टिळक महाराष्ट्र विद्यापीठ पुणे तात्त्विक व सामाजीक शास्त्रे विद्याशाखेंतर्गत इतिहास विभागात विद्यावाचस्पती (Doctor of Philosophy) पदवीसाठी सादर करावयाचा शोधप्रबंध.

# "History of Freedom Movement in Raigad (Kolaba) District" (1901-1947)

# "रायगड (कुलाबा) जिल्ह्यातील स्वातंत्र्य चळवळीचा इतिहास"

(१९०१ ते १९४७)

## * संशोधक *


श्री. भानुदास धोंडिबा शिंदे.

एम.ए.

रयत शिक्षण संस्थेचे,

महात्मा फुले कलाविज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, पनवेल, जिल्हा रायगड.


## * मार्गदर्शक *


प्राचार्य, डॉ. विजयराव नलावडे

एम.ए., बी.एड.,एम.फिल., पीएच.डी

रयत शिक्षण संस्थेचे,

कला व वाणिज्य महाविद्यालय, पुसेगाव

ता. खटाव, जि. सातारा.


## टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे.

मे २०११

# CERTIFICATE

This is to certify that the thesis entitled **"रायगड (कुलाबा) जेल्ह्यातील स्वातंत्र्य चळवळीचा इतिहास (१९०१-१९४७)" "History of Freedom Movement in Raigad (Kolaba) District" (1901-1947)"** which is being submitted herewith for the award of the Degree of Vidyavachaspati (Doctor of Philosophy) in **History** of Tilak Maharashtra Vidyapeeth,Pune is the result of original research work completed by **Shri Bhanudas Dhondiba Shinde** under my supervision and guidance. To the Best of my knowledge and belief the work incorporated in this thesis has not formed the basis for the award of any Degree or similar title of this or any other University or examining body.

**Place : Satara** **Research Guide**

**Date :25/04/2011**

I hearby declare that the thesis entitled "रायगड (कुलाबा) जिल्ह्यातील स्वातंत्र्य चळवळीचा इतिहास (१९०१-१९४७)" **"History of Freedom Movement in Raigad (Kolaba) District (1901-1947)** completed and written by me has not previously formed the basis for the award of any Degree or other similar title of this or any other University or examining body.

**Place : Panvel** **Research Student**

**Date 15/04/2011**

# ऋणनिर्देश

संशोधन कार्यासाठी प्रोत्साहन व प्रेरणा देणारे आदरणीय प्राचार्य एच.आर.मढवीकै. डॉ.एन.टी.गडदेडॉ.हिरा अधंताया प्राचार्य डॉ.विजयराव नलावडे प्राचार्य डॉ.गणेश ठाकूर प्राचार्य डॉ.के.एस.मोहिते प्राचार्य डॉ.गोर्गे प्राचार्य डॉ.एस टी.गडदे प्राचार्य डॉ.व्ही.के. खाडेप्रा.आर.डी.शिंदेप्रा.व्ही.एस.मेटकरीप्रा.पी.वाय कांबळेप्रा.ए.डी.आढाव व श्री. आय.डी.पवार यांच्यामुळे मी संशोधन कार्याकडे वळलो.त्यामुळे मी त्यांचा सर्वप्रथम ऋणी आहे.

**“रायगड(कुलाबा) जिल्ह्यातील स्वातंत्र्य चळवळीचा इतिहास (१९०१-१९४७)”** या विषयावर संशोधन करीत असताना माझे प्रेरणास्थानसतत प्रोत्साहन देऊन संशोधनात मार्गदर्शन करणारे माझे मार्गदर्शक प्राचार्य डॉ.विजयराव नलावडेकला व वाणिज्य कॉलेज पुसेगाव ता. खटाव,जि.सातारा यांनी मला सातत्याने मार्गदर्शन केल्यामुळेच हा प्रबंध पूर्ण करू शकलो.त्यामुळे मी सरांचा अत्यंत ऋणी आहे.तसेच संशोधन कार्यात वेळोवेळी सल्ला व मार्गदर्शन करत असल्याने मी प्रा.सौ.उज्वला नलावडे मॅडम यांचाही ऋणी आहे.

या संशोधन कार्यामध्ये सतत मदत व मार्गदर्शन करणारे प्राचार्य बिरबल शिंदे डॉ.एस.पी शिंदे उपप्राचार्य पी.के क्षिरसागर उपप्राचाय पी.व्ही.भिसे डॉ.एन.आर.मढवी प्रा.एस.व्ही.घोडके प्रा.सी.डी.धिंदळे डॉ.एस.के.बोराडे प्रा.डी.डी.गलांडे डॉ.ए. जे.घरत डॉ.बी.एस.चव्हाण प्रा.यु.एन.धायगुडे प्रा.आर.ए.पाटील प्रा.ऐ.जे.रोकडे प्रा.एस.व्ही.पाथरकर प्रा.ए.एम.सोहनी प्रा.टी.एम.माळवे प्रा.आयुश शेख.प्रा. व्ही.पी.पवार प्रा.व्ही.एस.जाधव ग्रंथपाल श्री.ए.एस.अवचिते श्री.सुहास कुपेकर गणेश धारेकरसंदिप डोंगळे आणि इतर सर्व कार्यालय सेवक तसेच माझ्या महाविद्यालयातील ज्युनिअर व सिनिअर विभागातील प्राध्यापक व कार्यालय सेवक यांनी मला संशोधन करीत असताना मदत केल्याबद्दल मी त्यांचा ऋणी आहे.

संशोधनाचे काम करत असताना वसंत भाऊ पाटील यांनी दुर्मीळ कागदपत्रे उपलब्ध करून दिली.श्री.प्रभाकर भुस्कुटे श्री.म.ना.पाटील श्री.ना.का.भगत श्री.दत्ता खानविलकर श्री.भगत गुरूजीश्री.भाई लंकेश्वर यांनी अत्यंत महत्त्वाचे ग्रंथ उपलब्ध करून दिले.पनवेल उरण कर्जत खोपोली पेण पाली माणगाव गोरेगाव महाड अलिबागरोहा येथील सार्वजनिक व शाळा महाविद्यालय ग्रंथालयाने असंख्य ग्रंथ उपलब्ध करून दिले.या ठिकाणच्या सर्व कर्मचाऱ्यांनी खूप चांगले सहकार्य केले म्हणून मी त्यांचा आभारी आहे.

माझ्या शैक्षणिक विकासामध्ये वडील श्री.धोंडिबा शिंदे व आई सौ.गोजाबाई शिंदे यांचा सिंहाचा वाटा आहे.त्यांचा आशीर्वाद आणि माझी पत्नी सौ.संगीता शिंदे हिची प्रेरणा व प्रोत्साहन सतत माझ्या पाठीशी असल्यामुळे मी हा प्रबंध पूर्ण करू शकलो.तसेच माझ्यावर मनापासून प्रेम करणारी माझी मावशी कै.सौ.पारूबाई दडस बहिण सौ.सुमन तरडे मामा श्री.दादासाहेब मोटे आणि श्री.देविदास शिंदेसौ.सुप्रिया शिंदे सौ.अनिता शिंदे श्री.शामराव मेटकरी शालन मेटकरी श्री.सुभाष मेटकरी श्री.तुकाराम गलांडेसौ.मेघा गलांडे यांच्या सतत प्रोत्साहामुळे व सहकार्यामुळे त्यांचा अत्यंत ऋणी आहे.विश्वजीत शिंदेअभिजीत शिंदेऋग्वेद शिंदेघार्गी शिंदे स्नेहा गलांडे सुप्रीत गलांडे या छोटॉंनी मदत केली.या संशोधनाचे टायपिंगचे काम करणारी निलिमा श्रीवर्धनकर व शुध्दलेखन तपासनी कविता पवार यांनी केले याबद्दल मी सर्वांचा अत्यंत ऋणी आहे.हा संशोधन प्रबंध लिहिण्यास अनेकांनी मला मदत केली.त्या सर्वांची नावे मी येथे नमूद करू शकत नाही.या सर्वांचे मी मनापासून आभार मानतो.

प्रा.भानुदास शिंदे.

# अनुक्रमणिका


| अ.नं | प्रकरणाचे नाव | पान नं. |
|---|---|---|
| १ | विषयप्रवेश | १ |
| २ | रायगड जिल्ह्यातील स्वातंत्र्य चळवळीचा उद्‌गम ते असहकार चळवळ | ५७ |
| ३ | सविनय कायदेभंग चळवळ - मीठ सत्याग्रह | १०५ |
| ४ | जंगल सत्याग्रह - चिरनेरचा जंगल सत्याग्रह | १४१ |
| ५ | १९४२ ची छोडो भारत चळवळ व भूमिगत आंदोलन | १९६ |
| ६ | मूल्यमापन (निष्कर्ष) | २४२ |
| ७ | परिशिष्ट | २६७ |
| ८ | संदर्भ सूची | २८० |
| ९ | छायाचित्रे | २८९ |
| १० | नकाशे | २९८ |

# प्रकरण - १ विषयप्रवेश

- ❖ **संशोधनाची रूपरेषा**
- ❖ **महाराष्ट्र राज्याचे प्रादेशिक विभाग :**
- ❖ **रायगड जिल्ह्याची सर्वांगीण माहिती :**
    - जिल्ह्याच्या निर्मितीचा इतिहास :
    - जिल्ह्याची प्राकृतिक रचना व स्वरूप :
    - जिल्ह्यातील नैसर्गिक संपत्ती :
    - जिल्ह्यातील जलसंपत्ती (नद्या खाड्या आणि बंदरे):
    - जिल्ह्यातील सामाजिक व धार्मिक जीवन:
    - जिल्ह्यातील आर्थिक स्थिती :
    - जिल्ह्यातील वाहतूक व दळणवळण:
    - जिल्ह्यातील सांस्कृतिक जीवन

छत्रपती शिवाजी महाराजांना आपल्या स्वराज्य निर्मितीसाठी कोकण व रायगड जिल्ह्याची भूमि येथील डोंगर किल्ले व जंगलमय प्रदेश फारच उपयुक्त ठरला. त्याचप्रमाणे तेथील लोकही स्वराज्य निर्मितीच्या कार्याने भारावून गेले होते. स्वराज्य निर्मिती व स्वराज्याचा विस्तार या कालखंडात मराठी माणूस 'स्वराज्य' प्रेमाने झपाटून गेला होता. अनेक शूरवीर या काळात निर्माण झाले होते. मराठयांची सत्ता वैभवाला पोहोचलेली होती. परंतु हा काळ फार दिवस टिकला नाही. व्यापाराच्या निमित्ताने या देशात इंग्रज, फ्रेंच, डच, पोर्तुगीज हे युरोपीय व्यापारी आले. व्यापार करता करता त्यांनी आपली राजकीय सत्ता निर्माण करण्याचा प्रयत्न केला. त्यात इंग्रज लोक यशस्वी झाले. ब्रिटिशांनी या देशातील ऐकक दुर्बल सत्ता नष्ट करून सर्व भारत देश आपल्या वर्चस्वा खाली आणला. मराठ्यांची सत्ता शेवटी नष्ट झाली.

भारतासारख्या खंडप्राय देशावर आपली सत्ता निर्माण केल्यानंतर या देशाचे प्रशासन चालविण्यासाठी ब्रिटिशांना इंग्लंडहून लोक आणणे शक्यच नव्हते. त्यांनी येथील लोकांनाच कारणापुरते इंग्रजी शिक्षण देवून त्यांचा प्रशासनात उपयोग करून घेतला व प्रशासनात सुलभता यावी म्हणून अनेक सुधारणा घडवून आणल्या. इंग्रजी शिक्षण, पाश्चात्य ज्ञान व निरनिराळ्या क्षेत्रात घडून आलेल्या सुधारणा याचे दूरगामी परिणाम येथील जनतेवर झाले. आधुनिक शिक्षण व पाश्चात्य ज्ञान यामुळे एकीकडे नवजागृती घडून येत होती तर दुसऱ्याबाजूला ब्रिटिशांच्या सत्तेचे दृढीकरण चालू होते. भारत ही एक ब्रिटिशांची सर्वात मोठी वसाहत झाली होती. त्यांनी या देशाचे अमाप आर्थिक शोषण चालविले होते.

ब्रिटिशांची जुलमी राजवट, प्रचंड प्रमाणातील आर्थिक लूट व साम्राज्यवादी धोरण यामुळे येथील जनतेला ही राजवट नकोशी वाटू लागली. तसेच आधुनिक शिक्षणाची ओळख झालेल्या सुशिक्षितामधून अनेक सामाजिक व राजकीय विचारवंत पुढे आले व त्यांनी सामाजिक व राजकीय प्रबोधन केले. अशा निरनिराळ्या कारणांनी या देशात राष्ट्रवाद वाढीस लागला. राष्ट्रवादाच्या वाढीमुळे या देशात राजकीय चळवळीस सुरूवात झाली व प्रादेशिक पातळीवर संघटना अस्तित्वात येवू लागल्या. देशव्यापी पातळीवर मात्र एकही संघटना अस्तित्वात नव्हती अशी एखादी संघटना असावी असे अनेक राजकीय नेत्यांना वाटत होते. त्यातूनच सन १८८५ मध्ये राष्ट्रीय कॉंग्रेसची स्थापना करण्यात आली. सन १८८५ ते १९०५ या काळात मवाळवाद्यांचा तर १९०५ ते १९२० या काळात जहालवाद्यांचा राष्ट्रीय राजकारणावर प्रभाव होता. १९२० पासून म. गांधीजींचा प्रभाव

वाढत जाऊन स्वातंत्र्याची चळवळ अधिकच तीव्र बनत गेली. या चळवळीमध्ये सर्वसामान्य माणसाचा सहभाग मोठŸाा प्रमाणात वाढत होता.

राष्ट्रीय स्वातंत्र्य चळवळीची ताकद वाढविण्याच्या हेतूने रायगड जिल्हा काँग्रेसने चळवळीत सहभाग घेतला. म. गांधीजींच्या नेतृत्वाखाली सुरू करण्यात आलेल्या असहकार आंदोलन, सविनय कायदेभंग चळवळ (मीठ व जंगल सत्याग्रह), वैयक्तिक सत्याग्रह आणि चले जव या चळवळीमध्ये लोकांनी वाढता सहभाग घेऊन चले जाव चळवळीला जनसमुदायाचे स्वरूप प्राप्त करून दिले. या सर्वसामान्य माणसांच्या कामगिरीचा आढावा घेण्याच्या उद्देशानेच रायगड जिल्हयातील स्वातंत्र्य चळवळीचा इतिहास १९०१ ते १९४७ या विषयाची संशोधनासाठी निवड केली.

## ❖ संशोधनाची रूपरेषा :–

### ➢ <u>विषय प्रवेश :–</u>

प्रारंभीच्या काळात काँग्रेसच्या नेतृत्वाखाली स्वातंत्र्याची चळवळ शहरापुरती व उच्चभ्र लोकांमध्ये केंद्रित झालेली होती. म. गांधीजींनी ही चळवळ सामान्य माणसाच्या झोपडीपयत पोहोचविण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे अडाणी, दारिद्रŸाात जगत असलेली जनता जागृता होऊन इंग्रजांच्या गुलामगिरीविरोधी स्वातंत्र्य चळवळीच्या प्रवाहाता हळुहळू सहभागी होत गेली. या लोकांच्यात प्रखर राष्ट्रवाद,स्वराज्य, स्वातंत्र्य या कल्पना रूजू लागल्या. त्यामुळे सर्वसामान्य माणसे, काँग्रेसचे कार्यकर्ते मोठŸाा संख्येने राष्ट्रीय चळवळीत सहभागी होऊ लागले. शिस्तबद्ध, कर्तव्यनिष्ठ व देशाभिमानी अशा स्वातंत्र्य सैनिकांमुळे म. गांधीजींनी सुरू केलेल्या स्वातंत्र्याच्या संघर्षात शेवट पयत लढणारे हजारो स्वातंत्र्य सैनिक निर्माण झाले. या स्वातंत्र्य चळवळीमध्ये आक्रमक राष्ट्रवाद आणि स्वातंत्र्य प्रेमी असलेले रायगड जिल्ह्यातील हजारो स्वातंत्र्य सैनिक मोठŸाा संख्येने सहभागी झालेले होते.

स्वातंत्र्याच्या लोकशाही प्रतिष्ठापनेसाठी स्वकीयांनी किंवा परकीयांनी चालविलेल्या दडपशाहीला तोंड देण्यासाठी अनेक लढे दिले गेले. त्यात कित्येक लोक सर्वस्वाचा त्याग करून धारातीर्थी पडले. २० व्या शतकाच्या प्रारंभी भारतासारख्या देशातील समाज कधी नव्हे अशा पद्धतीने आणि कधी नव्हे इतक्या प्रमाणात संघटित होऊन, ब्रिटिश सत्तेविरूद्ध उभे राहिले.

प्रखर राष्ट्रवादातूनच स्वराज्य,स्वातंत्र्य या संकल्पानांचा उदय झाला.रायगड जिल्ह्यातील स्वातंत्र्य चळवळीमध्ये राष्ट्रवाद, स्वराज्य, स्वातंत्र्यप्रेम या संकल्पना अधिक प्रभावीपणे दिसून येतात.ही संकल्पना रूजविण्याचा प्रयत्न लो.टिळक, ना.गोपाळ कृष्ण गोखले, वि.दा.सावरकर यांनी प्रयत्न केला.रामभाऊ मंडलिक, आत्माराम आठवले, रामजी घरत यांनी त्याचा प्रसार रायगड जिल्ह्यात करून लोकजागृतीचे कार्य केले.म.गांधीजींच्या नेतृत्वाखाली ज्या-ज्या चळवळी घडून आल्या.त्यामध्ये रायगड जिल्ह्याचे योगदान असल्याचे दिसून येते.मीठ सत्याग्रह, चिरनेर जंगल सत्याग्रह, महाड किसान मोर्चा, १९४२ मधील घातपाती कारवाया इ.महत्वपूर्ण घटनामध्ये रायगड जिल्ह्यातील सर्वसामान्य लोकांनी निष्ठेने,त्यागाने कार्य केले.परंतु राष्ट्रीय इतिहासात त्याची नोंद होऊ शकली नाही.अशा तळागाळातील सर्वसामान्य माणसांच्या कार्याचा इतिहास लोकांच्या समोर मांडण्याचा प्रयत्न करत आहे.त्या आधारेच काही उद्देश डोळ्यांसमोर ठेवलेले आहेत.

१)रायगड जिल्ह्यातील स्वातंत्र्य चळवळीचा इतिहास अभ्यासणे व त्यातील तपशीलवार घटना लोकांच्या समोर मांडणे.

२)स्वातंत्र्य चळवळीतील स्थानिक नेतृत्व व त्यांची भूमिका व कार्य अभ्यासणे.

३)स्वातंत्र्य चळवळीची व्याप्ती व स्वरूप अभ्यासणे.

४)रायगड जिल्ह्यातील स्वातंत्र्य चळवळीची राष्ट्रीय स्वातंत्र्य चळवळीशी असलेली समरूपता व सहकार्य अभ्यासणे.

५)रायगड जिल्ह्यातील सर्वसामान्य जनता,आदिवासी, स्त्रिया, दलित मुले यांच्या कामगिरीचा अभ्यास करणे.

हे उद्देश डोळयासमोर ठेवूनच संशोधन कार्याला सुरूवात केली.त्यातून शोध प्रबंधाचे लेखन केले आहे.

## ➢ संशोधन विषयाची निवड :–

भारतीय स्वातंत्र्य चळवळीचा इतिहास हा गौरवशाली इतिहास आहे.भारतातील निरनिराळ्या भूप्रदेशातील ब्रिटिशांविरोधी स्वातंत्र्य चळवळीचा अभ्यास करण्यात आलेला आहे. रायगड जिल्ह्यामध्ये स्वातंत्र्यासाठी विविध चळवळी घडून आल्या.त्यातील काही घटनांचा म्हणजे चिरनेर जंगल सत्याग्रह, भाई कोतवालाच्या घातपाती चळवळी यांच्या नोंदी राष्ट्रीय इतिहासामध्ये घेण्यात आलेल्या आहेत.त्याचे आकर्षण आणि स्वातंत्र्य चळवळी बद्दलची सामान्य लोकांची प्रखर

विचारधार असलेली दिसून आली. त्याच बरोबर प्रभाकर गुप्ते, द. श. गोडबोले, शंकरभाई गांधी यांच्या हस्तालिखितांचे वाचन केले. त्यामधून स्वातंत्र्य चळवळीची तीव्रता दिसून आली. या स्वातंत्र्य चळवळीमध्ये रायगड जिल्ह्यातील नेते, सामान्य जनता, स्त्रिया,आदिवासी, विद्यार्थी यांच्यातील आक्रमक राष्ट्रवाद व स्वातंत्र्यप्रेमामुळे सखोल संशोधनाची प्रेरणा मिळाली. या स्वातंत्र्य चळवळीचा सविस्तर अभ्यास करण्याच्या हेतूने **"रायगड जिल्ह्यातील स्वातंत्र्य चळवळीचा इतिहास"** या विषयाची निवड केली.

## ➢ संशोधन विषयाचा कालखंड :–

इ. स. १८५८ नंतर कंपनी सरकारचे राज्य जावून सरकारने आपल्याकडे कारभार घेतल्यानंतर प्रथमच संपूर्ण भारत देश एकछत्री अमलाखाली आला. त्यामुळे भारत एकसंघ राष्ट्र बनण्याच्या प्रक्रियेची सुरूवात झाली. राष्ट्रवाद हा प्रादेशिक न रहाता तो देश व्यापी बनत गेला. त्याबरोबरच स्वराज्याची कल्पनाही व्यापक बनत गेली. हा देश ब्रिटिश सत्तेपासून मुक्त, स्वतंत्र केला पाहिजे असा अर्थ स्वराज्य या शब्दाला प्राप्त झाला. परंतु १८९८ मध्ये लॉर्ड कर्झन हा भारताचा गव्हर्नर म्हणून आला. त्याने आपली हुकूमशाही राजवट निर्माण करण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे सर्वसामान्य जनता अधिक जागृत व आक्रमक बनू लागली. याचा प्रत्यक्ष अनुभव १९०५ मध्ये केलेल्या बंगालच्या फाळणीत दिसून आला. बंगालच्या फाळणी विरोधी वंगभंग चळवळ सुरू झाल्याने जनतेने मोठÎा प्रमाणात प्रथमच सहभाग घेतलेला दिसून येतो. यावरून सर्वसामान्य जनतेला स्वातंत्र्याची जाणीव झाल्याचे स्पष्ट जाणवते.

याच दरम्यान रायगड जिल्ह्यातील सर्वसामान्य जनता स्वातंत्र्यासंदर्भात जागृत होऊ लागलेली होती. सन १८९६ मध्ये पडलेल्या दुष्काळाच्या वेळी लो. टिळकांनी घेतलेल्या आक्रमक भूमिकेचा प्रसार मोठÎा प्रमाणात रायगड जिल्ह्यात झालेला दिसून येतो. तसेच रायगड जिल्ह्यातील अभिनव भारत संघटनेने ब्रिटिश सरकार व अधिकाऱ्यांविरोधी घेतलेल्या भूमिकेच्या प्रभावामुळे रायगड जिल्ह्यातील आक्रमकता, प्रखर राष्ट्रवाद आणि स्वातंत्र्य प्रेम दिसून येते. याच प्रभावामुळे स्वातंत्र्य चळवळीत प्रथमच मोठÎा संख्येने सर्वसामान्य जनता सहभागी होऊ लागल्याने स्वातंत्र्य चळवळ दिवसेंदिवस अधिक आक्रमक बनत गेली. सर्वसामान्य जनतेच्या आक्रमकतेची सुरूवात आणि २० व्या शतकाच्या प्रारंभ या अर्थाने संशोधनासाठी १९०१ ते १९४७ असा मर्यादित स्वरूपाचा कालखंड निवडण्यात आला.

## ➢ संशोधन विषयाची व्याप्ती :–

रायगड जिल्ह्यातील स्वातंत्र्य चळवळीचा इतिहास १९०१–१९४७ हा कालखंड आणि जिल्हा प्रादेशिक विस्ताराचा विचार करून संशोधन विषयाची व्याप्ती निश्चित करण्यात आली. वास्तविक पहाता घडलेल्या घटनांच्या तपशीलवार नोंदी उपलब्ध सामग्रीच्या आधारे व विषयाच्या अनुशंगाने सदर शोध प्रबंधाची व्याप्ती रायगड जिल्ह्यापुरती मर्यादित व १९०१ ते १९४७ या कालखंडात ठेवण्यात आलेली आहे. या काळातील असहकार आंदोलन, सविनय कायदेभंग चळवळ (मीठ सत्याग्रह व जंगल सत्याग्रह) वैयक्ति सत्याग्रह, १९४२ ची चले जाव चळवळ आणि त्या अनुषंगाने घडून आलेल्या संघर्षात्मक घटनांचा इतिहास मांडण्याचा प्रयत्न या ठिकाणी केलेला आहे. रायगड जिल्ह्याचा स्वातंत्र्य लढा आक्रमक असून राष्ट्रीय स्वातंत्र्य चळवळी बरोबरच झालेला आहे. त्यामुळे स्थानिक पातळीच्या स्वातंत्र्य लढÝामुळे राष्ट्रीय स्वातंत्र्य लढÝाची ताकद वाढत गेली. परिणाम १९४७ मध्ये भारताला स्वातंत्र्य मिळण्यास मदत झाली.

## ➢ संशोधन विषयाची मर्यादा :–

संशोधनासाठी घेतलेला विषय हा रायगड जिल्ह्यातील स्वातंत्र्य चळवळीपुरता मर्यादीत आहे व त्याचा कालखंडही १९०१ ते १९४७ असा आहे. रायगड जिल्ह्यातील स्वातंत्र्य चळवळीवर सखोल संशोधन व अभ्यास झालेला नसल्यामुळे हा विषय घेतलेला आहे. त्याचे संशोधन स्थानिक पातळीपयंत अगदी खेडÝापाडÝांतील चळवळीचा सखोल अभ्यास व्हावा म्हणून रायगड जिल्ह्यापुरता हा विषय निवडला आहे. जिल्ह्यापुरती मर्यादा घालून घेतल्याने या जिल्ह्यातील संपूर्ण स्वातंत्र्य चळवळीचा अभ्यास झालेला आहे. स्थानिक पातळीपयतच्या नेत्यांचे कार्य येथे अभ्यासता आले आहे. या अभ्यासामुळे रायगड जिल्ह्याने राष्ट्रीय स्वातंत्र्य चळवळीला कशी ताकद दिली होती हे स्पष्ट होते. भारतीय स्वातंत्र्य चळवळीतील या जिल्ह्याचे योगदान महत्वपूर्ण आहे.

## ➢ संशोधनाची उद्दिष्टे :–

महाराष्ट्र राज्याच्या कोकण प्रशासकीय विभागातील रायगड हा एक जिल्हा आहे. या जिल्हयामध्ये जी स्वातंत्र्य चळवळ घडून आली. त्यासंदर्भात संशोधनाचा अभ्यास करत असताना संशोधनाची कांही उद्दीष्टे ठरविण्यात आलेली आहेत.

१) रायगड जिल्ह्याची सर्वागींण माहिती घेणे म्हणजे जिल्ह्याचा ऐतिहासिक मागोवा व निर्मितीचा

इतिहास, भौगोलिक स्थान व रचना याचा अभ्यास करणे.

२)जिल्ह्याची सामाजिक, आर्थिक, धार्मिक व सांस्कृतिक जीवनाची ओळख करून घेणे.

३)रायगड जिल्ह्यातील प्रबोधन चळवळीची पार्श्वभूमी तपासणे.

४)लोक जागृतीतून स्वातंत्र्य चळवळीच्या उदयास जबाबदार घटकांच्या नोंदी घेणे.

५)म.गांधीजींच्या चळवळीचा रायगड जिल्ह्यावर पडलेला प्रभाव पहाणे.

६)स्थानिक नेत्यांची चळवळी संदर्भात भूमिका-नियोजन तपासणे.

७)स्थानिक चळवळीसाठी प्राप्त केलेल्या आर्थिक मदतीचा अभ्यास करणे.

८)चळवळीत सहभागी झालेली सर्वसामान्य जनता, शेतकरी, आदिवासी, स्त्रिया, दलित, विद्यार्थी वर्गाचे योगदानाचा अभ्यास करणे.

९)मूठभर उच्चप्रभू लोकांच्या हवेलीपासून ते गरिबांच्या झोपडीपयत आणि आदिवासींच्या पाडÿापयत स्वातंत्र्य चळवळीचा प्रसार कसा झाला हे पहाणे.

१०)प्रखर राष्ट्रवाद व स्वातंत्र्य प्रेमातून निर्माण झालेली आक्रमकता आणि त्यातून चळवळीची वाढती व्यापकता याचा शोध घेणे.

## ➢ <u>संशोधनाची गृहितकृत्ये :-</u>

इंग्रजांनी प्रगत सुधारणावादी धोरणाबरोबरच भारतीयांचे शोषण हे धोरण अवलंबले होते. त्यामुळे २० वे शतक परिवर्तनाचे, विकासाचे आणि क्रांतिकारी विचार मंथनाचे शतक ठरले.याच शतकात सामाजिक चळवळीबरोबर राजकीय चळवळी विकसीत झाल्या.म.गांधीजींच्या नेतृत्वाखाली स्वातंत्र्याची चळवळ दऱ्याखोऱ्यात रहाणाऱ्या लोकांपायत पोहोचली.त्यामुळे स्वातंत्र्य चळवळीमध्ये जनतेचा सहभाग वाढत गेला.कारण ब्रिटिश सरकारने अंमलात आणलेली अन्यायकारक करपद्धती, नवे कायदे यामुळे सामान्य लोकांच्या पारंपारिक व्यवसाय, रहाणीमान आणि जीवन शैलीवर वाईट परिणाम झाले.या परिणामातून रायगड जिल्ह्यातील अभिनव भारत संघटन आणि लो.टिळकांच्या आक्रमक विचारधारेच्या धोरणातून ब्रिटिशांना विरोध होऊ लागला. याच आक्रमकतेच्या पार्श्वभूमीवर रायगड जिल्ह्यामध्ये स्वातंत्र्य लढÿाची तीव्रता वाढत गेली. म.गांधीजीच्या नेतृत्वाखाली स्वातंत्र्याचा लढा सुरू झाल्याने त्यामध्ये जनता सहभागी होऊ लागली.मीठ सत्याग्रह व जंगल सत्याग्रहाच्या स्वरूपात चळवळ व्यापक बनत गेली.या चळवळी मध्ये उच्च शिक्षित, अडाणी, सामान्य जनता, स्त्रिया, आदिवासी दलित यांनी मोठÿा प्रमाणात

सहभाग घेतला . जनतेच्या वाढत्या सहभागामुळे स्वातंत्र्य चळवळीची व्याप्ती वाढत गेली . रायगड जिल्ह्यातील स्वातंत्र्य चळवळीमुळे राष्ट्रीय स्वातंत्र्य चळवळीला एक प्रकारे मदत झाली आहे . या स्वातंत्र्य चळवळीमध्ये प्रत्येक घर हे एक स्वातंत्र्य चळवळीचे केंद्र बनले प्रत्येक घरातील माणूस स्वातंत्र्य सैनिक बनून स्वातंत्र्याचा लढा लढत होता म्हणूनच भारताची ब्रिटिशांच्या गुलामगिरीतून मुक्तता होऊन भारताला स्वातंत्र्य प्राप्त झाले .

## ➢ <u>संशोधन समस्या सूत्रण :-</u>

भारतीयांना स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी म . गांधीजींनी व त्यांच्या सहकाऱ्यांनी शांतीच्या मार्गाने संघर्ष केलेला होता . या संघर्षातून स्वातंत्र्य चळवळ निर्माण झाली . ही चळवळ उभारताना रायगड जिल्ह्यातील स्थानिक नेत्यांना अनेक अडचणींना तोंड द्यावे लागले . प्रारंभीच्या काळात मूठभर लोकांच्या मदतीने चळवळ उभी राहीली . तिला जनसमुदायाचे स्वरूप देण्यासाठी रामभाऊ मंडलिक, आप्पासाहेब वेदक, प्रभाकर गुप्ते, भाई कोतवाल, ना . ना . पाटील यासारख्या नेत्यांनी लोकांच्यात राष्ट्रवाद व स्वातंत्र्य प्रेम निर्माण करण्यासाठी सभा, बैठका, प्रचार, मोर्चा यांचा उपयोग केला . या घटनांचा शोध घेणे एक समस्या होती . या शिवाय स्वातंत्र्याचे आंदोलन उभे करण्यासाठी आर्थिक प्रश्न मोठा होता . म . गांधीजींच्या नेतृत्वाखाली सुरू झालेल्या असहकार आंदोलन, सविनय कायदेभंग चळवळ, चलेजाव चळवळ या आंदोलनापासून जनतेच्या वाढत्या सहभागावरून स्वातंत्र्य प्रेमाची तीव्रता स्पष्ट दिसून येते . ही तीव्रता निर्माण होण्यास अनेक घटक जबाबदार असल्याने त्या घटकांची समस्या निर्माण झालेली होती .

## ➢ <u>संशोधनाची सैद्धांतिक कल्पना :-</u>

अठराव्या शतकात युरोपमध्ये राष्ट्रवादाचा जन्म झाला असे मानले जाते . राष्ट्र व राष्ट्रभूमी यांना आदर्श मानून त्यावर निष्ठा ठेवणारी आधुनिक राजकीय विचार प्रणाली व त्यावर आधारलेला ध्येयवाद व १९ व्या शतकापासून युरोपच्या इतिहासाला दिशा देणारी एक प्रमुख प्रेरण म्हणून राष्ट्रवादाचा निर्देश करता येईल . राष्ट्रवाद म्हणजे राष्टाचे स्वातंत्र्य आणि एकता कायम राखणे . ही स्वयंसिध्द नैतिक भुमिका होय . व्यक्ति स्वातंत्र्यास पुरक असलेल्या राष्ट्र स्वातंत्र्याचा आग्रह धरावयास हवा अशी उदारमतवादांची भुमिका आहे . जॉन स्टुअर्ट मिल, जोसेफ मॅझिनी, वुड्रो विल्सन यांनी त्याचे समर्थन केले .

भारतामध्ये इंग्रजांनी आपल्या वसाहती स्थापन करुन त्याचे साम्रज्यात रुपांतर केले .

साम्राज्याच्या विविध अंगांनी  विचार करुन त्याचे इतिहास लेखन सुरु केल्याने साम्रज्यवादी इतिहास लेखनाचा प्रवाह उदयास आला.राष्ट्रवादी इतिहासकारांनी ब्रिटिश राजवटीच्या साम्रज्यवादाचे अंतरंग उघडल्याने भारतीय इतिहास लेखनाचे स्वरुप बदलले.साम्रज्यवादी भुमिकेच्या विरोधात राष्ट्रवादी इतिहासकारांनी राष्ट्रीय लढ्यामधील विचारसरणी, संकल्पना, लढ्याची तीव्रता आणि अभिजात वर्गाच्या वैचारिक नेतृत्वाची भुमिका महत्वाची मनली.वसाहतवादाविरोधी उभी राहिलेली प्रत्येक चळवळ व प्रतिकार हे कॉंग्रेसच्या नेतृत्वाला शिरोधार्य मानत होती.या धारणेनुसार त्यांनी आपले इतिहास लेखन केले.कॉंग्रेसचा इतिहास व राष्ट्रीय नेत्यांचा चरित्रक्रम यांना केंद्रवती ठेऊन भारतीय स्वातंत्र्य चळवळीचे इतिहास लेखन केले.स्थानिक पातळीवर सर्वसामान्य लोकांनी जी चळवळ उभी करुन स्वातंत्र्य चळवळीची ताकद वाढवली.परंतु त्यांना या इतिहास लेखनामध्ये स्थान देण्यात आलेले नव्हते.अश्या वंचित किंवा तळागाळातील लोकांच्या स्वातंत्र्य लढ्याचा शोध घेण्याचा प्रयत्न केलेला आहे.

भारतीय सबाल्टर्न इतिहास लेखनाचे प्रवर्तक डॉ.रणजीत गुहा यांनी १९८० च्या दशकाच्या सुरुवातीस प्रथमच भारतीय समाजस्थितीच्या संदर्भात या संकल्पनेचा अवलंब केला.सबाल्टर्न यास डॉ.अरविंद देशपांडे वंचित, डॉ.सुमित सरकार तळाकडून इतिहास, डॉ.ज्ञानेंद्र पांडे निम्मनवर्गीय इतिहास व डॉ.उमेश बगाडे शोषित व अंकितांचा इतिहास असे संबोधितात.सबाल्टर्नांनी तळागाळातील कर्तृत्ववान व्यक्तिांच्या व्यक्तिमत्वाचा व कार्याचा परिचय करुन देण्याचा व त्यांना इतिहासाच्या मुख्य प्रवाहात आणण्याचा संकल्प समोर ठेवला आहे.त्यांच्या कृतीचा व विचारांचा एकत्र विचार केला जावा.इतिहासात सामान्यांचा इतिहास स्पष्ट व्हावा मग तो जगातील कोणत्याही राष्ट्रचा किंवा भारताचा अथवा एखाद्या विशिष्ट स्थानिक प्रदेशाचा इतिहास असो.स्थानिक प्रदेशाचा इतिहास मांडण्यासाठीच रायगड जिल्हयातील स्वातंत्र्य चळवळीचा इतिहास या विषयाची निवड करुन त्यांचा इतिहास मांडण्याचा प्रयत्न केलेला आहे.

राष्ट्रीय स्वातंत्र्य चळवळीमध्ये देशात महाराष्ट्र राज्य आघाडीवर होते.लो.टिळकांच्या काळात देशाच्या स्वातंत्र्य लढ्याचे महाराष्ट्राने नेतृत्व केलेले होते.त्यांच्या काळात पुणे हे महाराष्ट्राचे व भारतीय स्वातंत्र्य लढयाचे केंद्र बनले होते.महाराष्ट्रात प्रामुख्याने मुंबई-पुणे प्रदेशात स्वातंत्र्य चळवळीची तीव्रता मोठया प्रमाणात होती.त्याचा परिणाम जवळ असलेल्या रायगड जिल्ह्यावरही झालेला दिसून येतो.त्यामुळे रायगड जिल्ह्यात स्वातंत्र्य चळवळीची तीव्रता

दिवसेंदिवस वाढत गेलेली दिसते. आद्यक्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके, लो. टिळक, ना. गोपाळ कृष्ण गोखले, वि. दा. सावरकर यांच्या विचारांचा प्रभाव जिल्ह्यावर होता. लो. टिळकांनी राष्ट्रवाद व स्वातंत्र्य प्रेम रूजविण्याचा प्रयत्न केला. त्यांच्या विचारांचे पुरस्कर्ते रामभाऊ मंडलिक, माधवराव गोसावी, आत्माराम आठवले यांनी रायगड जिल्ह्यांमध्ये आक्रमक राष्ट्रवादाचा प्रसार केल्याने लोकजागृती होऊन स्वातंत्र्य चळवळीला पाठिंबा वाढत गेला. ब्रिटिशांची सत्ता नष्ट करून या देशात स्वत:चे स्वराज्य निर्माण करणे हा उद्देश प्रारंभी होता. म. गांधीजींच्या असहकार आंदोलनाच्या वेळी ब्रिटिशांच्या कार्यावर व कार्यपद्धतीवर बहिष्कार टाकण्यात आला. यावेळी महाराष्ट्रात कायमची वकिली सोडणाऱ्या दोन वकिलांपैकी अलिबागचे माधवराव गोसावी हे एक होते. या मागे स्वराज्य हीच प्रेरणा होती.

स्वातंत्र्य चळवळीची व्याप्ती जसजशी वाढत गेली तसतसा आक्रमक राष्ट्रवाद आणि स्वातंत्र्याची संकल्पाना लोकांच्यात रूजत गेली. स्वातंत्र्य चळवळीच्या वातावरणामुळे प्रभावीत होऊन प्रभाकर गुप्तेंनी स्वातंत्र्य संग्रामात उडी घेतली ते म्हणतात की "मी स्वातंत्र्य प्रेमाने भारावून जाऊन शिक्षणाला रामराम ठोकला. इंग्रजांच्या साम्राज्याचा सूर्यास्त केल्या शिवाय मी शांत बसणार नाही." त्यावरोबरच मीठ सत्याग्रह,जंगल सत्याग्रहाचा पनवेल परिसरात प्रचार करून लोक जागृतीचे कार्य केले. त्यामुळे चिरनेर जंगल सत्याग्रहांमध्ये नाग्या कातकरीसारखा आदिवासी सहभागी होऊन या सत्याग्रहात तो हुतात्मा झाला. देशाच्या इतिहासात नोंद घेतलेली घटना म्हणजे चिरनेरचा जंगल सत्याग्रह आणि त्यामध्ये ९ स्वातंत्र्य सैनिक हुतात्मे झाले. यावरूनच रायगड जिल्ह्यात प्रखर राष्ट्रवाद व स्वातंत्र्य प्रेमाची जाणीव झाल्याचे दिसून येते.

१९४२ च्या लढयासंदर्भात अलिबागच्या ना. का. भगत यांनी मुलाखतीत स्पष्ट केले की, श्री. भगत यांना पोलिसांनी कैद केले तेव्हा त्यांची आई म्हणाली की, मला ७ मुले आहेत. त्यापैकी एक देशाच्या स्वातंत्र्यासाठी अर्पण करते. यावरून एका सामान्य अशिक्षित स्त्रिच्या मनातील स्वातंत्र्याची भावना स्पष्ट होते. नाना पुरोहित यांच्या नेतृत्वाखाली महाड किसान मोर्च्याच्यावेळी झालेल्या गोळीबारात सात स्वातंत्र्य सैनिक हुतात्मे झाले. कर्जत तालुक्यात घातपाती कारवाया करत असताना जिल्ह्याचे साम्यवादी नेते भाई कोतवाल आणि त्यांचे सहकारी गोमाजी पाटील व हिराजी पाटील हे पितापुत्र गोळीबारात हुतात्मे झाले. अशा अनेक हुतात्म्यांच्या व स्वातंत्र्य

सैनिकांच्या राष्ट्रीय चळवळ वाढत गेली. देशव्यापी झाली व त्यामुळे आपणांस स्वातंत्र्य मिळण्यास मदत झाली.

## ➢ संशोधनाचे तंत्र :-

संशोधन विषयाचा अभ्यास करत असतान संशोधनाच्या काही तंत्रांचा अभ्यास करण्यात आलेला आहे. यासाठी विषयाच्या संदर्भातील कागदपत्रांची निवड केली. त्यानंतर कागदपत्रांचे वर्गीकरण करून प्राथमिक व दुय्यम साधनांमध्ये त्याचे विभाजन करण्यात आले. निवडलेल्या कागदपत्राचे संघटन,वर्गीकरण, मूल्यमापन व स्पष्टीकरण या तंत्राच्या आधारे त्यांची सत्यता तपासण्यात आली. त्याबरोबरच स्वातंत्र्य सैनिकांच्या मुलाखती, प्रश्नावली, स्वातंत्र्य चळवळीच्या अभ्यासकांसी चर्च्या करण्यात आली. इत्यादी संशोधन तंत्रांचा उपयोग या संशोधनासाठी करण्यात आलेला आहे.

## ➢ संशोधन पद्धती :-

इतिहास संशोधन पद्धतीनुसार सदर विषयाचा अभ्यास करण्यात आलेला आहे. विषयाची निवड कागदपत्राचे संघटन, वर्गीकरण, मूल्यमापन व स्पष्टीकरण या सर्व प्रक्रियेतून हे संशोधन पूर्ण झाले आहे. अस्सल कागद पत्रांचा शोध घेण्याचा प्रयत्न केला आहे. प्राथमिक साधनांचा पुरेपुर वापर करून संशोधन केले आहे व जेथे प्राथमिक साधने उपलब्ध नाहीत तेथे दुय्यम साधनाचा आधार घेवून संशोधनात सत्यता राखण्याचा पुरेपुर प्रयत्न केला आहे.

रायगड जिल्ह्यातील स्वातंत्र्य चळवळीचा अभ्यास करताना प्रभाकर गुप्ते, शंकरभाई गांधी, द. श. गोडबोले या स्वातंत्र्य सेनानीची हस्तलिखिते, व नाना काणे, श्रीकांत देशपांडे व इतर अनेक स्वातंत्र्य सैनिकांची पत्रे, सरकारी अहवाल, मुलाखती यांच्या आधारे अनेक नव्या घटनांचा शोध घेण्याचा प्रयत्न करण्यात आलेला आहे. त्यामुळे सैद्धांतिक संशोधन पद्धतीचा प्रामुख्याने उपयोग केलेला आहे.

अनेक स्वातंत्र्य सैनिकांचे आत्मचरित्र, चळवळीच्या घटनासंदर्भात प्रकाशित झालेली माहिती आणि नव्याने प्राप्त झालेली माहिती यांची सुसंगत मांडणी करून नवा आशय व अर्थ शोधण्याचा प्रयत्न करून आता पयत राहिलेल्या उपेक्षित, दुर्लक्षित, विस्मृत घटनांवर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न केलेला आहे. व्यावहारिक जीवनाशी संबधित विषय आणि समस्याबाबत यथार्थ ज्ञान मिळविण्यासाठी व्यावहारिक संशोधन पद्धतीचाही उपयोग केलेला आहे.

संशोधन पद्धतीनंतर संशोधनाचे विवेचन हे अतिशय महत्वाची पायरी आहे. संशोधन विवेचनामध्ये ऐतिहासिक पृथक्करणात्मक भूमिका घेऊन सत्य शोधण्याचा प्रयत्न करून योग्य नव्या स्वरूपात त्याची मांडणी करणे. पृथ्थकरण पद्धतीत अवलोकन, चिकित्सकता, सावधानता, ऐतिहासिकता, वस्तुनिष्ठता या सर्व गुणांचा संच झालेला असतो हेच संशोधनाचे मुळ स्वरूप आहे. त्याच्या आधारे विषयाचे स्पष्टीकरण मांडलेले आहे.

ऐतिहासिक पद्धती बरोबरच, विस्तरण पद्धतीचा उपयोग करून विविध प्रदेशातील विविध घटनांची सविस्तरपणे मांडणी केलेली आहे. म. गांधीजींच्या आदेशानुसार रायगड जिल्ह्यामध्ये सविनय कायदेभंग चळवळ सुरू झाली. या चळवळीच्या काळात प्रथम मीठ सत्याग्रह, कल्हे जंगल सत्याग्रह, चिरनेर जंगल सत्याग्रह आणि नेतृत्ववाद याबाबत मतभिन्नता असल्याचे दिसून येते. त्या संदर्भात सत्य साधनाच्या आधारे निष्कर्ष मांडण्यात आलेले आहेत. त्यामुळे संशोधन प्रबंध रचनेच्या कार्यास प्रारंभ केला.

## ➢ संशोधनाची प्रबंध रचना :-

संशोधनाच्या विविध अवस्था पार पाडल्यानंतर संशोधन प्रबंधाची रचना आणि त्याचे लेखन अतिशय महत्वाचे आहे. या संशोधन प्रबंध रचनेमध्ये एकूण सहा प्रकरणाचा समावेश केलेला आहे. शिवाय संशोधनास उपयुक्त असलेली इतर माहितीही आहे. त्यामध्ये परिशिष्टे, संदर्भ सूची, छात्राचित्रे, नकाशे इ. समावेश आहे.

**संशोधन प्रंबधाची रचना :-**

१)विषयप्रवेश

३)सविनय कायदेभंग चळवळ - मीठ सत्याग्रह

२)रायगड जिल्ह्यातील स्वातंत्र्य चळवळीचा उद्‌गम ते असहकार चळवळ

४)जंगल सत्याग्रह - चिरनेरचा जंगल सत्याग्रह

५)१९४२ ची छोडो भारत चळवळ व भूमिगत आंदोलन

६)मूल्यमापन (निष्कर्ष)

सह्याद्रीच्या पर्वतरांगांमुळे महाराष्ट्राचे भौगोलिकदृष्ट्या दोन विभाग पडलेले आहेत.ते म्हणजे कोकण आणि देश होय.पश्चिमेकडील भागाला कोकण तर पूर्वेकडील प्रदेशाला देश असे म्हणतात.प्रामुख्याने महाराष्ट्राची किनारपट्टी व त्याच्या आसपासच्या प्रदेशाचा समावेश कोकणात होतो.कोकणामध्ये पूर्वी रायगड(कुलाबा) ठाणे, रत्नागिरी या जिल्ह्याचा समावेश होत होता.सध्या रत्नागिरी जिल्ह्याचे विभाजन होऊन नवीन सिंधुदुर्ग जिल्हा निर्माण करण्यात आला आहे.या संपूर्ण कोकण विभागाला पूर्वीपासून राजकीय महत्त्व असलेले दिसून येते.छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळात स्वराज्य स्थापनेच्या दृष्टीने अनन्यसाधारण महत्त्व या प्रदेशाला आलेले होते.छत्रपती शिवाजी महाराजांनी आदिलशाही व मोगलशाही यासारख्या बलाढ्य शत्रूंना सह्याद्री पर्वतातील किल्ले व घनदाट जंगलाचा आश्रय घेऊनच शह दिला.छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्वराज्य उभारणीत कोकण प्रदेशाचा अतिशय महत्वाचा उपयोग झालेला दिसतो.मैदानी प्रदेशातील शहरांना असलेला शत्रूंचा धोका ओळखून शिवाजी महाराजांनी आपल्या राजधानीसाठीदेखील अशा अवघड प्रदेशातील रायगड किल्ल्यांची निवड केलेली होती.याच गडावर शिवाजी महाराजांनी स्वत:चा राज्याभिषेक केला.स्वराज्याची राजधानी म्हणून रायगडची निवड झाल्यामुळे रायगड हे नाव भारतीय इतिहासात सर्व परिचित झाले.

शिवकाळात या प्रदेशातील मावळ्यांनी स्वराज्य स्थापनेसाठी व पेशवे काळात मराठी राज्याचा विस्तार करण्यासाठी खूपच मदत केलेली होती.पेशव्यांचे मूळ घराणे श्रीवर्धन गावचे होते.हे गाव याच प्रदेशातील आहे.मराठेशाहीच्या काळात या कोकणवासीयांनी व रायगड जिल्ह्यातील लोकांनी स्वराज्य उभारण्यात खूपच सक्रियता दाखविलेली दिसते.कालांतराने मराठेशाही कमकुवत होत गेली.दुसऱ्या बाजीरावाच्या काळात तिचा शेवट झाला.त्याबरोबर ब्रिटिशांनी या प्रदेशात आपली सत्ता निर्माण केली.मराठी सत्तेच्या विनाशाबरोबर कोकणवासी लोकांमधील राजकीय सक्रियताही हळूहळू लोप पावली.पुढील शंभर वर्षाच्या काळात या विभागावर ब्रिटिशांचा एकछत्री अंमल होता.या प्रदेशात पुन्हा राजकीय जागृती होण्यासाठी २० वे शतक उजाडावे लागले.स्वत:च्या हक्काची जाणीव लोकांना झाल्यामुळे राष्ट्रवाद निर्माण झालेला दिसून येतो.राष्ट्रवादामुळे भारतीय राष्ट्रीय काँग्रेसची स्थापना झाली.तिच्या नेतृत्वाखाली भारतात स्वातंत्र्य चळवळ सुरू करण्यात आली.

आद्य क्रांतिकारक वासुदेव बळवंत फडके, लोकमान्य टिळक, नामदार गोखले या राष्ट्रीय नेत्यांचा प्रभाव, त्यांच्या विचारातूनच रायगड जिल्ह्यात स्वातंत्र्य चळवळीची पार्श्वभूमी तयार झालेली दिसून येते. त्यांच्या प्रेरणेमुळेच रायगड जिल्ह्यातील अनेक नेत्यांनी स्वातंत्र्य चळवळीसाठी महत्त्वपूर्ण योगदान दिल्याचे दिसते. त्यामध्ये श्री. रामभाऊ नारायण मंडलिक, श्री. आत्माराम आठवले, श्री. रामजी घरत, श्री. नाना काणे, श्री. चिंतामणीशास्त्री जोशी, श्री. केशव गुप्ते, श्री. प्रभाकर गुप्ते, श्री. ना. ना. पाटील इत्यादी अनेक व्यक्तींचे कार्य स्वातंत्र्य चळवळीच्या दृष्टीने महत्त्वाचे आहे. ब्रिटिश राजवटीविरोधात रायगड जिल्ह्यामध्ये स्वातंत्र्य चळवळ विकसित झाली. या प्रदेशातील आदिवासी, शेतकरी, कामगार, स्त्रिया, विद्यार्थी, सुशिक्षित वर्ग मोठ्या संख्येने या चळवळीत सहभागी झालेला होता. त्यांच्या सहभागामुळे चळवळ यशस्वी झालेली दिसून येते.

भारतातील निरनिराळ्या भूप्रदेशातील ब्रिटिशविरोधी स्वातंत्र्य चळवळीचा अभ्यास करण्यात आलेला आहे. रायगड जिल्ह्यामध्ये स्वांतत्र्यासाठी ज्या विविध चळवळी घडून आल्या, त्यामध्ये विशेषत: महात्मा गांधीजींच्या काळातील चळवळी दिवसेंदिवस खूपच जोरदारपणे झालेल्या आहेत. स्वातंत्र्य चळवळीमध्ये रायगड जिल्ह्यातील नेते, सर्वसामान्य जनता, स्त्रिया, आदिवासी, शेतकरी, कामगार, विद्यार्थी, सुशिक्षित वर्ग यांचा वाढता सहभाग आणि त्यांचे योगदान याचा संशोधनामध्ये घटनाक्रमानुसार शोध घेण्याचा प्रयत्न केलेला आहे. स्वातंत्र्यलढ्याच्या दृष्टीने रायगड जिल्ह्यातील १९०१ ते १९४७ या काळातील स्वातंत्र्य चळवळीचा समग्र अभ्यास व्हावा. तसेच रायगड जिल्ह्यातील स्वातंत्र्य चळवळीचा अभ्यास करीत असताना या जिल्ह्याची तोंडओळख व्हावी म्हणून रायगड जिल्ह्याचा सवागी अभ्यास करणे आवश्यक आहे. म्हणून महाराष्ट्र राज्य आणि त्याचे प्रादेशिक विभाग त्यातील जिल्ह्याच्या निर्मितीच इतिहास, जिल्ह्याचे भौगोलिक स्थान, रचना, या प्रदेशातील लोकांचे सामाजिक, धार्मिक व सांस्कृतिक जीवन तसेच नैसर्गिक साधनसंपत्ती, औद्योगिक प्रगती, येथील दळणवळणाच्या सोई इत्यादी बाबींचा सन १९४७ पयतचा अभ्यास या प्रकरणामध्ये करण्यात आलेला आहे.

### ❖ <u>महाराष्ट्र राज्याचे प्रादेशिक विभाग :-</u>

प्लासीच्या युद्धाने ब्रिटिशांनी इंग्रजी सत्तेचा पाया बंगालमध्ये घातला. साम्राज्यवादी धोरणाचा स्वीकार करून इंग्रजांनी हळूहळू संपूर्ण भारत ताब्यात घेतला. स्वत:ची स्वतंत्रपणे प्रशासन व्यवस्था आमलात आणली. प्रशासन व्यवस्थेसाठी मुंबई, कलकत्ता, मद्रास असे तीन

विभाग निर्माण केले. ब्रिटिशांच्या ताब्यातील पश्चिम भारतातील प्रदेश म्हणजे मुंबई इलाखा होय. त्याचे अहमदाबाद, कराची, पुणे व बेळगाव अशी चार उपकेंद्रे होती. मुंबई इलाख्यामध्ये संस्थानिक राज्य, एजन्सीस, ब्रिटिश प्रदेश असे तीन विभाग येतात. या प्रदेशातून १ मे १९६० रोजी स्वतंत्र मराठी भाषिकांचे महाराष्ट्र राज्य अस्तित्वात आले. भारताच्या पश्चिमेकडील भूप्रदेशात महाराष्ट्राचा समावेश होतो. महाराष्ट्राचा अक्षांश विस्तार १५° ४४' उत्तर अक्षवृत्त ते २२° ६' उत्तर अक्षवृत्त असून, रेखांश विस्तार ७२° ३६' पूर्व रेखावृत्त ते ८०° ५४' पूर्व रेखावृत्त आहे. महाराष्ट्राचा सर्वसाधारण आकार त्रिकोणाकृती असून दक्षिणेकडे चिंचोळा तर उत्तरेकडे रुंद होत गेलेला दिसतो. त्याचा पाया कोकणात व त्याचे निमुळते टोक पूर्वेस गोंदियाकडे आहे. पश्चिमेस अरबी समुद्रापासून पूर्वेस साधारणपणे पूर्व घाटापयत महाराष्ट्र पसरलेला आहे. महाराष्ट्राची पूर्व-पश्चिम लांबी सुमारे ८०० किमी असून दक्षिणोत्तर रुंदी सुमारे ७२० किमी आहे. महाराष्ट्राचे क्षेत्रफळ ३,०७,७१३ चौ. किमी आहे. क्षेत्रफळाच्या दृष्टीने भारतामध्ये दुसऱ्या क्रमांकाचे राज्य आहे. महाराष्ट्राने देशाचा ९.३६% प्रदेश व्यापलेला आहे.

महाराष्ट्राच्या सीमा व सरहद्दी वेगवेगळŸा स्वरूपाच्या आहेत. महाराष्ट्राच्या वायव्य बाजूस गुजरात राज्य असून ठाणे, नाशिक, नंदुरबार जिल्ह्याच्या सरहद्दी भिडतात. केंद्रशासित प्रदेश (संघराज्य क्षेत्र) दादर व नगर हवेलीशी ठाणे जिल्ह्याची सरहद्द आहे. महाराष्ट्राच्या उत्तर बाजूस मध्य प्रदेश असून नंदूरबार, धुळे, जळगाव, भंडारा, बुलढाणा, अमरावती, नागपूर व गोंदिया जिल्ह्याच्या सरहद्दी मिळालेल्या आहेत. महाराष्ट्राच्या पूर्वेस छत्तीसगड असून गोंदिया, गडचिरोली जिल्ह्याच्या सरहद्दी भिडलेल्या आहेत. महाराष्ट्राच्या आग्नेयेस आंध्र प्रदेश असून गडचिरोली, चंद्रपूर, यवतमाळ व नांदेड जिल्ह्याच्या सरहद्दी आहेत. महाराष्ट्राच्या दक्षिणेस कर्नाटक व गोवा राज्य आहे. कर्नाटक राज्याला कोल्हापूर, सांगली, सोलापूर, उस्मानाबाद, लातूर व नांदेड जिल्ह्याच्या सरहद्दी भिडलेल्या आहेत. गोवा राज्याबरोबर सिंधुदुर्ग जिल्ह्याची सीमा जोडलेली आहे [१].

१ मे १९६० रोजी महाराष्ट्राची निर्मिती झाली. त्या वेळी महाराष्ट्रामध्ये २६ जिल्हे, २३५ तालुक्यांचा समावेश होता. त्यानंतर कुलाबा जिल्ह्याचे नामांतर रायगड असे करण्यात आले. रत्नागिरी जिल्ह्याचे विभाजन होऊन सिंधुदुर्ग जिल्हा, चंद्रपूर जिल्ह्याचे विभाजन होऊन गडचिरोली, तर उस्मानाबाद जिल्ह्याचे विभाजन करून लातूर जिल्हा निर्माण करण्यात आला. मुंबई जिल्ह्याचे

विभाजन करून मुंबई उपनगर हा जिल्हा निर्माण केला. धुळे व अकोला जिल्ह्याचे विभाजन होऊन हिंगोली तर भंडारा जिल्ह्याचे विभाजन होऊन गोंदिया जिल्ह्याची निर्मिती झाली. महाराष्ट्र राज्याच्या निर्मितीच्या वेळी मुंबई, पुणे, औरंगाबाद व नागपूर असे चार प्रशासकीय विभाग स्थापन केले होते. त्यानंतर नाशिक व अमरावती असे दोन प्रशासकीय विभाग निर्माण करण्यात आले. त्यामुळे एकूण ६ प्रशासकीय विभाग सध्या आहेत. सध्या महाराष्ट्रात एकूण ३५ जिल्हे असून, एकूण ३५७ तालुके आहे.

प्रशासकीय विभागाप्रमाणेच महाराष्ट्र राज्याचे भौगोलिकदृष्टÝा, सांस्कृतिक आणि ऐतिहासिक वसाहतीच्या दृष्टीने काही पारंपरिक प्रादेशिक विभाग दिसून येतात. यामध्ये देश, घाटमाथा, बालघाट, मावळ, खानदेश, मराठवाडा, विदर्भ आणि कोकण हे विभाग आढळून येतात. सह्याद्रीच्या पूर्व बाजूला 'देश' हा प्रादेशिक विभाग असून या विभागात पुणे, सातारा, सांगली, कोल्हापूर, नाशिक, अहमदनगर अशा एकूण सात जिल्ह्यांचा समावेश होतो. सह्याद्री पर्वताच्या उंचवटÝाच्या भागास घाटमाथा म्हणून ओळखला जातो. नाशिकच्या पलीकडे चांदवड टेकड्या व राहुरीपासून ते वऱ्हाडातील यवतमाळ, चांदÝापयत सह्याद्रीचे फाटे पसरलेले आहेत. त्या भागाला बालघाट असे म्हणतात. सह्याद्रीच्या पूर्वेकडील उतरणीचा भाग म्हणजे मावळ प्रांत होय. उत्तर महाराष्ट्रातील तापी नदीचे खोरे म्हणजे खानदेश होय. धुळे, नंदुरबार व जळगाव या जिल्ह्यांच्या प्रदेशाला खानदेश म्हणतात. मध्य महाराष्ट्रातील गोदावरीच्या खोऱ्यास मराठवाडा हे प्रादेशिक नाव आहे. औरंगाबाद, जालना, बीड, परभणी, हिंगोली, लातूर, उस्मानाबाद, नांदेड या आठ जिल्ह्यांच्या प्रदेशाला मराठवाडा असे म्हणतात. हा प्रदेश म्हणजे औरंगाबाद प्रशासकीय विभाग होय. नागपूर विभागास विदर्भ किंवा वऱ्हाड असे म्हणतात. पूर्णेचे खोरे म्हणजे विदर्भ होय. अमरावती व नागपूर विभागातील नागपूर, वर्धा, भंडारा, गोंदिया, चंद्रपूर, गडचिरोली, अमरावती, बुलढाणा, अकोला, वाशिम, यवतमाळ इ. ११ जिल्ह्यांचा प्रदेश म्हणजे विदर्भ प्रदेश होय. महाराष्ट्राच्या पश्चिमेकडील प्रदेश म्हणजे कोकणपट्टी होय. कोकणात मुंबई शहर,मुंबई उपनगर, ठाणे, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग असे सहा जिल्हे आहेत. उत्तर कोकण, मध्य कोकण, दक्षिण कोकण, मुंबई महानगरीय प्रदेश इ. उपविभाग आहेत.

## ❖ रायगड जिल्ह्याच्या निर्मितीचा इतिहास :-

कोकण विभागातील अतिशय महत्त्वाचा जिल्हा म्हणजे रायगड जिल्हा होय. पूर्वी हा जिल्हा कुलाबा या नावाने ओळखला जात होता. पूर्वेस सह्याद्रीच्या रांगा आणि पश्चिमेस अथांग अरबी समुद्र यांच्यामध्ये विसावलेला व निसर्गाचा वरदहस्त लाभलेला भूप्रदेश म्हणजे कुलाबा होय. कुलाबा या नावाच्या संदर्भात मतप्रवाह आहेत. कुलाबा हे कुल–आप या शब्दाचा अपभ्रंश आहे. कुला–आप म्हणजे ज्याच्या चारही बाजूला पाणी आहे असा किल्ला होय. काहींच्या मते कुलाबा म्हणजे समुद्रात गेलेली जमिनीची दांडी अथवा भूशिर होय. त्यावरून कुलाबा हे नाव पडले असावे. या प्रदेशावर मध्ययुगीन काळात आदिलशाही, मोगल, हबशी, पोर्तुगीज आणि मराठ्यांची राजकीय सत्ता असल्याचे दिसून येते. या प्रदेशात प्रवेश करण्याचा इंग्रजांचा प्रयत्न सुरू होता. मराठ्यांच्या अंतर्गत राजकारणामुळे इंग्रजांना ही संधी प्राप्त झाली.

सन १७५६ मध्ये बाळाजी बाजीराव ऊर्फ नानासाहेब पेशवे यांनी आंग्रेविरुद्ध इंग्रजांशी तह केला. त्यामुळे या जिल्ह्यात इंग्रजाचा प्रवेश झाला. नानासाहेब पेशवे यांनी ब्रिटिशांना महाड तालुक्यातील दासगाव, कोमल ही खेडी आणि सावित्री नदीच्या मुखाजवळील बाणकोटचा किल्ला दिला. सन १८१८ मध्ये पेशवाई नष्ट झाल्यानंतर साक्षी उपविभागातील पेण, राजपुरी विभागातील रोहा आणि रायगड उपविभागातील महाड व माणगावच्या उर्वरित भागाचा ताबा इंग्रजांनी घेतला. सन १८१८ ते सन १८५० या काळात रायगडचा प्रदेश ब्रिटिश सत्ता, कुलाबाकर आंग्रे व भोरचे संस्थानिक यांच्या ताब्यात होता. त्यामुळे या विभागातील गावांची सतत एकमेकांमध्ये देवाण–घेवाण होत असे. साक्षी, राजापुरी व रायगड हे उपविभाग ब्रिटिश सत्तेच्या नियंत्रणाखाली असून ते रत्नागिरी जिल्ह्यास जोडलेले दिसून येतात. सन १८३० मध्ये ठाण्याला जिल्ह्याचा दर्जा देण्यात आला. त्या वेळी साक्षी, राजापुरी व रायगड हे उपविभाग ठाणे जिल्ह्यास जोडण्यात आले. नागोठाणे भागातील खेडी भोर संस्थानचे पंतसचिव व आंग्रे यांच्या मालकीची असलेली आढळतात. तर अवचितगडमधील खेडी आंग्रे व इंग्रजांच्या ताब्यात होती. पंतसचिवांनी सन १८३०मध्ये नागोठाण्यामधील अर्धा प्रदेश ब्रिटिशांना देऊन त्याच्या मोबदल्यात अवचितगडचा अर्धा भाग स्वत:कडे घेतला. पेणच्या उत्तरेकडील व पनवेलच्या दक्षिण भागातील खेडी सन १८३९ पयत आंग्रे यांच्या ताब्यात होती.[२]

दुसऱ्या कान्होजी आंग्रे यांच्या मृत्यूनंतर कुलाबाकरांच्या गादीला वारस नसल्यामुळे, ब्रिटिशांनी सन १८३९ मध्ये कुलाबा संस्थान खालसा करून सर्व प्रदेश आपल्या ताब्यात घेतला. त्याच्या प्रशासनासाठी पॉलिटिकल सुपरिटेंडेंट पदी डेव्हिसची नेमणूक करण्यात आली. सन १८४४ च्या क्रमांक १७ च्या कायद्याने कुलाबा संस्थान ब्रिटिश प्रदेशात विलीन केले. याच कायद्याने औरवालित तुंगारतनचा काही भाग, कर्नाळा, चिमणखळ, वाकरूळ, दुर्ग, हवेली आणि अंतोरा ही ठिकाणे ठाणे जिल्ह्यास जोडण्यास आली. तसेच नागोठाण्याचा दर्जा कमी करून त्याचा साक्षीमध्ये समावेश केला. १ ऑक्टोबर १८५२ रोजी कुलाबा एजन्सी रद्द केली.[३] या एजन्सीमधील खांदेरी, रेवदंडा हे उपविभाग तसेच पूर्वीचे साक्षी, राजापुरी, रायगड हे उपविभाग ब्रिटिश संस्थान प्रदेशात विलिन केले. या सर्व प्रदेशात ब्रिटिश कायदे लागू करण्यात आले. ब्रिटिश संस्थानामधील खांदेरी, रेवदंडा, साक्षी, राजापुरी व रायगड उपविभाग तसेच नागोठाणे, तळा, निजामपूर, गोरेगाव, बिरवाडी आणि पोलादपूर हे लहान उपविभाग एकत्र करून सन १८५३ मध्ये कुलाबा हा उपजिल्हा निर्माण करण्यात आला. त्याचे एकूण क्षेत्रफळ ३,५०० किमी. असून,८८० खेडी ६०२ वाड्यांचा समावेश होता. यावेळी २,७८,५०० एवढी लोकसंख्या होती.

सन १८६६ मध्ये ब्रिटिशांनी उपविभागाची नावे बदलली. साक्षी उपविभागाचे नाव पेण, राजपुरी उपविभागाचे नाव रोहा व रायगड उपविभागाचे नाव महाड अशी नावे बदलण्यात आली. उंदेरी व खांदेरीचा एकत्रित असा अलिबाग उपविभाग निर्माण केला. सन १८६६-६७ मध्ये राजपुरी उपविभागाचे तळा व निजामपूर हे दोन विभाग आणि रायगड उपविभागाचा गोरेगाव हा लहान विभाग रद्द केला. तळा, निजामपूर, गोरेगाव या लहान विभागातून एकत्र माणगाव उपविभाग निर्माण करण्यात आला. महाड उपविभागामध्ये बिरवाडी व पोलादपूर यांचा समावेश केला.[४] त्यामुळे या काळात पेण, रोहा, महाड, अलिबाग, माणगाव हे उपविभाग असल्याचे दिसून येतात.

ठाणे जिल्ह्यापासून कुलाबा जिल्हा सन १८६९ मध्ये वेगळा करण्यात आला. त्याच वेळी कुलाबा जिल्हाधिकाऱ्यांची नेमणूक करण्यात आली. महसूलविषयी कार्याव्यतिरिक्त तो प्रमुख मॅजिस्ट्रेट व जंजिरा संस्थानचा पॉलिटिकल एजंट म्हणून काम पाहत होता. यावेळी जिल्ह्यात अलिबाग, पेण, नागोठाणे, रोहा, माणगाव आणि महाड या उपविभागाचा समावेश करण्यात आला. या जिल्ह्यात १०६४ गावांचा समावेश होता. त्यापैकी ५०० गाव खालसा, ४८५ गावे खोती व ७९ गावे इनाम होती. ठाणे जिल्ह्यातील पनवेल तालुका व उरण (कारंजा) महाल कुलाबा

जिल्ह्यास सन १८८३ मध्ये जोडण्यात आले. सन १८९१ मध्ये कर्जत तालुका कुलाबा जिल्ह्यात समाविष्ट केला. सन १९२१-३१ दरम्यान नागोठाणे महाल, सन १९३२ मध्ये खालापूर महल रद्द करण्यात आले. सन १९४६ मध्ये खालापूर हा नवीन तालुका निर्माण करण्यात आला. [५]

सन १६१८ मध्ये पहिला सिद्दी गव्हर्नर नियुक्त झाल्यापासून जंजिरा प्रदेशावर सिद्दीची सत्ता स्थापन झाली. नंतरच्या काळात अनेक वेळा अंतर्गत प्रदेशाची देवाण-घेवाण झाली. सन १८८१ मध्ये जंजिरा संस्थानचे क्षेत्रफळ ८४१.७५ चौ. किमी. असून २३४ गावांचा समावेश होता. या प्रांताची लोकसंख्या ७६३६१ होती. प्रशासकीय कामासाठी एकूण आठ महाल होते. त्यामध्ये जंजिरा किल्ला, मुरूड, नांदगाव, मांडला, श्रीवर्धन, म्हसाळा, गोवळे व वोर्लीपंचातम इत्यादींचा समावेश होता. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर संस्थान विलीनीकरण होईपयत सिद्दीकडे प्रदेश होता. नंतर तो प्रदेश रायगड जिल्ह्यास समाविष्ट करण्यात आला.

जंजिराप्रमाणेच भोर संस्थानही विलीन करण्यात आले. सन १९४८ मध्ये भोर संस्थानाचा काही प्रदेश कुलाबा व काही प्रदेश पुणे जिल्ह्यात समाविष्ट करण्यात आला. पूर्वीच्या भोर संस्थानातील सुधागड महालातील काही भाग, पूर्वी जंजिरा संस्थानातील श्रीवर्धन, मुरूड आणि म्हसाळा या महालाच्या प्रदेशात समाविष्ट केला. सन १९४९ मध्ये पोलादपूर, श्रीवर्धन, म्हसाळा, सुधागड व मुरूड हे महाल निर्माण केले. सन १९५० मध्ये रत्नागिरी जिल्हयातील दोन खेडी कुलाबा जिल्ह्यास जोडली. स्वातंत्र्यप्राप्ती नंतर जिल्ह्याच्या रचनेत बदल झालेले दिसून येतो.

सन १९६१ मध्ये कुलाबा जिल्ह्यात आठ तालुके व सहा महाल होते. पुढे महालाचा दर्जा वाढविल्यामुळे १९७१ मध्ये तालुक्यांची संख्या १४साली. ती म्हणजे अलिबाग, पेण, रोहा, पनवेल, खालापूर, कर्जत, उरण, सुधागड, महाड, माणगाव, पोलादपूर, मुरूड, श्रीवर्धन व म्हसाळा असे १४ तालुके होते. रायगड किल्ल्याच्या स्मरणार्थ महाराष्ट्र शासनाने १ मे १९८१ रोजी कुलाबा जिल्ह्याचे नामांतर “रायगड जिल्हा” असे केले. २६ जून १९९९ रोजी माणगाव तालुक्याचे विभाजन करून स्वतंत्र तळा तालुका निर्माण केला. सध्या रायगड जिल्ह्यामध्ये १५ तालुके आहेत. १९७१ नंतर तालुक्यातील गावांची अदलाबदल अनेक वेळा झालेली आहे. आजच्या स्थितीमध्ये रायगड जिल्ह्याची सीमा व स्थान निश्चित करण्यात आलेले आहे.

रायगड जिल्हा हा महाराष्ट्र राज्याच्या कोकणपट्टीचा एक भाग आहे. हा जिल्हा दक्षिणोत्तर अक्षांश १७° ५१° उत्तर ते १९° ८०° आणि पूर्व-पश्चिम रेखांश ७२° ५१’ आणि ७३° ४०’ यामध्ये

विस्तारलेला आहे. जिल्ह्याची दक्षिणोत्तर लांबी सुमारे १५० किमी असून पूर्व-पश्चिम रुंदी अंदाजे २४ ते ४८ किमी आहे. जिल्ह्याचे एकूण क्षेत्रफळ ७१४८ चौ. किमी असून ते महाराष्ट्र राज्याच्या एकूण क्षेत्रफळांच्या २.३२ टक्के आहे. जिल्ह्याच्या अंतर्गत सीमा म्हणजे उत्तरेस उरण–करंजा, दक्षिणेस बाणकोटची खाडी, पश्चिमेस अरबी समुद्र आणि पूर्वेस सह्याद्री पर्वतांच्या रांगा आहेत. जिल्ह्याच्या बहि:सीमा उत्तरेस ठाणे जिल्हा व मुंबई, दक्षिणेस रत्नागिरी जिल्हा, पूर्वेस पुणे व सातारा जिल्हा, पश्चिमेस अरबी समुद्र आहे.

## ❖ रायगड जिल्ह्याची प्राकृतिक रचना व स्वरूप :-

सह्याद्रीच्या पश्चिमेस अरुंद किनारपट्टीस कोकण असे म्हणतात. कोकणाचा सर्वच भाग डोंगरदऱ्यानी व्यापलेला असून कमी उंचीचा सखल भागही आहे. उत्तर व दक्षिण असे कोकणचे दोन भाग आहेत. उत्तर कोकणात मुंबई शहर, मुंबई उपनगर, ठाणे, रायगड यांचा समावेश होतो. याच विभागातील रायगड जिल्ह्याच्या प्राकृतिक रचनेचा अभ्यास म्हणजे भूस्वरूपांची रचना, भूस्तररचना, हवामान, तापमान, पर्जन्यमान, आर्द्रता, मेघ, वारे इ. घटकांची माहिती करून घेणे संशोधनाच्या दृष्टीने गरजेचे वाटते.

रायगड जिल्ह्यातील प्राकृतिक भूस्वरूपाचे सवात महत्त्वाचे वैशिष्टŸ म्हणजे कमी उंचीचा सखलपणा होय. जिल्ह्याच्या पूर्वेकडे उंच शिखरे आणि सह्याद्रीचे खिंडीयुक्त डोंगर व कडे दिसून येतात. पश्चिमेकडे समुद्रापयत भूशिखरासारखा पसरलेला प्रदेश आहे. प्रदेशाच्या उंचीनुसार खलाटी व वलाटी असे दोन भाग पडतात.[६] साधारणपणे या भूस्वरूपाचे खलाटी, वलाटी, सुपीक मैदाने असे तीन विभाग दिसून येतात. पश्चिमेकडील अरबी समुद्राच्या सखल भागास 'खलाटी' असे म्हणतात. त्याची समुद्रसपाटीपासूनची उंची फार कमी आहे. खलाटीची जमीन कसदार असून समुद्र किनाऱ्याकाठी वाळूमिश्रित हलकी जमीन आहे. उरण, अलिबाग, मुरूड, श्रीवर्धन व तळे या तालुक्यांच्या जमिनीचा समावेश यामध्ये दिसून येतो. समुद्र किनारपट्टी व पूर्वेकडील भाग यांच्यामधील जो मैदानी भाग आहे त्यास सखल किंवा सुपीक मैदानी प्रदेश म्हणतात. पनवेल, पेण, रोहे, तळे, माणगाव, म्हसाळा, महाड या तालुक्यांचा काही भाग सखल व सुपीक मैदानी प्रदेशात येतो. खलाटीच्या पूर्वेस जो डोंगराळ भाग आहे त्यास 'वलाटी' असे म्हणतात. या प्रदेशाची साधारण उंची २७५ ते ३०० मीटर पयत आहे. हा भाग जिल्ह्याच्या पूर्वेस आहे. कर्जत, खालापूर, सुधागड, माणगाव, महाड व पोलादपूर या तालुक्याचा पूर्व भाग या प्रदेशात येतो.

जिल्ह्यातील प्रमुख डोंगररांगा प्रामुख्याने सह्याद्री पर्वताच्या आहेत.जिल्ह्याच्या उत्तरेकडे माथेरानचा प्रवळ डोंगर आहे.पनवेलच्या दक्षिणेकडे कर्नाळा ४७५मी, रतनगड ५८४ मी उंचीचे डोंगर आहेत.पेणच्या दक्षिणेस मिराडोंगर ३३५ मी, अलिबागच्या पूर्वेस सागरगड ४१४ मी उंचीचा डोंगर आहे.सह्याद्रीच्या मुख्य रांगापासून विभक्त झालेला रायगड किल्ला ८७० मी उंचीचा महाडच्या उत्तरेस आहे.या पर्वतामध्ये कमी-जास्त उंचीची अनेक शिखरे आहेत.या प्रदेशात बोर, वरंधा, आंबेनळी हे घाट आहेत.पुणे-मुंबई जोडणारा मध्य रेल्वेचा मार्ग आणि राष्ट्रीय महामार्ग वारेघाटातून जातो.कोकण व सातारा जिल्ह्यातील महाबळेश्वरला जोडणारा रस्ता आंबेनळी (फिट्झगेराल्ड) घाटातून जातो.महाड व भोर यांना जोडणारा मार्ग वरंधा घाटातून जातो. बोरघाटाच्या उत्तरेस भीमाशंकर, कोलींब, सावला, कुसूर, राजमाची इ. खिंडी आहेत.वरंधा घाटाच्या दक्षिणेस तीन व उत्तरेस तेरा खिंडी आहेत.दक्षिणेस किनेश्वर जवळ महाबळेश्वर मार्गावर आणि वाई मार्गावर धावळा व कामटा खिंडी आहेत.वरंधा घाटाच्या उत्तरेकडील तेरा खिंडी असून त्यामध्ये माजेरी गावाजवळील खिंड, शिवतरजवळ गोप्याखिंड, आंबे शिवतरजवळ आंबेनळीखिंड, वाकी बुद्रूकजवळ मध्याखिंड, तोरणा किल्ल्याजवळ शेवटÝाखिंड, कावळेगावाजवळ कावळÝा खिंड, मशीदवाडीजवळ कुंभाखिंड, जितेगावाजवळ लिंगाखिंड, उंबर्डी भागात निसनीखिंड, विळेगावाच्या हद्दीत ताम्हणी, देवस्थळी आणि थिबाखिंड आणि निजामपूरजवळ पिंपरीखिंड आहे. सुधागड तालुक्यातून लोणावळ्याकडे जाताना प्रसिद्ध ऐतिहासिक उंबरखिंड आहे. [७]

भारताच्या पश्चिम किनारपट्टीसारखे रायगड जिल्ह्याचे हवामान आढळते.पावसाळÝात प्रचंड पाऊस, उन्हाळÝात उष्ण हवामान आणि वर्षभर हवेत आर्द्रतेचे जास्त प्रमाण असते. उन्हाळा (मार्च ते मे), पावसाळा(जून ते सप्टेंबर), दमट-उष्ण हवामानाचा काळ (ऑक्टोबर-नोव्हेंबर), हिवाळा( डिसेंबर ते फेब्रुवारी)असा कालखंड असतो.जिल्ह्यात साधारण उष्ण व दमट हवामान नेहमीच असते.जिल्ह्यामध्ये अकरा पर्जन्यमापण केंद्र असून त्याच्याआधारे पर्जन्यमापन केले जाते.नैर्ऋत्य मोसमी वाऱ्यापासून पडणाऱ्या पावसाची सुरुवात जुनच्या पहिल्या आठवडÝात होते.ऑक्टोबरच्या पहिल्या आठवडÝापयत पाऊस असतो.येथे सरासरी पाऊस ३०२८.९ मिमी पडतो.समुद्रकिनाऱ्याकडून जिल्ह्याच्या पूर्वसीमेवरील पश्चिम घाट प्रदेशाकडे पर्जन्याचे प्रमाण वाढत जाते.जिल्ह्याच्या उत्तर भागात अलिबाग, उरण येथे पर्जन्याचे वार्षिक प्रमाण २०७२.३

मी.मी.आणि २०८०.८ मि.मी.आहे.जुलै हा सर्वाधिक पावसाचा महिना असून एकूण पावसापैकी ३८% पाऊस पडतो.[१०]

समुद्रकिनारपट्टीजवळ असल्याने दिवस-रात्रीच्या तापमानात फारसा फरक आढळत नाही. त्यामुळे हवामान समान असते.मार्च ते मे या काळात तापमान वाढते.सरासरी कमाल तापमान ३१.८ सेल्सिअस आणि सरासरी किमान तापमान २६.४° सेल्सिअस असते.वर्षभर हवेत आर्द्रता असते.पावसाळ्यात सापेक्ष आर्द्रता ८० प्रतिशत किंवा त्यापेक्षा जास्त असते.उर्वरित वर्षामध्ये सापेक्ष आर्द्रता ६५ते ७५% असते.पावसाळ्यात आकाश पूर्णपणे मेघाच्छादित असते.मे व ऑक्टोबर महिन्यात मेघमयता मध्यम स्वरूपाची असते.उर्वरित वर्षभरातील काही दिवस सोडल्यास आकाश निरभ्र असते.पावसाळ्यात पश्चिम किंवा नैर्ऋत्य दिशेने जोरदार वारे वाहतात.ऑक्टोबर ते डिसेंबरमध्ये ईशान्य अथवा अग्नेय दिशेने वाहणाऱ्या वाऱ्यांचा वेग कमी असतो.जानेवारी ते मार्च या काळात वारे प्रामुख्याने ईशान्य दिशेने मंद गतीने वाहतात. एप्रिलमध्ये वाऱ्याची दिशा बदलते.मेमध्ये वारे वाहणे पुन्हा जलद गतीने सुरू होते.

## ❖ रायगड जिल्ह्यातील जलसंपत्ती (नद्या खाड्या आणि बंदरे ):-

महाराष्ट्रातून वाहणाऱ्या नद्यांनी महाराष्ट्राची भूमी सुजलाम सुफलाम केली.त्यामुळे महाराष्ट्राच्या जीवनाचे नंदनवन झालेले दिसून येते.नद्यांच्या काठी अनेक मोठी तीर्थक्षेत्रे, पवित्रस्थाने आहेत.सांस्कृतिक विकासाच्या जडणघडणीत त्यांनी मोठा हातभार लावलेला दिसून येतो.पूर्ववाहिनी व पश्चिमवाहिनी अशा दोन प्रकारच्या नद्या आहेत.पश्चिमवाहिनी नद्या प्रामुख्याने कोकणातील आहेत.त्या वाहत जाऊन अरबी समुद्राला मिळतात.जिल्ह्याच्या प्राकृतिक रचनेनुसार नद्यांचे उत्तर रायगड विभाग़ अंबानदीचे खोरे़ मध्य रायगड विभाग असे तीन विभाग आढळतात.

उत्तर रायगड विभागात उल्हास नदी़ पनवेल नदी पाताळगंगा नदी या तीन मुख्य नद्या आहेत.उल्हासनदी सह्याद्रीच्या पायथ्याजवळ उगम पावून उत्तरेकडे ठाणे जिल्ह्यातील वसई खाडीमध्ये समुद्रास मिळते.तिच्या उपनद्या पोथीऱ शीलाऱ पेज या नद्या उत्तरेकडून वाहतात. पनवेल नदी समूहातील लहान नद्या (कामरंग़कासाडी़काळूंदी) नैर्ऋतेकडे वाहतात.पाताळगंगा नदी खंडाळ्याजवळ सह्याद्रीच्या पश्चिम कड्यावर उगम पावते.पुढे पश्चिमेकडे खालापूर आपटा गावाजवळून ४० किमी.वाहत जाऊन धरमतर खाडीला मिळते.या नदीच्या दोन्ही बाजूस अनेक उपप्रवाह येऊन धरमतर खाडीला मिळतात.भोगावती किंवा भोगेश्वरी ही अतिशय लहान नदी

वालगंगा नदीला समांतर ६४ किमी वाहत गेल्यावर धरमतर खाडीला मिळते. उल्हासनदीचे खोरे पनवेल नदीचे व पाताळगंगा नदीचे खोरे वेगळे आहे.

अंबानदी सह्याद्री रांगेतील खंडाळ्याच्या दक्षिणेस ३ किमीवर उगम पावते. नेर्ऋत्येकडे २३ किमी वाहत जाऊन नंतर वायव्येकडे वळते. पुन्हा उत्तरेकडे वळून नागोठाणेजवळ धरमतर खाडीस मिळते. अंबानदी खोरे व कुंडलिका नदीचे खोरे सागरगड-कनकेश्वर डोंगरगंगामुळे स्वतंत्र झाले दिसून येते.

मध्य रायगड विभागातून कुंडलिक व मांदाड या दोन नद्या वाहतात. मुळशी जलाशयाच्या पश्चिमेला सह्याद्रीच्या पश्चिम उतारावर कुंडलिका नदी उगम पावून नैर्ऋत्येकडे वाहत जाऊन रेवदंड्याजवळ अरबी समुद्रास मिळते. मांदाड नदी माणगावच्या पठारावर उगम पावते. राजपुरी म्हसाळा खाडीला मुरूडच्या दक्षिणेस मिळते. या विभागातून सावित्रीच्या चार उपनद्या वाहतात. त्यापैकी घोड़े गांधारी आणि काळ या नद्या उत्तरेकडून आणि नागेश्वरी दक्षिणेकडून सावित्रीत मिळतात. सावित्री नदी महाबळेश्वरच्या भागात उगम पावून ती पुढे पश्चिमेकडे वाहत जाऊन बाणकोटजवळ समुद्राला मिळते [११].

रायगड जिल्ह्यामध्ये प्रमुख खाड्या, बंदरे, बीच, बेटे आहेत. नद्यांच्या मुखाशी समुद्राचे खारे पाणी शिरून खाडया तयार झालेल्या आहेत. रायगड जिल्ह्यामध्ये पनवेल धरमतर रोहे राजपुरी बाणकोट आपटे इ. खाडया आहेत. रायगड जिल्ह्यामध्ये लहान-मोठी पुष्कळ बंदरे आहेत. उरण पनवेलजवळचे उलव व धरमतरखाडीवरील मांडवे करंजे रेवस धरमतर नागोठाणे ही बंदरे प्रसिद्ध आहेत. या बंदरातून दररोज मुंबई प्रवासी वाहतूक सुरू असते. पश्चिम किनाऱ्याजवळील बंदरे माल व प्रवासी वाहतुकीस उपयुक्त होती. त्यामध्ये अलिबाग, रेवदंडा जंजिरा श्रीवर्धन व हरीहरेश्वर ही प्रमुख बंदरे आहेत. [१२] रेवदंडा बंदर हे रोहा खाडीच्या तोंडाशी आहे. जंजिरा बंदर राजपुरी खाडीच्या तोंडाशी आहे. त्याच्या उत्तरेस मांदाड बंदर आहे. हरीहरेश्वर बंदर बाणकोटच्या खाडीच्या तोंडाशी आहे. रायगड जिल्ह्याला मोठा समुद्रकिनारा लाभलेला आहे. या किनाऱ्यावरील अनेक बीचे आहेत. जिल्ह्यातील महत्त्वाचे बीच म्हणजे अलिबागबीच, मुरूडबीच, वरसोलीबीच, सासवणेबीच, काशीदबीच, चैल व रेवदंडाबीच, नागाव आक्षीबीच, रेवसबीच, मांडवाबीच, किहीमबीच आहेत. [८] रायगड जिल्ह्यामध्ये घारापुरी, खांदेरी, उंदेरी, कासा, कुलाबा आणि जंजिरा ही बेटे आहेत.

## ❖ रायगड जिल्ह्यातील नैसर्गिक संपत्ती :-

देशाच्या आर्थिक विकासामध्ये नैसर्गिक साधनसंपत्तीचा महत्त्वाचा वाटा असतो. नैसर्गिक साधनसंपत्तीने नटलेला प्रदेश म्हणजे रायगड असून त्याचे वेगळे स्थान आहे. जिल्ह्यात नैसर्गिक साधनसंपत्तीचे साठे मोठŸा प्रमाणात आहेत. नैसर्गिक संपत्तीमध्ये खनिजसंपत्ती सागरीसंपत्ती मीठ वनसंपत्ती वन्य पशुपक्षी या संपत्तीचा समावेश होतो. या संपत्तीच्या आधारे रायगड जिल्ह्यातील लोकांनी उद्योग-व्यवसाय करून आपली उपजीविका चालविलेली आहे. रायगड जिल्ह्यामध्ये बॉक्साइट हे खनिज प्रामुख्याने सापडते. त्याचे मुरूड व श्रीवर्धन तालुक्यात साठे आहेत. जिल्ह्यामध्ये कुरावडे,साखरीवेळस, कालिंग या ठिकाणी बॉक्साइटचे साठे असावेत असा अंदाज आहे. जासई, बारवई गावाजवळ व वरंधा घाटातील रस्त्याच्या कडेला नट्रोलाइटअपोफायलाइट स्टिलबाइट इ. प्रकारच्या झिओलाइटांचे उत्कृष्ट स्फटिक आढळतात. [१३]

रायगड जिल्ह्याला सागरी किनारा १५० किमी आणि सुमारे २१,००० चौ. किमी सागरी क्षेत्र मासेमारीसाठी उपलब्ध आहे. समुद्र व खाड्यालगतची सुमारे १०३ गावे मच्छिमार व्यवसायात आहेत. सोनकोळी खारवी गाबीत भोई दालदी मुसलमान लोक या व्यवसायात आहेत. जिल्ह्यात ३९ मासेमारीची केंद्रे आहेत. या केंद्रातून मासे पकडणे व विक्रीचे व्यवहार होतात. सप्टेंबर ते मेपयत मासेमारी जोरात चालते. मोरा कारंजा अलिबाग रेवदंडा मुरूड श्रीवर्धन हे पाच मासेमारीचे विभाग आहेत. अलिबाग व रेवदंडा विभागातून एकुण मासेमारी पैकी ६०% व्यवसाय होतो. ब्रिटिश राजवटीत रोहा, पेण, पनवेल, नागोठाणे येथून देशावर आणि रेवस, वरसोली, थळ व मांडवा येथून मुंबईला सुकी मासळी पाठविण्यात येई. या काळात महाड हे सुक्या मासळŸांचे मोठे व्यापारी केंद्र होते. जिल्ह्यात मासेमारीसाठी वावरी, सारंगा, घोळ, बुढी, रामवान, करेल, धनगड, दोल, म्होर, चिराटे, कात्रा, माजोला, खोला, पाग आणि गळांच्या आकड्यांची जाळी वापरतात. ही जाळी नायलॉनच्या धाग्यापासून तयार करतात. समुद्रात सुरमई, बांगडा, हाईद, कर्ली, रावस, सरंगा, पापलेट, पेडवे, रेणच्या, कोळंबी, सुनेरा, वाघबीर, सोनमुशी, बाळदा, मुशी, कानमुशी, लांज, रांजा, नाली, पाकट, बिजली, चिराई, भिंग, तारळी, गुरबा, टोअक, मांदेली, काटी, दांडेतर, कावळ, दिंडास, कारली, बोंबील, नरशिंगाला, तळी, किलीस, वाम, सुंव, घोडमासा, पिकू, बडवी, जिताडा, गोब्रा, नावेरी, सुंदाळा, रानवी, शिताप, डोगल, लोडगू, मोडूसा, तांबुसा, चारबात, चांदवा, वागटी

इ.[१४] अनेक प्रकारचे मासे आढळतात.उरण, पेण, पनवेल तालुक्यात अनेक ठिकाणी मिठागरे आहेत.मासे व मीठ ही समुद्रापासून मिळणारी उत्पन्ने आहेत.

रायगड जिल्हा डोंगर दऱ्याखोऱ्यांचा आणि घनदाट जंगलांचा प्रदेश आहे.त्यामुळे मोठ्या प्रमाणात वनसंपदा आढळते.कर्जतखालापूर पनवेल पेण सुधागड अलिबाग रोहा महाड तालुक्यात बरीच वने विखुरलेली आहेत.नागोठणे ते माणगाव, कर्जत, माथेरान या भागात सदाहरित वनस्पती आढळतात.कर्नाळा, कनकेश्वर येथे दाट झाडी असून पानझडी प्रकारची जंगले आहेत.जिल्ह्यात १६०६.४८ चौरस किमी वनक्षेत्र असून त्याचे दोन विभागात विभाजन करण्यात आलेले आहे.रोहा वन विभाग आणि अलिबाग वन विभाग होय.रोहा वन विभागात रोहामाणगाव, महाड, पोलादपूर, मुरूड, म्हसाळा, श्रीवर्धन या तालुक्यांचा समावेश होतो.या विभागामध्ये ऐन, आंबा, आपटा, आसना, बोंडरा, हिरडा, करंज, मोहा, साग, सातवीन, शिंदी इ.अनेक महत्त्वाच्या वनस्पती कमी-जास्त प्रमाणात आढळतात.

अलिबाग विभागात कर्जत, खालापूर, पनवेल, उरण, पेण, सुधागड आणि अलिबाग या तालुक्यांचा समावेश होतो.या विभागात साग, ऐन, आंबा, आपटा, अर्जुन, आसना, अशोक,बाभूळ, बेहडा,बहावा, भेरलीभाड, बोंडरा, चंदन, चारबोर, निंब, धावडा, गोरखचिंच, दांडोशी, पळस,पायर, कुंभी, खैर, वड, बांबू इत्यादी प्रमुख वनस्पतींच्या जाती आढळतात. जिल्ह्यातील वनक्षेत्राचा विचार करताना राखीव वनक्षेत्र व संरक्षित वनक्षेत्र यामध्ये सतत वाढ करण्यात आलेली दिसून येते.

## जिल्ह्यातील वनक्षेत्र

| अक्र | वर्ष | राखीव वनक्षेत्र चौ.किमी | संरक्षित वनक्षेत्र चौ.किमी | अवर्गीकृत | एकूण वनक्षेत्र चौ.किमी |
|---|---|---|---|---|---|
| १ | १८८० -८१ | ६९४ | २०७ | | ९०१ |
| २ | १८९० -९१ | ७९३ | १५० | | ९४३ |
| ३ | १९०० -०१ | १११५ | १० | | ११६५ |
| ४ | १९१० -११ | ११६८ | १८९ | | १३५७ |
| ५ | १९२० -२१ | ११६६ | १८९ | | १३५५ |
| ६ | १९८५ -८६ | १२७३.४८ | १८१.०८ | १४६.५५ | १६०१.११ |
| ७ | १९८९ -९० | १२७७.६१ | १७६.९४ | १५१.९३ | १६०६.४८ |

रायगड जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात जंगल असल्याने प्राणिसृष्टीही तेवढ्याच प्रमाणात आढळते. संपूर्ण जिल्ह्यात बिबळ्या, वाघा, रानमांजर, अस्वल, गिलुरी, खारकुंडी, वानर व माकडे मोठ्या प्रमाणात आढळतात. अलिबाग तालुक्यातील सागरगड व महान, कर्जत तालुक्यातील खांडस वनक्षेत्र आणि नागोठाणे रांगेतील सुकेली वनक्षेत्र, मुरूड तालुक्यातील फणसाड वनक्षेत्रामध्ये वाघ व इतर वन्य प्राणी आढळतात. तसेच माथेरान पठार, खालापूर, कर्जत आणि अलिबाग प्रदेशात बिबळ्या, वाघ, रानमांजर, तरस, काळिंद्र, मनोरी, मुंगुस, कोल्हे, ससे, रानडुक्कर, सांबर, चितल, भेकर आणि निलगाय हे वन्य प्राणी दिसतात. सुधागड, खालापूर, रोहा, माणगाव तालुक्यात अनेक प्रकारचे वन्य प्राणी आढळतात.

रायगड जिल्ह्यामध्ये मोठ्या प्रमाणात जंगल असल्यामुळे वन्य पशू-पक्षी मोठ्या संख्येने दिसतात. पनवेल तालुक्यात कर्नाळा हे पक्षी अभयारण्य म्हणून महाराष्ट्र सरकारने २८ ऑक्टोबर १९६९ रोजी स्थापन केले. त्याचे क्षेत्र ४.४८चौ.किमी आहे. येथे १४६जातींचे सुंदर पक्षी आहेत. तसेच ३७ जातींचे पक्षी निरनिराळ्या हंगामात देशांतर करून येथे येतात. अकरा पक्षी घरे बांधली असून त्यामध्ये २३८ पक्षी पिंजऱ्यात ठेवलेले आहेत. या पक्षी अभयारण्यामध्ये विविध पक्षी आहेत. बगळे आणि त्यांच्या विविध उपजाती, घारी व गिधाडे आणि त्यांच्या विविध उपजाती, ससाणा आणि त्यांच्या विविध उपजाती, तितर व कुक्कुट, पाणकोंबडी, जलकपोत, टिटवी, कवाडा, कबुतर, होले, पारवे, पोपट, चातक, कोकीळ, भारद्वाज, घुबड, पिंगळा, जंगली निशाचर, भिंगरी, खंड्या, नीळकंठ, हुप्प, जटायू, तांबट, सुतार, चंडोल, पाकोळ्या, खाटीक, पिलक, कोतवाल, मैना, साळूंकी, मिनिव्हेट, बुलबुल, नंदननाचण, परीट, शिंपी, वटवट्या, फुलचुखी, चिमणी, सुगरण, फिंच, मुनिया इत्यादी प्रमुख जाती आणि त्यांच्या विविध जातींचे पक्षी या विभागात आढळतात.

## ❖ रायगड जिल्ह्यातील सामाजिक व धार्मिक जीवन:-

भारतातील समाजव्यवस्था चातुवर्णी असून त्यामध्ये अनेक जाती-पोटजातींचा समावेश आहे. उपजीविकेसाठी प्रत्येकाने जो व्यवसाय व सामाजिक कामे केलेली होती ती त्यांची जात बनली. संपूर्ण रायगड जिल्ह्यातही तसीच समाजव्यवस्था आढळून येते. रायगड जिल्ह्यामध्ये हिंदू, बौद्ध, जैन, मुसलमान, खिश्चन धर्मातील विविध जाती-पोटजातीच्या लोकांचे अस्तित्व आढळते.

प्रत्येक जातीचे राहणीमान, अन्न, विवाहाचे संबंध, त्यांचे सामाजिक व धार्मिक रूढी- परंपरा, देवदेवता व कायदे यामध्ये भिन्नता आहे.

**ब्राह्मण:-**रायगड जिल्ह्यामध्ये ब्राह्मण समाजात चित्पावन, देशस्थ, कऱ्हाडे, देवरूखे, क्रमवंत या पोटजाती प्रामुख्याने आढळतात. पूर्वी नागाव व पेण येथे ऋग्वेदी आणि यजुर्वेदी शाखांच्या वेदशाळा व संस्कृत पाठशाळा होत्या. त्यामुळे ब्राह्मण समाजातील विविध पोटजातींचे लोक जिल्ह्यात स्थायिक झाले. चित्पावन ब्राह्मण म्हणजे इराणच्या आखातातून आलेल्या मृतवत माणसांना परशुरामाने शुद्ध केले. ते कोकणात स्थायिक झाले. तेच चित्पावन ब्राह्मणाचे पूर्वज आहेत असे मानतात. पेशव्याच्या काळात यांना विशेष महत्त्व होते. जिल्ह्यामध्ये चित्पावन ब्राह्मणांच्या तुलनेने देशस्थ ब्राह्मणांची संख्या कमी आहे. त्यांच्यामध्ये ऋग्वेदी व यजुर्वेदी असे वर्ग आहेत. कुऱ्हाडे ब्राह्मण पेण, अलिबाग, महाड तालुक्यात आढळतात. ते सातारा जिल्ह्यातील कराड येथून कोकणात आलेले आसल्यामुळे त्यांचे कुऱ्हाडे ब्राह्मण असे नाव पडले. त्यांची एकुण चोवीस गोत्रे आहेत. देवरूखे ब्राह्मण प्रामुख्याने कर्जत,दहिवली भागात वास्तव्य करून आहेत. कुबेर नावाच्या राजाची राजधानी देवराष्ट्र असून तेथे राजाच्या आश्रयास होते. त्यामुळे त्यांना देवराष्ट्रीय अथवा देवरूखे असे म्हणतात. क्रमवंतही ब्राह्मणाची पोटजात असून ती प्रामुख्याने अलिबाग तालुक्यात आढळते. सारस्वस्त ही ब्राह्मणाची पोटजात असून ती अलिबाग, रोहा तालुक्यात आहे. उत्तरेतून सरस्वती नदीच्या काठी असलेल्या प्रदेशातून आलेले असल्याने त्यांना सारस्वत नाव मिळाले. सारस्वतांना शेणवी किंवा शर्ण असे म्हणतात. शेणवी या शब्दाचा अर्थ शिक्षक किंवा विद्वान होय.[१६] ब्राह्मण समाजाची लोक वस्ती शहरात मोठ्या प्रमाणात आहे. हिंदू धर्मातील सर्व सण आनंदाने साजरे करतात. पुरुषांचा पगडी, कोट, धोतर, उपरणे, जोडे आणि स्त्रियांचा नऊवारी पातळ व चोळी असा पोशाख असे. शुभकार्याच्या प्रसंगी पुरुष केशरीलाल किंवा पिवळ्या रंगाचा रेशमी मुगटा (पितांबर)नेसतात. जेवण शुद्ध शाकाहारी असते. शुभकार्याच्या वेळी गोड जेवण असते. याची कु लदैवते म्हणजे व्याडेश्वर, हरिहरेश्वर, व्याघ्रेश्वर, कोळेश्वर, सोमेश्वर इ. समावेश होतो.

**चांद्रसेनीय कायस्थ प्रभू:-** कोकणातील चांद्रसेनीय कायस्थ प्रभू ही प्रमुख जात असून रायगड जिल्ह्यामध्ये अलिबाग, मुरूड, पेण, पनवेल, सुधागड, रोहा या तालुक्यामध्ये त्यांचे जास्त प्रमाण आहे. त्यांचा मूळ प्रदेश अयोध्या असून राजा चांद्रसेन यास आपला वंशज मानतात.

शिलाहार राजाच्या काळात या वंशाचे लोक मुलकी अधिकार पदावर काम करत होते.त्यावेळी त्यांना प्रभू हे अधिकाराचे पद मिळाले होते.मुलकी कामे करणाऱ्या कायस्थानाच पुढे देशमुख हे उपनाव मिळाले.कायस्थांचामध्ये शैव, शाक्त, वैष्णव हे पंथ आढळतात.हे प्रामुख्याने देवीची उपासना करतात.एकविरा दैवी त्यांचे कुलदैवत आहे.हिंदूप्रमाणेच सर्व रितीरिवाज, संस्कार, सण, उत्सव साजरे करतात.

**आगरी:-** रायगड जिल्ह्यातील सवात मोठी लोकसंख्या असलेली जात म्हणजे आगरी होय.त्यांना बागायतदार म्हणून ओळखतात.नारळ-पोफळीच्या बागा असलेल्या गावास आगर किंवा आगरी असे म्हणतात.पोफळीच्या बागा मक्त्याने करणारा म्हणजे आगरी होय.सन १२८९ मध्ये नागावच्या शिलालेखात त्यांचा प्रथम उल्लेख येतो.मिठागरातील कामकरी असा आगरींचा उल्लेख त्यामध्ये आहे.आगरी लोकांना खारकी, खारपाटे किंवा आगले कुणब अशी ही नावे आहेत.त्यांच्या पूर्वजांच्या परंपरागत माहितीनुसार आगरी रावणाचे गायक-वादक होते.त्याच्या कामगिरीबद्दल रावणाने त्यांना पश्चिम किनाऱ्यावरील जमीन बक्षीस म्हणून दिली.[१७] रायगड जिल्ह्यात अलिबाग, पेण, पनवेल, उरण, रोहा व मुरूड तालुक्यात सवात जास्त संख्या आहे. आगरीमध्ये शुद्ध आगरी,दास आगरी,वरप आगरी अशा तीन शाखा आढळतात.शुद्ध आगरी किंवा मीठ आगरी(मीठ करणारे),जस आगरी(ताडी काढणारे),ढोल आगरी(ढोल वाजविणारे), सोन आगरी,पाण आंगले इ.उपशाखा आहेत.वरप आगऱ्यास नवा मराठा समजतात.कारण त्यांना पोर्तुगिजांनी बाटवून ख्रिश्चन केले होते.नंतर ते पावन होऊन पुन्हा हिंदू धर्मात आलेले आहेत.वास आगरी फारच थोड्या प्रमाणात असून ते अलिबाग तालुक्यात आढळतात.त्यांना कराड आगरी असेही म्हणतात.मीठ आगरी स्वत:ला उच्च समजत असून, ते दास आगरी व वरप आगरी यांच्याशी बेटी व्यवहार करत नाहीत.म्हात्रे, ठाकूर, मोरे, मोकल, पाटील, कर्वे, दांडेकर, पिंगले, धुमाळ, थळे, राऊत, नाईक इ.आडनावे आहेत.[१८]

आगरी लोकांच्या वस्त्या लहान-लहान गावात विखुरलेल्या असून त्या गावास पाडा असे म्हणतात.त्यांच्या लग्नात चाळीस विधी असतात.हा विधी धवलारीणीच्या म्हणजे स्त्री पुरोहिताच्या देखरेखीखाली पार पाडला जातो.प्रत्येक विधीच्या वेळी धवलारीणी गाणे म्हणते. या गाण्यांना धवले म्हणतात.फक्त दोनच विधी ब्राह्मण पुरोहित करतो.गौरी पूजन करून नववधूची सुपाच्या मिरवणुकीने सासरी बोलवणे करणे यास ‘बवसा’ म्हणतात.पहिल्या बाळंतपणानंतर आगरी तरुणी

सासरी जाते, तेव्हा तिचे भव्य स्वागत होते.त्यास पानवेत म्हणतात.आगरी पुरुष धोतर किंवा कंबरेला मोठा पंचा गुंडाळतात् अंगात सदरा असतो. स्त्रिया आखूड लुगडे अंगाबरोबर गुडघ्यापर्यंत नेसतात.जुन्या वळणाच्या स्त्रिया घराबाहेर पडताना घोंगडेवजा असलेला खोंडा डोक्यावर घेतात.आगरी समाज मांसाहारी असून भात, डाळ, तांदळाची भाकरी, मासळी हे आगरी लोकांचे मुख्य अन्न आहे.

**कोळी:-**व्यावसायिक व सांस्कृतिकदृष्ट्या महाराष्ट्रीय लोकजीवनापासून भिन्न असलेले लोक म्हणजे कोळी होय.कोल या शब्दाचा अर्थ नौका/होडी असा होतो.यावरून नौकेच्या मदतीने मासेमारी करणारे लोक म्हणजे कोळी होय.संस्कृत शब्दकोशात कोल्हा हा शब्द डोंगर कोळी या जमातीला उद्देशून वापरलेला आहे.सोन कोळी (समुद्र कोळी),महादेव कोळी (डोंगर कोळी),मल्हार कोळी व ढोर कोळी या चार स्वातंत्र जाती कोळ्यांमध्ये आहेत.रायगड जिल्ह्यामध्ये सोन कोळी लोकांची मोठी संख्या आहे.तसेच महादेव कोळी व मल्हार कोळी याचेही थोडेफार प्रमाण आहे.

समुद्रकिनारी राहणाऱ्या कोळ्यांना सोन कोळी असे म्हणतात.यांची वस्ती प्रामुख्याने पेण, अलिबाग, रोहा, मुरूड, श्रीवर्धन तालुक्यात आहे.सोन कोळी यांच्याबद्दल 'शिवनिबंध' ग्रंथात पुढील कथा सांगितलेली आहे.परमेश्वराच्या सोहम या ध्वनीपासून सोह व सोम(मयात) या नावाची मुले झाली.मयातच्या अचिंता नावाच्या मुलीचा कश्यप ऋषीबरोबर विवाह झाला. अचिंताचा मुलगा मार्धन हा हिंसेकडे वळाला म्हणून मयातने त्याला मासे मारून उदरनिर्वाह करण्यास सांगितले.त्यानुसार त्याने मासेमारी सुरू केली.त्याला व त्याच्या वंशजांना सोन किंवा सोन कोळी असे म्हणतात.रायगड जिल्ह्यात त्यांची मूळ वस्ती होती.

आंग्रे प्रशासनाच्या काळात सोन कोळी महिलांवर जीवनपट्टी किंवा चोळीपट्टी नावाचा कर आकारण्यात येत असे.ज्या महिलांना चोळी घालावयाची आहे त्यांना चोळीपट्टी कर भरावा लागत असे.यामुळे अलिबाग व थळ भागातील सोन कोळी लोकांनी स्थलांतर केले.हे कोळी स्वत:ला थळकर सोन कोळी म्हणत असत.हे लोक मासेमारी, सैनिक, किल्लेदार व लढाऊ जहाजांवर नाविक म्हणून काम करीत.विवाहप्रसंगी धवलारीण गाणी गात विधी करते.कोळी महिला फक्त डाव्या हातात बांगड्या घालतात.कारण लग्नाच्या दिवशी समुद्राची कृपा व्हावी म्हणून उजव्या हातातील बांगड्या समुद्राला अर्पण करतात.

महादेव कोळी अथवा डोंगर कोळी हे डोंगर भागात आढळतात. यांचे मूळस्थान बाल घाट अथवा महादेवाचा डोंगर असून तेथून ते आलेले असावेत. कॅप्टन मॅकिन्टोसच्या मते महादेव कोळी जमातीत २४ कुळे आणि २१८ पोटकुळे असावीत.[१९] त्यांच्या १२ कुटुंबाचा एक गट असे अनेक गट असून गटांना गोत्रीभाऊ म्हणतात. पुरुष लंगोटी व धोतर नेसतात. स्त्रिया नऊवारी लुगडे व चोळी वापरतात. मल्हार कोळी ही कोळ्यांची पोटजात असून ते मल्हारीचे भक्त आहे. ग्रामीण भागात ते पाणी भरण्याचा व्यवसाय करतात, त्यावरून पाणभरे कोळी असे म्हणतात. त्यांची जिल्ह्यात अतिशय कमी संख्या आहे. ढोर कोळी ही दुसरी पोटजात जिल्ह्यात असून त्यांची संख्याही अतिशय कमी आहे. ढोर कोळी, टोकरे कोळी, कोलचा कोळी, कोलंधा कोळी या नावांनीही त्यांना ओळखले जाते.

**ठाकूर :-**रायगड जिल्ह्यात ठाकूर ही मोठी अनुसूचित जमात आहे. कर्जत, पेण, खालापूर, पनवेल, सुधागड, तालुक्यातील डोंगर भागात त्यांची लोकवस्ती मोठ्या प्रमाणात आहे. ठाकूरात 'म' ठाकूर आणि 'क' ठाकूर असे दोन सजातीय भेद आहेत. महाल देशातून आलेले 'म' ठाकूर, तर कोकणातून आलेले 'क' ठाकूर असे स्पष्टीकरण देतात. ना. गो. चाफेकर यांच्या मते ठाकुरांच्या बोलीत 'म' आणि 'क' हे वर्ण वारंवार येत असल्याने असे दोन भेद पडले असावेत. ठाकुरांच्या वस्तीला ठाकूरवाडी म्हणतात. वस्तीच्या प्रमुखास पाटील किंवा पडेखोत असे म्हणतात. ठाकुरांच्या घरबांधणीची खास वैशिष्टे आहेत. पुरुष बंडी व लंगोटी नेसतात. स्त्रिया कमरेभोवती घट्ट लुगडे बहुधा गुडघ्यापयत नेसतात. अंगात चोळी घालतात [२०]

**कातकरी :-**कातकरी जमातीचे लोक प्रामुख्याने ठाणे, रायगड जिल्ह्यात आढळतात. त्यांना कातोडी असेही म्हणतात. कातकरी म्हणजे काथ करणारे असा अर्थ होय. जिल्ह्यात खालापूर, कर्जत, रोहा, पनवेल, माणगाव, पेण, सुधागड, अलिबाग तालुक्यात त्यांचे वास्तव्य आहे. रामाच्या वानर सेनेपासून आपली उत्पत्ती झाली असे कातकरी सांगतात. कातकऱ्यात अठावर, वारप, सिद्धी,, सोन किंवा मराठे, धेड किंवा ढोर हे पाच पोटभेद आहेत. सोन कातकरी गोमांस खात नाहीत. सिद्धी कातकऱ्यांची उत्पत्ती आफ्रिकेतून आलेल्या सिद्दीतून झाली. ख्रिस्ती किंवा मुसलमान झालेले लोक,ते शुद्ध होऊन परत आले त्यास वरप कातकरी म्हणतात. ढोर हे गोमांस खात असून त्यांना सवात हलके गणले जाते. कातकऱ्यात एकूण ९३ कुळी

आढळतात.कुळी म्हणजे त्यांची आडनावे होय.पंधरा-वीस झोपड्या असलेल्या कातकऱ्यांच्या वसाहतीस कातकरवाडी असे म्हणतात.[२१]

**भंडारी:-**भंडारी जातीची वस्ती कोकणातील सर्व जिल्ह्यात आढळते.मंधारक या संस्कृत शब्दाचा अर्थ भंडारी म्हणजे दारू गाळणारा असे एक मत आहे.परंतु भंडार म्हणजे खजिना या शब्दावरून हे नाव पडल्याचे भंडारी सांगतात.त्यांना भावगुण असेही म्हणतात.तिलकसुर नावाच्या दैत्याला महादेवाने घाण्याला जुंपले असता महादेवाच्या कपाळावरून गळालेल्या धर्मबिंदूतून उत्पन्न झालेला पुरुष म्हणजे भावगुण होय असा एक समज आहे.तोच भंडाऱ्याचा मूळ पुरुष होय. भंडाऱ्याचे कित्ते भिर्ले गावड़ देवळी तथा बेंद्रे काळण़ थळे शेषवंशी तथा शिंदे आणि किरपाल(क्रियापाल)असे आठ पोटभेद आहेत.मेर्ले भंडारी हे मेर्ला मांडाची ताडी काढतात.भंडारी नारळाच्या झाडाची ताडी काढतात.हे लोक प्रामुख्याने शैव आहेत.महादेव़ खळनाथ़ शिवनाथ़ कालिका़ चंडिका इ.त्यांची कुलदैवते आहेत.नारळी पौर्णिमेला पोवते (यज्ञोपर्वात सदृश दोरा) बांधतात.[२२]

याशिवाय रायगड जिल्ह्यात कुणबी़ माळी़ काळण़ कासाऱ धनगऱ चांभाऱ गुरव़ परीट़ शिंपी इत्यादी जाती-जमाती आहेत.त्यांचे राहणीमान-रीतीरिवाज हिंदू धर्म व संस्कृती प्रमाणेच आहेत.

**मुसलमान:-**लोकसंख्येच्या दृष्टीने हिंदूंच्या खालोखाल मुसलमान समाजाचा क्रमांक लागतो.जिल्ह्यात सुन्नीपंथीय मुसलमानांची संख्या मोठी आहे.कोकणी़ दालदी बोहोरा़ खोजा़ मेमऩ कसाई मंडळीची संख्या आढळते.कोकणी व दालदी हे युफ्राटिस खोऱ्यातून आले असावेत. चौल येथे अरब़ पर्शियऩ मुसलमान मोठ्या प्रमाणात आहेत.कोकणी मुसलमानांची संख्या जास्त असून काहीजण स्वत:ला खान म्हणतात.दालदी हा जिल्ह्यातील दुसरा प्रकार असून दालन या शब्दावरून दालदी हा शब्द तयार झाला.यांचा मच्छीमार हा उद्योग आहे. बोहोरा हे लोक मुंबईहून जिल्ह्यात आले असले तरी ते मूळचे गुजरातचे आहेत.बोहोरा समाजात व्यापार करणारे लोक असून अलिया़ दाऊदी़ जाफरी़ नागोशी़ सुलेमानी या पाच पोटजाती आहेत.मेमण किंवा मोमीन शहरात राहणारे आहेत.मोमीन म्हणजे विश्वास ठेवणारे.हे हनफी पंथाचे असून हालाई मेमन व कच्छी मेमन हे दोन प्रकार आहेत.खोजा याचा मूळ शब्द खव्वाजा असून त्याचा अर्थ शिक्षक़ व्यापारी किंवा भट होय.इजिप्तच्या इस्माइली पंथाचे अनुयायी असून स्वत: सत्याचे शिष्य म्हणवितात.कसाई यांचे

प्रमाण अतिशय कमी आहे. गायकसाई व बकरकसाई असे दोन भेद आहेत. इस्लाम धर्मानुसार सर्व रीतीरिवाज व इस्लामी संस्कार विधीपार पाडतात.

**बेने इस्त्रायल:-**बेने इस्त्रायल या शब्दाचा अर्थ बेन ए इस्त्रायल म्हणजे इस्त्रायलची मुले असा आहे. त्यांना ज्यू यहुदी अथवा शनवार असे म्हणतात. तेल गाळण्याचा प्रमुख व्यवसाय आहे. अलिबाग, रोहा, मुरूड, पेण व पनवेल तालुक्यात त्यांची वस्ती आहे.

रायगड जिल्ह्यातील समाजामध्ये विविध धर्माचे, पंथाचे, जाती-जमातींचे लोक राहात आहेत. भारतीय संस्कृतीच्या रूढी-परंपरेनुसार विविध समाजाचे धार्मिक जीवन दिसून येते. हे धार्मिक जीवन म्हणजे जन्मापूर्वीपासून ते मृत्यूनंतरही करावयाच्या संस्कारांची एक मालिकाच आहे. एकूण १६ संस्कार असून ते सर्व संस्कार थोड्याफार प्रमाणात पाळले जातात. लोक विठोबाचे भक्त आहेत. अनेक मंडळी वारकरी असून पिढ्यान्पिढ्या विठ्ठलाची भक्ती करतात. अनेक देवदेवतांच्या उत्सवाच्या वेळी प्रचंड गर्दी जमा होती. लोकांचा धर्मावर व देवावर खूप विश्वास आहे. दररोज पूजापाठ करत असत. हिंदूंच्या चालीरीतीचा बराचसा भाग धार्मिक विधीशी निगडित आहे. जिल्ह्यामध्ये वीरेश्वर, काळभैरव, हरिहरेश्वर, सोमजाई, धावीर, कनकेश्वर, रामेश्वर, सीतलादेवी, बल्लाळ विनायक, वरदविनायक इ. दैवतांच्या जागृत व स्वयंभूपणाचे दाखले आहेत. आगरी, कुणबी, माळी, काळण, भंडारी, कोळी या समजाचेही उपरोक्त दैवते आहेत. कातकरी व ठाकूर जमातीचे लोक वाघदेव, चेडा, हिरवा, वेताळ, म्हशा, जरीमरी, मावळ्या इ. देवतांची पूजा करतात. कोकणी, दालदी, वोहोरा, खोजा, मेमन हे सुन्नी पंथीय असून कुराण त्यांचा धर्मग्रंथ आहे. महंमद पैगंबराच्या आदेशाप्रमाणे रोज पाच वेळा मशिदीत अरबी भाषेत नमाज पढतात.

धार्मिक जीवनाशी अनेक लोककला प्रचलित आहेत. 'पिंगळी' या लोककलेचा उगम पहारेकऱ्यांच्या गरजेतून झाला आहे. पिंगळ्याचा कलाकार पहाटे गाणे म्हणून लोकांना ज्ञानामृत पाजून तृप्त व कृतार्थ बनवितो. 'पांगुळे' ही लोककला ठाकर समाजानेच जोपासलेली आहे. नंदीबैल प्राण्यांचा आधार घेऊन पांगुळवाला कलाकार पांगुळ लोककला सादर करतो. 'चित्रकथी' हा लोककला प्रकार ठाकर समाजातील सर्व कलाकारांनी पूर्वापार जोपासला आहे. चित्रकथा लोककलेमध्ये चित्रांच्या साहाय्याने जो चित्रकथाकार कथाकथन करतो, तो श्रेष्ठ चित्रकथक म्हणून प्रसिद्धीस येतो. आदिवासी, ठाकर समाजात कलाकारांनी भिंतीचित्रांना चांगले कलात्मक वळण देऊन प्रसिद्धी मिळविली आहे. या कलावंतांना 'पोथी सोडणे' असे म्हणतात. ठाकर समाजात

'कळसूत्री' लोककला हा एक प्रकार आहे. या लोककलेवर राजस्थानी कळसूत्री कलेचा प्रभाव दिसून येतो. यामध्ये बहुसंख्येचे दोन प्रकार असतात. त्यांना सजवून कार्यक्रम केले जातात. ठाकर समाजाने 'गोंधळी' लोककला जोपासलेली आहे. ही कला अभिनव रूपात कार्यरत आहे. ही मूळची राजस्थानी कला आहे. ठाकर समाजाने 'वासुदेव' ही लोककला जोपासलेली आहे. पहाटेच्या वेळी मधूर आवाजात अनेक गाणी सादर करून, नृत्य करून सवाना जागा करतो. ठाकर समाजाने 'नमन' लोककलेलाही जन्म दिला. नमन लोककलेत पौराणिक नाटकातील प्रमुख पात्रांच्या भूमिकेतून सूचक वक्तव्ये करून व भारुडी भजन पद्धतीने सादर केलेले नमन हे उत्कृष्ट समाजप्रबोधनाचे साधन होते.[२३] याशिवाय खळनाथ संप्रदाय, सातेरी संप्रदाय, दत्त संप्रदाय, रामदासी संप्रदाय, सूर्योपासने इत्यादी संप्रदाय परंपरा आढळतात.

## ❖ <u>रायगड जिल्ह्यातील आर्थिक स्थिती :-</u>

भारताचा शेती हा प्रमुख व्यवसाय असून त्यावर आधारीत अर्थव्यवस्था होती. आधुनिक काळात नव्या तंत्रज्ञानामुळे औद्योगिकीकरण सुरू झाले. शेतीबरोबरच उद्योग, व्यवसाय आणि व्यापार याचा विकास होऊन आर्थिक परिस्थिती सुधारली. रायगड जिल्ह्याच्या आर्थिक स्थितीचा विचार करताना शेती,त्याची उत्पादने तसेच शेतीवर आधारित जोड- व्यवसाय हे प्रमुख्य घटक असल्याचे दिसून येते. जोड-व्यवसायामध्ये गुरे पाळणे, मासेमारी, लाकूडफाटा गोळा करणे हे प्रमुख व्यवसाय आहे. याशिवाय औद्योगिक व कुटीरउद्योग, हस्तकला या उद्योगातून आर्थिक विकास हळूहळू होत होता.

### ● जमीन व कृषी उत्पादने :-

रायगड जिल्ह्याच्या प्रदेशातील जमिनीची रचना विविध स्वरूपाची असल्याचे दिसून येते. पनवेल व उरण तालुक्यामध्ये चिकणमातीची काळी जमीन आहे. श्रीवर्धन, म्हसाळा, मुरूड व अलिबाग तालुक्यात रेताड वाळुमिश्रित तांबडी आणि अल्प प्रमाणात रेती असलेली काळी जमीन आहे. खालापूर व सुधागड तालुक्यात उथळ चिकण मातीची जमीन, तपकिरी व लाल खडकांच्या जमिनीचे पट्टे आहेत. कर्जत तालुक्यात तपकिरी व काळसर लाल रंगाच्या जमिनी आहेत. महाड व पोलादपूर भागात गडद व तपकिरी रंगाची जमीन आहे. महाड व माणगाव तालुक्यातील जमीन सर्व साधारण आहे. रोहा व पेण तालुक्यात तांबडी व काळी जमीन आहे. पोलादपूर तालुक्यातील काही भागात आणि माथेरान डोंगरावर लॅटेराईट खडकाळ जमीन आढळते.[२४] रायगड जिल्ह्यातील

जमिनीचे सर्वसाधारणपणे वर्गीकरण पुढीलप्रमाणे- १)जंगलयुक्त जमीन २)वरकस जमीन ३)भात जमीन ४)खार जमीन ५)समुद्र व नदी ६) लॅटेराईट जमीन.

रायगड जिल्ह्यामध्ये शेती हा प्रमुख व्यवसाय असून शेतकरी अतिशय कष्टाळू आहेत. जिल्ह्यात खरीप व रब्बी हे शेतीचे हंगाम आहेत.नैऋत्य मोसमी वाऱ्यामुळे पडणाऱ्या पावसात खरीप पिके घेतात.आग्नेय वाऱ्यामुळे आलेल्या पावसाच्या मदतीने रब्बी पिके घेतात.जिल्ह्याचे प्रमुख पीक भात असल्याने रायगडला भाताचे कोठार असे म्हणतात.पोलादपूर, महाड, माणगाव, रोहा तालुक्यात नाचणी व वरीची पीके घेतली जातात.खरीप हंगामात वाल आणि तूर ही पिके पिकवली जातात.अलिबाग, श्रीवर्धन, मुरूड, म्हसाळा या तालुक्यात माडाच्या बागा तर जिल्ह्यात समुद्रकिनारपट्टी भागात सुपारीच्या बागा आढळतात. श्रीवर्धनची रोठा सुपारी प्रसिद्ध आहे. याशिवाय काजू, कलिंगड, फणस इ.पिके घेतली जातात.माणगाव, तळे, अलिबाग, पनवेल व पेण या तालुक्यात भाताचे पीक जास्त प्रमाणात होते.श्रीवर्धन, पनवेल, अलिबाग, मुरूड इ. तालुक्यात पोफळीची आगरे आहेत.

**जिल्ह्यातील निरनिराळ्या प्रमुख पिकांखालील असलेली जमीन**

| अ.क्र. | पिके | एकर क्षेत्र |
|---|---|---|
| १ | भात | ३२७४३७ |
| २ | नाचणी | ५१४७० |
| ३ | वरी | २४१४७ |
| ४ | हरभरा | १११७ |
| ५ | मूग | ३१३० |
| ६ | तूर | २५०१ |
| ७ | उडीद | २७८४ |
| ८ | वाल | १७२८७ |
| ९ | मिरची | १५५२ |

वरील पिकांशिवाय ज्वारी, गहू, चवळी, वाटाणे इ.पिके घेतली जातात. फलोत्पादनाखाली १४४४६ एकर जमीन आहे.त्यामध्ये सुपारीच्या लागवडीचे १२८७ एकर, नारळीच्या लागवडीखाली १२९८ एकर, काजू लागवडीचे ५९५८ एकर क्षेत्र आणि भाजीपाल्याच्या लागवडीचे क्षेत्र ५९०३ एकर जमीन आहे.आंबा, पेरू, चिकू ही फळे मोठ्या प्रमाणात जिल्ह्यात घेतली जातात.[२५]

जिल्ह्यामध्ये विविध पिकांवर वेगवेगळे रोग व कीड पडत असते. खोडा कीड लष्कर अळी पाने गुंडाळणारी अळी तुडतुड़े कडाकरपा करपा अभासमय काजळी उदबत्ता इ. रोग व किडींचे प्रकार [२६] आहेत. या किडींचा व रोगांचा नाश करण्यासाठी औषधे फवारणी केली जाते. त्यामुळे शेतातून चांगल्या प्रतीचे मोठ्या प्रमाणात उत्पादन मिळत असते.

- **जलविद्युत :-**

जलविद्युतचे महत्त्व पटल्याने जमशेटची टाटांनी एक योजना तयार केली. परंतु योजना तयार होण्यापूर्वी त्यांचा मृत्यू झाला. त्यानंतर त्याचे सुपुत्र सर दोराबजी व सर रतन टाटा यांनी खोपोलीनजीक जलविद्युतची सन १९०७ मध्ये परवानगी मिळविली. सन १९१५ मध्ये मुंबईचा गव्हर्नर लॉर्ड विलिंग्डन यांच्या हस्ते प्रकल्पाचे उद्‌घाटन झाले. सन १९१६ मध्ये आंध्र व्हॅली पॉवर सप्लाय कंपनीची स्थापना करून कर्जतजवळ ठोकरवाडी येथे जलाशय बांधण्यास प्रारंभ केला. याच पाण्यावर भिवपुरीला जलविद्युत केंद्र स्थापन केले. सन १९१९ मध्ये टाटा पॉवर सप्लाय नावाची तिसरी कंपनी स्थापन केली. भिरा येथे जलविद्युत प्रकल्प उभारला. खोपोली जलविद्युतनिर्मिती योजना ब्रिटिश अभियंता डेव्हिड गॉसलिंग याने जमशेटजी टाटा यांच्यासाठी तयार केली. [२७] डिझेलवर चालणारे वीजनिर्मिती केंद्र सुरू करण्यात आले. माथेरान सन १९३१ मध्ये सुरू करून २४६ मेगावॅट वीजनिर्मिती केली. महाडला सन १९३३ मध्ये सुरू करून ३१५ मेगावॅट वीजनिर्मिती केली. सन १९३४ मध्ये वीजनिर्मिती केंद्र मुरूड- जंजिरा येथे सुरू करून ५१.५ मेगावॅट वीज निर्माण करण्यात आली. तिन्हीसाठी स्वतंत्र वीज मंडळे स्थापन करण्यात आली. पुढे महाराष्ट्र शासनाने वरील केंद्र महाराष्ट्र राज्य वीज मंडळाच्या ताब्यात दिली. [२८] मुंबईला वीज पुरवठ्यासाठी टाटांनी खोपोली (१९१५) भिवपुरी (१९२२) भिरा (१९२७) मध्ये जलविद्युत केंद्रे सुरू केली.

- **औद्योगिक उत्पादने :-**

रायगड जिल्ह्यामध्ये उद्योगधंद्याच्या इतिहासातील अतिशय महत्त्वाची बाब म्हणजे शिवाजी महाराजांनी कुलाबा किल्ल्यात गलबते बांधण्याचा कारखाना सुरू केला. पुढे कान्होजी आंग्रे यांनी गलबते बांधण्याच्या कामाला उत्तेजन देऊन आरमारी साधनसामग्री तयार करण्याचा प्रयत्न केला. मुगल व आंग्रे कारकिर्दीत चौलला चांगले हातमाग कापड विणले जाई. रेवदंड्यातील कोष्टी लोक पितांबर विणाईसाठी प्रसिद्ध होते. सन १७५८ च्या सुमारास मुंबईचा हातमाग उद्योग वाढविण्यासाठी ब्रिटिशांनी वसई रेवदंडा चौलच्या विणकरांना सवलत देऊन मुंबईत

आणले.रेवदंड्यात सन १८५० च्या सुमारास पितांवर विकणारे कोष्टी लोक होते.[२९] १९ व्या शतकात महाड़ माणगाव़ जंजिरा येथे हातमाग सुरू होते.परंतु सन १९३० च्या काळात गिरणीतील कापडाची आयात होऊ लागल्याने बहुतांश हातमाग हळूहळू बंद पडले.सन १९५१ मध्ये जिल्ह्यात २१६ माग व ६०३ कारागीर होते.त्याचप्रमाणे लोकर विणकाम व्यवसाय होता. माणगाव़ मालेगाव़ अलिबाग़ रोहा इत्यादी ठिकाणी १०० धनगर कुटुंबे घोंगड्या वीणत.सन १९२० मध्ये मालेगाव़ अलिबागचा व्यवसाय बंद पडला.सन १९२१ मध्ये कारागिराची संख्या फक्त ५३ होती.

सन १९३० मध्ये पेणच्या कटलरी कारखान्याच्या रूपाने अभियांत्रिकी उद्योगाला प्रारंभ झाला.परंतु अभियांत्रिकी उद्योगाचा खरा प्रारंभ मोरा उरणच्या ग्राईडवेल ॲब्रेसिव्हज कारखान्याने सन १९४० मध्ये केला.झेकोस्लोव्हाकियातील तंत्रज्ञांच्या मदतीने हा कारखाना सुरू झाला होता. स्वातंत्र्यपूर्व काळामध्ये औद्योगिक प्रगती अत्यल्प होती.जिल्ह्यात रासायनिक उद्योगाची सुरुवात पनवेलमध्ये सन १८७२ मध्ये धुतपापेश्वर आयुर्वेदिक औषधाच्या कारखान्याने झाली.हा कारखाना विष्णू कृष्णशास्त्री ऊर्फ तात्या पुराणिक यांनी सुरू केला.[३०] सन १९५१ मध्ये सुदर्शन केमिकल्स इंडिया हा रासायनिक पदार्थाचे उत्पादन करणारा दुसरा कारखाना रोहा येथे सुरू झाला.

दुसऱ्या महायुद्धाच्या काळात खोपोली व आपटा येथे दोन कागद कारखाने सुरू करण्यात आले.नंतर आपटा कारखाना खोपोली कारखान्यात समाविष्ट केला.सन १९४९ मध्ये मुंबईहून एक कागद कारखाना खोपोलीला स्थलांतरीत झाला.सन १८७० मध्ये सत्यसदन नावाचा पहिला छापखाना अलिबाग येथे सुरू झाला.तेथे शिलामुद्रण पद्धतीचे काम चालत असत.सन १८९२ मध्ये फामजी मेहतांनी माथेरान जॉटिंग्ज द्विसाप्ताहिक सुरू केले.ते १९१६ मध्ये बंद पडले.सन १९०७ मध्ये पनवेलमध्ये धुतपापेश्वर मुद्रणालय सुरू झाले.सन १९५४ मध्ये जिल्ह्यात दहा मुद्रणालये होती.[३१]

खाद्य पदाथ्याच्या उत्पादनामध्ये पोहा़ तेल़ मिरची मसाला पावडऱ बेकरी पदार्थ इ. समावेश होतो.सन १८९७ मध्ये पनवेलमध्ये पहिली यांत्रिक भात गिरणी सुरू झाली.सन १९११ मध्ये जिल्ह्यातील भात गिरण्यामध्ये ़२१९२ कामगार होते.सन १९२२ मध्ये भात गिरणीचे यांत्रिकीकरण झाले.सन १९३५ मध्ये पेणमध्ये गोपाळराव साठे यांनी पहिली पोहा गिरणी सुरू केली.त्यासाठी बडोद्याहून यंत्रसामग्री आणली.सन १९३८ मध्ये पनवेलमध्ये माणकचंद पोहा मिल व वेस्टर्न इंडिया

पोहा फॅक्टरी सुरू झाली.सन १९४२ मध्ये जिल्ह्यात आठ पोहा गिरण्या सुरू होत्या.[३२] या खाद्यपदार्थ उत्पादनास मुंबई पुणे रत्नागिरी बाजारपेठेत मोठी मागणी होती.

विडी पेये मद्य उत्पादन रायगड जिल्ह्यात सुरू होते.सन १८७१-७२ मध्ये उरण हे मोहाची दारू गाळण्याचे प्रमुख केंद्र होते.पारशांच्या मालकीच्या सुमारे २० भट्ट्या होत्या.[३३] त्यात मोहाची दारू खजुराची दारू तयार करत असत.मोहा फुलांचे मुंबईचे पारशी व्यापारी जबलपूरवरून मोहाची फुले आणून उरणला पाठवत असत.सन १८७१ ते १८८१-८२ या काळात दरवर्षी सरासरी ५१३६७० गॅलन दारूचे उत्पादन होते .दारूपासून उत्पादन शुल्कही मोठ्या प्रमाणात मिळत असे.सन १९२० मध्ये शासनाने उरणच्या दारूभट्ट्या बंद करून इतरत्र नेण्याचा निर्णय घेतला.[३४] महाड येथे पहिला विडी कारखाना सन १९११ मध्ये सुरू झाला.दुसरा विडी कारखाना सन १९४८ मध्ये महाडमध्येच सुरू झाला.या दोन्ही कारखान्यामध्ये १४० कामगारांनी (३१ पुरुष १०९ महिला) ४०७०६ श्रमदिवस काम केले.[३५] सन १९८१ मध्ये जिल्ह्यातील विडी कारखाने बंद झाले.तळोजा येथे हाथूर ब्रुवरीज ॲण्ड डिस्ट्रिलरीज व सावळे येथे बॉम्बे ब्रुवरीज हे पेयनिर्मितीचे कारखाने सुरू झाले.

- **कुटीरउद्योग व हस्तकला उद्योग:-**

मीठ कोळसा हातमाग मूर्ती तांबे व पितळेची भांडी व खेळणी सुतार चर्मोउद्योग कुंभारउद्योग लोहारकाम वेतकाम व बांबूकाम यांचा समावेश कुटीर व हस्तकला उद्योगामध्ये होतो.पनवेलमध्ये क्राफर्ड या व्यक्तीने सन १८६६मध्ये विटाचा कारखाना सुरू केला.येथील विटांना मुंबईत मोठी मागणी होती.सन १९२८-२९ मध्ये पनवेल व मोरा येथे विटांचे दोन कारखाने सुरू झाले.मोरा येथील भारत स्टाईल फॅक्टरीमध्ये १० लाख रंगीत कौलांचे उत्पादन झाले.सन १९३४-३५ मध्ये २ लाख रुपये किंमतीची कौले तयार होती.१९ व्या शतकात महाड व पेणमध्ये व्यावसायिक चांभार होते.सन १९११ सन १९२१ सन १९३१ सन १९५१ मध्ये अनुक्रमे ७१७ ४७० ४८३ ५८३ कारागीर होते. आंग्रेच्या काळामध्ये कुलाबा बंदरामध्ये गलबते बांधत असत.

१९ व्या शतकापासून पनवेल बैलगाडीची चाके बांधणीसाठी प्रसिद्ध होते.टणक सागापासून चाके बनवली जात असत.रायगड पुणे सातारा अहमदनगर कोल्हापूर जिल्ह्यात पनवेलच्या चाकांना मोठी मागणी होती.पूर्वी कोचीन व आफ्रिकेतून व्यापारी मचवे आणून शंभर दोनशे चाक जोड्या खरेदी करत असत.या व्यवसायात हिंदू कच्छी मुसलमान सुतार आहेत.

१९११ मध्ये जिल्ह्यात १५९९ व्यक्ती सुतारकाम करत. सन १९५१ मध्ये १५३३ सुतारकाम करत होते. पेण महाड पनवेल खोपोली अलिबाग नागोठाणे रोहा या ठिकाणी हा व्यवसाय केंद्रित झालेला होता.

- **मीठ उत्पादन :-**

प्राचीन काळापासून शेतीनंतर मीठ उत्पादन हा सवात मोठा व्यवसाय आहे. शिवाजी महाराजांच्या राजवटीत हा मोठा उद्योग असल्याचे दिसून येतो. त्यांनी स्थानिक मिठास संरक्षण दिले. पेशव्यांच्या काळात उरण पेण पनवेल नागोठाणे ही प्रमुख उद्योग केंद्रे होती. मिठागरातील प्रत्येक वाफ्यावर एक टक्का (४आणे) आणि उत्पादित मिठावर खंडीस २ रुपये १० आणे एवढा कर आकारला जाई.[३६] एकोणिसाव्या शतकात अलिबाग पेण पनवेल रोहा जंजिरा व उरण भागात हा व्यवसाय केंद्रित होता. सन १८५८-७२ या काळात मिठागरे बंद करून भात शेती सुरू केली होती. सन १८७४ मध्ये अलिबाग रोहा भागातील अष्टमी मिठागरे वगळता सर्व मिठागरे बंद पडली. रायगड जिल्ह्यात वाशी हे मीठ उत्पादनाचे प्रमुख केंद्र असून वढाव शिर्की कणे ओबंगी इ. खेड्यात मिठागरे आहेत. उरणची बहुतांशी मिठागरे खाजगी व एक शासकीय मालकीचे होते. ब्राह्मण मारवाडी पारशी सोनार मराठा खोजावाणी व ख्रिश्चनांच्या मालकीची मिठागरे होती. मिठागर मालकांना शिलोतरी असेही म्हणत. ही मिठागरे आगरी भाड्याने घेत असत. भाड्यापोटी उत्पादित मिठाचा चौथा ते दुसरा भाग मिळत असे.

**१८९३ ते १९५६ या काळात जिल्ह्यातील मीठ उत्पादन व विक्रीची आकडेवारी पुढीलप्रमाणे.**

| **वर्ष** | | **१८९३-९४** | **१९१०-११** | **१९०२-०३** | **१९२१-२२** | **१९४५-४६** | **१९५६** |
|---|---|---|---|---|---|---|---|
| **पनवेल** | उत्पादन | ४११०६१ | ४३६८९० | १२७३० | - | - | - |
| | विक्री | ४१९२११ | ४१९१४२ | १२६८५ | - | - | - |
| **उरण** | उत्पादन | १८२९५७४ | १८९५,४९७ | १,०३४०७५ | ९,६९,२५० | ११,९४६४१ | ९,७४००० |
| | विक्री | १७०३२७६ | १५५८४९४ | ९,७८९०३ | ७९०७६६ | - | - |
| **पेण** | उत्पादन | ३४४ ८१० | २५१३६४ | २५८५४४ | १,४६,७०० | ४२९,३३२ | ३८३००० |
| | विक्री | ३४७८८० | २१७१४६ | २६५,५२४ | २०२३९० | - | - |
| **कारंजा** | उत्पादन | ४७०५४८ | ६१० ५५५ | ७२१३१५ | २७२३४५ | ७४०१७८ | ५४१००० |
| | विक्री | ५१० ३२२ | ४५६. २६२ | ६ ७०७७१ | ४९७२३८ | - | - |
| **शेवा** | उत्पादन | - | - | १७७७८०६ | १,४०२८५० | १७२७९७५ | १,४५६००० |
| | विक्री | - | - | १६६२५१२ | १,६४००७८ | - | - |

सन १९०६-०७ मध्ये उरण महालाचे दोन तालुके निर्माण होऊन शेवा हा नवीन तालुका झाला. त्यामुळे मीठ उत्पादन करणाऱ्या पनवेल, पेण, उरण, शेवा, कारंजा तालुक्यात एकूण ३,६६,५९४ मण मिठाचे उत्पादन झाले. त्यापैकी १३६४६८० मण मीठ एकट्या शेवा तालुक्याचे होते. सन १९११ ते १९२१ या काळात पेण, कारंजा, शेवा, उरण येथील व्यवसाय सुस्थितीत असला तरी सन १९१५-१६ मध्ये पनवेलचा व्यवसाय बंद पडला.

## ❖ रायगड जिल्ह्यातील वाहतूक व दळणवळण:-

कोकणातील भौगोलिक परिस्थितीमुळे वाहतूक व दळणवळण क्षेत्रामध्ये फारशी प्रगती दिसून येत नाही. तरीपण समुद्रकिनारपट्टी लाभल्याने जागतिक व्यापरक्षेत्रात महत्त्वाचे स्थान प्राप्त झाले होते. व्यापारामुळे घाटमार्ग, रस्ते, जलमार्ग यांचा उपयोग प्राचीन काळापासून होत असल्याचे आढळून येते. त्या दृष्टीने वेळोवेळी या मार्गात सुधारणा करण्यात आल्या आहेत. हे सर्व मार्ग रायगड जिल्ह्याच्या प्रदेशातून कमी-जास्त प्रमाणात जात होते. त्याचा उपयोग रायगडच्या विकासासाठी झाल्याचा दिसून येतो.

### ▪ रस्ते व घाट:-

रायगड जिल्ह्यात भौगोलिक पार्श्वभूमीमुळे वाहतूक व दळणवळणांचा विकास झाला नाही. अनेक नद्या, खाड्या, डोंगर, घाट यामुळे रस्ते बांधणे व त्याची देखभाल करणे अतिशय खर्चीक असल्यामुळे त्याचा विकास झाला नाही. रायगड जिल्ह्यात प्राचीन काळापासून वाहतूक होत असल्याचा उल्लेख आढळतो. ख्रिस्तपूर्व २२५ वर्षापासून बोर, देवस्थळी, कुंभा या घाट रस्त्यांमुळे चौल, महाड, गोरेगाव(घोडेगाव),नागोठाणे आणि राजपुरी ही बंदरे व्यापारी केंद्रास जोडली होती. परकीय प्रवाशापैकी भूगोलतज्ज्ञ टॉलेमीने इ.स.१५० मध्ये चौलचा उल्लेख सिमुल्ला किंवा तिमुजल्ला असा केला आहे. इ.स.१७७ च्या सुमारास पिलीनीने चौलचा उल्लेख पेरीमुला असा केलेला आहे.[३८] नैर्नच्या मते चौलशी बोरघाटातून मोठा व्यापार चालत असत. हा मार्ग बोरघाटातून पनवेल व पुढे जलमार्गाने नागोठाण्यापयत आणि नागोठाण्याहून पुढे रोहा व कुंडलिका नदीपयत जात असे. खोंडाणे, जांबरूंग, कार्ले, आंबिवली, भाजे आणि बेडसा लेण्यांमधील अवशेषावरून इ.स.पूर्व १०० ते इ.स.६०० या काळात बोरघाटातील रस्त्याचा मोठ्या प्रमाणात वापर होत असावा असे दिसून येते.

इ.स.६०० ते १२०० या कालावधीत संजानहून चिरई माहाज़ पिंप्री मार्गे बागलाण व खानदेशपयत व्यापारी मार्ग असावा.[३९] जिल्ह्यातील सवात जुना रस्ता बोरघाटातून पनवेल़ खारवा़ सोपारापयत जात असे.सन १८२६ मध्ये रायगड जिल्ह्यात पुण्याहून तीन रस्ते येत होते.पुण्याहून सावे घाटातून भोर संस्थान ओलांडून रायगड जिल्ह्यातील उन्हेरे येथे प्रवेश करून रावगाव़ चिकणीहून नागोठाण्यापयत जात होता.हा रस्ता १०३ किमी होता.त्यापैकी १९ किमी रस्ता रायगड जिल्ह्यात होता.पुणे रत्नागिरी हा २६२ किमी.लांबीचा दुसरा रस्ता असून ६१ किमी रस्ता जिल्ह्यातून जात होता.तो रस्ता घाटातून प्रवेश करूऩ रायगड जिल्ह्यातील काळनदीहून दहिवड़ बिरवाडी़ खारोशी़ माटवण़ कणगुले़ दिवील़ सावित्री नदी ओलांडून पोलादपूर गोगराघाटात प्रवेश करून जिल्ह्याच्या बाहेर जात असे.[४०]

पुणे ते गोरेगाव(घोडेगाव)पयत जाणारे दोन रस्ते होते.त्यापैकी कुंभा घाटामार्गे निजामपूरहून गोरेगावहून जाणाऱ्या मार्गाची लांबी १०५ किमी.असून फक्त २९ किमी.जिल्ह्यामध्ये होता.हा मार्ग काळ नदी पार करून कडापे़ हरवंडी़ करंबेली़ ताम्हणे़ पळसगाव़ हातकेली़ तळेगाव़ कुरवडे़ वडगाव़ पुणे असा रस्ता होता.तर दुसरा मार्ग देवस्थळी घाटातून उतरून उमरोलीमार्गे गोरेगावपयत जात असे.[४१] क्लन्स नावाच्या प्रवासाने १८२६ मध्ये नमूद केले की़ ३४ किमी.लांबीचा पेण़ पनवेलमार्ग पेणहून निघून भोगावती नदी पार करून तरणखोप़उरवाडी गावानंतर बळबळीपयत जात असे.खारोशीजवळ ओलांडून ठाणे जिल्ह्यातील पनवेलला जात असे.

सन १८५० मध्ये पेण ते अलिबाग दरम्यान तीन रस्ते होते.त्यापैकी नागोठाणे-सांबरी-पोयनाडमार्गे जाणारा ७२.५ किमीचा रस्ता होता.दुसरा रस्ता कासू-सांबरी-पोयनाडमार्गे ५ किमी लांबीचा रस्ता होता.तिसरा रस्ता धामतर-पोयनाडमार्गे जाणारा ३९ किमी लांबीचा रस्ता होता.सन १८४० मध्ये मिस्टर डेव्हिस या अधिकाऱ्याने धरमतर खाडी पार करण्यासाठी पेणच्या बाजूस असलेल्या खाडीवर वडखळपयत एक पूल व रस्ता बांधण्यात यावा अशी सूचना दिली होती.[४२] पनवेलहून बोरघाटातील पहिला रस्ता ब्रिटिशांनी १७७९ च्या शेवटी तयार केला.जनरल वेलने सन १८०४ मध्ये सुधारणा केली.सन १८३० मध्ये गर्व्हनर सर जॉन माल्कमने बोरघाटातील नव्या रस्त्याचे उद्घाटन केले.सन १८८२ मध्ये पनवेलहून तीन रस्ते तयार करण्यात आले.ते म्हणजे

पनवेल-उलवे पनवेल-उरण-मोरा-करंजा बंदर तसेच पनवेल-कोळखे-चौकहून कर्जत रेल्वे स्थानकाशी जोडणारा रस्ता होता.

सन १८८१ मध्ये रायगड जिल्ह्यात ३०१ किमी. लांबीचे १२ रस्ते असून त्यापैकी तीन रस्ते ७७ किमी.लांबीचे बारमाही वाहतुकीस आणि नऊ रस्ते २२३ किमी.लांबीचे हंगामी होते. नागोठाणे ते धरमतर हा प्रमुख रस्ता होता.नागोठाण्याहून कोलाड-माणगाव-महाड-पोलादपूर-महाबळेश्वरच्या पायथ्यापयत असा ९० किमी.लांबीचा प्रमुख मार्ग सन १८८१ मध्ये बांधण्यात आला.या रस्त्याला अनेक रस्ते मिळत असत.याशिवाय रेवस-अलिबाग २४किमी.लांबीचा रस्ता असून या मार्गाने प्रवाशी मुंबईला जात असत.कार्ला घाटातून जाणारा अलिबाग-धरमतर हा २१ किमीचा रस्ता सन १८८०-८१ मध्ये तयार करण्यात आला.त्यामुळे खोपोली ते अलिबाग रस्ता तयार झाला.सन १९२१-२२ मध्ये रायगड जिल्ह्यात सुमारे २९९ किमी.लांबीचे खडीचे रस्ते व ४५५ किमी.लांबीचे हंगामी कच्चे रस्ते होते.सन१९३९-४० पयत जिल्ह्यात ८४९.४३ किमी. लांबीचे रस्ते होते.त्यापैकी ३२६.९७ किमी.लांबीचे पक्के रस्ते व ५२५.४६ किमी.लांबीचे कच्चे रस्ते होते.सन १९४३ मध्ये रस्ते विकासाचा कार्यक्रम आखण्यात आला.या योजनेस 'नागपूर योजना' असे म्हटले आहे.सन १८७५ ते १९२१ दरम्यान रायगड जिल्ह्यातील रस्ते व पुलांची कामे मोठ्या प्रमाणात झाली.[४३]

रायगड जिल्ह्यातील सर्वात जुना पूल नागोठाण्याजवळील अंबा नदीवरील आहे.तो चौलच्या काझी अल्लाउद्दीन याने आपल्या सैन्याची वाहतूक सुलभ करण्यासाठी सन १५८० मध्ये बांधला.सन १८२९ मध्ये पुलाच्या दुरुस्तीसाठी २५९० रु,. मंजूर केले होते.सन १८८२ मध्ये पुन्हा दुरुस्ती करण्यात आली.सन १८८३ मध्ये निझामपूरजवळ काळ नदीवर माणगावसाठी सहा कमानीचा मोठा पूल होता.सन १८७१ मध्ये धरमतर ते नागोठाणे या रस्त्यावर प्रत्येक २५ फुटाच्या अंतरावर १२ कमानी व दुसरा प्रत्येक २५ फुटावर चार कमानी दगडी पूल बांधण्यात आला.सन १८८२ मध्ये धरमतर ते खोपोली रस्त्यावर असलेल्या तीन पुलापैकी पेणजवळ भोगावती नदीवर गोरणा नदीवर काळी नदीवर पूल बांधण्यात आले. महाड-वरंध घाट रस्त्यावर सन १८६७ मध्ये सावित्री नदीवर पूल बांधण्यात आला.अलिबाग-रेवस रस्त्यावर दोन पूल आहेत.

■ **घाट व खिंडी मार्ग:-**

पुणे व सातारा जिल्ह्यांना जोडणारे अनेक घाट व खिंडी असून त्यामधून पाऊलवाट व रस्ते आहेत.रायगड जिल्ह्याच्या आग्नेयेस सातारा जिल्ह्यातील मालकम पेठेमधून कोकणात जाणारे पारघाट व रडतोंडी घाट आहेत.प्रतापगडच्या भागातून महाडच्या आग्नेयस किनेश्वर गावाजवळ पार घाट सुरू होतो. सन १८२६ पयत बंजारा लोक या मार्गाने व्यापार करत असत.पार घाटाच्या उत्तरेस फिट्झगेराल्ड (आंबेनळी)घाटमार्ग आहे.कापडे खुर्द गावापासून महाबळेश्वर घाटमाथ्यापयत रस्ता आहे.सन १८७१ मध्ये घाट रस्त्याचे काम सुरू होऊन सन १८७६ मध्ये पूर्ण झाले.यासाठी ४.४४ लाख रुपये खर्च आला.[४४] हा रस्ता सुरूर- महाबळेश्वर-महाड असा होता.सध्या आंबेनळी घाटातून महाड-पोलादपूर-वाई-भाडळे- दहिवडी हा राज्य महामार्ग जातो.आंबेनळी घाटाच्या उत्तरेस ढवळा व कामठा घाट असून तो भोर संस्थानातून वाईपयत जातो.कामठा घाटाच्या उत्तरेस वरंधा गावाजवळ वरंध घाट आहे.या घाटातून पूर्वी सोलापूर-महाड-धरमतर असा मार्ग होता.हा घाट सातारा पब्लिक वर्क्स विभागाने सन १८६७ मध्ये १११०६० रुपये खर्च करून बांधला.[४५] या घाटमार्गातून बाणकोट-म्हाप्रक-महाड- भोर-शिरवळ- फलटण-पंढरपूर हा राज्य महामार्ग जातो.वरंध घाटाच्या उत्तरेस माझेरी येथे उंबर्ड घाटाच्या उत्तरेस शिवथरजवळ गोप्या घाट असून गोप्या घाटामधून पुण्याकडे जातो.गोप्या घाटाच्या उत्तरेस शिवथर येथे आंबेनळी घाट असून तो सन १८२६ पयत वाहतुकीस योग्य होता.आंबेनळी घाटाच्या उत्तरेस बाकी बुद्रुक येथे मढघाट असूनसध्या महाड-मढेघाट-वेल्हे-नसरापूर-पुणे हा राज्य महामार्ग आहे.याशिवाय ताम्हणे, कावळ्याघाट, कुंभाघाट, निसनीघाट, शिबाघाट, देवस्थळी घाट आहेत

मुंबई-पुणे शहरांना जोडणारा बोरघाट अतिशय महत्त्वाचा आहे.सन १८०४, सन १८२५, सन १९३० मध्ये अनेक सुधारणा करून वाहतुकीस खुला करण्यात आला.सन १८४० मध्ये संपूर्ण पक्का रस्ता तयार केला.घाटाच्या उत्तरेस राजमाची घाट व राजमाची किल्ला आहे.त्यास कोकण दरवाजा असे म्हणतात.राजमाची घाटाच्या उत्तरेस कुसूरघाट असून तळेगावहून कुसूर- कर्जत-नेरळ-कल्याण-पनवेल अशी वाहतूक चालत असते.हा घाट पेशवे काळात बांधलेला आहे.[४६]रायगड जिल्ह्यात लहान टेकड्यामधून जाणाऱ्या अकरा खिंडी आहेत.अलिबाग तालुक्यात पाच व पेण, रोहा, महाड तालुक्यात प्रत्येकी दोन खिंडी आहेत.

- **लोहमार्ग :-**

मध्य रेल्वेचा (पूर्वीची ग्रेट इंडियन पेनिन्सुल रेल्वे) मुंबई-पुणे रेल्वेमार्गाचा प्रवेश जिल्ह्यात शेळू येथे तर शेवट पळसदरी येथे होतो. याची लांबी २५ किमी. आहे. १२ मे १८५६ रोजी कल्याण ते पळसदरी रेल्वे सुरू झाली. या मार्गावर नेरळ-चिंचवळी-कर्जत-पळसदरी ही रेल्वेस्थानके होती. बोरघाटाचे काम पूर्ण झाल्यावर पळसदरी-खोपोली मार्ग बंद केला. सन १८७९ मध्ये पुन्हा सुरू केला. कर्जत-खोपोली हा १५किमी. लांबीचा मार्ग सन१८५६ मध्ये सुरू झाला. कर्जत-पळसदरी-डोलवली-लोवजी-खोपोली रेल्वेस्थानके आहेत.

सन १९०७ मध्ये नेरळ-माथेरान हा नॅरोगेज रेल्वेमार्ग सुरू झाला. याचे श्रेय मुंबईचे व्यापारी सर आदमजी पीरभाय यांच्याकडे जाते. सन १९०० आदमजी माथेरानला आले. प्रवासाचा त्रास झाल्याने रेल्वे सुरू करण्याचा निर्णय घेतला. माथेरान-नेरूळ या रेल्वेमार्गाचा प्रस्ताव आदमजीचा मुलगा अब्दुल हुसेन याने शासनाकडे पाठविला. प्राथमिक सर्वेक्षणाचे काम जर्मन अभियंत्याने केले. त्यानंतर रायसाहेब हरिश्चंद्र याला आदमजींनी काम दिले. सन १९०३ मध्ये काम सुरू झाले. १५ एप्रिल १९०७ रोजी १३ लाख रुपये खर्च करून पहिली रेल्वे धावू लागली.[५२] सन १९२७ मध्ये मुंबई शासनाच्या सल्ल्यानुसार आर्थिक अडचणीमुळे हुसेनने ग्वाल्हेरचे राजे शिंदे यांच्याकडे चार लाख रुपयांना माथेरान-नेरूळ रेल्वेमार्ग गहाण ठेवला. सन १९५१ मध्ये भारतीय रेल्वेचे पुनर्गठण झाल्यानंतर हा रेल्वेमार्ग मध्य रेल्वेच्या प्रशासकीय विभागाच्या नियंत्रणाखाली आली.

दिवा-दासगाव रेल्वे प्रकल्पाचा सन १८९४ पासूनचा इतिहास आहे. मराठा रेल्वे कंपनीने कराड ते मुंबई-उलव बंदरापयत रेल्वे मार्गासाठी सर्वेक्षण केले. त्यानंतर सन १९१८ मध्ये रेल्वे बोर्डाने चिपळूणमार्गे कराड-उलवपयत मीटर गेज रेल्वेसाठी सर्वेक्षण केले. सन १९२० मध्ये ग्रेट इंडियन पेनिन्सुला रेल्वेशी जोडण्यासाठी व ब्रॉड गेज करण्याचा प्रस्ताव रेल्वे बोर्डाने स्वीकारला. जास्त खर्चीक असल्याने दासगावपयत रेल्वेमार्ग बांधावा हा निर्णय झाला. त्यास १९४६ मंजुरी मिळाली. पुन्हा सन १९५३ मध्ये सर्वेक्षण करण्यात आले. दिवा ते पनवेल याचे सन १९६२ ला काम सुरू झाले. २८ डिसेंबर १९६६ रोजी वाहतुकीस सुरुवात झाली.

■ **जलवाहतूक:-**

टॉलेमी पेरिप्लस स्ट्रॅबो व प्लिनी यांच्या माहितीनुसार चौल मांदाड महाड पाले राजपुरी गोरेगाव या बंदरातून इजिप्त अरेबिया पर्शिया ओमान रोमन इ. साम्राज्याशी प्राचीन काळात मोठ्या प्रमाणात व्यापार चालत असे. वरील बंदरे सह्याद्रीच्या पूर्वेकडील जुन्नर नाशिक पैठण यासारख्या व्यापारी केंद्रांशी बोरघाट देवस्थळीघाट कुंभाघाट शेवट्याघाट या घाटमार्गांनी जोडलेली होती.[४४] मुंबई-पुणे रेल्वेमार्ग सुरू होण्यापूर्वी प्रवासी व माल वाहतुकीसाठी जलमार्ग प्रमुख साधन होते. मुंबई -रेवस मुंबई-रेवस-धरमतर मुंबई-मांडवा मुंबई-उलव-पनवेल धरमतर- नागोठाणे हे पाच प्रमुख जलमार्ग होते. पोर्तुगिजांच्या आगमनापूर्वी रेवदंडा हे महत्त्वाचे बंदर होते. परंतु गाळाने भरते म्हणून धरमतर धक्का १८६८ मध्ये १६,५३० रु. खर्च करून बांधण्यात आला. जिल्ह्यातील वाहतूक प्रामुख्याने गलबतांने होई. यामध्ये बाम्बोट पडाव मचवा धरबा म्हांगिरी फटेमारी कोठिया बटेलो या प्रकारची गलबते होती. नाखवेचे कप्तान प्रामुख्याने मुंबई, रत्नागिरी राजापूर अंजनवेळ अलिबाग वलसाड जंजिरा येथील कोळी भंडारी मुसलमान लोक असत.[४९]

सन १८८३ मध्ये जिल्ह्यात एकूण १३ बंदरांचे सीमा शुल्कासाठी अलिबाग पेण राजपुरी आणि बाणकोट या चार गटात विभागणी केलेली होती. अलिबाग गटात थळ अलिबाग रेवदंडा मांडवा रेवस आणि धरमतर या सात बंदराचा समावेश होता. पेण समूहात पेण अंतोरा नागोठाण्याचा समावेश होता. राजपुरी विभागात मांदाड एकच बंदर होते. बाणकोट विभागात म्हाप्रणे सावित्री गोरेगाव दासगाव आणि रत्नागिरी जिल्ह्यातील काही बंदरांचा समावेश होता. जिल्ह्यात १६ बंदरपैकी सात बंदरे सागरकिनाऱ्यावर होती. त्यामध्ये मांडवा थळ अलिबाग श्रीवर्धन मुरूड जंजिरा नांदगाव कुंभार याचा समावेश होतो. पनवेल करंजा मोरा रेवस धरमतर रेवदंडा राजपुरी बोर्ली मांडला मांदाड ही नऊ बंदरे खाडीवर आहेत. मुंबई-पणजी मार्गावरील प्रवासी वाहतूक होत असून मुरूड जंजिरा श्रीवर्धन येथे थांबत असत. अलिबाग थळ बंदरे फक्त मालवाहतुकीसाठी वापरत असत. मोरा व रेवस ही बंदरे जलवाहतुकीस उपयुक्त आहेत. रेवस येथून अलिबाग भागातील तर मोरा येथून उरण भागातील मुंबईसाठी प्रवासी वाहतूक चालत असे.[५०]

जिल्ह्यात उल्हास पाताळगंगा अंबा कुंडलिका सावित्री काळ या मुख्य नद्या आहेत. धरमतर करंजा नागोठाणे रोहा राजपुरी बाणकोट आपटे साखर मांदाड धारापुरी बोरखार रेवदंडा

मुरूड़ श्रीवर्धन या प्रमुख खाड्या असून त्यातून जलवाहतूक व मालवाहतूक सुरू होती. सन १८८२ मध्ये जिल्ह्यात ३१ प्रमुख केंद्रे होती.त्यापैकी अंबानदीवर ४ कुंडलिका नदीवर ४ सावित्री नदीवर ५ काळ नदीवर ४ आणि लहान नद्या व खाड्यावर १४ केंद्रे होती.३१ केंद्रापैकी १६ केंद्रे बारमाही१५ केंद्रे पावसाळी सुरू होती.या केंद्रातून लहान-मोठ्या नाव (तरसेवा) चालत असत.

कुंडलिका नदीवरील रोहा ते रेवदंडा साळवा ते रेवदंडा अशी वाहतूक होत असे. अंबानदीवर धरमतर ते नागोठोण व धरमतर ते वावे साखरखाडीवरील अलिबाग ते साखर अशी तरसेवा चालत असे.जंजिरा संस्थानात एकूण १२ तरसेवा होत्या.बाणकोट खाडीमध्ये तळवडे-निगडी-फळसप-पाणदरे-आंबेत-म्हाप्रल श्रीवर्धन खाडीमध्ये श्रीवर्धन- काळिंजे- पंचातन- बोली-दिवेआगर ते वेळास राजपुरी खाड्यांमध्ये राजपुरी-दिघीराजपुरी-जंजिरा किल्ला मुरूड खाडीमध्ये डोंगरी-मुरूड़नांदगाव खाडीतून नांदगाव ते पलीकडचा किनारा मांडला खाडीतून बोर्ली-कोरोणे-चिपोळेबोर्ली-बारसिव आणि रेवदंडा खाडीतून साळव-रेवदंडा तसेच मुंबईतील कर्नाळ बंदर ते हॉगबेट उरण तालुक्यातील मोरा पनवेल तालुक्यातील उलवापयत यंत्रचलित बोटीची तरसेवा होती.बॉम्बे फेरीज ॲण्ड इनलॅड व्हेसलस कंडिशन ऑला हायसेन्स ॲक्ट १९४८ च्या तरतुदीनुसार जिल्हा परिषद नाव चालविण्याचा परवाना देते.

## ❖ <u>रायगड जिल्ह्यातील सांस्कृतिक जीवन:-</u>

कोकणामध्ये सांस्कृतिक जीवनाची परंपरा फार मोठी आहे.परंतु ही परंपरा ठरावीक वर्गा पुरतीच मर्यादित असल्याची दिसून येते.सामाजिक राजकीय सांस्कृतिक दृष्टिकोनातून विकास घडून आलेला दिसतो.शिक्षण साहित्य नाट्य कलाक्षेत्रात महाराष्ट्राची जी मंडळी आघाडीवर होती त्यामध्ये रायगड जिल्ह्याचे प्रमाण सवात जास्त असल्याचे दिसून येते.रायगड जिल्ह्यातील सांस्कृतिक जीवनाचा विकास झालेला आढळून येतो.शिक्षण क्षेत्रामध्ये अत्यल्प प्रगती झालेली असली तरी साहित्यकलाक्षेत्रात मोठा विकास झालेला आहे.या जिल्ह्याने साहित्य क्षेत्रासाठी अनेक नामवंत लेखक मंडळी दिलेली आहे.त्यांनी साहित्याच्या विविध अंगाने लेखन केले.कला नाट्य गायन वाद्य या क्षेत्रासाठी अनेक दिग्गज महाराष्ट्राला दिलेले आहेत.या सांस्कृतिक विकासाच्या चळवळीने स्वातंत्र्य चळवळीला मोठ्या प्रमाणात हातभार लावला आहे.अनेक नाटके व स्थानिक स्वरूपाचे सार्वजनिक कार्यक्रमातून लोकजागृती आणि स्वातंत्र्य चळवळीचा प्रसार व प्रचार

अनेकांनी केलेला आढळतो.त्या दृष्टीने सांस्कृतिक विकास आणि स्वातंत्र्य चळवळीसाठीचे योगदान यांचा संबंध महत्त्वाचा आढळतो.

- **शैक्षणिक वाटचाल:-**

रायगड जिल्ह्यात शिक्षणाचे प्रमाण फारच कमी असल्याचे दिसून येते.प्रभू व ब्राह्मण विद्यार्थ्यांना प्राथमिक शिक्षण देण्यासाठी मोठ्या गावात शाळा असून शिक्षक बहुधा ब्राह्मण असत.त्यांचा पगार गावचा प्रमुख देत असे.मराठ्यांच्या काळात नागाव व पेण ही विद्येची प्रमुख केंद्रे होती.आग्रे राजवटीत कुलाबा किल्ल्यात शिक्षणाची सोय करून सर्व खर्च संस्थानाकडून केला जात असे.[५१] ब्रिटिशांनी आपले राज्य स्थापन केल्यानंतर शिक्षण क्षेत्रातही बदल केले.

जिल्ह्यात पहिली व्हर्नाक्युलर शाळा सन १८४० मध्ये महाडला सुरू करण्यात आली. दुसरी शाळा नागोठाणेला सन १८५६ मध्ये भोर संस्थानने सुरू केली.अलिबाग तालुक्यात तीन, महाड व माणगाव तालुक्यात प्रत्येकी दोन, पेण व रोहा तालुक्यात प्रत्येक एक शाळा सुरू करण्यात आली.सन १८६५-६६च्या दरम्यान जिल्ह्यात व्हर्नाक्युलर शाळेची संख्या ३० होती. जिल्ह्यात मुलींसाठी पहिली शाळा सन १८६९ मध्ये अलिबागला सुरू झाली.[५२]

भोर संस्थाने आपल्या प्रदेशातील पाली, नाडसूर, आतोने, जांभूळपाडा, सिद्धेश्वर येथे शाळा सुरू केल्या.जंजिरा संस्थानामध्ये सन १८७० मध्ये मुरूड येथे पहिली सरकारी शाळा सुरू झाली.सन १८७३ मध्ये श्रीवर्धनला दुसरी शाळा सुरू झाली.याच वर्षी मुरूड, म्हसाळा,श्रीवर्धन येथे प्रत्येकी एक देशी शाळा सुरू केली.हरेश्वर, मांडले, बोर्लीला प्रत्येकी एक शाळा सन १८७५-७६ मध्ये सुरू झाली.सन १८८१-८२ मध्ये २२ शाळा असून १,२२१ विद्यार्थी होते.

सन १८५० मध्ये पहिली सरकारी शाळा पनवेलला सुरू झाली असावी.सन १८४८ मध्ये पनवेलमध्ये मराठी शाळा स्थापन झाली.सन १८७२ मध्ये गुलामसाहेब राऊत यांनी आपल्या घरात सन १८७२ मध्ये उर्दू शाळा सुरू केली.सन १८८१-८२ मध्ये पर्शियन शाळा सुरू होऊन त्यामध्ये १२२ विद्यार्थी होते.दलितांकरिता शाळा सुरू होती.त्यामध्ये ४४ विद्यार्थी होते.सन १८५४ मध्ये उरण येथे शाळा नं.१,१८७१ मध्ये व कन्याशाळा नं.२,१०९२ मध्ये नेटिव इंन्स्टिट्यूट ही इंग्रजी शाळा सुरू करण्यात आली.सन १९०४ मध्ये एडेंडने उर्दू शाळा स्थापन केली.[५३]

अलिबाग येथे फ्री मिशन चर्चने सन १८७९ मध्ये पहिली इंग्रजी शाळा सुरू केली. अलिबाग, रोहा, महाड, पेण येथील खाजगी शाळेतून इंग्रजी शिकविले जाई.जिल्ह्याात चार शहरे

वगळता ग्रामीण भागात १८ खेड्यांमध्ये एक शाळा या प्रमाणात शाळा सुरू करण्यात आल्या. अलिबाग उपविभागात १५ महाड विभागात ११ माणगाव विभागात १७ पेण विभागात ८ रोहाविभागात ८ पनवेल विभागात १८ कर्जत विभागात १७ शाळा सुरू होत्या.[५४]

श्री.बा.ग.रानडेश्री.के.रा.आठवलेश्री.ग.दा.टिळक श्री.सी.वि.घाटे यांनी अलिबागच्या इंग्रजी शाळेला कटशह देण्यासाठी १ जानेवारी १९१७ रोजी कोकण एज्युकेशन सोसायटीची स्थापना केली.पेण एज्युकेशन सोसायटी(१९१०)अभिनव ज्ञानमंदिर कर्जत (१९१५) अलिबाग शिक्षण प्रसारक मंडळ(१९१७) माणगाव तालुका एज्युकेशन सोसायटी (१९४)खालापूर तालुका शिक्षण प्रसारक मंडळ(१९५७) पनवेल एज्युकेशन सोसायटी (१९६०) या संस्थांनी जिल्ह्यात शिक्षण प्रसाराचे कार्य केले.जिल्ह्यात साक्षरतेचे प्रमाण अत्यल्प होते.उच्चवर्णीयांमध्ये काही प्रमाणात साक्षर लोक होते.महिला व मागासलेल्या जातीमध्ये साक्षरतेचे प्रमाण नगण्य होते.

- **साहित्य क्षेत्रातील विकास:-**

रायगड जिल्ह्याच्या शैक्षणिक स्थितीचा विचार करता पुणे मुबंई या शहरांच्या तुलनेने अतिशय कमी प्रगती झालेली आढळून येते.परंतु जे शिकले त्यांनी स्वातंत्र्य चळवळीच्या प्रवोधनाचे अप्रत्यक्ष कार्य मोठ्या प्रमाणात केल्याचे दिसून येते.रायगड जिल्ह्यातील शिक्षण हे केवळ ब्राह्मण वर्गापुरते असल्याचे स्पष्ट होते.इतर समाजात व स्त्रियांमध्ये शिक्षणाचा प्रसार झालेला दिसत नाही.कोकणामध्ये जे अनेक विचारवंत साहित्यिक उदयास आले त्यांनी साहित्यक्षेत्रात भरीव कामगिरी करून आपले वेगळे स्थान निर्माण केले.

त्यापैकी काही मंडळी कोकणातील असून रायगड जिल्ह्यात त्यांचे वास्तव्य असल्याचे आढळून येते.ज्योतिर्विलासकर्ते शा.बा.दीक्षित यांचे रेवदंड्यात वास्तव्य होते.केरू नाना छत्रे यांची जन्मभूमी व कर्मभूमी नागाव होती.रघुनाथ पंडित यांचे चौल येथे वास्तव्य होते.समर्थ रामदासस्वामींनी 'दासबोध' या ग्रंथाचा बराच मोठा भाग शिवथरघळ येथे लिहिला असे मानतात. इतिहासकारांच्या मते "ज्ञानेश्वरी एकनाथी भागवत तुकारामांचे अभंग आणि दासबोध हे महाराष्ट्राचे चार वेद आहेत.[५५] गोविंद निधी वासकर (नेवासकर)ऊर्फ कवी परमानंद हे मूळचे नेवाशाचे असून सन १६७३ पासून पोलादपूर येथे कायम वास्तव्य केले.त्यांनी १०० अध्यायांचे 'शिवभारत' महाकाव्य लिहिले.शिवकालीन कवी रघुनाथ पंडित यांनी 'दमयंती स्वयंवर' हे काव्य

लिहिले.य.ग.फडके यांच्या मते कवी रघुनाथ पंडित हे चौल येथील असून त्यांचे आडनाव मनोहर होते.[५६]

आधुनिक कालखंडात अनेक नामवंत साहित्यिक प्रसिद्ध होते.श्री.अनंत महाराज पैठणकर नाते-महाड येथे ध्यानधारणा करीत.त्यांनी संत तुकारामाच्या आत्मानुभवावर चाळीस हजार अभंगांच्या ओव्या रचल्या आहेत.श्री.विष्णुबुवा ब्रह्मचारी यांचा 'वेदोक्त धर्मप्रकाश' सवात मोठा ग्रंथ होय.'सुखदायक राज्य प्रकरणी निबंध' या प्रबंधामध्ये सर्व संपत्ती लोकांना समानतेने मिळावी व सरकारने प्रत्येकास पोटभर अन्न व चांगला निवास द्यावा अशी मागणी केली. श्री.नारायण मराठे तथा स्वामी केवलानंद सरस्वती यांनी संस्कृतमध्ये 'मीमांसा कोशा' चे सात खंड प्रसिद्ध केले.चोल़ नागाव़ अष्टगार या भागात अनेक शास्त्री होऊन गेले.त्यामध्ये श्री.जगन्नाथ शास्त्री क्रमवंत़ श्री.दाजीशास्त्री शुक्ल़ श्री.बाळकृष्ण शास्त्री सोवानी़ श्री.गंगाधरशास्त्री फडके होते.

शास्त्रीमंडळींच्या मदतीने मोल्सवर्थ़ मेजर कॅडी़ जॉर्ज विस्टे जर्व्हिस़ माऊंट स्टुअर्ट एल्फिन्स्टन यांच्या मार्गदर्शनाखाली 'मराठी भाषेचा कोश' व मराठी व्याकरणाचे लेखन केले. मोल्सवर्थ व मेजर कॅडी यांच्या मार्गदर्शनाखाली सन १८१९ मध्ये 'मराठी-मराठी कोश' हा पहिला मराठी कोश प्रसिद्ध झाला.त्यास पंडिती कोश म्हणतात.त्याचे मूळ नाव 'महाराष्ट्र भाषेचा कोश' हे आहे.श्री.माधव चंद्रोबा डुकले यांनी आवासकर कृष्णशास्त्री पेंडसे यांच्या मदतीने 'शब्दरत्नाकर' नावाचा सवात मोठा कोश तयार केला.कोशरचनेप्रमाणे व्याकरण रचना क्षेत्रातही जिल्ह्यातील अनेक मंडळींनी प्रभावी कार्य केले.मराठीतील पहिले मुद्रित व्याकरणाचे कर्ते श्री.गंगाधरशास्त्री फडके होय.त्यांनी 'महाराष्ट्र भाषेचे व्याकरण' हे पुस्तक प्रसिद्ध केले.श्री. जगन्नाथशास्त्री क्रमवंत़ श्री.रामशास्त्री जन्हवेकऱश्री.गंगाधरशास्त्री फडके व श्री.बाळशास्त्री घणवे या चार पंडितांनी मराठी व्याकरण लिहिण्याचे काम केले.रेवदंड्याचे शंकर बाळकृष्ण दीक्षित यांनी मराठी कवितेचे 'विद्यार्थिबुध्दिवर्धिनी'हे व्याकरण लिहिले.मराठी भाषेच्या कोशाप्रमाणेच व्याकरणाच्या जनकत्वाचा मान रायगड जिल्ह्यातील नागाव़ चौल़ अष्टागरातील शास्त्री मंडळींना द्यावा लागतो.

एकोणिसाव्या शतकाच्या सुरुवातीस पाठ्यपुस्तके आणि छापील पुस्तकांची कमतरता होती.ती कमी करण्याच्या हेतूने हैदशाळा़ शाळापुस्तक मंडळ आणि त्याच्याशी संबंधित असलेल्या

शास्त्रींनी पंडितांनी पायाभूत कार्य केले. विल्यम हेन्री बेल याने नारायणशास्त्री जोशी चौलकर यांच्या मदतीने शिल्पविद्या या विषयावर निबंध तयार केला. श्री. गोविंद गंगाधर फडके यांनी 'यंत्रशास्त्रीची मुळे' हे शास्त्रीय पुस्तक प्रसिद्ध केले. जॉर्ज जर्व्हिस याने श्री. जगन्नाथशास्त्री क्रमवंत व श्री. रामचंद्रभट अधलेकर यांच्या मदतीने अंकगणित कर्तव्यभूमिती आदिकरण भूमिती बीजगणित इ. विषयांच्या पुस्तकांची भाषांतरे केली. नागावचे श्री. सदाशिव काशिनाथ तथा बापू छत्रे यांनी अनेक पुस्तकांचे भाषांतर केले. पेण तालुक्यातील वरसईचे वेदशास्त्री श्री. विष्णुभट बाळकृष्ण भट्ट गोडसे यांनी 'माझा प्रवास' स्वहस्ते लिहून काढले. त्यांच्या मृत्यूनंतर सन १९०७ मध्ये कल्याणच्या श्री. चिंतामण विनायक वैद्यांनी प्रथम प्रसिद्ध केले.[५७]

विसाव्या शतकात साहित्यिक परंपरा जिल्ह्यातील अनेक लेखकांनी चालू ठेवली. महाडचे श्री. शिवराम महादेव परांजपे यांचे नाव प्रामुख्याने पुढे येते. त्यांनी 'काळ'साप्ताहिक व 'स्वराज्य' साप्ताहिकमधून राजकीय सामाजिक इ. अनेक प्रकारचे लेख प्रसिद्ध केले. तसेच नाटकेकथासंग्रह कादंबरी इ. लेखन केले. गोरेगावचे श्री. महादेव मल्हार जोशी श्री. नारायण मल्हार जोशी श्री. वामन मल्हार जोशी यांनी साहित्य क्षेत्रात मोठी भर घातली. वामनरावांची राजकीय विचारधारा लोकांच्या स्मरणात नसली तरी ते कादंबरीकार व विचारवंत म्हणून प्रसिद्ध होते. काव्यशास्त्र विनोदाचा फार मोठा ठेवा त्यांच्याकडे होता हे त्यांच्या लेखनावरून दिसून येते.[५८] महाडचे श्री. गोविंद गोपाळ टिपणीस व श्री. गोंविद चिमणाजी भाटे हे सार्वजनिक व सांस्कृतिक जीवनात कार्य करणारे विचारवंत होते. सुधागड तालुक्यातील काशिनाथ हरी मोडक ऊर्फ कवी माधवानुज यांनी बंगाली साहित्याचा अनुवाद केला. पनवेलजवळील पळस्पे गावचे श्री. विनायक लक्ष्मण भावे यांनी 'महाराष्ट्र सारस्वत' हा ग्रंथ प्रसिद्ध केला. 'महाराष्ट्र कवी' या मासिकातून प्राचीन कवींच्या अनेक कविता प्रसिद्ध केल्या. मुरूड-जंजिरा येथील श्री. बाळकृष्ण अनंत भिडे खोपोलीचे श्री. रघुनाथ वामन दिघे श्री. त्र्यंबक विष्णू पर्वते (उद्धरगाव) आवासच्या मालतीबाई बेडेकर उरणचे श्री. वामन रावजी ढवळे चौकचे श्री. दि. बा. मोकाशी खिडकीचे श्री. गंगाधर गणेश पाटील धामणपाडाचे श्री. मधुकर सुदाम पाटील चौलचे श्री. माधव नारायण आचार्य पनवेलचे श्री. मोरेश्वर सखाराम मोने पळस्पेचे श्री. भालचंद्र कृष्ण भाटवडेकर यांनी व्याकरण कथा कादंबरी नाटक शास्त्रीय इ. विषयांमध्ये लेखन केले.

- **नाट्यक्षेत्रातील प्रगती :-**

जिल्ह्यामध्ये अनेक नाटककार व नट उदयास आलेले होते. त्यांनी नाट्य संस्था स्थापन करून अनेक नाटके रंगभूमीवर आणली.सन १९०४ मध्ये महाडला महाराष्ट्र नाटक मंडळाची स्थापना झाली.या मंडळाने कृ.प्र.खाडिलकर, राम गणेश गडकरी यांची नाटके बसवली.'कांचनगडची मोहना'या नाटकाच्या पहिल्या प्रयोगाच्या वेळी स्वत: खडिलकर हजर होते.पुणे, मुंबई या शहरात अनेक नाटके सादर केली.गणपतराव भागवत, कारखानीस, टिपणीस बंधू, त्र्यंबकराव प्रधान, पोतनीस,दाते इ.अनेक नट या मंडळास लाभले होते.[५९] अलिबागचे पुरुषोत्तम भास्कर डोंगरे यांनी गद्य व संगीत नाटके लिहिले.स्वदेशी हितचिंतक नाट्य मंडळ व किर्लोस्कर नाटक मंडळाने नाटके बसविली.महाडचे शि.म.परांजपे व यशवंत नारायण ऊर्फ आप्पा टिपणीस तसेच केशव सीताराम ठाकरे(पनवेल)वा.म.जोशी, र.वा.दिर्गे व त्र्यंबक विष्णू पर्वते यांनीही नाटके लिहिली.रेवदंड्याचे प्रति केशवराव कृष्णराव शेंड़े पनवेलचे गणेश कृष्ण बोडसे,अलिबागचे केशवराव गो.कुंटे यांनी अनेक नाटके लिहिली.तसेच नट म्हणून प्रभावी भूमिकाही नाटकातून बजावल्या.या काळात गाजलेली नाटके म्हणजे कांचनगडची मोहना, प्रेमसंन्यास, चंद्रसेना, मत्स्यगंधा, भाऊबंदकी, कीचक वध, टाकलेले पोर, शिवसंदेश, झाशीची राणी, मर्द मराठा, देशाचा फकीर इ.नाटके या काळात गाजली.नाट्यकृतीबरोबर रंगभूमीचा नट व दिग्दर्शक म्हणून अनेकांनी सेवा केली.[६०]

- **संगीतक्षेत्रातील प्रगती:-**

जिल्ह्यामध्ये उच्च दर्जाचे गायक, नट होऊन गेले.कुंतिनाथ करके यांचा शाहीर म्हणून खास उल्लेख करावा लागेल.शाहिरी वाङमय व राष्ट्रीय कविता लिहणारे महाडचे कवी विष्णू गणेश धारप यांचा उल्लेख येतो.रेवदंड्याचे कृष्णराव शेंडे यांच्या अनेक ध्वनीमुद्रिकाही निघाल्या होत्या.पेझारीचे श्री.गंगाराम धुवा पाटील हे गंधर्व नाटक मंडळीत गायक नट होते.तरणखोपचे श्री.बाळाराम पाटील, वाघरणचे श्री.शांतारामबुवा पाटील हे गायक नट होते.भावगीत गायकमध्ये पेणचे श्री.यशवंत त्र्यंबक देव, चिरनेरचे श्री.गोविंद त्रिंबक पोवळे यांचा उल्लेख करावा लागतो. श्री.यशवंत देव सुगम संगीत क्षेत्रात गायक, दिग्दर्शक या नात्याने प्रसिद्ध आहे.माणगाव तालुक्यातील पोटनेरच्या लावणी गायिका सुलोचना शामराव चव्हाण प्रसिद्ध आहेत.जिल्ह्यात बासरी, तबली, मृदंग, ऑर्गझ वाद्ये वाजविणाऱ्या गुणी कलावंताची मोठी खाण आहे.उत्तम बासरी वादक पेणचे श्री.वामन गणेश देवधर तर पेणचेच ऑर्गन वादक श्री.आनंद

दत्तात्रय लिमये तबला वादक पेणचे श्री.विनायक कृष्णाजी धांग्रेकर प्रसिद्ध आहेत.धांग्रेकर हे सारंगी दिलरूबा पखवाज वाजवीत असत.पालीचे श्री.गोविंद पटवर्धन हे उत्तम हार्मोनियम व ऑर्गन वादक आहेत.

रायगड जिल्ह्यामध्ये ब्रिटिश मुरूड-जंजिरा संस्थान भोर संस्थान यांची राजकीय सत्ता दीर्घ काळ होती.त्यांच्यात नेहमी सत्तासंघर्ष होत असल्याने प्रादेशिक बदल सतत होत असल्याचे दिसून येतात.भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर सन १९६० मध्ये महाराष्ट्र राज्याची निर्मिती झाली.महाराष्ट्र राज्य सरकारने विकासाच्या हेतूने जे प्रशासकीय विभाग निर्माण केले आहेत त्यापैकी कोकण प्रशासकीय विभागात रायगड जिल्ह्याचा समावेश केलेला आहे.महाराष्ट्राच्या प्रादेशिक वैशिष्ट्यांचे महत्त्वाचे घटक रायगड जिल्ह्यामध्ये मोठ्या प्रमाणात आहेत.त्यामध्ये समुद्रकिनारा डोंगर घाट खाड्या नयनरम्य निसर्ग यांचा समावेश होतो.रायगडच्या प्राकृतिक रचनेमध्ये भूस्वरूप अतिशय महत्त्वाचे व वेगळ्या स्वरूपाचे आहे.हवामान तापमान पर्जन्यमान यामध्ये सतत बदल होत असला तरी उष्ण दमट व खारट हवामान नेहमीच असते.नैसर्गिक संपत्तीमध्ये खनिजसंपत्ती सागरीसंपत्ती वनस्पतीसंपत्ती प्राणीसृष्टी यांचाही साठा रायगडमध्ये आहे.बॉक्साइट हे प्रमुख खनिज असून मीठ मासे यांचे उत्पादन मोठ्या प्रमाणात जिल्ह्यात आहे.प्राचीन काळापासून अनेक बंदरे व्यापारासाठी प्रसिद्ध आहेत.शिवाय मुंबईजवळ असल्याने रायगडला अतिशय महत्त्व प्राप्त झाले आहे.मुंबईच्या सहवासामुळे येथील लोकजीवनावर मोठा परिणाम झाला.त्यांच्या राहणीमानामध्ये सुधारणा होऊ लागली.अनेक धर्माचे पंथाचे जाती–जमातीचे लोक अतिशय आनंदाने एकत्र राहतात.

रायगड जिल्हा आर्थिक व सामाजिक परिस्थितीत मागासलेला असला तरीही हा प्रदेश नररत्नांचा प्रदेश म्हणून ओळखला जातो.तसेच या प्रदेशाची भाषाही मराठीचे अभिजात सौंदर्य मिरविणारी कोमल व मंजुळ आहे.या प्रदेशाची बुध्दिमत्ता ही बुध्दी स्तिमित करणारी गोष्ट आहे. महाराष्ट्रातील मराठी भाषेतील अतिप्राचीन शिलालेख व ताम्रपट याच जिल्ह्यात प्राप्त झाले आहे. अनेक कवी नाटककर प्रसिद्ध आहेत.मराठी भाषेतील प्रथम कोश रचनाकार व्याकरण रचनाकार यांचे मानकरी याच जिल्ह्यातील अनेक शास्त्री मंडळी आहेत.काळाची गरज आणि शिक्षणाचे परिवर्तन होत असताना पाठ्यपुस्तके तयार करणारे आणि स्वातंत्र्य चळवळीच्या काळात समाज जागृतीसाठी प्रवोधनपर लेखन करणारे विचारवंत साहित्यिक आग्रक्रमान याच जिल्ह्यातील

आहेत. संगीत नाट्य कला व स्थापत्य या कलाक्षेत्रातही आपले स्थान वरच्या क्रमांकाचे मिळविणारे अनेक कलावंत आहेत. ब्रिटिश राजवटीपासून सुधारणेची वाटचाल अतिशय मंद गतीने चालू होती. ब्रिटिशांनी स्वत:च्या हितासाठी का होईना? दळणवळणाच्या सुधारणेला प्रारंभ केला. १९५० नंतर खऱ्या अर्थाने रायगड जिल्ह्यातील विकासाला प्रारंभ झाला. त्यामुळे सर्वच क्षेत्रात प्रगती होत आहे. जिल्हा आजही आपले स्थान श्रेष्ठ दर्जाचे राखण्याचा प्रयत्न करत आहे.

रायगड जिल्ह्याचा अभ्यास करत असताना अनेक बाबी समोर आल्या आहेत. रायगडची सामाजिक आर्थिक आणि सांस्कृतिक परिस्थिती मूठभर लोकांच्या हाती असल्यामुळे वास्तव परिस्थिती एका बाजूस अतिउच्च दर्जाची दिसते तर दुसऱ्या बाजूस अति मागासलेली दिसून येते. प्रगती व अधोगती या दोन्हीही बाबी जिल्ह्यात एकाच वेळी दिसून येतात. पुणे मुंबईमध्ये मोठ्या प्रमाणात विकास झालेला असूनही त्याच्या शेजारी असलेल्या रायगड जिल्ह्याला विकासाचा स्पर्शही झालेला दिसून येत नाही. जिल्ह्याच्या अप्रगतीची-मागासलेपणाची कारणमीमांसा व स्पष्टीकरण करताना काही ठळक बाबी व विविध कारणे दिसून येतात.

त्या कारणांमध्ये असे दिसते की, जिल्ह्यातील सुशिक्षित कर्ते बुध्दिवान लोकांनी स्थानिक विकासाचे व चळवळीचे नेतृत्व न स्वीकारता अन्य ठिकाणी नोकरीच्या निमित्ताने स्थिर झाले. ज्यांना शक्य आहे तेवढे लोक शहरात जाऊन गिरण्यातून व कारखान्यातून काम करतात. जे शिकले ते आपल्या मूळ प्रदेशापासून दूर गेले. शेती उत्पादनामध्ये नवीन तंत्रज्ञान नाही. सुधारित पध्दतीने शेती करण्याचे शेतकऱ्यांना माहीत नाही. तसेच उत्पादित झालेल्या मालाला शहरापयत पाठविण्यासाठी भरपूर व सोईची दळणवळणांची साधने नाहीत. बऱ्याच गावातून पाण्याचे दुर्भिक्ष आहे. उन्हाळ्यात पिण्यासाठी पाणी नाही. ते आणण्यासाठी दोन ते सहा तास खर्च करावे लागतात. लोकांच्या आचार-विचारांमध्ये बदल नाही. त्यांना पुरेसे अन्न वस्त्र निवारा मिळत नाही. समाजावर रूढी परंपरा अज्ञान व्यसन याचा मोठा प्रभाव होता. जिल्ह्यात बऱ्याच भागात ठाकूर कातकरी इ. आदिवासी लोकांची वस्ती असून त्यांची फारशी सुधारणा झालेली नाही.

जिल्ह्यात एकही वरिष्ठ शिक्षण देणारे महाविद्यालय नव्हते. तसेच साक्षरतेचे प्रमाणही अतिशय कमी होते. आर्थिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासल्यामुळे नवीन पध्दतीची उपकरणे वापरत नाहीत. जिल्ह्यामध्ये छोटे-मोठे कारखाने व उद्योगधंदे पुरेसे नाहीत. वैद्यकीय उपचार व सल्ला मिळण्याची साधने व सेवेच्या सोई पुरेशा नाहीत. आरोग्य साधनांची माहिती नाही. रोग होणार

नाहीत म्हणून काय करावे ते झाल्यास काय करावे याचे ज्ञान नाही. आपले हक्क व जबाबदाऱ्या यांचा उपयोग करून आपण आपली स्थिती सुधारता येईल यांचे खेडुतांना ज्ञान नाही. खेड्यातील शेतकरी वर्षातील जवळजवळ आठ महिने रिकामेच असतात. तो सर्व वेळ आरामातच घालवितात. अशा समाजाला पर्यायी जिल्हाला विकसित जिल्हा म्हणता येत नाही.

ब्रिटिश राजवटीपासून सुधारणेची वाटचाल अतिशय मंद गतीने चालू होती. ब्रिटिशांनी स्वत:च्या हितासाठी का होईना सुधारणेला प्रारंभ केला. यातून रायगड जिल्ह्यातील विकासाला व जागृतीला प्रारंभ झाला. त्यामुळे सर्वच क्षेत्रात प्रगतीला सुरुवात झाली. महाराष्ट्राच्या राजकीय सामाजिक व सांस्कृतिक चळवळीच्या जडण घडणीमध्ये या जिल्ह्यातील अनेक थोर विभुतींचे योगदान आहे. वैचारिक चळवळीचे नेतृत्व जिल्ह्याने स्वीकारले. त्यामुळे रायगड जिल्ह्यात प्रवोधन चळवळीचा उदय होऊन म. गांधीजींच्या नेतृत्वाखाली सुरू झालेल्या स्वातंत्र्य चळवळीला मोठ्या प्रमाणात पाठिंबा मिळत गेलेला दिसून येतो.

## संदर्भ साधने


१) डॉ. सांकलिया ह. श्री. : अस्मिता महाराष्ट्राची: प्रकाशन अनुपलब्ध: पृ. ३

२) प्रा. शेणोलीकर ह. श्री. व डॉ. देशपांडे प्र. न: महाराष्ट्र संस्कृती घडण आणि विकास: मोघे प्रकाशन कोल्हापूर. १९७२ पृ. १५

३) डॉ. कर्वे इरावती: युगान्त : प्रकाशन अनुपलब्ध: पृ. २५

४) प्रा. शेणोलीकर डॉ. देशपांडे. :उपरोक्त : पृ. २९

५) प्रा. सोनार व. लू. :महाराष्ट्राचा सांस्कृतिक इतिहास: मोघे प्रकाशन कोल्हापूर. १९८५ पृ. ९

६) सवदी ए. बी. द. :मेगा स्टेट महाराष्ट्र,: निराली प्रकाशन पुणे. २००५ पृ. ३३

७)डॉ. चौधरी कि. का:महाराष्ट्र राज्य गॅझेटिअर रायगड जिल्हा:महाराष्ट्र शासन. १९९३ पृ. ५८२

८) कुलाबा गॅझेटिअर: १८८३. पृ. १९६

९) कित्ता : पृ. १६०

१०) डॉ. चौधरी कि. का. :उपरोक्त: पृ. ५८३

११) सवदी ए. बी. :उपरोक्त: पृ. २

१२)डॉ. चौधरी कि. का. :उपरोक्त : पृ. ०५

१३) देशमुख एस.एम.: असा हा रायगड : सुधांश प्रकाशन् अलिबाग.जून २००६ पृ.३३

१४) डॉ.चौधरी.कि.का.:उपरोक्त: पृ. ०५

१५)भुदकवी वसंत : महाराष्ट्र वैभव मार्गदर्शक-कोकण विभाग: पुरुषार्थ प्रकाशन्पनवेल. १९७३ पृ.१३

१६) प्रि.जोशी वि.कृ.: कुलाबा वर्णन: नारायणराव कुलकर्णी मेमोरियल वेल्फेअर सोसायटी मुंबई.१९५४ पृ. ०३

१७) कित्ता : पृ. ०५

१८) डॉ.चौधरी कि.का.: उपरोक्त : पृ. १५

१९) 'सामान्य भूगोल' रायगड जिल्हा इयत्ता तिसरी. १९९३. पृ.६४

२०) डॉ.चौधरी.कि.का.: उपरोक्त : पृ.६३

२१)डॉ.आकलेकर भालचंद्र: कोकणचा सांस्कृतिक इतिहास: नवभारत प्रकाशन संस्थामुंबई २००३ पृ ११७

२२)डॉ.आकलेकर भालचंद्र : उपरोक्त : पृ.१६९

२३)कालेकर गोविंद मंगेश : मुंबई इलाख्यातील जाती: वरदा प्रकाशन् पुणे.१९९९. पृ.४

२४) एन्थोवेन आर.ई.: दि ट्राईब्स ॲण्ड कास्टस ऑफ बॉम्बे: स्टेट खंड ३ कास्मो पब्लिकेशन्स् दिल्ली.१९७५ पृ.२५४

२५)कालेलकर गोविंद मंगेश: उपरोक्त : पृ.४ ५

२६)डॉ.चौधरी कि.का.: उपरोक्त : पृ. २३७

२७)डॉ.आकलेकर भालचंद्र: उपरोक्त : पृ.१६७

२८) कित्ता : पृ.८६

२९) महाराष्ट्राचे जिल्हे कुलाबा : प्रसिध्दी विभाग महाराष्ट्र सरकार् मुंबई. १९६०पृ.११

३०)तत्रैव

३१) पीक संरक्षण मार्गदर्शिका: कृषी संचालनालय् पुणे.१९८१पृ.३३

३२)खोपोली नगरपालिका स्मरणिका: १९७६पृ.१२५

३३)पनवेल नगरपालिका शतसांवतरिका ग्रंथ: १९५७पृ.१५९

३४) सदावर्ते प्रार्थना : समग्र पनवेल गाथा : आशय प्रकाशन् पनवेल.२००६पृ.६९

३५)कृती आराखडा रायगड जिल्हा उद्योग केंद्र. १९९०.पृ.२८२९

३६)कुलकर्णी पी.व्ही.: इंडस्ट्रिअल डेव्हलपमेंट ऑफ कोकण: अप्रकाशित पीएच.डी प्रबंध.१९६१पृ.४१८

३७)ठाणा गॅझेटिअर भाग १. १८८२ पृ.३९५

३८)सेकंड रिव्हीजन सेटलमेंट रिपोर्ट.तालुका पनवेलउरण-महाल.१९२५पृ.२५

३९) कुलकर्णी पी.व्ही: उपरोक्त : पृ.६८७

४०)महाजन टी.टी.: इंडस्ट्री ट्रेड कॉमर्स ड्युरिंग पेशवा पिरिअड: पाईट पब्लिशरजयपूर १९८९ पृ.३०

४१) कुलकर्णी पी.व्ही.: उपरोक्त : पृ.२२६

४२)ढवु .दा.गो.: कुलाबकर आंग्रे सरखेल आंग्रे घराण्याचा इतिहास:शंकर नारायण जोशी प्रकाशन अलिबाग. १९३९ पृ.३४१

४३)दाते.प.रा.: कुलाबा जिल्ह्यातील कुडेमांदाड येथील गीरीगुहा: दाते प्रकाशन पेण १९६९ पृ. ०९

४४)ठाणा गॅझेटिअर खंड १. उपरोक्त पृ.३१६

४५)डॉ.चौधरी कि.का.: उपरोक्त : पृ.४६९

४६) तत्रैव

४७)कुलाबा गॅझेटिअर: १८८३ पृ.११२

४८)गॅझेटिअर ऑफ दि बॉम्बे प्रेसिडेन्सी कुलाबा ॲण्ड जंजिरा खंड ११ बी.१९२६पृ.२

४९)सातारा गॅझेटिअर. १८८४ पृ.२०१

५०)कुलाबा गॅझेटिअर : उपरोक्त : पृ ११४

५१)पुना गॅझेटिअर. १८८५ पृ.१५२

५२)बस्तावाला दिनू एस.: हिल ऑफ ब्युटी माथेरान सेंटेनरी १८५० ते १९५०: न्यू बुक कंपनी मुंबई. १९५०पृ. ६

५३)डेहेजिया विद्या : अर्ली बुद्धिस्ट रॉक टेंपल्स एक्रॉनॉलॉजिकल स्टडी: थॉमस ॲण्ड हडसम लंडन. १९७२पृ,.३०

५४)रॉबिन्सन : इंटर कोर्स बिटवीन इंडिया ॲण्ड दि वेस्टर्न वर्ल्ड: केंब्रिज. १९१६ पृ.७

५५)रायगड प्रादेशिक योजना वाहतूक व दळणवळण मार्च १९८९ पृ.१०४

५६)ढवू दा.गो.: उपरोक्त : पृ.३४२४३

५७)कुलाबा गॅझेटिअर : १८८३ पृ.२३०३१

५८)उरण नगरपालिका शतसंवत्सरिका स्मृतिग्रंथ. १९६७ पृ.३५

५९)ठाणा गॅझेटिअर -खंड २.: १८८२. पृ.६६१

६०) पगडी सेतु माधवराव : श्री समर्थ आणि समर्थ संप्रदाय: १९८५ पृ. १६

६१)मालशे स.ग.: मराठी वाङ्मयाचा इतिहास खंड -२.: महाराष्ट्र साहित्य परिषद पुणे. १९९२ पृ.२४६

६२)पोतदार दातो वामन (संपा): माझा प्रवास : आवृत्ती ४थी.जुन १९९६ पृ.६७

६३)कुलकर्णी गो.म. (संपा) : मराठी वाङ्मयाचा इतिहास खंड-६: महाराष्ट्र साहित्य परिषद पुणे.१९८८पृ.२३

६४)आजगावकर जगन्नाथ रघुनाथ: प्रसिद्ध पुरुषांच्या अप्रसिध्द गोष्टी : अलिबाग. १९७८ पृ.२३२

६५)जोशी निशिकांत (संपा): सागर दैनिक विशेषांक- डिसेंबर १९९०

६६)महाराष्ट्राचे जिल्हे कुलाबा : प्रसिद्धी विभाग महाराष्ट्र सरकार मुंबई. १९६० पृ. ५९

## प्रकरण - २ रायगड जिल्ह्यातील स्वातंत्र्य चळवळीचा उद्गम ते असहकार चळवळ

❖ **रायगड जिल्ह्यातील प्रबोधन चळवळीचा उद्गम :**

१) इंग्रजी शिक्षणाचा प्रसार

२)ख्रिस्ती धर्मोपदेशकांचे प्रयत्न
३)वृत्तपत्रांची भूमिका
४)मराठी वाङ्मय आणि नाटŸक्षेत्रमुळे प्रबोधन
५)ऐतिहासिक वारसा
६)दुष्काळ निवारण व राष्ट्रीय जागृती
७)शेतकरी व कामगार वगाची पिळवणूक
८)मुंबई औद्योगिकीकरणाच्या घटनांचे पडसाद
९)वासुदेव बळवंत फडके यांच्या कार्याचा परिणाम
१०)शिवसमाधीचा जीर्णोध्दार व शिवाजी उत्सव
११)रायगड जिल्ह्यातील अभिनव भारत संघटनेचे कार्य

❖ **रायगड जिल्ह्यातील स्वातंत्र्य आंदोलनास प्रारंभ:**

❖ **म.गांधीजींची असहकार चळवळी संर्दभात भूमिका:**

❖ **रायगड जिल्ह्यातील असहकार चळवळीचे स्वरूप:**

➢ **अ)असहकार चळवळीचा संघर्षात्मक कार्यक्रम :**

कायदेमंडळ निवडणुकी संदर्भात जिल्ह्याची भूमिका
न्यायालयीन बहिष्कार
विदेशी कापडांवर बहिष्कार

➢ **ब)असहकार चळवळीतील विधायक कार्यक्रम :**

१)खादी ग्रामोद्योग चळवळ
२)राष्ट्रीय शिक्षण कार्यक्रम
३)मद्यपान निषेध कार्यक्रम
४)अस्पृश्यता निमूर्लन कार्यक्रम व सामाजिक समतेचा लढा

❖ **रायगड जिल्ह्यातील शेतकऱ्यांचे आंदोलने :**

१)पेण-वाशीच्या शेतकरी कुळांचा संप
२)धारवाढ निवारण चळवळ
३)खोत विरोधी चळवळ

❖ **सायमन कमिशनचा निषेध :**

भारतामध्ये इंग्रजी सत्तेचे दृढीकरण सुरू असतानाच दुसऱ्या बाजुला ब्रिटिश सत्तेविरूध्द स्वातंत्र्य चळवळीचे बिजारोपण होत होते.या देशात महराष्ट्र, पंजाब, बंगाल, मद्रास यासारख्या प्रांतात निरनिराळ्या संघटना अस्तित्वात येत होत्या.ब्रिटिश सत्तेच्या विरोधात लहान-मोठ्या

स्वरूपात निरनिराळे उठाव व चळवळी सुरू होत्या. त्यामध्ये आदिवासींचे उठाव व शेतकऱ्यांच्या चळवळीचा समावेश होता. ब्रिटिशांनी चालविलेल्या शोषणाविरुध्द व साम्राज्यशाहीविरोधी या चळवळी होत्या. १९ व्या शतकाच्या उत्तरार्धात झालेल्या चळवळीत व उठावात ब्रिटिश सत्ता उलथून टाकण्याची ताकद नव्हती. परंतु या उत्तरार्धातच राष्ट्रीयत्वाची राजकीय जागृती होऊन सुसंघटित राजकीय चळवळीचा पाया घातला गेला. राष्ट्रीय कॉंग्रेसची स्थापना १८८५ मध्ये झाली. अखिल देशव्यापी ही पहिली राजकीय संघटना होती. या संघटनेमुळे भारतीय नेत्यांना आपल्या मागण्या ब्रिटिशांपुढे मांडण्यासाठी व्यासपीठ मिळाले. राष्ट्रीय कॉंग्रेसच्या माध्यमातून अनेक राजकीय नेत्यांनी स्वातंत्र्य चळवळीचे नेतृत्व केले.

१८८५ साली राष्ट्रीय कॉंग्रेस स्थापन झाल्यामुळे लहान व सौम्य स्वरूपात का होईना सघंटित स्वरूपात स्वातंत्र्यलढ्याला तोंड फुटले. पुढील काळात हा लढा वाढत गेला. सर्व जनतेमुळे शक्तिशाली व लढाऊ मोहिमेचे स्वरूप या लढ्याला प्राप्त झाले. १८८५ते १९०५ या काळात कॉंग्रेसने जनतेमध्ये राष्ट्रवादी वृत्ती वाढीस लावली. त्याबरोबर दादाभाई नौरोजी, ना. गोखले, फिरोजशहा मेहता, न्या. तेलंग, सुरेंद्रनाथ बॅनर्जी इत्यादींनी नेत्यांनी आपल्या मवाळ मार्गाने अनेक मागण्या ब्रिटिशांकडून मान्य करून घेतल्या. त्यामुळे राष्ट्रीय चळवळीची ताकद वाढत गेली. जहाल कॉंग्रेसच्या लढ्याला कळत-नकळत पार्श्वभूमी तयार झाली .

१९०५ ते १९२० या काळात राष्ट्रीय चळवळीचे नेतृत्व लो. टिळकांकडे गेले. याच काळात लाल-बाल-पाल हे नेतृत्व पुढे आले. १९०५ पयत मवाळ धोरण स्वीकारलेली कॉंग्रेस हळूहळू आकमक बनली. ब्रिटिशांनी या देशातून निघून जावे व आमचे आम्हाला स्वराज्य द्यावे अशी मागणी होऊ लागली. त्यासाठी ब्रिटिशांविरुध्द संघर्ष सुरू केला. "स्वराज्य हा माझा जन्म सिध्द हक्क आहे" अशी घोषणा लो. टिळकांनी करून राष्ट्रीय आंदोलन अधिक आक्रमक बनविले. राष्ट्रीय कॉंग्रेसने चालविलेल्या चळवळीबरोबरच अनेक क्रांतिकारी युवकांनी व संघटनांनी ब्रिटिशांविरुध्द संघर्ष सुरू केला. भारतीयांना आता सुधारणा नको होत्या तर आपल्या देशाचे स्वातंत्र्य हवे होते.

सन १९२० मध्ये लो. टिळकांचा मृत्यू झाल्यानंतर भारतीय स्वातंत्र्य चळवळीचे नेतृत्व म. गांधीजींकडे आले. म. गांधीजींनी सर्वप्रथम राष्ट्रीय कॉंग्रेसची स्वातंत्र्य चळवळ सर्व देशव्यापी बनविण्याचा प्रयत्न केला. या देशातील सामन्य माणूस ज्या वेळी या चळवळीत सहभागी हाईल तेव्हाच खऱ्या अर्थाने या स्वातंत्र्य चळवळीला ताकद प्राप्त होईल. ब्रिटिशांना या देशातून घालवून

देणे शक्य होईल असे म.गांधीजींना वाटत होते, म्हणून त्यांनी सर्वत्र जनजागृती केली.राष्ट्रीय कॉंग्रेस ग्रामीण भागापर्यंत पोहोचवली.म.गांधीजींच्या नेतृत्वामुळे भारतीय स्वातंत्र्य चळवळीत नवचैतन्य निर्माण झाले.भारतीय जनतेत त्यांचे नेतृत्व सर्वमान्य झाले.म.गांधीजींनी भारतीय स्वातंत्र्य चळवळ देशव्यापी बनवली.तुम्ही सर्व भारतीय माझ्या पाठीशी उभे राहा.ब्रिटिश राजवटीशी पूर्णपणे असहकाराची भूमिका घ्याल तर ब्रिटिशांना हा देश सोडून जावे लागेल अशी म.गांधीजींनी सर्व भारतीयांना हाक देऊन ब्रिटिशांविरुध्द असहकार चळवळ पुकारली.

ब्रिटिशांच्या विरोधात स्वातंत्र्यप्राप्तीसाठी भारतीय कॉंग्रेसने म.गांधीजींच्या नेतृत्वाखाली स्वातंत्र्य चळवळ सुरू केली.या चळवळीचा श्रीगणेशा असहकार चळवळीनेच केला.या चळवळीची मान्यता नागपूर अधिवेशनात घेण्यात आली.देशाच्या परिवर्तनाच्या लढ्याचे मूळ महाराष्ट्रातच पेरले.तेथेच जोपासले आणि त्याचा विस्तार संपूर्ण देशात पसरला.हेच महाराष्ट्राच्या मातीचे वैशिष्टय मानावे लागेल.या महाराष्ट्राच्या पर्यायाने देशाच्या मातीत स्वातंत्र्य चळवळ उदयास आली.महाराष्ट्रातील प्रबोधन चळवळीचा उदय आणि प्रसार हा स्थानिक वृत्तपत्रातून झालेली समाजजागृती, पाश्चात्त्य शिक्षणाचा प्रभाव, ब्रिटिश सरकारचे अन्यायकारक धोरण, औद्योगिकीकरणाचा प्रभाव इत्यादी कारणांनी झालेला होता.

महाराष्ट्रभर सुरू असलेल्या स्वातंत्र्य चळवळीचा परिणाम रायगड जिल्ह्यावर झाला. रायगड जिल्ह्यातील स्वातंत्र्य चळवळीच्या प्रबोधनाचा उदय व प्रसार कसा झाला.तसेच रायगड जिल्ह्यामध्ये असहकार चळवळीचे स्वरूप, त्याचे नेतृत्व आणि सर्वसामान्य जनतेचा सहभाग कसा होता? याचा शोध घेण्याचा प्रयत्न येथे केलेला आहे.या चळवळीतील कार्यक्रम व घटना या बाबींचा तपशीलवार अभ्यास या प्रकरणामध्ये करण्यात आलेला आहे.

## ❖ <u>रायगड जिल्ह्यातील प्रबोधन चळवळीचा उद्‌गम :-</u>

महाराष्ट्रातील राजकारण व समाजजीवनावर कोकणस्थ विशेषत: रायगड जिल्ह्यातील ब्राह्मणवर्गाचे वर्चस्व होते.पेशवाई नष्ट झाल्यामुळे त्यांच्या हातून सत्ता गेली.त्यामुळे हा वर्ग नाराज झालेला होता.या नाराज झालेल्या ब्राह्मणवर्गाला आपल्या बाजूस इंग्रजांनी ओढले. बुध्दिवादी ब्राह्मणांना पाश्चिमात्य संस्कृतीच्या प्रभावाखाली आणले.त्यांना प्रशासनातील उच्च जागा देऊन राज्यकारभाराशी त्यांचे नाते जोडले.त्याच वेळी त्यांच्या डोक्यातून स्वातंत्र्याचे अथवा बंडाचे विचार काढून टाकले.त्यांना राजनिष्ठ बनवून इंग्रजांनी आपली संस्कृती, धर्म, तत्त्वज्ञान त्यांच्यावर

लादले.[१] पाश्चात्त्य शिक्षण, ब्रिटिश राज्यकर्ते आणि मिशनरी यांच्या प्रयत्नामुळे देशातील सुशिक्षितांची पहिली पिढी तयार झाली.या पहिल्या पिढीने भारताची सामाजिक, धार्मिक व्यवस्था, परंपरा, प्रथा इत्यादींचे अवलोकन सुरू केले.आपली व्यवस्था सुधारण्यासाठी बिटिश राजवटीमुळे एक चांगली संधी आलेली आहे असे म्हणणार गट तयार झाला.त्यांनी ब्रिटिश राजवटीचा धिक्कार करण्याऐवजी त्यांच्या राजवटीचे कौतुक केले.

पाश्चात्त्य शिक्षण, ब्रिटिश राज्यकर्ते आणि मिशनरीच्या प्रयत्नांमुळे आपणास परिवर्तनाची म्हणजे सामाजिक, धार्मिक, राजकीय स्वातंत्र्याची भाषा दिसू लागली.या नव्या विचारांमुळे महाराष्ट्रातील नव सुशिक्षितांमध्ये आणि बुध्दिवाद्यांच्या मनामध्ये चलविचल सुरू झाली.त्यांनी आपल्या सामाजिक व धार्मिक व्यवस्थेचे परीक्षण करून त्यात काही बदल आणि सुधारणा सुचविल्या.त्यामुळे मोठ-मोठ्या शहरांमध्ये सामाजिक सुधारणांचे नवे पर्व सुरू झाले.महाराष्ट्रातील या पर्वाचे मानकरी श्री.दादोबा पांडुरंग,श्री.आत्माराम पांडुरंग, श्री.रामकृष्ण भंडारकर, न्या. रानडे,महात्मा फुले, श्री.वि.रा.शिंदे इत्यादी होते.सामान्य माणसात जागृती घडवून आणण्यासाठी त्यांनी प्रयत्नांची पराकाष्ठा केली.धर्मावर आत्यंतिक निष्ठा ठेवणारा विस्तीर्ण समाज, त्यांच्या भोवती जमा होऊ लगला.त्यांनी धर्म संकल्पनांना सामाजिक आशय देण्याचा प्रयत्न केला.यासाठी महाराष्ट्रातील विविध संघटना अत्यंत महत्त्वाच्या आहेत.परमहंस सभा, प्रार्थना समाज,आर्य समाज या संस्थांनी साक्षर, सुशिक्षित सुधारणोत्सुक पांढरपेशा मध्यमवर्गीय समाजामध्ये आपले अस्तित्व स्थिर केले.सत्यशोधक समाज, सार्वजनिक सभा या संस्थाचा उद्देश निरक्षर, अशिक्षित बंधनग्रस्त दलित,बहुजन समाजात जागृती करणे हा होता.[२] मुंबई, पुणे या शहरामध्ये नवीन विचार, प्रवर्तक सभा, संस्था उदयास आलेल्या होत्या.रायगड जिल्हा हा दोन्ही शहरांच्या सीमेवर असल्याने या नवविचारांचा प्रसार-प्रचार जिल्ह्यामध्ये झाला.त्यामुळे जिल्ह्यात सामाजिक, वैचारिक परिवर्तने घडून आली.त्यातून समाजजागृती होऊ लागली.त्यामुळे रायगड जिल्ह्यात प्रबोधन चळवळीची पार्श्वभूमी तयार झाली.या प्रबोधन चळवळीसाठी रायगड जिल्ह्यातील विविध घटक जबाबदार होते.

**✓इंग्रजी शिक्षणाचा प्रसार:-**

इंग्रजांनी हिंदुस्थानात शैक्षणिक कार्य केले ते भारतीय जनतेवर प्रेम होते म्हणून नव्हे, तर त्यांना इंग्लंडवरून साध्या-साध्या दुय्यम कामासाठी कामगार, नोकर आणणे शक्य नव्हते.

प्रशासनात मदत करणारा आणि शिक्षणप्रणालीतून पाश्चिमात्य संस्कृतीचे गोडवे गाणारा भारतीय माणूस निर्माण करावयाचा होता. यासाठी भारतात इंग्रजी शिक्षणाची सुरुवात केली. या शिक्षणाचा भारतीय समाजजीवनावर व लोकजीवनावर संमिश्र स्वरूपात परिणाम झाला. इंग्रजी शिक्षणाची पदवी संपादन केलेल्या अनेकांना इंग्लंडमध्ये झालेल्या सामाजिक व राजकीय चळवळी आणि त्यातून स्थापन झालेल्या संस्थांची माहिती मिळाली. काही पदवीधर सर्व बाबतीत इंग्रजांचे अंधानुकरण करू लागले. काहींनी स्वतंत्रपणे विचार करून आधुनिक भारत निर्माण करण्याची आवश्यकता आहे याची खात्री त्यांना पटलेली होती.

रायगड जिल्ह्यामध्ये शिक्षण क्षेत्राची बुध्दिमान व विद्याव्यसंगाची परंपरा मोठी आहे. या परंपरेमध्ये श्री. शिवरामपंत पराजपे, श्री. गो. गो. टिपणीस, भास्करराव जाधव, प्राचार्य दादासाहेब भाटे, आचार्य भागवत, श्री. दत्तोपंत पोतदार, श्री. वामनराव जोशी, श्री. महादेव मल्हार, श्री. नारायण मल्हार जोशी, श्री. विनोबा भावे इत्यादींचा समावेश होतो. १८६८ मध्ये पेणचे श्रीपाद दादाजी ठाकूर हे बी. ए. झाले. ते जिल्ह्यातील पहिले ग्रॅज्युएट असून इंग्लंडला जाऊन इंडियन सिव्हिल सर्व्हिसची परीक्षा देणारे ते पहिलेच होते.[४] जिल्ह्यातील बहुतेक तरूण पिढी पुणे येथे शिक्षणासाठी जात असे. पुण्यातील सामाजिक, राजकीय घटना व चळवळीचा त्यांच्या मनावर परिणाम होत असे. अशा प्रकारच्या चळवळी आपल्या भागात सुरू करण्याचा नवशिक्षित तरुण पिढीने प्रयत्न केला.

ब्रिटिशांप्रमाणे नव्या सामाजिक व राजकीय संस्था निर्माण केल्यास स्वातंत्र्याच्या दिशेने प्रगती होऊ शकते याची जाणीव काही जणांना झाली. हे विचार समाजापयत त्यांनी पोहोचविले. त्यांच्यात रुजविण्याचे प्रयत्न केले. विचारवतांची समाजप्रबोधनाची विविध साधने म्हणजे नियतकालिक, वृत्तपत्रे, साहित्य निर्माण केले. शिक्षणामुळे भारतात नवी राजकीय जाणीव निर्माण होऊ लागली. त्यातून वेगवेगळ्या भागात सामाजिक,राजकीय संस्था स्थापन होऊ लागल्या.[३] त्यांच्या माध्यमातून लोकांमध्ये नवीन राजकीय उर्मीचा व आकांक्षांचा विकास होऊ लागला. त्यामुळे समाजात राजकीय जागृतीची जाणीव झाली. ही राजकीय जागृती शिक्षणातून निर्माण झाली. त्यामुळे राजकीय व सामाजिक सुधारणा व आत्मविश्वास लोकांमध्ये वाढला. त्यातून प्रवोधन चळवळीचा जन्म झाला आणि राजकीय जागृतीवरोवर स्वातंत्र्य चळवळीला प्रारंभ झाला.

### ✓ख्रिस्ती धर्मोपदेशकांचे प्रयत्न:-

आपल्या देशात धर्म, रूढी, परंपरा, नितीनियम, श्रद्धा यांचा उपयोग सत्ताधारी वर्गानी त्या-त्या अवस्थेत करून घेतला. ही बाब खरी आहे की, कदाचित त्या-त्या अवस्थेत समाजाला शिस्त लावण्यासाठी त्याची उपयुक्तता होती. परंतु उपयुक्तता संपल्यानंतर त्या फेकून देण्याऐवजी त्यांना अधिकच जवळ केले. त्यामुळे समाजाच्या पुढच्या प्रगतीत अडथळे निर्माण होऊ लागले. त्याचे परिणाम कष्टकरी समाजावर झाले. त्यातून या समाजात फूट तर पडली पण त्यांची प्रगतीही थांबली. ब्रिटिशांच्या आगमनाबरोबर ख्रिस्ती धर्मोपदेशकांचे आगमन झाले. त्यांनी मोठी वैचारिक आघाडी निर्माण केली. शैक्षणिक संस्था स्थापन करून ख्रिस्ती धर्माचा प्रसार सुरू केला. चर्चा, वादविवाद, भाषणे, सभा इ. कार्यक्रमातून धर्माचे कार्य घडवून आणले. तसेच इतरअनेक सेवाभावी संस्था स्थापन केल्या. या नव्या प्रकारच्या धार्मिक धोरणातून वैचारिक आक्रमणाचे निरनिराळ्या विभागावर परिणाम झाले. दुर्दैवाने धमांतर घडविताना परिस्थितीचा गैरफायदा घेतला जात असे. ख्रिस्ती मिशनरी यांनी ग्रामीण भागात विशेषत: मागासलेल्या भागातील लोकांना आपले लक्ष बनविले. त्यांचा विश्वासही संपादन केला. ख्रिस्ती धर्माच्या आक्रमणामुळे हिंदू धर्मातील मध्यमवर्ग व विचारवंतांमध्ये खूपच खळबळ माजली. म्हणून सामाजिक व सांस्कृतिक लढ्याला महत्त्व आहे. बदल घडवू इच्छिणाऱ्या शक्तींना लढण्याशिवाय समाजाची प्रगती होऊ शकत नाही याची जाणीव झाली. त्यांनी धार्मिक कल्पकता, रूढी, अंधश्रध्दा, परंपरा यापासून समाज मुक्तीसाठी लढा सुरू केला. त्यातून लोकजागृती होऊ लागली. ख्रिस्ती धर्माबाबत त्या काळात चार विचारप्रवाह तयार झाले.

१)स्वत:हून ख्रिस्ती धर्म स्वीकारणे.

२)हिंदू धर्माच्या चौकटीत राहून इंग्रजी संस्कृतीचे व समाजसुधारणांचे स्वागत व पुरस्कार केला. या दृष्टीने देशबांधवांचे प्रबोधन करण्याचा प्रयत्न केला. या गटात लोकहितवादी, श्री. आगरकर, म. फुले, न्या. रानडे, ना. गोपाळ गोखले इत्यादी होते.

३)पाश्चात्त्य समाजसुधारणा विचारसरणीचे स्वागत करत असतानाच आपल्या हिंदू धर्मात हे सर्व पूर्वी होते. आमच्या चुकांमुळे ते मागे पडले. या विचारप्रवाहाचे श्री. विष्णुबुवा ब्रम्हचारी, श्री. विष्णुशास्त्री पंडित, श्री. भाऊ महाजन इ. होते.

४)आमचा धर्म आणि परंपरा हेच पाश्चात्त्यापेक्षा श्रेष्ठ आहे. असे सिध्द करण्याचा प्रयत्न करत असताना सनातनी प्रतिगामी विचारांशी ते एकनिष्ठ राहिले. हे चार विचारप्रवाह समाजात होते.

खिस्ती धर्मोपदेशकांचा आक्रमक गोरे-काळा भेदभाव, हिंदी लोकांना अपमानास्पद वागणूक अशा अनेक गोष्टीतून दिसून येतात. भारतीय जनतेमध्ये असंतोष झपाट्याने वाढू लागला. हा असंतोष शहरापासून खेडयापयत पसरला. एकूणच पाश्चात्त्य संस्कृतीच्या प्रभावाबाबत लोकांमध्ये नाराजी खोलवर रुजलेली होती. त्यामुळे इंग्रजांबाबत कडवट भूमिका वाढलेली होती. त्याचा उपयोग राजकीय चळवळी वाढीसाठी झाला.

### ✓वृत्तपत्रांची भूमिका:-

१८५० नंतरच्या कालखंडात भारतीय वृत्तपत्रांनी राजकीय विचारप्रणाली उचलून धरून स्वातंत्र्य चळवळीसाठी फार मोलाची कामगिरी बजावली. देशभरातील स्वातंत्र्य चळवळी संदर्भात ज्या घटना घडल्या त्या ठळकपणे छापल्या. सरकारने केलेल्या पाशवी अत्याचाराचे वर्णन वृत्तपत्रांनी छापले. बातम्या व वर्णने वाचून सरकारविरोधी लोकांमध्ये प्रचंड राग निर्माण झाला. त्यामुळे सरकारने चिडून वृत्तपत्रांवर अनेक बंधने लादली. प्रमुख वृत्तपत्राकडून जामीन म्हणून प्रचंड रकमेची मागणी केली. परंतु सरकारच्या दडपशाही धोरणाला न घाबरता त्यांनी कार्य निर्भयपणे सतत चालू ठेवले. त्यांच्या कार्यामुळे राजकीय चळवळीचे एक नवे पर्व सुरू झाले. या पर्वामध्ये रायगड जिल्ह्यातील वृत्तपत्रांनीही योगदान दिले. त्यामुळे रायगड जिल्ह्यात प्रबोधन चळवळ सुरू झाली.

मराठी वृत्तपत्रे संपादकांच्या वृत्तीत जो निर्भय़ स्पष्ट़ स्वातंत्र्य व बाणेदार वृत्ती आढळते. तिचे अग्रदूत म्हणून पेणचे श्री. गोविंद विठ्ठल कुंटे तथा भाऊ महाजन यांचा उल्लेख करता येतो. त्यांनी मुंबईमधून 'प्रभाकर' नावाचे वृत्तपत्र सुरू केले. भाऊ महाजन यांनी प्रथमच ब्रिटिश राज्यकारभारावर टीका केली. रूढी व सामाजिक बंधनाला तीव्र विरोध केला. राष्ट्रीय वृत्तीने वृत्तपत्रातून लेखन केले. "इंग्रज अंमलदार हजारो रुपये पगार घेऊन लक्षावधी रुपयाची लाच खातात" अशी तिखट वाक्ये प्रभाकरमधून छापली.[६] याच काळात १८७० मध्ये रावजी हरी आठवले यांनी 'सत्यसदन' नावाचे साप्ताहिक सुरू केले. ते जिल्ह्यातील पहिले मराठी वृत्तपत्र होते. अलिबागच्या 'सत्यसदन' वृत्तपत्राने रायगड जिल्ह्यात लोकजागृतीचे कार्य केले. सधुयुग्म़ अबला मित्र सुधाकऱ पेण समाचाऱ कुलाबा़ राष्ट्रमुख़ कुलाबा समाचाऱ कृषीवल इत्यादी प्रमुख वर्त

मानपत्रे जिल्ह्यामध्ये सुरू होती. पनवेल मधून विधायक पाक्षिक अस्पृश्योध्दारासाठी सुरू केले होते पण ते बंद झाले.[७]

मुंबई जवळ असल्याने मुंबईची वृ,त्तपत्रेच जिल्ह्यात मोठÎा प्रमाणात वाचली जात. त्यामुळे मुंबई पुणे या शहरातील घडलेल्या घटनांचा जिल्ह्यात प्रसार होऊन राजकीय जागृती घडून आली. त्याचप्रमाणे मुंबई-पुणे शहरातील वृत्तपत्राचे प्रमुख वार्ताहर जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात होते. श्री.शि.म.परांजपेश्री.द्वा.भ.कर्णिके श्री.रामभाऊ मंडलिक प्रबोधनकार के.सी.ठाकरे श्री.बाळकृष्ण पालवणकर श्री.नारायण मल्हार जोशी श्री.रावजी आठवले श्री.प्रभाकर गुप्ते इत्यादी अनेक वार्ताहरांनी सामाजिक धार्मिक राजकीय घटनांना प्राधान्य देऊन जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात प्रवोधन घडवून आणले. त्यामुळे रायगड जिल्ह्यात राजकीय जागृती घडून आली.

**✓मराठी वाङ्मय आणि नाटÎक्षेत्रमुळे प्रबोधन:-**

महाराष्ट्रातील वाङ्मयीन जागृती हे समाज व राजकीय प्रबोधनाचे महत्त्वाचे साधन होते. या साहित्यातून भूतकाळातील पौराणिक ऐतिहासिक घटनांचा व पात्रांचा आधार घेऊन वर्त मानकाळातील सामाजिकराजकीय परिस्थितीची मांडणी केलेली होती. तसेच परंपरेने चालत आलेल्या सामाजिक व धार्मिक रूढी परंपरा बंधने यावर अनेकांनी आघात केले होते. या पार्श्व भूमीवर रायगड जिल्ह्यातील साहित्य नाटक चळवळीने सामाजिक व राजकीय प्रबोधनास हातभार लागला.

अस्पृश्यता निवारण स्त्रीमुक्ती पुनर्विवाहाचे समर्थक विष्णुबुवा ब्रम्हचारी होते. त्यांनी ‘सुखदायक राज्यप्रकरणी निबंध’ या पुस्तकामध्ये उत्पादनाची सर्व साधने सरकारी मालकीची असावीत असे मत मांडले. सरकारने लोकांच्या कल्याणाकडे लक्ष द्यावे हा पुरोगामी विचार मांडला. नारायण सदाशिव मराठे तथा स्वामी केवलानंद सरस्वती हे धर्मसुधारक व परिवर्तनवादी समाजसुधारक होते. त्यांनी सामाजिक समता निर्माण करण्याचा प्रयत्न केला. या शिवाय अनेक लेखक नाटककारांनी आपल्या लेखणीतून सामाजिक-राजकीय जागृती घडवून आणली. म.फुले यांचे ‘तृतीयरत्न’ हे सामाजिक विषयावरील पहिले स्वतंत्र नाटक म्हणून ओळखले जाते. स्वातंत्र्य व समता या तत्त्वांचा विचार नाटकाद्वारे लोकांपयत पोहोचविण्याचा प्रयत्न सुरू झाला. सामाजिक ध्येयवाद मांडणारे आगरकर धार्मिक निरपेक्षवाद व राजकीय मानवतावादी भूमिका मांडणारे न्या.

रानडे राजकीय ध्येयवादाचा पुरस्कार करणारे लो.टिळक यांनी हे सामाजिक वातावरण भारून टाकले.[८] त्याचे प्रतिबिंब नाट्य वाङ्मयात पडलेले दिसते.

लो.टिळकांनी शिवजयंती उत्सवाची सुरुवात करून लोकांमध्ये राष्ट्रप्रेम, राष्ट्रवाद वाढविण्यास मदत केली.त्याचे पडसाद ऐतिहासिक नाटकातून पडलेले दिसतात.श्री.वि.ज. किर्तने यांच्या 'थोरले माधवराव पेशवे' या नाटकाने प्रथम ऐतिहासिक व्यक्ती व परिस्थितीचा उपयोग करून वर्तमानकालीन घटना, प्रसंग यांचे प्रकटीकरण करण्याचा प्रयत्न केला.सन १९०७ मध्ये श्री.कृ.प्र.खाडीलकरांनी किचकवध नाटक लिहिले.या नाटकामध्ये राजकीय रूपक होते. वर्तमानकाळातील व्यक्ती व प्रसंग यांची सांगड पौराणिक घटनांशी या नाटकात घालण्यात आली. परकीय सत्ताधीश व त्यांचे हस्तक या नाटकाने हादरले होते.सर्व महाराष्ट्रात नाट्यकलेच्या व नाट्य वाङ्मयाच्या आधारे जनजागृती होत होती.त्यांचे पडसाद रायगड जिल्ह्यात उमटले.त्यातून नाट्यचळवळ सुरू होऊन राजकीय जागृती घडविण्यास हातभार लागला.

महाडमध्ये 'महाराष्ट्र नाटक मंडळाची' स्थापना १९०४ मध्ये झाली.नाटक मंडळाने महाडमध्ये 'कांचनगडची मोहना' या नाटकाचा प्रयोग केल्याची आठवण सी.डी.देशमुखांनी लिहिलेली आहे.[९] त्याचबरोबर गडकरीचे 'प्रेम संन्यास' नाटकाचा प्रयोग झाला.महाडचे यशवंत नारायण ऊर्फ आप्पा टिपणीस यांनी 'भारत नाटक मंडळी' स्थापन केले.अलिबागचे केशवराव कुंटे यांनी बलवंत संगीत मंडळ, बालमोहन संगीतमंडळ व कला विकास नाटक मंडळी या नाट्यसंस्थेतून काम केले.रायगड जिल्ह्यातील नाट्यमंडळीनी कांचनगडची मोहना, किचकवध, भाऊबंदकी, दख्खनचा दिवा, टाकलेले पोर, स्वातंत्र्ययज्ञ, शिवसंदेश, धर्मवीर संभाजी इ अनेक नाटके समाजप्रबोधनासाठी सादर केली.

स्वातंत्र्य चळवळीच्या पार्श्वभूमीवर या काळात लोकमतावर प्रभाव टाकणारी काही नाटके निर्माण झाली.नाटकामध्ये सामाजिक, राजकीय तत्त्व विशद करणारी नाटके, पौराणिक व ऐतिहासिक कथांमधून स्वाभिमान व देशप्रेम प्रगट होणारी नाटके सदर केली जात.त्या नाटकातून समकालीन परिस्थिती, राष्ट्रभक्ती, आत्मत्याग, स्वातंत्र्य, देशद्रोह यासारख्या कल्पना दाखविल्या जात.त्यामुळे राजकीय जागृती होण्यास मदत झाली.

### ✓ऐतिहासिक वारसा :-

शिवकाळापासून ते इंग्रजी राजवटीपयत या जिल्ह्याला अनेक वीर पुरुषांची परंपरा लाभलेली आहे. त्यांनी महाराष्ट्राच्या इतिहासात आपले नाव अजरामर करून ठेवले आहे. अशा ऐतिहासिक व्यक्तीबाबत कष्टकरी जनतेमध्ये आत्मीयता असून त्यांना अवतारी पुरुष मानतात. त्यांच्या जयंत्यापुण्यतिथी साजरी करून त्यांचे पुतळे उभारणे या बाबी समाजात कार्य सुरू होते. या काळात दुसरी गोष्ट म्हणजे परकीय राष्ट्राविरोधी लढ्याकरिता आपल्या देशाचा इतिहास परंपरा धर्म याचा उपयोग सर्वत्र झालेला दिसतो.[११] यातून महाराष्ट्रात अस्तित्वात आलेले उत्सव म्हणजे गणपती उत्सव व शिवजयंती उत्सव हे राष्ट्रभक्तीच्या प्रचाराचे साधन म्हणून पुढे आले. गणपती उत्सवातून लोकांचे मनोरंजन आणि लोकशिक्षण करणे हे दोन्हीही हेतू साध्य होऊ शकले. गणपती उत्सव हा जरी धार्मिक उत्सव असला तरी या निमित्ताने राजकीय जागृतीसाठी व्याख्याने दिली जावीत असे आवाहन लो. टिळकांनी केले. या आधारे टिळकांनी राजकीय शिक्षणाचे व्यासपीठ महाराष्ट्रात निर्माण केले.

### ✓दुष्काळ निवारण व राष्ट्रीय जागृती:-

मुंबई इलाख्यात भीषण दुष्काळ पडला. दुष्काळाच्या संकटप्रसंगी लोकांना अल्प स्वरूपाची मदत देण्यासाठी फॅमिन रिलीफ कोड नावाचा कायदा मुंबई सरकारच्या संग्रही होता. परंतु त्याचा उपयोग करण्याची सरकारची इच्छा नव्हती. त्यासाठी लो. टिळकांच्या मार्गदर्शनाखाली सार्वजनिक सभेने चळवळ सुरू केली. १ नोव्हेंबर १८९६ दुष्काळाबद्दलची माहितीपत्रक प्रसिद्ध केले.[१२] दुष्काळाची तीव्रता कमी करणे हाच चळवळीचा मुख्य उद्देश होता. फॅमिन रिलीफ कोड तयार केल्याने नेमस्त पुढाऱ्याने सरकारचे अभिनंदन केले. सरकारने आचारसंहितेचे पालन करावे यासाठी आवश्यक असेल तर लोकांचा दबाव आणला पाहिजे अशी भूमिका टिळकांनी घेतली. सरकारच्या टीकेचा विचार न करता शेतकऱ्यांना जागृत करण्यासाठी टिळकांनी प्रचार मोहीम सुरू केली. या मोहिमेमध्ये श्री. वि. का. राजवड़े श्री. न. चिं. केळकर श्री. नारायण बाबा महाडचे ज्योतिषी वगैरे सहभागी झालेले होते.

सार्वजनिक सभेच्या दुष्काळ समितीचे सचिव श्री. अच्युतराव सीताराम साठे यांनी ता. १३/१२/१८९६ रोजी ठाणे जिल्ह्यातील उंबरगाव पेड्यात खत्तलवाड या गावी सभा घेतली. या सभेला महालकरी फौजदार असिस्टंट कलेक्टर दुवले हे अधिकारी हजर होते. 'पिके बुडाली असतील तर शेतसारा सरकारला देऊ नका' हा विषय चर्चेसाठी होता. सभेत असि. कलेक्टर दुवले

यांच्याबरोबर वाद झाला. लो. टिळकांनी केसरीमध्ये अग्रलेख लिहिला की 'पोलिसांच्या पेटलेल्या बंदुकीच्या टप्प्यांत भरलेली रयतेची जंगी सभा. या सभेच्यावेळी साठ्यांना अटक होणार होती परंतु ती झाली नाही. त्यानंतर साठे यांनी पनवेल पेण रोहा गोरेगाव नागोठाणे रेवदंडा येथे शेतकऱ्यांच्या सभा घेतल्या.

दुष्काळ निवारण्याच्या निमित्ताने राष्ट्रवादी विचारसरणीचा प्रसार करण्याचा प्रयत्न करण्यात आला. रायगड जिल्ह्यात बोर्ले येथील सभा संपताच अच्युतराव सीताराम साठे आणि श्री. दत्तोपंत आपटे यांना पोलिसांनी अटक केली.[१३] त्यांच्यावर खटला भरण्यात आला. त्यानंतर टिळकांनी रायगड जिल्ह्यात खेडोपाड्यात सभा घेऊन लोकांमध्ये जागृती केली. श्री. शिवरामपंत परांजपे व महाडकर ज्योतिषी जिल्ह्याच्या दौऱ्यावर आले. श्री. साठे व श्री. आपटे यांच्यावरील खटला रायगडचे असिस्टंट कलेक्टर मि. बुक्सच्या पुढे पेण येथेच चालविण्यात आला होता. या खटल्याची तारीख ११/१/१८९७ ही होती. यावेळी परांजपे महाडकर आणि लो. टिळक पेण येथे आले होते. टिळकांनी सभा घेतली. त्यास १० हजार लोक उपस्थित होते. साठे यांचा खटला चालू असताना श्री. आप्पाराव वैद्य श्री. ना. बा. कानिटकर श्री. पी. पी. खेर श्री. दत्तोपंत वैद्य आणि पेणचे वकील लिमये हे हजर होते. मि. बुक साहेबांनी मा. साठ्यांना दोषमुक्त केले. आपटेंना न्यायालयाने एक वर्षाची सजा व २०० रु. दंड ठोठविला.

सार्वजनिक सभेची साराबंदी चळवळ यशस्वी झाली. साठे यांच्या सभेला हजारो लोक जमा होत असत. त्यामध्ये ब्राह्मण खोत कातकरी आदिवासी कोळी व इतर जातीचे हजारो शेतकरी येत असत. लो. टिळकांनी लोकांना निर्भय होण्यास शिकविले. त्यांनी लोकांना त्यांच्या हक्कासाठी संघर्ष करण्याची प्रेरणा दिली. टिळकांच्या निर्भय आचरणामुळे लोकांनाही त्यामार्गाने जाण्याची प्रेरणा मिळाली. त्यासाठी लोकांच्या अपेक्षा वाढल्या. शेतकरी शेतसाऱ्यात सुट मिळविण्यासाठी मागणी करू लागले. एवढेच नव्हे तर मि. बुक साहेबांच्या तंबूवर शेतकऱ्यांचे लोढे जाऊ लागले.[१५]

सार्वजनिक सभेच्या मोहिमेचे यश म्हणजे शेतकऱ्यांच्या स्थानिक संघटना चळवळीत सक्रिय झाल्या. श्री. रामजी लक्ष्मण घरत व अलिबाग तालुका असोसिएशन याबाबत आघाडीवर होते. नागावची सभा या आंदोलनात सक्रिय झालेली होती.[१६] महसूल वाढीचा विषय मुंबई इलाख्याच्या शासनाच्या विचारात होता. त्या वेळी वर्तमानपत्रांनी तसेच अलिबाग तालुका असोसिएशन सार्वजनिक सभा मुंबई प्रांतिक विधान परिषदेने जोरदार मोहीम उघडली होती. पनवेल तालुक्यात

माणेकशा जहांगिरशा तल्यारखान या जामीनदारांच्या नेतृत्वाखाली शेतसाऱ्यात सूट मिळविण्याचा प्रयत्न केला. शेतकऱ्यांच्या सारावंदी मोहिमेमुळे राजकीय जनजागृतीची प्रक्रिया सुरू झाली. पुण्याच्या बुध्दिवादी लोकांनी ग्रामीण भागात सरकारविरोधी प्रभावी मोहीम सुरू करून रयतेचा असंतोष जागृत केला. त्याला राजकीय प्रवाहात आणण्याचा प्रयत्न केला. त्यातून स्वातंत्र्य चळवळीची पार्श्वभूमी तयार झाली.

**✓ शेतकरी व कामगार वर्गाची पिळवणूक :-**

ब्रिटिशांनी सतत जमिनीचा शेतसारा वाढविला. त्याबरोबर जमीन ही विक्रीची वस्तू बनविली. हक्कदारी नष्ट केल्यामुळे कुळे बेकार झाली. शहरातील व्यापारी भांडवलदार जमीन विकत घेऊन नवा जमीनदार बनू लागले. ग्रामीण समाजरचनेमध्ये या नव्या जमीनदारांचा वर्ग तयार झाला. गावात राहणारा पूर्वीचा जमीनदार, सावकार, गावच्या सरंजामी मुल्यांना काही प्रमाणात धरून राहत होता. परंतु नव्याने उदयास आलेला भांडवल वृत्तीचा जमीनदार हा पुर्ण आत्मकेंद्रित, बेफिकीर व बेधडक मनोवृत्तीने वागत असे. जमीनदारी पद्धतीमुळे शेतकरी व कामगार उद्ध्वस्त झाला.

हजारो वर्षे सामाजिक पिळवणुकीवर आधारलेली पण स्वयंपूर्ण आर्थिक रचनेमुळे टिकून राहिलेली ग्रामरचनाही या प्रगत अर्थरचनेने उद्ध्वस्त झाली. शहरे वाढू लागली. ग्रामीण श्रमिक शहरात येऊ लागले. नव्याने सुरू झालेल्या कारखान्यात काम करू लागले. जुन्या आर्थिक व सामाजिक तुरुंगातून तो श्रमिक सुटला होता. परंतु नव्या भांडवलशाहीच्या चरख्यात येऊन अडकला होता. त्यामुळे समाजात दारिद्र्य झपाट्याने वाढू लागले. त्यातून भांडवलदार विरोधी कामगार, सावकारविरोधी ऋणको, जमीनदारविरोधी कुळे अशा मूलभूत स्वरूपाचा अंतर्विरोध संघर्ष देशव्यापी वाढत होता. त्यामुळे राजकीय स्वातंत्र्याच्या पार्श्वभूमीवर हे लढेही महत्त्वाचे ठरत होते. एका बाजूला या प्रगत आर्थिक, राजकीय व सामाजिक विचारांची स्वागत करणारी एक प्रतिक्रिया तयार होत होती. तर देशाचे शत्रू म्हणून प्रथम ब्रिटिशांना हाकलून लावले पाहिजे ही राजकीय स्वरूपाची दुसरी प्रतिक्रिया असे दोन प्रवाह तयार झाले.[१७] ब्रिटिशांच्या वाढत्या साम्राज्यशाही व लुटारु भूमिकेमुळे त्यांच्या विरोधी स्वातंत्र्यवादी प्रतिक्रिया जास्त व्यापक होत गेली. त्यातून राजकीय चळवळ वाढीस लागली.

ब्रिटिश सरकार नेहमीच शेतकरी-कामगार वर्गाची पिळवणूक करत असे. कामगार-कष्टकरी वर्गासमोर महागाई, बेकारी, दारिद्र्य, भ्रष्टाचार, अत्याचार, पोलीस व गुंडाची दादागिरी हे

प्रश्न होते.अन्न वस्त्र निवारा शिक्षण वैद्यकीय मदत नोकरी इ.जगण्यासाठीच्या अत्यावश्यक गोष्टी उपलब्ध करण्यात अनेक अडचणी येत होत्या.यागोष्टी मिळविण्याकरिता कष्ट करणाऱ्या वर्गाला अखंड जीवनभर हालअपेष्टा सोसाव्या लागत होत्या.या समस्यांचे स्वरूप आर्थिक राजकीय होते.स्वत: एकजुटीने लढल्याशिवाय प्रश्न सुटणार नाही.यासाठी विविध वंशाचे कष्टकरी एकत्रित आले.[१८] समाजपरिवर्तनाच्या क्रांतीमध्ये कामगार ग्रामीण श्रमिकगरीब शेतकरी कष्टकरी शहरी विभागातील मध्यमवर्ग दलित मुक्तीकरिता झगडणारा वर्ग स्त्रिया आदिवासी ही सर्व मंडळी एकत्र येऊन राष्ट्रीय चळवळीशी त्यांनी संबंध जोडला.ते राष्ट्रीय चळवळीत उतरल्याने चळवळीची ताकद वाढली.

रायगड जिल्ह्यामध्ये उरण पेण पनवेल तालुक्यात मोठ्या प्रमाणात मिठागरे व मिठाचे आगर होते.या आगरांचे मालक प्रामुख्याने मुसलमान गुजराथी मारवाडी लोक होते. त्यांच्यामध्ये मुसलमान लोकांचे अधिक वर्चस्व होते.मिठागरात काम करणारा मजुरवर्ग बहुसंख्य स्थानिक कोळीआगरी यांसारख्या बहुजन समाजातील होता.त्यांचे मोठ्या प्रमाणात शोषण होत होते.त्यांचे आर्थिक सामाजिक सांस्कृतिक शोषण चालविले होते.या विरोधी कोणी तक्रार केल्यास त्याला शंभर लोकांसमोर बुटाने मारले जात असे.[१९] त्यामुळे सर्व कामगार व समाजात ऐक्य निर्माण झाले.अन्याय व अत्याचाराविरोधी लढण्यास त्यांची मानसिकता तयार झाली.ही मानसिकता राजकीय स्वातंत्र्यासाठी पुढील काळात उपयोगी पडली.त्यातून राजकीय व राष्ट्रीय चळवळीची पार्श्वभूमी तयार झाली.उरण तालुक्यात वीर वाजेकरांनी सर्व समाज व कामगारांना एकत्र करून त्यांच्यात जागृती व आत्मविश्वास निर्माण केला.त्यांना त्यांच्या हक्काची जाणीव करून दिली.स्त्रियांमध्ये चेतना निर्माण करून खंबीरपणे उभे केले.

### ✓मुंबई औद्योगिकीकरणाच्या घटनांचे पडसाद :-

१९ व्या शतकात महाराष्ट्रत सामाजिक प्रबोधनाबरोबर औद्योगिक विकास व प्रगतीही होत होती.मुंबई नगरीच्या विकासाचा रायगड जिल्ह्यातील लोकजीवनावर प्रभाव पडणे क्रमप्राप्त होते. त्यामुळे मुंबईत घडणाऱ्या घटना आणि त्यांचा रायगड जिल्ह्यावर पडलेला प्रभावत्यातून राजकीय ऐक्यास व चळवळीला हातभार कसा लागला याचा शोध घेणे आवश्यक आहे.माऊंटस्टुअर्ट एल्फिन्स्टनने पुण्याकडे जाणाऱ्या बोरघाटाच्या रस्त्याचे काम सुरू केले.तर सर जॉन माल्कमच्या राजवटीत वाहतूक सुरू झाली.त्यामुळे रायगड जिल्ह्यातून देशाकडे जाणारी वाहतूक सुलभ झाली.

पुढे मुंबईच्या अपोलो बंदरावरील वेलिंग्टन धक्का बांधून पूर्ण केल्याने रायगड जिल्ह्यातील प्रवासी वाहतूक मुंबईला सुरू झाली.[२०] बॉम्बे कोस्ट अॅण्ड विव्हर स्टीम नेव्हिगेशन कंपनीची स्थापना होऊन मुंबईपासून मांडवा, करंजा, रेवस, धरमतर, उरण उलवापर्यंत वाफेच्या इंजिनावर चालणाऱ्या तरसेवा प्रवाशांसाठी सुरू केल्या.

रायगड जिल्ह्यातून परदेशी व्यापार सुरू होता. शिक्षणासाठी अनेक महाविद्यालय मुंबईत स्थापन करण्यात आलेली होती. मुंबईमध्ये कापड उदद्योग मोठ्या प्रमाणात विकसित झालेला होता. रायगड जिल्ह्यातील विशेषत: चौल-रेवदंडा येथील कुशल विणकार त्याचप्रमाणे बेरोजगार लोक उपजीविकेसाठी मुंबईत येऊ लागले. मुंबईच्या औद्योगिकीकरणात कामगार म्हणून मोठ्या प्रमाणात रायगड जिल्ह्यातील लोक होते. मुंबईमध्ये सामाजिक व धार्मिक प्रबोधन आणि राजकीय जागृतीच्या घटना नेहमीच घडत असत. जिल्ह्यातील लोक आपल्या गावी जाताना मुंबईतील घटना, विचार आपल्याबरोबर घेऊन जात असत. या घटनांचा परिणाम होत असे. त्यामुळे रायगड जिल्ह्यात राजकीय जागृतीस प्रारंभ झालेला होता. मुंबईतील घटनाचा रायगड जिल्ह्यातील लोकजीवनावर त्वरित परिणाम होत असे.

### ✓वासुदेव बळवंत फडके यांच्या कार्याचा परिणाम :-

१८५७ चे स्वातंत्र्ययुध्द संपले तरी पण, त्याच्या आठवणी व स्वातंत्र्यप्रेम अजून काही भारतीयांच्या मनातून नष्ट झालेले नव्हते. १८५७ च्या स्वातंत्र्ययुद्धानंतर पुन्हा बंडखोरी आणि क्रांतीचा स्फोट होऊ नये याची दक्षता ब्रिटिश सरकार घेत होते. पराभूत वृत्तीतूनही काही स्वाभिमानी भारतीयांच्या मनात स्वातंत्र्याच्या अकांक्षा फुलत होत्या. ब्रिटिश सरकारच्या अन्यायाची दखल घेऊन सार्वजनिक सभा जोरदार लोकजागृतीचे कार्य करीत होती. मुंबईचे गव्हर्नर टेंपल व लॉर्ड लिटन यांचे दडपशाहीचे धोरण यामुळे तरुण वर्गात असंतोष पसरला. पेशवाई नष्ट केल्याने पेशव्यांचे अस्तित्व संपलेले होते. पेशव्यांचे मूळ घराणे रायगड जिल्ह्यातील श्रीवर्धन येथील असल्याने तसेच आंग्रे घराणेही नष्ट केल्यामुळे ब्रिटिशांच्या विरोधात जिल्ह्यातील जनतेच्या मनात असंतोष होता. त्यातून शिरढोण गावचे वासुदेव बळवंत फडके यांनी ब्रिटिशांच्या विरोधात सशस्त्र क्रांतीची योजना तयार केली.

क्रांतीच्या भावनेने प्रेरित झालेल्या श्री. वासुदेव बळवंत फडके यांनी ब्राह्मण, कोळी, रामोशी, मांग, महार, मुसलमान यांच्या मदतीने पुणे परिसरात ब्रिटिश सत्तेविरूध्द क्रांतिकार्य सुरू केले. राष्ट्रीय

कार्यासाठी श्री.वासुदेव बळवंत फडकेंनी वित्त व शस्त्रसाठा मिळविण्यासाठी उपक्रम हात्ती घेतला.या उपक्रमासाठी इंग्रजधार्जिन व श्रीमंत लोकांच्यावर दरोडे घालण्यास २० फेब्रुवारी १८७९ पासून प्रारंभ केला.[२१] मुंबई गव्हर्नर सर रिचर्ड टेंपलंने वासुदेव बळवंत फडके यांना पकडण्यासाठी जाहीर केले की "जो फडके यांचे डोके कापून आणले त्याला ५ हजार रुपयांचे बक्षिस दिले जाई ल." २०जुलै १८७९ च्या रात्री आजारी अवस्थेत देवरनावडगी येथे मेजर डॅनियनने श्री.वासुदेव बळवंत फडकेस पकडले.त्यांच्यावर खटला भरण्यात आला.हा न्यायालयीन खटला चालविण्यासाठी गणेश वासुदेव जोशी(सार्वजनिक काका) यांनी फडक्यांचे वकीलपत्र घेतले.श्री.महादेव चिमणाजी आपटे या प्रसिद्ध कायदेपंडितांने फडक्यांची बाजू मांडली.परंतु श्री.ग.वा.जोशी व श्री.आपटे यांना यश आले नाही.श्री.वासुदेव बळवंत फडके यांना जन्मठेप व काळ्या पाण्याची शिक्षा झाली.एडंनच्या तुरुंगात शिक्षा भोगत असताना १७ फेब्रुवारी १८८३ रोजी मरण पावले.[२२]

श्री.वासुदेव बळवंत फडके यांच्या कार्यामागे सार्वजनिक सभेचा हात असावा किंवा दोघांचे परस्परसंबंध असावेत.याबद्दल टेंपल म्हणतो की १८७९ चे फडकेंचे दरोडे व सार्वजनिक सभा यांचा थेट संबंध जोडणे शक्य नसले तरी सार्वजनिक सभेचे पुढारी त्यामागे होते.आद्य क्रांतिकारक श्री.वासुदेव फडके यांनी सशस्त्रलढ्Ÿाचा पहिला प्रयत्न केला.त्यांच्या चरित्राने पुढील कित्येक क्रांतिकारकांना स्फर्ती मिळाली.पेणमध्ये अभिनव भारत या क्रांतिकारी संघटनेचे कार्य सुरू झाले.या स्फुर्तीतून पुणे व रायगड जिल्ह्यात इंग्रजांच्या विरोधी वातावरण निर्माण झाले.त्यामुळे रायगड जिल्ह्यात राजकीय जागृती घडून आली.

**✓शिवसमाधीचा जीर्णोध्दार व शिवाजी उत्सव :-**

जेम्स डग्लस नावाच्या ब्रिटिश अधिकाऱ्याने शिवसमाधीची दुरवस्था प्रथम लोकांसमोर आणली.हिंदवी स्वराज्याच्या संस्थापकाच्या समाधीवर गवत व झुडपे वाढलेली आहेत असे डग्लसने सांगितले.[२४] बडोद्याचे समाजसुधारक श्री.गोविंदराव बाबाजी जोशी यांनी ३ एप्रिल १८८५रोजी रायगडला भेट दिली.शिवसमाधीवर छत्री बांधण्याची कल्पना मांडली.या कामासाठी अंदाजे ४५,०४६रु.खर्च येईल असे सांगितले.तेव्हापासून शिवाजी महाराजांच्या समाधीच्या जीर्णो ध्दाराचा विचार पुढे आला.त्यातून जीर्णोध्दाराच्या हालचाली सुरू झाल्या. त्याचे नेतृत्व न्या.रानडे यांनी स्वीकारुन २४मे १८८५रोजी पुणे शहरात जाहीर सभा बोलविली.[२५] समाधीच्या जीर्णो

ध्दारासाठी शासनाने वित्तबळ उपलब्ध करून द्यावे असा ठराव मंजुर केला.त्यानुसार गव्हर्नर लॉड रे याने काही रक्कम देण्याचे मान्य केले.प्रारंभी दुरुस्तीसाठी ५१ रु.तीन आणे खर्च करण्यात आले.[२६]

औंधचे संस्थानिक श्रीनिवासराव पंतप्रतिनिधी यांच्या अध्यक्षतेखाली पुण्यात सभा झाली.छत्रपतींची समाधी दुरुस्ती व रायगडावर महाराजांचा जन्मोत्सव साजरा करण्यात यावा असा ठराव झाला.यासाठी एका मंडळाची स्थापना करून चिटणीस पद लो.टिळकांकडे देण्यात आले. त्यांनी केसरीतून लेख लिहून निधी गोळा करण्याचा उपक्रम सुरू केला.शिवाजी महाराज हे राष्ट्रवादाचे प्रतीक असल्याचे त्यांनी सांगितले.तेव्हापासून शिवाजी उत्सव चळवळीला जोर वाढला.या चळवळीच्या माध्यमातून लो.टिळकांनी लोकांमध्ये देशाभिमान व ऐक्याची भावना जागृत करण्यासाठी व इंग्रजांच्या अन्यायाबद्दल त्यांच्या मनात चीड निर्माण करण्यासाठी लोकांसमोर शिवाजी महाराजांचा आदर्श ठेवला.या चळवळीद्वारे लोकमान्य टिळकांनी कॉंग्रेसचा स्वराज्याचा मंत्र घरोघरी पोहोचविण्यासाठी मोहीम उघडली.चळवळीमध्ये सामान्य जनतेबरोबर काही संस्थानिक जहागीरदार काही राजकीय नेतेही सहभागी झाले.कलकत्त्याच्या एका भाषणामध्ये लो.टिळक म्हणाले की महाराष्ट्रात आम्ही शिवाजी उत्सव हा राजकीय महोत्सव सुरू केला आहे.छत्रपतींच्या पराक्रमी जीवनापासून स्फूर्ती घेऊन देशासाठी त्याग करण्याची वृत्ती लोकांमध्ये निर्माण व्हावी हा उत्सवामागचा हेतू आहे.[२७]

१५एप्रिल १८९६ रोजी पहिला शिवाजी उत्सव टिळकांच्या नेतृत्वाखाली साजरा करण्यात आला.या उत्सवासाठी रायगड परिसरातील विशेषत: महाडचे लोक मोठ्या संख्येने रायगडावर जमले.श्री.शिवरामपंत परांजपे श्री.रा.रा.माधव श्री.कृष्णदेशमुख श्री.नारायण बापूजी कानिटकर या मंडळींनी मोठया प्रमाणात परिश्रम घेऊन कार्यक्रम यशस्वी केला.या कार्यक्रमासाठी १५०० रु.गोळा झाले होते.[२८] अल्पावधीत शिवउत्सव चळवळीला राष्ट्रवादी विचारसणीच्या लोकांचा चांगला पाठिंबा मिळू लागला.रायगड जिल्ह्यातील सर्व थरातील लोकांनी शिवउत्सवात भाग घेतला. त्यामुळे राजकीय चळवळींची पार्श्वभूमी तयार होण्यास झाली.

**✓रायगड जिल्ह्यातील अभिनव भारत संघटनेचे कार्य :-**

मराठी भाषिकांच्या मुलखामध्ये स्वा.विनायक दामोदर सावरकरांनी १८९९ च्या अखेरीस 'राष्ट्रभक्त समूह' नावाचे गुप्तमंडळ स्थापन केले.गुप्त मंडळामधील सवात मोठी व गाजलेली

संघटना म्हणजे राष्ट्रभक्त समूह होय.१ जानेवारी १९०० रोजी स्थापन झालेल्या 'मित्रमेळा' हे त्या गुप्त संघटनेचे प्रकट स्वरूप होते.तर नारायणराव सावरकर यांनी स्थापन केलेल्या 'मित्रसमाज' हे संघटनेचे दुसरे स्वरूप होते.या संघटनेमार्फत शारिरीक व्यायाम विविध उत्सव व्याख्यानमाला इ.उपक्रम राबवून देशकार्यात तरुणांना संधी प्राप्त करून दिली जात असे.स्वा.विनायकराव सावरकर यांनी विष्णू महादेव भट हरी अनंत थत्ते दाजी नागेशा आपटे यांच्याशी चर्चा करून १९०४ च्या मे महिन्यात 'मित्रमंडळ' या गुप्त संघटनेचे 'अभिनव भारत' असे नामांतर केले.[२९] अभिनव भारताच्या एकूण ३९ शाखा होत्या.त्यापैकी रायगड जिल्ह्यामध्ये पेण पनवेल महाड पोलादपूर येथे शाखा होत्या.

रत्नागिरी जिल्ह्यातील श्री.अनंत लक्ष्मण कान्हेरे हे अभिनव भारताचे एक प्रमुख कार्यकर्ते होते.त्यांनी पेणमध्ये क्रांतिकारकांचा एक गट तयार केला.श्री.नारायण गणेश मंडलिक व श्री.गणेश भास्कर जोशी(बाबुराव जोशी)या गटात सामील झाले होते.त्या सवानी पेणजवळील धावटे(गणपतीची वाडी) येथील गणपतीच्या देवळात करंगळीचे रक्त काढून गुप्ततेची शपथ घेतली.कागदावर रक्ताने सह्या करून आठ तरुण क्रांतिकारकांनी पेण येथे एक क्रांतिकारी गट स्थापन केला होता.

श्री.गणेश भास्कर जोशी मरण पावल्याने या गटाची सूत्रे नाराय्ण मंडलिक (नाना) यांच्याकडे आली.श्री.करंदीकर मास्तर श्री.बाबा काळे श्री.जनार्दन केशव दामले श्री.त्रिंबक गंगाधर मराठे मास्तर श्री.दत्तात्रेय सदाशिव बापट मास्तरश्री.विनायक पांडूरंग कोल्हाटकर मास्तरश्री.अण्णा जोशी श्री.नारायण सदाशिव सावंत श्री.अनंत रा.जोशी श्री.बाबुराव आगाशे श्री.विठोबा मराठे श्री.केशव बल्लाळ जोशी श्री.केशव नारायण मंडलिक श्री. रामचंद्र नारायण मंडलिक इ.मंडळी या गुप्त गटात सहभागी झाले होते.रायगड जिल्ह्यासाठी एक गुप्त क्रांतीकारी संघटना उभी केली गेली.पेण हे अभिनव भारताचे एक महत्त्वाचे केंद्र बनले.या केंद्रामार्फत अनंत कान्हेरे व श्री.करंदीकर मास्तर दोघे पेणजवळील बोरगावच्या जंगलात पिस्तुल नेमबाजीचे शिक्षण बॉम्ब करण्याची कृती शिकवत होते.काब्रा नावाचा तरुण हा क्रांतिकारकांना रसायने बॉम्बचे साहित्य पुरवीत असे.[३०]

अभिनव भारत गुप्त संघटनेचे श्री.गोपाळ कृष्ण पाटणकर हे मिरजेचे असून त्यांचा पेण मुंबई वसई या शाखेशी व मुख्य कचेरीशी संबंध होता.यावेळी श्री.कृष्णा गोपाळ खरे हे बॉम्ब

एक्सपर्ट होते. श्री. खरे एम. ए. ला रसायनशास्त्राचा अभ्यास करत असताना प्रा. गज्जर यांच्या लॅबोरेटरीत काम करत होते. त्या वेळी बॉम्ब तयार करण्यासाठी लागणारे पिकरीक ॲसिड़ मर्क्युरी फाल्मनी कसे बनवावे यांचे ज्ञान प्राप्त केले. जेव्हा अभिनव भारत संघटनेशी संबंध आला. तेव्हापासून प्रात्यक्षिके करून दाखवित असत. श्री. पाटणकर व श्री. खरे यांनी वरसई पेण या भागात बॉम्ब तयार करणे व स्फोट घडविणे याचे प्रशिक्षण दिले. पाटणकर यांना 'गुरूपी' असे टोपण नाव होते.[३१] पेण येथील अभिनव भारत शाखेचे सूत्रधार श्री. विठोबा मराठे व श्री. त्रिंबक गंगाधर मराठे यांच्याकडे १४ पिस्तुले व दोन हजार फैरी झाडता येईल इतका दारूगोळा होता. पाटणकरच्या सूचनेनुसार त्यांनी ६ पिस्तुले वाटली होती. पुढे विठोबा मराठे प्लेगच्या साथीत मरण पावले.

ठिकठिकाणच्या क्रांतिकारकांनी एक कट तयार केला होता. त्या कटाप्रमाणे महाराष्ट्रातील १७ जिल्ह्याचे १७ कलेक्टर एकाच तारखेला ठार मारावयाचे होते. परंतु श्री. अनंत कान्हेरे यांचा संयम सुटला आणि त्यांनी २१ डिसेंबर १९०९रोजी नाशिकचे कलेक्टर जॅक्सन यांना नाशिक येथील विजयानंद थिएटरमध्ये गोळ्या घालून ठार मारले. त्यामुळे हा कट फसला परंतु या कटाचे धागेदोरे पेणपर्यंत येऊन पोहोचले. पाटणकरच्या कबुली जबाबाच्या आधारे ३१ डिसेंबर १९०९ रोजी पेणमध्ये धरपकड सत्र सुरू करून अंदाजे ४० आंदोलकांना पकडण्यात आले. सी. आय. डी. ऑफिसर श्री. कोकणे व स्पेशल पोलीस सुपरिटेंडंट श्री. देशपांडे यांच्या नेतृत्वाखाली अटक सत्र सुरू होते.

जॅक्सन खून खटल्यात १८ आरोपी होते. त्यांचा खटला मुंबई हायकोर्टात सुरू होऊन दिनांक २४/१२/१९१० रोजी खटल्याचा निकाल लागला.[३२] श्री. गोपाळ कृष्ण पाटणकर व श्री. त्र्यंबक गंगाधर मराठे यांना १० वर्षाची सक्त मजुरीची शिक्षा होऊन त्यांना येरवडा तुरुंगात पाठविले. श्री. विनायक पांडुरंग कोल्हटकर पोलिसांच्या मारहाणीमुळे नाशिकमध्ये मरण पावले श्री. गोपाळ पांडुरंग साने व श्री. शंकर वासुदेव गोडबोले यांना शस्त्र अधिनियमाखाली साडेतीन वर्षे शिक्षा झाली. श्री. गोविंद सदाशिव बापट मास्तर यांना १५ वर्षे सक्त मजुरी झाली. श्री. त्रिंबक विनायक जोग यांच्याकडे पिस्तुले सापडल्याने साडेतीन वर्षे शिक्षा झाली. पुरुषोत्तम वामन गोखले यांना शस्त्र व काडतुसे बाळगल्याबद्दल साडेतीन वर्षाची शिक्षा झाली. श्री. नारायण सदाशिव सावंत

व श्री.गोविंदराव लिमये व घांग्रेकर यांना पकडले होते.परंतु पुराव्याअभावी सोडून दिले. श्री.रामकृष्ण विष्णू जोशी कटात असूनही परागंदा झाल्याने सुटले.

अभिनव भारत महाड शाखेच्या सभासदांची माहिती गणेश कृष्णा दीक्षित याने पोलिसांना सांगितली.गणेशचा भाऊ श्री.श्रीधर दीक्षित मुंबईमध्ये गोपाळ पाटणकरशेजारी राहात असे. त्यामुळे पाटणकर व गणेश दीक्षित यांचे संबंध आले.पेणच्या त्रिंबक मराठ्यांनी गणेश दीक्षितजवळ ब्राऊनिंग पिस्तूल दिले व श्री.बाळकृष्ण रावजी पालवणकर यांना महाड मामलेदारला ठार मारण्यास सांगितले.परंतु श्री.गणेश दीक्षित याने पिस्तूल स्वत:कडे ठेवल्याने मामलेदाराला ठार मारण्याचा कट यशस्वी झाला नाही.बंदुकीच्या दारूचा साठा बाळगल्याबद्दल श्री.तुळजाराम मिठा, श्री.लालजी पुरुषोत्तम, श्री.नाथ नारायण या गुजर मंडळींना अटक करण्यात आली.तसेच पालवणकरांना पकडून त्यांच्यावर खटला भरण्यात आला.[३३]

रायगड जिल्ह्यातील राजकीय चळवळीची पार्श्वभूमी तयार होण्यास राष्ट्रीय स्तरावरील घटकाप्रमाणेच स्थानिक घटकही जबाबदार होते.राष्ट्रवादी नेत्यांनी प्रबोधनाच्या विविध साधनाने लोकजागृती घडवून आणली.त्यामुळे लोकांच्या मनात इंग्रजांबद्दल राग निर्माण झाला.इंग्रज अन्यायी व अत्याचारी आहेत.त्यांनी हा देश सोडून जावे हा विचार भारतीयांच्या मनात निर्माण होऊ लागल्याने राष्ट्रवादाचा उदय झाला.त्यातून स्वातंत्र्य चळवळीला जिल्ह्यात प्रारंभ झालेला दिसून येतो.

## ❖ <u>रायगड जिल्ह्यातील स्वातंत्र्य आंदोलनास प्रारंभ:-</u>

रायगड जिल्ह्यामध्ये स्वा.वि.दा.सावरकरांच्या अभिनव भारत या क्रांतिकारक संघटनेचा व विचारांचा प्रभाव होता.तसेच लोकमान्य टिळक व ना.गोपाळ कृष्ण गोखले यांच्या राष्ट्रवादी विचारांचा प्रभाव असलेले अनेकजण होते.अलिबाग, पेण, पनवेल, महड इत्यादी ठिकाणी त्यांच्या सभा व बैठकाही झाल्या.त्यांच्या विचारानुसार श्री.शि.म.परांजपे, श्री.महादेव बल्लाळ नामजोशी, श्री.आत्माराम आठवले, श्री.रामभाऊ मंडलिक इत्यादी मंडळी कार्य करत होती. लोकमान्य टिळकांनी आपल्या लिखाणातून व भाषणातून लोकांना निर्भय, नि:स्पृह व स्वाभिमानी बनविण्याचा प्रयत्न केला.राष्ट्रीय विचार लोकांपर्यंत पोहोचविण्यासाठी परंपरागत गणेशोत्सवाला सार्वजनिक स्वरूप दिले.शिवउत्सवाला चालना दिली.

'पैसा व फंड' या विषयावर प्रथम अग्रलेख लो. टिळकांनी केसरीमध्ये प्रसिद्ध केला. श्री. अंताजी दामोदर काळे हे स्वयंस्फुर्तीने गावोगावी हिंडून पैसा व फंड गोळा करण्याचे काम करत होते. महाडचे रीसबूड़ पटवर्धऩ ओक इ. गृहस्थांनी फंडाची उपयुक्तता जाणून लहान- लहान पुस्तके प्रसिद्ध केली. १८९४ साली श्री. गोपाळ अनंत भट आणि महाडच्या मुनसफ यांनी 'निरपेक्ष भांडवल' नावाचा एक निबंध प्रसिद्ध केला. पैसा व फंड चळवळ सुरू केली. त्याचप्रमाणे अवर्षणामुळे दुष्काळामुळे रोगराईमुळे शेत पिकले नाही तर सरकारला शेतसारा देऊ नका असाही सल्ला टिळकांनी प्रथमच लोकांना दिला. व्हाइसरॉय एलिजन यांनी देशी गिरण्यातील कापडावर कर लावला तेव्हा लो. टिळकांनी देशाला स्वदेशीची व विलायती मालावर बहिष्कार टाकण्याचे आवाहन केले.[३५]

लॉर्ड कर्झनने स्थानिक स्वराज्य संस्था़ शैक्षणिक स्वायता व वृत्तपत्र स्वातंत्र्यावर बंधने आणली. या कर्झनच्या धोरणाला मवाळवाद्यांनी विरोध केला. परंतु त्याचा फारसा उपयोग झाला नाही. हिंदू-मुसलमान यांच्यामध्ये दरी निर्माण करण्याच्या हेतूने लॉर्ड कर्झनने बंगालची फाळणी १९०५ मध्ये केली. त्यामुळे भारतभर संतापाची लाट उसळली. बंगालमध्ये व इतर प्रांतातील लोकांनी वंगभंग चळवळ सुरू केली. वंगभंग आंदोलनानंतर लो. टिळकांनी स्वदेशी आंदोलन सुरू केले. स्वदेशी़ बहिष्काऱ राष्ट्रीय शिक्षण़ स्वराज्य ही चतु:सूत्रे या आंदोलनातील तत्त्वे होती. १९०५मध्ये दसऱ्याच्या दिवशी स्वा. विनायकराव सावरकरांनी पुण्यात लो. टिळक व शिवरामपंत परांजपे यांच्या साक्षीने भारतात प्रथमच परदेशी कपड्यांची होळी केली. भारतीय वृत्तपत्रांनी या आंदोलनास प्रसिद्धी दिली. लॉर्ड कर्झन व सरकारविरोधी लोकांनी अघोषित युद्ध सुरू केले होते. चतु:सूत्री कार्यक्रमामुळे लो. टिळकांचा राजकारणात प्रभाव वाढला. रायगड जिल्ह्यात चतु:सूत्री कार्यक्रमाचा सर्वत्र हळूहळू प्रसार होऊ लागला.

रायगड जिल्ह्यातील टिळकप्रणीत कार्यकर्ते १९०६ च्या कलकत्ता काँग्रेस अधिवेशनासाठी गेले होते. त्यांचा प्रमुख हेतू १९०७ चे काँग्रेसचे अधिवेशन नागपूरला घ्यावे व लो. टिळकांना अध्यक्ष पद द्यावे असा होता. परंतु टिळक समर्थकांना अपयश आले. १९०७ चे काँग्रेस अधिवेश सुरत येथे घेण्यात आले. सुरत अधिवेशनामध्ये जहाल-मवाळ यांच्यात वाद निर्माण होऊन काँग्रेसचे विभाजन झाले.

मार्च १९०८ मध्ये पुण्यात काँग्रेसच्या जिल्हा सभेत बोलताना लो.टिळकांनी मद्यपान निषेधाची चळवळ सुरू करण्याचा निर्णय जाहीर केला.ही चळवळ पुणे, बेळगाव, नगर, ठाणे, रायगड जिल्ह्यात सुरू झाली.रायगड जिल्ह्यात श्री.रामभाऊ मंडलिक यांच्या मार्गदर्शनाखाली चळवळ सुरू करण्यात आलेली होती.या चळवळीमध्ये जिल्ह्यातील कोळी, कातकरी, माळी, मराठे, मुसलमान समाजातील लोक सहभागी झाले होते.खुदिरामने मुझफ्फरपूरच्या न्यायाधीशावर फेकलेला बॉम्ब व इतर प्रसंग यावर केसरीमध्ये दोन लेख प्रसिद्ध झाले होते. हे लेख श्री.कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर यांने लिहिले होते.या लेखांचा आधार घेऊन लो.टिळकांना २५ जून १९०४ रोजी अटक करून त्यांच्यावर राजद्रोहाचा खटला भरला.त्यांना सहा वर्षासाठी मंडले येथे पाठविले. १९१४ मध्ये त्यांची सुटका झाली.त्यानंतर १९१६ मध्ये होमरुल चळवळ सुरू केली. यावेळी संपुर्ण मराठी भाषिक प्रांतामध्ये लो.टिळकांनी होमरुल चळवळीचा प्रचार केला.रायगड जिल्ह्यातील टिळकप्रणीत कार्यकर्त्यांनी टिळकांच्या राजकीय भूमिकेला पाठिंबा देऊन सहकार्य केले.त्यामुळे राजकीय जागृती घडून आली.

विसाव्या शतकाच्या प्रारंभीच्या काळात रायगड जिल्ह्यामध्ये राजकीय जागृतीचे कार्य वृत्तपत्र, साहित्य, कला, नाट्यकला, शिक्षण या माध्यमांनी केले.परिणामी सामाजिक, धार्मिक, आर्थिक व राजकीय क्षेत्रामध्ये प्रबोधन सुरू झाले.सामाजिक व धार्मिक सुधारणेचे पडसाद राष्ट्रवादी चळवळीत उमटले.तर आर्थिक स्वरूपाच्या स्वदेशी चळवळीने इंग्रजाविरोधी बहिष्काराचे रूप धारण केले.स्वदेशीचा हेतू भारतीय मालाला उत्तेजन मिळावे असा होता. स्वदेशी चळवळ ही एक राजकीय चळवळ बनली.गणेशोत्सव, शिवजयंतीसारख्या धार्मिक कार्यक्रमाचा उपयोग लोकजागृतीसाठी केला.त्याचा राजकीय आंदोलनासाठी एक प्रभाव साधन म्हणून उपयोग करण्यास प्रारंभ झाला.याच काळात राजकीय, सामाजिक, धार्मिक सुधारणेचे प्रतिबिंब साहित्यातून, वृत्तपत्रातून येऊ लागले.लोकांना अन्याय, अत्याचार यांचे ज्ञान प्राप्त झाल्याने या अन्यायाविरुध्द लोक संघटित होऊ लागले.त्यामुळे सरकारला विरोध होऊ लागला.लो.टिळकांनी लोकांच्या मनात आत्मविश्वास निर्माण केला.लो.टिळकांच्या मृत्यूनंतर या जनजागृतीचा उपयोग म. गांधीजींनी करून घेतला.त्यामुळे भारतीय स्वातंत्र्य चळवळीचे नेतृत्व म.गांधीजींकडे आले.

### ❖ <u>म.गांधीजींची असहकार चळवळी संर्दभात भूमिका:-</u>

विसाव्या शतकातील दोन दशकानंतर टिळक युगाचा अंत होत असतानाच गांधी युगाचा प्रारंभ झाला. म. गांधीजींनी असहकार ऊर्फ आत्मशुध्दीची चळवळ देशात सुरू केली. संस्कारमय व भावनाशील समाजजीवनावर त्याचा परिणाम झाला. भारताच्या स्वातंत्र्यलढ्यात एका अभूतपूर्व पर्वाची सुरुवात झाली. निग्रही प्रतिकाराने सत्याग्रह करण्याचे आपले अभिनव तंत्र दक्षिण आफ्रिकेत विकशित करून गांधीजी मायदेशी परतले. त्यांनी सर्व भारत फिरून पाहिला. लोकांचे आत्मबल प्रभावी करण्याचा प्रयत्न केला. सत्याग्रह, अहिंसा, प्रेम ही त्यांची साधने आहेत. या साधनांचा उपयोग करून इंग्रजांच्या विरोधी स्वातंत्र्याचा लढा सुरू केला. गांधीजींनी चंपारण्य, खेडा, अहमदाबाद येथे सत्याग्रह करून लढ्याची यशस्वी वाटचाल सुरू केली. त्यानंतर रौलेट विधेयकाने भारतीयांपुढे एक मोठा प्रश्न उभा केला होता.

भारतातील वाढत्या राजकीय आकांक्षाबरोबर राजकीय चळवळ तावडतोब चिरडून टाकली पाहिजे असे ब्रिटिश सरकारला वाटत होते. यासाठी १० डिसेंबर १९१७ रोजी मि. रौलेट यांच्या अध्यक्षतेखाली कमिशन नेमण्यात आले. त्याने १९ जानेवारी १९१९ रोजी अहवाल प्रसिध्द केला. रौलेट कमिशनच्या शिफारशीप्रमाणे केंद्रीय असेब्लीमध्ये रौलेट बिल मांडण्यात आले. त्या वेळी या बिलास नेमस्त सदस्यांसह सर्वांनी कडाडून विरोध केला. परंतु सरकारने सन १९१९ मध्ये ‘दि अनार्व्हिकल ॲण्ड रेव्होल्युशनरी क्राइम्स ॲक्ट (रौलेट ॲक्ट) पास केला. त्यानुसार भारतातील चळवळीला आळा घालण्यासाठी राजद्रोहात्मक साहित्य प्रसिध्द करण्यास बंदी, विनाचौकशी अटक, कोणताही उठाव दडपण्याचा सर्वधिकार सरकारला देण्यात आला. असा या जुलमी व अत्याचारी विधेयकाविरुद्ध सत्याग्रह सुरू करण्याचा गांधीजींनी निर्धार केला. ६ एप्रिल १९१९ रोजी रौलेट ॲक्ट विरुध्द सत्याग्रहाचा शुभारंभ मुंबईमध्ये केला. त्यानंतर गांधीजी दिल्लीला जात असताना त्यांना कैद करून पुन्हा मुंबईला आणले.

६ एप्रिल रोजीच पंजाबमध्ये हरताळ पाळला गेला. ९ एप्रिल रोजी डॉ. सत्यपाल व डॉ. किचलू यांना सरकारने हद्दपार केले. त्यामुळे प्रक्षुब्ध जमावाने अमृतसरमध्ये हिंसाचार व जाळपोळ केली. सरकारच्या दडपशाही धोरणाचा निषेध करण्यासाठी १३ एप्रिल म्हणजे हिंदू नववर्ष दिनी अमृतसरच्या जालियनवाला बागेत सभा भरली. जनरल डायरने पूर्वसुचना न देता या सभेवर गोळीबार केला. या गोळीबारात सरकारी निवेदनानुसार ३७९ लोक मरण पावल्याचे व १००० लोक

गंभीर जखमी झाल्याचे मान्य करण्यात आले. काँग्रेस अभ्यासगटाच्या मतानुसार १००० लोक मरण पावले असावेत. या घटनेमुळे संपूर्ण देशात इंग्रजी सत्तेविरोधी संतापाची लाट निर्माण झाली.

भारतातील खिलापत प्रकरण म्हणजे इंग्रजांनी मुसलमानांचे केलेले वचनभंग होय. पहिल्या महायुद्धात तुर्कस्थान जर्मनीच्या बाजूने युद्धात उतरले होता. यावेळी युद्धाचा शेवट कसाही लागला तरीही तुर्कस्थानला धक्का लावणार नाही असे भारतीय मुसलमानांचा पाठिंबा मिळविण्यासाठी ब्रिटिश पंतप्रधान लॉईड जॉर्ज याने जाहीर केले होते. कारण तुर्कस्थानचा खलिफा हा मुस्लिमांचा धर्मप्रमुख होता. परंतु तहाच्या वेळी या आश्वासनाचा इंग्रजांनी भंग केला. त्यामुळे मौलाना महंमद अली व शौकत अली या बंधूंनी भारतात खिलापत चळवळ सुरू केली. १९ मार्च १९२० हा दिवस 'निषेध दिन' म्हणून पाळला. २८ मे १९२० रोजी मुंबईमध्ये ऑल इंडिया खिलापत कमिटीची मिटिंग झाली. त्या वेळी गांधीजींच्या असहकार चळवळीत सहभागी होण्याचा निर्णय झाला. या प्रकरणास राष्ट्रीय आंदोलनाचे स्वरूप देण्यासाठी गांधीजींचे नेतृत्व स्वीकारले.[३६] त्यामुळे बरेच मुसलमान राष्ट्रीय आंदोलनात सामील झाले.

खिलाफपत प्रकरणी मुसलमानांचा झालेला विश्वासघात,रौलेट विधेयक़जालियनवाला बाग हत्याकांड या घटनेमुळे ब्रिटिश सरकार हिंदी लोकांना किडा-मुंगी इतकी किंमत देत नाही हे दिसून आले. जनरल डायर आणि गव्हर्नर मायकेल ओडवायर यांच्या विरुद्ध कोणत्याही प्रकारची कारवाई केली नाही. उलट मार्शल लॉ पुकारून पंजाबमधील काही भागात अनेक लोकांना शिक्षा देण्यात आली. या अन्यायामुळे हिंदु-मुसलमान या सर्वांना स्वराज्याची तीव्रता भासू लागली होती. अशा आणीबाणीच्या वेळी लोकांच्या उत्साहाला असहकारतेचा योग्य मार्ग महात्मा गांधीजींनी दाखवून दिला.

शांततामय असहकाराचा मार्ग हिंदुस्थानलाच नव्हे तर जागतिक शांततेच्या दृष्टीने गांधीजींनी थोर कार्य केले. पंजाब प्रकरणी रवींद्रनाथ टागोरांनी 'सर' पदवीचा त्याग केला. झुलू युद्धाच्या प्रसंगी रेडक्रॉसमध्ये केलेल्या सेवेबद्दल मिळालेले 'कैसर-इ-हिंद' हे पदक गांधीजींनी १ ऑगस्ट १९२० रोजी व्हॉईसरॉयला परत करून असहकार आंदोलनाची घोषणा केली. त्याबरोबर असहकारतेच्या युगाची सुरुवात झाली. डॉ. ॲनी बेंझेंट, श्री. मदन मोहन मालवीय, बॅ. जीना, श्री. चित्तरंजन दास, श्री. नारायण चंदावरकर, श्री. दिनशा वाच्छा श्रीनिवास शास्त्री, श्री. न. चिं. केळकर, श्री. कस्तुरी रंगा या पुढाऱ्यांचा असहकार चळवळीला विरोध होता.

सप्टेंबर १९२० मध्ये लाला लजपतराव यांच्या अध्यक्षतेखाली कलकत्त्यास काँग्रेसचे जादा अधिवेशन होऊन महात्माजींनी सुरू केलेल्या असहकारतेच्या चळवळीस मान्यता देण्यात आली. २६ ते ३१ डिसेंबर १९२० या काळात काँग्रेसचे वार्षिक अधिवेशन विजय राघवाचारी यांच्या अध्यक्षतेखाली नागपूर येथे पार पडले. या अधिवेशनास सुमारे १४,५८२ प्रतिनिधी व १० हजार प्रेक्षक उपस्थित होते. त्यामध्ये १०२५ प्रतिनिधी मुस्लीम होते. ३० डिसेंबर रोजी असहकारतेचा ठराव चितरंजन दासने मांडला. या ठरावास लाला लजपतराय यांनी अनुमोदन दिले.[३७] बहुमताने असहकाराचा ठराव मंजूर करण्यात आला.

काँग्रेससाठी निश्चित संविधान व संघटनेची निर्मिती करण्याचा प्रस्ताव नागपूर अधिवेशनाच्या वेळी स्वत: गांधीजींनी मांडला. त्यास काँग्रेसने मान्यता दिली. काँग्रेस कार्यकारी समितीची स्थापना करण्यात आली. भाषावार २१ प्रांतिक समित्या नेमण्याचे ठरले. काँग्रेसचे अधिवेशन संपल्यानंतर प्रांताप्रांतातले काँग्रेस कार्यकर्ते काँग्रेसच्या नव्या घटनेनुसार प्रांतिक, जिल्हा आणि तालुका काँग्रेस समित्यांची पुनर्रचना करण्याच्या कामात गुंतलेले होते. आधुनिक काळातील राजकीय पक्षाला साजेशी अशी पक्षसंघटना बांधणीला प्रारंभ झाला. काँग्रेस पक्षाने प्रादेशिक भाषेला प्राधान्य देऊन भाषेच्या तत्त्वावर पुनर्रचना केली. त्यामुळे प्रांतिक तसेच जिल्हा व तालुका पातळीवर संघटनेचे कामकाज सुरू झाले. परिणामी काँग्रेस पक्ष जनताभिमुख बनला. काँग्रेसच्या नव्या घटनेनुसार मुंबई प्रांतिक समितीची स्थापना झाली. त्यानुसार १९२१ मध्ये कुलाबा जिल्हा काँग्रेस समितीची स्थापना झाली. गांधीजींच्या आदेशानुसार रायगड जिल्हा काँग्रेस समितीने असहकार चळवळ सुरू केली.

### ❖ <u>रायगड जिल्ह्यातील असहकार चळवळीचे स्वरूप:-</u>

जिल्हा काँग्रेस समितीची व्यवस्थित उभारणी होण्यापूर्वी १९०७ मध्ये कुलाबा जिल्हा सभा ही संघटना स्थापन झालेली होती.[३८] तिचे पहिले अधिवेशन आत्माराम महादेव आठवले यांच्या पुढाकाराने पनवेल येथे भरविण्यात आले. तेव्हापासून रायगड जिल्ह्यात राष्ट्रीय जागृतीस चालना मिळाली. १९०७ ते १९२० या काळात दरवर्षी वेगवेगळ्या ठिकाणी कुलाबा जिल्हा सभांची अधिवेशने होत असत. जिल्हा सभेला १९२१ पासून रीतसर जिल्हा काँग्रेस समितीचे स्वरूप प्राप्त झाले. तिच्या नेतृत्वाखालीच जिल्ह्यात स्वातंत्र्य चळवळीस प्रारंभ झाला. म. गांधीजींच्या

नेतृत्वाखाली असहकार चळवळीने जो कार्यक्रम दिलेला होता, त्यानुसार रायगड जिल्हा कॉंग्रेस समितीने तो कार्यक्रम जिल्ह्यात सुरू केला.

## ➢ <u>असहकार चळवळीचा संघर्षात्मक कार्यक्रम :-</u>

म.गांधीजींच्या नेतृत्वाखाली सुरू करण्यात आलेल्या असहकार चळवळीचे दोन पैलू होते.ते म्हणजे संघर्षात्मक कार्यक्रम आणि विधायक कार्यक्रम होय.संघर्षात्मक कार्यक्रमामध्ये विधिमंडळे, सरकारी शाळा, कॉलेज, विदेशी कापड आणि न्यायालय यांच्यावरील बहिष्कार यांचा समावेश केलेला होता.

## ● कायदेमंडळ निवडणुकी संदर्भात जिल्ह्याची भूमिका:-

कलकत्ता येथील कॉंग्रेस अधिवेशनात 'असहकार चळवळी' बाबत ठराव मांडण्यात आला.त्यावर अधिवेशनात कडाक्याचा वादविवाद झाला.सी.आर.दास, पंडित मदन मोहन मालविय, बॅरिस्टर जिना, बाबू बिपिनचंद्र पाल, सत्यमूर्ती, खापर्डे,विठ्ठलभाई पटेल, तात्यासाहेब केळकर यांनी उघडपणे विरोध केला.कायदेमंडळावरील बहिष्कारखेरीज बाकीच्या बाबी सी. आर.दास बाबूनांही मान्य होत्या.म.गांधीजींच्या बाजूस मोतीलाल नेहरू, स्वामी श्रध्दानंद असे केवळ हाताच्या बोटावर मोजण्याइतके पुढारी होते.परंतु तरुणवर्ग व मुस्लीम नेते यांच्या पांठिब्यामुळे ठराव बहुमताने मंजूर करण्यात आला.या ठरावास रायगड जिल्हा कॉंग्रेसनेही पाठिंबा दिला.त्यानुसार नेत्यांनी कार्य करण्यास सुरुवात केली.रायगड जिल्हा कॉंग्रेस पक्षाचे नेते श्री.रामभाऊ मंडलिक यांनी जिल्ह्यातील जनतेला राष्ट्रभक्तीचे आवाहन केले की'राष्ट्रीय सभेचा आदेश मानणे हे जिल्ह्याचे पवित्र कर्तव्य आहे.आपल्या कर्तव्यापासून कोणीही दूर जाऊ नये. जिल्ह्यातील प्रत्येक देशभक्ताची तशीच इच्छाही असेल या विषयी आमच्या मनात शंका नाही. राष्ट्राच्या सत्वपरीक्षेचा काळ आहे.'त्यामुळे रायगड जिल्ह्याने आपले कर्तव्य चोख बजवावे अशी इच्छा श्री.रामभाऊ मंडलिक यांनी जाहीर प्रकट केली.

रायगड जिल्ह्यात १९२० च्या कायदेमंडळावरील बहिष्कार कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी श्री.रामभाऊ मंडलिक, श्री.माधवराव गोसावी यांनी प्रयत्न केला.त्यांनी बहिष्काराचे दोन पर्याय सांगितले.एक म्हणजे कायदेमंडळाच्या निवडणुकीसाठी कोणीही राष्ट्रीय पक्षाचा उमेदवार म्हणून उभा राहू नये.दुसरा म्हणजे कोणी अन्य पक्षातील उमेदवार एकाच जागेसाठी एक असा जरी उभा राहिला तरी त्यांनाही अत्यल्प मते पडतील अशी खबरदारी मतदारांनी घ्यावी.म्हणजे अपरिहार्यपणे

निवडून आलेला उमेदवार हा मतदारांचा पाठिंबा मिळवून निवडून आलेला नाही हे जाहीर होईल. रायगड जिल्ह्यात कॉंग्रेस लोकशाही पक्षातर्फे जिल्ह्यातील नामवंत वकील व कुशल प्रचारक श्री. माधवराव गोसावी हे उभे राहिले होते. दुसरे अलिबागचे रावबाहदूर श्री. गजाननराव कामत हे होते. परंतु दोघांनीही कॉंग्रेसच्या आदेशानुसार आपली उमेदवारी मागे घतली.

त्यामुळे जिल्ह्यातील मतदारांना कायदेमंडळ निवडणुकीवर बहिष्कार घालण्यास सांगताना रामभाऊ मंडलिकांनी पुन्हा एकदा नम्र विनंती केली. त्यामुळे रायगड जिल्ह्यातील राष्ट्रीय वृत्तीच्या मतदारांनी निवडणुकीवर बहिष्कार घातला. अकरा हजार मतदारापैकी अवघ्या ७९० मतदारांनी १२ ऑक्टोबर १९२० रोजी मतदान केले. त्यापैकी रोह्याचे श्री. गोपाळराव भाटे यांना अवघी ४११ मते मिळून प्रागतिक पक्षातर्फे निवडून आले.[३९] यावरून रायगड जिल्ह्यात कॉंग्रेसचा बहिष्काराचा कार्य क्रम यशस्वी झाला असेच दिसून येते.

असहकारतेच्या कार्यक्रमात कायदेमंडळावर बहिष्कार हा एक भाग होता. पण कायदेमंडळातील कामाचे ज्यांना विशेष आकर्षण होते अशांनी देशबंधू दास व पंडित मोतीलाल नेहरू यांच्या नेतृत्वाखाली चळवळ करून कॉंग्रेसमध्येच स्वराज्य पक्षाची स्थापना केली. त्याच्यामार्फत १९२३ ची कायदेमंडळाची निवडूक लढविण्याची कॉंग्रेसची मान्यता मिळविलेली होती. त्यामुळे कायदेमंडळामध्ये काम करण्याची हौस असणाऱ्यांना एक संधी मिळाली. सन १९२३ ची मुंबई विधिमंडळ निवडणूक रायगड जिल्ह्यात स्वराज्य पक्षामार्फत लढविण्यात आली. त्या वेळी श्री. रामभाऊ मंडलिक यांनी स्वराज्य पक्षातर्फे जोरदार प्रचार केला. पक्षाचे अधिकृत उमेदवार महाडचे डॉ. पवार यांना विजय मिळवून दिला.[४०]

१९२३ च्या लोकल बोर्ड कायद्यानुसार, प्रत्यक्ष मतदानाने होणारी जिल्हा लोकल बोर्डाची पहिलीच निवडणूक १९२६ ची होती. यापूर्वी बोर्डावर जमीनदार, सावकार या वर्गातील विशिष्ट लोकांची सरकारकडून नियुक्ती केली जात होती. अलिबागचे रावबहादूर श्री. गजाननराव कामत, रोह्याचे श्री. आबासाहेब मेहेंदळे, नेरळचे श्री. बापूसाहेब सुगवेकर, पनवेलचे श्री. आत्मारामशेठ आठवले इ. बड्या नेत्यांचे वर्चस्व होते. १९२४साली श्री. रामभाऊ मंडलिकांच्या नेतृत्वाखाली रायगड जिल्हा कॉंग्रेस कमिटीने वीस सभासदांचे एक लोकल मंडळ स्थापन केले. या कमिटीच्या मदतीने रायगड जिल्हा लोकल बोर्ड व स्कूल बोर्ड या मंडळाच्या निवडणुका लढविल्या. या मंडळाच्या स्थापनेसाठी २२/९/१९२४ रोजी रामभाऊच्या अध्यक्षतेखाली सभा झाली. मंडळाची

घटना,नियम इत्यादी ज.वि.ऊर्फ भाऊसाहेब लेले यांनी तयार केले.२३/३/१९२६ रोजी मतदान होऊन रायगड जिल्हा लोकल बोर्डातील २१ जागांपैकी १२ जागा मंडळाला मिळाल्या.त्याचे लोकल बोर्डात निर्विवाद बहुमत झाले.शेतकरी संघटनेचे नेते ना.ना.पाटील जिल्ह्यात सवात जास्त मते मिळवून विजयी झाले.

बोर्डातील लोकनियुक्त अधिकारी, पदे व अध्यक्ष, उपाध्यक्ष या संदर्भात चर्चा करण्यासाठी २५/०४/१९२६ रोजी रामवाडी येथे रामभाऊच्या अध्यक्षतेखाली सभा झाली.श्री.माधवराव गोसावी हे रायगड जिल्हा बोर्डाचे अध्यक्ष होणार अशी लोकांची अपेक्षा होती परंतु त्यांना विरोध झाला.अध्यक्षीय निवडणुकीच्या आदल्या दिवशी अलिबाग येथे बैठक झाली.श्री.सिताराम टिळक यांची अध्यक्ष म्हणून निवड करावी असे ठरले.त्यांच्या विरोधकांनी कोकणचे श्रीमंत रावबहादूर श्री.भाऊसाहेब तेंडूलकर यांचे नाव सुचविले. श्री.सितारामपंत टिळकांना ८ मते तर भाऊसाहेब तेंडूलकर यांना ११ मते पडली.त्यामुळे जिल्हा लोकल बोर्डाचे नवे अध्यक्ष म्हणून श्री.भाऊसाहेब तेंडूलकर यांची निवड झाली. श्री.माधवराव गोसावी यांची उपाध्यक्ष पदावर निवड झाली.[४१] लोकल बोर्ड मंडळाचे बहुमत असतानाही त्यांचा अध्यक्ष होऊ शकला नाही.गांधीजींच्या निवडणुक बहिष्कार या कार्यक्रमास रायगड जिल्ह्यातील नेत्यांनी एक मताने पाठिंबा दिला.त्यामुळे प्रचंड संख्येने मतदान झाले नाही.यावरून स्पष्ट होते की, गांधीजींचा निवडणुक बहिष्कार कार्यक्रमास रायगड जिल्ह्याने पाठिंबा दिला होता.

- **न्यायालयीन बहिष्कार :-**

असहकार चळवळीच्या कार्यक्रमाचा एक भाग म्हणजे वकिलांनी सरकारी न्यायालयावर बहिष्कार टाकून आपला व्यवसाय सोडून द्यावा.कलकत्ता अधिवेशनात सरकारी न्यायालयावर बहिष्कार टाकण्याचा निर्णय घेण्यात आला.त्याची विविध कारणे दिसून येतात.सरकारी न्यायालयात प्रचंड विलंब व खर्च असे.बहुतेक वेळा सरकारच्या बाजूनेच न्यायदान होत असे. ब्रिटिश न्यायालयात घृणास्पद व उघड-उघड वांशिक पक्षपात चालत असे.यावर कोर्टाची कार्यपध्दती आधारलेली होती.पैशासाठी आपला आत्मा विकणारे वकील, वकिलाचें दलाल, पटविलेले साक्षीदार त्यांची कोर्टातील उपस्थिती होती.त्यावर आधारित न्यायदान हे गांधीजींना अनैतिक वाटत असे म्हणून न्यायालयावर बहिष्कार टाकण्याचा निर्णय घेतला.राजकीय उद्देशासाठी कॉंग्रेसने न्यायालय बहिष्काराच्या आवाहनाला देशातील वकिलांनी व सामान्य

नागरिकांनी साथ दिली. सामान्य जनतेत त्या वेळी एक म्हण प्रसिद्ध होती की, "अदालत मे जो जाता सो हारा, जो हारा सो मरा" असा अनुभव असल्याने जनतेने न्यायालय बहिष्काराचे स्वागत केले.

असहकाराचा कार्यक्रम मान्य असलेल्या काही वकिलांनी एक वर्षभर वकिली सोडली. तर काही जणांनी खटले चालविण्याचे नवीन काम हाती घेण्यास नकार दिला. मात्र ज्यांच्याकडे पूर्वीचेच खटले बरेच होते त्यांनी ते चालविण्यासाठी न्यायालयात जाणे सोडले नाही. जिल्ह्यातील व महाराष्ट्रातील शेकडो वकिलांनी आपली वकिली सोडली पण ती काही काळापुरतीच. वकिलीचा कायमचा त्याग करणारे महाराष्ट्रात दोनच वकील होते. ते म्हणजे अलिबागचे श्री. माधवराव गोसावी आणि दुसरे वकील भुसावळचे श्री. अण्णासाहेब दास्ताने होय. गांधीजींच्या आवाहनानुसार इतरांनी वकिली सोडली पण पुन्हा चालविली. यामध्ये रायगड जिल्ह्यातील नागाव-अलिबागचे श्री. लिमये वामन गोविंद, महाडचे शेठ चुनीलाल मोठा ऊर्फ बापू. हायकोर्ट जज्जची नोकरी नाकारणारे अलिबागचे वकील श्री. लेले जनार्दन विष्णू इत्यादींचा प्रामुख्याने समावेश आढळतो. [४२]

वकिलीचा त्याग करण्याच्या आवाहनास व्यापक प्रतिसाद मिळाला नाही. कारण कित्येकांनी नुकतीच वकिली सुरू केली होती. काहींना क्वचित काम मिळत असे. ज्यांचा उदरनिर्वाह जेमतेम चालत असे त्यांना व्यवसाय सोडून परवडण्यासारखे नव्हते. वकिलीचा व्यवसाय सोडून देण्याच्या आवाहनाला फारसा प्रतिसाद मिळाला नाही. त्यामुळे न्यायालयावर बहिष्कारचा कार्यक्रम अयशस्वी ठरला असे पक्षकर मानतात. परंतु मिळालेले यश निराशाजनक म्हणता येणार नाही. संख्येच्या दृष्टीने ते यश परिणामकारक नसले तरी गुणवत्तेच्या दृष्टीने प्रेरणादायक होते हे पुढील वाटचालीवरून दिसून येते. असहकार चळवळीच्या काळात वकिलीचा धंदा सोडलेले अनेक प्रतिष्ठित वकील व बॅरिस्टर पुढील काळात राष्ट्रीय शाळा, कॉलेजातील अध्यापक व विद्यार्थी प्रमाणेच राष्ट्रीय आंदोलनात कायमचे राहिले हे बहिष्काराचे एक महत्त्वाचे फलित होते.

पंचायतीचे पुनरुज्जीवन ही न्यायालयावरील बहिष्काराची विधायक बाजू होती. स्वस्त, जलद न्याय मिळवून देण्याच्या प्रयत्नाला सामान्य जनतेने उत्तम प्रतिसाद दिला. अनेक प्रांतात लवाद मंडळींची व न्याय पंचायतीची वेगाने स्थापना केली. काही पंचायती कार्यक्षमतेने काम करीत असल्या तरी सरकारी न्यायव्यवस्थेवर दूरगामी परिणाम करू शकल्या नाहीत. कारण त्यांच्या निवाड्यामागे कायद्याचे पाठबळ नव्हते. पंचायत न्यायदान पध्दतीत ब्रिटिश न्यायपध्दतीचा अवलंब

केला जात असे. अनेक वेळा सरकारचा रोषही पंचायतींना पत्करावा लागत असे. पुष्कळदा गाढवावरून धिंड काढण्यासारख्या अपमानास्पद शिक्षा अपराध्यांना दिल्या जात. सामाजिक बहिष्काराची सजा भोगावी लागे. कदाचित शारीरीक शिक्षाही केल्या जात असत. त्यामुळे बहुसंख्य सामान्य लोक पंचायत न्यायालयात न जाता सरकारी न्यायालयाकडे धाव घेताना दिसून येत होते. त्यामुळे हा कार्यक्रम फारसा यशस्वी झाल्याचे आढळत नाही. न्यायालयावर बहिष्कार फारसा यशस्वी झाला नसला तरीही लोकजागृती मोठ्या प्रमाणात घडून आली. बरोबरच विदेशी कापडांवर बहिष्कार चळवळ सुरू केली.

- **विदेशी कापडांवर बहिष्कार :-**

कलकत्ता येथील अधिवेशनात काँग्रेसने असहकार कार्यक्रमाबरोबर विदेशी वस्तूंवरील बहिष्काराचा समावेश केला. 'गांधीजींनी विदेशी वस्तूपैकी फक्त विदेशी कापडाची निवड केली. कारण कापडाची टंचाई देशी कापडाच्या किंवा खादीच्या उत्पादनाने भरून काढणे शक्य आहे असा गांधीजींचा विश्वास होता. विदेशी वस्तूंवरील बहिष्कार मोहिमेला फारसे यश आले नाही. परंतु कापडावरील बहिष्काराला मात्र सर्व देशभर जनतेने उत्साहाने प्रतिसाद दिला. मुंबई इलाखा, बंगाल, संयुक्त प्रात, मद्रास इलाख या चार प्रातांत स्वदेशी आंदोलनाचा प्रभाव तीव्र होता. २ जुलै १९२१ पासून जवळजवळ दररोज गांधीजी गिरणी मालक, व्यापारी, ग्राहक यांना उद्देशून पत्रक काढीत होते. त्यांच्या सभा घेऊन त्यांचे मन वळविण्याचा प्रयत्न करत होते. गिरणी मालक, व्यापारी यांच्याकडून कापडाच्या किंमती वाढविणार नाहीत असे अभिवचन घेत असे. विदेशी कापड दुकानांवर पिकेटिंग (निरोधन) हा बहिष्कार मोहिमेतील अत्यंत लोकप्रिय व सार्वत्रिक कार्यक्रम होता. काही विशिष्ट काळापयत विदेशी कापड आयात न करण्याची सामुदायिक शपथ घेऊन कापड व्यापारी बहिष्कार आंदोलनात सामील झाले.

सन १९२४ मध्ये बेळगाव येथील काँग्रेस अधिवेशन म. गांधीजींच्या अध्यक्षतेखाली भरले. त्यावेळी रायगड जिल्ह्याचे रामभाऊ मंडलिकसह १६ जण उपस्थित होते. या परिषदेमध्ये गांधींच्या आग्रहास्तव काँग्रेसची चार आणे वार्षिक वर्गणी रद्द करून, तिच्याऐवजी दोन हजार वार हात सूत वर्गणी म्हणून देण्यात यावे असा ठराव पास झाला. त्या वेळी श्री. रामभाऊ मंडलिकांनी कळविले की, आमच्या जिल्ह्यात कापूस पिकत नाही. लोक चरखा फिरवून सूत काढत नाही. त्यामुळे सुतास मताधिकार हे तत्त्व आम्हाला मान्य नाही.

जिल्ह्यात विदेशी कापड दुकानावर पिकेटिंगचा कार्यक्रम पनवेल, पेण, महाड, अलिबाग शहरात राबविण्यात आला. अलिबाग येथे जोशी गणेश लक्ष्मण आणि लेले जनार्दन विष्णू यांच्या नेतृत्वाखाली कार्यक्रम पार पाडला. रोहे येथे श्री. नाझरे शिवराम आत्माराम याने पिकेटिंग कार्य क्रमात सहभाग घेतला. श्री. बागडे रामचंद्र मोरेश्वर, देशमुख यशवंत द्वारकानाथ यांच्या मार्गदर्श नाखाली महाड येथे बहिष्काराचा कार्यक्रम झाला. बिरवाडीचे श्री. बागडे रामचंद्र मोरेश्वर यांनी महाड येथे विदेशी कापडाची होळी केली. भोर संस्थानामध्ये असलेल्या पाली गावातील श्री. लिमये केशवराव यांनी संस्थानच्या हद्दीवाहेर जाऊन विदेशी कापडांची होळी केली.[४३]

ब्रिटिश कापडाची १९२०-२१मध्ये १०२ कोटी रु. आयात झाली होती. सन १९२१-२२ मध्ये ५७ कोटीपयत घसरली. परिणामी भारतीय व्यापार पेठाना कुलपे लागली. मँचेस्टरमधील कार्यालय बंद केले. गोदामात परदेशी कापडाचे गठ्ठे पडून राहू लागले. इंग्लंडच्या कापडाची हिंदुस्थान ही मोठी बाजारपेठ होती. त्यामुळे ग्रॅहॅम ॲण्ड कंपनी, रॅाय टॅावेथ ॲण्ड कंपनी, टॅामस डिनिन ॲण्ड कंपनी इ. अनेक नामवंत मोठ्या गिरण्या दिवाळखोरीत निघाल्या.

## ➢ असहकार चळवळीतील विधायक कार्यक्रम :-

विधायक कार्यक्रमामध्ये स्वदेशीचा विशेषत: खादीचा अंतर्भाव होता. अस्पृश्यता निवारण,हिंदू-मुसलमान ऐक्य, दारूबंदी प्रचार, राष्ट्रीय शिक्षण यांचा समावेश होता. त्याबरोबर गांधीजींनी राष्ट्रासमोर 'स्वयंपूर्ण खेड्यांची' कल्पना मांडली. व श्रमाच्या प्रतिष्ठेवर भर दिला. या कार्यक्रमाच्या आधारे गांधीजींनी चळवळीत नवचैतन्य निर्माण करण्याचा प्रयत्न केला

### ▪ खादी ग्रामोद्योग चळवळ :-

विदेशी कापडावरील बहिष्काराचे यश म्हणजे खादी उद्योग होय. हातसुताचे, हातविणाईचे स्वदेशी कापड म्हणजे खादी कापड होय. विदेशी कापडावरील बहिष्कार चळवळीमुळे खादीची मागणी मोठ्या प्रमाणात वाढली. खादी हा स्वातंत्र्याचा गणवेश आहे, असे पंडित नेहरूनी जाहीर केले. देशातील लक्षावधी घरात चरखे फिरू लागले. अनेक खेड्यात व गावात हातमाग सुरू झाले. शहरात खादी भांडारे सुरू झाली. हजारो बेकार स्त्री-पुरुषांना रोजगार मिळाला. अखिल भारतीय कॉंग्रेस कमिटीचे अधिवेशन ३१ मार्च ते १ एप्रिल या काळात बेझपाडा (आंध्र प्रदेश) येथे झाले. या अधिवेशनात पुढील टप्प्यातील कार्यक्रमावर चर्चा झाली. लोकशक्ती संघटित करून आंदोलन अधिक प्रभावी करणे व सविनय कायदेभंग चळवळ या दोन प्रश्नावर चर्चा झाली.

यावेळी गांधीजींचा विधायक कार्यक्रम स्वीकारण्यात आला यालाच 'बेझपाडा कार्यक्रम' असे म्हणतात. हा कार्यक्रम म्हणजे टिळक स्वराज्य फंडासाठी एक कोटी रु. जमावणे. काँग्रेसच्या एक कोटी सभासदांची नोंद करणे. वीस लाख चरखे चालू करणे हा कार्यक्रम ३० जून १९२१ पूर्वी करणे. [४४]

बेझपाडा कार्यक्रमानुसार प्रत्येक खेड्यातील सर्व जाती-जमातीत चरखा गेला तर त्यांच्यात स्वराज्याविषयी प्रेम निर्माण होईल. स्वराज्य मिळविण्याची सर्वाधिक शक्ती चरख्यात आहे तसेच टिळक स्मारक फंडातील पैसा टिळकांच्या पुतळ्यासाठी किंवा स्मारक मंदिराकरीता खर्च केला जाणार नाही तर तो राष्ट्रीय शाळेतील मुलांच्या शिक्षणासाठी, चरखा चळवळीकरीता व स्वराज्य संपादनाच्या कार्यासाठी खर्च केला जाईल असे गांधीजींनी व्यक्त केले. गांधीजींनी खादीचा जोरदार पुरस्कार करून खादीला प्रोत्साहन मिळावे म्हणून वेगवेगळे उपक्रम राबविण्याचे आदेश दिले. सर्व शैक्षणिक संस्थांनी शक्यतो खादीचा वापर करावा. खादी भांडारे सुरू करून खादी, चरखे व खादी उत्पादनासाठी लागणारे सर्व साहित्य विक्रीसाठी ठेवावे. हातकताईचे सूत किंवा भारतीय गिरणीत तयार झालेले सूत वापरण्यास विणकरांना प्रवृत्त करावे. प्रत्येक घरात चरखा चालेल यासाठी प्रयत्न करावा. त्यानुसार २० लाख चरखे फिरू लागले. काँग्रेसजनांनी १ ऑगस्ट १९२१ पासून विदेशी कापडाचा संपूर्ण त्याग करावा असा काँग्रेसने सल्ला दिला. परिणामी खादीचे उत्पादन मोठ्या प्रमाणात वाढले. टिळक स्मारक फंडात १ कोटी १५ लाख रु. जमा झाले.

वरील उपक्रमामुळेच पनवेल, जासाई, उरण इ. ठिकाणी आप्पासाहेब वेदक यांच्या मार्गदर्शनाखाली खादी प्रसार व प्रचार केंद्र सुरू करण्यात आले. त्यांनी पनवेल तालुक्यात खादीचे महत्त्व पटवून दिले. श्री. सदाशिव हरी तथा काकासाहेब गोखले यांनी स्वदेशी वस्तू व खादीच्या प्रसारात भाग घेतला. पनवेल येथे खादी विणाईसाठी हातमाग सुरू केला. [४५] बाबुराव मेहता यांनी महाड येथे खादी ग्रामोद्योग सुरू केला. त्यामुळे नजीकच्या काळात रायगड जिल्ह्यात पेण, अलिबाग, सासवणे, महाड इत्यादी ठिकाणी खादी प्रशिक्षण केंद्र सुरू करण्यात आले. पुढे जिल्ह्यात हळूहळू खादी चळवळ सुरू झाली.

- **राष्ट्रीय शिक्षण कार्यक्रम :-**

विसाव्या शतकाच्या प्रारंभीच्या दशकामध्ये देशाच्या स्वातंत्र्यासाठी धडपडण्याची दीक्षा लो. टिळकांनी समाजाला दिली. परकीयांच्या मगरमिठीतून देशाला सोडवायचे असेल तर लोकांना

विशेषत: तरुण पिढीला शिक्षणाची संधी उपलब्ध करून दिली पाहिजे. त्या शिक्षणातून देशभक्त तरुणांची निर्मिती होईल अशाच पध्दतीचे राष्ट्रीय शिक्षण दिले गेले पाहिजे. याच विचारातून राष्ट्रीय शिक्षणाच्या कल्पनेचा उगम झाला. शिक्षणाचा सार्वत्रिक प्रसार झाल्या शिवाय देश स्वतंत्र होणार नाही हे जाणून विष्णुशास्त्री चिपळूणकर, लो. टिळक, आगरकर व नामजोशी यांनी पुण्यात न्यू इंग्लिश स्कूल व फर्ग्युसन कॉलेजची स्थापना केली. इंग्रज सरकारविरोधी लोक स्वदेशीच्या शपथा घेऊ लागले होते. राष्ट्रीय शिक्षणाच्या स्वतंत्र शाळा सुरू होऊ लागल्या. राष्ट्रीय शिक्षणाच्या विचारसरणीत दोन प्रवाह सुरू होते. यांचा मूळ उगम लो. टिळक व ना. गोखले यांच्या विचारसरणीमध्ये होता. ते म्हणजे जहाल व मवाळ होय. जहाल विचारसरणीनुसार राष्ट्रीय शिक्षण देऊन देशाच्या स्वातंत्र्यासाठी प्राणार्पण करणारे तरुण तयार करणे हा हेतू होता तर दुसरा विचारप्रवाह म्हणजे सरकारी दोष टाळून राष्ट्रीय शिक्षण देणे व यातून स्वावलंबी, सदाचारी कर्तृत्वसंपन्न तरुण पिढी तयार करणे हा हेतू होता. या दृष्टीने शहरामधून राष्ट्रीय शाळा स्थापन होऊ लागल्या. काळाची गरज ओळखून कॉंग्रेसनेही राष्ट्रीय शिक्षणाला प्राधान्य देण्याचे ठरवले.

भारतीय राजकीय क्षेत्रातून टिळक युगाचा अस्त १९२० मध्ये झाला. त्याच वेळी म. गांधीजींच्या रूपाने नवे नेतृत्व उदयास आले. त्यांनी स्वातंत्र्यलढ्यातील असहकार हे पहिले आंदोलन सुरू केले. देशाच्या गुलामगिरीला कारणीभूत झालेल्या मेकॉले प्रणित शिक्षणपध्दतीवर बहिष्कार टाकून विद्याथ्यानी स्वातंत्र्यलढ्यात सहभागी व्हावे असे म. गांधीजीनी आवाहन केले. १९२० च्या कलकत्ता अधिवेशनामध्ये असहकारतेचा ठराव पास केला. त्यामध्ये स्वराज्याची चतु:सूत्री म्हणजे स्वदेशी, स्वराज्य, बहिष्कार आणि राष्ट्रीय शिक्षण यांना स्थान प्राप्त झाले. या अधिवेशनात सरकारी शाळा, कॉलेजच्या बहिष्कारासंबंधीचा ठराव मांडला. त्या ठरावानुसार संपूर्ण सरकारी, निमसरकारी (सरकारी मदतीच्या) अगर सरकारी नियंत्रण असलेल्या शाळा, कॉलेजवर बहिष्कार टाकून त्या शाळेतून व कॉलेजमधून विद्यार्थी आस्ते-आस्ते काढून घेऊन, प्रांताप्रांतातून स्थापन झालेल्या राष्ट्रीय शाळा व कॉलेजमध्ये प्रवेश घ्यावा. या ठरावाची अंमलबजावणी करण्याकरिता म. गांधीजींनी आपल्या 'यंग इंडिया' द्वारे सर्व प्रांतांना कळविले. सर्वत्र दौरे काढून राष्ट्रीय शिक्षणाच्या प्रचाराचे प्रयत्न केले. कॉंग्रेसच्या या आदेशानुसार सर्वत्र राष्ट्रीय शिक्षणासाठी शाळा व कॉलेजची स्थापना करण्यास सुरुवात झाली. राष्ट्रीय शिक्षणामध्ये लो. टिळकांचा मोठा

सहभाग होता. त्यामुळे महाराष्ट्रात टिळक विद्यापीठ,गुजरातमध्ये गुजरात विद्यापीठ स्थापन झाले. तसेच पुण्यात चिंचवड व तळेगाव येथे राष्ट्रीय माध्यमिक शाळा स्थापन झाल्या.[४६]

राष्ट्रीय शिक्षणाचा अभ्यासक्रम तयार करण्यात आला. शिवाय विद्यार्थ्याची भूमिकाही यामध्ये स्पष्ट करण्यात आलेली होती. १ ते १० इयत्तेपयत मातृभाषा व हिंदुस्थानी भाषा, पंचतंत्र, इसापनीती, हेकायते, लोकमत, कथा, इतिहास, पुराणकथा तसेच भारताच्या व जगाच्या भूगोलाची प्राथमिक ओळख करून देणे. याशिवाय रेल्वे, बँक, पोस्ट, टेलेग्रॉफ, न्यायव्यवस्था, पंचायत पध्दत, नगरपालिका, जिल्हा बोर्ड निवडणूक, आरोग्य नियम, जिल्हा व सरकारी अधिकाऱ्यांची कामे इ. सामान्य ज्ञान या विषयांचा शिक्षणक्रमात समावेश केला होता. तुळशीदास, जानक, कबीर, अर्जुन, शिवाजी महाराज, रामदास, तुकाराम इ. भारतीय थोर पुरुषांची चरित्रेही सांगितली जात. तांत्रिक शिक्षणाला अभ्यासक्रमात विशेष महत्त्व दिले होते. शिवणकाम, बुकबाइडिंग, चर्मकला, कॅनिंग, टोपल्या विणणे, सायकल दुरुस्ती,घड्याळ दुरुस्ती, इलेक्ट्रॉनिक पॉलिसिंग, विणाई, कताई, दोर वळणे, लोहारकाम, सुतारकाम, चित्रकला, मातीकाम इ. कलांचे व छोट्या-छोट्या धंद्याचे शिक्षण देऊन विद्यार्थ्याना आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी बनविण्याचा प्रयत्न होत असे.

कॉलेज अभ्यासक्रमामधील भाषा विषयामध्ये हिंदुस्थानी भाषेचा आग्रहपूर्वक समावेश केलेला होता. इंग्रजी शिकवली जात होती. ती शिकविण्याची पध्दत सरकार नियंत्रित शाळामधील पध्दतीसारखी होती. इंग्रजीची क्रमिक पुस्तके सरकारी होती. गणित, तत्वज्ञान, तर्कशास्त्र, अर्थ शास्त्र, विज्ञान, इतिहास राज्यशास्त्र इ. सर्व विषयांचे माध्यम अनिवार्यपणे प्रांतिक भाषा म्हणजे मातृभाषा होते. एडमंड बर्कचे 'रिक्लेक्शन्स ऑन-रेव्होल्यूशन इन फ्रान्स' आणि जॉन स्टुअर्ट मिलचे 'ऑन लिबर्टी ' ही दोन पुस्तके इंग्लिश विषयासाठी असलेल्या क्रमिक पुस्तकांच्या यादीत होती, असे स्वामी रामानंद तीर्थ यांनी सांगितले. युरोपीय इतिहास शिकविताना आयरिश, चिनी, रशियन, फ्रेंच,अमेरिकन क्रांत्यांच्या इतिहासावर विशेष भर दिला जात असे. कबड्डी,आट्यापाट्या, सुरपाट्या, खो-खो इ. भारतीय खेळांना प्रोत्साहन दिले जात असे.[४७]

राष्ट्रीय शिक्षणात शाळा-कॉलेजमधील विद्यार्थ्याची महत्त्वाची भूमिका व जबाबदारी होती. आपला अभ्यास सांभाळून, बाहेर सुरू असलेल्या आंदोलनात विद्यार्थी सहभागी होत असत. अध्यापकांच्या नेतृत्वाखाली सुट्टीच्या दिवशी शहरात व खेड्यात खादी विक्रीसाठी फिरत, अस्पृश्यता निवारण, दारूबंदी इ. कामात सहभागी होत होते. राष्ट्रीय शाळेतील विद्यार्थ्यामध्ये

राष्ट्रप्रेम व स्वावलंब यांची जागृती होण्यासाठी अभ्यासक्रम व दैनंदिन कार्यक्रम होते. स्वातंत्र्य चळवळीसाठी नवीन पिढी तयार व्हावी ही अपेक्षा होती.

रायगड जिल्ह्यामध्ये राष्ट्रीय शिक्षणाचा प्रसार करण्यासाठी महाड, सासवणे इ. ठिकाणी राष्ट्रीय शाळेची स्थापना करण्यात आली. या शाळेमध्ये वरीलप्रमाणे अभ्यासक्रम राबविण्यात आला. आचार्य भागवत,श्री. विनायकराव उपाध्ये, श्री. चिंतामणशास्त्री, श्री. नाना काणे गुरूजी, श्री. भाई ढवण या तरुणांनी राष्ट्रीय वृत्ती जोपासण्यासाठी व प्रज्वलित करण्यासाठी राष्ट्रीय शिक्षणाचा प्रचार केला. महाडला राष्ट्रीय शाळेची स्थापना आचार्य भागवत, श्री. विनायक उपाध्ये यांनी १९२२ मध्ये केली. १९२८ मध्ये आचार्य भागवत व उपाध्ये चळवळीत सहभागी झाल्याने ही राष्ट्रीय शाळा बंद पडली. श्रीवर्धन येथे श्री. महादेव सदाशिव पेंडसे यांनी शाळा सुरू केली. नागाव-अलिबाग येथे श्री. वामन गोविंद लिमये तर नागाव-महाड येथे श्री. गोपाळ गोविंद शेठ यांनी राष्ट्रीय शाळा सुरू केली.[४८] सासवणे येथील शाळेने खऱ्या अर्थाने स्वातंत्र्य चळवळीत योगदान दिले. या शाळेच्या घडामोडी व कार्यक्रमाची माहिती घेणे गरजेचे आहे.

**वैश्य विद्याश्रम सासवणे राष्ट्रीय शाळा :-**

रायगड जिल्ह्यात राष्ट्रीय शिक्षणासाठी ज्या शाळा स्थापन करण्यात आल्या होत्या त्यामध्ये रायगड जिल्हा स्वातंत्र्य चळवळीचे प्रमुख केंद्र बनलेली शाळा म्हणजे वैश्य विद्याश्रम सासवणे ही होय. संगमेश्वरी वैश्य समाजात आधुनिक शिक्षणप्रसाराला चालना देण्यासाठी व शिक्षण प्राप्त करणाऱ्या विद्यार्थ्याला आर्थिक मदत करण्याच्या हेतूने समाजातील काही सुशिक्षित मंडळींनी 'वैश्य विद्यावर्धक समाज' नावाची संघटना १९०४ मध्ये स्थापन केली होती. या संघटनेच्या १९१९ च्या वार्षिक समारंभामध्ये भाई ढवण यांनी 'विद्याश्रम' या विषयावर निबंध वाचला. महाराष्ट्रातील राष्ट्रीय शिक्षणाचे थोर प्रणेते प्रो. अण्णासाहेब विजापूरकर यांचे 'राष्ट्रीय शिक्षण' या विषयावर व्याख्यान झाले. त्यामुळे भाई ढवण यांच्या विद्याश्रम या विषयाला चालना मिळाली. दुसऱ्या दिवशी भाई ढवण यांनी श्री. अण्णासाहेब मोरे व श्री. अण्णासाहेब विजापूरकर यांची भेट घेतली. वैश्य विद्याश्रम या विषयावर चर्चा केली. त्यानंतर ता. ४/१०/१९१९ रोजी विजयादशमीच्या दिवशी वैश्य विद्याश्रमाची योजना अण्णासाहेब मोरे यांनी आपली योजना म्हणून समाजापुढे मांडली. ही योजना कार्यवाहीत आणण्यासाठी फंड संस्थेकडून सुरुवातीस ३० हजार रु. नंतर ५९ हजार रुपयांपयत मदत घेतली.

ज्ञाती फंडाचे अध्यक्ष कै.तात्यासाहेब कोलते यांना या योजनेचे महत्त्व पटल्यानंतर त्यांनी सढळ हाताने मदत केली.ज्ञाती फंडाची शाखा म्हणून सासवणे येथे वैश्य विद्याश्रम सुरू करण्याचा ठराव झाला.अण्णासाहेब मोरे यांच्यासह भाई ढवण सासवण्याला आले.गजाननशेठ देवळेकर यांची वाडीनजीकची सागरतीरावरील २ एकर जागा नाममात्र मोबदल्यात मिळविली.जागेची साफसफाई करून त्यावर सुरुवातीस तात्पुरत्या स्वरूपात इमारती उभारण्यात आल्या.समारंभपूर्वक आश्रमाच्या कामाला सुरुवात अक्षयतृतीयाच्या शुभमुहूर्तावर दि.१०/५/१९२१ रोजी करण्यात आली.असहकार आंदोलनाच्या वेळी गांधीजींच्या आदेशानुसार सरकारी शिक्षणावर बहिष्कार टाकून अनेक तरुण बाहेर पडले.त्यामधील काही विद्यार्थी व शिक्षकांनी सासवणे येथे अध्यापनाचे काम केले.त्यामध्ये भाई ढवण, डॉ.रा.सी.तथा भाऊ कापडी, डॉ.सि.बा.तथा दादा मालुष्टे, श्री.तात्या लुमणे, श्री.शंकर लक्ष्मण तथा बंधू चौधरी असा गुणवान अध्यापकांचा संच होता.२९ विद्यार्थ्यासह वैश्य विद्याश्रम सुरू झाले.[४९]

विद्याश्रमामध्ये सरकारमान्य शाळेतील अभ्यासक्रम चालू होता.प्राथमिक, माध्यमिक म्हणजे मॅट्रिक परीक्षेपयत १० वर्षाचे शिक्षण आश्रमात चालू होते.शेवटच्या परीक्षेनंतर विद्यासंपन्न झाल्याबद्दल विद्यार्थ्याला 'विद्याविजीत' अशी प्रशस्तीपत्रिका देण्यात येत होती.अशा परीक्षेला व अभ्यासक्रमाला टिळक महाराष्ट्र विद्यापीठाची मान्यता होती.त्यामुळे विद्यार्थ्याला कोणत्याही राष्ट्रीय महाविद्यालयामध्ये प्रवेश मिळत होता.आश्रमाच्या अभ्यासक्रमात धार्मिक शिक्षणावर विशेष भर असे.मात्र या धार्मिक शिक्षणात सर्वधर्म समभावनेच्या दृष्टीने जगातील सर्व धर्माचा परिचय करू देण्यात येत होता.शिवाय व्यापारी गणित, जमा-खर्च हे आवश्यक ठेवले होते.वरच्या वर्गातील सर्व विषय मातृभाषेतून शिकविले जात होते.हिंदी या राष्ट्रभाषेचे शिक्षण सक्तीचे होते.सूतकताई, विणाई हा खादीग्रामोद्योग सुरू होता.

अध्यापक श्री.भाऊसाहेब कापडी,श्री.दादा मलुष्टे, बंधू चौधरी आपल्या व्यवसायाच्या निमित्ताने सोडून गेल्यावर विल्सन कॉलेजचे प्राध्यापक कै.आप्पासाहेब तुळपुळे यांनी काही दिवस अध्यापक म्हणून काम केले.प्रा.आप्पासाहेब शेटये हे त्या वेळी मुंबईच्या राष्ट्रीय महाविद्यालयात मराठी भाषेचे प्राध्यापक म्हणून काम करीत होते.ते अधून-मधून आश्रमात येऊन अध्यापनाचे काम करीत होते.सासवणे गावचे सेवा निवृत्त तपस्वी शिक्षक रामजी लक्ष्मण घरत यांचाही सतत आश्रमाला लाभ मिळत होतो.श्री.आप्पा पेंडणे, श्री.चिंतामणशास्त्री जोशी, श्री.नाना काणे

यांनीही अध्यापक म्हणून कार्य केले.आश्रमातून शिक्षण घेऊन विद्याविजीत झालेले श्री.धु. बा.धामणकर,श्री.गजाननराव म्हस्कर, श्री.ज.पा.पोवार यांचा शिक्षक म्हणून आश्रमाला लाभ झाला.म्हणून आश्रमाची प्रगती मोठ्या प्रमाणात होऊन ते रायगड जिल्ह्याच्या स्वातंत्र्य चळवळीचे केंद्र बनले.

आश्रमाचे राष्ट्रीय शिक्षणाचे कार्य विशेष: रायगड जिल्ह्यातील स्वातंत्र्यलढ्याला फार पोषक व चालना देणारे असे झाले आहे.१९३२ च्या सविनय कायदेभंग चळवळीत सरकारने हा आश्रम बेकायदा ठरविला.कारण म.गांधीजींच्या हाकेला साथ देऊन आश्रमातील अनेक सत्याग्रही कायदेभंग चळवळीत सहभागी झाले होते.त्यामुळे सत्याग्रही निर्माण करणारी एक दैदीप्यमान शाळा म्हणून तिची गणना होऊ लागली.स्वातंत्र्याच्यालढ्यात ब्रिटिश सरकारने दडपशाहीचे धोरण स्वीकारून आश्रमावर बंदी घातली.त्यामुळे आश्रमाचे कार्य मंदावले.तो पुन्हा पूर्वीच्या ताकदीप्रमाणे उभा राहिला नाही.१९३४ नंतर सरकारने शाळेवरची बंदी उठवली.परंतु त्याचा फारसा उपयोग झाला नाही.ज्ञाती फंडाचा रीतसर ठराव करून भाई ढवणाने ही आश्रमशाळा सरकारच्या राष्ट्रीय शिक्षण विभागाकडे दोन लाख रुपयेसह समारंभपूर्वक सूर्पत केली.

असहकार चळवळीतील राष्ट्रीय शिक्षण हा कार्यक्रम महत्त्वाचा होता.सरकारी शाळा-कॉलेजवरील बहिष्कार कार्यक्रमात शिक्षक, विद्यार्थी मोठ्या प्रमाणात सहभाग झाले नव्हते. त्यामुळे राष्ट्रीय शिक्षणाच्या कार्यक्रमास मोठ्या प्रमाणात पाठिंबा मिळाला नाही.परंतु या कार्यक्रमाने मात्र भावी यशाचा प्रारंभ केला.या कार्यक्रमास प्रतिसाद न मिळाल्याचे पुढील घटक दिसून येतात.[५०]

१)सरकारी शाळा, कॉलेजवर बहिष्कार टाकणे याबाबत कॉंग्रेसमध्ये एकमत झालेले नव्हते.

२)१९२० च्या कौन्सिल निवडणूकीवरील बहिष्काराचा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सर्व नेत्यांचे लक्ष केंद्रित झालेले होते.

३)सर्वच विद्यार्थी, प्राध्यापक यांनी सरकारी नियंत्रित शाळा सोडल्या नाहीत.

४)राष्ट्रीय शिक्षणसंस्थांनी आपण राष्ट्रीय शिक्षणसंस्था स्थापन केल्याचे किंवा सरकारी अनुदान घेणे बंद केल्याचे जाहिर केले नाही.

असहकार आंदोलनातील बहिष्काराच्या कार्यक्रमास योग्य प्रतिसाद मिळालेला दिसून येत नाही.सरकारी शाळा, कॉलेजवरील बहिष्कारासंबधीच्या दोन भूमिका होत्या.एक राजकीय आणि दुसरी सांस्कृतिक जागृती करणे.या कार्यक्रमामुळे समाजात राजकीय जागृती घडून येण्यास मदत

झाली.या कार्यक्रमाबरोबरच समाजजागृतीसाठी मद्यपान निषेध कार्यक्रम सुरू करण्यात आला होता.

## ▪ मद्यपान निषेध कार्यक्रम:-

काँग्रेसने मान्य केलेल्या कार्यक्रमात विदेशी मद्यविक्रीविरूध्द सत्याग्रह करण्याचे कलम होते.इंग्लंड-फ्रान्स या देशातील दारूनिर्मिती उद्योगधंद्याला मोठ्या प्रमाणात फायदा होत होता. दारू विक्रीतून ब्रिटिश सरकारला मोठ्या प्रमाणात महसूल मिळत होता.परिणामी भारतीय जनता अधिक दरिद्री बनली जात होती.शिवाय मद्यपानाचे दुष्परिणाम घालविणे हा सामाजिक हेतू डोळ्यासमोर ठेवून गांधीजींनी मद्यपान निषेधाचा कार्यक्रम दिला होता.असहकार आंदोलनात विदेशी कापड बहिष्कारइतकेच मद्यपान बहिष्कार कार्यक्रमाला महत्त्व प्राप्त झाले होते.दारू दुकानावर निरोधन करणे दारू मक्त्याच्या लिलावावर बहिष्कार टाकणे दारूला स्पर्श न करण्याची वैयक्तिक किंवा सामूहिक शपथ घेणे दारू दुकानदारांना व दारू पिणाऱ्यांना हात जोडून समजावून सांगणे की, दारू पिऊन आपला संसार कसा उदध्वस्त होतो? त्यांचे दुष्परिणाम काय होतात? हे त्यांना पटवून देणे.इत्यादी स्वरूपाचा कार्यक्रम मद्यपान निषेध मोहिमेंतर्गत होता.त्यामुळे यास सर्वत्र प्रतिसाद मिळाला.असहकार आंदोलनातील कार्यकत्याच्या दृष्टीने दारू बहिष्कारातील राजकीय भूमिका, नैतिक भूमिकेइतकीच महत्त्वाची होती.कारण दारूद्वारे सरकारला प्राप्त होणारे उत्पन्न थांबवून त्यांची आर्थिक मार्गाने राजकीय कोंडी करण्याचा उद्देश होता.[५१]

रायगड जिल्हा काँग्रेसने गांधीजींच्या मद्यपान निषेधाच्या कार्यक्रमास पाठिंवा दिला. श्री.रामभाऊ मंडलिक, श्री.माधवराव गोसावी, श्री.गजानन कामत, श्री.आत्माराम आठवले इ. प्रमुख मंडळींनी या कार्यक्रमात सहभाग घेतला.त्यानुसार अलिबाग, पेण, महाड, पनवेल, रोहा इ. ठिकाणी पिकेटिंगचा कार्यक्रम हाती घेतला.तसेच अलिबाग येथे दारूचा मक्ता होता.त्यावर जिल्ह्यातील लोकांनी, व्यापाऱ्यांनी बहिष्कार टाकला.रोहा येथे श्री.शेट दोराबाजी पनवेलवाला यांचे दारू विक्रीचे दुकान होते.सदर दुकानामध्ये रोहॅानजिकच्या गावातून रोज संध्याकाळी दारू पिण्यासाठी गिऱ्हाईक मोठॅा प्रमाणात येत असत.या ठिकाणच्या शाळेमध्ये श्री.ना.ना.पाटील शिक्षक होते.त्यांनी पिकेटिंगचा कार्यक्रम हाती घेतला होता.त्यामुळे श्री.पाटील यांच्यावर हल्ला करण्यासाठी काही मंडळी आली.परंतु त्यांनी हल्ला केला नाही.या पिकेंटिंग कार्यक्रमामुळे अनेक गावे एक महिनाभर तरी दारूपासून अलिप्त राहिली.नंतर जैसे थे परिस्थिती होती.[५२] प्रत्येक

तालुका काँग्रेस नेत्यांनी आपल्या तालुक्याच्या ठिकाणी तसेच परिसरातील दारू दुकानासमोर पिकेटिंग कार्यक्रम केला.

सरकारने दडपशाहीचा पहिला प्रहार मद्यपानविरोधी मोहिमेवर केला. त्यानुसार असहकार आंदोलन दडपून टाकण्याचे आदेश दिले. मद्यप्राशनाचे जाहीरपणे समर्थन करून काँग्रेसच्या मोहिमेला विरोध केला. यासाठी सरकारने प्रचारपत्रके प्रसिद्ध केली. त्यामध्ये त्यांनी म्हटले की "एक औषध म्हणून मद्याची उपयुक्तता अतिशय महत्त्वाची आहे. मोझेस, सिकंदर, ज्युलियस सीझर, नेपोलियन,शेक्सपीअर, टेनिसन, बिस्मार्क इ. जगातील महान व्यक्ती मद्यप्राशन करीत होत्या" हे ही निदर्शनास आणून दिले.[५३] ४४ कलमाद्वारे सभा-मिरवणुकांवर बंदी घालण्यात आली. १२४अ कलमाखाली पिकेटिंग करणाऱ्यावर खटले भरण्याची परवानगी देण्यात आली. मद्यपान निषेधाच्या चळवळीमुळे अनेकांना पकडले. त्यांच्यावर खटला भरण्यात आला. हे खटले फुकट चालवून त्यांचा बचाव करण्याची काही वकिलांनी तयारी दर्शविली. परंतु मुंबई प्रांतिक काँग्रेस समितीने अशी मदत नाकारण्याचे ठरविले. कारण प्रचलित कायद्यानुसार एखादी कृती गुन्हा ठरत असेल तर, सत्याग्रह करणाऱ्याने तो सरळ कबुल करावयाचा आणि बचाव करण्याच्या भानगडीत न पडता, निमूटपणे शिक्षा भोगावयाची असे सत्याग्रहात सांगितले होते. त्यामुळे दंड इतके भरावे लागले की पैशाचा हा अपव्यय म्हणून चळवळ थांबवावी लागली असे केळकरांनी "गतगोष्टी"या पुस्तकामध्ये म्हटले आहे. मद्यपान निषेध चळवळीबरोबरच गांधीजींच्या आदेशानुसार अस्पृश्यता निमूर्लन कार्यक्रम व सामाजिक समतेचा लढा ही चळवळअसहकार चळवळीच्या माध्यमातून सुरू करण्यात आली.

- **अस्पृश्यता निमूर्लन कार्यक्रम व सामाजिक समतेचा लढा :-**

असहकार आंदोलनाच्या निमित्ताने अस्पृश्यताविरोधी प्रचाराला भारतीय स्वातंत्र्य आंदोलनाच्या कार्यक्रमात प्रथमच स्थान प्राप्त झाले. अस्पृश्यतेचा प्रश्न हा गांधीजींच्या दृष्टीने एक राजकीय प्रश्नदेखील होता. अस्पृश्यता व साम्राज्यावाद ही जुळी भावंडे आहेत. आपल्या समाजातील दुर्गुण, दोष, दुर्बोधता यांचा फायदा घेऊनच ब्रिटिशांनी सत्ता टिकवली म्हणून अस्पृश्यता दोष नाहीसा केला पाहिजे. त्यातूनच ब्रिटिश सत्तेचा शेवट होईल अशी गांधीजींची भूमिका होती. तरीपण काँग्रेसच्या नेतृत्वाखाली बहुतेकांना अस्पृश्यता निर्मूलनाचा प्रश्न आवश्यक व महत्त्वाचा वाटला नाही. कारण रूढीग्रस्त व सनातनी विचारांच्या हिंदु समाजातील गटांचा क्रोध ओढवून घ्यावयास नेते मंडळी तयार नव्हती. त्यामुळे अस्पृश्यताविरोधी मोहिमेला इतर कार्य

क्रमाप्रमाणे भरीव प्रतिसाद मिळाला नाही. रायगड जिल्ह्यात श्री. अनंत चित्रे, श्री. नाना काणे, श्री. सुरबानाना टिपणीस, इ. मंडळी प्रामुख्याने दिसून येतात. या मंडळींनी सामाजिक समता निर्माण करण्याचा प्रयत्न केला. अस्पृश्य लोकांच्या संगतीत फिरणे, त्यांच्याबरोबर सहभोजन एकाच पंक्तीत घेणे. अडचणीच्या वेळी आर्थिक व इतर मदत करणे. स्वत:च्या घरी बोलावणे.[५४] तसेच सामाजिक समते संदर्भात प्रचार करणे, त्यातून लोकजागृती केली.

मुंबई इलाख्यातील अस्पृश्य समाजात सार्वजनिक काम करण्यासाठी ज्या विविध संस्था स्थापन झाल्या त्यामध्ये महाडजवळील रावढळ येथील श्री. गोपाळबुवा वलंगकर यांनी १८९० मध्ये 'अनार्य दोष परिहारक मंडळ' ही पहिली संस्था स्थापन केलेली होती. म. फुले यांचे बरेच अनुयायी या संस्थेत होते. महारांची सेनादलातील भरती थांबविण्याच्या सरकारच्या कृतीविरूध्द वलंगकरांनी न्या. रानडेंच्या मदतीने अर्ज केला होता. रायगड जिल्ह्यात वलंगकरांनी अस्पृश्यता जागृतीचे कार्य केले. या पार्श्वभूमीवर दलित मुक्तीसाठी महाड हे ठिकाण डॉ. बाबासाहेब यांनी निवडले.[५५]

अस्पृश्यांसाठी सार्वजनिक पाणवठे, विहिरी, तळी खुली करण्यासंबंधीचा श्री. सी. के. बोले यांनी १९१३ मध्ये विधिमंडळात ठराव मांडला. सरकारने तो मान्य केला. तरीही प्रत्यक्षात अंमलात आलेला नव्हता. ५ जानेवारी १९२४ रोजी महाड नगरपालिकेन चवदार तळे अस्पृश्यांना खुले असल्याचे जाहीर केले. तरीही प्रत्यक्षात अस्पृश्यांनी तळ्यावर जाऊन आपला हक्क बजावला नव्हता. त्यामुळे महाडला होणाऱ्या बहिष्कृत हितकारिणी सभेच्या निमित्ताने समतेच्या लढ्याचे रणशिंग फुंकण्याचे बाबासाहेब आंबेडकरांनी ठरविले. १९ व २० मार्च १९२७ रोजी डॉ. बाबासाहेबांच्या अध्यक्षतेखाली रायगड जिल्हा बहिष्कृत परिषदेचे अधिवेशन भरले. या अधिवेशनास २५०० हून अधिक लोक हजर होते. तेव्हा ३२ ठराव मंजूर करण्यात आले. २० मार्च रोजी डॉ. आंबेडकरांच्या नेतृत्वाखाली अनेक अस्पृश्य चवदार तळ्ीावर गेले. तेथे स्वत:बाबासाहेब पाणी पिऊन परत सभामंडपात आले. परिषदेचे काम संपविण्यात आले.[५६]

सत्याग्रह शांततेने पार पडल्यानंतर महाडमधील वीरेश्वराच्या देवळातील गुरवाने गावात दवंडी पिटून, अस्पृश्य वीरेश्वराच्या मंदिरात घुसणार असल्याचे जाहीर केले. त्यामुळे सर्व हिंदूनी सभामंडपात जाऊन अस्पृश्यांना बेदम मारहाण केली. डॉ. बाबासाहेब व भाई अनंतराव चित्रेंनी दंगलखोराविरोधी तक्रार नोंदविण्याची व्यवस्था केली आणि ते मुंबईस परतले. २१ मार्च १९२७ रोजी हिंदू लोकांनी एक हजार कलश पाणी उपसून तळ्ीात पंचगंगा मिसळून वैदिक मंत्रांच्या

घोषात तळे शुध्द करण्याचा कार्यक्रम पार पाडला. याला उत्तर देण्यासाठी आंबेडकरांनी 'बहिष्कृत भारत' नावाचे पाक्षिक ३ एप्रिल १९२७ रोजी सुरू केले. सत्याग्रहानंतर महाड नगरपालिकेने चवदार तळ्याचा ठराव मागे घेतला. चवदार तळे हे सार्वजनिक नसून खाजगी मालकीचे आहे. त्यातून ते अस्पृश्यांना वापरण्यास मनाई करण्याचा प्रयत्न सुरू झाला.

रायगड जिल्हाधिकाऱ्यांनी सांगितले की सरकार अस्पृश्यांना प्रतिबंध करणारा मनाई हुकूम काढणार नाही. त्या वळी महाडच्या पुढाऱ्यांनी ७ डिसेंबर १९२७ रोजी सांगितले की अस्पृश्यांना वाटल्यास त्यांनी दावा करावा. त्यानंतर महाडमधील नऊ जणांनी दावा दाखल केला. मात्र त्यास न्यायालयाने मनाई हुकूम दिला.[५७] ठरल्याप्रमाणे महाडची दुसरी परिषद २५ डिसेंबर १९२७ रोजी सुरू झाली. १० हजार लोक या परिषदेला उपस्थित होते. पहिल्या दिवशी जन्मसिध्द हक्काचा जाहीरनामा प्रसिध्द करण्यात आला. तसेच इतर ठरावही पास करण्यात आले. त्यानंतर मनुस्मृती या ग्रंथाचे रात्री नऊ वाजता गंगाधरपंत सहस्त्रबुध्दे व सहा अस्पृश्य साधूंच्या हस्ते दहनविधी करण्यात आला.[५८] परिषद तीन दिवस सुरू होती. बाबासाहेबांचा चवदार तळ्याच्या सत्याग्रहाच्या संदर्भात निर्णय बदलला. न्यायालयाने मार्च १९३७ मध्ये तळ्याचा निर्णय दिला. १९२७ पासून सुरू झालेला समतेचा लढा यशस्वी झाला.

## ❖ रायगड जिल्ह्यातील शेतकऱ्यांचे आंदोलने :-

म. गांधीजींच्या नेतृत्वाखाली भारतीय स्वातंत्र्य चळवळ सुरू झाली. त्यामुळे सर्वसामान्य जनता, शेतकरी व कष्टकरी वर्ग जागृत झाला. आपल्यावर होणाऱ्या अन्यायाविरोधी एकत्र येऊ लागला. त्याचाच एक भाग म्हणून रायगड जिल्ह्यातील शेतकरी व कुळे एकत्र आली. त्यांनी आपल्या मालकाविरोधी व सरकारविरोधी चळवळ सुरू केली. ही चळवळ स्वातंत्र्य चळवळीचा एक भाग होता. परंतु त्यांचा मार्ग व हेतू वेगळा होता. या जागृत जनतेचा म. गांधीजींनी पुढील स्वातंत्र्यलढ्यासाठी उपयोग करून घेतला. त्यामुळे रायगड जिल्ह्यात पेण-वाशीच्या शेतकरी कुळांचा संप, धारवाढ निवारण चळवळ, खोतविरोधी चळवळ या शेतकरी चळवळींचा आढावा घेणे क्रमप्राप्त होते.

### • पेण-वाशीच्या शेतकरी कुळांचा संप:-

मुंबई राज्यातील शेतीविषयक कूळ कायदा १९४७ मध्ये झाला. त्या क्रांतिकारी कायद्याचा उगम ज्या चळवळीत झाला ती चळवळ म्हणजे पेण-वाशी शेतकरी कूळांचा संप होय. शेतकरी

कूळ चळवळ १९२२ मध्ये प्रथमच पेण तालुक्यात झाली. महाराष्ट्र राज्याचा कूळ कायद्यातील ज्या तरतुदी दिसतात त्याची बीजे या संपामध्ये सापडतात. पेण तालुक्यातील शेतकरी चळवळीचे नेतृत्व वाशी ता. पेण येथील सरपाटील श्री. हिरू महादू म्हात्रे यांनी केले. २० फेब्रुवारी १९२२ रोजी पेण येथे श्री. बाळासाहेब धारकर यांच्या अध्यक्षतेखाली पेण तालुक्यातील शेतकऱ्यांची सभा झाली. परिणामी पेण व वाशी येथे संप करण्यात आला. शेतकऱ्यांचा संप हा खंडासंदर्भात होता. पूर्वी तिजाई १/२ कुळाला व २/३ मालकाला असे खंडाचे प्रमाण होते. म्हणजे मालकाला जास्त धान्य व कुळाला कमी धान्य मिळत असे. ते दूर करून कूळ-मालक यांना अर्धा म्हणजे १०/१० असे ठरविले. उभयपक्षात करार-कबुलायत मान्य करण्यात आला. तसे जमीनदारांनी करारपत्र लिहून दिले. हा क्रांतिकारी संप यशस्वी झाला. या संपात कुळाचे पंच म्हणून सर्वश्री श्री. हिरू महादू म्हात्रे(रा. वाशी), श्री. लक्ष्मण गोविंद पाटील(रा. वाघ्रण),प्रि. टी. ए. कुलकर्णी(मुंबई) यांनी काम पाहिले. या संपाबाबत श्री. रामजी लक्ष्मण घरत यांचा मोठा वाटा होता. याच वेळी महाराष्ट्र प्रांतिक कॉंग्रेसने १७/०४/१९२२ रोजी ठराव पास करून वरील शेतकरी चळवळीचे महत्त्व दर्शविले.

या ऐतिहासिक संपाच्या संदर्भात कायदेपंडित श्री. के. एस. गुप्ते यांनी " दि बॉम्बे टेनन्सी ॲण्ड ॲग्रिकल्चर लॅन्डस् ॲक्ट १९४८"या पुस्तकाच्या प्रथम आवृत्तीच्या प्रस्तावन मध्ये उल्लेख केलेला आहे. त्यांनीच १९३८ मध्ये 'बॉम्बे टेनन्सी प्रॉब्लेम्स' नावाची एक पुस्तिका लिहिली. त्यामध्ये रोहा-पेण तालुक्यातील शेतकरी कुळांची पिळवणूक व त्यांच्या संपाची माहिती दिलेली आढळते.[५९]

- **धारवाढ निवारण चळवळ :-**

पेण-वाशी शेतकरी कूळ संपाच्या वेळी रायगड जिल्ह्यात शेतकरी संघटनेची स्थापना केली तेव्हापासून शेतकरी चळवळीला सुरुवात झाली. चळवळीचा एक भाग म्हणून धारवाढ निवारण चळवळ रायगड जिल्ह्यात सुरू झाली. रायगड जिल्ह्यात काही तालुक्यात जमीन महसुलाची फेरतपासणी करण्यात आली. मूळ महसुलात रुपया मागे ५ ते १० आणे वाढ करण्यात आली. याच वेळी भाताचे भाव घसरले होते. याच सुमारास बारडोली तालुक्यात सरदार वल्लभभाई पटेल यांच्या नेतृत्वाखाली सरकारविरोधी धारवाढ निवारण सत्याग्रह यशस्वी झाला होता. त्याच धर्तीवर रायगड जिल्ह्यात रामभाऊ मंडलिक यांच्या नेतृत्वाखाली सत्याग्रह करण्यात आला. माधवराव गोसावी, रामभाऊ मंडलिक यांनी एकत्र विचार करून ज्या तालुक्यात शेतसारा वाढ झाली होती. तेथील

लहान-मोठ्या खातेदारांना एकत्र करून त्यांच्यात लढण्याची जिद्द निर्माण केली. या संदर्भात रायगड जिल्हा धारवाढ निवारण समिती नावाची मध्यवर्ती संस्था स्थापन करण्यात आली. विशेष अलिबाग, पेण तालुक्यात या आंदोलनाचा जोर होता.[६०]

## ● खोत विरोधी चळवळ :-

शेतकरी चळवळीच्या उदयाचे मूळ कारण म्हणजे कोकणातील खोत होते. बरेच खोत सनदधारक होते. एकोणिसाव्या शतकात त्यांच्या मालकी हक्काच्या संदर्भात वाद सुरू झाला. इंग्रजांनी खोत हे जमीनमालक नसून महसूल संकलन करणारा मध्यस्थी आहे असे जाहीर केले. त्यामुळे रायगड, रत्नागिरी जिल्ह्यातील अनेक खोतांनी शासनाच्या धोरणाविरूध्द न्यायालयात दावे चालविले. मुंबई शासनाने १८७९ मध्ये खोत व त्याच्या भूमिकेसंदर्भात एक विधेयक तयार केले. या विधेयकाच्या विरोधी लो. टिळक उभे राहिले. तरीपण विधेयक पास झाले.[६१]

सन १९०४ मध्ये खोती अधिनियम दुरुस्ती केली. त्यानुसार कुळांनी पिकांचा काही भाग शेतसारा म्हणून खोतास देण्याऐवजी रोकड रकमेच्या रूपाने देण्यास परवानगी दिली. हा नियम कुळांच्या हिताचा ठरला. पहिल्या महायुध्दाच्या काळात व नंतरही धान्याच्या किमती वाढल्यामुळे कुळांना धान्याच्या रूपाने खंड देण्यापेक्षा तो पैशामध्ये देणे किफायतशीर झाले. परंतु खोतांनी धान्याच्या स्वरूपात खंड घेण्याचे ठरविले. आपले हित रक्षण करण्यासाठी पेण तालुक्यातील आगरी जातीच्या कुळांनी खोतांविरूध्द असहकार व बहिष्कार करण्याचे शस्त्र हाती घेतले.[६२] खोतांनी धान्याच्या स्वरूपात खंडाची मागणी केल्याने आगरी कुळांनी जमीन कसण्यास नकार दिला. अखेर दोघांच्यात तडजोड होऊन आगरी कुळांनी बहिष्कार मागे घेतला.

१९२१-१९२९ या काळात रायगड व रत्नागिरी जिल्ह्यातील खोतांविरुद्ध कुळांनी केलेल्या तक्रारींना मुंबई विधिमंडळात वाचा फोडण्यात आली होती. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी जमीनदारांची खोती पध्दत नष्ट करण्याची ही चळवळ १९२९ एप्रिलमध्ये सुरू केली. या चळवळीचे आघाडीचे संघटक भाई अनंतराव चित्रे होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांप्रमाणे रायगड जिल्ह्यात श्री. ना. ना. पाटील, श्री. भाई अनंतराव चित्रे, श्री. त्र्यंबकराव पर्वते, श्री. सुरबानाना टिपणीस, श्री. कमलाकांत चित्रे यांनी लोकजागृतीचे कार्य केले.[६३] रायगड जिल्ह्यातील शेतकऱ्यांचे पुढारी व चरीच्या सत्याग्रहाचे, अलिबाग तालुका शेतकरी सत्याग्रहाचे नेतृत्व करणारे श्री. नारायण नागू

पाटील यांनी खोती मुक्ती आंदोलनासाठी बरेच काम केले. अखेर १९४९ मध्ये बाळासाहेब खेर मंत्रिमंडळाने खोती पध्दती नष्ट केली.

रायगड जिल्ह्यातील खोतीविरोधी चळवळीमुळे समाजातील सर्व जाती-जमातीचे लोक एकत्र आले होते. आक्रमक चळवळ केल्यास आपले हक्क प्राप्त होतात याची जाणीव लोकांना झाली होती. शेतकरी चळवळीचा व त्यांच्या ऐक्याचा उपयोग स्वातंत्र्यलढ्यासाठी गांधीजींनी करून घेतला. चळवळीच्या माध्यमातून समाजाच्या एकीकरणातूनच अस्पृश्य निवारण चळवळीला पाठिंबा वाढत गेलेला दिसतो.

## ❖ सायमन कमिशनचा निषेध :-

असहकार चळवळीच्या माध्यमातून विविध उपक्रम राबविण्यात आले. त्यामुळे लोकजागृतीबरोबर सामाजिक व राजकीय जागृती घडून आली. परिणामी इंग्रज सरकारविरोधी वातावरण निर्माण झाले. १९२७ मध्ये सायमन कमिशन नियुक्त करण्यात आले. या कमिशनमध्ये सात इंग्रज सभासद असून ते भारतातील परिस्थितीचा अभ्यास करणार होते. भारतीयांना कायद्यासंदर्भात अहवाल देणार होते. पण हे भारतीयांना नको होते. म्हणून मुंबईला कमिशन उतरताच त्यांचे स्वागत "सायमन गो बॅक" या घोषणेने केले. देशभरातून कमिशनचा निषेध करण्यात आला.

स्वातंत्र्यलढ्यातील पुढील महत्वाचा टप्पा म्हणजे १९२९ चे लाहोर अधिवेशन होय. याचे अध्यक्ष पंडित जवाहरलाल नेहरू होते. या अधिवेशनात 'संपूर्ण स्वातंत्र्य आणि सविनय कायदेभंग चळवळ ठराव पास झाला. ३१ डिसेंबर १९२९ रोजी रावी नदीच्या काठी तिरंगा फडकावून स्वातंत्र्यप्राप्तीची घोषणा केली. २६ जानेवारी १९३० हा स्वातंत्र्य दिन पाळण्यासाठी सर्वांना आवाहन केले. २६ जानेवारी १९३० हा स्वातंत्र्य दिन म्हणून रायगड जिल्ह्यात साजरा करण्यात आला. संपूर्ण देशात स्वातंत्र्याचे वारे वाहू लागले. गांधीजींनी या वातावरणाचा फायदा घेऊन ब्रिटिशांचे अन्यायकारक व जुलमी कायदे मोडण्यासाठी सविनय कायदेभंग चळवळ १९३० मध्ये सुरू केली.

ब्रिटिश व्यापारी म्हणून भारतात आले आणि राज्यकर्ते बनले. त्यांनी स्वत:ची स्वतंत्र प्रशासन व्यवस्था स्थापन केली. प्रशासनाच्या माध्यमातून राजकीय, सामाजिक, धार्मिक सुधारणे बरोबरच आर्थिक पिळवणूक, अन्याय, अत्याचारही केला. त्यांच्याबरोबर आलेल्या ख्रिस्ती मिशनने

शिक्षणप्रसाराबरोबर धर्मातरांचे धोरण अमलात आणले. इंग्रज आणि मिशनरी यांच्या सुधारणावादी धोरणामुळे भारतात नव सुशिक्षित वर्ग उदयाला आला. त्यांनी विविध सामाजिक धार्मिक संस्था वृत्तपत्रे साहित्य यांच्या माध्यमातून प्रबोधनास सुरुवात केली. तसेच नैसर्गिक संकटप्रसंगी सरकारचे धोरण तसेच अन्यायकारक जुलमी आर्थिक धोरण या विरोधात आवाज उठविला. मुंबई-पुणे या शहरात शिक्षण नोकरी निमित्ताने जाणारा तरुण वर्ग व कामगार वर्गावर तेथील घटनांचा परिणाम झाला. अशा प्रकारच्या घटना आपल्या गावी किंवा परिसरात घडविण्याचा प्रयत्न केला. याच वेळी आपल्या प्रदेशाचा उज्वल इतिहास शूर पराक्रमी व्यक्तींच्या आठवण होत असे. तशाच प्रकारे कामगिरी करावी अशी अपेक्षा व्यक्त करणारा तरुणवर्ग उदयास आला. सर्वसामान्यांमध्ये जागृती व राष्ट्रीय ऐक्याची भावना जागृत करण्याच्या उद्देशाने सार्वजनिक शिवजयंती गणेशउत्सव यासारखे कार्यक्रम अमलात आणले. त्यातून देशाच्या विरोधी असणारे ब्रिटिश सरकारचे धोरण लोकांसमोर मांडले. त्यामुळे लोकांच्यात जागृती होऊन राष्ट्रीय स्वातंत्र्य चळवळीचा उदय झाला. १९२० मध्ये टिळक युगाचा अस्त होऊन भारतीय राजकारणात म. गांधीजींचा उदय झाला. म. गांधीजींनी इंग्रजांच्या अन्यायकारक रौलेट ॲक्ट कायद्याविरोधी व इतर धोरणाविरोधी असहकार चळवळ सुरू केली.

असहकार चळवळीमध्ये संघर्षात्मक व विधायक कार्यक्रम राबविण्याचे धोरण स्वीकारले. विधायक कार्यक्रमामध्ये स्वदेशीचा पुरस्कार करून खादीचा प्रसार राष्ट्रीय शिक्षण मद्यपान निषेध अस्पृश्यांता निवारण टिळक फंड इ. कार्यक्रमाचा समावेश केलेला होता. तर संघर्षात्मक कार्य क्रमामध्ये प्रामुख्याने बहिष्काराचे तत्त्व स्वीकारले होते. रायगड जिल्ह्यामध्ये असहकार चळवळ मोठ्या प्रमाणात जरी नसली तरीही त्याचे पडसाद जिल्ह्यावर पडले होते. श्री. रामभाऊ मंडलिक श्री. माधवराव गोसावीश्री. ना. ना. पाटील श्री. रामजी लक्ष्मण घरत श्री. आत्मारामशेठ आठवणे इ. प्रमुख नेत्यांच्या मार्गदर्शनाखाली चळवळ यशस्वी करण्याचा प्रयत्न केला. असहकार चळवळीचे फलित म्हणजे रायगड जिल्ह्यात खोतांच्या विरोधात शेतकरी संघटनेचा जन्म झाला. शेतकरी संघटनेने शेतकऱ्यांवरील व कुळांवरील अन्याय दूर करण्यासाठी शेतकरी आंदोलन सुरू केले आणि त्यांना न्याय मिळवून दिला. त्याचप्रमाणे रायगड जिल्ह्यात डॉ. बाबासाहेब आंबेडकरभाई अनंतराव चित्रेश्री. सुरबानाना टिपणीस यांच्या मार्गदर्शनाखाली शेतकरी चळवळीबरोबरच सामाजिक समतेचा लढा सुरू झाला. त्यातूनच महाडचा सत्याग्रह झाला. न्यायालयाच्या निर्णयामुळे समतेच लढा यशस्वी

झाला.१९२७ मध्ये सायमन कमिशन आले.मुंबईला कमिशन उतरताच त्यांचे स्वागत "सायमन गो बॅक" या घोषणेने केले.देशभरातून कमिशनचा निषेध करण्यात आला.१९२९ च्या लाहोर अधिवेशनात "संपूर्ण स्वातंत्र्य" आणि सविनय कायदेभंग चळवळ ठराव पास झाला.२६ जानेवारी १९३० हा स्वातंत्र्य दिन पाळण्यासाठी सवाना आवाहन केले.त्याचप्रमाणे गांधीजींनी ब्रिटिशांच्याविरोधी सविनय कायदेभंग चळवळ सुरू करण्याचा आदेश जनतेला दिला.त्यानुसार देशाव्यापी चळवळ सुरू झाली.त्याचे पडसाद रायगड जिल्ह्यातही उमटले.

## संदर्भ साधने

१)मोरजे गंगाधर: महाराष्ट्रातील सांस्कृतिक परिवर्तन आणि ख्रिस्तीधर्मीय: लोकवाङ:मय प्रकाशन् मुंबई. १९९२ पृष्ठ २४

२)सरदार ग.बा(संपा) : महाराष्ट्र जीवन:

३)प्रधान ग.प्र.: स्वातंत्र्य संग्रामाचे महाभारत: साधना प्रकाशन् पुणे.१९८७ पृष्ठ ३२

४)ठोसर: कोंकण एज्युकेशन सोसायटीचा इतिहास: सेक्रेटरी को.ए.सो. प्रकाशन् महाड. १९५१ पृष्ठ ४

५)दिघे पी.डी.: महाराष्ट्रातील सामाजिक-सांस्कृतिक चळवळ: अक्षर प्रकाशन्मुंबई. १९९५ पृष्ठ ४०

६)जोग रा.श्री.: मराठी वाङ्मयाचा इतिहास खंड-४: महाराष्ट्र साहित्य परिषद्पुणे.१९७३ पृष्ठ ६५

७)लेले रा.के.:मराठी वृत्तपत्रांचा इतिहास: कॉटिटेनेन्टल प्रकाशन् पुणे.१९८४पृष्ठ १०७

८)फडके य.दि.: विसाव्या शतकातील महाराष्ट्र खंड -१: श्री विद्या प्रकाशन्पुणे.१९८९ पृष्ठ ४७

९)डॉ.देशमुख सी.डी.: दि कोर्स ऑफ माय लाईफ: १९७४ पृष्ठ ११

१०)डॉ.चौधरी के.के.: रायगड जिल्हा गॅझेटिअर : दर्शनिक विभाग महाराष्ट्र शासन् मुंबई. १९९३ पृष्ठ ५७

११)दिघे पी.डी.: उपरोक्त : पृष्ठ ५४

१२)परांजपे वामन कृष्ण: काळकर्ते शिवरामपंत परांजपे: देशपांडे प्रकाशन पुणे.१९४५ पृ.८४

१३)पर्वते त्र्य.वि.: नरसिंह चिंतामण एक महनीय व्यक्तित्त्व: मनोहर ग्रंथमाला प्रकाशन पुणे. १९७२ पृष्ठ १२

१४)प्रधान ग.प्र.: उपरोक्त : पृष्ठ ४४

१५)कुलावा जिल्हाधिकाऱ्याचे मध्यवर्ती महसूल विभागाच्या आयुक्तास पत्र -१५ जुलै १८९७

१६)बॉम्बे पोलीस ॲबस्ट्रॅक्ट ऑफ इन्टेलिजन्स - ९ नो १८९६ परि.१५६७

१७)दिघे पी.डी.:उपरोक्त : पृष्ठ ४२

१८)कित्ता : पृष्ठ ८

१९)प्रा.म्हात्रे व्यंकटेश : वीर वाजेकर : मथुरा प्रकाशन खोपटे उरण. २००५ पृष्ठ ४१

२०)बॉम्बे सिटी गॅझेटिअर खंड - २१/९०९. पृष्ठ क्र. १४३

२१)जोशी वि.श्री .: आद्य क्रांतिकारक वासुदेव बळवंत फडके यांचे चरित्र : मुंबई.दुसरी आवृत्ती १९७४ पृष्ठ १४०

२२)जोशी विष्णू श्रीधर : मृत्युंजयाचा आत्मयज्ञ : राजा प्रकाशन पुणे. १९८१ पृष्ठ ५७

२३)रिचर्ड टेंपलचे लॉर्ड लिटनला पत्र - ३ जुलै १८७९

२४)जेम्स डग्लस : बुक ऑफ बॉम्बे गॅझेट : स्टीम प्रेस मुंबई. १८८३ पृष्ठ ४३२

२५)जोशी गोविंद बाबाजी: रायगड किल्ल्याचे वर्णन: पुणे. १९२४ पृष्ठ ५०

२६)रेव्हेन्यु डिपार्टमेंट (आर.डी.) व्हॉल्यूम क्र.२९० /१९२४ पृष्ठ ५०

२७)सरदार गं.बा.: उपरोक्त : पृष्ठ ४६

२८)आर.डी.व्हॉल्यूम २७३/१८८६. पृष्ठ १६१

२९)फडके य.दि.: विसाव्या शतकातील महाराष्ट्र खंड १: के सागर पब्लिकेशन्स पुणे. २००५ पृष्ठ २२५

३०)दाते प.रा.: पेण तालुका स्वातंत्र्य सग्राम : दाते प्रकाशन पेण. १९७२ पृष्ठ ६

३१) स्वातंत्र्य सैनिक चरित्र कोश खंड -२ : पृष्ठ २४९

३२)फडके वि.कृ.: पेण तालुक्यातील क्रांतिकारक: अप्रकाशित हस्तलिखित पृष्ठ ५

३३)फडके य.दि.:उपरोक्त : पृष्ठ २६५

३४)केळकर नरसिंह चिंतामण: लो.टिळक यांचे चरित्र खंड २ : न.चिं.केळकर प्रकाशन पुणे. १९२८ पृष्ठ २२०

३५)बिपनचंद्र अमलेश त्रिपाठी (अनुवाद मा.क्रु.पारधी): स्वातंत्र्याचा लढा : नॅशनल बुक ट्रस्ट इंडिया नवी दिल्ली. १९७४ पृष्ठ ५७

३६)लोकसत्ता लोकरंग पुरवणी : डॉ.रफिक झलेरिया : १६ नोव्हेंबर १९९७

३७)आचार्य केळकर श्रीपाद:असहाराचे आंदोलन: कॉन्टिनेन्टल प्रकाशनपुणे.२००३पृष्ठ २२६

३८) डॉ.चौधरी के.के.: रायगड जिल्हा गॅझेटिअर : पृष्ठ १५८

३९)सहस्त्रबुद्धे मा.के.: कर्मयोगी रामभाऊ मंडलिक: चरित्र ग्रंथ समिती पेण.दुसरी आवृत्ती १९९१ पृष्ठ ६९

४०)कित्ता : पृष्ठ ५५

४१)पाटील प्रभाकर: कथा एका संघर्षाची: नागेश पब्लिशर्स वेश्वी-अलिवाग. १९९४पृष्ठ १६

४२)दाते प.रा.: पेण तालुका-स्वातंत्र्य संग्राम: दाते प्रकाशन पेण. १९७२ पृष्ठ ११

४३)गायकवाड देविदास(सुविधा): कर्मयोगी दादासाहेब लिमये: गायकवाड प्रकाशन देविचापाडा पनवेल. २००५पृष्ठ ५९

४४)आचार्य केळकर श्रीपाद : उपरोक्त : पृष्ठ २५५

४५)सदावर्ते प्रार्थना : पनवेल गाथा : पृ. १५०

४६)केतकर गोदावरी (संपा): कुलगुरू दादासाहेब केतकर संस्मरण ग्रंथ : पुणे विद्यार्थी गृह पुणे. १९८७ पृष्ठ २५

४७)केळकर श्रीपाद: उपरोक्त : पृ.२४२

४८)बेर्डे विश्वनाथ रामचंद्र : कै.नाना काणे चरित्र : पुणे विद्यार्थी गृह पुणे. पृष्ठ ३०

४९)सार्दक शंकर धोंडे :आचार्य भाई ढवण: आचार्य ढवण स्मृति प्रकाशन समिती अंधेरी मुंबई १९७८ पृष्ठ २५

५०)कित्ता : पृष्ठ २३

५१)आचार्य केळकर श्रीपाद : उपरोक्त : पृष्ठ २४८

५२)कित्ता - : पृष्ठ २५७

५३)पाटील प्रभाकर.: उपरोक्त : पृष्ठ १२

५४)पाटील प्रभाकर : उपरोक्त : पृ.६१.

५५)खैरमोडे चंगदेव भगवानराव : डॉ.भीमराव रामजी आंबेडकर यांचे चरित्र खंड -३ : सुगाव प्रकाशन मुंबई. १९९० पृष्ठ २१

५६)फडके य.दि.: विसाव्या शतकातील महाराष्ट्र खंड - ३ : श्रीविद्या प्रकाशन पुणे. १९९१ पृष्ठ २५६

५७)बहिष्कृत भारत - : ३ फेबुवारी १९२८

५८)गणवीर रत्नाकर(संपा) : बहिष्कृत भारतातील डॉ.आंबेडकरांचे स्फुटलेख : रत्नमित्र प्रकाशन भुसावळ. १९८१ पृष्ठ ३६

५९)घरत किशोर हरिश्चंद : उरणच्या शेतकऱ्यांचा ऐतिहासिक संग्राम: न्हावाशेवा बंदर कामगार संघटना उरण. २००२ पृष्ठ ३४

६०)सहस्त्रबुध्दे मा.के.: उपरोक्त : पृष्ठ ५९

६१)रिचर्ड कॅशमन : दि मिथ ऑफ दि लोकमान्य टिळक अॅंड मास पोलिरिक्त इन महाराष्ट्र: १९७५ पृष्ठ ४१

६२) डॉ.चौधरी के.के.: रायगड जिल्हा गॅझेटिअर: महाराष्ट्र शासन.१९९३पृष्ठ १४६

६३)अधिकारी चंद्रकांत: खोतीविरूद्धाचा उठाव : श्रीमती उषा अधिकारी प्रकाशन गोरागाव. १९९९ पृष्ठ ६४

# प्रकरण - ३ सविनय कायदेभंग चळवळ - मीठ सत्याग्रह

**सविनय कायदेभंग चळवळीची पार्श्वभूमी :**

**कायदेभंग चळवळीचा निर्णय आणि मागण्या :**

**सविनय कायदेभंग चळवळीच्या कार्यक्रमाचे स्वरूप:**

**रायगड जिल्ह्यातील मीठ सत्याग्रह:-**

१)पेण येथील सत्याग्रह शिबिर व मीठ सत्याग्रह

२)पनवेल-उलवा मीठ सत्याग्रह

३)अलिबाग तालुक्यातील मीठ सत्याग्रह

४)महाड-माणगाव-गोरेगावचा मीठ सत्याग्रह

**जिल्ह्याबाहेरील मीठ सत्याग्रहामध्ये जिल्ह्याचे योगदान :**

१)दांडीयात्रा

२)विलेपार्ले मीठ सत्याग्रह

३)धारासना मीठ सत्याग्रह

**सविनय कायदेभंग चळवळीतील संघर्षात्मक कार्यक्रम :**

१)विदेशी दारू दुकानावर व लिलावावर निरोधन कार्यक्रम

२)विदेशी कापडांवर बहिष्कार चळवळ

३)सरकारी नोकरांवर सामाजिक व आर्थिक बहिष्कार

४)सोलापूर मार्शल लॉ विरोधी सत्याग्रह

**सविनय कायदेभंग चळवळीतील विधायक कार्यक्रम :**

१)खादीप्रसार व प्रचार

२)प्रभातफेऱ्या व राष्ट्रध्वज वंदन

३)सामाजिक ऐक्याचे प्रयत्न

म.गांधीजींच्या नेतृत्वाखाली भारतीय स्वातंत्र्य चळवळीचे स्वरूप बदलून गेले होते.सत्य व अहिंसा ही तत्वे प्रमाणभूत मानून त्याच्या आधारे म.गांधीजींना ब्रिटिशांविरोधी स्वातंत्र्यलढा द्यावयाचा होता.हिंसा, रक्तपात, दंगेधोपे अगर खुनाखुनी म.गांधीजींना अभिप्रेत नव्हती.भारत देश भारतीयांचा आहे.इंग्रज हे परकीय आहेत.त्यांनी आमचे स्वातंत्र्य हिरावून घेतले आहे. इंग्रजांनी हा देश सोडून जावे.सर्व भारतीयांना स्वातंत्र्य प्राप्त व्हावे हे सत्य साकारण्यासाठी अहिंसेच्या मार्गाने म.गांधीजींनी ब्रिटिशांच्या विरोधी स्वातंत्र्यलढा देण्याचे ठरविले.त्यासाठी म.गांधीजींनी जे एकेक शस्त्र(असहकार,सत्याग्रह, सविनय कायदेभंग चळवळ) उपसले त्यास प्रारंभी अनेकजण हसले असतील.परंतु ज्या वेळी म.गांधीजींनी त्या आधारे लढा सुरू केला त्या वेळी सर्वजण आवाक झाले.ब्रिटिशांसारखा शत्रूदेखील भयचकित झाला.

व्यापारी वृत्तीच्या ब्रिटिशांनी राजकारणाबरोबर भारतीय लोकांची सामाजिक व आर्थिक पिळवणूक मोठ्या प्रमाणात केली.ब्रिटिशांच्या धोरणावर अनेक भारतीय विचारवंत व समाजसुधारकांनी जोरदार टीका केली.परंतु ब्रिटिश सरकारने त्याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केलेले दिसून येते.सरकारने जे-जे अन्यायकारक कायदे, कर भारतीयांवर लादले त्यामुळे भारतीय जनशक्ती हळूहळू एकत्र येऊ लागली.म गांधीजींनी सरकारच्या जुलमी अन्यायकारक धोरणाविरोथी व इंग्रजांना या देशातून घालवून देण्यासाठी असहकार आंदोलनाचे हत्यार उपसले. देशभरातून त्याला चांगला प्रतिसाद मिळाला.चळवळ अगदी जोमने सुरू असताना चौरीचौरा येथे हिंसात्मक घटना घडून आली.असहकार चळवळ हिंसेच्या दिशेने जाऊ लागताच म.गांधीजींनी असहकार चळवळ बंद करण्याचा निर्णय घेतला.त्याबद्दल म.गांधीजींवर अनेकांनी टीका केली. परंतु म.गांधीजींनी कुणाचेही न ऐकता चळवळ मागे घेतली.

राष्ट्रीय कॉंग्रेसच्या आदेशानुसार रायगड जिल्हा कॉंग्रेस कमिटीने सविनय कायदेभंग चळवळीचे नियोजन केले.गांधीजींचा सात कलमी कार्यक्रम जिल्ह्यात राबविण्याचा निर्णय झाला. त्यानुसार जिल्ह्यात मीठ सत्याग्रह आणि विधायक कार्यक्रम मोठ्या प्रमाणात यशस्वी करण्याचा प्रयत्न झाला.या चळवळीत रायगड जिल्ह्याच्या ग्रामीण भागातील नेते, शेतकरी, आदिवासी, स्त्रिया, व्यापारी व विविध धर्मातील सामान्य जनतेचे योगदान कसे होते? तसेच स्थानिक सविनय कायदेभंग चळवळीचे स्वरूप, नियोजन व घडून आलेला संघर्ष या संदर्भाचा अभ्यास या प्रकरणामध्ये केला आहे.

## ❖ सविनय कायदेभंग चळवळीची पार्श्वभूमी :-

राष्ट्रीय काँग्रेसने भारतात असहकार चळवळ सुरू केली तेव्हापासून भारतीय स्वातंत्र्यलढ्याचे नेतृत्व म. गांधीजींनी स्वीकारले. त्याच वेळी भारतीय स्वातंत्र्यासाठी त्यांनी काही अपेक्षा व धारणा व्यक्त केल्या. केवळ मूठभर लोकांच्या सहभागाने व बलिदानाने स्वातंत्र्यलढा यशस्वी होणार नाही. स्वातंत्र्यप्राप्तीसाठी देशातील प्रत्येक व्यक्तीने थोडातरी त्याग केला पाहिजे. स्वातंत्र्यासाठी देशातील मूठभर असामान्य व्यक्तींनी सर्वस्वाचा त्याग करावयाचा आणि इतरांनी केवळ बघ्याची भूमिका घेऊन तटस्थ राहावयाचे, ही कल्पना गांधीजींना मान्य नव्हती. प्रत्येक भारतीयाने स्वातंत्र्यलढ्यात सहभाग घेतला पाहिजे यासाठी काँग्रेसने आपल्या शाखा खेड्यामध्ये स्थापन कराव्यात त्यातून स्थानिक कार्यकर्ते तयार करावे त्यांचा स्वातंत्र्यलढ्यासाठी उपयोग करावा.[१] अशी त्यांची इच्छा होती. त्याप्रमाणे ग्रामीण पातळीवर काँग्रेसच्या अनेक शाखा स्थापान होऊन स्वातंत्र्य चळवळीला मोठ्या प्रमाणात जनतेचा पाठिंबा मिळालेला दिसून येतो.

असहकार चळवळ सुरू असताना सामुदायिक कायदेभंग चळवळ सुरू करावी अशी मागणी अनेक लोकांनी केली होते. लोकांच्या मागणीनुसार राष्ट्रीय काँग्रेसच्या वकिंग कमिटीमध्ये अनेकदा चर्चा करण्यात आली. अखिल भारतीय काँग्रेस कमिटीचे अधिवेशन ३१ मार्च ते १ एप्रिल १९२१ रोजी बेझपाडा (आंध्र प्रदेश) येथे झाले. या अधिवेशनात प्रथमच सविनय कायदेभंग चळवळी संदर्भात चर्चा करण्यात आली. अद्याप आपला देश पुरेसा शिस्तबद्ध व सुसंघटित झालेला नसल्याने चळवळ सुरू करण्यास समर्थ नाही, असा ठराव करून सविनय कायदेभंग चळवळीची परवानगी नाकारली.

असहकार चळवळीच्या अंतिम टप्प्यात कार्यकर्त्यांचा उत्साह व अपेक्षा वाढत होत्या. त्यामुळे सविनय कायदेभंग चळवळ सुरू करावी अशी लोकांची पुन्हा-पुन्हा मागणी होऊ लागली. दरम्यान १६ ऑगस्ट १९२१ रोजी पटणा आणि ४ऑक्टोंबर १९२१ रोजी मुंबईत येथे काँग्रेस वकिंग कमिटीची बैठक झाली. या बैठकीत संयुक्त प्रांतातील हरदोई जिल्हा काँग्रेस कमिटीच्या व लोकांच्या मागणीवर चर्चा झाली. देशातील वातावरण अद्यापि सविनय कायदेभंगाच्या दृष्टीने अनुकूल नाही, असा कमिटीने निर्णय घेऊन परवानगी नाकारली. यावेळी एका ठरावाद्वारे स्पष्ट केले की, विदेशी कापड बहिष्कार चळवळ अद्यापि यशस्वी झाली नाही. तसेच गरजेइतके खादीचे

उत्पादन केले जात नाही, तोपयत कोणत्याही प्रांताला किंवा जिल्ह्याला सामुदायिक सविनय कायदेभंग चळवळ सुरू करण्यास परवानगी दिली जाणार नाही.

परंतु लोकांच्या पुन्हा-पुन्हा मागणीमुळे अखिल भारतीय काँग्रेस कमिटीने ४ नोव्हेंबर १९२१ रोजी दिल्ली येथील अधिवेशनामध्ये सविनय कायदेभंग चळवळ सुरू करण्याचा निर्णय घेण्यात आला. अखिल भारतीय काँग्रेस कमिटीने एका ठरावाद्वारे जाहीर केले की, प्रांतिक काँग्रेस कमिटीने स्वत:च्या जबाबदारीवर करबंदीसह अन्य प्रकारची सामुदायिक सविनय कायदेभंग चळवळ सुरू करावी. त्याबरोबर वैयक्तिक कायदेभंगास मान्यता दिली. तसेच काँग्रेस कमिटीने असा निर्णय घेतला की, गांधीजींच्या नेतृत्वाखाली बार्डोली (गुजरात)येथून सविनय कायदेभंग चळवळीचा प्रारंभ करावा.

त्यामुळे श्री. मदन मोहन मालवीय व बॅ. जीना यांनी सरकार व असहकारवादी यांच्यामध्ये तडजोड घडवून आणण्याचा प्रयत्न केला. यासाठी १४ जानेवारी १९२२ रोजी मुंबई येथे ३०० नेत्यांची एक परिषद मदन मोहन मालवीयांनी घेतली. या परिषदेने निर्णय घेतला की,असहकार नेत्यांनी हरताळ, पिकेटिंग, बहिष्कार, स्वयंसेवक भरती, सविनय कायदेभंग चळवळ इ. कार्यक्रम स्थगित ठेवावेत. या परिषदेनंतर तीन दिवसांनी वकिंग कमिटीची बैठक मुंबईमध्ये झाली. त्यामध्ये ठराव मंजूर करण्यात आला की, मालवीयाने गोलमेज परिषद आयोजनासाठी प्रयत्न चाललेले आहेत आणि त्यातून गोलमेज परिषद निर्णयासंदर्भात जी तारीख जाहीर होईल ती तारीख किंवा निर्णय घेण्यासाठी मालवीय परिषदेला ३१ जानेवारी १९२२ पयतची मुदत दिलेली आहे. वरील दोन तारखांपैकी जी तारीख आधीची असेल तोपयत सविनय कायदेभंग चळवळ सुरू करण्यात येणार नाही.[२]

काँग्रेस वकिग कमिटीने मदन मोहन मालवीय परिषदेला दिलेली मुदत ३१ जानेवारी १९२२ रोजी संपली. त्यामुळे गांधीजींनी व्हॉईसरॉयला पत्र पाठवून कळविले की, सुरत जिल्ह्यातील बार्डोली तालुक्यामध्ये सविनय कायदेभंग चळवळ १ फेब्रुवारी १९२२ रोजी सुरू करण्यात येईल. त्यानुसार चळवळ सुरू करण्यात आली. परंतु संयुक्त प्रांतामधील गोरखपूर जिल्ह्यातील चौरीचौरा या गावी ५ फेब्रुवारी १९२२ रोजी हिंसात्मक घटना घडली. ही बातमी गांधीजींनी ८ फेब्रुवारी रोजी 'बॉम्बे क्रॉनिकल' मध्ये वाचली. ते अत्यंत दु:खी झाले. त्याच क्षणी त्यांनी चळवळ स्थगित करण्याचा निर्णय घेतला. या निर्णयासाठी ११ व १२ फेब्रुवारी १९२२ रोजी बार्डोली येथे काँग्रेस वकिग

कमिटीची बैठक बोलवून असहकार चळवळीबरोबरच सविनय कायदेभंग चळवळ मागे घेतल्याचे गांधीजींनी जाहीर केले.

## ❖ कायदेभंग चळवळीचा निर्णय आणि मागण्या :-

असहकार चळवळ स्थगित केल्यामुळे सर्व देशातून म.गांधीजींवर टीका होऊ लागली. याचा फायदा घेऊन इंग्रज सरकारने म.गांधीजींना अटक केली.त्यानंतर कौन्सिल व लोकल बोर्ड निवडणूक बहिष्कार कार्यक्रम १९२३ मध्ये राबविण्यात आला.त्याला सवानी पाठिंबा दिलेला दिसून येतो.१९१९च्या कायद्याचा आढावा घेण्यासाठी व भारतीयांना सुधारणा देण्याच्या हेतूने सायमन कमिशनची १९२७ मध्ये नियुक्ती करण्यात आली.परंतु त्यांच्या शिफारशीने भारतीयांचे समाधान झाले नाही. त्यामुळे भारतमंत्री लॉर्ड बर्कनहेड याने आवाहन केले की, सर्व पक्षांना सहमत होईल अशी राज्यघटना तयार करावी.या आवाहनानंतर भारताच्या भावी राज्यघटनेचा मसुदा तयार करण्यासाठी सर्व पक्षीय नेत्यांची परिषद डॉ.अन्सारी यांच्या अध्यक्षतेखाली १९ मे १९२८ रोजी झाली.या परिषदेत पंडित मोतीलाल नेहरू यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती स्थापन केली.नेहरू समितीने एक रिपोर्ट तयार केला.नेहरू रिपोर्टवर सर्वपक्षीय नेत्यांची डिसेंबर १९२८ मध्ये कलकत्ता येथे चर्चा होऊन तो रिपोर्ट कॉंग्रेसने स्वीकारला.नेहरू रिपोर्टची अंमलबजावणी १९२९ वर्ष संपण्यापूर्वी करावी.अन्यथा स्वातंत्र्य आंदोलन सुरू केले जाईल असा गांधीजींनी ठराव पास केला.म.गांधीजींने लॉर्ड आयर्विन यांची २३ डिसेंबर १९२९ रोजी भेट घेऊन राजकीय कैद्यांची सुटका, भारताची राज्यघटना आणि नेहरू रिपोर्ट इ.महत्त्वाच्या घटनांवर चर्चा केली.परंतु आयर्विन याने टाळाटाळ केली.पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या अध्यक्षतेखाली ३१ डिसेंबर १९२९ रोजी लाहोर येथे रावी नदीकाठी अधिवेशन भरले.या अधिवेशनात सविनय कायदेभंग चळवळीचा प्रस्ताव गांधीजींनी एका ठरावामार्फत मांडला.त्यास कमिटीने मंजुरीही दिली.चळवळ केव्हा? व कशी करावयाची? याचे सर्व अधिकार कॉंग्रेस वकिंग कमिटीला देण्यात आले.कायदेभंग चळवळीचा कार्यक्रम निश्चित करण्याचे अधिकार वकिंग कमिटीने म.गांधीजींना २ जानेवारी १९३० रोजी दिले.या अधिवेशनातील ठरावानुसार सर्व देशाने २६ जानेवारी १९३० हा दिवस स्वातंत्र्य दिन म्हणून मोठ्या उत्साहाने साजरा करावा असे जाहीर केले.लोकांमधील उत्साह पाहून गांधीजींनी लॉर्ड आयर्विन यांना पत्र पाठवून आपल्या ११ मागण्या सादर केल्या **.त्या मागण्या पुढीलप्रमाणे**

१) शेतसारा निम्मा कमी करावा . त्यावर कायदेमंडळाचे नियंत्रण राहावे .

२) मिठावर कोणताही कर लावू नये .

३) मोठमोठ्या नोकरांचे पगार निम्मे कमी करावेत .

४) सैनिक खर्चात कमीत कमी ५० % कपात करावी .

५) विदेशी कापडाची आयात रद्द करावी .

६) भारताचा समुद्रकिनारा हा भारतीय जहाजांसाठी सुरक्षित करावा .

७) राजकैद्यांची सुटका करून त्यांच्यावरील सर्व खटले मागे घ्यावेत .

८)सी . आय . डी . विभाग रद्द करण्यात यावा किंवा तो जनतेच्या नियंत्रणासाठी ठेवण्यात यावा .

९) आत्मरक्षणासाठी हत्यार बाळगण्याचे लायसेन्स दिले जावेत .

१०) सर्वत्र दारूबंदी करण्यात यावी .

११) विनिमयाचा दर कमी करून १ शिलिंग ४ पेन्स करण्यात यावा .

### ❖ सविनय कायदेभंग चळवळीच्या कार्यक्रमाचे स्वरूप :-

म . गांधीजींच्या मागण्यांचा विचार लॉर्ड आयर्विन यांनी केला नाही . परिणामी काँग्रेस वकिग कमिटीची १४, १५, १६ फेब्रुवारी १९३० रोजी साबरमती येथे बैठक झाली . त्यामध्ये राष्ट्रीय स्तरावर सविनय कायदेभंग चळवळ सुरू करण्याचा निर्णय घेण्यात आला . याच वेळी सविनय कायदेभंग चळवळीच्या कार्यक्रमाची रूपरेषा ठरविण्यात आली . ज्येष्ठ काँग्रेसजनांच्या मार्गदर्शनाखाली सर्व स्वयंसेवक सर्व प्रकारची कामे करीत असत . सामान्यांना आंदोलनासाठी प्रवृत्त करणे, इंग्रज सरकारला वेठीस धरणे, सरकारी अधिकाऱ्यांवर प्रभाव पाडणे आणि स्वातंत्र्य आंदोलनाचा अजिबात स्पर्श न झालेल्या बांधवांना काँग्रेसच्या प्रभावक्षेत्राखाली आणणे . यासाठी काँग्रेसने सविनय कायदेभंग आंदोलनाचा सात कलमी कार्यक्रम ठरविला .

१) मीठ कायद्याचा भंग करून स्वदेशी मीठ तयार करणे व विकणे .

२) रौलेट कायद्याचे उल्लंघन करणे, फी न भरता गायरानातील गवत कापणे, गुरे चारणे, इमारती व जळाऊ लाकुड प्राप्त करणे .

३) दारूच्या दुकानांवर व लिलावावर निरोधन (पिकेटिंग )करून ग्राहकांना परावृत्त करणे .

४) विदेशी कापडावर बहिष्कार टाकणे व खादीचा प्रसार करणे .

५) राष्ट्रध्वज वंदन व प्रभातफेऱ्या काढणे .

६) क्रिमिनल प्रोसिजर कोडच्या कलम १४४ चा भंग करून जमाव वंदी हुकूम मोडणे.

७)सरकारी नोकरांवर सामाजिक बहिष्कार व आर्थिक नाकेबंदी करणे.त्याबरोबर अस्पृश्यता निवारण

काँग्रेस वकिंग कमिटीने प्रांतीय काँग्रेसला वरीलप्रमाणे सविनय कायदेभंग चळवळीच्या कार्यक्रमाचे स्वरूप कळविले.त्यानुसार चळवळ सुरू करण्याचे आदेश दिले.या आदेशानुसार देशात सर्वत्र चळवळ सुरू झाली.या चळवळीत रायगड जिल्हाही सहभागी झालेला होता.रायगड जिल्हा काँग्रेस कमिटीच्या नेतृत्वाखाली सात कलमी कार्यक्रमानुसार सविनय कायदेभंग चळवळ सुरू करण्यात आली.

## ❖ रायगड जिल्ह्यातील मीठ सत्याग्रह:-

राष्ट्रीय काँग्रेसच्या लाहोर अधिवेशनात पंडित जवाहरलाल नेहरूंच्या अध्यक्षतेखाली 'संपूर्ण स्वातंत्र्याचा' ठराव मंजूर करण्यात आला.त्यानुसार २६ जानेवारी १९३० रोजी स्वातंत्र्य दिन साजरा करण्याचे आदेश सर्व काँग्रेस कमिटींना देण्यात आले.सर्व देशभर या चळवळीसाठी एक प्रकारे चैतन्यमय वातावरण तयार झाले होते.रायगड जिल्हाही या चळवळीत सक्रिय झालेला दिसून येतो.'स्वातंत्र्य दिन साजरा करा' हा काँग्रेस कमिटीने दिलेला आदेश वाचून दाखविण्यासाठी २६ जानेवारी १९३० रोजी पेण येथे श्री.आप्पासाहेब देव यांच्या वाड्यात सभा झाली.या सभेचे अध्यक्ष रामभाऊ मंडलीक होते.यावेळी स्थानिक पुढाऱ्यांनी भाषणे केली.शेवटी श्री.रामभाऊ मंडलीक यांचे भाषण झाले.त्यानंतर म.गांधीजींचा 'कायदेभंग चळवळीस निघा' हा संदेश वाचून दाखविण्यात आला.[३] रायगड जिल्ह्यातील कायदेभंग चळवळीच्या नियोजनासाठी महाराष्ट्र प्रांतिक काँग्रेस कमिटीने श्री.ग.वि.केतकर,श्री.रामभाऊ मंडलीक, श्री.हरीभाऊ जोशी, श्री.कमलाकर सुमंत व श्री.न.चिं.केळकर यांची निवड केलेली होती.

महाराष्ट्र प्रांतिक काँग्रेसच्या आदेशाला साथ देण्यासाठी रायगड जिल्हा काँग्रेस कमिटीने कायदेभंग चळवळीचा निर्णय घेतला.कायदेभंग चळवळीसाठी जिल्हा काँग्रेसने पनवेल येथे २ एप्रिल १९३० रोजी श्री.बाळासाहेब पटवर्धन यांच्या उन्हाळी मांडवात(फक्त उन्हाळ्यात सावलीसाठी घातलेला मांडव) सभा घेतली.या सभेस श्री.रामभाऊ मंडलीक,श्री.ग.वि.केतकर, श्री.बाळासाहेब पटवर्धन, श्री.गेंदुकाका पटवर्धन, श्री.शंभूशेट, श्री.भाऊसाहेब जाईल इत्यादी प्रमुख मंडळी उपस्थित होती.या सभेमध्ये जिल्हा सत्याग्रह समिती स्थापन करून त्याचे अध्यक्ष म्हणून पळस्पे गावचे श्री.विनायकराव गोविलकर यांची निवड करण्यात आली.तसेच पेण येथे

सत्याग्रह शिबिर घेण्याचे ठरले.शिबिर यशस्वी होण्यासाठी श्री.चिंतामणशास्त्री जोशी, श्री. आप्पासाहेब वेदक, श्री.रामभाऊ मंडलीक,श्री.नानासाहेब वेडेकर, श्री.नानासाहेब कुंटे इ. स्थानिक नेत्यांनी अनेक ठिकाणी सभा घेऊन प्रचार केला.त्यामुळे कायदेभंग चळवळी संदर्भात मोठ्या प्रमाणात लोकजागृती झाली.[४] रायगड जिल्ह्यातील १९३० च्या स्वातंत्र्यलढÝाचे नेतृत्व रामभाऊ नारायण मंडलीक यांच्याकडे होते.तर जिल्ह्याच्या चळवळीचे केंद्र पेण हे होते.त्यामुळे या काळातील सर्व निर्णय पेणमधूनच घेतले जात असत.

म.गांधीजींच्या आदेशानुसार संपूर्ण देशात सविनय कायदेभंग चळवळीस प्रारंभ झाला.या चळवळीचा एक भाग म्हणून मीठ सत्याग्रह करण्याचे ठरविण्यात आले.रायगड जिल्ह्याला समुद्रकिनारा असल्याने अनेक ठिकाणी मीठ बनविण्याचे उद्योग व मोठमोठी मिठागारे सुरू होती.इंग्रजांच्या अन्यायकारक करपद्धतीला विरोध करण्यासाठी जिल्ह्यात मीठ सत्याग्रह सुरू करण्यात आला.प्रामुख्याने पेण, पनवेल, अलिबाग, महाड, माणगाव, गोरेगाव इत्यादी गावात व त्यांच्या आसपासच्या खेड्यामधून मीठ सत्याग्रह करण्यात आला.

## ➢ पेण येथील सत्याग्रह शिबिर व मीठ सत्याग्रह :-

सागरी पाण्यापासून मीठ तयार करण्याचा व्यवसाय सागरी किनाऱ्यावरील लोक करीत असत.ब्रिटिश सरकारने मीठ उत्पादनावर कर आकारल्यामुळे त्याचा मीठ व्यवसायावर फार मोठा परिणाम झाला.ब्रिटिश सरकारच्या या अन्यायकारक धोरणाविरुद्ध म.गांधीजींनी १९३० मध्ये सविनय कायदेभंग चळवळीचा आदेश दिला.या चळवळीचा एक भाग म्हणून मीठ सत्याग्रहासाठी जनतेला हाक दिली.त्याला सर्व देशातून मोठ्या प्रमाणात प्रतिसाद मिळाला.यामध्ये रायगड जिल्हा उत्साहाने सहभागी झालेला दिसून येतो.

रायगड जिल्हा काँग्रेसच्या वतीने सविनय कायदेभंग चळवळीची सुरुवात करण्यात आली.याचा एक भाग म्हणून जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्याला निमंत्रण दिले.मीठ सत्याग्रहासाठी रायगड जिल्हा काँग्रेसच्या वतीने पेण येथे एक शिबिर घेण्यात आले.हे शिबिर पेणमधील दातार आळीतील श्री.रंगोपंत लिमये यांच्या गिरणीच्या इमारतीमध्ये ८ एप्रिल १९३० रोजी सुरू झाले.या शिबिरासाठी प्रारंभीस ८६ सत्याग्रही हजर होते.[५] त्यामुळे रायगड जिल्ह्यातून अनेक स्थानिक पुढारी ८ एप्रिलपासून पेणमध्ये जमू लागले.त्यामध्ये महाडचे श्री.पितांबरभाई पालीचे श्री.बापूसाहेब लिमये अलिबागचे श्री.भाऊसाहेब लेले श्री.माधवराव लिमये वकील गोरेगावचे श्री.शहा व्यापारी

पनवेलचे श्री.आत्माराम आठवले श्री.बाळासाहेब पटवर्धन श्री.नानासाहेब बेडेकर इ. मंडळी होती.महाराष्ट्र प्रांतिक काँग्रेस कमिटीने या शिबिराचे प्रमुख म्हणून रामभाऊ मंडलीक यांची निवड केली.त्यांनी सर्व स्तरावर प्रयत्न करून शिबिराचे नियोजन केले.शिबिराच्या कार्यक्रमाची सुरुवात श्री.न.चिं.केळकर यांच्या हस्ते झेंडा वंदनाने झाली.शिबिरासाठी आर्थिक मदत प्रसिद्ध व्यापारी श्री.हेमचंदभाई यांनी केली. त्याचप्रमाणे शिबिराचे सर्व व्यवस्थापन श्री.विनायक कृष्णा फडके यांनी केले.

१४ एप्रिल १९३० पासून दररोज रात्री पेणमध्ये हनुमान व्यायामशाळेच्या पटांगणावर जाहीर सभा होत असत.या सभेस बाहेरगावचे पुढारी येत असत.यावेळी श्री.बुवासाहेब गोसावी आचार्य भागवत श्री.मसुरकर महाराज श्री.केशवराव जेधे श्री.गंगाधर गाडगीळ श्री.न.ग. गोरे श्री.अनंतराव कटकोळी श्री.कमलाकर सुमंत या नेत्यांची चळवळीसंदर्भात भाषणे झाली. वरील सर्व नेत्यांना अटक होऊन शिक्षा झाली.रायगडचे भीष्माचार्य श्री.रामजी लक्ष्मण घरत यांनी १९ एप्रिल रोजी शिबिराला भेट दिली.

चैत्र कृष्ण ११ गुरूवार(२८एप्रिल १९३०)या दिवशी पेणमध्ये खाडीच्या काठी मीठ सामुदायिक सत्याग्रह नाना काणे यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आला.या सत्याग्रहासाठी आसपासच्या खेड्यातून शिक्षित, अशिक्षित, लहान-थोर स्त्री-पुरुष मिळून सात हजार लोकांचा जनसमुदाय खाडीकाठी शिस्तीने व शांतपणे जमा झालेला होता.नाना काणे यांनी अत्यंत परिणामकारक भाषण केले.यावेळी सर्व अबालवृद्ध स्त्री-पुरुषांनी मीठ सत्याग्रहात सहभाग घेतला.

३० एप्रिल रोजी सत्याग्रहासाठी कापूर बागेकडे दुपारी मिरवणूक निघालेली होती. सुरुवातीस श्री.रामभाऊ मंडलीक यांनी शिबिराच्या आवारात झेंडावंदन केले.त्यामुळे श्री. मंडलीक, ग.वि.केतकर यांना अटक झाली.ठरल्याप्रमाणे मिरवणूक कापूर बागेत शिरली.या मिरवणुकीत पेण महाड सासवने अलिबाग इ.ठिकाणचे हजारो लोक सहभागी झाले होते. खाडीतील खारे पाणी आणण्यासाठी न.चिं.केळकरांच्या नेतृत्वाखाली सत्याग्रहींची निवड करण्यात आली होती.त्यामध्ये सर्वात पुढे श्री.चिंतामणशास्त्री श्री.दामलेमास्तर श्री.चुनीलाल मेहता होते.सवाच्या कपाळी कुंकूम तिलक लावला होता.प्रत्येकाच्या हातात एक कुंभ होते.सुवासिनीने पंचारतीने त्यांची ओवाळणी केली.श्री न.चिं.केळकर व काही सेवकांनी खारे पाणी आणून

चूलीवरच्या कढईत टाकून मीठ तयार केले.'नमक का कायदा तोड दिया' ही प्रचंड गर्जना हजारो मुखातून निघाली.सत्याग्रह यशस्वी पार पडल्यानंतर श्री.केळकर पुण्याला गेले.[६] पेणचा पहिला वर्ग मॅजिस्ट्रटने श्री.केतकर व श्री.मंडलीक यांना १ मे रोजी नऊ महिन्यांची साध्या कैदीची शिक्षा दिली.२ मे रोजी आचार्य भागवत सत्याग्रह करणार होते.परंतु त्यांना पकडून एक वर्षाची सक्त मजुरीची शिक्षा देण्यात आली.या सत्याग्रहासाठी श्री.कमलाकर सुमंतने २६ सत्याग्रहींना आणले होते.अहमदनगरचे श्री.चौधरी यांच्याबरोबर ३० सत्याग्रही आले होते.श्री.कमलाकर सुमंत, श्री.अनंतराव कटकोल यांनाही पकडण्यात आले.यानंतर पेण, अलिबाग, पनवेल येथे मीठ सत्याग्रह सुरू करण्यात आले.श्री.रामभाऊ मंडलीक यांनी श्री.विनायक नारायण उर्फ दादासाहेब लिमये यांची शिबिराधिपती व श्री.जनार्दन केशव दामलेमास्तर यांची व्यवस्थापक म्हणून नियुक्ती केले.

सत्याग्रहाच्या वेळी अनेकांनी मदत केलेली होती. श्री.रंगो वामन लिमये यांनी आपली गिरणी व श्री.कृष्णाजी पांडुरंग साठे यांनी आपली कापूरबाग सत्याग्रह चळवळीसाठी वापरू दिली.सरकार ते जप्त करेल याचा विचार त्यांनी केला नाही.पेणच्या सर्व जाती, धर्माच्या लोकांनी मुक्तहस्ताने शिबिरासाठी देणग्या दिल्या.त्यामध्ये कासूचे कानकिया, दुशमीचे व गोगाद्याचे जमीनदार व इनामदार, वावोशीचे श्री.रंगो रावजी टिळक, पेणचे व्यापारी श्री.हेमचंद्र शहा यांनी मोठ्या प्रमाणात आर्थिक मदत केली होती.[७] दरम्यानच्या काळात महाराष्ट्र प्रांतिक कॉंग्रेस कमिटीने वडाळा, शिरोडा इ.ठिकाणच्या सत्याग्रहासाठी सत्याग्रहींना बोलविण्यात आले.त्यामुळे पेणच्या शिबिरातील सत्याग्रही गेल्याने ते आपोआप बंद झाले.

### ➢ पनवेल-उलवा मीठ सत्याग्रह :-

म.गांधीजींनी सविनय कायदेभंग चळवळीचा आदेश दिल्यानंतर मुंबईमध्ये श्री.बाळासाहेब खेर, श्री.जमनालाल मेहता, श्री.नरिमन, श्री.युसुफ मेहर अली इ.अनेक नेत्यांनी भाषणे देण्यास सुरुवात केली.त्यामुळे इंग्रज राजवटीविरुद्ध वातावरण तापू लागले.म. गांधीजींच्या नेतृत्वाखालील चळवळीने श्री.प्रभाकर गुप्ते भारावून गेले होते.त्यांनी या लढ्यात सक्रिय भाग घेतला.गुप्ते देशप्रेमाने प्रेरित होऊन त्यांनी विल्सन कॉलेजला रामराम देऊन मूळगावी पनवेलला आले.पनवेल येथे श्री.प्रभाकर गुप्ते व श्री.मधू चिटणीस यांनी मीठ सत्याग्रह करण्याचा निर्णय घेतला. त्यानुसार मंगळवार दि.८ एप्रिल १९३० रोजी उलव बंदरातून मिठाच्या

पिशव्या भरून आणल्या. कस्टम शिपायाने त्यांना पकडून कस्टम कचेरीत कैद केले. शेवटी मारपीट करून सोडून दिले. ही बातमी पनवेल शहरात पसरली व हजारो लोक कचेरीसमोर जमा झाले. हा पनवेलचा पहिला मीठ सत्याग्रह होता. या घटनेने पनवेलच्या स्वातंत्र्य चळवळीला प्रारंभ झाला. लोकांनी म. गांधी, पंडित नेहरू, प्रभाकर गुप्ते, मधू चिटणीस यांच्या नावाचा जयजयकार केला. या जनसमुदायासमोर प्रभाकर गुप्ते यांनी भाषण केले की, "स्वातंत्र्याकडे नेणारा अंतिम लढा आज सुरू झाला आहे. यज्ञकुंड पेटणार आहे. आहुती देण्यास सिद्ध व्हा." आज रात्री टेनिस कोर्टाच्या आवारात सभा होईल असे जाहीर केले.[८]

९ व १० एप्रिल रोजी श्री. रामभाऊ मंडलीक व श्री. ग. वि. केतकर पनवेलला आले. त्यांनी श्री. प्रभाकर गुप्ते व श्री. मधू चिटणीस यांना शाबासकी दिली व श्री. बाळासाहेब पटवर्धन यांच्या घरी बैठक घेतली. त्या वेळी त्यांनी पनवेल येथे काँग्रेस कमिटीची स्थापना करा व कार्य करा असे सांगितले. पनवेल तालुका सत्याग्रह समितीची स्थापना झाली. समितीचे अध्यक्ष म्हणून विनायकराव गोविलकर यांची निवड करण्यात आली. श्री. प्रभाकर गुप्ते यांनी १२ एप्रिल रोजी प्रचारक दलाची संघटना उभी केली. या संघटनेमध्ये श्री. प्रभाकर गुप्ते, श्री. मधू चिटणीस, श्री. चिंतामण शृंगारपुरे, श्री. बाळा अधिकारी, श्री. पांडू काळण, श्री. राजू साठे, श्री. बबन प्रधान, श्री. नाना खरे, श्री. बाबुराव आपटे, श्री. मदन मानकामे, श्री. शंकर पांडव, श्री. नथू पांडव, श्री. दामू म्हात्रे, श्री. बुक्या काका, श्री. बाळ गडकरी, श्री. शंकर खरे, श्री. रामकृष्ण आपटे इ. मंडळी स्वयंसेवक होते.[९] त्यातील अनेकांनी मुसलमान मोहल्ल्यात भाषणे करून त्यांच्यात जागृती केली. मुंबईतील जमानीत-उल-उलेगा या मुस्लीम संघटनेचे प्रतिनिधी पनवेलला आले. त्यांनी पनवेलच्या मुस्लीम समाजात जागृती केली. त्यामुळे पनवेलमधील मुस्लीम समाज या आंदोलनात सामील झाला. खाजा करैगी, इस्माइल मस्ते, नुरुद्दीन फकारमिया, असगरी इब्राहिम ही तरुण मंडळी स्वयंसेवक दलात सहभागी झालेली होती.

पनवेल येथे दुसरा मीठ सत्याग्रह १३ एप्रिल १९३०रोजी घडून आला. श्री. रामभाऊ मंडलीक व श्री. ग. वि. केतकर मुंबईवरून पेणला चळवळीच्या कामानिमित्त जात असताना पेणची गाडी चुकल्याने त्यांनी पनवेलला मुक्काम केला. त्या दिवशी म्हणजे १२ एप्रिल रोजी उलव बंदरावर जाऊन पाहणी केली. त्यानंतर त्यांनी दुसऱ्या दिवशी १३ एप्रिल रोजी पार्ल्याहून आणलेल्या मिठाची विक्री पनवेलमध्ये केली. पारले मीठ पैशाला पुडी याप्रमाणे ५ हजार मिठाच्या पुड्या विकल्या.

त्याच रात्री म्हणजे १३ एप्रिल रोजी रामभाऊ मंडलीक आपल्या सहकाऱ्यांना घेऊन उलवा बंदरावर रात्री १ वाजता गेले आणि मीठ सत्याग्रह केले. हा पनवेलचा दुसरा मीठ सत्याग्रह होय. यावेळी पनवेलकरांनी मोठ्या संख्येने सहभाग घेऊन आपली देशभक्ती दाखवून दिली.

पनवेलचा महिला वर्गही या राष्ट्रीय चळवळीत सहभागी झाला होता. विमल गुप्ते यांनी एक महिला स्वयंसेविका दल तयार केले होते. या महिला स्वयंसेविका दलामध्ये प्रामुख्याने अम्बू दामले, स्नेहा वेंद्रे, सौ. मंदा आपटे इ. महिला सहभागी झाल्या होत्या. पनवेलमध्ये जनजागृती व्हावी म्हणून तेथील स्वयंसेवक व स्वयंसेविका दलांची प्रभातफेरी निघत असे. ही प्रभातफेरी शेवटी काँग्रेस कचेरीपुढील राष्ट्रध्वजाला मानवंदना करून विसर्जन होत असे.

पनवेल आणि परिसरात कायदेभंग चळवळीच्या प्रचाराचे नियोजन प्रभाकर गुप्ते यांनी केले होते. पनवेल तालुक्यातील गावांचा संपर्क जोडण्यासाठी व काँग्रेसचा संदेश तालुक्याच्या सर्व कानाकोपऱ्यापर्यंत पोहोचविण्यासाठी त्यांनी मुख्य व उपरस्त्यांची माहिती घेऊन नकाशा तयार केला होता. त्याच्या आधारे गावोगावी प्रचार करण्याची जबाबदारी सर्व पथकांवर सोपविली. हे प्रचाराचे कार्य १५ एप्रिलपासून सुरू झाले. हे स्वयंसेवक सायकलवरून पायी प्रवास करून गावोगावी फिरून रात्री १० वाजेपयत परत येत असत. प्रत्येक पथकाबरोबर राष्ट्रध्वज असे पथक दिसले की लोक म्हणत असत की गांधी बाबांची माणसे आली आणि सर्वजण उत्साहाने एकत्र जमत असत. लोक देवळात वडाच्या किंवा पिंपळाच्या पारावर जमत व तेथे सभा होत असत. त्याच वेळी काँग्रेस सभासद नोंदणी विनामूल्य केली जाई. प्रमुख सभांमध्ये श्री. नाना खरे श्री. बाबुराव आपटे श्री. किसन आपटे श्री. राजू साठे ही मंडळी भाषणे करीत असत. शिरोडा सत्याग्रहाहून धुळ्याच्या सेवादलांचे एक स्वयंसेवकांचे पथक पनवेलला आले. ते आठ दिवस पनवेल येथे होते. श्री. बाळासाहेब पटवर्धन यांच्याकडे त्यांच्या राहण्याची व जेवणाची सोय केली होती. 'चरखा चला चला के स्वराज्य लेंगे ' या गीताऐवजी 'नही रखनी नही रखनी जालिम सरकार नही रखनी' हे नवे गीत पनवेलकरांनी प्रथमच ऐकले.

श्री. प्रभाकर गुप्ते आणि त्यांचे सहकारी श्री. चिंतामण शृंगारपुरे श्री. मधू चिटणीस असगर अली हे २५ मे १९३० रोजी पोयंजे विभागातून प्रचार करून घरी आले. प्रभाकर गुप्ते यांना काँग्रेस हाउसवर त्वरित बोलविण्यात आले. कारण स्वधर्म पत्राचे संपादक श्री. हरीभाऊ जोशी हे आले होते ते दुसऱ्या दिवशी मीठ सत्याग्रह करणार आहेत. गुप्ते व जोशी यांची ही

पहिलीच भेट होती. त्याच रात्री टेनिस कोर्टाच्या आवारात सभा झाली. २६ मे रोजी हरीभाऊ जोशी मीठ सत्याग्रह करणार हे जाहीर करण्यात आले. सभा संपल्यानंतर नाक्यानाक्यावर सत्याग्रहाचे फलक लावले. स्वयंसेवकांनी पनवेल आणि आसपासच्या ३ मैलांच्या परिसरातील गावामध्ये दवंड्या पिटवून हरीभाऊ जोशींच्या मीठ सत्याग्रहाचा प्रचार केला.

उलवा बंदर किनाऱ्यावर मीठ तयार करण्याचे ठरविण्यात आले. त्यानुसार २६ मे रोजी दुपारपासून तयारी सुरू झाली. व्यासपीठ म्हणून वाळूचा एक उंचवटा तयार करण्यात आला. त्याच्यासमोर २०-२५ फुटावर गोवऱ्या व लाकडे रचून सत्याग्रहासाठी यज्ञकुंड तयार केले. त्यावर एक मोठे मडके ठेवले. पनवेलमधून ४ वाजता मिरवणूक उलवा बंदराकडे निघाली. मिरवणुकीमध्ये सवात पुढे स्वयंसेवक महिला स्वयंसेविका विद्यार्थी तरुण गावकरी शेतकरी सहभागी झाले होते. स्थानिक प्रतिनिधी व्यापारी वर्गाचाही सहभाग होता. ही मिरवणूक उलवा बंदराकडे आली व तिचे सभेत रूपांतर झाले. जमलेल्या ४ हजार लोकांसमोर हरीभाऊ जोशी यांनी भाषण केले. गांधीजींनी मिठाचा सत्याग्रह का पुकारला? याचे स्पष्टीकरण सांगितले. या प्रसंगी ते म्हणाले की 'ब्रिटिश साम्राज्याची चिताच आपण पेटविली आहे. अशाच चिता पेटत राहतील. अखेर ब्रिटिश साम्राज्याची रक्षादेखील वाऱ्यावर उडून जाऊन भारतावर तिचा कणही शिल्लक राहणार नाही'.[११] श्री. हरीभाऊ जोशींचे भाषण चालू असताना स्वयंसेवकांनी खारे पाणी आणून मोठ्या मडक्यात पाणी भरले. पोलिसांनी श्री. हरीभाऊ जोशींना कैद केले. सत्याग्रहाच्या साहित्याचा पंचनामा करून जप्त केले. २७ मे रोजी हरीभाऊंवर मीठ कायदा मोडण्याचा व प्रक्षोभक भाषण केल्याचा खटला सुरू झाला. 'गुन्हा कबूल की ना कबूल' असे मामलेदाराने विचारले असता श्री. हरीभाऊने उत्तर दिले की "गांधीजींच्या आज्ञेनुसार मी एका जुलमी कायद्याचा भंग करून माझे कर्तव्य बजावले आहे". त्यानंतर मामलेदाराने पोलिसाच्या व पंचाच्या साक्षीनुसार हरीभाऊ जोशींना ६ महिने सक्त मजुरीची शिक्षा देण्यात आली. दुपार नंतर त्यांची रवानगी ठाणे तुरुंगात करण्यात आली. त्या वेळी जमलेल्या स्त्री-पुरुषांच्या जमावाने हरीभाऊंचा जयजयकार करीत निरोप दिला. पनवेलमध्ये विधीयुक्त झालेला हा पहिला मीठ सत्याग्रह होता [१२].

## ➢ अलिबाग तालुक्यातील मीठ सत्याग्रह :-

म. गांधीजींनी 'मीठ सत्याग्रह' व 'दांडी मोर्चाची' घोषणा केली. त्यामुळे देशभरातील सर्व कार्यकर्त्यामध्ये विशेषत: तरुणांमध्ये नवचैतन्य निर्माण झालेले दिसू लागले. जिल्हा काँग्रेस कमिटीने

मीठ सत्याग्रह करण्याचे ठरविले. त्यानुसार सर्व तालुका काँग्रेस कमिटींना आदेश दिले. अलिबाग जिल्हा काँग्रेस कमिटी व तालुका काँग्रेस कमिटीने संयुक्तपणे अलिबाग येथे 'सत्याग्रह शिबिर' आयोजित केले. सध्याची तालुका पंचायतीची इमारत आहे त्या ठिकाणी हे शिबिर घेण्यात आले. त्या वेळी या जागेवर व्यायामशाळा होती. अलिबाग येथे समुद्रकिनारा असल्याने मीठ सत्याग्रहाचे नियोजन करण्यात आले होते. यासाठी जिल्ह्याबाहेरील सत्याग्रहींच्या तुकड्या आल्या होत्या. त्यामध्ये बागलाण, धुळे, सोलापूर येथून सत्याग्रही आले होते. त्यांची राहण्याची व जेवणाची सोय शिबिराच्या व्यवस्थापकाने केली होती. बाहेर गावावरून आलेल्या सत्याग्रहींना भाताची सवय नसल्याने त्यांना ज्वारी, बाजरीच्या भाकरी द्याव्या लागत असत. त्यामुळे अलिबागमधील प्रत्येक गुजराती व्यापारी एक दिवशी धान्य देत असे. या शिबिराची जेवणव्यवस्था श्री. द. श. गोडबोले व श्री. ग. भा. पंडित यांच्याकडे होती. जेवण वाढत असताना पेणचे दामलेमास्तर (जनुभाऊ) शिबिराच्या ठिकाणी आले होते. त्यांनी गोडबोलेंना शिक्षण विचारल्यानंतर त्याला सल्ला दिला की, तुम्ही शिकलेल्या मंडळींनी खेड्यात जाऊन प्रचाराचे कार्य करावे. जेवण वाढण्याचे काम दुसरे कोणीही करेल.[१३]

दामलेमास्तरांच्या सल्ल्यावरून श्री. द. श. गोडबोले व श्री. ग. भा. पंडित यांनी प्रचार कार्याला सुरुवात केली. यावेळी अलिबाग ते रेवस आणि अलिबाग ते धरमतर अशी मोटार सर्व्हिस होती. त्यामधून सत्याग्रहींना विनामूल्य प्रवास करण्याची परवानगी होती. श्री. गोडबोले व श्री. पंडित यांनी चोंढी, किहीम गावात जाऊन प्रभातफेरी काढली. तेथून रेवस, कावाडे, हाशिवरे, कामार्ले, सातघर, वाघ्रण गावापयत प्रचार केला. तसेच गावात फेरी मारून, दवंडी देऊन, रात्री अलिबाग येथे भाऊसाहेब लेले व वा. गो. लिमये यांचे व्याख्यान असल्याचे जाहीर केले. गावामध्ये प्रभातफेरीची गाणी आणि 'नही रखनी, नही रखनी, यह जालिम सरकार नही रखनी' असा प्रचार केला. या प्रभातफेरीमध्ये शाळेतील मुलेही सहभागी झाली. प्रचार संपल्यानंतर जात-पात न मानता सर्व एकत्र जेवत असत. यावेळी सर्व जबाबदारी वाघ्रणचे दामोदर नारायण पाटील या तरुणाने स्वीकारली होती. रायगड जिल्ह्यात त्यांना दामूअण्णा पाटील या नावाने ओळखले जात होते. नारायणराव पाटील या सरकारी नोकराच्या आग्रहामुळे संध्याकाळी वाघ्रण येते जाहीर सभा झाली. दुसऱ्या दिवशी माणकुळे गावात प्रभातफेरी काढली. त्यामध्ये लहान मुले सहभागी झाली होती. दुपारी धरमदास शहा उर्फ धर्माशेठ यांनी जेवण दिले. त्यानंतर खारेपाटातील शाहपूर, धेरंड, कोपरा,

खिडकी लेभी या गावातून प्रभात फेऱ्या काढण्यात आल्या. अशा प्रकारे अलिबाग तालुक्यातील गावामधून श्री. द. श. गोडबोले श्री. ग. भा. पंडित श्री. द. का कुंटे आणि त्यांचे शाळकरी मित्रांनी प्रभातफेरीच्या सभेच्या माध्यमातून प्रचार केला.

तालुका काँग्रेस कमिटीने अलिबागमध्ये मीठ सत्याग्रहाची तयारी केली. बाहेरगावावरून येणाऱ्या सत्याग्रहींची आणि शिबिरासाठी येणाऱ्या वक्त्यांच्या सर्व प्रकारच्या सोई स्थानिक वकील मंडळी करत असत. त्यातील बराच खर्च श्री. भाऊसाहेब लेले स्वत:च करीत असत. एक दिवशी पैसे संपल्यामुळे श्री. द. श. गोडवोल्यांनी तालुका काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष वामनराव लिमये यांची भेटून घेऊन अडचण मांडली. यावर लिमये यांनी उत्तर दिले की "सत्याग्रह बंद करून सत्याग्रहींना परत जाण्यास सांगा. कारण जिल्ह्यातील इतर तालुका कमिट्या बेकायदेशीर ठरविल्या आहेत. आम्हाला आमची तालुका कमिटी बेकायदेशीर ठरवायची नाही." त्यानंतरही श्री. गोडबोले आर्थिक मदतीसाठी फिरत राहिले. त्या वेळी श्री. भाऊसाहेब लेले यांनी स्वत:चे २० रु दिले. श्री. वसंत रघुनाथ आंबेरकर श्री. वि. त्र्य. देवधर यांनी १०० रु जमवून दिले. पनवेलहून श्री. त्र्य. ना. बेडेकर व श्री. प्रभाकर गुप्ते यांनी १०० रु पाठविले.[१४]

अलिबागच्या सत्याग्रह शिबिरात अनेक नेते मंडळी सहभागी होऊन त्यांनी व्याख्याने दिली. श्री. विष्णू लक्ष्मण उर्फ नाना काणे श्री. चिंतामणशास्त्री जोशी ठाण्याचे श्री. नानासाहेब दामले वकील पेणचे श्री. जनुभाऊ दामलेमास्तर सातारचे श्री. बुवासाहेब गोसावी महाडचे आचार्य भागवत इ. मंडळींनी जाहीर व्याख्याने दिली. त्याबद्दल त्यांना अटक होऊन शिक्षा झाल्या. अलिबागच्या वाळवंटात सत्याग्रही मंडळी मीठ पुड्या विकून मिठाचा कायदा मोडत होती. तालुका काँग्रेसचे अध्यक्ष वामनराव लिमये यांच्या हस्ते मीठ विक्री करून कायदेभंग करणाऱ्यांना मदत करीत असत. ६ मे १९३० रोजी न. वि. गाडगीळ आणि त्याचे सहकारी पुण्याहून अलिबागला आले. त्यामध्ये श्री. एस. एम. जोशीश्री. ना. ग. गोरेश्री. र. का. खाडिलकर ही मंडळी होती.[१५] रात्री समुद्रकिनाऱ्यावर त्यांची कायदेभंगाबाबत भाषणे झाली. त्यांनी मिठाची विक्री केली. त्यामुळे त्यांना अटक करण्यात आली. काही दिवसांनी पावसाळा सुरू झाल्याने मिठाचा सत्याग्रह बंद करण्यात आला.

## ➢ महाड-माणगाव-गोरेगावचा मीठ सत्याग्रह :-

रायगड जिल्ह्यामध्ये पेण, पनवेल, अलिबाग तालुक्यात मीठ सत्याग्रह चळवळ सुरू होती. ब्रिटिशांच्या अत्याचाराची पर्वा न करता, हजारो लोक रस्त्यावर उतरले. महड, माणगाव, गोरेगाव गावातील देशभक्तांची इच्छा होती की, आपल्या गावी मीठ सत्याग्रह व्हावा. या इच्छेपोटी त्यांनी मीठ सत्याग्रह घडवून आणला.

महाडमधील बाबा टिपणीस यांच्या जुन्या घराच्या अंगणामध्ये सत्याग्रहींचे शिबिर सुरू करण्यात आले. त्या वेळी सत्याग्रही तरुणांची नोंदणी करण्यात आली. सावित्री नदीच्या बाणकोट खाडीजवळ मीठ सत्याग्रह करण्याचे ठरविण्यात आले. त्यानुसार २ मे १९३० हा दिवस सत्याग्रहासाठी निश्चित करण्यात आला. श्री. तुळजारामभाई, श्री. चुनीलालशेठ, श्री. बापुराव जोशी, डॉ. बाबुराव मेहता, श्री. चिंतुभाऊ ओक, श्री. कुशाभाऊ ओक, श्री. मोरेश्वर रहाळकर, श्री. विठ्ठलभाई चिंतोबा देशपांडे, श्री. आत्माराम भगत, इ. प्रमुख मंडळी सत्याग्रहासाठी एकत्र जमली. सखाराम जनार्दन भागवत उर्फ आचार्य भागवत यांनी लेखणी व वाणीने सारा रायगड जिल्हा जागृत करून सत्याग्रहासाठी वातावरण निर्माण केले. महाडच्या स्वातंत्र्यलढÝाचे सेनापती म्हणून डॉ. बाबुराव मेहता यांची निवड झाली. तुळजारामभाई यांनीही सत्याग्रहात भाग घेतला. त्यामुळे त्यांचे धाकटे बंधू चुनीलालशेट यांनी सत्याग्रहास येण्याचा आग्रह धरला. परिणामी २ मेच्या मीठ सत्याग्रहात दोन्ही बंधू सहभागी झाले.[१६]

२ मे १९३०रोजी सावित्री नदीच्या काठी बंदरावर मीठ तयार करण्यासाठी सत्याग्रही जमा झाले. हातात काठी, गळ्यात शबनम, अंगावर खादीची वस्त्रे, हातात तिरंगा आणि मुखात भारतमातेचा जयघोष सुरू होता. सत्याग्रहीने चुली पेटवून त्यावर भांडी ठेवली. त्यामध्ये खारे पाणी ओतून मीठ तयार केले. मिठाचा कायदा मोडून कायदेभंग चळवळीस सुरुवात केली. ब्रिटिश राजसत्तेचे शिपाई घटनास्थळी आले. त्यांनी सर्व मंडळींना अटक केली. आचार्य भागवत, श्री. चुनीलालमिठा शेठ, श्री. उपाध्ये गुरुजी, श्री. पुरुषोत्तम दत्तात्रय मराठे, श्री. बाळू,कूभाई, श्री. बुटाला मास्तर, श्री. कुशाभाऊ ओक, श्री. बापुराव जोशी, डॉ. द. पि. मेहता, श्री. भगवान गोकुळ मेहता, श्री. तुळजारामभाई शेठ, श्री. गोपाळ गोविंदशेठ, श्री. भाईसाहेब मेहता, श्री. देवचंद्र बुटाला, श्री. सुरेन्द्र नाय, श्री. गोविंद टिपणीस, श्री. विठ्ठल कृष्णशेठ, श्री. चिंतूभाऊ देशपांडे,

आनंदीबाई गांधी लक्ष्मीबाई हिराचंद्र गांधी विमलताई उपाध्ये इत्यादी नेत्यांना यावेळी मीठ सत्याग्रहामुळे शिक्षा झाली .[१७]

विविध ठिकाणच्या सत्याग्रहासाठी महाडच्या सत्याग्रह केंद्रातून पथके पाठविण्यात आलेली होती.असेच एक पथक पेणच्या सत्याग्रहासाठी पाठविण्यात आले.या पथकामध्ये श्री. चुनीलालमिठा शेठ श्री.भगवान गोकुळ मेहता श्री.पुरुषोत्तम दत्तात्रय मराठेश्री.देवचंद्र बुटाला श्री.बापुराव जोशी इ.कार्यकत्याचा समावेश होता.पेणमध्ये या तुकडीने मीठ सत्याग्रह केला.तेथे त्यांना अटक झाली नाही.परंतु महाडला आल्यानंतर मात्र त्यांना पकडण्यात आले.वरील सवाना शिक्षा होऊन ठाण्याच्या तुरुंगात पाठविले.

माणगाव तालुक्यात १९३० पयत राजकीय चळवळी फारशा झालेल्या दिसून येत नाहीत.गोरेगावच्या नागरिकांनी गोरेगावच्या खाडी किनारी मीठ सत्याग्रह केला.त्यामध्ये श्री. रामचंद्र भगवानशेठ श्री.रामचंद्र विश्वनाथ अधिकारी श्री.चंद्रकांत पांडुरंग अधिकारी श्री. वासुदेव दातार श्री.घनश्याम जेठादास शहा या व्यक्तींनी सहभाग घेतलेला होता.त्यामुळे त्यांना शिक्षा झाली.[१८]

मीठ सत्याग्रहाचे नियोजन व मार्गदर्शन शिविर पेणमध्ये झाले होते.परंतु पेण व पनवेल मीठ सत्याग्रह चळवळीमध्ये फार मोठा फरक दिसून येतो.पनवेलची चळवळ उभी राहिली ती अचानक कुणाही अनुभवी व वृद्ध काँग्रेस नेत्याच्या मार्गदर्शनाशिवाय चळवळीची सुरुवात झाली ती मुळात प्रक्षोभक व आक्रमक स्वरूपात होती.संपूर्ण तालुका जिल्हा काँग्रेसच्या चळवळीमुळे जागृत होऊन कायदेभंग चळवळीत उतरला.'चरखा चला चला के लेंगे स्वराज्य लेंगे' या गीतापेक्षा 'नही रखनी नही रखनी जालीम सरकार नही रखनी' या गीताला तरूणांनी अधिक पसंती दिली."जिंदा है अगर जिंदा तो पूर्व को हिला देंगे पश्चिम को मिटा देंगे"| या घोषणा होत्या.अलिबागचे नेते नाना कुंटे हरीभाऊ महाजन शांत धिमेपणाने निश्चित वाटचाल करणारे होते.पनवेलचे नेते गुप्ते हे साम्राज्यशाहीचा नायनाट करा अशा विचाराने पछाडलेले होते तर बेडेकर भावनिक असून काहीतरी झपाट्याने घडवून अणण्याच्या वृत्तीचे होते.अशा या सवाच्या सहकार्यामुळे पनवेलमधील चळवळीत उत्स्फूर्तपणा जाणवत होता.महाडचे एक पथक पेणच्या सत्याग्रहासाठी पाठविण्यात आले.माणगाव तालुक्यात १९३० पयत राजकीय चळवळी फारशा झालेल्या दिसून येत

नाहीत. मीठ सत्याग्रहाने राजकीय जागृतीला सुरुवात झाली. गोरेगावच्या नागरिकांनी गोरेगावच्या खाडी किनारी मीठ सत्याग्रह केला.

## ❖ जिल्ह्याबाहेरील मीठ सत्याग्रहामध्ये जिल्ह्याचे योगदान :-

अखिल भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचे ४४ वे अधिवेश २९ ते ३१ या काळात लाहोर येथे झाले. यावेळी म. गांधीजींना अध्यक्षपदी देण्यात आले. परंतु अध्यक्षपदास नकार देऊन तरुण वर्गाला संधी द्या असे गांधीजींनी सुचविले. त्यामुळे पंडित जवाहरलाल नेहरू यांची एकमुखाने निवड करण्यात आली. तर स्वागताध्यक्ष म्हणून सैफुद्दीन किचलू यांची निवड करण्यात आली. त्यांच्या अध्यक्षतेखाली लाहोर अधिवेशनात 'भारताला संपूर्ण स्वातंत्र्य हवे' अशी मागणी करणारा ठराव एकमताने मंजूर करण्यात आला व २६ जानेवारी १९३० हा दिवस स्वातंत्र्य दिन म्हणून देशभर पाळावा असा निर्णय घेण्यात आला. त्या दिवशी देशभरातील जनतेने जाहीरपणे स्वातंत्र्याची प्रतिज्ञा घ्यावी असा आदेश देण्यात आला. ही प्रतिज्ञा पुढीलप्रमाणे होती. "जगातील सर्व देशाप्रमाणेच स्वातंत्र्य उपभोगणे आणि स्वकष्टाने जीवनाच्या गरजा पूर्ण करून सवागीण विकासाची संधी प्राप्त करून घेणे हे भारतीय जनतेचे मूलभूत हक्क आहेत. हे सरकार लोकांचे हक्क नाकारीत असेल आणि त्यांच्यावर जुलूम-जबरदस्ती करीत असेल तर ते सरकार बदलण्याचा आणि रद्द करण्याचा अधिकार येथील जनतेला आहे. ब्रिटिश सरकारने भारताच्या स्वातंत्र्याचे अपहरण केले. इतकेच नव्हे तर येथील जनतेचे शोषण करून भारताचे राजकीय आर्थिकसांस्कृतिक आणि आध्यात्मिक जीवन उदध्वस्त केले आहे. म्हणून भारताने ब्रिटिश शासनाशी असलेले संबंध तोडून संपूर्ण स्वातंत्र्याचे ध्येय साध्य केले पाहिजे अशी आमची ठाम भूमिका आहे". [१९]

लाहोर अधिवेशनात मंजूर झालेला संपूर्ण स्वातंत्र्याचा ठराव आणि प्रतिज्ञा या संदर्भात काँग्रेसचे तात्पुरते अध्यक्ष डॉ. राजेंद्रप्रसाद यांनी पत्रक काढून हा दिवस साजरा करावा असा आदेश कार्यकर्त्याना दिला. त्यानुसार तालुका काँग्रेस कमिटीतील सर्व लोकांनी स्वातंत्र्याची प्रतिज्ञा घेतली आणि शेवटी वंदे मातरम हे राष्ट्रगीत गायले. अशा रीतीने २६ जानेवारी १९३० हा दिवस स्वातंत्र्यदिन म्हणून सर्वत्र साजरा करण्यात आला. तो दिवस आगामी स्वातंत्र्य संग्रामाची नांदी होती. स्वातंत्र्यदिन साजरा केल्याने अनेक ठिकाणी पोलिसांनी लाठीमार केला. शेकडो कार्यकर्त्याची धडपकड करण्यात आली. त्यानंतर म. गांधीजीनी मीठ सत्याग्रहाचा निर्णय घेतला.

- **दांडीयात्रा :-**

ब्रिटिशांच्या जुलमी राजवटीविरुद्ध शांततामय व अहिंसक चळवळीचा जन्म साबरमती आश्रमात झाला . या लढ्यासंदर्भात सहा आठवडे चर्चाचिंतन होऊन लढ्याच्या स्वरूपाविषयी निर्णय घेण्यात आला . त्यामुळे साबरमती ब्रिटिश राजवटीविरुद्ध स्वातंत्र्यलढ्याचे एक प्रमुख केंद्र बनले . मिठावरील कर कायदा मोडण्यासाठी म . गांधीजींनी समुद्रकाठी दांडी या गावाची निवड केली . या ऐतिहासिक दांडीयात्रेची सुरुवात साबरमती आश्रमापासून १२ मार्च १९३० रोजी सकाळी ६ . ३० वाजता झाली . साबरमाती आश्रमापासून २४१ मैल (३८६ किमी) अंतरावर दांडी हे गाव आहे . गांधीजींनी ७९ निवडक अनुयायांसह दांडीयात्रेला प्रारंभ केला . यात्रेमध्ये त्यांनी दररोज १६ किमी पायी प्रवास केला . प्रवासात एकूण २२ ठिकाणी मुक्काम केला .[२०] रस्त्यावर तोरणे, पताके, कमानी ध्वज लावून सुशोभित करण्यात आले होते . या यात्रेमध्ये पंजाब, गुजरात, महाराष्ट्र संयुक्त प्रांत, कच्छ, सिंध, केरळ, राजपुताना, आंध्र, कर्नाटक, मुंबई, बिहार, तमिळनाडू नेपाळ इ . ठिकाणांहून अनेक सत्याग्रही आले होते . म . गांधीजी की जय, भारतमाता की जय, स्वराज्य लेके रहेंगे लेके रहेंगे इ . घोषणा होत्या . प्रवासात जाहीर सभा, भाषणे, प्रार्थना, सूतकताई व दररोजची दिनचर्या लिहिणे इ . प्रत्येकाला बंधनकारक होते .[२१]

५ एप्रिल रोजी समुद्रस्नान करून सकाळी ८ . ३० वाजता मिठाचा खडा उचलून गांधीजींनी मिठाचा कायदा मोडला . कायदे मोडणारे म्हणून गांधीजींचा गौरव श्रीमती सरोजिनी नायडू यांनी केला . आपणास अटक झाली तर अब्बास तय्यबजी व श्रीमती सरोजिनी नायडू यांनी सत्याग्रह करावा असा आदेश गांधीजींनी दिला . सरोजिनी नायडू माधवलाल शहा, आनंद हिंगोरानी, भानुशंकर देव, रतनजी बारिया, ललीत परमार, सतीश कार्लेकर इत्यादींनी मीठ उचलले . या सत्याग्रहात ८२ हजार लोक सहभागी झाले होते . त्यापैकी १७ हजार स्त्रिया मीठ सत्याग्रहात सहभागी झाल्या होत्या . मीठ सत्याग्रहप्रसंगी पंडित नारायण शंकरशास्त्री खरे यांनी भजन म्हटले .[२२]

राष्ट्रीय काँग्रेसच्या आदेशानुसार देशातून अनेक यात्रेकरू दांडीयात्रेत सहभागी झालेले होते . प्रत्येक जिल्ह्यातून जिल्हा काँग्रेसचे प्रतिनिधी म्हणून अनेक सत्याग्रही दांडीयात्रेला गेलेले होते . रायगड जिल्हा काँग्रेस कमिटीच्या वतीने जे प्रतिनिधी पाठविले होते त्यामध्ये सासवने येथील वैश्यविद्या आश्रमातील शिक्षक श्री . विष्णू लक्ष्मण ऊर्फ नाना काणे आणि श्री . चिंतामणशास्त्री जोशी यांची निवड करण्यात आली होती . जमनालाल बजाज यांनी ही निवड केलेली होती .[२३] ते

गांधीजींच्या पहिल्या तुकडीमध्ये सहभागी झालेले होते. त्यांनी दांडीमध्ये मिठाचा कायदा मोडला. गांधीजींच्या आदेशानुसार रायगड जिल्ह्यात मीठ सत्याग्रहासाठी ते परत आले.

- **विलेपार्ले मीठ सत्याग्रह :-**

श्री. जमनालाल बजाज यांच्या नेतृताखाली ६ एप्रिल १९३०रोजी महाराष्ट्रात विलेपार्ले येथे मीठ सत्याग्रहाची सुरुवात झाली. सत्याग्रहासाठी रायगड जिल्ह्यातून आचार्य भाई ढवण यांच्या नेतृत्वाखाली २० जणांची 'रायगड तुकडी'सहभागी झाली होती. या 'रायगड तुकडी' मध्ये सासवणे वैश्य विद्याश्रमातील आजी-माजी विद्यार्थी सहभागी झालेले होते. सहभागी झालेले विद्यार्थी पुढीलप्रमाणे :-

| | |
|---|---|
| १)श्री. हनुमान रामचंद्र कोलते. | २)श्री. अनंत लक्ष्मण मालुसरे. |
| ३)श्री. शंकर काशिराम मोरे. | ४)श्री. विश्वनाथ गणपत मोरे. |
| ५)श्री. गोपाळ बाळकृष्ण नारकर. | ६)श्री. गजानन शंकर शेटये. |
| ७)श्री. शंकर महादेव महाकाळ. | ८)श्री. काशिनाथ वासुदेव सार्दळ. |
| ९)श्री. सदाशिव सखाराम वंजारे. | १०)श्री. माधव गोविंद पाटणे. |
| ११)श्री. मुरलीधर आत्माराम लोद. | १२)श्री. शांताराम यज्ञेश्वर म्हस्कर. |
| १३)श्री. बाळकृष्ण गणपत कोलते. | १४)श्री. पांडुरंग दत्तात्रय पायरे. |
| १५)श्री. महादेव भिकू भिंगाडे. | १६)श्री. केशव धोंडे संसारे. |
| १७)श्री. विनायक सदानंद पठारे. | १८)श्री. रंगनाथ रघुनाथ म्हात्रे. |
| १९)श्री. रामजी मोतीराम शेठ. | २०)श्री. आचार्यभाई ढवण (सेनापती). |

श्री. जगन्नाथ गणपत ऊर्फ आचार्य भाई ढवण यांच्या नेतृत्वाखाली रायगड तुकडी ५ एप्रिल रोजी विलेपार्ले येथे गेली. ६ एप्रिल रोजी छावणीतील स्वयंसेवकांनी पहाटे ४ वाजता उठून प्रार्थना केली. तीनशे-चारशे मंडळी जुहू खाडीवर गेले. कावडीने पाणी आणून सिमेंटच्या वाफ्यामध्ये ओतले. त्यानंतर जाहीर सभा झाली. त्यामध्ये जमनालाल बजाज यांनी भाषण केले. खाजण जमिनीतून मीठ जमा करून कायदा मोडला. दुसऱ्या दिवशीही हाच उपक्रम केल्याने श्री. बजाज यांना अटक झाली. तिसऱ्या दिवशी पोलिसांनी सत्याग्रहींवर अत्याचार केला. 'रायगड तुकडी' ने या अत्याचाराला मोठ्या धैर्याने तोंड देऊन आपल्यावर सोपविलेली कामगिरी उत्तमरीत्या पार पाडली.[२४]

## ● धारासना मीठ सत्याग्रह :-

श्रीमती सरोजिनी नायडू यांच्या मार्गदर्शनाखाली सुरत जिल्ह्यातील धारासना येथे सत्याग्रह झाला. यावेळी अमेरिकेतील 'युनायटेड प्रेस' चे वार्ताहर वेबूमिलर हे हजर होते. सत्याग्रहासाठी २५०० लोक हजर होते. या सत्याग्रहासाठी रायगड तुकडी सहभागी झालेली होती. आचार्य भाई ढवण यांच्या नेतृत्वाखालील २० जणांची 'रायगड तुकडी' २० मे रोजी विलेपार्ले येथून निघून ते सर्वजण धारासनास पोहोचले. रायगड तुकडीतील विशेष मदुर्मकी गाजविणारे सत्याग्रही श्री. ह. रा. कोलतेने सांगितले की "धारासना येथे पोहोचल्यावर सुमारे १५ मिनिटांच्या आतच आम्ही सर्वजण मिठागराजवळ पोहोचलो. मिठागराच्या चोहो बाजूने पोलिसांचे कडे होते. सत्याग्रही जवळ आल्याने लाठीधारी पोलीस चिडले आणि त्यांनी सत्याग्रहींना अर्वाच्य शिविगाळ केली. सत्याग्रहींवर अमानुष लाठी हल्ले केले. परिणामी सत्याग्रही धडाधड खाली कोसळले. रायगड तुकडीतील आचार्य भाई ढवण अनंत मालूसरे हे हल्ल्याने घायाळ झाल्यावर शुश्रुषा पथकाने तावडतोब स्ट्रेचरवर घालून शिबिरानजीकच्या तात्पुरत्या दवाखान्यात नेले. 'रायगड तुकडी' तील हनुमान कोलते यांच्या शरीरावर अनेक मोठ्या जखमा झाल्या. त्या बऱ्या होण्यास कित्येक दिवस लागले. जमनालाल बजाज यांनी कोलते यांना ठाणे कारागृहात भेटीसाठी बोलविले आणि त्यांचे कौतुक केले. त्या प्रसंगी बजाज म्हणाले की "हा पाहा आमचा अहिंसक सैनिक चिमूटभर मिठासाठी त्यांच्यावर ब्रिटिशांनी अमानुष हल्ला केला". [२५]

म. गांधीजींची मीठ सत्याग्रहाची अपेक्षा महाराष्ट्राने बहुतांशाने पूर्ण केली. आचार्य भाई ढवण यांच्या नेतृत्वाखाली २० सत्याग्रहींची तुकडी धारासनास गेली होती. त्यानंतर शेठ अब्दुला यांच्याबरोबर गेलेल्या दुसऱ्या तुकडीने धारासनाच्या धारातीर्थीवर पराक्रमाची शर्थच केली. शेठ अब्दुला यांच्यासारख्या वृद्ध गृहस्थावरही पोलिसांनी लाट्यांचा बेसुमार मारा करून त्यांना जायबंदी केले. तरी महाराष्ट्राची सत्याग्रहींची तिसरी तुकडी धारासनास गेली. त्यांच्यावर घोडेस्वार सोडण्यात आले. सत्याग्रहामध्ये जखमी झाल्याशिवाय एकही महाराष्ट्रीयन सत्याग्रही परत फिरला नाही. धारासनाच्या सत्याग्रहामध्ये सत्याग्रहींनी जिद्दीने व निर्णायक लढा देऊन गांधीजींच्या अपेक्षेप्रमाणे सत्याग्रह घडवून आणला. [२६] महाडचे विसूभाऊ पेणसे यांनी वडाळा मीठ सत्याग्रहामध्ये तर कापरसू मथूरशेठ यांनी रत्नागिरी जिल्ह्यातील शिरोडा येथील मिठाच्या सत्याग्रहामध्ये सहभाग घेतला. दोघांना पकडण्यात आले व त्यांना शिक्षा झाली. [२७]

रायगड जिल्हा काँग्रेसने ज्याप्रमाणे जिल्ह्यात मीठ सत्याग्रह यशस्वी करण्याचा प्रयत्न केला तसाच जिल्ह्याबाहेर दांडी, विलेपार्ले, धारासना, वडाळा, शिरोडा येथील मीठ सत्याग्रह चळवळीत सहभागी होऊन महत्त्वाची भूमिका बजावली. राष्ट्रीय चळवळीला प्रभावी व बलशाली बनविण्याचा प्रयत्न केला. म्हणूनच कायदेभंगाच्या चळवळीमुळे स्वातंत्र्यलढ्याचे पाऊल निश्चितच पुढे पडले. जुलूम अत्याचार करणाऱ्या इंग्रज सरकारला या चळवळीची आक्रमकता लक्षात आली. मिठाच्या सत्याग्रहाची टिंगलटवाळी उडविणारे इंग्रज अधिकारीही या चळवळीची तीव्रता पाहून भयभीत झाले. नि:शस्त्र प्रतिकारातून स्वातंत्र्य सैनिकांची एक नवी फौज भारतात तयार झाली. त्यामुळे इंग्रजांच्या सत्तेला जोरदार हादरा बसला.

## ❖ <u>सविनय कायदेभंग चळवळीतील संघर्षात्मक कार्यक्रम :-</u>

म. गांधीजींनी सत्य व अहिंसेच्या मार्गाने बलशाली ब्रिटिश साम्राज्यशाहीच्या विरोधात संघर्ष सुरू केला. या संघर्षाला जगाच्या इतिहासामध्ये तोड नाही. पारतंत्र्य, शोषण, अन्यायामुळे व्यथित झालेल्या लोकांच्या अंत:करणातून आत्मोद्धाराच्या निर्धाराचे सूर उमटले. या कार्यक्रमामध्ये विदेशी दारू दुकानावर व लिलावावर निरोधन, विदेशी कापडांवर बहिष्कार, सरकारी नोकरांवर सामाजिक, आर्थिक बहिष्कार, सोलापूर मार्शल लॉ विरोधी सत्याग्रह यांचा समावेश करण्यात आलेला होता.

### ▪ विदेशी दारू दुकानावर व लिलावावर निरोधन कार्यक्रम :-

म. गांधीजींनी दांडी येथे मूठभर मीठ उचलून कायदेभंग चळवळीला प्रारंभ केला. या घटनेचा नेत्यांवर, जनसामान्यांवर मोठा प्रभाव पडला. त्यामुळे देशात अनेक ठिकाणी मीठ सत्याग्रह घडून आले. जूनमध्ये पावसाळा सुरू झाल्याने मीठ सत्याग्रह बंद करण्यात आला. सात कलमी कार्य क्रमानुसार चळवळीची वाटचाल सुरू झाली. चळवळीमध्ये स्त्रियांचा सहभाग वाढावा या हेतूने म. गांधीजींनी १० एप्रिल १९३० रोजी 'यंग इंडिया' वृत्तपत्रातून स्त्रियांना आव्हान केले की, "सूत कातण्याच्या व दारू दुकानांवर निरोधन करण्याच्या कार्यक्रमात जास्तीत जास्त स्त्रियांना सहभागी व्हावे". या आव्हानाला अनेक स्त्रियांनी पाठिंबा देऊन चळवळ यशस्वी करण्यासाठी अनेक ठिकाणी नारी सत्याग्रह समितीची स्थापना केली. अनेक ठिकाणच्या चळवळीत सहभाग घेऊन सरकारचे हुकुम पायदळी तुडविले. पोलिसांच्या जुलमाला भीक न घालता कायदेभंग चळवळ यशस्वी करण्यासाठी प्रयत्न केला. सविनय कायदेभंग चळवळीच्या वेळी संपूर्ण स्वातंत्र्य व

स्वदेशीचा कानमंत्र जनतेला दिला. त्याबरोबर सात कलमी कार्यक्रमामधील दारूबंदीचा कार्यक्रम लोकांना दिला. दारूबंदीसाठी स्थानिक पातळीवर चळवळ सुरू करण्याचे आदेशही दिले. म. गांधीजींची दारूबंदी चळवळ सुरू करण्यामागची कारणे पुढीलप्रमाणे होती.

१)दारूमुळे कुटुंबाची पर्यायाने देशाची सामाजिक व आर्थिक व्यवस्था उद्ध्वस्त होते.

२)दारूमुळे अनेक कुटुंब बेकार होऊन कुटुंबातील लोकांचा मानसिक व शारीरिक छळ मोठ्या प्रमाणात होतो.

३)ब्रिटिश सरकारला मद्य विक्रीद्वारे प्रचंड महसूल मिळत असे. तो नष्ट करून ब्रिटिशांच्या आर्थिक व शासकीय साम्राज्याला जबरदस्त हादरा देणे.

४)मद्यपानबंदी एक छोटीशी संकल्पना स्वराज्यप्राप्तीसाठी एक मोठे शस्त्र म्हणून उपयोगात आणणे

कायदेभंग चळवळीचा एक भाग म्हणून दारूबंदी हा कार्यक्रम घेण्यामागे गांधीजींचा अत्यंत शुद्ध विचार होता. तो म्हणजे स्वातंत्र्य चळवळीला सामाजिक सुधारणेचा पाठिंबा मिळविणे. स्त्रियांना आपल्या कौटुंबिक जीवनात आनंद, समाधान प्राप्त करून देणे. त्याबरोबर इंग्रजांची आर्थिक व शासकीय व्यवस्था उद्ध्वस्त करणे. या ध्येयाने सामाजिक बहिष्काराचे शस्त्र म. गांधीजींनी हाती घेतले. स्थानिक नेते, जनता, शेतकरी,कामगार, स्त्रिया, आदिवासी व लहान मुले यांना सहभागी करून घेण्यासाठी दारूबंदीचा कार्यक्रम दिला. त्याचे स्वरूप पुढीलप्रमाणे ठरविण्यात आले.

१)समाजात दारूबंदीसंदर्भात जागृती करणे. यासाठी प्रचार,जाहीर सभा यांचा उपयोग करणे.

२)दारू ताडी याचा सरकारने पुकारलेला लिलाव घेऊ नये.

३)व्यापारी, दुकानदार यांनी दारू विक्री करू नये किंवा दुकाने बंद करावीत.

४)विदेशी दारू दुकानासमोर शांतपणे निरोधन करावे.

५)दारू पिण्यास येणाऱ्या व्यक्तीस हात जोडून शांतपणे समजावून सांगावे. त्यांचे मत परिवर्तन न झाल्यास सामाजिक बहिष्कार किंवा दंड आकारणे.

६)लिलावधारक व्यापारी किंवा दुकानदार यांच्यावर सामाजिक बहिष्कार टाकावा.[२८]

म. गांधीजींच्या आदेशांचे पालन करून रायगड जिल्ह्यातही दारूबंदीचा कार्यक्रम मोठ्या स्वरूपात राबविण्यात आला. या कार्यक्रमात अलिबाग, महाड, पेण, पनवेल इ. ठिकाणच्या स्त्रियांनी मोठ्या प्रमाणात सहभाग घेतला. पनवेल तालुका कॉँग्रेस सत्याग्रह समितीने जून महिन्यामध्ये

दारूबंदी कार्यक्रमाला सुरुवात केली. पनवेलमध्ये पारशी मालक असलेल्या दारू दुकानासमोर विमल गुप्ते यांच्या नेतृत्वाखाली पिकेटिंग सुरू करण्यात आले. यावेळी सौ. मालती कर्वे सौ. मंदा आपटे आणि अबू दामले व इतर ३०-४० स्त्रियांनी पिकेटिंग कार्यक्रमध्ये सहभाग घेतला होता. त्यामुळे त्याचा धंदा बंद झाला तरी तो रागवला नाही. शेवटी १५ दिवसांनी दुकान बंद केले. या कार्यक्रमात एकाही महिलेला अटक किंवा त्रास झाला नाही. कारण पनवेलचे मामलेदार जोशी यांनी कोणालाही त्रास अगर अटक करू नये असा गुप्त आदेश दिला होता. २२ सप्टेंबर रोजी पनवेलमध्ये हरताळ पाळण्यात आला. यावेळी सरकारने पुकारलेला ताडीचा लिलाव घेण्यासाठी कोणीही पुढे आला नाही. यावरूनच ग्रामीण भागात राष्ट्रप्रेम व राष्ट्रवाद जागृत झाल्याचे स्पष्ट दिसून येते. पनवेलच्या काँग्रेस नेत्यांनी कर्जत येथे जाऊन दारूबंदीचा कार्यक्रम केला. श्री. प्रभाकर गुप्ते श्री. मधू चिटणीस श्री. नाना खरे श्री. बाबुराव आपटे ही मंडळी १० दिवस कर्जतमध्ये मुक्कामी होती. यावेळी कर्जतचे कामगार नेते श्री. शंकरराव महाले यांच्या नेतृत्वाखाली कार्यक्रम यशस्वी पार पडला.[२९]

रायगड जिल्ह्यातील दारू-ताडी मक्त्यांचा लिलाव १२/२/१९३१ रोजी होता. यावेळी गांधीवादी नेते श्री. विष्णू लक्ष्मण ऊर्फ नाना काणे यांनी जिल्ह्यातील महाड पेण पनवेल इ. ठिकाणच्या कार्यकर्त्यांच्या मदतीने लिलावाच्या वेळी शांततेने निरोधन करण्याची योजना तयार केली. त्यानुसार विविध ठिकाणाहून ८० ते ९० सत्याग्रही आले होते. यामध्ये स्त्रियांचे प्रमाण जास्त होते. पनवेलहून विमल गुप्ते सौ. गांगल सौ. कर्वे इत्यादींना घेऊन श्री. दत्तू गोडबोले अलिबागला गेले होते. सासवणेहून सौ. दयाबाई ढवण यांच्या नेतृत्वाखाली एक तुकडी आली होती. महाडहून स्वयंसेविकांची एक तुकडी आली. निरोधनाच्या पूर्वी त्यातील बऱ्याच सेविकांना अलिबागच्या हिराकोट कोठडीत अटक करू ठेवले. परंतु त्यांना लगेच सोडून देण्यात आले. लिलावाच्या वेळी निरोधन झाले. त्यामुळे सरकारला प्रचंड आर्थिक तोटा झाला. दर वेळी चार लाखांचा लिलाव होत असे. परंतु निरोधनामुळे तो केवळ दीड लाखांचा लिलाव झाला. त्यामुळे सरकारला अडीच लाख रुपयांचा तोटा झाला.[३०]

पेणच्या नेत्यांनी व स्वयंसेवक-सेविकांनी दारू दुकानावर पिकेटिंग करण्याची चळवळ सुरू केली. दारूच्या दुकानासमोर उभे राहून दारू पिणाऱ्यांना दुकानात जाऊ नका असे सांगत होते. दारूबंदीचे पहिले पिकेटिंग ३१ जुलै १९३० रोजी झाले. त्या वेळी रघुनाथ धोंडी सावंत जनार्दन

केशव दामले नारायण बाळकृष्ण हजारे गोविंद गायकवाड लक्ष्मण मुरारजी गुजर यांना अटक करून खटला भरला.सावंतला १० रु दामले व हजारे यांना प्रत्येक ३० रु.गायकवाड व गुजर यांना ताकीद देऊन सवांना सोडले.पेणमध्ये कोळीवाडा नाक्यावर जनार्दन महादेव काळण यांचे दारूचे दुकान होते.त्याने सत्याग्रहींना त्रास दिला नाही.[३१] पेणमध्ये ११/२/१९३२ रोजी पिकेटिंग करणारे श्री.दत्तात्रेय नारायण दांडेकर श्री.नामदेव बाबाजी पाटील यांना पकडले.पाटील यांना चार महिने कैद व ११० रु.दंड व तो न भरल्यास एक महिना जादा शिक्षा झाली व दांडेकर यांना ६ महिने सक्त मजुरीची शिक्षा व १०० रु.दंड व तो न भरल्यास एक महिना शिक्षा करण्यात आली.

९ ऑगस्ट १९३० रोजी गटारी आमावस्येला लोकांनी दारू पिऊ नये यासाठी दारू दुकानासमोर पिकेटिंग करण्यात आले.त्यामध्ये यमुनाबाई मुकुंद लिमये (सौ मनोरमाबाई पुरुषोत्तम गोखले)श्री.लाला पठाण श्री.गणपत लिमये श्री.नारायण दांडेकर श्री.तात्या पटवर्धन श्री.बगाराम गुजर श्री.हिरू म्हात्रे श्री.ठाकरसी भाईदास श्री.गोविंद गायकवाड यांनी पिकेटिंग केले त्यांनाही पकडण्यात आले.पठाण गायकवाड ठाकरसी यांना मॅजिस्ट्रेटने सोडून दिले. श्री. गणपत लिमये यांना २५रु.श्री.पटवर्धन यांना १५रु.व श्री.दांडेकर श्री.गुजर श्री.म्हात्रे यांना प्रत्येकी १० रु.दंड करून सोडून देण्यात आले.तरीही पिकेटिंग सुरू होते.[३२]

गांधीजींच्या सात कलमी कार्यक्रमानुसार जिल्ह्यात दारूबंदीचा कार्यक्रम राबविण्यात आला. यामध्ये पनवेल पेण अलिबाग सासवणे येथील नारी सत्याग्रही समितीच्या स्त्रियांनी सहभाग घेतलेला होता.त्याचप्रमाणे सर्व जाती-जमातीतील व धर्मातील लोक मोठ्या प्रमाणात सहभागी झालेले दिसून आले.या कार्यक्रमामध्ये प्रामुख्याने नाना काणे विमल गुप्ते दयाबाई ढवण यांनी नेतृत्व केले.पनवेलचे मामलेदार जोशी या सरकारी अधिकाऱ्याने अप्रत्यक्षपणे सत्याग्रहींना कोणताही त्रास होणार नाही याची काळजी घेतलेली दिसून येते.

- **विदेशी कापडांवर बहिष्कार चळवळ:-**

राष्ट्रीय काँग्रेसने विदेशी कापडावरील बहिष्काराचा कार्यक्रम जाहीर केला.त्याची अंमलबजावणी करण्यासाठी म.गांधीजींच्या अध्यक्षतेखाली सन १९२८ मध्ये एक समिती स्थापन केली.२९ जानेवारी १९२९च्या 'यंग इंडिया' या वर्तमानपत्रामधून म.गांधीजींनी काँग्रेसच्या विविध

शाखांना या कार्यक्रमाची माहिती कळवली."परदेशी कापडावर संपूर्ण बहिष्कार घालावा.या निर्णयाच्या प्रचारासाठी आणि लोकांमध्ये खादीचा प्रसार करण्यासाठी स्वयंसेवकांची नेमणूक करावी.स्वयंसेवक जे परदेशी कापड व कपडे गोळा करतील त्यांची जाहीरपणे होळी करावी. जेथे-जेथे शक्य असेल तेथे-तेथे विदेशी कापडाच्या दुकानासमोर निरोधन करावे" असा कार्यक्रम सांगण्यात आला.ब्रिटिशांविरोधी राष्ट्रव्यापी स्वातंत्र्य आंदोलनाची पूर्वतयारी म्हणून काँग्रेसने बहिष्कार चळवळ सुरू केली.या चळवळीमधून जन आंदोलनाची गती हळूहळू वाढविण्याचे गांधीजींचे तंत्र होते.या तंत्राच्या आधारे संपूर्ण देशात मोठ्या प्रमाणात चळवळ प्रभावी करणे. यासाठी विदेशी कापडावर बहिष्कार चळवळीबरोबरच खादीचा प्रसार व प्रचार केला.खादी वापर धोरणामुळे स्वातंत्र्य चळवळीचे भक्कम वस्त्र विणले जात होते.त्याचा एक धागा म्हणजे रायगडमधील बहिष्कार व खादीप्रसार चळवळ होय.[३३]

विदेशी कापडावर बहिष्कार आणि खादीचा प्रसार व प्रचार कार्यक्रमाची चर्चा, नियोजन करण्यासाठी रायगड जिल्हा काँग्रेस कमिटीची बैठक अलिबाग येथे ३० मे १९३० रोजी झाली.या बैठकीमध्ये विदेशी कापड बहिष्कार कार्यक्रम नाना काणे यांच्याकडे विधीपूर्वक सोपविण्यात आला.श्री.नाना काणे यांनी कार्यक्रमाच्या नियोजनास सुरुवात केली व जिल्ह्यामध्ये विदेशी कापड विकले जाणार नाही याची जबाबदारी त्यांनी घेतली.तर खादीचा प्रसार व प्रचाराचे काम भाई ढवणकडे सोपविण्यात आले.बहिष्काराचा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी नाना काणे यांनी अनेक उपाययोजना केल्या.त्यांनी अनेक ठिकाणी प्रवास करून व्यापाऱ्यांच्या भेटीगाठी घेतल्या. त्यांच्याकडून फॉर्म भरून घेतले.वर्तमानपत्रातून जाहिरात दिली व स्वतंत्र पत्रके काढली.अनेक ठिकाणी व्याख्याने व प्रचारयात्रा काढल्या.शक्य असेल तेथे परदेशी कापडांना शिलबंद केले. महाड येथील सर्व कापड व्यापाऱ्यांनी परदेशी कापड आणणार नाही असे प्रतिज्ञापत्रकावर लिहून त्यावर सहया केल्या होत्या.तरीपण काही व्यापाऱ्यांनी प्रतिज्ञा मोडून बहिष्कृत गिरण्यांचे कापड विकले.हे नाना काणेना समजताच त्यांनी त्या दुकानासमोर निरोधन केले.त्यांच्यासोबत सौ.सरस्वतीबाई उपाध्ये सौ.दयाबाई ढवण चिंतामणशात्री जोशी होते.रात्री जाहीरसभेत नानांनी सांगितले की जे व्यापारी ऐकणार नाहीत त्यांच्या विरोधत निरोधन करावे लागेल.त्यामुळे सर्वच व्यापाऱ्यांनी विदेशी कापडांना शिलबंद केले.

- **सरकारी नोकरांवर सामाजिक व आर्थिक बहिष्कार :-**

सविनय कायदेभंग चळवळीसारख्या चळवळी पुन्हा घडू नयेत व तिचा मोड करता यावा म्हणून सरकारने अधिकारी वर्ग व कर्मचारी पोलीस यांची नव्याने नेमणूक केली. परंतु सविनय कायदेभंग चळवळीचा जोर मात्र सर्वत्र वाढत होता. ब्रिटिश नोकरांना कोणत्याही प्रकारचे सहकार्य करावयाचे नाही असा निर्णय जिल्हा काँग्रेस कमिटीने घेतला होता. सरकारी नोकरांना धान्य किराणा कापड व इतर जीवनावश्यक वस्तूंचा पुरवठा होणार नाही याची कार्यकत्यानी खबरदारी घेतली होती. त्यामुळे अनेक ठिकाणी सरकारी नोकरांना प्रचंड त्रास झाला. त्यांची उपासमार होऊ लागली. त्यांनी डी. एस. पी यांच्याकडे तक्रार केली.

महाडमधील व्यापाऱ्यांनी सविनय कायदेभंग चळवळीत सहभाग घेतला. त्यांनी सरकारी नोकरांना किराणा मालरॉकेल देण्यास नकार दिला. ही बातमी डी. एस. पी यांना समजताच ते ८ मे १९३० रोजी फौजफाट्यासह महाडमध्ये आले. त्यामुळे सर्व दुकानदारांनी दुकाने बंद केली. त्या वेळी श्री. कमलाकर दांडेकर चौकामधील श्री. देवचंद कृष्णा तलाठी यांचे दुकान सुरू होते. मात्र त्यांचे सर्व नोकर पळून गेले. डी. एस. पी यांनी यादीप्रमाणे माल खरेदी करून पैसे दिले. ही बातमी महाडचे ज्येष्ठ नेते श्री. सुरेंद्रनाथ टिपणीस यांना समजली. त्या दिवशी त्यांच्या भावाच्या लग्नाचा कार्यक्रम सुरू होता. तरीपण ते देवचंद कृष्णा तलाठीच्या दुकानावर गेले व डी. एस. पी. बरोबर मोठा वाद केला. त्यामुळे सुरेंद्रनाथ टिपणीस यांना अटक करून तुरुंगात डांबले. या घटनेवरून सर्वांना तानाजी मालुसरेंची आठवण आली. या प्रसंगावरून महाडकर जनतेने सुरेंद्रनाथ टिपणीस यांना 'महाडचा तानाजी' हा किताब दिला.[३४]

पेण शहरातही सरकारी अधिकाऱ्यांना बहिष्कर चळवळीची झळ बसू लागली होती. त्यांना कोणीही जीवनोपयोगी साहित्य देत नव्हते. एवढेच नव्हे तर त्यांच्या बरोबरीचे सर्व संबंध तोडून टाकले होते. पाली पनवेल अलिबाग उरण इ. महत्त्वाच्या ठिकाणी सरकारी नोकरांना कोणत्याही प्रकारचे सहकार्य मिळत नव्हते. ब्रिटिशांना साहाय्य करतात म्हणून एक प्रकारे सामाजिक बहिष्कारच जनतेने त्यांच्यावर टाकलेला होता.

## ▪ सोलापूर मार्शल लॉ विरोधी सत्याग्रह :-

सोलापूरमध्ये ब्रिटिश सरकारने मार्शल लॉ जाहीर केला. त्याच्या विरोधी सोलापूरमध्ये सत्याग्रह सुरू करण्यात आला. सत्याग्रहामध्ये सहभाग घेतल्यामुळे सोलापूरच्या श्री. मल्लाप्पा रेवणसिद्ध धनशेट्टी श्री. जगन्नाथ भगवान शिंदे श्री. अब्दुल रसूळ कुर्बान हुसेन श्री. किसन

लक्ष्मीनारायण सारडा यांना सत्र न्यायाधीश श्री.वाडिया यांनी ६ जून रोजी फाशीची शिक्षा फर्मावली.त्यानुसार १२ जानेवारी १९३१ रोजी त्यांना येरवड्याच्या तुरुंगात फाशी दिले.

यावेळी महाड शहरातून काही सत्याग्रही पाठविण्यात आले होते.त्यामध्ये श्री.बाबुराव पर्वते श्री.आत्माराम शिंदे श्री.शांताराम भाऊ धारप श्री.मोरेश्वर रहाळकरश्री.भगवान मथूर शेठश्री.पिंगळे वकीलश्री.फळसकर इ.सत्याग्रही होते.या सवानी सोलापूर येथे सत्याग्रह केला. त्यामुळे त्यांना कैद केले.गोरेगावच्या नागरिकांनी सोलापूर मार्शल लॉचा निषेध करून गोरेगाव शहरात एक मिरवणूक काढली.या प्रसंगी खालील व्यक्तींवर खटला भरण्यात आला.[३५]

१)श्री.रामचंद्र विश्वनाथ अधिकारी.
२)श्री.रामचंद्र भगवान शेठ.
३)श्री.चंद्रकांत पांडुरंग अधिकारी.
४)श्री.शंकरराव खुळे.
५)श्री.वासुदेव दातार .
६)श्री.नारायण वेळजी शेठ .
७)श्री.घनश्याम जेठा शेठ.
८)श्री.पुरुषोत्तम पितांबर शेठ.

त्याचवेळी १४४ चे कलम जारी केले.१४४ कमल भंग करण्यासाठी पेणमध्ये मिरवणूक काढली.१३/१/१९३१ रोजी मिरवणुकीच्या वेळी श्री.ना.य.नेने, श्री.स.रा.फडके श्री. गोपाळ कृष्ण नारकरश्री.चि.त्र.भाटेश्री.दत्तात्रेय बंदिवडेकर या सवांना अटक करण्यात आली.भाटे फडके नारकर यांना प्रत्येकी ४० दिवस कैदेची शिक्षा झाली.इतरांना सोडून देण्यात आले.वरील सर्व व्यक्तींवर सरकारने खटला भरला.पुढे गांधी-आयर्विन करारानुसार त्यांच्यावरील खटले मागे घेतले व सर्व आरोपी मुक्त झाले.[३६]

## ❖ <u>सविनय कायदेभंग चळवळीतील विधायक कार्यक्रम :-</u>

म.गांधीजींना आपल्या अहिंसा या तत्त्वाचा बळी देऊन चळवळीचा विस्तार नको होता म्हणून त्यांनी चळवळ मागे घेतली.नंतर काही काळ लोकजागृतीला वाहून घेतले.जातिभेद, अस्पृश्यता निवारण, दारूबंदी, प्रभातफेऱ्या व राष्ट्रध्वज वंदन आणि खादीप्रसार करण्याचा प्रयत्न केला.या कार्यातून लोकजागृती व लोकऐक्य निर्माण केले.कालांतराने ब्रिटिशांविरोधी त्यांनी सविनय कायदेभंग चळवळीचे शस्त्र उपसले.त्यासाठी सत्याग्रहाचा वापर केला.त्यांच्या नेतृत्वाखाली या चळवळीत असंख्य भारतीय सहभागी झाले.तिची व्यापकता देशाच्या बऱ्याच भागात पसरली होती.एवढ्या मोठ्या प्रमाणात लोकांचा स्वातंत्र्य चळवळीत यापूर्वी सहभाग दिसून

येत नव्हता. चळवळीत महाराष्ट्र तर आघाडीवर होता. सविनय कायदेभंग चळवळीत रायगड जिल्ह्याने दिलेले योगदानही महत्त्वाचे आहे.

### ● खादीप्रसार व प्रचार

विदेशी कापडावर बहिष्कार म्हणजे एका अर्थाने खादीचा प्रचार होता. सवाना स्वातंत्र्य संग्रामात सहभागी करून घेण्यासाठी गांधीजींनी हा कार्यक्रम देशासमोर ठेवला. त्यालाच विधायक कार्यक्रम असे म्हणतात. या कार्यक्रमामध्ये खादीच्या वापराला अग्रस्थान दिले होते. म. गांधीजींनी असा आदेश दिला की, कार्यकत्यानी खेडŸात जाऊन शेतकऱ्यांना स्वातंत्र्यलढ्यात सहभागी करून घ्यावे. त्यानुसार कार्यकर्ते खेड्यात गेले व गांधीजींचा संदेश घरोघरी पोहोचविला. विधायक कार्यातून स्वराज्याची कल्पना लोकांमध्ये रुजवली. त्यामुळे देशाच्या सर्व भागातून निष्ठावंत कार्यकर्ते तयार झाले. या कार्यकत्याना 'गांधीजींची माणसे' म्हणून समाज ओळखू लागला. या लोकांनी खादीचा प्रचार व प्रसार केला. याचा परिणाम रायगड जिल्ह्यातही झाला. त्यामुळे खादी कार्यक्रम मोठ्या प्रमाणात यशस्वी झाला.

पेण शहरामध्येही बहिष्कार चळवळीचे वारे वाहू लागले होते तरी पेणच्या मिरची गल्लीतील श्री. महादेव नथू टमघरे या व्यापाऱ्याने चळवळीच्या विरोधी भूमिका घेतली. लोकांनी त्याच्यावर बहिष्कार टाकला. श्री. गणेश रघुनाथ लिमये व श्री. प. रा. दाते यांच्या नेतृत्वाखाली स्वयंसेवकाने घरोघरी हिंडून प्रचार केला. त्यामुळे व्यापाऱ्याचे मोठे नुकसान झाले. तसेच दि. ३०/३/१९३२ रोजी नारायण लक्ष्मण आधारकर यांनी विदेशी कापडाची होळी केली. त्यामुळे त्यांना अटक होऊन दि. १/४/१९३२ रोजी ९ महिने सक्त मजुरी व दोनशे रुपये दंड किंवा दोन महिने जादा शिक्षा सुनाविण्यात आली. भोर संस्थानातील पालीचे श्री. दादासाहेब लिमये यांनी गावाबाहेर येऊन ब्रिटिश राज्यात विदेशी कापडांची होळी केली.[३७]

अलिबागजवळील सासवणेच्या विद्यावैश्य आश्रमाच्या दशम वार्षिक समारंभाच्या अध्यक्ष पदावरून सरदार वल्लभभाई पटेल यांनी "या आश्रमाने खादीद्वारा रायगड जिल्ह्याची सेवा करावी". अशी शुभेच्छा प्रगट केली. जिल्ह्यातून ११ लक्ष वार सूत कातून ते महात्माजींना अर्पण करावयाचा संकल्प आश्रमाने जाहीर केला. या संकल्पाची पूर्तता म्हणून जिल्ह्यातून २०१११८० लाख वार सूत तयार करण्यात आले. त्याचप्रमाणे या काळात १५०० रु. किमतीच्या खादीची विक्री करण्यात आली.[३८] हे सर्व नाना काणेंच्या प्रयत्नाने साध्य झाले.

पनवेल कॉंग्रेस कमिटीचे खादीप्रसाराचे काम श्री.आप्पासाहेब वेदक यांच्या नेतृत्वाखाली सुरू होते.त्यांनी सूतकताई पेळू तयार करणे इ.कार्यक्रम राबविले.पनवेलच्या कॉंग्रेस हॉलमध्ये स्त्री-पुरुषांना सूतकताईचे प्रशिक्षण दिले जात असे.श्री.वेदकांच्या मार्गदर्शना खाली चिरनेर जासई येथे सूतकताई केंद्र सुरू करण्यात आले.ही ठिकाणे गांधीवादी विचाराची व विधायक कार्य क्रमाची केंद्रे होती.परंतु पोलिसांनी धाड घालून तेथील सर्व साहित्य जप्त केले.त्यामुळे ही केंद्रे बंद पडली.तरीपण गांधीजींनी विधायक कार्यक्रमाद्वारे जनतेला योग्य शिक्षण दिले.अन्यायाविरुद्ध लढणारी एक शक्ती उभी करण्याचा प्रयत्न केला.

खरवलीच्या स्थानिक लोकांना अर्थसाहाय्य मिळावे म्हणून खरवली येथे जिल्हा कॉंग्रेसच्या नेतृत्वाखाली खादी केंद्र सुरू करण्यात आले.अलिबागचे श्री.वामनराव लिमयेश्री.भाऊसाहेब लेले श्री.भाई ढवण श्री.नाना कुंटे पेणचे श्री.भाऊसाहेब नेने श्री.ग.र.लिमये श्री.वि. ना.लिमये श्री.मु.ना.लिमये पनवेलचे श्री.आत्मारामशेठ आठवणे श्री.शंभूशेठ श्री.आबा पन्हाळे उरणचे श्री.भाऊसाहेब डाऊर कर्जतचे श्री.भाऊसाहेब राऊत महाडचे श्री.पितांबरभाई मेथा खालापूरचे श्री.बाबासाहेब ठोसर माणगावचे श्री.दादा वैद्य श्री.नाना अधिकारी श्री. रामभाईशेठ इ.प्रमुख नेत्यांनी विधायक कार्याला सुरुवात केली.या कार्याचा भाग म्हणून खरवली खादी केंद्र स्थापन केले.श्री.वामनराव लिमये नानासाहेब कुंटे यांनी कामाला सुरुवात केली.दादा वैद्य यांनी भाड्याने जागा मिळवून दिली.केंद्रात काम करण्यासाठी श्री.कुशाभाऊ ओक व बापू खांबेट यांची नियुक्ती केली.स्त्री-पुरुष, मुला- मुलींना सूतकताईचे प्रशिक्षण कुशाभाऊ ओक यांनी दिले.या भागातील विणकर साळी समाजाला उत्पादनाची माहिती दिली.कुशाभाऊ ओक व बापुसाहेब खांबेट हे प्रत्यक्ष खादी विणून दाखवत असे.सूत उत्पादन कमी पडू लागल्याने खरवलीच्या आसपास गावात चरखे सुरू करण्यात आले व उत्पादन वाढले.सूत खरेदीसाठी खरवलीला दर शनिवारी बाजार भरत असे.खादीची कोरी ठाणे धुवून काढण्यासाठी भोपाळी (पेण) येथील परीट लोकांकडून खादी धुवून घेत असत.पुढे भोपाळी येथेच धुलाई केंद्र सुरू केले.श्री.ओक व श्री.खांबेटे यांनी धुलाई करून दाखविल्यानंतर धुलाईतही सुधारणा झाली. श्री.शंकरभाई गांधी व श्री.प्रभाकर सुळे यांनी सानेगुरूजी श्री.एस.एम.जोशी श्री.ना.ग. गोरे यांना खरवली केंद्रास भेट देण्यासाठी आणले.पुढे सन १९४२ च्या चळवळीत अनेक नेत्यांना व खरवली केंद्रातील प्रमुखांना अटक केल्याने खादी उद्योगाचा ऱ्हास होऊ लागला.[३९]

## ● प्रभातफेऱ्या व राष्ट्रध्वज वंदन :-

सविनय कायदेभंग चळवळीच्या काळात जिल्ह्यातील अनेक पुढाऱ्यांना पकडून अलिबाग येथील हिराकोट तुरुंगात ठेवले होते.ही चळवळ मोडून काढण्यासाठी पोलिसयंत्रणा कठोरपणे राबत होती.त्यामुळे सत्याग्रहाचे स्वरूप पुन्हा उग्र होऊ लागले होते.प्रभातफेरी व झेंडावंदनाचे कार्यक्रम मोठ्या प्रमाणात होत होते.वरसई गावात दि.६/९/१९३० रोजी झेंडा मिरवणूक श्री.नारायण बगाराम गुरव, श्री.श्रीधर रामचंद्र आधारकर यांनी काढली.आधारकरांना अटक करण्यात आली.नंतर सोडून दिले १३/१/१९३१ रोजी श्री.चिं.वि.जोशी यांनी झेंडा उभारण्याचा कार्यक्रम केला.म्हणून त्यांना अटक करून ४० दिवसांची कैदेची शिक्षा देण्यात आली.[४०] दि.१७/१२/१९३२ रोजी श्री.प.रा.दाते श्री.ग.र. लिमये चुनीलालशेठ यांनी 'कायदेभंगात कोणत्याही पद्धतीने भाग घेता कामा नये' असे नोटीस देऊन सोडून दिले. शासनाच्या आदेशाचा भंग करण्याचा कार्यक्रम सुरू झाला. दि.१९/१/१९३२ रोजी सरस्वतीबाई लिमये कुसुम लिमये भागिरथीबाई पटवर्धन दुर्गा लिमये यांनी प्रभातफेरी काढली.कुसुम लिमये दुर्गा लिमये यांना प्रत्येक ६० रु.दंड झाला. त्यांना दि.२१/१/१९३२ रोजी ठाणे जेलमध्ये पाठविले.

१९ जानेवारी १९३२ रोजी पेण शहरातील स्त्रियांनी एक मोठी प्रभातफेरी काढली.या प्रसंगी सौ.सरस्वतीबाई विनायक लिमये(डॉ.मनोरमा गोखले)दुर्गा मुकुंद लिमये(डॉ.हेमलता उपाध्ये) लीला विनायक मनोहर(डॉ.प्रभावती वरखेडकर) भागिरीथीबाई पटवर्धन कुसुम लिमये या महिलांना कैद करण्यात आले व प्रत्येकीला २ महिने कैदेची शिक्षा झाली.सरस्वतीबाई लिमये व भागिरथीबाई पटवर्धन यांना दीड महिना सक्त मजुरी व बाकीच्यांना प्रत्येकी ६० रु.दंड करून यांना दि.२१/१/१९३२ रोजी ठाणे जेलमध्ये पाठविण्यात आले.दि.१९/१/१९३२ रोजी श्री.अण्णाराव दाते श्री.ग.र.लिमये श्री.चुनीलाल भगवानदास गुजरे यांना पकडून हिराकोट तुरुंगात पाठविले.दि.२८/१/१९२२रोजी मंडलीकांच्या घरासमोर प्रभातफेरी सुरू असताना प.रा.दाते यांना अटक करण्यात आले.त्यांना २ महिने सक्त मजुरी व १०० रु दंड अगर एक महिना सक्त मजुरीची शिक्षा लॉ.अमेन्डमेन्ट ॲक्ट कलम २६ खाली शिक्षा झाली.स्वातंत्र्य दिनानिमित्त दि.४/१/१९३२ रोजी वरसाई येथे मोठी सभा झाली.यावेळी श्री.नारायण बगाराम गुरव यास अटक करण्यात आली.त्यांना ५० रु.दंडाची शिक्षा देण्यात आली.यावेळी लोकांनी घरावर तारांच्या खांबावर राष्ट्रीय झेंडे लावले परंतु पोलिसांनी ते काढून टाकले.

विद्यार्थ्यामध्येही राष्ट्रीय चळवळीचे वातावरण निर्माण झाले होते. अनेक विद्यार्थी एकत्र येऊन भारतमातेच्या गौरवाचे गीत गात रस्त्याने फिरत असत. वाशी, वसई, दिव, कासू इ. गावातून विद्यार्थी भारतमाता की जय, म. गांधीजींच्या नावाचा जयजयकार करीत फिरत असत. श्री. वसंत रामचंद्र मानकामे, श्री. पुरुषोत्तम प्रभुदास शहा यांनी झेंडावंदन केल्यामुळे त्यांना पकडून त्यांच्यावर खटला भरला. त्यांना सहा महिन्यांची सक्त मजुरी व ५० रु. दंड व तो न भरल्यास दीड महिना सक्त मजुरी अशी शिक्षा देण्यात आली. दि. १०/३/१९३२ रोजी पोलिसांनी श्री. जनार्दन केशव दामले यांना अटक करून अलिबाग येथे पाठविले. त्यांच्या अटकेमुळे पेण गावात व बाजारात हरताळ पाळण्याची विनंती करताना चुनीलाल कालिदास गुजर यांना पकडून त्यांना सहा महिने सक्त मजुरी व दोनशे रुपये दंड व तो न दिल्यास दीड महिना सक्त मजुरीची शिक्षा देण्यात आली. दि. ४/४/१९३२ रोजी सभेत श्री. काशिनाथ नारायण दांडेकर व श्री. गणपत धाकू हुजरे यांना अटक केली. त्याच वेळी श्री. पांडुरंग गोविंद बाम, श्री. विनायक कृष्णा फडके यांना तारेच्या खांबावर झेंडा लावला म्हणून त्यांना ४० रु. दंड अगर ४० दिवसांची सजा देण्यात आली. दि. ४/५/१९३२ रोजी भागिरथीबाई पटवर्धन यांना झेंडावंदन व भाषण या बद्दल ३ महिने सक्त मजुरी व ५० रु. दंड अशी शिक्षा देण्यात आली.[४१]

- **सामाजिक ऐक्याचे प्रयत्न :-**

भारतीय समाजव्यवस्थेमध्ये विविध धर्म- त्यांचे पंथ आणि अनेक जाती आहेत. समाज व्यवस्थेमध्ये मोठ्या प्रमाणात विषमता होती. म. गांधीजी सामाजिक ऐक्य साधण्याचा प्रयत्न करीत होते. त्यांनी जातिभेद निर्मुलन, अस्पृश्यता न मानणे व हिंदू-मुसलमान यांच्यात ऐक्य निर्माण करणे हा कार्यक्रम अमंलात आणला. त्याची पूर्तता करण्याचा प्रयत्न रायगड जिल्ह्यातील काँग्रेस नेत्यांनी केलेला दिसून येतो. यासाठी चळवळीच्या काळात स्पृश्य- अस्पृश्यता न मानणे, सहभोजनाचे कार्यक्रम करणे, अस्पृश्य समाजाला पाणी देणे, गावात प्रवेश देणे इ. उपक्रम हाती घेतले होते.

मीठ सत्याग्रहाचा प्रचार करताना बाहेरगावी कार्यकर्त्यांना जेवण घ्यावे लागत असे. त्या प्रसंगी ते जातिभेद मानत नसत. अलिबाग तालुक्यात वाघ्रण गावात श्री. द. श. गोडबोले व अनंता वैशंपायन देवधर यांची जेवणाची स्वतंत्र सोय करण्यात आली. परंतु त्यांनी त्या वेळी स्पष्ट सांगितले की, आम्ही जातपात व धर्माधर्मातील भेद पाळत नाही. त्यामुळे आमच्या पंक्तीला बसून सर्व जणांनी एकत्र जेवण घ्यावे. त्यानुसार देवळामध्ये सवानी एकत्र बसून जेवण केले.[४२] सन

१९३५ मध्येही श्री.नारायणराव गुंजाळ यांच्या नेतृत्वाखाली रायगड किल्ल्यावर सहभोजनाचा कार्यक्रम आयोजित केला.त्या वेळी श्री.शंकरभाई गांधी यांनी आपल्याबरोबर महाडमधील हरिजन समाज मोठÎा प्रमाणात आणला.त्यांच्याबरोबर सहभोजन घेतले होते.त्यामुळे रायगड जिल्ह्यात सहभोजनाचा कार्यक्रम मोठ्या प्रमाणात साजरा झाला.[४३] म.गांधीजींच्या नेतृत्वाखाली सविनय कायदेभंग चळवळ १९३० मध्ये सुरू करण्यात आलेली होती.सात कलमी कार्यक्रमानुसार विविध कार्यक्रम सुरू करण्यात आलेले होते.मीठ सत्याग्रहावरोबर विधायक कार्यक्रम सुरू केलेला होता.पावसाळा सुरू झाल्याने मीठ सत्याग्रह बंद करण्यात आला.त्यानंतर जंगल सत्याग्रह व वैयक्तिक सत्याग्रह सुरू करण्यात आला.

ब्रिटिश राजसत्ता व प्रशासन व्यवस्था खिळखिळी करण्यासाठी राष्ट्रीय काँग्रेसने म.गांधीजींच्या नेतृत्वाखाली १९३०मध्ये सविनय कायदेभंग चळवळ सुरू केली.या चळवळीचा एक भाग म्हणून रायगड जिल्हा काँग्रेस कमिटीने जिल्ह्यात चळवळ सुरू केली.राष्ट्रीय काँग्रेसने जो कार्यक्रम दिलेला होता त्यानुसार चळवळीचे स्वरूप ठरविण्यात आले होते.इंग्रज सरकारने जे अन्यायकारक कायदे केलेले होते ते मोडून त्या संदर्भात होणारी शिक्षा आनंदाने स्वीकारण्यास नवी पिढी तयार झाली होती.या चळवळीचा कार्यक्रम म्हणजे मीठ सत्याग्रह व जंगल सत्याग्रह आणि विधायक स्वरूपाचे कार्यक्रम राबविणे होय.राष्ट्रीय काँग्रेस व महाराष्ट्र प्रांतिक काँग्रेसचा आदेश पाळून जिल्हा काँग्रेस कमिटीने मीठ सत्याग्रहाचे नियोजन केले.त्यानुसार रायगड जिल्ह्यात पहिल्या टप्प्यात पेण पनवेल अलिबाग महाड माणगाव गोरेगाव इत्यादी तालुक्यात मीठ सत्याग्रह करण्यात आले.या सत्याग्रहामध्ये जिल्ह्यातील शेतकरी आदिवासी स्त्रिया लहान मुले वकील आणि स्थानिक नेते मोठ्या संख्येने सहभागी झालेले होते.यासाठी पेण येथे एक स्वतंत्र शिबिर घेण्यात आले. श्री.रामभाऊ मंडलीक इतर नेत्यांच्या मार्गदर्शनाखाली पेण येथील कापूरबाग या ठिकाणी मिठचा सत्याग्रह करण्यात आला. या प्रसंगी हजारो लोक सहभागी झाले होते.अनेक नेत्यांना कैद करण्यात आली.पनवेल उलवा येथे श्री.प्रभाकर गुप्ते व श्री.मधू चिटणीस यांनी उलवा बंदरावर मीठ सत्याग्रह केला.तसेच अलिबाग महाड माणगाव गोरेगाव या ठिकाणी मीठ सत्याग्रह करण्यात आला.जिल्ह्यातील श्री.नाना काणे श्री.चिंतामणशास्त्री जोशी, यांनी दांडीयात्रेत सहभाग घेतला.तसेच आचार्य भाई ढवण यांच्या नेतृत्वाखाली रायगड तुकडीने वडाळा शिरोडा येथील मीठ सत्याग्रहामध्ये सहभाग घेतला.

मीठ सत्याग्रहाबरोबर रायगड जिल्ह्यात विधायक कार्यक्रम राबविण्यात आला.यामध्ये विदेशी कापडावर बहिष्कार आणि विदेशी वस्तू विक्री दुकानासमोर निरोधन हा कार्यक्रम श्री.नाना काणे यांच्या मार्गदर्शनाखाली पार पाडण्यात आला.आचार्य भाई ढवण श्री.वेदक यांनी खादीचा प्रसार व प्रचार करण्याचे कार्य केले.श्री.कुशाभाऊ ओक श्री.खोबेटे यांनी खादी कापड तयार करणे व विक्री करणे ही कामगिरी पार पाडली. समाजातील जातपात धर्मभेद नष्ट करून सामाजिक समता स्थापन करण्याचे प्रयत्न अनेक स्थानिक नेत्यांनी केले.स्वातंत्र्य चळवळीला विरोध करणारे आणि सरकार धार्जिणे तसेच सरकारी नोकर यांची सामाजिक व आर्थिक नाकेबंदी करण्याचा प्रयत्न केला.सरकारच्या धोरणाविरोधी आणि आपल्या न्यायासाठी सर्वसामान्यांमध्ये जागृती करण्याच्या उद्देशाने प्रभातफेरी व झेंडावंदन कार्यक्रमाचे नियोजन करण्यात आले होते. कॉंग्रेसच्या विधायक कार्यक्रमामध्ये जिल्ह्यतील सर्व जाती-धर्माचे स्त्री-पुरुष मोठÝा संख्येने सहभागी झाले होते.त्यामुळे समाजातील शेवटच्या माणसापर्यंत स्वातंत्र्याची भावना जागृत करणे हे गांधीजींचे ध्येय सफल झाले असे म्हणावे लागेल.

सविनय कायदेभंग चळवळीला रायगड जिल्ह्यातून मोठ्या प्रमाणात प्रतिसाद मिळाला.या चळवळीमुळे लोकांमध्ये धैर्य, अत्मविश्वास वाढीस लागलेला दिसून आला.त्यातून जनशक्ती एकत्र येऊन पुढील स्वातंत्र्य चळवळीला जनसमुदायाचे स्वरूप प्राप्त झाल्याचे दिसून आले.यामुळे सविनय कायदेभंग चळवळ जिल्ह्यात यशस्वी झाली.पावसाळा सुरू झाल्याने मीठ सत्याग्रह बंद करून जंगल सत्याग्रह व वैयक्तिक सत्याग्रह सुरू करण्यात आला.

## संदर्भ साधने

१)प्रधान ग.प्र: स्वातंत्र्य संग्रामाचे महाभारत: साधना प्रकाशन पुणे.१९८७ पृ.२३५

२)केळकर श्रीपाद: असहकार चळवळ: कॉन्टिनेन्टल प्रकाशन पुणे.१९९९पृ.२५५२८४

३)लिमये ग.र.: पेण तालुक्यातील सत्याग्रहाचा इतिहास: अप्रकाशित हस्तलिखित पृ.१

४) सदावर्ते प्रार्थना: समग्र पनवेलची गाथा: आशय प्रकाशन पनवेल.२००६. पृ.२९

५) दाते प.रा: पेण तालुक्यात स्वातंत्र्य संग्राम: दाते प्रकाशन पेण.१९७२ पृ. २३

६) लिमये ग.र.: कित्ता : पृ .२

७)दाते प.रा.: कित्ता: पृ.३०

८)पाटील वसंत भाऊ: चिरनेर जंगल सत्याग्रह: मयूर प्रकाशन चिरनेर १९९८ पृ.१०

९) गुप्ते प्रभाकर: पनवेलचा मीठ सत्याग्रह: अप्रकाशित हस्तलिखित पृ. ५

१०)सदावर्ते प्रार्थना: कित्ता: पृ.२९

११) कुलाबा समाचार: १९ एप्रिल १९३०

१२)गुप्ते प्रभाकर: पनवेलचा मीठ सत्याग्रह: अप्रकाशित हस्तलिखित. पृ.६

१३) गोडबोले द.श.: अलिबाग तालुक्यातील राजकीय आंदोलनातील वाटचाल: अप्रकाशित हस्तलिखित. पृ.४

१४)गोडबोले द.श.: बांधीलकीची वाटचाल: गोडबोले प्रकाशन अलिबाग.१९९४पृ.४९

१५)आचार्य भाई ढवण: कै.नाना काणे चरित्र व कार्य: वैश्य विद्याश्रम सासवणे.१९५८पृ.६६

१६)भुस्कुटे प्रभाकर रघुनाथ: महाड गॅझेट: चिरंजीव प्रकाशन महाड.२००२ पृ.८

१७)गांधी शंकरभाई गोपीनाथ: महाड तालुक्यातील स्वातंत्र्यलढ्यातील ऐतिहासिक कार्याचा त्रोटक वृत्तान्त: अप्रकाशित हस्तलिखित. पृ.३

१८)गांधी शंकरभाई गोपीनाथ: माणगाव तालुक्यातील चळवळीचे ऐतिहासिक वृत्त: अप्रकाशित हस्तलिखित पृ.१

१९) प्रधान ग.प्र.: कित्ता : पृ.२४६२४७

२०) सकाळ वृत्तपत्र : दि.६ एप्रिल १९८८

२१) पुढारी: १५ ऑगस्ट१९९४

२२) सकाळ : १५ ऑगस्ट १९९७

२३) आचार्य भाई ढवण: कै.नाना काणे चरित्र व कार्य: कित्ता. पृ.३२

२४) सार्दक शंकर धोंडो: आचार्य भाई ढवण: आचार्य भाई ढवण स्मृती प्रकाशन समिती अंधेरी.१९६२. पृ.२९३०

२५) कित्ता: पृ.३०३२
२६)शिखरे दा.न.: गांधी चरित्र : पृ.६०
२७) गांधी शंकरभाई गोपीनाथ: महाड तालुक्यातील स्वातंत्र्यलढ्यातील ऐतिहासिक कार्याचा त्रोटक वृत्तान्त: अप्रकाशित हस्तलिखित पृ.४
२८)डॉ.चौधरी के.के : जळगाव जिल्ह्यातील स्वातंत्र्यलढा: ऑगस्ट क्रांती सुवर्ण महोत्सव समिती, मुंबई. १९९७. पृ.६४
२९) बॉम्बे प्रेसिडेन्सी पोलीस अ‍ॅबस्ट्रक्ट ऑफ इंटेलिजन्स. जानेवारी १९३२
३०) आचार्य भाई ढवण: उपरोक्त : पृ.३९
३१) दाते प.रा.: उपरोक्त : पृ.२६
३२)होम डिपार्टमेंट स्पेशल ब्रँच फाईल क्रमांक ८००(७४)२० साप्ताहिक अहवाल ६मार्च १९३२
३३) प्रधान ग.प्र.: उपरोक्त : पृ.२३४
३४)होम डिपार्टमेंट स्पेशल ब्रँच फाईल क्रमांक ७५०(४०)-डी-(ए) १९३०
३५) गांधी शंकरभाई गोपीनाथ: माणगाव तालुक्यातील चळवळीचे ऐतिहासिक वृत्त: अप्रकाशित हस्तलिखित. पृ.२.
३६) लिमये गणेश रघुनाथ: पेण तालुक्यातील सत्याग्रहाचा इतिहास: अप्रकाशित हस्तलिखितपृ.५
३७)दाते.प.रा.: उपरोक्त : पृ.२६४२
३८)आचार्य भाई ढवण : उपरोक्त : पृ.४५४६
३९) प्रभाकर गुप्ते: उपरोक्त : पृ.१२२
४०) रायगड जिल्हा गॅझेटियर्स:महाराष्ट्र शासन प्रकाशन विभाग मुंबई १९९३ पृ.१०९११३
४१)दाते.प.रा.: उपरोक्त : पृ.३५४१
४२)गोडबोले द.श.: बांधीलकीची वाटचाल : गोडबोले प्रकाशन अलिबाग १९९४पृ.५२
४३) गांधी शंकरभाई: माणगाव तालुक्यातील चळवळीचे ऐतिहासिक वृत्त: उपरोक्त : पृ.३

# प्रकरण - ४ जंगल सत्याग्रह-चिरनेरचा जंगल सत्याग्रह

**जंगल सत्याग्रहाची कारणे:**

१)भारतीय वन कायदा १९२७

२)१९२७ च्या जंगल कायद्याचे उल्लंघन केल्यास कठोर शिक्षेचे स्वरूप
३)ग्रामीण लोकजीवनावर झालेला आघात
४) लाकूड, काटक्या गोळा करण्यावर बंदी
५)वन उत्पादने गोळा करण्यावर बंदी
६)शेती व्यवसायावरील बंधने
७)गवत कापणे, पालापाचोळा गोळा करणे यावर बंदी
८)राखीव वनामध्ये गुरांना बंदी
९)जंगल विभागातून येणारे मार्ग व पाण्याचे पाट बंद
१०)शिकार करणे व मासे पकडण्यावर बंदी
११)लोककल्याणासाठी खाजगी जमिनीचा ताबा
१२)वाहतुक नियंत्रण आणि शुल्क आकारणी

**रायगड जिल्ह्यातील जंगल सत्याग्रह :**

१)पेण तालुक्यातील जंगल सत्याग्रह
२)अलिबाग तालुक्यातील जंगल सत्याग्रह
३)पनवेल तालुक्यातील जंगल सत्याग्रह
४)उरण तालुक्यातील जंगल सत्याग्रह

**चिरनेर जंगल सत्याग्रह :**

१)२५ सप्टेंबरचा आक्कादेवी डोंगरावरील जंगल सत्याग्रह
२)सत्याग्रहाच्या संदर्भात सरकारची भूमिका
३)सत्याग्रहाच्या संदर्भात काँग्रेस भूमिका
४)चिरनेरचा खटला

**वैयक्तिक सत्याग्रह:**

साबरमती येथे काँग्रेस वर्किंग कमिटीने सविनय कायदेभंग चळवळीचा निर्णय घेतला.या कमिटीच्या ठरावनुसार सन १९३० च्या सविनय कायदेभंग आंदोलनाचे नेतृत्व म.गांधीजीकडे दिले.कृती कार्यक्रमाचे सूत्र नियोजन सरदार वल्लभभाई पटेल यांच्याकडे होते.[१] सविनय

कायदेभंग चळवळीचा म्हणजे सरकारचे अन्यायकारक कायदे मोडणे व त्याबद्दल होणारी शिक्षा भोगणे सरकारी अधिकाऱ्याने अन्याय, अत्याचार केला तरीही शांतपणे व हसतमुखाने तो सहन करणे. सविनय कायदेभंग चळवळीचा एक भाग म्हणून मीठ सत्याग्रह घडून आले. दांडी येथील सत्याग्रहाबरोबरच रायगड जिल्ह्यात विविध ठिकाणी सत्याग्रह घडून आले होते. सविस्तर कायदेभंग चळवळीचा दुसरा भाग म्हणून जंगल सत्याग्रह हाती घेण्यात आला. जूनमध्ये पावसाळा सुरू झाल्याने मीठ सत्याग्रह बंद केला. अहमदाबाद येथे कॉंग्रेस वर्किंग कमिटीने करबंदी व जंगल सत्याग्रह सुरू करण्याचा निर्णय घेतला. यानुसार उत्तर प्रदेश, गुजरात, कर्नाटकमध्ये करबंदी चळवळ सुरू करण्यात आली. तर महाराष्ट्र व मध्य प्रदेशामध्ये जंगल सत्याग्रह सुरू करण्यात आला.

महाराष्ट्रातील राष्ट्रीय नेत्यांची बैठक १२ जुलै १९३० रोजी झाली. या बैठकीमध्ये जंगल सत्याग्रहाचे स्वरूप व त्याचे नियोजन ठरविण्यात आले. महाराष्ट्र कॉंग्रेस कमिटीने जिल्हा व तालुका स्तरावर सत्याग्रह कमिटी व युध्दमंडळाची स्थापना केली. यासाठी प्रत्येक तालुक्याच्या ठिकाणी सत्याग्रह शिबिर घेण्यात आले. सत्याग्रहाच्या कार्यक्रमाची रूपरेषा ठरविली. तसेच सत्यग्रहींची नावनोंदणी करण्यात आली. मुंबई प्रांतिक कॉंग्रेस कमिटीने संगमनेर व अकोले या दोन तालुक्यात २२ जुलै १९३० रोजी दुपारी १२ वाजता जंगल सत्याग्रह केला. साधारण २० गावातील १ लाख लोक जमा झाले होते. या घटनेमुळे सत्याग्रहाचा प्रसार सर्व महाराष्ट्रात झाला. त्यामुळे अकोले, अहमदनगर, अमरावती, चंद्रपूर, यवतमाळ, नाशिक, धुळे, जळगाव, रायगड इत्यादी जिल्ह्यामध्ये जंगल सत्याग्रह करण्यात आले. जंगल कायद्याने जी बंधने घातली होती ती तोडण्यासाठी स्थानिक पातळीवरील नेते, स्त्रिया, लहान मुले, विद्यार्थी, शिक्षक,आदिवासी, शेतकरी,व्यापारी, वकील इ. मंडळी सहभागी झालेली होती. अनेकांनी सत्याग्रहास मदत केली होती. तर सरकारधार्जिणे लोक, स्वार्थी सरकारी नोकरांनी या चळवळीला विरोध केला. तर काहीजण अलिप्त राहिले.

मुंबई प्रांतिक कॉंग्रेस कमिटीच्या आदेशानुसार रायगड जिल्ह्यामध्ये जंगल सत्याग्रह सुरू करण्यात आला. यासाठी जिल्हा कॉंग्रेसने सर्व तालुका कॉंग्रेसचे एक शिबिर अलिबाग येथे घेतले. या शिबिरामध्ये सत्याग्रह सुरू करण्याचा निर्णय घेण्यात आला. जिल्ह्यामध्ये जंगल सत्याग्रहाचा प्रथम मान अलिबाग तालुक्याला जातो. त्याचप्रमाणे पेण, पनवेल, उरण तालुक्यात जंगल सत्याग्रह करण्यात आले होते. उरण तालुक्यातील चिरनेर जंगल सत्याग्रहात गोळीबार झाल्याने तो देशभर

गाजला.रायगड जिल्ह्यातील जंगल सत्याग्रहाची कारणे कोणती? चिरनेर जंगल सत्याग्रहाचे नियोजन, नेतृत्व कोणी केले ? सत्याग्रहाचे स्वरूप व जनतेचा सहभाग कसा होता? तसेच पनवेल व ठाणे कोर्टातील खटला इत्यादी घटकांचा सविस्तर अभ्यास या प्रकरणामध्ये करण्यात आलेला आहे.

## ❖ जंगल सत्याग्रहाची कारणे :-

ब्रिटिश सरकारने जंगल व राखीव वने या संदर्भात भारतीय वन अधिनियम १९२७ हा कायदा मंजूर केला.या कायद्यात एकूण ८३ कलमे असून त्यांच्या अंतर्गत पोटनियमही सांगितलेले आहेत.जंगल कायद्यामध्ये अनेक अन्यायकारक तरतुदी होत्या.हा कायदा जंगलाशी निगडित असलेल्या लोकांवर आणि सामान्य जनतेवर अन्याय करणारा होता.कायद्यामुळे सामान्य लोकांच्या उपजीविकेचे साधन नष्ट होणार होते.त्यामुळे ब्रिटिश सरकार व जंगल कायदा याबाबत लोकांमध्ये नाराजी निर्माण होऊ लागली होती.परिणामी या जंगल कायद्याविरुध्द म.गांधीजींनी सविनय कायदेभंग चळवळ सुरू करण्याचा निर्णय घेतला.त्याचा एक भाग म्हणून महाराष्ट्रात अनेक ठिकाणी जंगल सत्याग्रह सुरू करण्यात आले.याची प्रतिक्रिया रायगड जिल्ह्यातही उमटली.पनवेल, उरण, पेण, अलिबाग, रोहा या तालुक्यांमध्ये विविध ठिकाणी सत्याग्रह करण्यात आले.या जंगल सत्याग्रहाची विविध कारणे पुढीलप्रमाणे दिसून येतात.

### ● भारतीय वन कायदा १९२७ (अधिनियम क्रमांक १६ मधील अन्यायकारक तरतुदी):-

भारतीय वन कायदा १९२७ अधिनियम क्रमांक १६ मधील कलम नंबर २६अ, २९, ३० क, ३३ ब, ३९ मधील अन्यायकारक तरतुदी होत्या.त्या तरतुदी पुढीलप्रमाणे दिसून येतात.[२]

१)वनातील झाडे व इमारती लाकूड कापणे,साल काढणे यावर कायद्याने बंदी घातलेली होती.

२)राखीव वनातील झाडे तोडून जमीन बनविण्यास बंदी होती.

३ वन उत्पादने गोळा करणे, तयार करणे आणि वनाबाहेर नेणे यावर बंदी होती.

४)वनातील सार्वजनिक किंवा खाजगी जाण्या-येण्याचा मार्ग आणि पाण्याचा पाट बंद केलेला होता.

५)जंगलांना आगी लावणे यास बंदी घातली होती.

६)स्वत:च्या उपयोगासाठी किंवा धंद्याच्या प्रयोजनार्थ वनातील झाडे किंवा इमारती लाकूड व वन उत्पादनाची ने-आण करण्यासाठी इसमांना लायसेन्सची गरज होती.

७)राखीव वनात गवत कापणे,पालापाचोळा गोळा करणे व गुरे चारणे यावर बंदी घातलेली होती .

८)वनामध्ये शिकार करणे, मासेमारी करणे, सापळे किंवा फास लावणे याला बंदी घातली .

९)वनात खाणी खोदून दगड काढणे,चुन्याची किंवा कोळशाची भट्टी लावणे यावर बंदी घातली .

१०)जमीन संपादन करताना मालकी हक्काच्या जमिनीबाबतचा निर्णय घेणे .

११)काही ठरावीक जातीची झाडे राखीव असल्याने ती तोडण्यास व विकण्यास बंदी घातली .

१२)बिनसराकारी वने व जमिनीवर नियंत्रण आणि सरकारच्या गरजेनुसार व लोककल्याणकारी सुधारणा करण्यासाठी उदा . रस्ते, पाटबंधारे,जलविद्युत, आरोग्य इ . जमिनीचा तावा घेणे .

१३)इमारती लाकूड आणि इतर वन उत्पादन यावर शुल्क आकारले . तसेच त्यांच्या ने -आण करण्याबात नियंत्रण ठेवले .

- **१९२७ च्या जंगल कायद्याचे उल्लंघन केल्यास कठोर शिक्षेचे स्वरूप :-**

जंगल कायद्यामध्ये ज्या तरतुदी केल्या होत्या त्या तरतुदींचे उल्लंघन केल्यास कठोर शिक्षेची तरतूद करण्यात आली होती . त्यामुळे ब्रिटिश सरकार आणि जंगल कायदा याबाबत लोकांच्या मनात चीड निर्माण झाली होती . ती जंगल सत्याग्रहाच्या स्वरूपात व्यक्त झाली . या **कायद्यातील शिक्षेचे स्वरूप** पुढीलप्रमाणे होते .

१)वनाच्या संदर्भात कोणताही अपराध करताना उपयोगात आणलेली सर्व हत्यारे व साधने किंवा गुरे जप्त करण्यात येत असत .

२)वनोत्पादनाची वाहतूक करण्याकरिता म्हणून ज्या वाहनाचा उपयोग केला त्या संबंधित कागदपत्रांची तपासणी करणे .

३)सरकारजमा करण्यात आलेल्या मालमत्तेची जाहीर लिलावाद्वारे विक्री करणे .

४)वनअधिकाऱ्यांनी झाडावर, इमारती लाकडावर, जमिनीची हद्द दर्शविण्यासाठी ज्या चिन्हाचा उपयोग केलेला आहे ते चिन्ह खराब करणे किंवा बदल केल्यास, त्या व्यक्तीस तीन वर्षांची कैद किंवा दंड किंवा दोन्ही शिक्षा होतील .

५) वनात गुरे सापडल्यास त्यांचा कोंडवाडा भरावा . प्रत्येक हत्तीस १० रु . प्रत्येक म्हैस व उंट २ रु . प्रत्येक घोडा, घोडी, खच्ची केलेला घोडा, शिंगा, शिंगी, खेचर, वळू, बैल, गाय, कालवड या प्रत्येकी स्वतंत्र १ रु . वासरू, गाढव, डुक्कर, एडका, मेंढी, मेंढा, कोकरू, शेळी, करडू या प्रत्येकी ५० पैसे प्रमाणे प्रत्येक जनावरास कोंडवाडा आकारण्यात आला .

६) हत्तींना ठार मारणे किंवा पकडणे अशा इसमास न्यायालयाने दोषी ठरविल्यास आणि जी नुकसानभरपाईची रक्कम देण्यास सांगितलेली असेल त्याशिवाय एक वर्षाची कैद किंवा २ हजार रुपये दंड किंवा दोन्हीही शिक्षा वन न्यायालय देत असे.

७) इमारती लाकूड गोळा करून विल्हेवाट लावणे. चिन्हे बदल करणे अथवा, त्यावर नोंदणी करणे. या कलमान्वये एखाद्या नियमाचे उल्लंघन केल्याबद्दल, शिक्षा म्हणून इसमास ६महिने पयतची कैद किंवा ५०० रु. पयत दंडाची किंवा दोन्हीही शिक्षा होतील.

- **ग्रामीण लोकजीवनावर झालेला आघात :-**

रायगड हा कोकणातील जिल्हा आहे. जिल्ह्याची भौगोलिक स्थिती म्हणजे जेथे गाव तेथे डोंगर व जंगल होय. लोकांचे राहणीमान साधे आहे. त्यांची घरे साधी व जास्त उताराची किंवा खोपटाची आहेत. लोकांचा मुख्य आहार भात व मासे आहेत. आजारावर उपचार म्हणून औषधी वनस्पतींचा प्रामुख्याने उपयोग करत असे. त्यामुळे ग्रामीण लोकांचे जीवन त्यांच्या रोजच्या गरजा डोंगर, जंगल याच्याशी निगडित होते. १९२७ च्या कायद्याने जंगल संरक्षण व राखीव वने या संदर्भात अनेक बंधनकारक तरतुदी लादण्यात आल्या. त्याचा ग्रामीण लोकजीवनावर विपरीत परिणाम होऊ लागला.

- **लाकूड , काटक्या गोळा करण्यावर बंदी :-**

भारतीय वन कायद्यानुसार जंगलातील व खाजगी मालकी जमिनीतील साग, ऐन, शिसव, चंदन, हिरडा, किंजळ, हेदू,, भोरप, नाणा, बिलवा,जांभळ, खैर, धावडा, माड तसेच उढा, मेस, मांणगा, कळक, बांबू आणि शिकेकाईची वेल इ. १६ जातींची झाडे राखीव ठेवलेली होती. ही झाडे तोडण्यासाठी परवानगी घ्यावी लागत असे. ती कशी? केव्हा? आणि कोणाच्या परवानगीने तोडायची याच्या अटी घालून दिल्या होत्या. झाडे व इमारती लाकूड तोडणे यावर बंदी असल्याने घरासाठी,खोपटासाठी व झोपडीसाठी तसेच शेतीची विविध अवजारे तयार करण्यासाठी लागणारे लाकूड मिळत नसे. परिणाम लोकांच्या व्यवसायाचा व निवाऱ्याचा प्रश्न निर्माण झाल्याने लोकांचे मोठ्या प्रमाणात हाल होऊ लागले.

- **वन उत्पादने गोळा करण्यावर बंदी :-**

भारतीय जंगल कायद्याने वन उत्पादन गोळा करणे, तयार करणे, त्याची वाहतूक करणे यावर बंदी घातलेली होती. त्यावर उपजीविका करणाऱ्या वर्गाचे साधन नष्ट झाले. परिणाम तो वर्ग बेकार होऊन दरिद्री बनला. लाकूड, काटक्या गोळा करणे तसेच आपटा, टेंभुर्णी व इतर झाडांची पाने गोळा करणे, झाडाची साल, मोहाची फुले व बिया गोळा करणे. मध, मेण, प्राण्याची कातडी, दात, शिंगे गोळा करणे यावर बंदी घातली. त्यामुळे लोकांच्या व्यवसाय व व्यापारावर परिणाम झाला. त्यांची आर्थिक उत्पादनाची साधने नष्ट झाली.

- **शेती व्यवसायावरील बंधने :-**

पावसाळ्यात लोक डोंगर भागात शेती करीत असत. झुडपे, गवत साफ करून लोक पावसाळ्यात विविध स्वरूपाची पिके, फळे, पालेभाज्यांची पिके घेत असत. परंतु या कायद्याने वने साफ करून शेती बनविण्यास बंदी घातली. त्यामुळे शेतकऱ्यांचे नुकसान झाले. त्यामुळे भात, नाचणी, काकडी, पडवळ, पालेभाज्या इ. पिके घेण्याचे बंद झाले. परिणामी शेतकऱ्यांचे आर्थिक उत्पन्न कमी झाले.

- **गवत कापणे, पालापाचोळा गोळा करणे यावर बंदी :-**

भारतीय वन कायद्याने जंगलातील राखीव वनातील गवत कापणे,पालापाचोळा गोळा करणे यावर बंदी घातली होती. त्यामुळे खोपटासाठी, झोपडीसाठी,भाताच्या पेंढ्याची गंज शेकारण्यासाठी आणि भाताची राप(रोपे)तयार करण्यासाठी गवत व पालापाचोळा लोकांना मिळत नसे. तसेच उन्हाळ्यात गुरांसाठी चारा मिळत नसे. त्यामुळे लोक नाराज झाले होते.

- **राखीव वनामध्ये गुरांना बंदी :-**

वन कायद्याने राखीव वनामध्ये गुरे किंवा त्यांचे कळप चारण्यास किंवा जंगल भागात सोडण्यास बंदी घातली होती. जर राखीव वन विभागात अतिक्रमण केल्यास गुरे पकडून कोंडवाड्यात बांधली जात. कोंडवाडा भरल्यानंतरच गुरे सोडली जात. त्यामुळे चाऱ्याअभावी गुरांचे हाल होत असत. पावसाळ्यात भात शेती असल्यामुळे व उन्हाळ्यात गवत न कापल्यामुळे गुरांना चारा मिळत नसे.

- **जंगल विभागातून येणारे मार्ग व पाण्याचे पाट बंद :-**

राखीव वनातून सार्वजनिक किंवा खाजगी स्वरूपाचा जाण्या-येण्याचा मार्ग या कायद्याने बंद करण्यात आल्याने लोकांना अडचणी निर्माण झाल्या. जलद जाणे-येणे, मालाची वाहतूक करणे या बाबतीत त्रास होऊ लागला. प्रवासाचा वेळ वाढला. कोणतीही कामे जलद होऊ शकत नव्हती. लोकांच्या सोईसाठी पर्यायी मार्ग तयार करावा असेही या कायद्याने सुचविले होते. तरीपण सरकारने पर्यायी मार्गाची तरतूद केली नव्हती. राखीव वनातून येणारे सार्वजनिक किंवा खाजगी पाण्याचे पाट बंद केले. त्यामुळे भात शेतीला व मत्स्य उत्पादनासाठी आवश्यक असणारे पाणी मिळत नव्हते. त्यामुळे शेतकऱ्यांचे व मत्स्य व्यावसायिकांचे नुकसान होत असे.

- **शिकार करणे व मासे पकडण्यावर बंदी :-**

कोकणातील लोकांचा मुख्य आहार म्हणजे भात, मासे, मटण आहे. परंतु सरकारने राखीव वनामध्ये शिकार करणे, मासे पकडणे, सापळे व फास लावून प्राणी पकडणे यावर वन कायद्याने बंदी घातली. तसे त्या संर्दभात शिक्षेची तरतूदही केलेली होती. त्यामुळे लोकांच्या आहारावर परिणाम झाला. लोकांना मासे, मटण मिळणे अवघड झालेले होते.

- **लोककल्याणासाठी खाजगी जमिनीचा ताबा :-**

सरकारच्यागरजेनुसार कुरण, रस्ते, पाटबंधारे, जलविद्युत, आरोग्य इ. लोककल्याणकारी योजनासाठी खाजगी मालकीची जमीन ताब्यात घेतली. त्याचप्रमाणे विनसरकारी वने व जमिनीवर नियंत्रण या कारणास्तव जमिनीचा ताबा मिळविला. त्यामुळे खाजगी मालकीच्या जमिनीचे क्षेत्र कमी होऊन उत्पादनेही कमी झाली. त्यामध्ये असणारी माती, दगड, झाडे, पिके यावरील अधिकार नष्ट झाला. विनसरकारी वने ताब्यात घेतल्याने गुरांचा चारा नष्ट झाला. परिणाम गावकऱ्यांचे सर्वच बाबतीत हाल होऊ लागले.

- **वाहतुक नियंत्रण आणि शुल्क आकारणी :-**

लाकूड,इमारती लाकूड, वन उत्पादने यांच्या वाहतुकीवर नियंत्रण ठेवण्यात आलेले होते. यासाठी ठरावीक तारखेपयत वाहतूक करण्याचा परवाना देण्यात आला होता. रक्कम भरण्याऱ्या परवानाधारकाला वाहतुकीची परवानगी देण्यात आली होती. त्यामुळे परवानाधारकाकडून वस्तूचा पुरवठा होत असे. परवान्यामुळे सामान्य लोकांना स्वत:च्या जमिनीतील अगर जंगलातील जीवनावश्यक वस्तूंची वाहतूक करता येत नसे. यामुळे गरजेच्या वेळी वस्तू मिळत नसे किंवा

ज्यादा रक्कम द्यावी लागत असे. वाहतुकीमध्ये कोणत्या स्वरूपाचा माल आहे त्यानुसार त्यावर शुल्क आकारण्यात येत असे. परिणामी शेतकऱ्यांना त्या वस्तु जवळ असूनही महाग स्वरूपात खरेदी कराव्या लागत. किंवा काही प्रसंगी गरज असूनही त्या वस्तू मिळत नसत. परिणामी लोक नाराज झालेले होते.

थोडक्यात वन संरक्षण व राखीव वन कायद्यातील तरतुदींमुळे लोकांना अनेक प्रकारच्या अडचणींना तोंड द्यावे लागत होते. शिवाय कायद्यातील तरतुदींचे उल्लंघन केल्यास कठोर शिक्षा भोगावी लागत होती. या कायद्याचा एकूण ग्रामीण जीवनावर मोठा आघात झाला. त्यामुळे सामान्य जनतेमध्ये या कायद्यावावत नाराजी निर्माण झालेली होती. परिणाम इंग्रजांच्या धोरणाविरोधी व कायद्याविरोधी लोकांनी विरोधकाची भूमिका घेतली. याचा फायदा म. गांधीजींनी व राष्ट्रीय काँग्रेसने घेण्याचे ठरविले. १९३० मध्ये म. गांधीजींच्या नेतृत्वाखाली सविनय कायदेभंग चळचळ सुरू करण्याचा निर्णय घेतला. या चळवळीचाच एक भाग म्हणून रायगड जिल्ह्यात जंगल सत्याग्रह सुरू करण्यात आला.

## ❖ रायगड जिल्ह्यातील जंगल सत्याग्रह :-

राष्ट्रीय काँग्रेसने जंगल सत्याग्रह व साराबंदी चळवळीचा आदेश दिला. मुंबई प्रांतिक काँग्रेस कमिटीच्या धोरणानुसार रायगड जिल्हा काँग्रेस कमिटीने सत्याग्रह संदर्भात आपले धोरण ठरविले. रायगड जिल्हा काँग्रेस कमिटीच्या नेतृत्वाखाली स्थानिक पातळीवर अनेक ठिकाणी जंगल सत्याग्रह करण्यात आले. त्यामध्ये पनवेल, उरण, पेण, अलिबाग, रोहा इ. ठिकाणी सत्याग्रह करण्यात आले. सविनय कायदेभंग चळवळीच्या अंतर्गत रायगड जिल्ह्यात चिरनेर सत्याग्रह झाला. या चळवळीमध्ये गोळीबार होऊन आठ लोक हुतात्मे झाले. या घटनेचे सर्व भारतात पडसाद उमटले. या जंगल सत्याग्रहामध्ये स्थानिक शेतकरी, आगरी, आदिवासी, स्त्रियांनी मोठ्या संख्येने सहभाग घतला होता.

रायगड जिल्हा काँग्रेस कमिटी व तालुका काँग्रेस कमिटी यांच्या संयुक्तपणे अलिबाग येथे जुलै १९३० मध्ये एक बैठक व सत्याग्रह शिबिर घेण्यात आले.[३] हे शिबिर पूर्वीची व्यायाम शाळा म्हणजे सध्याचे तालुका पंचायतीची इमारत येथे संपन्न झाले. या सत्याग्रह शिबिरासाठी व बैठकीसाठी पनवेल काँग्रेस कमिटीच्या वतीने श्री. प्रभाकर केशव गुप्ते व श्री. त्र्यंबक नारायण ऊर्फ नाना वेडेकर हजर होते.[४] अलिबागच्या सत्याग्रह शिबिरामध्ये मीठ सत्याग्रहा प्रमाणे जंगल

सत्याग्रह करण्याचे ठरविण्यात आले. जंगलासंबंधीचे अन्यायकारक कायदे मोडून सत्याग्रह करणे आपले हक्क प्रस्थापित करण्यासाठी लोकांमध्ये जनजागृती करणे जाचक जंगल कायदा मोडण्यासाठी जनतेला एकत्र करणे सत्याग्रहाचे नियोजन प्रचार व प्रसार आणि सत्याग्रहाचे स्वरूप या संदर्भात बैठकीमध्ये चर्चा करण्यात आली.

## ▪ <u>पेण तालुक्यातील जंगल सत्याग्रह :-</u>

पावसाळा सुरू झाल्याने मीठ सत्याग्रह बंद करण्यात आला. राष्ट्रीय काँग्रेस व जिल्हा काँग्रेस कमिटीच्या आदेशानुसार तालुका काँग्रेस कमिटीने आपल्या प्रदेशात जंगल सत्याग्रह करण्याचा निर्णय घेतला. यासाठी पेण तालुक्यातील स्वयंसेवकांचे एक पथक जनार्दन केशव दामलेंच्या नेतृत्वाखाली वरसई, वावोशी, डोणवत, छत्तीशी विभाग, कासू,, पाबळ या विभागात जाऊन सत्याग्रहासाठी जागेची पाहणी केली.[५] या पथकांनी ठिकठिकाणी मुक्काम करून गावोगावी त्यांनी सभा घेतल्या. या सभेमधून सर्व लोकांना इंग्रज सरकारची नीती, कायदा आणि लोकांची कर्तव्ये याबद्दलची माहिती दिली. जंगल कायदा किती जाचक आहे? तो रद्द करण्यासाठी सत्याग्रहाची गरज कशी आहे हे लोकांना पटवून दिले. पेण तालुक्यात जंगल सत्याग्रह कोठे व कशा पध्दतीने करावयाचा? यासाठी कासू येथे श्री. रणछोडदास कानकीया यांच्या वाडÝात सभा झाली. या सभेत पेण तालुक्याच्या जंगल सत्याग्रहाची सर्व सूत्रे जनार्दन केशव दामलेमास्तर यांच्याकडे देण्यात आली.[६] या सभेनंतर जंगल सत्याग्रहामध्ये भाग घेणाऱ्यांची नोंद करण्याचे काम सुरू करण्यात आले.

पेण तालुक्यात स्वयंसेवकांचे गट वेगवेगळÝा भागात जाऊन प्रचारकार्य करत होते. गावातील लोकांशी चर्चा करणे सभा घेऊन व्याख्याने देणे जंगल कायद्यातील जाचक अटींची लोकांना माहिती देणे. तसेच प्रतिष्ठित नागरिकांचे सहकार्य व मदत मिळविणे हे काम चालू होते. वावोशीचे श्री. मुकुंद धोंडदेव टिळक, डोणवतचे श्री. कुशाभाऊ टिळक, उधलोळीचे इनामदार बंधू,, खनावचे श्री. सखाराम पाटील, वाकरूळचे श्री. शंकरशेट गुजर, वरवण्याचे श्री. तुळाजीराव खोत, कासुचे श्री. रणछोडदास कानकीया, वाशीचे श्री. हिऊ महादू म्हात्रे, श्री. पद्म मास्तर आणि श्री. माया घोसू,, उंबरडÝाचे श्री. शंकर रामा म्हात्रे, हमरापुराचे श्री. माधवराव दोंदे यांनी स्वयंसेवकांना सर्व प्रकारची मदत केली. पेण शहरातील श्री. गुलाबचंद नाथालाल, श्री. हेमचंद्र भाई दास, श्री. विनायक नारायण उर्फ काकासाहेब मनोहर, श्री. नारायण मातंड, श्री. विनायक नारायण

लिमये, डॉ.मुकुंद नारायण लिमये, श्री.मोहनीराज कणेकर, श्री.रंगोपंत लिमये, श्री.गोपाळराव साठे इ.लोकांनी स्वयंसेवकांना सतत पैशाची मदत केली.[७] सत्याग्रहाचा प्रसार व प्रचार करण्याचे काम बदलापूरचे श्री.परांजपे यांनी केले.

पेण तालुका काँग्रेस कमिटीने श्री.जनार्दन केशव दामले मास्तरांच्या नेतृत्वाखाली सत्याग्रह करण्याचा निर्णय घेतला.त्याचप्रमाणे काँग्रेस कमिटीने जिल्हाधिकारी, जिल्हा पोलीस अधिकारी, जिल्हा वन अधिकारी यांना लेखी सूचना दिल्या.दामले मास्तरांमुळे तालुक्यातील चळवळ वाढत आहे.ती नष्ट करावयाची असेल तर दामले मास्तरांना कैद करणे गरजेचे आहे हे ओळखून पोलिसांनी क्रिमिनल प्रोसिजर कोड कलम १०६ व १०७ खाली श्री.जनार्दन दामले मास्तरांना दि.२२/९/१९३० रोजी अटक केली.त्यांच्यावर खटला चालवून त्यांना सहा महिन्यांची साधी शिक्षा देण्यात आली व ठाणे तुरुंगात पाठविले.

श्री.दामलेमास्तरांना अटक झाली तरीही स्वयंसेवकांनी जंगल सत्याग्रहाचा निर्णय घेतला.दि.२५/९/१९३० रोजीचा जंगल सत्याग्रह श्री.गणपतराव लिमये यांच्या नेतृत्वाखाली होराळे-आपटे-वावोशी येथे करण्यात आला.[८] या सत्याग्रहामध्ये श्री.गणेश रघुनाथ लिमये, श्री.लक्ष्मीदास मोरारजी गुजर, श्री.वामन कृष्णा टिळक, श्री.दामोदर केरोबा बांदिवडेकर या चौघाची सत्याग्रही म्हणून निवड करण्यात आली.[९] गावातील जंगलाच्या बंद भागात प्रवेश करणे हा सत्याग्रहाचा विषय व कार्यक्रम होता.पेण व आसपासची जनता प्रेक्षक म्हणून होराळे डोंगरावर जमा झाली.त्याचप्रमाणे पोलीसही हजर होते.लोकांवर नियंत्रण ठेवण्याचे काम श्री.रंगो रावजी टिळक व श्री.रंगो वामन टिळक याच्यांकडे होते.जंगल सत्याग्रहासाठी ज्यांची निवड झाली त्यांनी कार्यक्रमाचे स्वरूप लोकांना समजावून सांगितले.बंद भागामध्ये गुरांना गवत खाण्यासाठी प्रवेश बंद होता.माणसांना गवत कापण्यास बंदी घातलेली होती.म्हणून आम्ही बंद भागात प्रवेश करून गवत कापणे हा कार्यक्रम ठरविलेला आहे असे सांगत असतानाच ते चौघे जंगलात शिरले.त्यांना पोलिसांनी अटक केली.दि.२६/९/१९३० रोजी मामलेदार यांच्यापुढे खटला सुरू झाला.जंगल कायदा कलम ११७/६ प्रमाणे प्रत्येक सत्याग्रहींला ४महिने शिक्षा व २५रु.दंड अगर १ महिना शिक्षा देण्यात आली.त्याच दिवशी ठाणे तुरुंगात पाठविले.त्यांनी चार महिन्यापैकी १ महिना ठाणे, १ महिना येरवडा आणि २ महिने विसापूर येथे शिक्षा भोगली.

पेण तालुक्यातील कॉंग्रेसनिष्ठ श्री.गणू बाळू ठाकुर यांनी एकट्यानेच बांधणवाडीच्या जंगलात जाऊन दि.२७/९/१९३० रोजी झाड तोडण्याचा कार्यक्रम केला.त्यांना त्याच दिवशी अटक करण्यात आली.त्यांचा पेण मामलेदारासमोर खटला चालविण्यात आला.त्यांना कलम ११७/२६ नुसार १ वर्षाची सक्त मजुरीची शिक्षा देण्यात आली.ठाणे, येरवडा, नाशिक तुरुंगात त्यांनी शिक्षा भोगली.[१०] पेणजवळ वडगाव येथील जंगलात दि.१४/१०/१९३० रोजी सत्याग्रह करण्यात आला.यामध्ये सत्याग्रही श्री.शंकर त्रिंबक ठोसर, श्री.दत्तात्रेय श्री.महादेव गुरव आणि श्री.रघुनाथ धोंडो सावंत हे होते.त्यांनी नांगरखूट, लुंमणी येथे झाडे तोडून सत्याग्रह केला.त्यांना दि. १५/१०/१९३० रोजी सहा महिने सक्त मजुरीची शिक्षा देण्यात आली.

नाणेगावचा पहिला जंगल सत्याग्रह दि.०५/१०/१९३० रोजी श्री.शांताराम जगन्नाथ मोकाशी, श्री.गणेश भार्गव टिळक, श्री.गणपत धाकू हुजेर या सत्याग्रहींनी केला.त्यांनी बंद भागात शिरून टाहाळे तोडण्यास सुरुवात केल्यामुळे त्यांना पकडण्यात आले.यावेळी वरवण्याचे श्री.तुळाजीराव खोत व त्याचा मुलगा श्री.महादेव तुळाजी यांनी जमलेल्या लोकांवर नियंत्रण ठेवण्याचे काम केले.जंगल कायदा कलम २६ व इंडियन पिनल कोड कलम ११७ प्रमाणे चार महिने सक्त मजुरी व १५० रू.दंड, अगर २ महिने सक्त मजुरीची शिक्षा प्रत्येकाला देण्यात आली.[११] नाणेगाव येथे दुसरा जंगल सत्याग्रह दि.१५/१०/१९३० रोजी झाला.यावेळी श्री.प.रा.दाते, श्री.बापूजी आत्माराम मोकाशी, श्री.गजानन नारायण मलबारी यांनी बंद भागात जाऊन सत्याग्रह केला.ते बंद भागात शिरले आणि त्यांना अटक करण्यात आली.१६ आक्टोबर रोजी त्यांना ३ महिने सक्त मजुरीची शिक्षा आणि १५रु.दंड अगर एक महिना कैद अशी शिक्षा देऊन त्यांना ठाणे तुरुंगात पाठविले.दि.१४/१०/१९३० रोजी सत्याग्रहींनी मोठी मिरवणूक काढून बंद भागापर्यंत गेले.श्री.नारायण बगाराम गुरव, श्री.महादेव बाबाजी मांजरेकर यांनी जंगलात जाऊन टाहाळे तोडून सत्याग्रह केला.[१२] त्यांना सहा महिने सक्त मजुरीची शिक्षा देण्यात आली.

- **<u>अलिबाग तालुक्यातील जंगल सत्याग्रह :-</u>**

मीठ सत्याग्रह पावसाळा सुरू झाल्यामुळे बंद करण्यात आला.अलिबाग तालुका कॉंग्रेस कमिटीने जंगल सत्याग्रहचे शिबिर घेतले.श्री.द.का.कुंटे यांनी जंगलाचा सत्याग्रह कोठे सुरू करावा? या विषयी अनेकांशी चर्चा करून माहिती गोळा केली.अलिबाग तालुक्यात जास्त जंगल नसल्याने रोहे तालुक्यातील प्रदेशाची पाहणी केली.या तालुक्यातील गावात प्रचार सुरू केला.

'जंगलाचे कायदे व जनता' या विषयावर भाषणे केली. त्यामुळे रोहा तालुक्याचे फौजदार व जंगल अधिकारी यांनी श्री. कुंटे यांच्या विरोधात एक अहवाल वरिष्ठ अधिकाऱ्याकडे पाठविला. सरकारी नोकरीत असणाऱ्या एका अधिकाऱ्याने कुंटेना माहिती दिली की, तुम्हाला लवकरच अटक करण्यात येईल. त्यामुळे श्री. कुंटे यांनी श्री. बापूराव जोशी, श्री. नि. वा. सप्रे, श्री. पा. वा. सप्रे, श्री. ह. वा. महाजन यांच्याशी जंगल सत्याग्रहाच्या चळवळ संदर्भात चर्चा केली. पुढील चळवळीच्या नियोजनाचे धोरण ठरविले. परंतु लवकर श्री. द. का. कुंटे यांना अटक करून ठाणे तुरुंगात पाठविले.

अलिबाग तालुक्यातील चरी गावच्या लोकांची तीव्र इच्छा होती की, चरी येथे जंगल सत्याग्रह व्हावा. श्री. रामभाऊ कामत मास्तर यावेळी तालुका सत्याग्रह कमिटीचे प्रमुख होते. त्यांनी श्री. द. श. गोडबोले यांच्याकडे चरी सत्याग्रहाच्या नियोजनाची जबाबदारी सोपवली. श्री. गोडबोले स्वत: चरीला गेले. गावातील प्रतिष्ठित मंडळींची बैठक घेऊन आर्थिक निधी गोळा केला. श्री. रामभाऊ कामत यांनी श्रीमती पाटकर यांचेकडून ५१ रु. जमा झाल्याचे सांगितले. श्री. भगवानदास शहा, श्री. हरगोविंददास शहा यांनी प्रत्येकी २५रु. श्री. रामभाऊ कामतमास्तर यांनी १५रु., श्री. अण्णा प्रधान यांनी ११ रु. व इतर मंडळीकडून काही रक्कम असे एकूण १५० रु. जमा झाले.[१३] अशा रीतीने आर्थिक प्रश्न सुटला. अलिबागच्या मुख्य छावणीतर्फे जंगल सत्याग्रहाचे काम अनेक सत्याग्रहींनी केले. त्यामध्ये श्री. ह. वा. महाजन, थळचे डॉ. मधुकर आत्माराम रानडे, रोहĀाचे श्री. राजा चांदोरकर, वाघ्रणचे श्री. दत्तात्रय पाटील, रांजणखारचे श्री. गजानन नारायण पाटील, चरीचे श्री. नारायण थळे इ. अनेकांनी कामे केली. जंगल सत्याग्रहासाठी तालुक्यात निरनिराळ्या ठिकाणी छावण्या उघडल्या. प्रत्येक छावणीमध्ये ३ ते ४ सत्याग्रही व एक जबाबदार सत्याग्रहीची नियुक्ती करण्यात आली. भुवनेश्वर, परहुरपाडा, बोरघर, भिलजी इ. ठिकाणी सत्याग्रहींच्या छावण्या सुरू करण्यात आल्या. या छावण्यांमार्फत लोकजागृतीचे कार्य केले.

चरी सत्याग्रहाची जबाबदारी रामभाऊ कामतमास्तरांनी स्वीकारली. त्यांनी चरी गावात एक शिबिर घेतले. गावकऱ्यांना सत्याग्रहाचे स्वरूप व मार्गदर्शन केले. श्री. नारायण थळे, श्री. हसू रामजी पाटील, रांजणखारचे श्री. गजानन गणपत पाटील इ. सहभागी झाले होते. या सत्याग्रहामध्ये मराठी सातवी पास अगर मॅट्रिकपर्यंत शिकत असलेले विद्यार्थी होते.[१४] सत्याग्रहाच्या सुरुवातीस

दोन सुहासिनी भगिनींनी गाईची पुजा केली. नंतर गाईला व इतर जनावरांना जंगलाकडे वळविण्यात आले. त्यांच्याबरोबरच सत्याग्रही हातात विळे, कोयते घेऊन महात्मा गांधी की जय, जंगलाचा कायदा तोडा अशी घोषणा करून राखीव जंगलात जाण्याचा प्रयत्न केला. त्या ठिकाणी जंगलाचे अधिकारी व पोलीस हजर होते. त्यांनी श्री. वामन बुधाजी पाटील व श्री. रोहिदास नथू पाटील यांना व इतर सत्याग्रहींना अटक केली. अलिबाग तालुक्यात फणसपूर येथे सप्टेंबर महिन्यात जंगल सत्याग्रह करण्यात आला. यावेळी हजारो लोक जमा झाले होते. सत्याग्रहींनी टाहाळे तोडून सत्याग्रह केला. यावेळी श्री. गणपत बागवे (पेढांवे) व जागू अंबाजी पाटील (वाघ्रण) यांना अटक झाली.[१५]

## ▪ पनवेल तालुक्यातील जंगल सत्याग्रह :-

अखिल भारतीय काँग्रेसच्या आदेशानुसार पनवेल तालुका सत्याग्रह समितीची स्थापना करण्यात आली होती. श्री. गोविंद काशीनाथ पटवर्धन यांच्या वाड्यात सत्याग्रह कमिटीची कचेरी उघडण्यात आली, त्यालाच 'काँग्रेस हाउस' असे म्हणतात. पनवेल काँग्रेस सत्याग्रह कमिटीचे अध्यक्ष पळस्पे गावचे श्री. विनायकराव मोरेश्वर गोविलकर होते. शेठ चापसी पुरुषोत्तम उर्फ शंभूशेठ, श्री. केशव गणेश गुप्ते उर्फ भाईसाहेब गुप्ते, श्री. गोविंद काशिनाथ पटवर्धन ऊर्फ गोंदू काका इ. सदस्य होते. श्री. वसंत महादेव ऊर्फ आप्पासाहेब वेदक यांची सेक्रेटरी म्हणून निवड करण्यात आली.[१६] काँग्रेस हाउसमध्ये नेहमी सत्याग्रह संदर्भात चर्चा चालत असे. सत्याग्रहाची रूपरेषा, सत्याग्रहाची ठिकाणे, तेथील नेतृत्व आणि स्वयंसेवकांच्या याद्या, सभेचे नियोजन, प्रमुख वक्ते आणि त्यांचा प्रचाराचा प्रदेश इ. संबंधीची चर्चा चालत असे. तसेच प्रत्येक वेळी राष्ट्रीय व प्रांतीय नेत्यांकडून येणाऱ्या सूचना, जिल्हा काँग्रेस कार्यकारिणीकडून येणारे आदेश सर्वसामान्य कार्यकत्यापयत पोहोचविण्याचे काम पनवेल कमिटी करीत असे. अलिबाग येथील जिल्हा काँग्रेस कमिटीची बैठक संपवून श्री. प्रभाकर गुप्ते व श्री. नानासाहेब बेडेकर परत पनवेलला आले. त्यांनी श्री. आप्पासाहेब वेदकांच्या मदतीने चिरनेर, कल्हे, आंबेवाडी या ठिकाणी जंगल सत्याग्रह करण्याची योजना तयार केली. सत्याग्रहाच्या नियोजनासाठी प्रचार कमिट्या आणि त्यांच्याकडे विशिष्ट प्रदेश देण्यात आला. ती कमिटी त्या प्रदेशात प्रचारकार्य करत असे. शिवाय अनेक थोर देशभक्तांची व्याख्याने आयोजित करण्यात आली. स्वयंसेवक व स्वयंसेविकांचे दल स्थापन

करण्यात आले. त्यानुसार प्रचारकार्याला सुरुवात केली. त्यामुळे कॉंग्रेस हाउस म्हणजे गोंदूकाका पटवर्धनांचे घर रात्रं-दिवस जागे असे.

श्री. गोविंद काशीनाथ पटवर्धन हे टिळक भक्त आणि मवाळ विचारसरणीचे नेते होते. कोणी सत्याग्रही तुरुंगात गेल्यास त्यांचे अंत:करण भरून येत असे. तुरुंगातील सत्याग्रहीला स्वत:च्या घरचा जेवणाचा डबा पुरवित असत.[१७] श्री. विनायकराव मोरेश्वर गोविलकर हे प्रतिष्ठित असून पळस्पे गावचे जमीनदार होते. सरकारविरोधी सत्याग्रहाच्या वेळी सदैव कॉंग्रेस हाउसमध्ये असत. ते टिळकांचे परमभक्त व सावरकरांचे चाहते होते. ते चतु:सूत्री कार्यक्रमाचे प्रवचन आणि सत्याग्रहाचा प्रचार करत असत.[१८]

**➢ जंगल सत्याग्रहाचा प्रचार आणि प्रसार :-**

पनवेल तालुका सत्याग्रह समितीची स्थापना झाल्यानंतर जंगल सत्याग्रहाचे नियोजन करण्यात आले. सत्याग्रह यशस्वी व शांततेत पार पाडण्यासाठी सत्याग्रहाच्या प्रचाराचे नियोजन करण्यात आले. पनवेल येथील टेनिस कोर्टच्या मैदानावर सभा घेऊन जनजागृतीच्या कार्याला प्रारंभ केला. १५ जुलै ते ऑगस्ट अखेरपयत जंगल सत्याग्रहाची तयारी करण्यासाठी खेडोपाडी सत्याग्रह संघटना स्थापन केल्या.[१९] जंगल सत्याग्रहासाठी श्री. बापूसाहेब खरे यांनी स्वयंसेवक दलाची स्थापना केली. या स्वयंसेवक दलामध्ये श्री. नाना खरे, श्री. बाळ गडकरी, श्री. शंकर खरे, श्री. रामकृष्ण आपटे, श्री. बाबुराव आपटे, श्री. मोरारजी, श्री. बुध्या काका उर्फ वामनजी शंकर पांडव, श्री. नथू पांडव, श्री. मदन मानकामे, श्री. बबन प्रधान, श्री. राजा साठे इ. लोक प्रमुख स्वयंसेवक होते. प्रारंभीपासून श्री. बाळ गडकरी उर्फ वसंत गडकरी हे स्वयंसेवक दलाचे कॅप्टन होते,.[२०] पनवेलच्या स्वयंसेवक व सेविकींना कवायतीचे शिक्षण देण्यासाठी जुलै महिन्यामध्ये मुंबईहून सेवादलाचे शिक्षक श्री. शिरोडकर पनवेलला आले. त्यांनी महिनाभरात कवायतीची तयारी करून घेतली. श्री. शिरोडकरांच्या मदतीने पनवेलमध्ये स्वयंसेवक दलाची तयारी केली. याच वेळी श्री. प्रभाकर गुप्ते यांची बहीण विमल गुप्ते हिने एक महिला स्वयंसेविका दल तयार केले. तिने मुंबईला जाऊन तेथील स्वयंसेविकींच्या कामाचे निरीक्षण व अभ्यास केला. श्री. शिरोडकरांच्या मदतीने विमल गुप्तेने महिला स्वयंसेविका दल स्थापन केले.[२१]

पनवेल कॉंग्रेस सत्याग्रह कमिटीने सत्याग्रहाचा प्रचार करण्यासाठी आणि लोकांना संघटित करण्यासाठी अनेक थोर देशभक्तांची व्याख्याने आयोजित केली. त्याचप्रमाणे मुंबई प्रांतिक कॉंग्रेस

सत्याग्रह समितीनेही वेगवेगळ्या नेत्यांची प्रचारकार्यासाठी नियुक्ती केलेली होती. पुण्याचे एस. एम जोशी यांच्या दोन सभा झाल्या. पुणे युवक संघातर्फे श्री. डी. बी. कर्णिक आणि चिकेसर यांची भाषणे झाली. मुंबईचे नाटककार श्री. मामा वरेरकर यांचे व्याख्यान झाले. मुंबई प्रांतिक काँग्रेसतर्फे गुजराथी व्यक्तीचे भाषण झाले. त्यांनी व्याख्यानात अनेक वीरकथा सांगितल्या. 'हम कुछ ना कुछ कर जायेंगे' हा मंत्र त्यांनी लोकांना दिला. [२२] या मंत्राने पनवेलकर भारावून गेले होते. स्वयंसेवक दल व स्वयंसेविका दल यांनी पनवेल गावात व आसपासच्या परिसरात जाऊन सत्याग्रहाच्या संदर्भात जनजागृती केली. लोकांमध्ये नव्या गाण्यांच्या आधारे देशभक्ती व राष्ट्रवाद निर्माण करण्याचा प्रयत्न केला. प्रभातफेरीच्या माध्यमातून ब्रिटिश राजवटीविरुध्द घोषणा व भारतीय नेत्यांचा जयजयकार केला. आत्माराम अटवणे यांच्या घरी झालेल्या बैठकीत 'जंगल का कानून तोड दिया' हा क्रांतिकारकांचा मंत्र स्वीकारण्यात आला,,. [२३] श्री. प्रभाकर गुप्ते व श्री. नानासाहेब बेडेकर यांनी श्री. आप्पासाहेब वेदक यांच्या बरोबर सत्याग्रहाच्या संदर्भात चर्चा केली. राष्ट्रीय स्वातंत्र्य चळवळीच्या प्रवाहामध्ये ग्रामीण भागातील शेतकरी, स्त्रिया, आदिवासी, लहान मुले यांना सामावून घेण्याचा प्रयत्न करण्यात आला. त्यामुळे स्थानिक पातळीवर सत्याग्रह करता आला.

पनवेल व उरण परिसरातील जंगल सत्याग्रहाचे नेतृत्व श्री. आप्पासाहेब वेदक यांच्याकडे देण्यात आले होते. [२४] जंगल सत्याग्रह कोठे ?, केव्हा? आणि कसा करावयाचा? त्याचे नेतृत्व कोणी करावयाचे? कोणकोणत्या सत्याग्रहामध्ये कोणकोणते सत्याग्रही असावेत याची तपशीलवार माहिती श्री. वेदकांनी तयार केली. जी सत्याग्रहाची ठिकाणे निवडली त्याची प्रत्यक्ष पाहणी केली. त्या गावातील व परिसरातील लोकांना सत्याग्रह म्हणजे काय? त्याची तत्त्वे आणि सत्याग्रहाचे स्वरूप याविषयी माहिती देण्यासाठी अनेक सभा घेतल्या. त्यांच्याबरोबर अनेक नेते मंडळीवर विविध भागातील प्रचाराची जबाबदारी श्री. वेदकांनी सोपविली. श्री. आप्पासाहेब वेदकांनी उरण पेट्यात प्रचारासाठी जासई येथे आपले मुख्य केंद्र स्थापन केले. केंद्रामधूनच श्री. वेदकांनी सत्याग्रहाच्या प्रचाराचे कार्य केले. वेदकांच्या खांद्याला खांदा लावून निश्चय, आत्मीयता व सातत्याने काम करणारे श्री. अंताजी महादेव पोवळे,श्री. वसंत केशव पोवळे, श्री. सखाराम केशव पोवळे हे होते. पोवळ्यांच्या घरी कार्यकर्त्यांची जेवणखाण, प्रसंगी मुक्कामाचीही व्यवस्था उत्तम ठेवली जात असे. त्यांच्याकडे जाणे प्रत्येक स्वयंसेवकाला आनंदाचे वाटत असे. परिणाम खेड्यातील लोकांमध्ये नवचैतन्य निर्माण झाले. त्यामुळे उत्स्फूर्त लोकांनी सत्याग्रहामध्ये सहभाग

घेतला. श्री. प्रभाकर गुप्ते, श्री. असगर अली नुरुद्दीन यांनी नेरे, वांजे, पोयंजे, गाढे, मोहपाडा, गुळसंदे या विभागातून पायी तर कधी सायकलवरून प्रवास करून सत्याग्रहाचा प्रचार केला. श्री. प्रभाकर गुप्ते यांनी श्री. इस्माईल मस्ते, श्री. राजा साठे, श्री. बाबुराव आपटे, श्री. चिंतामण श्रृंगारपुरे, श्री. सोमण बंधू यांच्या मदतीने माथेरानच्या पायथ्यापर्यंत अनेक गावात प्रचार केला. नावडे, तळोजे, खारघर, चिरनेर, जासई येथे श्री. विनायकराव गोविलकर व प्रभाकर गुप्ते यांनी अनेक भाषणे केली. आपटे व कल्हे भागात प्रचाराची जबाबदारी श्री. किसन आपटे यांच्याकडे देण्यात आली. [२५]

पनवेल तालुका काँग्रेस कमिटीने स्वत:चे बुलेटीन सुरू केले. श्री. विनायक गोविलकर, श्री. मधुसूदन शंकर चिटणीस आणि श्री. प्रभाकर केशव गुप्ते हे बुलेटीन लिहिण्याचे काम करत असत. श्री. केशव गणेश गुप्ते यांच्या मदतीने ४० रुपयामध्ये सायक्लोस्टाईल मशीन खरेदी केले. बुलेटीनमधील श्री. प्रभाकार गुप्त्यांच्या प्रक्षोभक लिखाणामुळे पोलीसयंत्रणा जागी झाली. त्यांनी मशीनचा शोध घेण्यासाठी दररोज झडत्या चालू केल्या. परंतु मशीन त्यांना मिळत नसे. ही मशीन कधी गुप्ते यांच्या घरी, तर कधी शृंगारपुऱ्यांच्या वाड्यात राहणाऱ्या विधवाबाइच्या घरी, तर कधी श्री. तात्या बापट यांच्या वाड्यात असे. बुलेटीन छापण्याचे काम सरस्वतीबाई गुप्ते करत. त्यांच्या घरातील मोलकरणी दुर्गा पत्रके घमेल्यात भरून त्यावर गोवऱ्या किंवा लाकडे ठेवून ती श्री. बाळ गडकरी, श्री. लक्ष्मण महादेव नवरे, श्री. शंकर पांडव यांच्याकडे पोहोचवत असे. बुलेटीन वाटण्याचे काम श्री. कांदे, श्री. मदन मानकामे, श्री. शंकर पांडव ही लहान मुले अतिशय चपळाईने व कौशल्याने करीत. पोलीस झडती घेऊन गेले की, दोन तासात झडतीचे वर्णन करणारे बुलेटीन पोलीस स्टेशनमध्ये टाकले जात असे. बाळ गडकरी, लक्ष्मण महादेव नवरे यांना बुलेटीन वाटण्याबद्दल पकडले आणि शिक्षाही झाली. [२६]

पनवेलच्या स्वातंत्र्य चळवळीचा मुख्य आधारस्तंभ म्हणजे चापशी पुरुषोत्तम उर्फ शंभूशेठ होय. ते पनवेलचे प्रसिद्ध व्यापारी असून त्यांनी राष्ट्रीय स्वातंत्र्य चळवळीत स्वत:ला झोकून दिलेले होते. काँग्रेस कमिटीच्या प्रत्येक सभेला हजर राहून लोकांना मार्गदर्शन करत. चळवळीसाठी पैसा कमी पडला की मदतीसाठी पनवेलमधील श्रीमंत लोकांना चहापानाचे आमंत्रण देत असत. यामध्ये श्री. नानासाहेब पुराणिक, श्री. मेघजी मनजीशेठ, श्री. रतनशेठ वांठिया, श्री. भाऊसाहेब जाईल, श्री. आत्मारामशेठ आठवणे, श्री. तात्यासाहेब बापट इ. त्यांची हक्काची मंडळी असे. [२७]

त्यांच्याकडून पैसा जमा करून स्वातंत्र्य चळवळीसाठी देत असे. त्यामुळे या सर्व प्रकाराचा कर्ताकरविता शंभूशेठ आहे, असा पोलिसांचा दावा होता. म्हणून पोलिसांनी बुलेटीन मशीनच्या शोधण्यासाठी शंभूशेठच्या घराची झडती घेतली. परंतु मशीन मिळाले नाही. बुलेटीन छापण्याची सोय झाल्याने सर्व खेड्यापाड्यापर्यंत जंगल सत्याग्रहाची माहिती पोहोचविता आली. बुलेटीनच्या माध्यमातून नवीन गाणी, घोषणा, सत्याग्रहाची ठिकाणे, त्यांचे नेतृत्व, स्थानिक नेत्यांचे कार्यक्रम इ. माहिती गावोगावी पोहोचल्याने सत्याग्रहाचा प्रचार व प्रसार जलद गतीने झाला. परिणाम सत्याग्रहाच्या वेळी सर्व जाती-जमाती, धर्मातील हजारो स्त्री पुरुषांनी एकत्र येऊन एकजीवाने सत्याग्रह केला. ग्रामीण जनतेपर्यंत चळवळ पोहोचविण्याचा राष्ट्रीय काँग्रेसचा आणि म. गांधीचा हेतू या चळवळीमुळे सफल होऊ शकला.

➢ **जंगल सत्याग्रहाची वाटचाल :-**

पनवेल तालुक्यात सत्याग्रहाचा प्रचार करत असताना श्री. नानासाहेब बेडेकर व तालुका कमिटीचे अध्यक्ष श्री. विनायक गोविलकर यांना सप्टेंबरमध्ये अटक झाली. त्यामुळे जंगल सत्याग्रह सुरू करण्यापूर्वी पनवेल काँग्रेस कमिटी बरखास्त झाली. त्यानंतर काँग्रेस कमिटीचे नवे अध्यक्ष व जंगल सत्याग्रह समितीचा सर्वाधिकारी अशी दोन्हीही पदे श्री. प्रभाकर गुप्ते यांच्याकडे देण्यात आली.[२८] याच वेळी यवतमाळमध्ये लोकनायक श्री. माधवराव आणे यांनी चांदीच्या खुरप्याने सरकारच्या बंद भागात गवत कापून सत्याग्रह केला ही बातमी प्रसिद्ध होताच श्री. प्रभाकर गुप्ते यांनी पनवेलमध्ये एक सभा घेतली. प्रांतिक काँग्रेस कमिटीला पत्र लिहून पनवेल विभागात जंगल सत्याग्रह करण्याची परवानगी मागितली. प्रांतिक काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष श्री. शं. नवरे यांनी कळविले की, “जंगल सत्याग्रह फार जबाबदारीने करावयाचा असतो. तुम्हाला परवानगी देता येत नाही”. याला उत्तर म्हणून श्री. प्रभाकर गुप्ते यांनी कळविले की, “आम्ही जंगल सत्याग्रह करणारच. तुमची परवानगी असो वा नसो.[२९] कल्हे येथे सप्टेंबरच्या पहिल्या आठवड्यात पहिला जंगल सत्याग्रह करण्याचा निर्धार करण्यात आला. या निर्णयावर चर्चा करण्यासाठी श्री. गोंदूकाका पटवर्धन यांच्या माडीवरील काँग्रेस हाउसमध्ये एक बैठक घेण्यात आली. यामध्ये सत्याग्रह कसा करावयाचा? यावर वाद होऊन दोन गट निर्माण झाले. जंगल सत्याग्रह फक्त निवडक स्वयंसेवकांनी करावा. इतर जमावाने तो पाहात राहावे असे श्री. आप्पासाहेब वेदक, श्री. दादाभाई गुप्ते, श्री. शंभू शेठ इत्यादी मवाळवादी लोकांचे मत होते. हे मत श्री. प्रभाकर गुप्ते यांना मान्य

नव्हते.ते म्हणाले "एकदा जमाव जमविल्यावर लोक स्वस्थ बसतील असे तुम्हाला कसे वाटते? जंगल सत्याग्रह म्हणजे सत्यनारायणाची पूजा आहे काय".[३०] ३ सप्टेंबर १९३० च्या बैठकीमध्ये सत्याग्रह करावयाचे नियोजन करण्यात आले.परंतु या बैठकीमध्ये वाद होऊन सोमवार दिनांक ८ सप्टेंबर १९३० रोजी तारे, पोयंजे, गाढे, कल्हे आणि चिरनेर येथे सत्याग्रह करण्याचे मान्य झाले.

➢ **कल्हेचा जंगल सत्याग्रह ८ व १८ सप्टेंबर १९३०:-**

कल्हे गाव मुंबई-गोवा महामार्गावर असून पनवेलच्या दक्षिणेला ६ कि.मी. अंतरावर आहे.कर्नाळा किल्ल्याच्या पश्चिम बाजूस दाट जंगलामध्ये खोलगट भागामध्ये वसलेले आहे. शेजारीच कल्हे खिंड आहे.गावाच्या उत्तर बाजूस मोठे कर्नाळा अभयारण्य आहे.या जंगलात सत्याग्रह झाला.श्री आप्पासाहेब वेदक यांनी सरकारी बंद भागाच्या सीमा पाहिल्या.आंबेवाडी येथे मोठी सभा घेतली.शांततामार्गाने जंगल सत्याग्रह करावा अशी लोकांना सूचना दिली.सरकारने कसलेही अत्याचार केले तरी ते सोसून घेण्याबाबत लोकांना विनंती केली.तसेच या सत्याग्रहात हजारोंच्या संख्येने हजर राहून सविनय कायदेभंगाचा प्रयोग पाहण्याची लोकांना विनंती केली.[३१] एक सप्टेंबरला श्री.नानासाहेब बेडेकर यांची तुरुंगातून सुटका झाली.कल्हे जंगल सत्याग्रहाची तयारी म्हणून गुप्ते-बेडेकर यांनी परिसरात १० ते १२ सभा घेतल्या.श्री.प्रभाकर गुप्ते, श्री.नानासाहेब बेडेकर, श्री.आप्पासाहेब वेदक, श्री.दादाभाई गुप्ते यांनी सभा घेतल्या.कल्हे जंगल सत्याग्रहाचे नेतृत्व करणारे श्री.रामकृष्ण विश्वनाथ उर्फ किसनशेठ आपटे हे शिरढोणचे होते.[३२] कर्नाळा परिसरात त्यांची खूप लोकप्रियता होती.शेतकऱ्यांचे कैवारी अशीच त्यांची ओळख होती.पनवेल तालुक्यात भाताचे व्यापारी म्हणून प्रसिद्ध होते.सचोटीचा व्यवहार आणि सवाशी समभाव हे त्यांचे ब्रीद होते.८ सप्टेंबर रोजी कल्हे येथे श्री.किसनशेठ आपटे यांच्या नेतृत्वाखाली सकाळपासून सत्याग्रहाची जोरदार तयारी सुरू होती.या सत्याग्रहामध्ये परिसरातील गावे म्हणजे तारे, बारापाडा, साई, रावे, केळवणे, दिघाटी, शिरढोण, पळस्पे इ.गावातील लोक सहभागी झाले होते.[३३] श्री.वेदकांनी सत्याग्रहाची नोटीस सरकारी अधिकाऱ्यांना दिली.त्यामुळे सकाळी ७.३० वाजता फौजदार पाटील हे हत्यारबंद पोलीसास बंद भागात हजर होते.

श्री.किसनशेठ आपटे यांच्या नेतृत्वाखाली एक मिरवणूक निघाली.यावेळी किसनशेठची धर्मपत्नी यशोदाबाई यांनी प्रथम गो पूजन केले.सर्व सत्याग्रहींना कुंकूम तिलक व अक्षता लावून पंचारतीने औक्षण करून त्यांना वंदन केले.कल्हे ते आंबेवाडीकडे रांगेमधून मिरवणूक निघाली.

'रघुपती राघव राजाराम पतितपावन सिताराम' या भजनाच्या तालावर सत्याग्रही चालू लागले. श्री.बापुसाहेब खरे यांच्या नेतृत्वाखालील स्वयंसेविकांचे सर्व हुकूम सत्याग्रही आनंदाने पाळत होते.श्री.किसनशेठबरोबर स्थानिक गावचे पुढारी आणि त्यांचे सत्याग्रही सामील झाले होते. रावेगावचे श्री.बाळा रामा पाटील, श्री.गणपत बाळू पाटील, श्री.रघुनाथ गवऱ्या मोकल, तारेगावचे श्री.जानू पांडू पाटील, केळवणे गावचे श्री.अंबू खंडू ठाकूर, दिघाटीचे श्री.तुकाराम महादू म्हात्रे, कमळ्या श्री.गणू पाटील, शिरढोणचे श्री. आत्माराम विश्वनाथ आपटे, पनवेलचे श्री.मारूती मुकुंद पन्हाळे, श्री.गदाधर त्र्यंबक खरे, श्री.चिंतामण खरे इ.प्रमुख होते.[३४] ही सत्याग्रही मंडळी सरकारी बंद भागात शिरली. भारतमातेचा व म.गांधीजींचा जयजयकार करून हातातील कोयत्याने झाडे तोडली व गवत कापले.संध्याकाळी पनवेल येथे सत्याग्रहींनी हातात तोडलेल्या झाडाच्या फांद्या घेऊन मिरवणूक काढली.सत्याग्रहामध्ये भाग घेतलेल्या अनेकांना पकडून पनवेलला आणले.मामलेदारसाहेबांच्या परवानगीने सर्व सत्याग्रहींना बेड्या घातल्या.दुसऱ्या दिवशी सवाना एक वर्षाची सक्त मजुरीची शिक्षा मामलेदार श्री.जोशी यांनी ठोठावली.कल्हे गावाचा जंगल सत्याग्रह अतिशय नियोजनबद्ध असून म.गांधीजींना अपेक्षित असल्याप्रमाणे म्हणजे शांतता मार्गाने झाला.

कल्हे येथे १८ सप्टेंबर १९३० रोजी दुसरा जंगल सत्याग्रह करण्याचे नियोजन केले.दोन दिवस मुसळधार पाऊस पडत होता.त्यामुळे कॉंग्रेस कमिटीने सत्याग्रह स्थगित करण्याचा निर्णय घेतला.[३५] परंतु पूर्वनियोजनानुसार तेथे लोक जमा झाले.मामलेदार जोशी, फौजदार पाटीलही हजर होते. श्री.पाटील यांनी लोकांना धमकी दिली की "खबरादार पुन्हा जमा झाला तर गोळ्या घालीन".याला उत्तर म्हणून लोकांनी भारतमाता, म.गांधी, नेहरू यांचा जयजयकार करून बंद जंगलात प्रवेश केला आणि गवत कापले, झाडे तोडली आणि लोकांनी शांतपणे सत्याग्रह केला.यावेळी सत्याग्रहाचे नेतृत्व बाबुराव आपटे यांनी केले.त्यांना अटक करून पनवेलला आणले.श्री.आपटे यांना शिक्षा करण्यात आली.[३६]

**➢चावणे जंगल सत्याग्रह ८ सप्टेंबर १९३० :-**

पनवेल कॉंग्रेस सत्याग्रह कमिटीने जंगल सत्याग्रहासाठी निवडलेल्या केंद्रांपैकी चावणे हे एक ठिकाण होते.इतर केंद्रांच्या तुलनेने हे केंद्र आडमार्गावर आणि एक दुर्गम भागातील ठिकाणी होते.कल्हे सत्याग्रहाच्या तुलनेने येथे लोक फारच कमी जमा झाले होते.कराडे, गुळसुंदे, मोहपाडा,

जांबिवली आणि आसपासच्या परिसरातून ४०० ते ५०० लोक जमा झाले होते. सत्याग्रहाचे नेतृत्व विष्णू महादेव सोमण यांच्याकडे देण्यात आलेले होते.[३७] श्री. विष्णू महादेव सोमण हे मोहपाडा गावचे असून देशसेवेसाठी आपले सर्व जीवन त्यांनी खर्च केले. चावणे येथे अनेक सत्याग्रही जंगलात घुसले. त्यांनी जळाऊ लाकडे तोडली,गवत कापले आणि सत्याग्रह अतिशय शांततेच्या मार्गाने केला. यावेळी फक्त तीन पोलीस हजर होते, त्यांनी श्री. विष्णू महादेव सोमण यांना अटक करून पनवेलला आणले. त्यानंतर त्यांना ठाणे तुरुंगात पाठविले. पनवेल कॉंग्रेस कमिटीचे सर्वाधिकारी प्रभाकर गुप्ते यांनी चावणे येथे १८ सप्टेंबर रोजी दुसऱ्या जंगल सत्याग्रहाची तयारी सुरू केली. पनवेल शहराच्या ईशान्येस वावंज्यापासून ते पूर्वेस गाढे गावापर्यंत व आग्नेयेस गुळसुंदे, मोहपाडा, जांबिवली आणि नैर्ऋत्येस सर्व विभागात लोक जागृतीचे कार्य केले. यासाठी श्री. गुप्ते व श्री. बेडेकर यांनी प्रचारसभा घेतल्या. ठिकठिकाणी सत्याग्रहींच्या नावांच्या नोंदी केल्या. त्यामुळे या विभागात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले. चावणे केंद्रावर १८ सप्टेंबरचा दुसरा जंगल सत्याग्रह श्री. गंगाधर केशव दांडेकर यांच्या नेतृत्वाखाली झाला. साधारणत: ५०० लोक जमा झाले होते. सत्याग्रहींनी झाडे तोडली, गवत कापले, पालापाचोळा व लाकूड फाटा गोळा करून सत्याग्रह केला. त्यामुळे श्री. गंगाधर दांडेकर यांना अटक करण्यात आली. पनवेलच्या मामलेदारांसमोर हजर केले.

### ➢ गाढे व वावंजे येथील जंगल सत्याग्रह :-

पनवेल कॉंग्रेस कमिटीच्या सल्ल्यानुसार गाढे व वावंजे येथील स्थानिक व्यक्तीने जंगल सत्याग्रहाचे नियोजन व तयारी केली. सत्याग्रहाच्या वेळी श्री. शिवराम वामन टिपणीस यांना भाषण केल्यामुळे अटक झाली. श्री. विनायक वासुदेव चितळे यांनी सत्याग्रहाचे नेतृत्व केल्याने त्यांना पकडले. त्यानंतर श्री. पद्या ठाकूर हा आदिवासी सत्याग्रहात असल्याने त्यालाही पकडले. त्या सर्वाना पनवेलला पाठविण्यात आले. श्री. टिपणीस,श्री. पद्या ठाकुर,श्री. चितळे यांना एक वर्षाची सक्त मजुरीची शिक्षा झाली. वावंजे येथे श्री. असगर अलीच्या नेतृत्वाखाली सत्याग्रह करण्याचे ठरले होते. कारण या प्रदेशात मुसलमान समाज जास्त होता. परंतु गाढे येथे सत्याग्रह सुरू झाल्याने असगर अली व त्याचा दोस्त नुरुद्दीन यांनी त्यात भाग घेतला. त्यामुळे दोघांनाही सहा महिन्याची शिक्षा झाली. ८ व १८ सप्टेंबरच्या जंगल सत्याग्रहाच्या वेळी सत्याग्रहात भाग घेतलेल्या अनेक सत्याग्रहींना शिक्षा झाली. त्याच्या निषेधार्थ पनवेलच्या जैन हॉलमध्ये निषेध सभा झाली.

श्री. आत्मारामशेठ आठवले, श्री. बाबासाहेब फडके यांची भाषणे झाली. त्या वेळी सरकारच्या धोरणावर टीका करण्यात आली.

## ❖ उरण तालुक्यातील चिरनेर जंगल सत्याग्रह :-

पनवेल काँग्रेस कमिटीच्या मार्गदर्शनाखाली उरण तालुक्यातील चिरनेर येथे ८, १८ व २५ सप्टेंबर रोजी जंगल सत्याग्रह करण्यात आले. त्यापैकी ८ व १८ सप्टेंबरचे सत्याग्रह शांततेत पार पडले. २५सप्टेंबरच्या सत्याग्रहात गोळीबार होऊन आठ सत्याग्रही हुतात्मे व सरकारी लोक ठार झाले. सत्याग्रहींवर सरकारने खटले भरले. ते पनवेल व ठाणे कोर्टात चालविण्यात आले. त्यातील काहींची निर्दोष सुटका झाली तर काहींना शिक्षा झाली. २५ सप्टेंबरचा चिरनेरचा सत्याग्रह गोळीबारामुळे सर्व देशात गाजला.

### ● ८ सप्टेंबरचा चिरनेर जंगल सत्याग्रह :-

काँग्रेस सत्याग्रह कमिटीच्या निर्णयानुसार ८ सप्टेंबर रोजी चिरनेर येथे जंगल सत्याग्रहाचे नियोजन करण्यात आले. चिरनेर जंगल सत्याग्रहाचे नेतृत्व श्री. रामकृष्ण गणेश उर्फ बाबुराव आपटे यांच्याकडे देण्यात आले.[३८] श्री. बाबुराव आपटे हे शिरढोण गावचे जमीनदार होते. अकोल्याचे श्री. हरिभाऊ जोशी, श्री. मामासाहेब पेंडसे यांच्या प्रोत्साहनाने ते जंगल सत्याग्रहामध्ये ते सहभागी झाले. श्री. बाबुराव आपटे यांनी गणपती मंदिरासमोर श्री. जुवेकर यांची गाय आणली. तिला स्नान घालून, गळ्यात फुलांच्या माळा घालून, विधीयुक्त पूजा केली व नंतर सर्व सत्याग्रही गो-मातेचा जयजयकार करीत प्रचंड मिरवणुकीने सरकारी वन विभागाकडे निघाले. त्यांच्या तोंडी भजन, नवीन गाणी सुरू होती. ती म्हणजे

'जंगल आमुचे असून, सरकार बसलंय टपून

झाडे तोडण्याची बंदी आम्हाला, मोठं नवल वाटतय आम्हाला.

या गाण्याच्या तालावर कार्यकर्ते आक्कादेवीच्या डोंगराकडे निघाले. यावेळी काही लोकांनी गुरांचे कळप बरोबर घेतले होते. डोंगरावरील सपाट माळावर वडाच्या झाडाखाली सर्व लोक एकत्र जमले. श्री. बाबुराव आपटे यांची सभा झाली. त्यांनी आदेश दिले की "चला हा कायदा मोडून काढण्यासाठी येथील झाडोरा आपल्या कुंपणासाठी तोडून आपला हक्क बजावुया".[३९] असे म्हणताच कार्यकर्ते जंगलात घुसून त्यांनी झाडेझुडपे तोडण्यास सुरुवात केली. राखीव जंगलात गवत कापले. गुरांना चरावयास जंगलात घुसविले. काही लोकांनी वाळकी लाकडे, फाटी गोळा

केली आणि सत्याग्रह शांततेने पार पाडला.या सत्याग्रहाच्या वेळी श्री.केशव गणेश गुप्ते यांची कन्या विमल गुप्ते आघाडीवर होत्या.तिने या भागातील स्त्रियांना सत्याग्रहासाठी सहभागी करून घेतले.फॉरेस्ट खात्याने आपल्या मदतीसाठी बंदुकधारी सात ते आठ पोलीस आणले होते. सत्याग्रही व पोलीस यांच्यात धरपकड झाली.फक्त श्री.बाबुराव आपटे यांना कैद करून पनवेलला आणले.मामलेदार जोशी यांनी या प्रकरणी आपटे यांना इंडियन पिनल कोड क्र.११७ अन्वये ८ महिन्यांची सक्त मजुरीची शिक्षा ठोठावली.

**● १८ सप्टेंबरचा चिरनेर जंगल सत्याग्रह :-**

काँग्रेस कमिटीच्या निर्णयानुसार उरण तालुक्यात दुसरा जंगल सत्याग्रह करण्यात आला.यावेळी सत्याग्रहाची जोरदार तयारी करण्यात आली.श्री.नाना बेडेकर, श्री.आप्पासाहेब वेदक, श्री.अंताजी महादेव पोवळे, श्री.सखाराम केशव पोवळे, श्री.वसंत पोवळे, श्री.चिर्लेकर इ.मंडळी अत्यंत कष्टाने लोकांना संघटित करण्याचे कार्य करीत होती.चिरनेरच्या नऊ पाड्यांमधून प्रभातफेरी काढून गुरूवार दिनांक १८ सप्टेंबर १९३० रोजी श्री.केशव गणेश उर्फ भाई साहेब गुप्ते यांच्या नेतृत्वाखाली दुसरा सत्याग्रह झाला.[४०] चिरनेर व आसपासच्या खेड्यातील एकूण दोन हजार लोक सत्याग्रहासाठी जमा झाले.मारूती मंदिरासमोरील पटांगणात श्री.केशव गुप्त्यांची सभा झाली.त्यानंतर माळावरती श्री.गोपीनाथ नारायण वाणी, श्री.गोविंद सखाराम दामले यांनी भाषणे केली.त्यांना पोलिसांनी अटक केली आणि इंडियन पिनल कोड क्र.३७९ नुसार त्यांना आठ महिन्याची शिक्षा झाली.[४१] यावेळी फौजदार पाटील म्हणाले की "सर्व लोकांनी निघून जावे, नाही तर लाठीमार, प्रसंगी गोळीबार केला जाईल" परंतु लोक न घाबरता बाजूच्या जंगलात शिरून लाकडे, डाहळ्या तोडून लोकांनी सत्याग्रह केला.१८ सप्टेंबरच्या जंगल सत्याग्रहाच्या संदर्भात वेगवेगळे विचारप्रवाह दिसून आले.श्री.वसंत भाऊ पाटील, श्री.प्रभाकर गुप्ते, कुलाबा समाचार, श्री.दत्ता रहाळकर यांच्या विचारानुसार सत्याग्रह झाला.तर श्री.प.रा. दाते यांच्या मतानुसार जोरदार पाऊस आल्याने सत्याग्रह झालाच नाही.या सत्याग्रहाचे उद्देश व नेतृत्व याबाबतही मतभेद दिसून येतात.श्री.दत्ता रहाळकर यांच्या मतानुसार हा सत्याग्रह श्री.बाबुराव आपटे यांच्या नेतृत्वाखाली झाला.तर श्री.वसंत पाटील, कुलाबा समाचारानुसार श्री.केशव गणेश गुप्ते यांच्या नेतृत्वाखाली डाहाळी मिळविण्यासाठी सत्याग्रह झाला.एकंदरीत १८

सप्टेंबरचा जंगल सत्याग्रह हा केशव गुप्ते यांच्या नेतृत्वाखाली डाहाळी तोडण्यासाठी करण्यात आला.

## ❖ २५ सप्टेंबरचा आक्कादेवी डोंगरावरील जंगल सत्याग्रह :-

चिरनेर येथे ८ सप्टेंबर व १८ सप्टेंबर रोजी जंगल सत्याग्रह करण्यात आले. १८ सप्टेंबरच्या जंगल सत्याग्रहाच्या वेळी पुन्हा जंगल सत्याग्रह करण्यात येईल, असे सांगण्यात आलेले होते. त्यानुसार पनवेल सत्याग्रही कमिटीची बैठक झाली. श्री. प्रभाकर गुप्ते व श्री. बेडेकर यांनी २५ सप्टेंबरला चिरनेर येथे जंगल सत्याग्रह होईल असे जाहीर केले. त्यानुसार या सत्याग्रहाची तयारी सुरू झाली. सत्याग्रह कार्यकत्याना व परिसरातील लोकांना येण्याचे आवाहन करण्यात आले. त्यासाठी १९सप्टेंबरपासून ते २३ सप्टेंबरपर्यंत श्री. प्रभाकर गुप्ते, श्री. विनायक गोविलकर, श्री. पांडुरंग काळण या नेत्यांनी प्रचाराचे कार्य सुरू केले. २० सप्टेंबर १९३० रोजी चिरनेर येथील श्रीराम मंदिरात सभा झाली. या सभेचे अध्यक्ष चिरनेरचे श्री. वैद्य अंताजी महादेव ऊर्फ अण्णा पोवळे हे होते, .[४२]

### ▪ जंगल सत्याग्रहाची तयारी :-

दिनांक २३ व २४ सप्टेंबर रोजी श्री. आप्पासाहेब वेदक आणि त्यांचे चिरनेरचे सहकारी श्री. अंताजी महादेव पोवळे,श्री. केशव सखाराम पोवळे,श्री. जनार्दन काशीनाथ पोटे, श्री. परशुराम अंबू, म्हात्रे यांनी चिरनेर सभोवतीच्या विंधणे, दिघाटी, जुई, कळंबुसरे, कोप्रोली, पानदिवे, साई, गोवठाणे, वशेणी गावात फिरून प्रचार केला. २४ सप्टेंबर रोजी रात्री देवळात श्री. वेदक व श्री. पोटे यांची सभा झाली. यावेळी जाहीर केले की, "जंगलातील लाकडे तोडण्यासाठी कोयते, कुऱ्हाडी व दिंड्या घेऊन सर्वानी यावे व शांततेने सत्याग्रह करावा" हा संदेश लोकांना या सभेच्या वेळी देण्यात आला.[४३] श्री. प्रभाकर गुप्ते व श्री. नानासाहेब बेडेकर यांनी चिरनेर, जासई, वेश्वी, कोप्रोली येथील सभेमध्ये जहाल भाषणे करून सभा जिंकल्या. सत्याग्रहासाठी लोकमत तयार केले. डॉ. अण्णा पोवळे यांच्या सांगण्यावरून श्री. लक्ष्मण चावजी नारंगीकर याने मोठी जुई येथे जाऊन लोकांनी सत्याग्रहासाठी यावे म्हणून ताकीद दिली. सर्वानी सत्याग्रहाला आले पाहिजे, न आल्यास यापुढे तुमची फाटी, गाडगी बंद करण्यात येतील. चिरनेर परिसरातील अनेक गावात कार्यकर्त्यांनी सत्याग्रहाचा प्रचार करून वातावरण तयार केले. परिणाम २५ सप्टेंबरच्या जंगल सत्याग्रहासाठी लोकांची मने जागृत झाली.

पनवेल सत्याग्रही मंडळीने २५ सप्टेंबरपासून एक आठवडा जंगल सत्याग्रह म्हणून जाहीर केला. खोपटेचे राणा म्हात्रे यांच्याकडे सत्याग्रहींना इशारा देण्याचे काम सोपविण्यात आले. अचानक काही घडल्यास प्राथमिक औषधोपचारासाठी डॉ. त्र्यंबक कृष्णा फडके यांची नियुक्ती केली.[४४] सत्याग्रहाच्या संदर्भात सर्व घटनांच्या तपशीलवार नोंदी घेऊन त्याचे नियोजन केले. तसेच त्याची जबाबदारी लोकांवर टाकलेली होती. २४सप्टेंबर रोजी कार्यक्रमाचा आढावा आणि २५ सप्टेंबरच्या नियोजनासाठी तालुक्यातील कार्यकत्याची बैठक झाली. या बैठकीत सत्याग्रहाची संपूर्ण जबाबदारी चिरनेर सत्याग्रह समितीवर टाकण्यात आली. २५ सप्टेंबरच्या चिरनेर जंगल सत्याग्रहाचे प्रमुख म्हणून श्री. केशव गणेश ऊर्फ भाईसाहेब गुप्ते यांची निवड करण्यात आली. सत्याग्रहाच्या ठिकाणी संकटाला तोंड देण्यासाठी व त्यातून मार्ग काढण्यासाठी पनवेल येथे श्री. आप्पासाहेब वेदक, श्री. नानासाहेब बेडेकर, श्री. प्रभाकर गुप्ते यांनी तयारीत राहावे. त्यांनी चिरनेरला जावू नये असा निर्णय या बैठकीमध्ये घेण्यात आला.

- **सत्याग्रही तुकड्यांचे अगमन:-**

अश्विन शुद्ध ३ शके १८५२ गुरूवार दि. २५ सप्टेंबर १९३० रोजी सविनय कायदेभंग चळवळीच्या इतिहासात चिरनेरचा जंगल सत्याग्रह झाला. या दिवशी पहाटेपासून मुसळधार पाऊस पडत होता. १०-११ वाजता पाऊस कमी झाला. त्यामुळे गावामधील लोक एकत्र येऊ लागले. ते एकत्र आल्यानंतर चिरनेरकडे त्यांनी वाटचाल सुरू केली. त्यामुळे गावागावातील सत्याग्रहाच्या तुकड्या चिरनेरमध्ये जमा झाल्या.

चिरनेर रानवई सत्याग्रही तुकडीमध्ये श्री. धनाजी जोमा म्हात्रे,श्री. लक्ष्मण बाबाजी नारंगीकर,श्री. अंताजी पोवळे,श्री. मेघश्याम पोवळे, श्री. नाथ्या महाद्या कातकरी, श्री. धाकू गवत्या फोफेरकर इ. प्रमुख कार्यकर्ते आणि गावकरी यांचा समावेश होता. मोठी जुईच्या सत्याग्रही तुकडीमध्ये श्री. रामा बाया कोळी,श्री. विष्णुपंत रहाळकर,श्री. शंकरराव चौधरी,श्री. बाळाराम पोस पाटील, श्री. काश्या रामा पाटील, श्री. सेना भोईर इ. प्रमुख असून गावकरी त्यांच्या नेतृत्वाखाली होते. खोपटे गावच्या सत्याग्रही तुकडीमध्ये श्री. हसुराम बुधाजी घरत, श्री. गणा जोमा ठाकुर, श्री. काशीनाथ बुध्या पाटील इ. प्रमुख कार्यकर्ते आणि गावकरी यांचा समावेश होता. धाकटी जुईच्या तुकडीमध्ये श्री. आनंद माया पाटील, श्री. महाद्या माळ्या म्हात्रे, श्री. गणा जोमा ठाकुर इत्यादींचा समावेश होता. पाणदिवे गावच्या सत्याग्रही तुकडीमध्ये श्री. परशुराम रामा पाटील,

श्री.सिताराम गोमा ठाकुर, श्री.उंदीर हरी मोकल इ.प्रमुख नेते होते.दिघोडा गावच्या सत्याग्रही तुकडीमध्ये श्री.आळू बेमटÝा म्हात्रे आणि त्यांचे गावकरी होते.कोप्रोली गावच्या सत्याग्रही तुकडीमध्ये श्री.जनार्दन काशीनाथ पोटे, श्री.गणपत हिराजी म्हात्रे, श्री.रघुनाथ मोरेश्वर नाव्ही, श्री.पद्मा कमलाकर म्हात्रे, श्री.पांडुरंग काशीनाथ पोटे, श्री.परशुराम एवू,, श्री.नारायण हाश्या पाटील इ.प्रमुख असून शेकडो गावकरी सहभागी झाले होते.[४५] विमल केशव गुप्ते यांच्या नेतृत्वाखाली पनवेल व चिरनेर परिसरातील स्त्रियांची सत्याग्रही तुकडी चिरनेरला आली होती.

- **ब्रिटिश सरकारचे दडपशाहीचे धोरण:-**

चिरनेर जंगल सत्याग्रह हा तिसरा सत्याग्रह असून तो झाडे तोडण्याचा सत्याग्रह होता.झाडे तोडणे म्हणजे जंगल कायद्याचा प्राण नष्ट करण्यासारखे होते.त्यामुळे सरकारी यंत्रणा जागृत झाली.त्यांनी ठरविले की, हा झाडे तोडण्याचा जंगल सत्याग्रह यशस्वी होऊन द्यावयाचा नाही. यासाठी पोलीस पाटील, तलाठी, फॉरेस्टगार्ड, जमादार, फौजदार, सर्कल, इन्स्पेक्टर व मामलेदार इत्यादींना दक्ष राहण्याचे हुकूम सरकारने दिले.सरकारी अधिकाऱ्यांनी ही चळवळ बंद करण्याच्या हेतूने गावोगावी दवंडी दिली.तसेच गावातील सरकारी नोकर व हितचिंतक, पोलीस पाटील, तलाठी, वेसकर यांना चिरनेर मुक्कामी जाण्यास सांगितले.मामलेदार श्री.केशव महादेव जोशी यांनी आप्पासाहेब वेदक यांच्याशी चिरनेर सत्याग्रहात अनुचित प्रकार घडण्याचा संभव आहे काय? या संदर्भात चर्चा केलेली होती.

चिरनेर येथे सब डिव्हिजनल फॉरेस्ट ऑफिसर श्री.बापू रामचंद्र आलेकर,रेंजर, जंगलगार्ड, राऊंडगार्ड उपस्थित होते.दिघोडे गावचे तलाठी श्री.त्रिंबक गोपाळ कारूळकर,उरणचे महालकरीसाहेब उपस्थित होते.पनवेलचे मामलेदार श्री.केशव महादेव जोशी स्वत: हजर होते. इतर अनेक लहान-मोठे अधिकारी सत्याग्रहाच्या वेळी उपस्थित होते.[४६] जंगल सत्याग्रह यशस्वी होऊ नये म्हणून करड्या व करारी स्वभावाचे इन्स्पेक्टर श्री.रामचंद्र दौलत पाटील यांची खास नियुक्ती केली होती.त्याच्या मदतीसाठी सुभेदार श्री.बुधाजी लक्ष्मण भोसले या सेवानिवृत्त सुभेदाराच्या नियंत्रणाखाली एक पोलीस पथक पाठविण्यात आले होते.पोलीस इन्स्पेक्टर श्री.पाटील अलिबागहून आलेल्या हत्यारी व बिनहत्यारी पोलिसांसह आक्कादेवीच्या माळावर सकाळपासून हजर होते.सत्याग्रहाच्या वेळी हजर असलेले पोलीस पुढीलप्रमाणे

## संगिनधारी पोलीस

| | |
|---|---|
| १) श्री.कृष्णाजी गोविंद दळवी | ९) श्री.गोविंद रावजी गायकवाड |
| २) श्री.तुकाराम नारायण देसाई | १०) श्री.भिकाजी लक्ष्मण कदम |
| ३) श्री.लक्ष्मण बाबाजी चव्हाण | ११) श्री.हरी नारायण तवटे |
| ४) श्री.विठू बाबू घोसाळकर | १२) श्री.जयराम बाबाजी सावंत |
| ५) श्री.अंतू गणपत पाटील | १३) श्री.नारायण पांडू कदम |
| ६) श्री.शिवाजी केशव सावंत | १४) श्री.बाळाराम रामा शेडगे |
| ७) श्री.दौलनी सखाराम | १५) श्री.डुंबरे व इतर |
| ८) श्री.केशव सखाराम घोसाळकर | |

## लाठीधारी पोलीस

| | |
|---|---|
| १) श्री.शांताराम महादेव सावंत | २) श्री.कृष्णाजी अनंत सावंत |
| ३) श्री.दौलत सखारम ठुंबरे | ४) श्री.श्रीपत बालाजी व इतर |

### ▪ २५ सप्टेंबरचा जंगल सत्याग्रह:-

सर्व गावच्या सत्याग्रही तुकड्या भजन, गाणी म्हणत व सोबत कुऱ्हाडी, कोयते घेऊन चिरनेर गावात यानंतर सर्वजण ३ किमी असलेल्या आक्कादेवीच्या डोंगराकडे निघाले.जाताना भजन, राष्ट्रीय गीते, घोषणा आणि जयजयकार करत ही मंडळी डोंगराकडे गेली.यावेळी 'जंगल का कानून तोड दो" व 'नही रखनी, नही रखनी, ये जालिम सरकार नही रखनी' या घोषणा लोक देत होते.[४७] डोंगरावरील आक्कादेवीच्या समोरील विस्तारीत माळरानावर लोक जमा झाले. सत्याग्रहामध्ये चिरनेरचे वैद्य अंताजी महादेव पोवळे अग्रभागी असून वेळोवेळी सत्याग्रहींना सूचना देत होते.

जंगल सत्याग्रह करण्यासाठी चिरनेर परिसरातील सुमारे पाच हजार लोक दुपारी १२ वाजेपयत आक्कादेवीच्या डोंगरावर जमा झाले.चिरनेरच्या श्री.नामाजी गोपाळ मोकल याने डोंगरावरील उंच सागाच्या झाडावर मोठा तिरंगा झेंडा फडकाविला.वडाच्या पारावर उभे राहून श्री.शंकर नारायण पांडव यांनी पोवाडा सादर केला.सत्याग्रह शांततेने पार पाडावयाचा आहे असे सत्याग्रहाचे नेते श्री.भाई गुप्ते सांगत होते.चिरनेरचे श्री.हरिभाऊ बाळकृष्ण जोशी, श्री.मोरेश्वर

बाळकृष्ण जोशी या वयस्कर व्यक्ती हजर होत्या. शेवटी खोपटयाचा श्री. गणा जोमा ठाकुर याने शिंग फुंकले, त्याच क्षणी लोक जंगलात घुसू लागले.[४८]

सत्याग्रही व सरकारी यंत्रणा हे दोघेही यावेळी आक्रमक होते. सत्याग्रहाच्या जमावाच्या तुलनेने पोलिसांचे संख्याबळ अतिशय कमी होते. पोलीस दलाने सत्याग्रही मंडळींना रोखण्याचा प्रयत्न केला. त्याला प्रतिउत्तर म्हणून जमावाने आक्रमण भूमिका घेतली. श्री. विठू अंबानी नारंगीकर याने पहिला साग तोडला. यावेळी श्री. माथा कानू व श्री. नामाजी गोपाळ हे त्याच्या सोबतीला होते.[४९] इतर सर्व सत्याग्रहींनी 'म. गांधीजी की जय', 'भारत माता की जय' अशा घोषणा देत साग तोडण्यास सुरुवात केली. यावेळी पूर्वेकडील टेकडीवर इन्स्पेक्टर श्री. पाटील यांनी सत्याग्रहींवर लाठीमार सुरू केला. एका व्यक्तीच्या थोबाडात मारली. त्याला सत्याग्रही म्हणून अटक केली. इतर चार-पाच लोकांना बेड्या घातल्या. त्या वेळी इतर सत्याग्रहींनी सागाची झाडे तोडली. ते मुद्दे मालासह पोलिसाकडे आले. "आम्ही साग तोडला आहे. आम्ही गुन्हा केला आहे. तो सत्याग्रहाला मान्य आहे. हा आमचा मुद्देमाल आहे. आम्हाला बेड्या घाला, याचा पंचनामा करा" असे शेकडो सत्याग्रही बोलत होते.[५०] काही सत्याग्रहींनी पाटील यास प्रश्न केला की, "आम्हाला गुन्हा कबूल आहे, तरी आम्हाला अटक करा. मारहाण कशासाठी करता?" मारहाण प्रकरणावरून सर्वत्र गोंधळ सुरू झाला. याच वेळी श्री. लक्ष्मण चावजीने शिपायाच्या पाठीत दांडके मारले. त्यामुळे सर्वत्र अधिकच गोंधळ झाला.

पनवेलचे श्री. नारायण धोंडू उर्फ नाना खरे हे टेकडी उतरून खाली आले. आक्कादेवीच्या देवळाजवळ बसलेल्या मामलेदार श्री. जोशींना म्हणाले, "आमच्या कामात अडथळे आणू नका. पाटील आमच्या सभोवती लोकांवर छडीमार करीत आहेत." श्री. नाना खरेसह मामलेदार श्री. जोशी टेकडीवर आले. त्यांनी प्रथम पाटलांना छडीमार बंद करण्याचा हुकूम दिला. तो पाटलांनी पाळला. त्यानंतर सवाच्या बेड्या काढण्याचा आदेश दिला. त्यामुळे सवाच्या बेड्या काढल्या.[५१] या घटनेमुळे श्री. पाटील अतिशय चिडले होते. परंतु प्रथम मुद्देमालाचा पंचनामा करा, नंतर सत्याग्रहींना अटक करा असे मामलेदार जोशींनी श्री. पाटील यास सांगितले. त्यामुळे सत्याग्रही आनंदी झाले व जंगल का कानून तोड दिया "नही रखनी, नही रखनी ये जालिम सरकार नही रखनी" अशा घोषणा दिल्या. या घटनेमुळे श्री. पाटील अतिशय चिडले होते. पोलिसांनी मुद्देमाल व बेड्या घालून सत्याग्रहींना गावाकडे चालविले. पुढे पोलीस त्यांच्या मागे सत्याग्रही कैदी

त्यांच्यामागे पाटील व इतर अधिकारी व त्यांच्यामागे मामलेदार श्री.जोशी असे माळावरून खाली उतरून चालले होते.याच वेळी शेजारील विहिरीवर पाणी पिण्यासाठी मामलेदार श्री.जोशी गेले.सत्याग्रही कैदी चालत असताना त्यांच्या बाजूने स्वयंसेवक साखळी करून रांगेत चालले होते. सत्याग्रही शांत व शिस्तबद्ध चालले होते.त्यांना उद्देशून श्री.पाटील म्हणाले की, "माझा इंगा तुम्हाला माहीत नाही.मी सातारा जिल्हा नरम केलेला आहे.सोलापूरचा झेंडा सत्याग्रह मोडून काढला आहे" असे बडबडत रागाने चालला होता.[५२] आक्कादेवी मंदिराजवळील वडासमोर लोक जमू लागले.घोषणा व जयजयकार करत गर्दी वाढली होती.लोकांनी पोलिसांच्या दिशेने दांडके, दगडे फेकली.चिरनेरचा पोलीस पाटील श्री.शिवराम विठू पाटील याला कोप्रोलीच्या श्री.सोमा वाळ्या पाटील यांने दांडक्याने मारले.त्यामुळे वातावरण तंग झाले.'पोलिसांना धरा, मारा' असा आवाज घुमू लागला.त्यामुळे गर्दीत पळापळ सुरू झाली.त्यामुळे फौजदार पाटील याला धक्का लागल्याने त्याचा पटका उडला.त्यामुळे तो अतिशय रागवला आणि 'बुधाजी जान बचाव' ही ऑर्डर फौजदार पाटीलने दिली.कोणीतरी फायर असे म्हटले.त्याबरोबर पोलिसांनी गोळीबार सुरू केला.[५३] गोळीबार करणारे पोलीस ओढ्यात व पश्चिमेला गावाकडे जाणाऱ्या रस्त्यात उभे होते. त्यांनी पूर्व व दक्षिणेच्या जंगलाकडे गोळीबार केला.

मामलेदार श्री.जोशी विहिरीवरूनच धावत व हात उंच करत पोलिसांकडे धावत आले.'ऑर्डर कोणी दिली? गोळीबार थांबवा" असे सांगत होते.पाटील एका झाडाजवळ उभे होते.त्याने तिथूनच मामलेदार श्री.जोशींवर गोळ्या झाडल्या.तसे ते खाली पडले.पंधरा वषाची विमल केशव गुप्ते धावत जवळ गेल्या.श्री.जोशींचे डोके मांडीवर घेऊन पाणी आणा.तसे पट्टेवाला श्री.गणपत जयपाल, श्री.अंबू दामले व इतर लोक जमा झाले.चिरनेरचे श्री.मोरेश्वर जोशी यांनी धोतराचा सोगा भिजवून पाणी आणले.परंतु त्याचा उपयोग झाला नाही.मामलेदार जोशी मरण पावले होते.जंगल राऊंडगार्ड श्री.काशीनाथ जनार्दन शेवडे यांच्यावरही श्री.पाटीलने गोळी झाडली.हा सर्व प्रकार पाहून लोक पाटीलकडे धावले.पाटीलला पाठीमागून पकडण्यासाठी नाना खरे यांनी संकेत दिले.त्यानुसार श्री.धनाजी जोमा म्हात्रे यांनी पाटलाच्या हातावर जोराचा फटका मारला.त्यामुळे पिस्तुल पडले ते पिस्तुल श्री.धनाजी म्हात्रेने श्री.माया कानू याच्याकडे दिले.त्यामुळे फौजदार पाटील नि:शस्त्र झाले.[५४] लोकांनी फौजदार पाटील यांच्याकडे धाव घेऊन त्याला मारहाण करण्यास सुरुवात केली.त्याचा जीव धोक्यात आहे हे ओळखून श्री.भाईसाहेब

गुप्ते, श्री.नाना खरे, श्री.सखाराम अण्णा पोवळे, श्री.मेघनाथ बाळाजी पोवळे आणि इतर काँग्रेसच्या स्वयंसेवकांनी त्यांच्या सभोवती कडे केले.लोकांना हात जोडून विनंती केली.श्री. सखाराम पोवळे यांनी आपल्या डोक्यावरची खादी टोपी पाटलाच्या डोक्यावर ठेवली आणि चिरनेर गावात त्याला सुखरूप पोहोचविले.

- **गोळीबारातील हुतात्मे आणि जखमी :-**

पोलिसांनी केलेल्या गोळीबारामध्ये आठ जंगल सत्याग्रही हुतात्मे झाले व काही जखमी झाले.त्याचप्रमाणे सरकारी हुकुमावरून आलेल्या सरकारी व्यक्ती ठार व जखमी झाल्या होत्या. त्या पुढीलप्रमाणे:

**सत्याग्रहींमध्ये हुतात्मे**

१ ) श्री.धाकू गवत्या फोकेरकर चिरनेर

२ ) श्री.रामा बामा कोळी मोठी जुई

३) श्री.परशुराम बामा पाटील पाणदिवे

४) श्री.हाशिराम बुध्या घरत खोपर्टे

५) श्री.रघुनाथ मोरेश्वर न्हावी शिंदे कोप्रोल

६) श्री.आनंदा माया पाटील धाकटी जुई

७) श्री.आलु बेमट्या म्हात्रे दिघोडे

८) श्री.नाग्या महादू कातकरी चिरनेर

**जखमी सत्याग्रही**

१) श्री. बाळाराम रामजी ठाकुर चिरनेर रांजणपाडा

२) श्री.नानाभाई लक्ष्मण पोवळे चिरनेर

३) श्री.पांडू देऊ कुंभार चिरनेर तेलीपाडा

४) श्री.कुंडाजी चिमा पाटील कोप्रोली

५) श्री.आप्पा अंबू म्हात्रे कोप्रोली

६) श्री.मर्या काथारी म्हात्रे कोप्रोली

७) श्री.सिना माया भोईर मोठी जुई

८) श्री.जोमा धर्मा गोवारी मोठी जुई

९) श्री.जोमा नामा कोळी मोठी जुई

१०) श्री. धाया नामा ठाकूर खोपटे

११) श्री. सोमा चांगू पाटील टाकीगाव

१२) श्री. चांगू राघो पाटील पाण दिवे

१३) श्री.हरी गणू ठाकूर पाण दिवे

१४) श्री.सोमा भगू ठाकूर आवरे

**सरकारी यंत्रणेमधील ठार झालेल्या व्यक्ती**

१) मामलेदार श्री.केशव महादेव जोशी

२) राऊंडगार्ड श्री.काशिनाथ जनार्दन शेवडे

३)पोलीस श्री.जयराम बाबाजी सावंत

४)शिपाईश्री.नारायण पांडू कदम

५) श्री.शिवराम विठू पाटील

## ▪ सत्याग्रहाचा शेवट :-

चिरनेर सत्याग्रहाच्या ठिकाणी अलिबागचे २२ हत्यारी पोलीस होते. प्रत्येकाकडे तीस काडतुसे होती. पनवेलचे २० पोलीस होते. एकूण हत्यारी व बिनहत्यारी पोलिसांची संख्या ४२ होती. गोळीबारामुळे सर्वत्र गोंधळ, पळापळ, रडारड सुरू झाली. पोलिसांमध्ये काही पोलीस चिरनेर गावाकडे, काही पूर्वेकडे डोंगर ओलांडून चिंचवण, पळस्पे गावच्या बाजूस पळाले. चिरनेर गावाकडे गेलेल्या पोलिसांनी गावात गोळीबार केला. त्यामुळे अनेक लोक जखमी झाले. स्वत:च्या रक्षणासाठी पोलिसांनी कपडे टाकून दिली. जमिनीवर मेल्यासारखे पडले. यामध्ये अलिबागचे पोलीस श्री. अनंत गणपत पाटील याने जीभ बाहेर काढून मेल्यासारखा पडला.[५५] शेलार नावाच्या पोलिसाने बंदूक फेकून दिली. पडलेला एक फेटा डोक्याला बांधून तो कसाबसा लोकांमधून निसटला.[५६] इन्स्पेक्टर श्री. रामचंद्र दौलत पाटील याला काँग्रेस नेत्यांनी चिरनेरच्या काँग्रेस हाउसमध्ये म्हणजेच श्री. सखाराम अण्णा पोवळे यांच्या घरी लपवून ठेवले. श्री. पाटील समोर ओटीवर न बसता स्वयंपाक घरात जाऊन लपून बसला. श्री. पटवर्धन, श्री. वेदक, श्री. गोविलकर यांनी स्वत:च्या गाडीतून श्री. पाटीलला पनवेल पोलीस स्टेशनमध्ये सोडले. मामलेदार केशव जोशी यांचे प्रेत त्याच दिवशी सायंकाळी सात वाजता पुराणीकच्या मोटारीने पनवेलला आणले. पनवेलचे दुसरा वर्ग मॅजिस्ट्रेट श्री. गांगुली यांनी कलेक्टर रायगड व प्रांत ऑफिसर उत्तर विभाग यांना टेलीग्राम करून बोलवून घेतले. २६ सप्टेंबर रोजी प्रेताचा पंचनामा केला. पोस्टमार्टमच्या वेळी श्री. सदाशिव कृष्ण फडके श्री. वैश्यंपायन श्री. तात्यासाहेब लिमये इ. मंडळी होती. सत्याग्रहीही माळावरून गावाकडे पळून गेले. सरकारी भीतिपोटी जंगल, शेतात दडून बसले. संध्याकाळी ७ वाजेपयंत सर्वत्र गोंधळ होता. अंधार पडण्यास सुरुवात झाली. त्याबरोबर सत्याग्रहाचाही शेवट झाला.

## ❖ सत्याग्रहाच्या संदर्भात सरकारची भूमिका :-

चिरनेरला गोळीबार झाल्यामुळे पोलिसांना सरकारी व लष्करी मदत मिळेल. त्यामुळे गावाला एक प्रकारे लष्करी छावणीचे स्वरूप प्राप्त होईल, म्हणून चिरनेरकडे येणारे सर्व रस्ते बंद करण्यासाठी झाडे तोडून रस्त्यावर टाकणे, मोरी तोडणे आणि रस्ता बंद करणे असा गावातील लोकांनी विचार केला. परंतु रस्ता बंद केल्यास आपणाला मदत मिळणार नाही. त्यामुळे रस्ता बंद करण्याचा निर्णय घेतला नाही. २५सप्टेंबरच्या रात्री ११ च्या सुमारास शस्त्रधारी ७५-८० पोलिसांची एक तुकडी साताऱ्याहून चिरनेर गावी आली. नंतर १२ वाजता आणखी पोलीस आले. हे सर्वजण

गणपती मंदिराजवळ थांबले . पनवेलचे फौजदार श्री . धोंडू गणपत सावंत २५सप्टेंबरला रात्री दोन वाजता चिरनेरला आले . त्याच्यानंतर ठाणे व रायगडचे डी . एस . पी आणि त्यानंतर उरण, कर्जतचे इन्स्पेक्टर चिरनेरला आले . त्यामुळे चिरनेर गावात भीतीचे वातावरण निर्माण झाले .

- **सरकारी यंत्रणेची चौकशी व पंचनामे :-**

२६ सप्टेंबर रोजी सकाळी पोलीस अधिकारी व पोलीस आक्कादेवीच्या माळावर गेले . तेथे जागेवर प्रेते पडलेली होती . त्यांचे पोलिसांनी पंचनामे केले . श्री . शेवडे,श्री . कदम,श्री . जयराम सावंत,श्री . धाकू फोफेरकर,श्री . रघुनाथ न्हावी यांची प्रेते प्रथम उरण नंतर पनवेलला पंचनाम्यासाठी पाठवली .[५८] परंतु पोलिसांनी केलेल्या पंचनाम्यावर विश्वास नसल्याने दुसरे पंचनामे करावेत व पोस्टमाटमच्या वेळी दुसऱ्या डॉक्टरांना हजर राहण्याची परवानगी द्यावी . अशा आशयाचा अर्ज कॉंग्रेस नेत्यांनी दुसरा वर्ग मॅजिस्ट्रेट श्री . गांगुली यांच्याकडे केला . परंतु त्याचा काहीच उपयोग झाला नाही . राऊंडगार्ड व पोलिसांच्या प्रेतावर पनवेल येथे व सत्याग्रहींच्या प्रेतावर उरण येथे अत्यंसंस्कार करण्यात आले . २६ ते ३० सप्टेंबर १९३०या काळात पोलिसांनी सत्याग्रहाच्या वेळी जे साहित्य वापरलेले होते, त्या मालाचा पंचनामा करून तो जप्त केला . त्याचा पुरावा म्हणून कोर्टात दाखल केला . पंचनामा केलेले साहित्य व त्याचा तपशील

**दि . २६ . ०९ . ३० रोजी चिरनेर चावडी येथील जप्त केलेला माल .**

| अ . न . | तपशील | रुपये | आणे | पैसे |
|---|---|---|---|---|
| १ | रायफलचे काडतुसाचे खोके २ | ० | ० | ० |
| २ | रायफलचे काडतुसाचे चार्जर ४ | ० | १ | ० |
| ३ | मस्केटचे खोके काडतुसांचे ५ | ० | १ | ३ |
| ४ | मस्केटचे काडतुसे २ | ० | १ | ६ |
| ५ | **एकूण** | ० | ३ | ९ |

### दि.२६. ०९.१९३० रोजी चिरनेर येथील जप्त केलेला माल

| अ.न. | तपशील | रुपये | आणे | पैसे |
|---|---|---|---|---|
| १ | रायफलचे काडतुसाचे खोके पितळेचे | ० | १ | ६ |
| २ | रायफलची भरलेली काडतुसे ४ चार्जसह | ० | ४ | ० |
| ३ | मस्केटचे खोके ९ | ० | २ | ३ |
| ४ | कोयती एक मुठीसह | ० | ८ | ० |
| ५ | बक्कल नंबर १९७ चा चप्पल जोड १ | २ | १० | ० |
| ६ | बक्कल नंबर ६७ या चप्पल जोड १ | २ | १० | ० |
| ७ | बक्कल नंबर ८० चे डाव्या पायाची चप्पल १ | १ | ५ | ० |
| ८ | बक्कल नंबर १७५ चा चप्पल जोड १ | २ | १० | ० |
| ९ | **एकूण** | १० | ४ | ९ |

### दि.३०. ०९. १९३० रोजी चिरनेर येथील जप्त केलेला माल

| अ.न. | तपशील | रुपये | आणे | पैसे |
|---|---|---|---|---|
| १ | रिव्हॉलवर एक चामड्याच्या कव्हरात असलेले | ९२ | ६ | ० |
| २ | चामड्याचा ब्राऊनबेल्ट तुकडे केलेला | ० | १२ | ० |
| ३ | रिव्हॉलवरची भरलेली काडतुसे १८ | २ | ४ | ० |
| ४ | तांबडे ताकाचे दांडे २ | ० | ० | ६ |
| ५ | कपड्याचा पॅड | ० | ० | ३ |
| ६ | काचेची दौत | ० | १ | ९ |
| ७ | पंचनाम्याचे कागदाचे तुकडे | ० | ० | ० |
| ८ | **एकूण** | ९५ | ०७ | ९ |

### दि.०४.११.३० रोजी आक्कादेवीच्या डोंगरावर जप्त केलेला माल

| अ.न. | तपशील | रुपये | आणे | पैसे |
|---|---|---|---|---|
| १ | रिव्हॉलवरची काडतुसे भरलेली | ० | १४ | ० |
| २ | टाकांच्या पिशवीचा पुढील चामड्याचा तुकडा १ | ० | ० | ० |
| ३ | टाकांच्या होल्डरचा जस्तीसहित पुढील भागा | ० | ० | ० |
| ४ | टाकांची एक बोथी सर्व गंज असलेली | ० | ० | ० |
| ५ | **एकूण** | **०** | **१४** | **०** |

## • चिरनेर खटल्याची तयारी :-

चिरनेर हत्याकांडाच्या खटल्यासाठी आरोपी व साक्षीदार यांचा शोध घेण्यासाठी२६ सप्टेंबर रोजी प्रांत ऑफिसर श्री.कौंडिण्य चिरनेरला आले.ते विंधणे येथील श्री.फकीअल्ली फकी इस्माईल शिलोत्री(बापू खोत)यांच्या बंगल्यावर थांबले.त्यांनी आजूबाजूच्या गावातील पोलीस पाटील व हस्तक यांची एक बैठक घेतली.त्यामध्ये चिरनेर खटल्यामध्ये कोणाकोणाला आरोपी करावे व साक्षीदार कोण? या संदर्भात चर्चा करण्यात आली.यावेळी काँग्रेस नेत्यांनी कौंडिण्याची भेट घेऊन मॅजिस्ट्रेट श्री.गांगुली यांच्याकडे अर्ज दिला.तो शिष्टमंडळाला वाचून दाखविला. सरकारी वरिष्ठ डॉक्टरांची परवानगी असल्याशिवाय पोस्टमार्टमच्या वेळी कोणाला हजर राहता येणार नाही.तसेच नवीन पंचनामे करता येणार नाहीत असा मजकूर काँग्रेस नेत्यांना कळविला.

कलेक्टर व प्रांत ऑफिसर ३० सप्टेंबर रोजी चिरनेरला लक्ष्मण नारायण जुवेकर यांच्या बंगल्यावर आले.तेथे चौकशी ऑफिस सुरू करण्यात आले.चौकशीसाठी लोकांनी यावे म्हणून गावात दवंडी देण्यात आली.परंतु गावातील एकही व्यक्ती चौकशीसाठी आली नाही.त्यानंतर सरकारी लोकांना पाठवून काही व्यक्तींना बोलवून आणले.श्री.पांडू देऊ कुंभार, श्री.गजानन बाळू चिर्लेकर, श्री.धनाजी जोमा म्हात्रे, श्री.बाळू रोमजी ठाकूर, श्री.राघो विठू मोकल यांच्या केंद्रावर जबान्या घेतल्या.[५९] चिरनेर गावात पोलिसांचा सक्त पहारा बसवून कलेक्टर व प्रांत ऑफिसर पनवेलला गेले.

प्रांत ऑफिसर श्री.कौंडिण्य यांनी पनवेलच्या डाक बंगल्यामध्ये चौकशी केंद्र सुरू केले. चिरनेर परिसरातील अनेक लोकांना बोलावून त्यांच्या जबान्या घेतल्या.२ ऑक्टोबर १९३० रोजी श्री.शंकर नारायण पांडव, श्री.मदन गजानन मानकामे(पनवेल),श्री.बाळाराम पोशा पाटील(मोठी जुई)यांच्या जबान्या घेतल्या.त्यांनी जबानीमध्ये सांगितले की, “इन्स्पेक्टर पाटीलने तोंडात मारले, छडीमार केला.लाठीमाराचा हुकूम दिला, शेवटी खालच्या माळावर आल्यावर गोळीबार करण्याचा हुकूम दिला व  त्याने मामलेदार जोशींवर गोळ्या घातल्यामुळे ठार झाले”.त्यामुळे जनतेच्या जबान्या घेणे बंद केले.त्यानंतर सरकारी नोकर व हस्तक यांच्या जबान्या घेण्यास सुरुवात केली.

## • राजे चौकशी आयोग :-

चिरनेर सत्याग्रहाची व घडलेल्या प्रकारांची चौकशी करण्यासाठी सरकारने ३ ऑक्टोबर १९३० रोजी नोटीफिकेशन काढले.ठाणे जिल्ह्याचे डेप्युटी सुपरिटेंड ऑफ पोलीस द्वारकानाथ

शिवराम राजे यांची नेमणूक केली.[६०] त्यांनी ४ ऑक्टोबर १९३० रोजी चौकशीची सूत्रे हाती घेतली. या प्रकरणाची माहिती घेण्यासाठी त्यांनी प्रांत ऑफिसर कौंडिण्य, पोलीस इन्स्पेक्टर पाटील यांच्याशी पनवेल येथे चर्चा केली. ११ ऑक्टोबर रोजी डी. एस. पी. श्री. राजे चिरनेरला गेले. चिरनेर येथे श्री. लक्ष्मण नारायण जुवेकर याच्याकडे मुक्काम केला. त्यांनी अनेक प्रकारची माहिती प्राप्त केली. १२ ऑक्टोंबर रोजी धरपकड सत्र सुरू केले. त्यामध्ये श्री. दामा नागा गोंधळी, श्री. चांगू आंबू पाटील, श्री. कमळ्या सरडोक गोंधळी यांना पकडले. गावात पोलीस चौकी नसल्याने गणपतीच्या मंदिरात तात्पुरती पोलीस कोठडी बनवली. त्यामध्ये संशयितांना बांधून ठेवले. श्री. राजे यांनी अमानुष व अनन्वित छळ करून त्यांच्या जबान्या घेण्यास सुरुवात केली. त्यामुळे परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले.

रायगडचे शेतकऱ्यांचे पुढारी आमदार श्री. नारायण नागू पाटील यांना चिरनेरमधील घटनेची माहिती धनाजी जोमा पाटील यांनी दिली. दुसऱ्या दिवशी आमदार श्री. पाटील व आमदार श्री. ए. एम. सुर्वे सकाळी ९ वाजता चिरनेरला पोहोचले. चर्चा करत असताना आमदार श्री. ना. ना. पाटील व राजे यांच्यात वादावाद झाली. त्यामुळे आमदार श्री. पाटील यांना १४४ कलमाखाली पनवेल व उरण तालुक्यात येण्यास बंदी घातली. शिवाय त्यांच्या घराभोवती पोलिसांचा सक्त पहारा ठेवला. विंधणे येथे श्री. बापू खोत यांच्या माडीवर सरकारी ऑफिस सुरू करण्यात आले. सर्व खटल्याचे नियोजन करण्यात आले. चिरनेर गावातील दोन साक्षीदार व तीन पोलीस साक्षीसाठी तयार केले. हे श्री. अंबाजी तांडेल यांना समजताच त्यांनी श्री. ना. ना. पाटीलला माहिती सांगितली. त्यामुळे चिरनेर जंगलात गावकीची सभा घेऊन आम्ही कोणीही खोटी साक्ष देणार नाही अशा शपथा घेतल्या. तरीपण राजे यांनी १२ ऑक्टोबरपासून धरपकड सत्र सुरू करण्यात आले. साधाणरपणे नोव्हेंबरअखेरपयत अटक सत्र सुरू होते. त्यामध्ये अनेक लोकांना पकडले

- **पनवेलचा फौजदारी खटला:-**

सरकारी अधिकारी डी. एम. पी. श्री. राजे यांनी सत्याग्रहाच्या गोळीबार प्रकरणाची चौकशी सुरू केली. या कामात प्रांत ऑफिसर कौंडिण्य, इन्स्पेक्टर श्री. रामचंद्र दौलत पाटील, विंधण्याचे श्री. बापू खोत, चिरनेरचे पोलीस पाटील श्री. शिवा पाटीलने मदत केली. या चौकशी अहवालाच्या आधारे श्री. राजे यांनी पनवेल कोर्टात खटला भरला. लोकांना चेतावणी देण्याकरिता उत्तेजक भाषणे करणे, कायदा मोडण्यासाठी सत्याग्रह करणे, सत्याग्रहासाठी कोयते, काठ्या,

कुऱ्हाडी घेऊन येण्यास उत्तेजन देणे. सत्याग्रहींना पकडले म्हणून पोलिसांना मारहाण करणे. शेवडे, तेवटे,कदम, सावंत या सरकारी नोकरांना ठार मारणे. पोलिसांजवळील मालमत्ता, बंदुकी, संगीनी रिव्हॉलवर, काडतुसे, कपडे लुटून नेणे इ. गंभीर आरोप या खटल्यात दाखल करण्यात आले. इंडियन पिनल कोड कलम १४७, १४८, १४९, ३०२, ३९५, ३७९, २२४ व १२० व प्रमाणे हा खटला ४७ लोकांवर भरण्यात आला.

**<u>चिरनेर खटल्यातील ४७ आरोपी पुढीलप्रमाणे :-</u>**

| आरोपी नंबर | आरोपीचे नाव | ठिकाण | अटक दिनांक |
|---|---|---|---|
| १ | श्री. लक्ष्मण चावजी नावंगीकर | चिरनेर | १३.०.१९३० |
| २ | श्री. विठू अंबाजी नारंगीकर | चिरनेर | १३.१०.१९३० |
| ३ | श्री. तुकाराम विठू मोकल | चिरनेर | १४.१०.१९३० |
| ४ | श्री. माया कानू पाटील | चिरनेर | १४.१०.१९३० |
| ५ | श्री. हासू बाळू खारपाटील | चिरनेर | १४.१०.१९३० |
| ६ | श्री. नामाजी गोपाळ मोकल | चिरनेर | १३.१०.१९३० |
| ७ | श्री. अंबाजी सोमा पाटील | शोभ | १४.१०.१९३० |
| ८ | श्री. अंताजी महादेव पोवळे | चिरनेर | २२.१०.१९३० |
| ९ | श्री. जयराम सखाराम वाणी | चिरनेर | २७.१०.१९३० |
| १० | श्री. मेघनाथ बाळाजी पोवळे | चिरनेर | २२.१०.१९३० |
| ११ | श्री. सखाराम केशव पोवळे | चिरनेर | २५.१०.१९३० |
| १२ | श्री. परशुराम अंबू म्हात्रे | कोप्रोली | २५.१०.१९३० |
| १३ | श्री. अंबाजी नथू नारंगीकर | चिरनेर | १३.१०.१९३० |
| १४ | श्री. जनार्दन काशीनाथ पोटे | कोप्रोली | ९.११.१९३० |
| १५ | श्री. बाळाराम पोशा पाटील | मोठी जुई | १५.१०.१९३० |
| १६ | श्री. पद्या कमळ्या म्हात्रे | कोप्रोली | ९.११.१९३० |
| १७ | श्री. केशव गणेश गुप्ते | पनवेल | १४.११.१९३० |
| १८ | श्री. धनाजी जोमा म्हात्रे | चिरनेर | ८.११.१९३० |
| १९ | श्री. गजानन बाळू चिरलेकर | चिरनेर | ८.११.१९३० |
| २० | श्री. रामा धाकू नारंगीकर | चिरनेर | १३.१०.१९३० |
| २१ | श्री. बारक्या गवत्या फोकेरकर | चिरनेर | १३.१०.१९३० |
| २२ | श्री. राघो माया मोकल | चिरनेर | १३.१०.१९३० |
| २३ | श्री. तुकाराम कृष्णा ठाकूर | चिरनेर | १३.१०.१९३० |
| २४ | श्री. गणपत अंबाजी नारंगीकर | चिरनेर | १३.१०.१९३० |
| २५ | श्री. वसंत महादेव वेदक | पनवेल | १६.१०.१९३० |
| २६ | श्री. कानू झिटया पाटील | भोम | १४.१०.१९३० |
| २७ | श्री. काशा रामबा पाटील | मोठी जुई | २२.१०.१९३० |

| | | | |
|---|---|---|---|
| २८ | श्री.महादू हाल्या म्हात्रे | धाकटी जुई | २३.१०.१९३० |
| २९ | श्री.पांडुरंग काशीनाथ पोटे | कोप्रोली | १२.११.१९३० |
| ३० | श्री.दामा नागू गोंधळी | चिरनेर | १२.१०.१९३० |
| ३१ | श्री.नारायण धोंडू खरे | पनवेल | ठाणे शिक्षा |
| ३२ | श्री.शंकर नारायण पांडव | पनवेल | ठाणे शिक्षा |
| ३३ | श्री.मदन गजानन मानकामे | पनवेल | ठाणे शिक्षा |
| ३४ | श्री.चांगू आंबू पाटील | भोम | १२.१०.१९३० |
| ३५ | श्री.कमळ्या सरडोक गोंधळी | चिरनेर | १२.१०.१९३० |
| ३६ | श्री.बारकू अंबाजी चिरलेकर | चिरनेर | १३.१०.१९३० |
| ३७ | श्री.तुकाराम गणू म्हात्रे | धाकटे भोम | १५.०.१९३० |
| ३८ | श्री.हिरा पांगा साईकर | पाणदिवे | १३.१०.१९३० |
| ३९ | श्री.उंदीर हरी मोकाशी | पाणदिवे | १८.१०.१९३० |
| ४० | श्री.नारायण हाशा पाटील | कोप्रोली | १८.१०.१९३० |
| ४१ | श्री.दामा हासू पाटील | कोप्रोली | १८.१०.१९३० |
| ४२ | श्री.सीताराम गोमा ठाकूर | पाणदिवे | १८.१०.१९३० |
| ४३ | श्री.सोमा बाळू पाटील | कोप्रोली | १८.१०.१९३० |
| ४४ | श्री.गणा जोमा ठाकूर | खोपटे | २८.१०.१९३० |
| ४५ | श्री.हिराजी गणपत म्हात्रे | कोप्रोली | ३०.१०.१९३० |
| ४६ | श्री.त्र्यंबक नारायण बेडेकर | आपटे | २५.११.१९३० |
| ४७ | श्री.मसण्या कमळ्या म्हात्रे | कोप्रोली | २८.११.१९३० |

## ❖ सत्याग्रहाच्या संदर्भात कॉंग्रेस भूमिका :-

चिरनेर सत्याग्रहाच्या वेळी श्री.नानासाहेब बेडेकर, श्री.प्रभाकर गुप्ते, श्री.आप्पासाहेब वेदक हे श्री.पटवर्धनांच्या घरी म्हणजे कॉंग्रेस कचेरीत बसले होते.संध्याकाळी ८ वाजण्याच्या सुमारास चिरनेर सत्याग्रहामध्ये काहीतरी गोंधळ झाल्याची त्रोटक माहिती सवाना मिळाली.त्यामुळे श्री.गोंदुकाका पटवर्धन,श्री.वेदक, श्री.गोविलकर मोटारीने चिरनेरला निघाले.ओवळे गावाजवळ चिरनेरहून येणारे डॉ.फडके व इतर लोक भेटले.त्यांनी चिरनेरमध्ये घडलेली सर्व माहिती सांगितली.त्यानंतर ते सर्वजण चिरनेरला गेले.श्री.सखारामशेठ पोवळे यांच्या घरी सत्याग्रहींशी झालेल्या प्रकाराची चर्चा केली.सरकारी सूत्रे हालण्यापूर्वी सर्व पुराव्यांच्या गोष्टी नष्ट केल्या पाहिजेत यासाठी आज रात्री आक्कादेवीच्या माळावर सत्याग्रहीने वापरलेली होलपटे, दगड गोळा करून सर्व माळरान साफ केले पाहिजे.तसेच लोकांनी मारलेले पोलीस हे गोळीबारातच ठार झाले असे सिद्ध करणे, असा सल्ला श्री.वेदकांनी दिला.

त्यांच्या सल्ल्यानुसार श्री.लक्ष्मण चावजी नारंगीकर,श्री.धनाजी जोमा म्हात्रे, श्री. बारक्या अंबाजी चिर्लेकर, श्री.माया कानू पाटील, श्री.हाशा बाळू खारपाटील, श्री.तुकाराम कृष्णा ठाकूर इ.गावकऱ्यांनी रात्री ८ ते १० वाजेपर्यंत सर्व माळरान साफ केले.श्री.माया कानू पाटील याने पोलिसांच्या मुड्यांवर गोळ्या घातल्या.[५७] सर्व काम संपवून सर्वजण गावात परत आले.पनवेल काँग्रेसचे सर्व नेते श्री.आप्पासाहेब वेदक व डॉ.पटवर्धन यांनी चिरनेरच्या सात पाड्यात फिरून गोळीबारात जखमी झालेल्या लोकांना औषधोपचार करणे, त्यांच्या जखमांना मलमपट्टी करणे इ.कामे केली.तसेच जखमीना मुंबई काँग्रेसच्या हॉस्पिटलमध्ये जावे असा सल्ला दिला.जे भीतिपोटी जंगलात, शेतात लपून बसले होते त्यांना परत गावात येण्याचे आवाहन केले. डॉ.पटवर्धन, पनवेल काँग्रेस व जनतेने दिलेली आर्थिक मदत एकत्र करण्यात आली.त्यामधून जखमींसाठी उपचार करण्यात आले.श्री.चापशी पुरुषोत्तम उर्फ शंभूशेठ यांनी आपली खास माणसे मुंबईच्या काँग्रेस कमिटीकडे पाठवून "चिरनेर सत्याग्रहात अनेक लोक जखमी झाले आहेत.तावडतोब ॲव्युलन्स पाठवा"असा निरोप दिला.त्यानुसार रात्री १२ वाजेपयत गाडी चिरनेरला आली.त्यांच्यासोबत डॉ.श्राफ, डॉ.कोठारे, नवीन खांडवाला, अय्यर मुळराज, करसनदास तळपदे व स्वयंसेवक दलाचे लोक चिरनेरला आले.त्यांनी जखमींची चौकशी करून लोकांना धीर दिला.२०–२५जखमी लोकांना मुंबईला पाठविले.इतर जखमींवर तेथेच उपचार केले. श्री.आप्पासाहेब वेदक व काँग्रेस कार्यकर्त्यांनी घरोघरी जाऊन लोकांना धीर दिला.

- **काँग्रेस चौकशी समिती :-**

राष्ट्रीय काँग्रेसच्या वतीने चिरनेर गोळीबाराची स्वतंत्र चौकशी करण्यासाठी 'भारत सेवक समाजाला' पाचारण करण्यात आले.परंतु त्यांनी चौकशी करण्यास असमर्थता दाखवली.श्री.न. चिं.केळकरांच्या पुढाकारामुळे सार्वजनिक सभेने गोळीबाराच्या चौकशीची जबाबदारी स्वीकारली. या चौकशी समितीचे अध्यक्ष जमनादास माधवजी मेहता होते.या समितीमध्ये सर्व पक्षाचे व जाती-धर्माचे सभासद होते.त्यामध्ये श्री.हुसेनभाई तय्यबजी, बॅ.छगला, श्री.ल.र.गोखले, श्री.माधवराव गोविलकर, श्री.नारायण नागू पाटील, श्री.नारायणराव गुंजाळ, श्री.मोतीराम बाळकृष्ण वेलकर हे सभासद होते.तर श्री.माधवराव गोडबोले व श्री.हरिभाऊ जोशी हे चिटणीस होते.मुंबई येथील केसरीचे प्रतिनिधी श्री.आ.रा.भट हे अघोषित सदस्य होते.[६१] या समितीने

सत्याग्रहाची व गोळीबाराची चौकशी करण्यासाठी प्रश्नावली तयार केली.यामध्ये पुढीलप्रमाणे प्रश्न होते.

१) सत्याग्रह म्हणजे काय ?

२)सत्याग्रहात आपण सहभाग घेतला होता का?

३)प्रथम गोळीबार कोणी केला ?

४)जोशींना गोळी कशी लागली ?

या कमिटीचे कामकाज सोमवार व मंगळवार या दोन दिवशी मुंबई येथे होते. बाकीच्या दिवशी पनवेल येथे होते.या गोळीबाराची चौकशी करण्याची परवानगी मिळावी यासाठी कमिटीने सरकारकडे अर्ज केला.परंतु श्री.राजे यांनी प्रांत ऑफिसर श्री.कौंडिण्याला कळविले की, कमिटीला चौकशीची परवानगी देऊ नये.श्री.कौंडिण्याने १४४ कलमाखाली कमिटीला ३१ ऑक्टोबर रोजी रायगड जिल्ह्यात येण्यास बंदी आदेश काढला.त्यामुळे उरण व पनवेल येथील कमिटीचे कामकाज बंद करून ते मुंबईत सुरू केले.त्यांनी आपले कार्यालय सव्हंट ऑफ इंडिया सोसायटीच्या जागी सुरू केले.चौकशीच्या कामाला सुरुवात केली. कमिटीच्या वतीने अॅड. तुळपदे,डॉ.श्रॉफ,डॉ.अंकलसरिया, श्री.अजगावकर यांनी जखमी लोकांपैकी मुंबई येथे श्री.जोमा धर्मा म्हात्रे याची साक्ष घेतली.[६२] मुंबई काँग्रेस कमिटीचे सभासद अॅड.तळपदे यांची पहिली साक्ष नोंदविली.के.ई.एम.हॉस्पिटल काशीराम बुध्या याची दुसरी साक्ष घेतली.जखमीवर उपचार करणारे डॉ.धीरजलाल अंकलसरिया याच तिसरी साक्ष नोंदवली.श्री.प्रभाकर गुप्ते यांची धाकटी बहीण विमल गुप्ते यांची साक्ष घेतली.चिरनेर व आसपासच्या गावातून अनेक व्यक्तींना साक्षीसाठी मुंबईला पाठविण्यात आले.या लोकांच्या जेवणाची व निवासाची सोय सरदारगृहमध्ये मुंबई काँग्रेस कमिटीने केली होती.चौकशी कमिटीकडे जाताना पोलिसांची नजर चुकवून जावे लागत असे.जर पोलिसांना समजले की, त्यास आरोपी म्हणून कैद केली जात असे.या कमिटीने आपला अहवाल सरकारला सादर केला.परंतु तो सरकारने नाकारला.

## ▪ बचाव समिती :-

सत्याग्रहाच्या वेळी जखमी झालेल्या लोकांना आणि मरण पावलेल्या व्यक्तींच्या कुटुंबाला आर्थिक मदती देण्यासाठी ज्यांच्यावर आरोप ठेवलेले आहेत त्यांच्या खटल्यासाठी लगणारा पैसा गोळा करण्याच्या हेतूने बचाव समितीची स्थापना केली.यासाठी हरिभाऊ जोशी यांनी पुढाकार

घेतलेला होता . या समितीमध्ये श्री . के . एम . मुन्शी अध्यक्ष व श्री . बाळ गंगाधर खरे उपाध्यक्ष होते . या समितीमध्ये श्री . लक्ष्मण बळवंत भोपटकर, श्री . नारायण लाल बन्सीलाल, श्री . शेट लालजी नारायणजी,श्री . नगीनदासमास्तर, श्री . भाऊसाहेब पुराणीक इ . सभासद होते . श्री . एस . सी . जोशी व श्री . हरिभाऊ मोरेश्वर जोशी हे चिटणीस होते .[६३] बचाव समितीची जबाबदारी श्री . हरिभाऊ जोशी यांनी घेऊन सर्व महाराष्ट्रात फिरले व आर्थिक निधी गोळा केला . त्यांनी जवळजवळ ७० ते ७२ हजार रुपये चिरनेर रिलिफ फंड म्हणून गोळा केले . शेतकऱ्यांनी भाताच्या स्वरूपात मदत केली . कमिटीने एक पत्रक काढून सर्व लोकांना आर्थिक मदत देण्याचे आवाहन केले . आपली आर्थिक मदत पुढील ठिकाणी जमा करावी असे जाहीर केले .

१)एक्सप्लेनेड फोर्ट मुंबई

२)श्री . भाऊसाहेब पुराणीक पनवेल

३)केसरी वर्तमानपत्र कचेरी पुणे इ .

- **काँग्रेस कमिटीतर्फे खटल्याची तयारी :-**

श्री . हरीभाऊ जोशी यांनी आर्थिक मदत गोळा करण्यासाठी आणि आरोपींना निर्दोष मुक्तता करण्यासाठी अहोरात्र प्रयत्न केले . चिरनेर खटल्यात पकडलेले सर्व लोक आणि त्यांच्या कुटुंबातील सर्व माणसे भयभीत झालेली होती . श्री . नानासाहेब बेडेकरसाठी श्री . वैश्यंपायन तर श्री . भाईसाहेब गुप्तेंसाठी श्री . गडकरी हे वकील म्हणून काम पाहत होते . इतर आरोपींसाठी वकील नव्हते, त्यामुळे ते अतिशय घावरले . आपला संभाळ कोण करणार? या प्रश्नाने ते चिंताग्रस्त झाले होते . त्या वेळी श्री . वेदक, श्री . बेडेकर, श्री . गुप्ते यांनी त्या सवाना धीर दिला . सर्वांचे वकीलपत्र एका किंवा अनेक वकिलांना एकत्र दिले जाईल ही हमी या तिघानी सर्वाना दिली . यावेळी ॲड . नारायण सदाशिव देवरूखकर, ॲड . विठ्ठल नारायण वेदक आणि श्री . आप्पासाहेब वेदक यांची चर्चा होऊन सवाची बाजू एकत्र मांडावी असे ठरविण्यात आले . पनवेलचे वकील श्री . बाबासाहेब फडके यांनी अनेक नामवंत वकिलांच्या भेटी घेऊन या खटल्यात काम करण्याची विनंती केली . पेणचे वकील भास्कर रामकृष्ण दामले यांनी विना फीचे काम केले . श्री . हरिभाऊ जोशींनी श्री . भास्कर दामले व श्री . वामन अनंत रेंगे या वकिलांवर या खटल्याची सर्व जबाबदारी टाकली . त्यांनीही विनावेतन काम केले . त्याचप्रमाणे सातारचे श्री . दादासाहेब करंदीकर,बॅरिस्टर भीमराव आंबेडकर, ठाण्याचे श्री . वामनराव करमरकर, श्री . कोतवाल, श्री . गोडबोले आणि ठाणे,

रायगड जिल्ह्यातील अनेक प्रसिद्ध वकिलांनी काम केले. महाडचे श्री. काशिनाथ धारप यांनी सर्व प्रकारची मदत केली.[६४]

## ❖ चिरनेरचा खटला :-

चिरनेर खटल्यासाठी स्पेशल मॅजिस्ट्रेट म्हणून रायगड जिल्ह्याचे डेप्युटी कलेक्टर श्री. आर. आर. सोनाळकर यांची नियुक्ती करण्यात आली.[६५] हा चिरनेरचा ऐतिहासिक खटला पनवेलच्या मामलेदार कचेरीत दि. २२ डिसेंबर १९३० रोजी सुरू झाला. चिरनेर खटल्याची रचना द्वारकानाथ शिवराम राजे यांनी केलेली होती. सरकारच्या वतीने पनवेलचे फौजदार श्री. धोंडू गणपत सावंत होते. सरकारी वकील म्हणून श्री. अनंतराव चित्रे असून त्यांच्या मदतीसाठी श्री. साठे व श्री. गरूड हे वकील होते. सर्व आरोपीचे प्रमुख वकील ठाण्याचे श्री. भास्कर रामकृष्ण दामले असून श्री. धारप, श्री. फडके, श्री. करंदीकर, डॉ. आंबेडकर, श्री. मोहिते यांनी आरोपीतर्फे काम केले. पनवेलचे श्री. एल. आर. जोशी, श्री. बाळासाहेब पटवर्धन, श्री. के. गो. लिमये यांनी चांगले सहकार्य केले.[६६] दि. २२ रोजी आरोपीचे वकील श्री. बाबासाहेब फडके यांनी सर्व आरोपींना जामिन्यावर सोडावे असा अर्ज केला. परंतु श्री. अनंत चित्रे वकिलांनी विरोध केल्याने तो नाकारला. शिवाय कोर्टातील बैठकव्यवस्था योग्य नसल्याने कामकाज झाले नाही .

### ✓ पनवेल कोर्टातील खटल्याचा वृत्तान्त आणि निकाल :-

दि. २३ डिसेंबर १९३०रोजी प्रत्यक्ष खटल्याच्या कामकाजाला सुरुवात झाली. या दिवशी पहिली साक्ष सर्कल इन्स्पेक्टर श्री. बाळकृष्ण बाबाजी तिरवडकर यांची झाली. त्यानंतर फौजदार श्री. धोंडदेव गणपत सावंत, रेंजर ऑफिसर श्री. विश्वनाथ शिवराम देसाई, रेंजर ऑफिसर श्री. बापू रामचंद्र आलेकर यांची साक्ष झाली. दि. २४ रोजी कळंबुसरे गावचे पोलीस पाटील, श्री. पांगू हाशा, श्री. पांड्या बाळ्या कातकरी, श्री. महाद्या दाजी कातकरी, श्री. दगडू रामजी मुंबई कर, श्री. बाळाराम महादू मुंबईकर, श्री. रामा महादू नारंगीकर यांच्या साक्षी झाल्या. १६ जानेवारी १९३१ रोजी सर्व म्हणजे ११० साक्षीदारांच्या कोर्टाने जबान्या घेतल्या. "आम्ही गुन्हा केला नाही' असा जबाब सवानी दिला. सरकारी वकील श्री. चित्रे यांनी सांगितले की "सर्व आरोपी दोषी आहेत" न्यायाधीश श्री. सोनाळकर यांनी खटला सेशन कमिटकडे २६जानेवारी १९३१ रोजी पाठविला. मॅजिस्ट्रेट श्री. आर. आर. सोनाळकरने सर्व खटल्याच्या आधारे सत्याग्रहातील आरोपींवर पुढीलप्रमाणे आरोप ठेवले.

**कलम २२४ व ३७९ अन्वये :-** जंगलातील लाकूड तोडणे, अटकेतून पळून जाणे इ.स्वरूपाचे आरोप खालील सत्याग्रहींवर ठेवण्यात आला.

१)श्री. दामा जागू भगत
२)श्री.चांगू अंबू
३) श्री.कमळ्या साधू
४)श्री.बारक्या चिर्णेकर
५)श्री.तुकाराम म्हात्रे
६) श्री.हिऱ्या पांगा
७)श्री.उंदीर हरी
८)श्री.नारायण हाशा
९) श्री.दामा हाशा
१०)श्री.सिताराम
११)श्री.सोमा बाळ्या
१२) श्री.गणा जोमा
१३)श्री.हिऱ्या गण्या

**कलम ३०२ अन्वये :-** प्रमाणे पोलिसांचा व राऊंडगार्डचा खून करून पळून गेल्याचा आरोप खालील सत्याग्रहींवर ठेवण्यात आला.

१)श्री.लक्ष्मण चाया
२)श्री.विठू आंबाजी
३) श्री.तुकाराम विठू
४)श्री.माया कान्हया
५)श्री.आशा बाळू यांच्यावर ठेवण्यात आला.

**इन्स्पेक्टर श्री.पाटील यांना मारहाण करण्याबद्दल :-**

१)श्री.लक्षा चाया
२) श्री.विठू आंबाजी
३)श्री.सोमा गोपाळ
४)श्री.धनाजी सोमा
५) श्री.रामा धाकू
६)श्री.बारक्या गौऱ्या
७)श्री.राघो माया
८)श्री.तुका कृष्ण
९) श्री.गणपत आंबाजी

**कलम ३९२ अन्वये :-** शांताराम आर्डरली यांच्या जवळची थैली, रिव्हॉल्वर, काडतुसे व पंचनामे वगैरे पळविण्याबद्दल लूटमारीचा आरोप श्री.माया कान्हया यांच्यावर ठेवला.सरकारी अधिकाऱ्याच्या कामात अडथळा करणे, खून करणे, सरकारी अधिकाऱ्याला दुखापत करणे याबाबत कलम १४७, १४८, १४९, ३०२, ३३२ खाली श्री.बेडेकर व श्री.वेदक यांच्यासह ४५ आरोपींवर आरोप ठेवण्यात आला.

**कलम ३२०, ३३२ व ३९५** या कलमाखाली सरकारी अधिकाऱ्यांच्या कामात व्यत्यय आणणे व दरोडा घालणे इ.आरोप खालील सत्याग्रहींवर ठेवण्यात आला.

१)श्री.लक्षा चाया
२) श्री.विठ्या आंबाजी
३) श्री.अंताजी पोवळे
४)श्री.मेघनाथ पोवळे
५) श्री.सखाराम पोवळे
६) श्री.भाईसाहेब गुप्ते
७)श्री.आप्पासाहेब वेदक
८) श्री.नाना खरे
९) श्री.नानासाहेब बेडेकर
१०) श्री.जयराम वाणी

चिरनेर जंगल सत्याग्रहाचा खटला अलिबाग येथील हिरकोटमधील सेशन कोर्टात चालावा म्हणून सरकारी अधिकारी प्रयत्नशील होते. तर आरोपीच्या बाजूने हा खटला ठाणे येथील सेशन कोर्टात चालावा म्हणून हायकोर्टात अर्ज केला होता. कारण या कोर्टात आरोपीला ज्युरीचा फायदा मिळणार होता. हायकोर्टात आरोपीच्या बाजूने निर्णय दिला. त्याचे सर्वांनी स्वागत केले. या निर्ण यानुसार सरकारने चिरनेर जंगल सत्याग्रहातील सेशन कमिटीतील सर्व ४७ कैदी ३/२/१९३१ रोजी ठाणे तुरुंगात पाठविले.

### ✓ सेशन कोर्ट ठाणे खटला :-

चिरनेर जंगल सत्याग्रहातील आरोपींना पनवेल कोर्टातून ठाणे तुरुंगात पाठविण्यात आले. ७ मार्च १९३१ रोजी खटला सुरू करण्याचा निर्णय झाला,परंतु सरकारी वकील अनंतराव चित्रे आजारी पडल्यामुळे हा खटला प्रत्यक्षात २३ मार्च १९३१ रोजी सुरू झाला. हा खटला ज्युरीसह सेशन न्यायाधीश श्री. संजाना यांच्यापुढे सुरू करण्यात आला. खटला सुरू करण्यापूर्वी आरोपीचे चार गट निर्माण केले. त्या प्रत्येक गटासाठी स्वतंत्र वकील व त्याच्या मदतीसाठी इतर दोन वकील देण्यात आले. ज्याच्यावर खुनाचा आरोप ठेवला होता त्यांचा एक गट निर्माण करून त्यांच्यासाठी सातारचे कायदेपंडित श्री. दादासाहेब करंदीकर प्रमुख असून त्यांच्या मदतीसाठी श्री. गोडबोले के. आर. सहाय्यक होते. कटाचा आरोप असणाऱ्यासाठी ठाण्याचे प्रसिद्ध वकील श्री. भास्कर रामकृष्ण दामले हे प्रमुख असून त्यांच्या मदतीसाठी श्री. साठे वकील होते. दरोड्याचा आरोप ज्यांच्यावर होता, त्यांचे वकील श्री. काशीनाथपंत धारप प्रमुख असून श्री. वामनराव करमरकर हे मदतीसाठी होते. दंग्याचा आरोप ज्यांच्यावर होता त्यांचे काम श्री. वामन अनंत रेगे हे करीत असून त्यांच्या मदतीसाठी श्री. तेंडूलकर वकील होते. २३ मार्च १९३१ रोजी ११. ३० वाजता न्यायमूर्ती श्री. संजाना यांच्यासमोर खटला सुरू झाला.[६७] सरकारतर्फे वकील वामनराव प्रधान, अनंत चित्रे, श्री. डि. के. राजे हे होते. आरोपीतर्फे डॉ. बाबासाहेब आंबेडकर, श्री. दादासाहेब करंदीकर, श्री. काशीनाथपंत धारप, श्री. भास्करराव दामले, श्री. विठ्ठलराव करंदीकर, श्री. रंगे हे होते. ठाणे कोर्टाने ज्युरीची निवड केली. त्यामध्ये दोन मुसलमान, एक ज्यू,चार ख्रिश्चन व तीन हिंदू ज्युरी होते. यासाठी ज्युरींनी श्री. डी. जी. मुळे यांची ज्युरीचे फोरमन म्हणून निवड केली. त्यांचा शपथविधी झाल्यावर ज्युरर्स व असेसर्स म्हणून ते आपल्या जागेवर जाऊन बसले. श्री. डी. जी. मुळे, श्री. अब्राहम मोझेस, श्री. काझी गियासुद्दीन ,श्री. आर. बी. खारकर, श्री. ए.

एम.हेनसकर, श्री.एल.एम.डिएव्रो, श्री.जी.जी.चौबळ, श्री.जोसेफ रिबेरो, श्री.पीर अल्लउद्दीन इत्यादी ९ ज्युरींची निवड केली.

खटल्याच्या प्रक्रियेमध्ये सरकार पक्षाचे वकील श्री.वामन प्रधान याने पनवेल काँग्रेस कमिटीच्या मीठ सत्याग्रहापासून ते गोळीबार प्रकरणापयतची सर्व घटनांची माहिती ज्युरीला दिली. त्यानंतर साक्षीदारांचा जबाब घेण्यात आला.सरकार पक्षाचे साक्षीदार म्हणून चिरनेरचे तलाठी श्री.रामचंद्र गुणाजी गार्डी, चिरनेरचे पोलीस पाटील श्री.शिवराम विठू पाटील,केळवण्याचे तलाठी श्री.दत्तात्रेय गणेश वेलणकर, केळवण्याचे वेसकर श्री.काळ्या लवया महार, कळंबूस पोलीस पाटील श्री.पोसू गणू पाटील, दिघोड्याचे श्री.नारायण मुकूंद पाटील, विंधण्याचे तलाठी श्री.त्र्यंबक गोपाळ कारूळकर, अंमलदार श्री.एच.कोड, इन्स्पेक्टर श्री.रामचंद्र दौलत पाटील, श्री.शांताराम गोविंद देसाई, मामलेदाराचा पट्टेवाला श्री.गणपत धोंडू जयपाल, पोलीसप्रमुख श्री.बुधाजी लक्ष्मण भोसले, रेंजर श्री.बापू रामचंद्र आलेकर, चौकशी अधिकारी श्री.द्वारकानाथ शिवराम राजे आदींच्या साक्षी झाल्या.

ग्रामस्थांमध्ये श्री.महादू दादू कातकरी, कोप्रोलीचे श्री.पांडुरंग बाळ म्हात्रे, चिरनेरचे श्री.गोपाळ धर्मा घरत हे साक्षीदार होते.पोलिसांनी ग्रामस्थांना साक्षीदार बनविताना त्यांचा प्रचंड छळ केला.त्यामुळे अनेक लोक जंगलात पळून गेले.सरकारी साक्षीदार म्हणजे देशद्रोही हा कलंक लागत असे, तो टाळण्यासठी लोक भूमिगत राहून आपला बचाव करत होते.यावेळी ११० लोकांची साक्ष खटल्यासाठी घेतली.साक्षी, जबाब नोंदणी घेण्याचे संपल्यानंतर सरकारी वकील श्री.वामन प्रधान आरोपीचे वकील श्री.वामन अनंत रेगे, डॉ.बाबासाहेब आंबेडकर, श्री.भास्कर रामकृष्ण दामले, श्री.दादासाहेब करंदीकर यांची भाषणे झाली.त्यांनी आपल्या पक्षाचा बचाव कसा होईल हे सिद्ध करणारी भाषणे केली.त्यानंतर सेशन न्यायाधीश मि.संजाना यांनी २९ जून १९३१ रोजी भाषण केले.त्या वेळी खटल्याचे स्वरूप, सत्याग्रह हा राजकीय चळवळीचा एक भाग असल्याचे खटल्यातील प्रत्येक आरोप सांगत होता.तसेच कायद्याची भूमिका ज्युरर्सना समजावून सांगितली.दिनांक १ जुलै १९३१ रोजी दुपारी दोन वाजल्यानंतर आपले मत ठरवण्यासाठी ज्युरर्स व असेसर्स निरनिराळ्या जागी गेले.५ वाजून ४५ मिनिटांनी ते परत आले.एकही आरोपी कोणत्याही गुन्ह्याला पात्र नाही असे जाहीर केले.

### ✓ चिरनेर खटल्याचा निकाल :-

ज्युरी व असेसर्सच्या निकालानंतर गुरूवार दि.२ जुलै १९३१ रोजी दुपारी १२.३० वाजता न्यायाधीश संजान यांनी निकाल वाचून दाखविला.ज्युरीने सर्व आरोपीला सर्व आरोपातून निर्दोषी ठरविले असले तरी, एकंदर पुराव्यावरून आपले एकमत होत नाही.त्यांनी आपला निकाल वाचून दाखविला.त्यामध्ये १८ आरोपींना पूर्ण निर्दोष घोषित केले.२० जणांची दंडावर मुक्तता केली.९ जणांना कैदीची शिक्षा दिली.[६८] ४ जुलै १९३१ रोजी जैन हॉल पनवेल येथे श्री.ना.ना.पाटील यांच्या अध्यक्षतेखाली दोषमुक्त १८ व दंडावर मुक्त झालेल्या २० जणाचा भव्य सत्कार करण्यात आला.निकालाचा तपशील पुढीलप्रमाणे:

**दोषमुक्त अठरा आरोपी :-**

या सर्व आरोपींवर इंडियन पिनल को.क्र.१४७, १४८,१४९, ३३२, ३३३, ३७९, ३९५ या कलमानुसर शिक्षा झाली होती.पण त्यांची मुक्तता करण्यात आली ते १८ जण पुढीलप्रमाणे.

| अ.न. | आरोपी नंबर | आरोपीचे नांव | ठिकाण |
|---|---|---|---|
| १ | ६ | श्री.नामाजी गोपाळ मोकल | चिरनेर |
| २ | ७ | श्री. आंबाजी सोमा पाटील | भोम |
| ३ | १३ | श्री.आंबाजी जगू नारंगीकर | चिरनेर |
| ४ | १४ | श्री.जनार्दन काशीनाथ पोटे | कोप्रोली |
| ५ | १८ | श्री.धनाजी जोमा म्हात्रे | चिरनेर |
| ६ | १९ | श्री.गजानन बाळू चिर्लेकर | चिरनेर |
| ७ | २० | श्री.रामा धाकू नारंगीकर | चिरनेर |
| ८ | २१ | श्री.बारक्या गवत्या फोफेरकर | चिरनेर |
| ९ | २२ | श्री.राघो माया मोकल | चिरनेर |
| १० | २३ | श्री.तुकाराम कृष्णा ठाकूर | चिरनेर |
| ११ | २४ | श्री.गणपत आंबाजी नारंगीकर | चिरनेर |
| १२ | २५ | श्री. वसंत महादेव वेदक | पनवेल |
| १३ | २६ | श्री.कानू झिटया पाटील | भोम |
| १४ | २७ | श्री.काशा रामबा पाटील | मोठी जुई |
| १५ | २८ | श्री. महाद्या हालया म्हात्रे | धाकटी जुई |
| १६ | २९ | श्री. पांडुरंग काशीनाथ पोटे | कोप्रोली |
| १७ | ३२ | श्री.शंकर नारायण पांडव | पनवेल |
| १८ | ३३ | श्री. मदन गजानन मानकामे | पनवेल |

**दंडावर सुटलेले २०आरोपी :-**दंडावर सुटलेल्या २० आरोपींपैकी ८, ९, १०, ११,, १७, ३१, ४६ या ७ आरोपींवर चोरीच्या कटाचा अथवा चिथावणीचा आरोप होता.३०, ३९, ४३ या ३ आरोपींवर

चोरीचा व अटकेतून पळून गेल्याचा आरोप होता. ३४, ३५, ३६,३७, ३८, ४०, ४१, ४२, ४४, ४५ या १० आरोपीवर जंगलातील लाकूड तोडणे हा आरोप होता. त्या सर्व आरोपींचा १०० रु. व २०० रु. दंडावर सुटका करण्यात आली.

| अ.नं. | आरोपी नंबर | आरोपीचे नाव | ठिकाण | दंड रुपये |
|---|---|---|---|---|
| १ | ८ | श्री. अंताजी महादेव पोवळे | चिरनेर | १०० |
| २ | ९ | श्री. जयराम सखाराम वाणी | चिरनेर | १०० |
| ३ | १० | श्री. मेघनाथ बाळाजी पोवळे | चिरनेर | १०० |
| ४ | ११ | श्री. सखाराम केशव पोवळे | चिरनेर | १०० |
| ५ | १७ | श्री. केशव गणेश गुप्ते | पनवेल | १०० |
| ६ | ३० | श्री. दामा नागा गोंधळी | चिरनेर | २०० |
| ७ | ३१ | श्री. नारायण धोंडू खरे | पनवेल | २०० |
| ८ | ३४ | श्री. चांगू आंबू पाटील | भोम | १०० |
| ९ | ३५ | श्री. कमळ्या सरडोक गोंधळी | चिरनेर | १०० |
| १० | ३६ | श्री. बारक्या अंबाजी चिर्लेकर | चिरनेर | १०० |
| ११ | ३७ | श्री. तुकाराम गणू म्हात्रे | धाकटेभीम | १०० |
| १२ | ३८ | श्री. हिऱ्या पांगा साईकर | चिरनेर | १०० |
| १३ | ३९ | श्री. उंदीर हरी मोकाशी | पाणदिवे | २०० |
| १४ | ४० | श्री. नारायण हाशा पाटील | कोप्रोली | १०० |
| १५ | ४१ | श्री. दामा हाशा पाटील | कोप्रोली | १०० |
| १६ | ४२ | श्री. सीताराम गोमा ठाकूर | पाणदिवे | १०० |
| १७ | ४३ | श्री. सोमा बाळू पाटील | कोप्रोली | २०० |
| १८ | ४४ | श्री. गणा जोमा ठाकूर | खोपटे | १०० |
| १९ | ४५ | श्री. हिराजी गणपत म्हात्रे | कोप्रोली | १०० |
| २० | ४६ | श्री. त्र्यंबक नारायण वेडेकर | आपटे | १०० |

**सक्त मजुरीची शिक्षा झालेले ९ आरोपी :-**कोर्टाने ९ आरोपींना दगाधोपा केल्या बद्दल गुन्हेगार ठरवून त्यांना सक्त मजुरीची शिक्षा दिली.

| अ.नं. | आरोपी नंबर | आरोपीचे नाव | ठिकाण | दंड रूपये |
|---|---|---|---|---|
| १ | १ | श्री. लक्ष्मण चावजी नारंगीकर | चिरनेर | तीन वर्ष |
| २ | २ | श्री. विठ्या आंबाजी नारंगीकर | चिरनेर | तीन वर्ष |
| ३ | ३ | श्री. तुकाराम विठू मोकल | चिरनेर | तीन वर्ष |
| ४ | ४ | श्री. माया कान्या पाटील | चिरनेर | तीन वर्ष |
| ५ | ५ | श्री. हाशा बाळू खारपाटील | चिरनेर | तीन वर्ष |
| ६ | १२ | श्री. परशुराम अंबू म्हात्रे | कोप्रोली | ६ महिने |
| ७ | १५ | श्री. बाळाराम पोशा पाटील | मोठी जुई | दीड वर्ष |
| ८ | १६ | श्री. पद्या कमळ्या म्हात्रे | कोप्रोली | ६ महिने |
| ९ | ४७ | श्री. मसण्या कमळ्या म्हात्रे | कोप्रोली | ६ महिने |

म. गांधीजींच्या नेतृत्वाखाली सविनय कायदेभंग चळवळ १९३०-३१ आणि १९३२-३४ या काळात सुरू करण्यात आली. सात कलमी कार्यक्रमानुसार सर्व देशभर चळवळ सुरू होती. वैयक्तिक सत्याग्रह चळवळीपयत विधायक कार्यक्रम सर्वत्र सुरूच होती. याच काळात राष्ट्रीय स्वातंत्र्यासंदर्भात विविध घटना घडत होत्या. १९३० मध्ये पहिली गोलमेज परिषद लंडन येथे आयोजित करण्यात आली. या परिषदेने अल्पसंख्याकांच्या फूटीर वृत्तीस खतपाणी घातले गेले. प्रथम गोलमेज परिषदेला राष्ट्रीय काँग्रेसचे प्रतिनिधी उपस्थित नव्हते. दुसऱ्या गोलमेज परिषदेला उपस्थित राहण्यासाठी ब्रिटिश सरकारकडून प्रयत्न करण्यात आले. त्यामुळे १९३१ मध्ये गांधी-आयर्विन करार घडून आला. दुसरी गोलमेज परिषद १९३१ मध्ये घेण्यात आली. या परिषदेत सांप्रदायिक प्रश्न सोडवू शकला नाही. त्यामुळे गांधीजी परत आले. १७ ऑगस्ट १९३२ रोजी रॅम्से मॅकडोनाल्ड जातीय निवाडा जाहीर केला. या जातीय निवाडÎाच्या विरोधात पुण्यात म. गांधीजींनी उपोषणास प्रारंभ केला. शेवटी तडजोड होऊन २५ सप्टेंबर १९३२ पुणे करार करण्यात आला. गांधीजींनी वैयक्तिक सत्याग्रह चळवळ मागे घेतली. १९३२ मध्ये तिसरी गोलमेज परिषद घेण्यात आली. तीन गोलमेज परिषदेचा आढावा घेऊन श्वेतपत्र प्रसिद्ध करण्यात आली. त्याच्या आधारे १९३५ चा कायदा जाहीर करण्यात आला.

दुसरे महायुद्ध सुरू झाल्याने भारत इंग्लंडच्या बाजूने युद्धात सहभागी होत आहे असे लिनलिथगोने घोषित केले. ८ ऑगस्ट १९४० ला ब्रिटिशांनी वसाहतींतर्गत स्वातंत्र्य देणे, युद्ध समाप्तीनंतर राज्यघटना तयार करणे. सर्व पक्षांच्या प्रतिनिधींना स्थान देण्याची घोषणा केली. त्यास ऑगस्ट घोषणा असे म्हणतात. ब्रिटिश दुसऱ्या महायुद्धात असल्याने त्यांना अडचणीत न आणण्यासाठी १९४० मध्ये वैयक्तिक सत्याग्रहास प्रारंभ केला.

## ❖ <u>वैयक्तिक सत्याग्रह :-</u>

युरोप खंडामध्ये दुसरे महायुद्ध सुरू झाल्यानंतर इंग्रजांनी आपल्या स्वार्थासाठी भारतीयांचे मोठÎा प्रमाणात आर्थिक शोषण केले. भारतातील मनुष्यबळ, सेनादल, कच्चामाल, अन्नधान्य, जीवनावश्यक वस्तू, कारखान्यातील उत्पादित वस्तू या सर्वांचा दोस्त राष्ट्रासाठी उपयोग करून घेतला. हिंदुस्थान आपल्या हातून गेल्यास महायुद्धात आपले अस्तित्व धोक्यात येईल अशी इंग्रजांना भीती वाटत होती, म्हणून त्यांनी भारताला महायुद्धात ओढण्याचा एकतर्फी निर्णय घेतला. त्याबरोबरच अडचणीच्या काळात इंग्रजांना अधिक अडचणीत टाकू नये असे मानणारे मुस्लीम लीग,

कम्युनिस्ट पक्ष हिंदू महासभा या पक्षाप्रमाने कॉंग्रेस पक्षाचे काही पुढारी होते. मौलाना अबुल कलम आझाद जवाहरलाल नेहरू राजगोपालाचारी भुलाभाई देसाई इ. नेत्यांची राष्ट्रीय आंदोलनाची तयारी नव्हती. अशा अडचणीच्या प्रसंगी महात्मा गांधीजींनी अहिंसक मार्गाने वैयक्तिक सत्याग्रह सुरू करण्याची घोषणा केली. सुरुवातीस प्रत्येक सत्याग्रहीची पात्रता स्वत: बापूजी ठरवित. वैयक्तिक सत्याग्रहाद्वारे देशाची नाडी परीक्षा घेण्याचा बापूजींचा मनोदय होता. त्यामुळे सत्याग्रहाच्या तंत्रानुसार शांततावादी चळवळ सुरू करण्यात आली. देशातील पहिले सत्याग्रही म्हणून विनोबा भावे व दुसरे सत्याग्रही म्हणून पंडित जवाहरलाल नेहरू आणि तिसरे सत्याग्रही म्हणून दिल्लीचे ब्रम्हदत्त यांची निवड केली. दि. २७ ऑक्टोबर १९४० रोजी पवनार येथे युद्धविरोधी भाषण करून इंग्रजांचा जोरदार निषेध आचार्य विनोबाजींनी केला.[६९] व गांधी प्रणित सत्याग्रहाचा शुभारंभ झाला. परिणामी सर्व देशात वैयक्तिक सत्याग्रहाचे वारे वाहू लागले. रायगड जिल्ह्यात वैयक्तिक सत्याग्रह चळवळ मोठ्या जोमाने सुरू झाली.

जिल्हा कॉंग्रेस कमिटीकडे या सत्याग्रहाची जबाबदारी सोपवली होती. त्यांनी सत्याग्रहींच्या नावांची यादी तयार करून बापूजींकडे पाठवून त्यांची मान्यता घेतली. कारण वैयक्तिक सत्याग्रहाची सर्वांनाच परवानगी नव्हती. ज्यांना मान्यता मिळाली त्यांनीच सत्याग्रह केला. सरकारला पूर्वसूचना देऊन ठरलेल्या दिवशी जाहीर सभेत युद्धविरोधी भाषण करावे असा आदेश कॉंग्रेस हायकमांडने दिला. राष्ट्रीय कॉंग्रेसने वैयक्तिक सत्याग्रहाचा आदेश दिला की "हे युद्ध भारतीय जनतेचे नाही. तरी या युद्धाला कोणीही मदत करू नये". या आदेशानुसार जिल्हा कॉंग्रेस व तालुका कॉंग्रेसने सत्याग्रहींची यादी तयार केली. रायगड जिल्ह्यात वैयक्तिक सत्याग्रह सुरू झाला. माणगाव तालुक्यात शांतता मार्गाने वैयक्तिक सत्याग्रह काही नेत्यांनी व शेतकऱ्यांनी केला. श्री. रामचंद्र विश्वनाथ अधिकारी श्री. रामचंद्र भगवान शेठ यांनी गोरेगाव येथे जाहीर सभा घेऊन युद्धविरोधी घोषणा केली. त्यामुळे त्यांना शिक्षा झाली. श्री. रामचंद्र विठ्ठल अडित श्री. भिकू रामा सकपाळ यांनी खरवली येथे सत्याग्रह केला. श्री. बाजी दाजी अडीत (खरवली) यांनी साळेगाव येथे सत्याग्रह केला. श्री. बसवलिंग गणलिंग जंगम (खरवली) यांनी सुख येथे सत्याग्रह केला. या सवाना शिक्षा झाली.[७०]

उरण तालुक्यातही अनेकांनी सहभाग घेऊन उत्तम कामगिरी पार पाडली. श्री. शंकरराव पौडवाल श्री. डी. बी. उर्फ नानासाहेब म्हात्रे श्री. कृष्णाजी आबाजी उर्फ भाऊसाहेब डाऊर यांना

म.गांधीजींनी सत्याग्रहासाठी मान्यता दिली होती.त्यांनी सत्याग्रह केला व त्यांना शिक्षा झाली. यावेळी काँग्रेस कार्यकत्यांनी इंग्रज सरकारच्या दडपशाहीला न घाबरता चळवळीचे कार्य केले. श्री.हरिलालभाई करसनदास् श्री.रतीलाल उर्फ बाबुभाई सरपवैय्या श्री.विष्णूपंत रहाळकर (मोठी जुई)श्री.रमणिकलाल दामोदर् श्री.श्रीकांत काणेकर्श्री.लल्लुभाई सरवैय्याश्री.जनार्दन पोटे(कोप्रोली)श्री.बाबुशेठ जगे(पिरकोन)श्री.भाऊसाहेब डाऊर (करंजे) इत्यादींनी वैयक्तिक सत्याग्रह चळवळीत प्रभावी कार्य केले.[७१]

वैयक्तिक सत्याग्रह करण्यासाठी पनवेल तालुक्यात म्हणजे पनवेल शहरातून तीन व्यक्तींची निवड झाली.त्यामध्ये श्री.आप्पासाहेब वेदक् श्री.आत्मारामशेठ आठवणे श्री.शंभूशेठ यांची निवड झाली.काँग्रेसच्या आदेशानुसार जी व्यक्ती सत्याग्रह करणार त्यांनी जिल्हाधिकारी यांना सत्याग्रहाचे नोटीस द्यावे.सत्याग्रह कोठे केव्हा किती वाजता करणार तसेच सत्याग्रहाच्या मिरवणुकीचा मार्ग व जाहीर सभा यांची सविस्तर माहिती त्या नोटीसमध्ये असावी.त्याप्रमाणे श्री.आत्मारामशेठ यांनी नोटीस दिली.श्री.गोपाळ कृष्ण पटांगणावर जाहीर सभेच्या ठिकाणी अंबूताई लिमये यांनी सत्काराचे गीत गायले.श्री.आत्माराम आठवले यांनी युद्धविरोधी भाषण केल्याने त्यांना अटक झाली.त्यानंतर श्री.आप्पासाहेब वेदक व श्री.शंभुशेठ यांची भाषणे झाली त्यांनाही अटक करण्यात आली.[७२]

पेण तालुक्यात वैयक्तिक सत्याग्रहाला मोठ्या प्रमाणात प्रतिसाद मिळालेला दिसून येतो. अनेकांनी त्यात सहभाग घेतला.श्री.विनायक नारायण लिमये उर्फ दादासाहेब लिमये यांनी युद्धविरोधी घोषणा केल्याने त्यांना अटक करून १ वर्ष साधी कैद व ५० रुपये दंड अगर दीड महिना शिक्षा झाली.दि.१८/१/१९४१ रोजी श्री.दादाराव प्रधान यांनी सत्याग्रह केला.त्यांना ९ महिने सक्त मजुरी व ५० रुपये दंड अगर एक महिना साध्या कैदेची शिक्षा झाली. दि.२१/१/१९४१ रोजी दिव येथे श्री.विठ्ठल पोसू ठाकूर या शेतकऱ्याने सत्याग्रह केला.त्यांना सहा महिने सक्त मजुरी व २५ रुपये दंड अगर एक महिना कैदेची शिक्षा झाली. दि.२६/१/१९४१ रोजी स्वातंत्र्य दिनानिमित्त श्री.अण्णाराव दाते यांचा सत्कार झाला.त्यांनी दि.२७/१/१९४१ रोजी मिरची गल्लीत सत्याग्रह केला.त्यामुळे सहा महिने सक्त मजुरी व १५० रुपये दंड अगर एक महिना शिक्षा देण्यात आली.दि.६/२/१९४१ रोजी श्री.अण्णा मोकाशी यांनी निवृत्ती नाक्यावर युद्धविरोधी घोषणा करून सत्याग्रह केला.त्यांना चार महिने साधी शिक्षा व

५० रुपये दंड अगर एक महिना शिक्षा देण्यात आली. दि.१८/२/१९४१ रोजी श्री.नानासाहेब धारकर यांनी पेण येथील मिरची गल्लीत युद्धविरोधी घोषणा करून सत्याग्रह केला.त्यामुळे त्यांना १० महिने साधी शिक्षा व दोनशे रुपये दंड अगर दोन महिन्यांची शिक्षा देण्यात आली. दि.२२/३/१९४१ रोजी दिवे येथे विष्णू नारायण परांजपे यांनी वैयक्तिक सत्याग्रह करून युद्धविरोधी घोषणा केली.त्यांना ५ महिने सक्त मजुरीची शिक्षा झाली.दि.२५/४/१९४१ रोजी महात्मा गांधी चौकात श्री.नारायण यशवंत उर्फ भाऊसाहेब नेने यांनी युद्धविरोधी घोषणा दिली. त्यामुळे त्यांना चार महिने साधी कैद व ब वर्ग देण्यात आला.दि.२५/४/१९४१ रोजी नंदीमाळ नाक्यावर श्री.ना.ग.गोरे यांनी युद्धविरोधी घोषणा केली.त्यामुळे चार महिने साधी शिक्षा व ब वर्ग देण्यात आला.११/८/१९४१ रोजी महात्मा गांधी चौकात श्री.गोविंद रामदास गुजर यांनी युद्धविरोधी घोषणा केली. त्यांना चार महिने साधी कैद व ५० रुपये दंड व ब वर्ग देण्यात आला.पेण तालुक्यातील वैयक्तिक सत्याग्रहाचे पर्व चांगल्या प्रकारे यशस्वी झाले. [७३]

सुधागड तालुक्यात युद्धविरोधी प्रचार सुरू होता.श्री.बापुसाहेब उर्फ गोविंद रामचंद्र लिमये यांनी युद्धविरोधी प्रचार केल्याने १० महिने सक्त मजुरीची शिक्षा झाली.श्री.पुरुषोत्तम गोविंद लिमये यांना ६ महिने सक्त मजुरीची शिक्षा झाली.श्री.शांताराम रामचंद्र मुळे यांना १ वर्षाची सक्त मजुरीची शिक्षा झाली.श्री.रामजीभाई पुरुषोत्तम मेहता यांना ६ महिने सक्त मजुरीची शिक्षा झाली.[७४] महाड तालुक्यात वैयक्तिक सत्याग्रहाचा फारसा प्रभाव नव्हता तरी पण श्री.रघुनाथ गंगाराम उर्फ भाऊ लंकेश्री यांनी नाते येथे सत्याग्रह केला.श्री.कृष्णाजी गजानन हेलेकर यांने विन्हेरे येथे वैयक्तिक सत्याग्रह केल्यामुळे त्यां,ना ९ महिने शिक्षा झाली. अलिबाग तालुक्यात श्री.दत्तात्रय काशीनाथ तथा नानासाहेब कुंटे यांनी युद्धविरोधी प्रचार केल्याने सरकारने त्यांना एक वर्षाची शिक्षा दिली.

पेण तालुक्याच्या तुलनेत अलिबाग़ महाड़ पनवेल़ सुधागड या तालुक्यात वैयक्तिक सत्याग्रह कमी प्रमाणात घडून आले.तरीपण संपूर्ण रायगड जिल्ह्यातून गांधीप्रणीत चळवळीला चांगला प्रतिसाद मिळाला.प्रत्येकाने आपले राष्ट्रीय कर्तव्य पार पाडल्याचे दिसून येते.सविनय कायदेभंग चळवळीमुळे लोकांना हक्कांची व स्वातंत्र्याची जाणीव झाली.हे चित्र स्पष्ट दिसू लागल्याने म.गांधीजींनी इंग्रजांना या देशातून हाकलून लावण्यासाठी १९४२ मध्ये छोडो भारत चळवळ सुरू केली.

राष्ट्रीय कॉंग्रेसच्या आदेशानुसार जिल्हा कॉंग्रेस कमिटीने सविनय कायदेभंग चळवळीचे नियोजन केले. तालुका कॉंग्रेस कमिटी व सत्याग्रह समिती यांनी मिठाचा सत्याग्रह व जंगल सत्याग्रह जिल्ह्यात सुरू केला. पावसाळा सुरू झाल्याने मीठ सत्याग्रह बंद करून जंगल सत्याग्रह सुरू केला. कारण भारतीय वन कायदा १९२७ अधिनियम क्रमांक १६ हा अतिशय अन्यायकारक होता. या कायद्यामुळे डोंगरावर आणि जंगल उत्पादनावर ज्या लोकांचे जीवन अवलंबून होते ते धोक्यात आल्याने या कायद्याला विरोध करण्यासाठी रायगड जिल्ह्यात पेण, अलिबाग, पनवेल, उरण तालुक्यात जंगल सत्याग्रह झाले. उरण तालुक्यातील चिरनेर सत्याग्रहाच्या वेळी गोळीबार होऊन सत्याग्रही व सरकारी कर्मचारी ठार झाले. त्यामुळे चिरनेर जंगल सत्याग्रह देशामध्ये गाजला.

जंगल सत्याग्रहामध्ये जिल्ह्यातील शेतकरी, आदिवासी, स्त्रिया, लहान मुले तसेच वकील, डॉक्टर, व्यापारी यांनी सहभाग घेतला. सामान्य जनता, दानशूर, देशप्रेमींनी सत्याग्रहासाठी आर्थिक मदत मोठ्या प्रमाणात दिली. त्यामुळे सत्याग्रह सुरू करण्यात आला. सत्याग्रह सुरू करण्यापूर्वी प्रचारसभा घेऊन लोकजागृतीचे कार्य केले. जंगल सत्याग्रहाची सुरुवात विधीयुक्त पद्धतीने करण्यात आली. जंगल सत्याग्रहाच्या कार्यक्रमानुसार बंदी भागात प्रवेश करून गवत कापणे, झाडे तोडणे, झाडाच्या फांद्या तोडणे, पालापाचोळा गोळा करणे तसेच चरण्यासाठी गुरांना घेऊन जाणे. इत्यादी स्वरूपात कार्यक्रम केले. पेण, अलिबाग, पनवेल तालुक्यात सर्व सत्याग्रहींचे कार्यक्रम शांततेत पार पडले. सत्याग्रहींना पोलिसांनी अटक करून त्यांच्या गुन्ह्यानुसार शिक्षा आणि दंडही ठोठविण्यात आला.

पनवेल कॉंग्रेस कमिटी व तालुका सत्याग्रही समितीच्या नेतृत्वाखाली उरण तालुक्यात चिरनेर येथील आक्कादेवीच्या डोंगरावर २५ सप्टेंबर रोजी जंगल सत्याग्रह नियोजन करण्यात आलेले होते. या सत्याग्रहाचे आव्हान सरकारने व सत्याग्रही समितीने स्वीकारले. दोघांनीही जोरदार तयारी केली. २५ सप्टेंबर रोजी जंगल सत्याग्रह करून लोक गावाकडे जात असताना फौजदार पाटील याने गोळीबाराचा आदेश दिला. त्यामुळे सर्वत्र गोंधळ सुरू झाला. या गोळीबारात बारा सत्याग्रही व पाच सरकारी सेवक ठार झाले. या गोळीबाराच्या चौकशीसाठी सरकारतर्फे राजे समिती नियुक्त करण्यात आली. त्याचप्रमाणे कॉंग्रेसतर्फे सत्यशोधक सभेची समिती नियुक्त केली. श्री. हरिभाऊ जोशी यांच्या नेतृत्वाखाली बचाव समिती स्थापन करून सत्याग्रहीच्या खर्चासाठी आर्थिक मदत गोळा करण्यात आली. राजे समितीच्या अहवालानुसार ४७ जणावर आरोप ठेवून

पनवेल कोर्टात खटला भरण्यात आला. या सवांचा खटला एकत्र चालविण्यात आला. सत्याग्रहींचे वकील पत्र अनेक नामवंत वकिलांना घेऊन, विना फी किंवा नाममात्र फी घेऊन खटला चालविला. पनवेल कोर्टातून ठाणे कोर्टात खटला पाठविण्यात आला. ज्युरी पद्धतीने न्यायनिवाडा करून सवाना निर्दोष सोडण्यात आले. परंतु न्यायाधीश सांजना याने काही लोकांना किरकोळ शिक्षा दिली.

चिरनेर सत्याग्रहाच्या माध्यमातून ब्रिटिश सत्तेविरोधाची नाराजी व देशप्रेमाच्या जागृतीची जाणीव होते. अनेक सामान्य जनता, नेते स्वत:चा जीव धोक्यात घालून स्वातंत्र्य-प्राप्तीसाठी संघर्ष करीत होते. यावेळी धर्म, जात, वंश, लिंग यांचा भेदभाव न करता सर्वजण एकत्र आले होते. यावरून भारतीय जनतेचे स्वातंत्र्याचे स्वप्न आता दूर नाही हे सिद्ध होते. जेव्हा सर्वसामान्य माणूस एखाद्या प्रश्नासाठी एकत्रपणे रस्त्यावर उतरतो तेव्हा शासनाला त्यांच्या समोर माघार घ्यावी लागते हे यावरून स्पष्ट होते. म. गांधीजींच्या नेतृत्वाखाली सविनय कायदेभंग चळवळ १९३०-३१ आणि १९३२-३४ या काळात सुरू करण्यात आली. सात कलमी कार्यक्रमानुसार सर्व देशभर चळवळ सुरू होती. त्यानंतर गोलमेज परिषदा, १९३२ रोजी रॅम्से मॅकडोनाल्ड जातीय निवाडा, सप्टेंबर १९३२ पुणे करार, तीन गोलमेज परिषदेचा आढावा घेऊन श्वेतपत्रिक प्रसिद्ध करण्यात आली. त्याच्या आधारे १९३५ चा कायदा जाहीर करण्यात आला. क्रिप्स मिशनच्या अहवालाने कोणीही समाधानी झाले नाही. ब्रिटिश दुसऱ्या महायुद्धात असल्याने त्यांना अडचणीत न आणण्यासाठी १९४० मध्ये वैयक्तिक सत्याग्रहास प्रारंभ केला. वैयक्तिक सत्याग्रहींची संख्या दिवसेंदिवस वाढत होती. यावरून लोकांच्यात स्वातंत्र्याची तळमळ दिसून येत होती. १९४२ च्या दरम्यान काँग्रेसने आक्रमक भूमिका घेतलेली होती. तसेच ऑगस्ट प्रस्तावही फेटाळला होता. त्यामुळे भारतीयांच्या समाधानासाठी क्रिप्स मिशन पाठविण्यात आले. परंतु क्रिप्स मिशनच्या अहवालाने कोणीही समाधानी झाले नाही. शेवटी राष्ट्रीय काँग्रेसने १९४२ मध्ये छोडो भारत आंदोलन सुरू करण्याचा निर्णय घेतला.

# संदर्भ साधने

१)रहाळकर दत्ता: चिरनेर सत्याग्रह आणि उरणचा स्वातंत्र्य संग्राम: झुंज प्रकाशन उरण. डिसेंबर १९९३ पृ.१०

२)शेलकर अभय: वन संरक्षण कायदा: नाशिक लॉ हाउस प्रकाशन औरंगाबाद.२००५ पृ.१५

३)गोडबोले द.श.: बांधीलकीची वाटचाल: गोडबोले प्रकाशन थळ.१९८२ पृ.४९

४)पाटील वसंत भाऊ: चिरनेर जंगल सत्याग्रह: मयुरी प्रकाशन चिरनेर.१९९८ पृ.२२

५)दाते प.रा.:पेण तालुक्यातील स्वातंत्र्य संग्रामाचा इतिहास:दाते प्रकाशन पेण.१९७२ पृ.२८

६)पाटील वसंत भाऊ: उपरोक्त: पृ.१८

७)दाते.प.रा.: उपरोक्त: पृ.३०

८)जोश तलाठी: रायगड जिल्ह्याचा स्वातंत्र्य संग्रामांचा इतिहास: रायगड जिल्हा क्रांतिदिन सुवर्ण महोत्सव पेण. १९९२ पृ. ३१

९)लिमये गणेश रघुनाथ: पेण तालुक्यातील सत्याग्रहाचा इतिहास:अप्रकाशित हस्तलिखित.पृ.३

१०)कित्ता.

११)दाते प.रा: उपरोक्त: पृ.३२

१२)पाटील वसंत भाऊ: उपरोक्त: पृ.१९

१३)गोडबोले द.श.:अलिबाग तालुक्यातील राजकीय आंदोलने:अप्रकाशित हस्तलिखित पृ.२

१४)गोडबोले द.श.: बांधीलकीची वाटचाल: उपरोक्त: : पृ.६९

१५)पाटील वसंत भाऊ : उपरोक्त: पृ. १८

१६) फोफेरकर पांडुरंग कुशा: यांचे पत्र. दिनांक ९/७/१९८२

१७)पाटील वसंत भाऊ: चिरनेर जंगल सत्याग्रह : उपरोक्त: पृ.२५

१८)गुप्ते प्रभाकर केशव: चिरनेर जंगल सत्याग्रह: अप्रकाशित हस्तलिखित.पृ.३

१९)मोकाशी नारायण दामोदर: यांचे पत्र ७/७ /१९८२

२०)भगत अलोजी नाना : सत्याग्रहाचा खटला: अप्रकाशित हस्तलिखित.पृ.२

२१) ठाकूर धर्माजी बुधाजी : यांचे पत्र दिनांक १५/७/१९८२

२२)गुप्ते प्रभाकर केशव: उपरोक्त: पृ.६

२३)रहाळकर दत्ता: चिरनेर सत्याग्रह आणि उरणचा स्वातंत्र्य संग्राम: झुंज प्रकाशन् उरण.
डिसेंबर १९९३ पृ. ११

२४)दाते प.रा.: चिरनेर जंगल सत्याग्रह: दाते प्रकाशन्पेण.सप्टेंबर १९७१ पृ.१५

२५)फडके गो.स.: आत्माराम–रमापती कै.आत्माराम महादेव आठवणे यांचे चरित्र: पनवेल प्रकाशन् पनवेल. एप्रिल १९५० पृ.४५

२६)दाते प.रा.: उपरोक्त: पृ.१७

२७)पाटील वसंत भाऊ: चिरनेर जंगल सत्याग्रह: उपरोक्त: पृ. ३१

२८)गुप्ते प्रभकर केशव: चिरनेर जंगल सत्याग्रह: अप्रकाशित हस्तलिखित. पृ.८

२९)कित्ता: पृ.८

३०)पाटील वसंत भाऊ: चिरनेर जंगल सत्याग्रह: उपरोक्त: पृ. २४

३१)दाते प.रा.: चिरनेर जंगल सत्याग्रह : उपरोक्त: पृ.

३२)शिंदे भानुदास(संपा): कोकणातील शेतकरी चळवळीचा इतिहास: एम.पी.ए.एस.सी.कॉलेज पनवेल.फेब्रुवारी २००५पृ.८३

३३)पाटील वसंत भाऊ.'चिरनेर जंगल सत्याग्रह'.उपरोक्त: पृ. २८

३४)कित्ता: पृ.२८

३५)दाते प.रा.: चिरनेर जंगल सत्याग्रह: उपरोक्त: पृ.१०

३६)गुप्ते प्रभाकर केशव: चिरनेर जंगल सत्याग्रह: अप्रकाशित हस्तलिखित.पृ.१०

३७)पाटील वसंत भाऊ: चिरनेर जंगल सत्याग्रह: उपरोक्त: पृ. २९

३८)जोग गो.चिं.तलाठी ज.छ. (संपा): रायगड जिल्ह्याचा स्वातंत्र्य संग्राम: रायगड जिल्हा क्रांती दिन सुवर्ण महोत्सव समिती पेण. १९९२ पृ. ४३

३९)रहाळकर दत्ता: चिरनेर सत्याग्रह आणि उरणचा स्वातंत्र्य संग्राम: उपरोक्त: पृ. १४

४०)दाते.प.रा.: चिरनेर जंगल सत्याग्रह: उपरोक्त: पृ. २५

४१)कुलाबा समाचार वर्तमानपत्र २७ सप्टेंबर १९३०

४२)मोकाशी श.पा.: यांचे पत्र दिनांक ११/८/१९८२

४३) ठाकूर धर्माजी बुधाजी : यांचे पत्र दिनांक १५/७/१९८२

४४)रहाळकर दत्ता: चिरनेर सत्याग्रह आणि उरणचा स्वातंत्र्य संग्राम: उपरोक्त: पृ. १८

४५)लोकसत्ता वर्तमानपत्र २२ स. १९९४

४६)घरत किशोर हरिश्चंद्र: उरणच्या शेतकऱ्यांचा ऐतिहासिक संग्राम: न्हावा-शेवा बंदर कामगार संघटना उरण. जानेवारी २००२ पृ. ३८

४७)पाटील वसंत भाऊ: चिरनेर जंगल सत्याग्रह: उपरोक्त: पृ. ४१

४८)शिंदे भानुदास(संपा): कोकणातील शेतकरी चळवळीचा इतिहास: उपरोक्त: पृ.८४

४९)गोंधळी धनंजय (संपा): उरण टाइम्स: सप्टेंबर २००५.पृ.३१

५०)रहाळकर दत्ता: चिरनेर सत्याग्रह आणि उरणचा स्वातंत्र्य संग्राम: उपरोक्त: पृ.२०

५१)कानिटकर रा.प्र.श्री.जोशी ल.उपाध्ये श्याम गुळवणी (संपा): हरिभाऊ जोशी जीवन वृत्तान्त व आठवणी: पुणे. १९८३ पृ.१२

५२)दाते प.रा.: चिरनेर जंगल सत्याग्रह: उपरोक्त: पृ. ४३

५३)रहाळकर दत्ता: चिरनेर सत्याग्रह आणि उरणचा स्वातंत्र्य संग्राम: उपरोक्त: पृ.२०

५४)घरत किशोर हरिश्चंद्र: उरणच्या शेतकऱ्यांचा ऐतिहासिक संग्राम: उपरोक्त: पृ. ३९

५५)पाटील वसंत भाऊ: चिरनेरचा जंगल सत्याग्रह: उपरोक्त: पृ.४३

५६)दाते.प.रा.: उपरोक्त: पृ.४४

५७)पाटील वसंत भाऊ: उपरोक्त: पृ. ५४

५८)शिंदे भानुदास (संपा): कोकणातील शेतकरी चळवळीचा इतिहास: उपरोक्त: पृ.८४

५९)पाटील वसंत भाऊ: चिरनेर जंगल सत्याग्रह: उपरोक्त: पृ.५२

६०)पाटील प्रभाकर: कथा एका संघर्षाची: नागेश पब्लिशर्स वेशी अलिबाग.जानेवारी १९९४ पृ. ४३

६१)चौधरी के.के. (संपा): रायगड जिल्हा गॅझेटियर: महाराष्ट्र शासन मुंबई १९९३.पृ.१६७

६२)कुलाबा समाचार: दिनांक ८/११/१९३०

६३)बॉम्बे क्रॉनिकल: दिनांक ७ जानेवारी १९३१

६४)फ्री प्रेस जर्नल: दिनांक २८/११/१९३१

६५)बेडेकर नानासाहेब : यांचे पत्र. दिनांक २५/७/१९८२

६६)घरत किशोर हरिश्चंद्र: उपरोक्त: पृ.३९

६७)शिंदे भानुदास(संपा): उपरोक्त: पृ. ८५

६८)फडके य.दि.:विसाव्या शतकातील महाराष्ट्र,: खंड ४ श्रीविद्या प्रकाशनपुणे.१९९३पृ.४५

६९) डॉ. चौधरी के.के.: उपरोक्त: पृ.१००.

७०)गांधी शंकर भाई: माणगाव तालुक्यातील चळवळीचे ऐतिहासिक वृत्त: उपरोक्त: पृ. ९

७१)रहाळकर दत्ता : उपरोक्त: पृ.५४५५.

७२) सदावर्ते प्रार्थना: समग्र पनवेल गाथा: उपरोक्त: पृ.३३३४.

७३) होम डिपार्टमेंट स्पेशल बँच फाईल क्रमांक १०२०(५) सी १९३२

७४)जोग.गो.चिं.तलाठी.ज.छ. : रायगड जिल्ह्याचा स्वातंत्र्य संग्राम : रायगड जिल्हा क्रांतिदिन सुवर्ण महोत्सव समिती पेण. १९९२पृ.१४

# प्रकरण - ५ १९४२ ची छोडो भारत चळवळ व भूमिगत आंदोलन

## १९४२ च्या क्रांतीची पार्श्वभूमी व छोडो भारत ची घोषणा :

## सरकारची भूमिका :

## छोडो भारत आंदोलनाच्या कार्यक्रमाची रूपरेषा :

१) गांधीवादी संघर्षत्मक कार्यक्रमाचा पहिला टप्पा
२) भूमिगत नेत्यांचा विध्वंसात्मक कार्यक्रमाचा दुसरा टप्पा

## रायगड जिल्हयातील छोडो भारत चळवळची वाटचाल :

१)अलिबाग तालुक्यातील चळवळ
२)पेण तालुक्यातील स्वातंत्र्य चल्व
३)पनवेल तालुक्यातील चळवळ
४)उरण तालुक्यातील चळवळ
५)महाड तालुक्यातील चळवळ

## रायगड जिल्ह्यातील भूमिगत आंदोलन :

१)भूमिगत चळवळीचे स्वरूप
२)ब्रिटिश सरकारच्या सत्ता केंद्रावर हल्ला
३)रायगड जिल्ह्यातील घातपाती कारवाया
४)गनिमी पद्धतीने घातपाती घटना घडविणे (बॉब स्फोट)
५)ब्रिटिश व्यक्ती सरकारी नोकरांच्या व त्यांच्या हालचाली विरोधी धोरण

१९४२ च्या 'छोडो भारत' चळवळीला भारताच्या इतिहासात अनन्यसाधारण महत्त्व आहे. भारतीय स्वातंत्र्य चळवळ एका निर्णायक क्षणाला येऊन पोहोचली आहे हे या आंदोलनाने सिद्ध केले. या चळवळीद्वारे जनतेमध्ये ब्रिटिश शासनाविषयी असलेला असंतोष व प्रखर राष्ट्रीय भावना इत्यादींचा ब्रिटिश शासनाला प्रत्यय आला. भारतीयांना स्वातं‌्य मिळवावयाचेच आहे, तो त्यांचा दृढनिश्चय आहे हे स्पष्ट झाले. पुढील काळात भारतीयांवर राज्य करणे कष्टप्रद आहे याची जाणिव ब्रिटिश राज्यकत्याना झाली. म. गांधीजींच्या नेतृत्वाखाली झालेल्या या शेवटच्या ल½Ýाने इंग्रज सत्तेला मोठा हादरा दिला. आतापयत झालेल्या सत्याग्रही ल½Ýापेक्षा या चळवळीला थोडेसे वेगळे स्वरूप देण्याचा प्रयत्न तरुण व समाजवादी मंडळींनी केला. त्यांनी केवळ प्रतीकात्मक विरोध प्रकट करण्याऐवजी सरकारच्या मर्मस्थानांवर प्रहार करण्याचे धोरण आखले. यावेळी समाजातील निरनिराळ्या थरापयत स्वातंत्र्याची आकांक्षा पसरली होती. धनिकांपासून ते खेडÝातील गोरगरिबांपयत त्याग करण्याची प्रेरणा पोहोचली होती. तरुण मंडळी एका विशाल ध्येयासाठी तळहातावर शीर घेऊन लढ्यास सज्ज झालेली होती. क्रिप्स योजना अपयशी झाल्यामुळे सर्व देशात उव्देगाची व संतापाची लाट उसळलेली होती. त्यामुळे बहुतेक सर्व गटांमध्ये विकलतेची भावना निर्माण झालेली होती.

प्रदीर्घ काळ भारतावर राज्य केलेल्या इंग्रजांना हाकलावयाचेच या निश्चयाच्या भूमिकेने कॉंग्रेसने म. गांधीजींच्या नेतृत्वाखाली १९४२ मध्ये 'छोडो भरत' ही चळवळ सुरू करण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यामुळे स्वातंत्र्य सैनिकांनी सरकारच्या युद्धाला बळ वाढविणाऱ्या यंत्रणेवरच प्रहार करण्याचे लक्ष केंद्रित केले. रचनात्मक प्रवृत्तीचे काम करणारा अथवा लढवय्या सैनिक तसेच प्रत्येक जागृत कार्यकत्यानी स्वातंत्र्य संग्रामात भाग घेणे हे त्याचे आद्य कर्तव्य आहे असा सल्ला अनेक नेत्यांनी सर्वसामान्य जनतेला दिला. त्यामुळे शाळकरी मुलांपासून ते सरकारी नोकरीत उच्च पदावर असणाऱ्यापयत, गरिबांच्या झोपडीपासून ते श्रीमंतांच्या हवेलीपयत सवानी या लढ्यात भाग घेतला. शेतकरी कामकरी आदिवासी स्त्रिया या सवानी आपल्या कुवतीप्रमाणे व शक्तीनुसार लढ्यात योगदान दिले. रायगड जिल्ह्यामधील चळवळीची पार्श्वभूमी व तिचे स्वरूप आणि लोकांचा सहभाग कसा होता? हे जाणून घेण्याचा प्रयत्न या प्रकरणामध्ये केलेला आहे.

## ❖ १९४२ च्या क्रांतीची पार्श्वभूमी:-

दुसरे महायुद्ध सुरू असताना इंग्रजांनी स्वत:साठी अमेरिकन सेनादल मुंबईमध्ये ठेवलेले होते. अमेरिकन सेनादलाचा उपयोग जपानी आक्रमणावर नियंत्रण ठेवण्यासाठी आणि भारतातील स्वातंत्र्य आंदोलन चिरडून टाकण्यासाठी करण्यात येणार होता. हा संभाव्य धोका टाळण्यासाठी तसेच ब्रिटिशांनी भारत सोडून जावे यासाठी नवे आंदोलन सुरू करण्याचा निर्णय घेण्यात आलेला होता. ब्रिटिशांनी भारताच्या इच्छा-आकांक्षा पायदळी तुडवून भारतीयांची कोणत्याही प्रकारची अनुमती न घेता त्यांना दुसऱ्या महायुद्धाच्या वणव्यात लोटले होते. येथील मनुष्यबळ उत्पादित वस्तू आणि प्रचंड साधनसंपत्तीचा उपयोग इंग्लंडच्या सेनादलासाठी करून घेतला जात होता.

शेतकऱ्यांकडून अन्नधान्य सक्तीच्या जाचक लेव्ही पद्धतीनुसार वसूल केले जात होते. त्यामुळे भूईमुग कापूस यासारखी नगदी पिके अत्यंत स्वस्त भावात विकावी लागत होती. केळी व फळांच्या वाहतुकीसाठी रेल्वे वाघिणी न मिळाल्याने त्यांची विक्री होत नव्हती. कारण रेल्वेचा मुख्य उपयोग युद्धसामग्री व सेनादलाच्या वाहतुकीसाठीच करण्यात आला होता. शेती उत्पादनाला किंमत नव्हती. तसेच शेतमजुरी अत्यल्प होती. त्या उलट कारखान्यात तयार झालेला सर्वच माल महाग व दुर्मीळ असल्याने मूठभर श्रीमंत व्यक्ती आणि सावकारांनाच तो मिळत असे. आर्थिक दुरावस्थेमुळे सामाजिक जीवनसुद्धा हलाखीचे बनले होते. अशी परिस्थिती रायगड जिल्ह्यातही होती. याला इंग्रज जबाबदार असल्यामुळे त्यांना देशातून हाकलून लावले पाहिजे. यासाठी १९४२ ची चळवळ सुरू झाली.

अमेरिकेचे हजारो सैनिक व ६ कोटी डॉलर्सचे युद्धसाहित्य भारतात होते. त्यांच्या संरक्षणासाठी आणि महायुद्धासाठी भारतीयांचे सहकार्य मिळावे यासाठी अमेरिकेने चर्चिलवर दबाव आणला. युद्धकाळात अमेरिकेला दुखावणे इंग्लंडला परवडणारे नसल्याने चर्चिलने सर स्टॅफर्ड क्रिप्स याला भारत भेटीवर पाठविले. २३ मार्च १९४२ रोजी क्रिप्सचे दिल्लीमध्ये आगमन झाले. काँग्रेस मुस्लीम लीग आणि इतर राजकीय पक्ष व जाती-जमातीच्या नेत्यांशी २० दिवस चर्चा केली. त्यानंतर क्रिप्सने आपला अहवाल प्रसिद्ध केला. १० एप्रिल १९४२ रोजी काँग्रेसने ठराव करून क्रिप्स योजना फेटाळली. कारण हिंदुस्थानचे शेकडो तुकडे पडण्याची क्रिप्स योजना होती. तसेच भारताची राज्यघटना बनविण्याच्या प्रक्रियेत अनेक अडथळे होते. आपल्या स्वतंत्र सार्वभौम पाकिस्तानच्या मागणीची पूर्तता या योजनेत नसल्याने मुस्लीम लीगने योजना फेटाळली. हिंदुस्थानचे तुकडे करणारी

योजना असल्याने हिंदू महासभेने विरोध केला. संभाव्य हिंदुस्थान व पाकिस्तान यात शीख समाज विभागला जाईल आणि शिखांचे स्वतंत्र राज्य कधीही निर्माण होणार नाही या भीतीने शिखांनी ही योजना स्वीकारली नाही. आपणाला नव्या अवस्थेत पुरेसे संरक्षण मिळणार नाही म्हणून अस्पृश्यांनी योजना फेटाळली. संस्थानिकांचे स्वतंत्र स्वायत्त संघराज्य निर्माण करण्याची त्यांची महत्वाकांक्षा पुरी होत नव्हती म्हणून संस्थानिकांनी ही योजना फेटाळली. एकंदर देशातील सर्व गटांनी क्रिप्स योजना फेटाळली. युद्धाच्या प्रारंभापासून काँग्रेसपुढे अनेक प्रश्न निर्माण झाले होते.

दुसऱ्या महायुद्धाच्या वेळी जपान हा जर्मनी व इटालीच्या गटामध्ये सहभागी झाला. त्यामुळे आशिया खंडापयत युद्धाचा प्रसार झाला. जपानने ब्रिटन व अमेरिकेचे आशियातील सामर्थ्य नष्ट करण्याचा प्रयत्न केला. जपानची बॉम्बर विमाने ईशान्य भारत, पूर्व भारत, पूर्वकिनारपट्टीवर आक्रमकपणे उड्डाणे करीत होती. आसाम, कोहिमा, कलकत्ताही धोक्यात होते. जपानच्या पाणबुड्या ओरिसाच्या सागर किनाऱ्यापर्यंत संचार करीत होत्या. तसेच मद्रास, विशाखापट्टणम या शहरांवर बॉम्बहल्ले होत होते. त्यामुळे इंग्रजांच्या हुकूमशाहीच्या जागी जपानची हुकूमशाही येण्याची शक्यता होती. लष्करी आक्रमणाच्या भीतीने लोकांमध्ये घबराट निर्माण झाली होती. युद्धकाळात लोकांमध्ये नैतिक धैर्याचा अभाव व गुलामी वृत्ती यामुळे म. गांधीजी चिंतित झालेले होते. या अवस्थेतून लोकांना मुक्त करायचे असेल तर त्याच्यातील चैतन्य व स्वातंत्र्याची भावना जागृत होईल असे काहीतरी केले पाहिजे. तसेच जपानचे आक्रमण टाळण्यासाठी इंग्रजांनी भारत सोडून जावे असा निर्णय काँग्रेसने घेतला. त्यामुळे छोडो भारत चळवळ सुरू करण्यात आली.

### ❖ <u>'छोडो भारत' ची घोषणा :-</u>

इंग्लंडचे सैतानी साम्राज्यवादी स्वरूप व चर्चिलच्या दर्पोक्ती आणि क्रिप्स योजनेच्या वाटाघाटी फिसकटल्या. नंतरच्या काळात संपूर्ण काँग्रेस दिशाहीन व निष्क्रिय झालेली होती. अनेक नेते व कार्यकर्ते उदास व निराश होते. सर्व देश व सामान्य काँग्रेसजन म. गांधीजींच्या मार्गदर्शनासाठी मोठ्या आशेने पाहात होते. देशातील व परदेशातील हालचाली गांधीजी चिंतनशील मनाने पाहात होते. 'भारतातून ब्रिटिशांनी आपली सत्ता काढून घ्यावी असे आपण त्यांना सांगावे' अशी कल्पना म. गांधीजींच्या मनात एका सोमवारी आली. क्रिप्स गेल्यानंतर लगेच आपणास 'चले जाव' ही कल्पना सुचली असे म. गांधीजींनी लुई फिशर यांना दिलेल्या मुलाखतीच्या वेळी सांगितले.[१] क्रिप्स योजनेच्या अपयशानंतर होरेस अलेक्झांडर या ब्रिटिश मित्राजवळ गांधीजींनी

आपली कल्पना प्रथम प्रकट केली. २२ एप्रिल १९४२ रोजी म. गांधीजींनी होरेस अलेक्झांडर यांना पत्र लिहिले. त्या पत्रामध्ये असा उल्लेख केलेला आहे की "क्रिप्स प्रकरणाने तोंड कडू झालेले आहे. आता ब्रिटिशांनी शांततेने हिंदुस्थान सोडून जावे असे माझे मत आहे". २६ एप्रिल १९४२ च्या हरिजन साप्ताहिकात 'परकीय सैन्य' या शीर्षकाखाली म. गांधीजींनी लिहिले "इंग्लंडने व्यवस्थितपणे भारतातून निघून जाण्यामुळे भारत व इंग्लंड सुरक्षित राहणार आहेत".[२] दि. ३ मे, १० मे व २४ मे १९४२ च्या हरिजन अंकातून ब्रिटिशांनी भारत सोडून जावे या संदर्भात लेखन केले होते. इतर वृत्तपत्रांच्या मुलाखती, नेते व कार्यकर्त्याशी चर्चा, संभाषणे इ. माध्यमामधून म. गांधीजींनी या विषयावर चर्चा करून आपले विचार मांडले. म. गांधीजींच्या सर्व विचारांचा परिपाक म्हणजेच 'ब्रिटिशांनी स्वेच्छेने भारत सोडून जावे' हा होय. त्याला पुढे 'छोडो भारत' किंवा क्विट इंडिया हे शब्दरूप प्राप्त झाले,. या कल्पनेचे जनक म. गांधीजी असले तरी क्विट इंडिया या घोषणेचे जनक मात्र ते नाहीत,असे त्यांचे सचिव व चरित्रकार प्यारेलाल यांनी म्हटलेले आहे. प्यारेलाल यांच्या माहितीनुसार गांधीजी व अमेरिकन पत्रकार यांच्यातील संभाषणाच्या ओघात या कल्पनेच्या संदर्भात पत्रकाराने 'क्विट इंडिया' असा उच्चार करून या पंचाक्षरी घोषणेला जन्म दिला.[३]

भारतीय राजकारणात प्रवेश केल्यापासून म. गांधीजींच्या मनात ब्रिटिशांनी भारतातून निघून जावे हा विचार घोळत होता. बनारस हिंदू विश्वविद्यालयातील आपल्या ऐतिहासिक व खळबळजनक भाषणामध्ये म. गांधीजींनी १९१६ मध्ये जाहीर केले की, "हिंदुस्थानच्या कल्याणासाठी इंग्रजांनी निघून जावे किंवा त्यांना घालवून देणे आवश्यक आहे असे मला वाटते. त्यांनी गेले पाहिजे असे सांगायला मी कचरणार नाही आणि त्या निर्णयाच्या पूर्तीसाठी मी मृत्यूही पत्करायला तयार होईन."

म. गांधीजींच्या छोडो भारत या निर्णयावर काँग्रेसमधील अनेक नेत्यांमध्ये मतभेद होते. कारण इंग्रज महायुद्धामुळे अडचणीत आहेत. या संदर्भात विचार करण्यासाठी २७ एप्रिल १९४२ रोजी अलाहाबाद येथे प्रथम काँग्रेस कार्यकारिणीची बैठक झाली. त्यानंतर अखिल भारतीय काँग्रेस महासमितीची बैठक झाली. गांधीजींनी आपल्या नव्या भूमिकेविषयीचा ठराव मीराबेन यांच्यामार्फत पाठविला. त्यावर तीन दिवस चर्चा झाली. काँग्रेस महासमितीच्या सदस्यांमध्ये तीव्र मतभेद झाले. त्यामुळे म. गांधीजींचा मूळ मसुदा बाजूला ठेवून डॉ. राजेंद्रप्रसाद यांनी नवा दुरुस्ती ठराव मांडला.

तो एकमताने मंजूर करण्यात आला. परंतु दुसऱ्या दिवशी या नव्या मसुद्याला मौलाना आझाद यांनी विरोध केला. त्यामुळे त्यात दुरुस्ती करून पुन्हा मसुदा मांडला. तो २९ एप्रिल १९४२ अलाहाबाद येथे अखिल भारतीय महासमितीच्या अधिवेशनात मंजूर करण्यात आला.[४] अलाहाबाद येथे अखिल भारतीय काँग्रेस महासमितीने संमत केलेला ठराव म. गांधीजींना पसंत पडला नाही. म्हणून गांधीजींनी काही काँग्रेस नेत्यांना चर्चेसाठी सेवाग्रामला बोलविले. आपण काँग्रेसशिवाय इंग्रजांचाविरुद्ध लढा सुरू करावयाचा या संदर्भात बोलविलेल्या नेत्यांशी चर्चा करण्यात आली. श्री. वल्लभभाई पटेल, डॉ. राजेंद्रप्रसाद, गफारखान, कृपलानी, श्री. शंकरराव देव, श्री. प्रफुल्ल घोष, श्री. कृष्ण मेहताब, श्री. पट्टाभी सीताराम इ. अनेक नेते व २७ हजार गांधीवादी विधायक कार्यकर्ते यांच्यावर गांधीजींची भिस्त होती. तसेच अखिल भारतीय चरखा संघ, नयी तालीम संघ, हरिजन सेवक संघ आणि प्रांताप्रांतात विधायक संघटना ही गांधीजींची या लढ्याची ताकद होती. विधायक नेते व कार्यकर्ते थेट सेवाग्रामशी संपर्क साधू लागले. जून १९४२ च्या शेवटच्या आठवड्यात चरखा संघाच्या कार्यकर्त्यांच्या बैठकीत गांधीजींनी आंदोलनाची माहिती दिली.

६ जुलै रोजी सेवाग्रामला (वर्धा) येथे काँग्रेस कार्यकारिणीची बैठक भरली. या बैठकीत श्री. मौलाना आझाद, श्री. जवाहरलाल नेहरू, श्री. गोविंद वल्लभ पंत, श्री. सय्यद महमुद, श्री. असफ अली यांच्याशी गांधीजींनी चर्चा करून त्यांचे मतपरिवर्तन केले. १४जुलै रोजी 'छोडो भारत' ठराव सर्व संमतीने मंजूर करण्यात आला. त्यानुसार राष्ट्रवादी जन आंदोलनाचे सर्वाधिकार महात्मा गांधीजीकडे देण्यात आले. या कार्यकारिणीच्या ठरावावर शिक्कामोर्तब करण्यासाठी ७ ऑगस्टपासून मुंबईत होणाऱ्या अखिल भारतीय काँग्रेस महासमितीच्या अधिवेशनापयत थांबावे. अधिवेशनात ठराव पास होताच आंदोलन सुरू करावयाचे ठरले.[५] हा काँग्रेस कार्यकारिणीच्या ठरावाचा संदेश म्हणजे भारतावरील ब्रिटिशांची सत्ता तत्काळ संपुष्टात आली पाहिजे हे भारताच्या हिताचे आहे. तसेच जगाच्या सुरक्षितेसाठी नाझीझम व फॅसिझम यासारख्या लष्करशाही आणि साम्राज्यवादी यांचा शेवट करावयाचा आहे म्हणून ब्रिटिश व त्यांच्या दोस्तांना युद्धात अडचण निर्माण करावयाची नाही. तरीपण ब्रिटिशांनी आमची मागणी मान्य केली नाही तर काँग्रेसला गांधीजींच्या नेतृत्वाखाली व्यापक अहिंसक आंदोलन सुरू करणे भाग पडेल असा इशाराही या ठरावाने देण्यात आला.

## ❖ सरकारची भूमिका :-

वर्धा ठरावाच्या संदर्भात देशात संमिश्र प्रतिक्रिया उमटली.काँग्रेस समाजवादी फॉरवर्ड ब्लॉक व इतर जहाल गटांनी स्वागत केले. 'ईस्टर्न टाइम्स' या दैनिकाने आरोप केला की "काँग्रेस स्वत: विकत आहे." भारत सचिव अमेरी याने लिनलिथगोला पत्र लिहिले की म.गांधीजींचा दुखावलेला अहंकार व नेहरूंच्या मनातील अविवेकी कडवटपणामुळे हे दोघे उघड बंड करतील ही माझी भीती खरी ठरली आहे.मुस्लीम लीग मानवेंद्रनाथ रॉयच्या पक्षाने व हिंदू महासभेने काँग्रेसच्या भूमिकेला विरोध दर्शविला.डॉ.आंबेडकरांनी काँग्रेसच्या लढ्याच्या निर्णयाला विरोध करताना म्हटले की "देशाच्या दाराशी रानटी शत्रू आला असताना देशातील कायदा व सुव्यवस्था कमजोर करणे वेडेपणाचे आहे".

जून १९४२ च्या पहिल्या आठवड्यात गांधीजी आंदोलन करणार हे जवळपास निश्चित झाले होते.तेव्हापासून सरकारने काँग्रेसविरोधी उपाययोजना सुरू केल्या.वर्धा बैठकीत 'छोडो भारत' ठराव सुरू असतानाच सरकारने आंदोलनाचा मुकाबला करण्यासाठी प्रांतिक सरकारला ११ जुलै रोजी आदेश पाठवून कळविले की "नेत्यांना तत्काळ पकडावे लागेल म्हणून 'अ' व 'ब' वर्गाच्या नेत्यांच्या याद्या तयार कराव्यात व त्या पुन्हा तपासाव्यात."आंदोलन सुरू झालेच तर गांधीजी व इतर पुढाऱ्यांना कैद करून देशाबाहेर पाठविणे.परंतु नंतर तांत्रिक कारणामुळे हा निर्णय रद्द करण्यात आला.सरकारने ३ ऑगस्ट रोजी १६ कलमी योजना जाहीर केली.त्यानुसार गांधीजी व कार्यकारिणीच्या सदस्यांना पकडणे, प्रांताप्रांतातील प्रमुख काँग्रेस नेत्यांना व कार्यकर्त्याना अटक करणे, प्रांतिक काँग्रेस समित्या बेकायदा म्हणून जाहीर करणे, त्यांच्या कचेऱ्या बंद करणे त्यांचा निधी जप्त करणे इ.योजना होत्या.[६]

## ❖ राष्ट्रसेवा दल :-

डॉ.एम.एस.हर्डीकर यांनी 'हिंदुस्थान सेवादल' या संघटनेची स्थापना २८ डिसेंबर १९२३ रोजी केली होती.सन १९३१ च्या कराची अधिवेशनामध्ये काँग्रेसने या संघटनेस मान्यता दिली. काँग्रेसने त्याचे सेवादल असे नामांतर केले.१९४० च्या ऑक्टोबरमध्ये वैयक्तिक सत्याग्रहाची मोहीम संपल्यानंतर काँग्रेस सेवादलाचे कार्य थंडावले.शिवाय ब्रिटिश सरकारने काँग्रेस सेवादल आणि त्यांच्या स्वयंसेवकांच्या गणवेशावर व कवायत करण्यास बंदी घातलेली होती.काँग्रेसमधील समाजवादी नेते श्री.शिरूभाऊ लिमये व श्री.वि.म.हर्डीकरांनी जून १९४१ मध्ये राष्ट्रसेवा दलाची

स्थापना केली. या राष्ट्रसेवा दलाचे प्रमुख म्हणून श्री. एस. एम. जोशी यांची निवड करण्यात आली. महाराष्ट्र प्रांतिक काँग्रेस समितीने राष्ट्रसेवा दल या संघटनेस मान्यता द्यावी अशी विनंती श्री. एस. एम. जोशी यांना केली. राष्ट्रसेवा दलाची घटना तयार करण्यासाठी श्री. एस. एम. जोशी श्री. रावसाहेब पटवर्धन श्री. त्र्यं. र. देवगिरीकर यांची एक उपसमिती नियुक्त करण्यात आली. [७] या समितीच्या अहवालावर ६ ७ ८ फेब्रुवारी १९४२ रोजी महाराष्ट्र प्रांतिक काँग्रेस समितीच्या बैठकीमध्ये चर्चा करण्यात आली. तसेच राष्ट्रसेवा दलाच्या घटनेस मान्यता देण्यात आली. मुख्य संघटक एस. एम. जोशी साहाय्यक संघटक श्री. वि. म. हर्डीकर आणि महाराष्ट्र प्रदेश संघटक श्री. रामभाऊ अंबिके यांची नेमणूक करण्यात आली. राष्ट्रसेवा दलाचे प्रमुख कार्य म्हणजे स्थानिक पातळीवर तरुण कार्यकर्ते तयार करणे गावामध्ये प्रभातफेरी काढणे स्वातंत्र्यावर आधारित देशभक्तीपर गाणी बसविणे स्थानिक लोकजागृतीसाठी भाषणे व्याख्याने आयोजित करणे इ. कार्यक्रम होतात. [८]

आचार्य नरेंद्र देव यांच्या अध्यक्षतेखाली पुण्यामध्ये १ ते २३ मे १९४२ दरम्यान राष्ट्रसेवा दलाचे शिबिर घेण्यात आले. महाराष्ट्र समाजवादी व काँग्रेसमधील जहालवादी विचारांचे तरुण कार्यकर्ते आणि अनेक नेते उपस्थित होते. [९] त्यामध्ये श्री. पुरुषोत्तम त्रिकमदास कमलादेवी, चट्टोपाध्याय डॉ. राममनोहर लोहिया श्री. अच्युतराव पटवर्धन श्री. अशोक मेहता श्री. युसुफ मेहर अली श्री. एस. एम. जोशी, श्री. नानासाहेब गोरे श्री. शिरूभाऊ लिमये इ. मंडळी होती. शिबिरामध्ये भूमिगत संघटना कशी उभी करावयाची व चळवळीचा प्रचार गुप्तपणे कसा करावयाचा? यांच्या तपशीलवार सूचना देण्यात आल्या. ब्रिटिश सरकारविरोधी काँग्रेस पक्षाची जनआंदोलने सुरू होतील त्या वेळी त्या चळवळीला पूरक म्हणून भूमिगत चळवळ सुरू करावी असा निर्णय झाला. पुण्याच्या राष्ट्रसेवा दलाच्या शिबिरात छोडो भारत या चळवळीला क्रांती लढ्याचे स्वरूप देण्यासाठी कार्यकर्त्याचे बौद्धिक प्रबोधन करण्यात आले. छोडो भारत या क्रांती लढ्याची संकल्पना व सिद्धी यावर सखोल विवेचन झाले. भूमिगत चळवळीचे स्वरूप या विषयी साधारणपणे विचार मांडले. तेच भूमिगत चळवळीचे स्वरूप होते.

१) सरकारी यंत्रणेच्या हालचालीमध्ये अडथळे निर्माण करणे.

२) सरकारी दळणवळण यंत्रणा तोडणे म्हणजे टेलिग्राम टेलिफोनचे खांब आणि त्यांच्या तारा तोडणे छोटे पूल उडविणे रेल्वेमार्गावरील फिश प्लेट्स काढणे.

३)विद्युत पुरवठा बंद करणे.

४)सरकारी कार्यालयावर(तहसीलपोस्ट ऑफिसवर) हल्ला करणे.

५)प्रतिसरकार स्थापन करणे.[१०]

२५ जुलै १९४२ रोजी राष्ट्रसेवा दलाच्या प्रमुख नेत्यांची गुप्त बैठक पुण्यात झाली. त्यानंतर सर परशुरामभाऊ (एस.पी) महाविद्यालयाच्या मैदानावर विराट सभा झाली. म.गांधीजींच्या लढ्याला सर्वस्वपणाला लावावे असे जमलेल्या जनसमुदायाला आवाहन करण्यात आले.सभा संपल्यानंतर श्री.युसुफ मेहर अली यांच्या मार्गदर्शनाखाली पुण्यात रामनारायण बंगल्यामध्ये गुप्त शिबिर घेण्यात आले.[११] मुंबईतील कॉंग्रेसच्या अधिवेशनाला न जाता श्री.श्रीधर पुरुषोत्तम लिमये श्री.केशव गोरे यांनी पुण्याचे शिबिर आयोजित केले.शिबिरासाठी महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्ह्यातून दोन-तीन कार्यकर्त्यांची निवड करण्यात आली.श्री.युसुफ मेहर अली,श्री.पुरुषोत्तम त्रिमकदास, श्री.अच्युतराव पटवर्धन, श्री.एस.एम. जोशी, श्री.नानासाहेब गोरे,श्री.शिरूभाऊ लिमये यांनी उपस्थित कार्यकर्त्यांना दोन तीन दिवस मार्गदर्शन केले.काही खास सूचना व मार्गदर्शक तत्त्वे विशद करून सांगितली.या शिबिरासाठी रायगड जिल्ह्यातून महाडचे श्री.नानासाहेब पुरोहित, माथेरानचे श्री.भाई कोतवाल, माणगावचे श्री.शंकरभाई गांधी हे तिघेजण उपस्थित होते.[१२] म.गांधीजींची चळवळ सुरू होताच आपल्या विभागात स्थापन केलेल्या गटाच्या मदतीने त्यांनी पूरक अशी चळवळ सुरू करावी असे ठरविण्यात आले.

## ❖ <u>'छोडो भारत' आंदोलनाच्या कार्यक्रमाची रूपरेषा :-</u>

अखिल भारतीय कॉंग्रेस अधिवेशनाच्या वेळी कॉंग्रेस नेत्यांना अटक करण्यात आली. चळवळी संदर्भात म.गांधीजींनी किंवा कार्यकारिणीने कोणत्याही सूचना दिल्या नव्हत्या अगर कार्यक्रमाचे स्वरूपही स्पष्ट केलेले नव्हते.वर्धा येथे कॉंग्रेस कार्यकारिणने 'चले जाव' ठराव प्रथम मंजूर केला.तेव्हापासून ते महासमितीच्या अधिवेशनापर्यंतच्या काळात या संदर्भात म.गांधीजींनी अनेक नेत्यांशी चर्चा केली.अनेक वृत्तपत्रामध्ये लेख व मुलाखती दिल्या.'हरिजन' या वृत्तपत्रातील गांधीजींचे लेख, भाषणे, चर्चा, पत्रके इ.मार्फत भावी आंदोलनाची ढोबळ कल्पना लोकांपर्यंत पोहोचली होती.म.गांधीजी व इतर नेत्यांना अटक झाल्यानंतर ९ ऑगस्ट रोजी सकाळी विविध प्रांतातील शेकडो नेते व कार्यकर्ते बिर्ला भवनवर जमा झाले.पुढे काय? याची चौकशी नेते करू लागले.त्या वेळी प्यारेलाल यांनी म.गांधीजींचा संदेश लोकांना सांगितला.या वेळी डाह्याभाई

पटेल यांच्या घरी बैठक झाली.या बैठकीला सुचेता कृपलानी श्री.गिरीधारी कृपलानी श्री.चोइतराम गिडवानी डॉ.राम लेहिया मृदुलाबेन श्री.स्वामी आनंद श्री.डाह्याभाई पटेल श्री.खुर्शिदबेन श्री.सादिक अली इ.नेते हजर होते. श्री.सादिक अली यांनी एक बारा कलमी कार्यक्रम तयार करून तो अखिल भारतीय महासमितीचा अधिकृत कार्यक्रम म्हणून जाहीर केला.९ ऑगस्ट रोजी या कार्यक्रमाच्या शेकडो प्रती सायक्लोस्टाइल करून वाटण्यात आल्या. साधारणपणे १५ ऑगस्टपासून कार्यक्रमाची रूपरेषा पुढीलप्रमाणे ठरविण्यात आलेली होती."सर्व कार्यक्रम अहिंसेशी सुसंगत असला पाहिजे" अशी म.गांधीजींची सूचना होती.त्यांच्या सूचनेनुसार चळवळ सुरू करण्यात आली.चळवळीच्या कार्यक्रमानुसार गांधीवादी संघर्षात्मक कार्यक्रम आणि भूमिगत नेत्यांचा विध्वंसात्मक कार्यक्रम असे दोन स्वरूप कार्यक्रम दिसून येतात.

**गांधीवादी संघर्षात्मक कार्यक्रमाचा पहिला टप्पा :-**

१)युद्धविरोधी धोरणानुसार सभा मिरवणूक हरताळ संप इ.कार्यक्रमांचे नियोजन करावे.

२)परदेशी कापड बँका कारखाने शाळा कॉलेज इत्यादींवर बहिष्कार टाकावा.तसेच सरकारी नोकऱ्यांचा राजीनामा द्यावा.

३)ताडामाडाची झाडे तोडणे.ताडीदारू गुत्त्यावर निरोधन करणे.

४)करबंदी जंगल सत्याग्रह मीठ सत्याग्रह मिठागरांवर आक्रमण करणे नजरबंदी आणि तुरुंगातील नियम इत्यादींमध्ये कायदेभंग करणे.

५)आंदोलकांना पकडले असताना तुरुंगात घेऊन जाताना त्यांची सुटका करणे किंवा तुरुंगातून त्यांची सुटका करणे.

६) तुरुंगात उपोषण करणे.

**भूमिगत नेत्यांचा विध्वंसात्मक कार्यक्रमाचा दुसरा टप्पा :-**

१)ब्रिटिश सत्तेची केंद्रे व साधनावर हल्ला करून संपत्ती व साधने हस्तगत करणे.

२)दळणवळण साधनांमध्ये अडथळे निर्माण करणे किंवा उद्ध्वस्त करणे.

३)सरकारचा लष्करोपयोगी व जीवनोपयोगी साहित्याचा पुरवठा बंद करणे.

४)सरकारी नोकरांवर हल्ला करून चळवळीत सहभागी करून घेणे.

५)सरकारी कामकाज बंद पाडून प्रतिसरकार किंवा समांतर सरकार स्थापन करणे.

६)गनिमी पद्धतीने घातपाती (सावोटाज) चळवळ घडविणे.

## ❖ 'छोडो भारत' आंदोलनाची वाटचाल :-

मुंबईतील गवालिया टँक मैदानावर ७ व ८ ऑगस्ट रोजी अखिल भारतीय काँग्रेस कमिटीचे अधिवेशन भरले होते. या अधिवेशनासाठी एक लाख रुपये खर्च करून एक हजार चौ. मीटरचा सभामंडप उभारला होता. यावेळी देशातून व परदेशातून जवळजवळ आठ हजार प्रेक्षक हजर होते. ७ ऑगस्ट रोजी दुपारी अडीच वाजता "वंदे मातरम्" या गीताने अधिवेशनाचा प्रारंभ करण्यात आला. या अधिवेशनाचे अध्यक्ष मौलाना आझाद होते. त्यांच्या १०० मिनिटांच्या भाषणाने अधिवेशनाच्या कामकाजास प्रारंभ झाला. मौलाना आझाद यांनी 'छोडो भारत' चा ठराव मांडला तर सरदार पटेल यांनी अनुमोदन दिले. सरदार पटेल व म. गांधीजी यांची भाषणे झाली. ८ ऑगस्टला दुपारी अडीच वाजता अधिवेशन सुरू झाले. मुख्य ठरावाच्या अनेक उपसूचनांवर चर्चा करण्यात आली. काँग्रेस महासमितीने 'छोडो भारतचा' ठराव मंजूर केला. त्या ठरावामध्ये फक्त एवढाच उल्लेख होता की "कोणत्याही सूचना देणे किंवा त्या जनतेपयत पोहोचणे कदाचित शक्य होणार नाही अथवा काँग्रेस कोणतेही काम करू शकणार नाही. अशा परिस्थितीत या आंदोलनामध्ये सहभागी होणाऱ्या प्रत्येक स्त्री-पुरुषाला स्वत:च स्वत:चे मार्गदर्शक व्हावे लागेल. ज्या सर्वसाधारण स्वरूपाच्या सूचना आजवर केल्या आहेत, त्यानुसार प्रत्येकाला काम करावे लागेल."

'छोडो भारत' ठराव मंजूर होताच सरकारने काँग्रेसविरोधी कारवाईस सुरुवात केली. ८ ऑगस्टला रात्री तारेने 'पॅटॅलू' या सांकेतिक शब्दाद्वारे सर्व प्रांतिक नेत्यांना पकडण्याचा हुकूम दिल्लीहून प्रांतिक सरकारा कडे पाठविण्यात आला. त्यानुसार ९ तारखेला पहाटे ५ वाजल्यापासून देशभर धरपकड सुरू करण्यात आली. मुंबईतील कारवाई रावबहादूर देसाई या स्पेशल बॅचमधील एका गुजराथी वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्याकडे सोपविली होती. त्यांच्या आदेशाप्रमाणे ६० पोलीस पथकांनी ६० जागी पहाटे ५ वाजता कारवाईस सुरुवात केली. पोलीस कमिशनर बटलर व रावबहादुर देसाई पोलीस पथकाने बिर्ला भवन येथे म. गांधीजी़श्री. महादेवभाई मीराबेऩ कस्तुरबा इत्यादींना अटक केली. यावेळी एकूण २ हजार नेत्यांना अटक केली.

ब्रिटिश सरकारने ९ ऑगस्ट रोजी पहाटे स्वातंत्र्य आंदोलनाचे हायकमांड म. गांधी, पंडित नेहरू मौलाना आझाद आणि काँग्रेस वकिंग कमिटीचे इतर सदस्य यांना अटक केली. ब्रिटिशांनी छोडो भारत आंदोलन दडपून टाकण्याचा प्रयत्न चालविला. त्यामुळे एक प्रकारे देशातील लढाऊ

काँग्रेसजनांना व संघर्षोत्सुक जनतेला आव्हान दिले. अपूर्व दृढ निश्चयाने आणि हिमतीने भारतीयांनी आव्हान स्वीकारले. त्यांनी ९ ऑगस्टला सकाळीच राष्ट्रव्यापी स्वरूपाची प्रतिकार चळवळ सुरू केली. सरकारने त्याच दिवशी देशभर काँग्रेस कार्यकत्याची धरपकड केली. जिल्हा व तालुका पातळीवरील नेत्यांना व कार्यकत्याना पकडण्यात आले. परंतु बहुतेक सर्व सोशॅलिस्ट् काही गांधीवादी आणि काँग्रेसमधील इतर काही नेते व कार्यकर्ते भूमिगत झाले. भूमिगत झालेले सोशॅलिस्ट नेते आणि काँग्रेसमधील जहाल नेते यांनी चळवळ चालविण्यासाठी एकसूत्री यंत्रणा निर्माण केली. अखिल भारतीय काँग्रेस कमिटीतर्फे या केंद्राने देशाच्या कानाकोपऱ्यातील कार्यकत्याना सूचना पाठविण्यास सुरुवात केली. अच्युतराव पटवर्धन् अरुणा असफ अली़ राममनोहर लोहिया आणि सुचेता कृपलानी यांनी एक 'डिरेक्टोरेट' मध्यवर्ती समिती तयार केली. तसेच मुंबईत कॅथीड्रल स्ट्रीट या इमारतीतून भूमिगत कार्यकत्याचा एक गट आणि अखिल भारतीय काँग्रेस कमिटीचे कार्यालय हे एकत्रितपणे चळवळीचे कार्य गुप्तपणे चालवीत होता.[१३] या दोन्ही गटांनी एकत्र येऊनच काम करण्यास सुरुवात केली. या मध्यवर्ती केंद्रामार्फत स्वातंत्र्य चळवळीचे प्रचार साहित्य् सायक्लोस्टाइल पुरविले जात असत. मुंबईतील मध्यवर्ती केंद्र भूमिगत नेते चालवित होते. अखिल भारतीय काँग्रेस कमिटीच्या कार्यालयामार्फत प्रांत् जिल्हा् तालुका पातळीवरील भूमिगत केंद्रांना माहिती पोहोचविली जात असे. मध्यवर्ती केंद्रातून प्रसिद्ध केलेले गुप्त पत्रकमधून (बुलेटिन) जनआंदोलनाची माहिती मिळत असे. म. गांधीजींच्या अविरत व तुफान प्रचारामुळे ९ ऑगस्ट पूर्वीच 'छोडो भारत' उठावासाठी अनेकजण लढाऊ वृत्तीने सहभागी झाले होते. छोडो भारत चळवळीच्या दोन अवस्था होत्या. पहिल्या अवस्थेत जनतेचा प्रक्षोभ व्यक्त झाला. तर दुसऱ्या अवस्थेत सरकारी यंत्रणेत अडथळे व प्रतिसरकार स्थापन करण्याचे प्रयत्न झाले. देशामधील मोठ्या व प्रमुख शहरांमध्ये सुरू झालेल्या चळवळीचा विस्तार ग्रामीण भागातील झोपडीपयत पसरला. गांधीवादी विचारसरणीच्या नेत्यांनी व लोकांनी सत्याग्रह् बहिष्कार् सभा् मोर्चा, संप् पिकेटिंग आणि कायदेभंग चळवळ सुरू केली.

## ❖ <u>रायगड जिल्ह्यातील छोडो भारत चळवळ :-</u>

महात्मा गांधी आणि काँग्रेसश्रेष्ठींना अटक झाल्यावर रायगड जिल्हा काँग्रेस कार्यकर्ते मुंबई तील खेतवाडी परिसरात अत्यंत गुप्तपणे एकत्र आले. आपापल्या पद्धतीने सरकारविरोधी आंदोलन सुरू करण्याचा निर्णय त्यांनी घेतला. ९ ऑगस्ट दुपारपयत रायगड जिल्ह्यातील पनवेल् पेण्

अलिबाग़ कर्जत् महाड़ उरण या परिसरात अटकेचे वृत्त पसरले आणि आंदोलनाला प्रारंभ झाला. आंदोलनास प्रारंभ होताच सरकारने दडपशाहीचे धोरण स्वीकारले. त्यामुळे सर्वसामान्य जनतादेखील सरकारच्या विरोधात गेली. अनेक आंदोलक भूमिगत झाले. त्यांनी सरकारविरोधी घातपाती कारवाया करण्यास प्रारंभ केला. रायगड जिल्ह्यात गांधीवादी चळवळीबरोबरच समाजवादी गटाने भूमिगत राहून जहाल कार्यक्रम स्वीकारला. कर्जत तालुक्यात भाई कोतवाल यांच्या नेतृत्वाखाली सरकारी दळणवळण यंत्रणा उद्ध्वस्त करण्याचे कार्य केले. सरकारला अडचणीत आणण्याचा प्रयत्न केला. तर महाड तालुक्यात दिगंबर उर्फ नाना पुरोहित यांच्या नेतृत्वाखाली किसान मोर्चाने महाड मामलेदार कचेरी ताब्यात घेण्याचा प्रयत्न केला. भाई कोतवाल व नाना पुरोहित यांचे १९४२ च्या चळवळीतील कार्य हे राष्ट्रीय इतिहासात स्थान प्राप्त करणारे आहे. त्यांच्या नेतृत्वाखाली हजारो देशभक्तांनी चळवळीत भाग घेतला. महात्मा गांधीजींनी पुकारलेल्या १९४२ च्या चळवळीला रायगड जिल्ह्यातून उत्स्फूत प्रतिसाद मिळाला. पनवेल़ पेण़ अलिबाग़ कर्जत् महाड़ उरण या परिसरातील लोकांनी चळवळ चालवली.

- **अलिबाग तालुक्यातील चळवळ :-**

अलिबाग जिल्हा राष्ट्रसेवा दलाचे व अलिबाग तालुका राष्ट्रसेवा दलाचे प्रमुख राजा केळकर होते. तर नारायण भगत हे अलिबाग शाखेचे प्रमुख होते. म. गांधीजींच्या अटकेची बातमी समजताच त्याच रात्री राष्ट्रसेवा दलाचे सर्वजण एकत्रित येऊन त्यांनी चळवळीच्या संदर्भात विचार केला. एका मारवाड्याच्या गोडाऊनमध्ये शिरून पांढरा चुना आणला. गावातील प्रमुख रस्त्यावर 'क्वीट इंडिया' असे चुन्याने लिहिले. हे काम रात्री गुपचूप करण्यात आले. राष्ट्रसेवा दलातील मुलांचा हा दररोजचा उद्योग होता. केळकरवाडा हा या चळवळीचा केंद्रबिंदू होता. यासाठी साध्या वेशातील पोलीस सर्वत्र पाळत ठेवून होते.[१४] अलिबागच्या बंदरावरील भेंडीच्या झाडाखाली राष्ट्रसेवा दलाच्या गटाची आणि इतर मुला-मुलींची गुपचूप सभा २३ ऑगस्ट रोजी सुरू असताना जॉन एल्फिन्स्टन शाळेतील दातेमास्तरांना बरोबर घेऊन पोलीस प्रमुख खोत तेथे आले. त्यांनी या सर्व मुला-मुलींना दम दिला की "तुम्ही मिरवणूक काढताल तर याद राखा". एकेकाला फटकावून तुरुंगातच टाकीन". या दमाचा विचार न करता पुन्हा सर्वजण एकत्र आले. त्यांनी २४ ऑगस्ट १९४२ रोजी इंडियन हायस्कूल ते कोकण एज्यूकेशनच्या हायस्कूलपयत मोर्चा काढला. यावेळी सासवने गावचे आचार्य भाई ढवण व भालचंद्र ढवण यांची भाषणे झाली. त्यानंतर भाई ढवणला

अटक करण्यात आली. ९ महिन्यांची सजा झाली. त्यांना येरवड्याच्या तुरुंगात पहिल्या वर्गातील नजरकैद म्हणून ठेवण्यात आले.[१५] अटक झाल्यानंतरही पुन्हा भाषणे मोर्चा व मिरवणुकीस प्रारंभ झाला. अलिबाग बंदरापासून सुरू झालेला मोर्चा सध्याचा डोंगरे हॉल-कोळीवाडा-दत्ता पाटलाचे घर-भाजी मार्केट-बारक्या मुकादमांचे घर-रूळ नाकामार्गे आजच्या आंग्रे चौकात मिरवणूक आली. समोरच डी एस.पी.खोत उभे होते.त्यांनी मोर्चावर पिस्तुल रोखले व मोर्चावर लाठीमार केला. यावेळी श्री.दत्ता खानविलकर श्री.प्रभाकर कुंटे श्री.दत्तू रानडे श्री.नारायण भगत हे सर्व विद्यार्थी होते.सवाना पोलिसांनी अटक केली.यावेळी श्री.नारायण भगत श्री.नाना साष्टे श्री.आनंत साष्टे श्री.वसंत कुंटे इ.२७ मुलांना अटक करून हिराकोट जेलमध्ये ठेवले.[१६] संध्याकाळी अलिबागमधील ज्येष्ठ व प्रतिष्ठित नागरिक हिराकोट जेलमध्ये आंदोलकांना भेटण्यासाठी आले. श्री.दत्तात्रय गोपाळ म्हात्रे श्री.अ.मो.साष्टे हे सभेची पत्रके वाटणे फलक चिटकविणे प्रभातफेरीची तयारी करणे इ.कामे केली.यांना श्री.अ.मो.साष्टे यांना दिनांक २४/०८/१९४२ रोजी डिफेन्स ऑफ इंडिया रूल ५६(२)अन्वये १ वर्षाची सक्त मजुरीची शिक्षा झाली.[१७] सौ.दयाबाई ढवण यांना २१/१०/४२ रोजी तर श्री.भालचंद्र ढवण यांना ०९/०१/४३ रोजी अटक झाली व प्रत्येकी १ वर्षाची सक्त मजुरीची शिक्षा होऊन त्यांना ठाणे कारागृहात ठेवण्यात आले.[१८]

- **पेण तालुक्यातील स्वातंत्र्य चळवळ :-**

म.गांधीजींच्या अटकेची बातमी पेण शहर आणि पेण तालुक्यात सर्वत्र पसरली.यावेळी राष्ट्रसेवा दलाच्या विद्यार्थी दलाचा प्रमुख श्री.यशवंत देशमुख होता.पेणमधील सी.के.पी. आळीमधील श्री.मामासाहेब मोकाशी यांच्या घरात जिल्ह्यातील तरुणांसाठी सात-सात दिवसांचे राष्ट्र सेवादलाचे शिबिर चालत असे.[१९] सरकारी आदेशानुसार अनेक स्थानिक नेत्यांना अटक करण्यात आली.वि.ना.लिमये यांनी गांधीजींच्या अटकेचा निषेध केला म्हणून त्यांना ०९/०८/१९४२ रोजी अटक केली.पेण नगरपालिकेचे अध्यक्ष नारायण यशवंत नेने यांनी नगरपालिकेतर्फे सरकारविरोधी ठराव मांडला.त्यामुळे श्री.नेने श्री.बा.ह.गोरी श्री.प.रा. दाते यांना २७/०८/१९४२ रोजी अटक करून येरवडा तुरुंगात पाठविण्यात आले.[२०] तालुक्यातील कामार्ली गावच्या राष्ट्रसेवा दलाचे प्रमुख श्री.रा.वि.दावके आणि श्री.विठ्ठल पोसू ठाकूर यांना २४/०९/१९४२ रोजी अटक करून येरवडा तुरुंगात पाठविले.डॉ.मुकुंद नारायण लिमये व

श्री.नरहर काशिनाथ जोशी यांना २८/०९/१९४२ रोजी रात्री २.०० वाजता अटक करून ४ महिन्यांची शिक्षा देण्यात आली.

दोन ऑक्टोबर रोजी गांधी जयंती साजरी करण्याच्या हेतूने पेणमध्ये सभा घेण्यात आली.श्री.उत्तमलाल हेमचंद्र गुजर यांच्या नेतृत्वाखाली सभा संपल्यानंतर मिरवणूक निघून जवाहर मैदानावर आली.तेथे लोकांनी 'वंदे मातरम्' म्हटले.यावेळी श्री.उत्तमलाल हेमचंद्र गुजर, श्री.गोविंद पांडुरंग चाचड़ श्री.पांडुरंग शंकर कालेकर, श्री.दत्तात्रेय नारायण दातार इ.अटक करून चार महिने सक्त मजुरीची शिक्षा होऊन त्यांना ठाणे तुरुंगात पाठविले.[२१] गांधी जयंती सप्ताह निमित्ताने दि. ०४/१०/१९४२ रोजी १० ते १५ वयोगटातील १५ ते २० मुलांनी प्रभातफेरीचे नियोजन केले.याचे नेतृत्व श्री.रामचंद्र दत्तात्रय दोंदे यांनी केले होते.या प्रसंगी श्री.रामचंद्र दत्तात्रेय दोंदे, श्री.आत्माराम नारायण सावंत यांना ३ महिने सक्तमजुरीची शिक्षा झाली. श्री.राम गणेश जोशी, श्री.हिरालाल हेमचंद्र गुजर, श्री.मधुकर मोरेश्वर चंदने यांना दोन महिन्याची सक्त मजुरीची शिक्षा झाली.या सवाना ठाणे तुरुंगात पाठविण्यात आले.[२२]

काँग्रेसमधील तरुण कार्यकर्त्यांच्या मनात आले की कोर्टावर तिरंगा झेंडा लावावयाचा. दि.१९/१०/१९४२रोजी कौंडाळ तळ्यापासून(जुने कोर्ट) सर्वजणांनी प्रभात फेरीला सुरुवात केली.अनेकांच्या हातात झेंडे व फलक होते.छोडो भारत, क्वीट इंडिया, म.गांधीजी की जय, भारत माता की जय अशा घोषणा देत-देत प्रभातफेरी तहसील कचेरी पयत पोहोचली.फौजदार गजानन याने प्रभातफेरी अडवली.श्री.बाळकृष्ण रामजी शहासने, श्री.रामकृष्ण पांडुरंग रोडे, श्री.यशवंत बापूजी मोकाशी, श्री.प्रभाकर गंगाराम पाटील, श्री.रमाकांत नामदेव कालेकर, श्री.कमलाकांत रामचंद्र शृंगारपुरे, श्री.यशवंत प्रभाकर जोशी, श्री.पुंडलिक शंकर कालेकर, श्री.वसंत कृष्णाजी भागवत, श्री.मनोहर वसंत प्रधान, श्री.मनोहर रामकृष्ण चित्रे, श्री.गोपिचंद्र काशिनाथ पाटील, श्री.यशवंत देशमुख, आबा जोशी इत्यादींनी कोर्टावर तिरंगा झेंडा लावला. यावेळी कोर्टात वाद झाला.पोलिसांनी या प्रकरणातील संशयीत लोकांची यादी तयार करून १३ जणांना अटक केली.त्यांना ३ महिन्यांची सक्त मजुरीची शिक्षा दिली.या सवाना ठाणे जेलमध्ये पाठविले.कैद्यामध्ये तीन गट होते.अे गट येरवडा तुरुंगात, बी गट ठाणे तुरुंगात व सी गट जनरल असून हे गट व्यक्तीच्या उत्पन्नाच्या आधारे निर्माण केले होते.विसापूर जेलमध्ये अतिशय कडवे जहालवादी विचारांचे लोक ठेवत असत.अे व बी गटातील कैद्यांना सर्व प्रकारच्या सोई व

स्वातंत्र्य आणि उत्तम जेवण असे. सी गटातील कैद्याला सर्वसाधारण सोई व कमी प्रतीचे जेवण असे.[२३]

स्वातंत्र्य चळवळ मोडून काढण्यासाठी सरकारने धरपकडीचे धोरण सुरू केले होते. त्यानुसार पेण तालुक्यात दि.३०/१०/१९४२ रोजी श्री.रामकृष्ण गोविंद भावे(पेण), श्री.विष्णू नारायण परांजपे गुरूजी(दिवे)श्री.हिरू महादू म्हात्रे(वाशी)श्री.मंगलदास पद्मजी पाटील (वाशी), श्री.शंकर रामा म्हात्रे(उंबर्डे)इ.कॉंग्रेस नेत्यांना त्यांच्या गावी पकडून वरळीच्या तुरुंगात पाठविले.दि.३१/१०/१९४२ रोजी खोजा जमातींचे प्रमुख पुढारी श्री.बच्चू अल्ली करमाळी खोज़श्री.गणपत महादेव जाधव़ श्री.गोविंद रामदास गुजऱ श्री.पांडुरंग पुरुषोत्तम बाम़ श्री.प्रभाकर गणेश प्रधान आणि श्री.दामोदर आत्माराम मोकाशी यांनाही पकडून वरळीच्या तुरुंगात पाठविले.दि.२६/०१/१९४३ रोजी स्वातंत्र्य दिनी श्री.दत्तात्रय रावजी फडके़ श्री.बाळकृष्ण रामजी शहासने यांना कैद करून ६ महिने सक्तमजुरी व १०० रु.दंड अगर ६ महिने कैद अशी शिक्षा झाली.दि.२४/२/१९४३ रोजी श्री.मोहनीराज रामचंद्र कणेकऱ श्री.खंडेराव महादेव हजाऱे श्री.तुळशीदास गुजऱ श्री.ग.र.लिमये यांना पकडून वरळीच्या तुरुंगात पाठविले.स्वातंत्र्य चळवळीत सहभागी होणाऱ्या कार्यकर्त्यांच्या धरपडीचे हे सत्र ४-५महिने चालूच होते.रायगड जिल्ह्यातील ग्रामीण भागात गांधीवादी विचारानुसार चळवळ चालली होती.

- **पनवेल तालुक्यातील चळवळ :-**

'इंग्रजांनी भारताला आपल्या नशिबावर सोडून जावे' असा गांधीजींनी 'हरिजन' या वर्त मानपत्रामधून लेख लिहून पुढील लढ्याची तयारी करण्यासाठी म.गांधीजींनी देशातील निवडक लोकांच्या बैठका घेतल्या.मुंबईमध्ये भुलाभाई देसाई यांच्या बंगल्यावर बैठक झाली.त्या वेळी रायगड जिल्ह्यातून श्री.नानासाहेब कुंटे हजर होते.[२४] या बैठकीनंतर रायगडमध्ये चळवळीची तयारी सुरू झाली.११ ऑगस्ट रोजी नानासाहेब कुंटे व पनवेलचे श्री.चापसी पुरुषोत्तम ठक्कर ऊर्फ शंभूशेठ यांच्यात चळवळीच्या संदर्भात चर्चा झाली.त्यानंतर मुंबई येथे केळेवाडी गिरगाव येथील सोमण चाळीतील श्री.बापुराव(कृष्ण वामन)जोशी यांच्या घरी श्री.शंभूशेठ़ श्री.नाना कुंटे व इतर मंडळीमध्ये बैठक होऊन चळवळीच्या कामाची रूपरेषा ठरली.चळवळीचे पहिले पाऊल म्हणून शंभूशेठ यांनी १५ ऑगस्ट रोजी पनवेल येथे सत्याग्रह करावा असे ठरविण्यात आले.[२५] त्यानुसार पनवेलमध्ये चळवळीला सुरुवात झाली.

म.गांधीजींचे चिटणीस श्री.महादेवभाई देसाई यांचे आगाखान पॅलेसमध्ये १५ ऑगस्ट १९४२ रोजी हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने निधन झाले.१६ ऑगस्ट रोजी दुपारी ३.३० वाजता देसाई यांच्याबद्दलची दुखवटा सभा पनवेलमध्ये श्री.शंभूशेठ यांनी घेऊन सरकारविरोधी जनमत जागृत करण्याचा प्रयत्न केला.सरकारी इमारतीचा ताबा घेऊन तिरंगा झेंडा सरकारी इमारतीवर फडकविला.तहसील कार्यालयाकडील मोर्चामध्ये विद्यार्थी मजूर व्यापारी सहभागी झाले होते.पोलीस अधीक्षकाने डिफेन्स ऑफ इंडिया नियम ५६(४)खाली अनेकांना अटक केली. त्यामध्ये श्री.शंभूशेठ श्री.रामचंद्र पंडित श्री.वासुदेव आचार्य बल्लाळ कर्वे श्री.मूळशंकर मेहता श्री.साधुसिंग परदेशी श्री.नटवरलाल शहा श्री.मनोहर प्रधान श्री.बलाईचंद्र दत्त श्री. दत्तात्रेय नाडकरश्री.प्रल्हादसिंह परदेशी श्री.नारायण कदमश्री.सदाशिव ठाकूर श्री.शांताराम वालावलकर इत्यादींना अटक व शिक्षा झाली.त्यानंतर त्याचा निषेध करण्यासाठी पनवेलमध्ये हरताळ पाळण्यात आला.[२६]

- **उरण तालुक्यातील चळवळ :-**

भारतीय स्वातंत्र्य चळवळीत उरण तालुक्यातील अनेक तरुण शेतकरी कामगार सहभागी झालेले होते.म.गांधीजींच्या अटकेचा अनेकांच्या मनावर परिणाम झाला.अटक होताच त्यांचा संदेश आला की 'करा अथवा मरा'.म.गांधीजींनी भारत स्वतंत्र झाल्याचे जाहीर केल्यामुळे व ब्रिटिशांना 'चले जाव' चा हुकूम दिल्यामुळे जनता आनंदी झाली होती. मुंबई व प्रमुख शहरात सर्व व्यवहार पूर्णपणे बंद करण्यात आले.यावेळी उरण शहरात स्वयंपूर्ण हरताळ पाळला गेला.[२७] परंतु पोलिसांनी कोणालाही अटक केली नाही.यावेळी मुंबईहून खेडुतांच्या वेषात श्री.लल्लूभाई अभेचंद सरवैय्या व श्री.श्रीकांत काणेकर उरणला आले.उरणमध्ये गुप्त बैठक झाली.बुलेटिन तयार करण्याचे काम श्रीकांत काणेकर करत असत.म.गांधी जयंतीच्या दिवशी दुपारी ४ वाजता गांधी चौकात भर बाजारपेठेत 'वंदे मातारम्' ची घोषणा देऊन खांद्यावर तिरंगा झेंडे घेऊन जसवंतलालने भाषणास सुरुवात केली.त्यानंतर तरुण मंडळींनी मिरवणूक काढली.तारा कोर्लेकर(तारा रेड्डी) मिरवणुकीच्या प्रमुख होत्या.पोलिसांनी हरिलालजी शाहाच्या दुकानाजवळ मिरवणूक आडवली.रुक्मिणी वाजेकरतारा वाजेकर यांनी घोषणा दिल्या.या मिरवणुकीत ५० मुली-मुले सहभागी झाले.मिरवणुकीतील सवांना अटक झाली.जयवंतलाल दोशी कु.तारा

कोर्लेकर् श्रीकांत काणेकर् श्री.दत्ता नाडकर् श्री.नटवरलाल पितांबरदास इत्यादी सात जणांना पनवेल कोर्टात शिक्षा झाली.[२८]

उरण तालुक्यात २ ऑक्टोबर १९४२ नंतर दर चार दिवसांनी एक सत्याग्रह अशा प्रकारचे एक महिनाभर सत्याग्रह सुरू होते.या सत्याग्रहात प्रामुख्याने श्री.केशवलाल चुनीलाल दोशी श्री.जयंतीलाल रणछोडदास् श्री.त्रिभुवनदास रणछोडदास्कु.सुंदर डाऊर् सुलोचना अधिकारी श्री.निवास कोर्लेकर् श्री.शांताराम सखाराम गुप्ते श्री.दिनकर अनंत अधिकारी श्री.दत्तात्रेय सिताराम ठाकूर इ.अनेकांना अटक झाली.या सत्याग्रहाला प्रेरणा देणारे पडद्याआडचे नेते बेमुदत स्थानबद्ध करून जेलमध्ये ठेवले होते.त्यामध्ये श्री.डी.बी.ऊर्फ नानासाहेब म्हात्रे श्री.भाऊसाहेब डाऊर् श्री.हरिलालभाई करसनदास् श्री.रतीलाल ऊर्फ बाबुभाई सखैया श्री.रमणिकलाल दामोदर सखैया हे होते.[२९]

गोकुळअष्टमीचा दिवस म्हणजे हिंदू समाजातील लहान-मोठÝा लोकांचा आनंदाचा दिवस होय.या दिवशी ठिकठिकाणी दहीहंडीचा कार्यक्रम होत असे.परंतु ब्रिटिशांनी या कार्यक्रमावर व मिरवणुकीवर बंदी घातली होती.श्री.श्रीकांत काणेकर आणि १५-२० मुले गोविंदा घेऊन निघाली.रस्त्यावर हवलदाराने त्यांना आडविले.परंतु श्री.काका कोर्लेकरने काणेकरला नाच-गाणे आणि हातात हात धरून साखळी करण्यास सांगितले.त्यामुळे सर्व मुलांनी नाचत गात मिरवणूक काढली.गोविंदा गावातून फिरविला.[३०]

उरण शहरात पाच दिवसांच्या गणपती विसर्जनाची मिरवणूक मोठ्या प्रमाणात वाजत-गाजत निघत असे.मिरवणूकीवर बंदी असल्याने मिरवणूक निघाली नाही.तरीपण कोट नाक्यावरील गणपती निघाला व चार-पाच घरचे गणपती सामील झाल्याने मिरवणूकीचे स्वरूप प्राप्त झाले.पेठेत आल्यावर पोलिसांनी सांगितले की, वाजत-गाजत मिरवणूक काढू नका.तरीपण लोकांनी मिरवणूक काढली.वाणीआळीत श्री.श्रीकांत काणेकर व नगरपालीका दवाखान्याजवळ श्री.काका कोर्लेकर मिरवणूकीत सहभागी झाले.मिरवणुक बंदुकधारी पोलीस चौकीजवळ आली.त्यामुळे वाजविणे बंद झाले.यावेळी काका आनंदाने नाचत होते.काकांनी पाटोळे बुवांना भजन म्हणण्यास सांगितले.पुन्हा मिरवणूक वाजत गाजत पोलीस चौकीजवळून गेली.मिरवणूक बंदी असतानाही उरणमध्ये मिरवणूक काढून कायदेभंग चळवळ केली.[३१]

## • महाड तालुक्यातील चळवळ :-

महात्मा गांधीजींनी मुंबईतील जनसमुदयासमोर 'करेंगे या मरेंगे' अशी घोषणा करून आम्ही स्वातंत्र्य मिळविणारच असा निश्चय व्यक्त केला. त्यानंतर मुंबईहून अनेक नेते आपल्या भागात परत आले. त्यांनी चळवळ सुरू करण्याचा निर्णय घेतला. असाच निर्णय महाडमधील विद्यार्थ्यानी घेतला. त्यांनी अहिंसा मार्गाने चळवळ सुरू केली. सहा सप्टेंबर रोजी किशोर क्रांतिसेनेची गुप्त बैठक झाली. नाना पुरोहित यांच्या मोर्चाच्या वेळी सर्व प्रकारची मदत करण्याचा निर्णय बैठकीत झाला. सात सप्टेंबर रोजी पहाटे १०१२ प्रमुख विद्यार्थ्यांना पकडले. त्यामुळे मोर्चास मदत झाली नाही.[३२] कोकण एज्युकेशन सोसायटीच्या मुलांनी झेंडा मोर्चा काढला. यासाठी राष्ट्रसेवा दलाची बैठक झाली. शांता मेहता, चंदा बुटाला, यमुना मुडाळा (गुजर) हे विद्यार्थी बुलेटिन लेखनाचे काम करत असत. बुलेटिन वाटण्याचे कामही मुलीच करत असत. साधारणपणे २०० विद्यार्थी विद्यार्थिनी राष्ट्रसेवा दलामध्ये होत्या. रघु करंजकर व दत्ता गांधी हे सेवादलाचे शिक्षण देत असत. शांता मेहताला बुलेटिन वाटल्यामुळे ६ महिने शिक्षा झाली. त्याचप्रमाणे स्नेहलताबाई शेठ, यमुताई बुटाला, डॉ. दुवाळ यांना शिक्षा झाली. यामध्ये माफीचा साक्षीदार मोहन मेहता होता.[३३ ८]

दोन ऑक्टोबर रोजी गांधी जयंती निमित्त १० विद्यार्थ्यानी झेंडा हातात घेऊन मिरवणूक काढली. 'भारतमाता झिंदाबाद' ही घोषणा दिली. राम मंदिराजवळ पोलिसांनी सवाना कैद करून क वर्ग देऊन तुरुंगामध्ये पाठविले. त्यामध्ये श्री. मोहन धारिया, श्री. मनोहर काशिनाथ मेहता, श्री. रामभाई भुताळ, श्री. चंद्रकांत रामजी शेठ इ. अटक झाली.[३४] महाडमध्ये कुंभार आळीमध्ये दारूच्या दुकानासमोर पिकेटिंग करण्यात आले. यावेळी दारू पिण्यासाठी येणाऱ्यांना रागविणे किंवा दारू पिऊ नका, संसार उद्ध्वस्त होतो अशा विनंतीवजा प्रेमाचा सल्ला देत असत.[३५] बांधकाम, पाणी विभागात राम ओतुरकर हे सरकारी नोकरीस होते. त्यांनी स्वातंत्र्यलढ्यास सक्रिय मदत केली. ते वेळेवर बुलेटिन छापून देत असत. श्री. नारायण छगन खेडकर हा शाळकरी मुलगा बुलेटिन वाटण्याचे काम रात्रीच करीत असे. त्यांना पुढे पकडले आणि तुरुंगात डांबले.[३६]

## ❖ रायगड जिल्ह्यातील भूमिगत आंदोलन :-

१९४२ ची छोडो भारत चळवळ सर्व देशभर पसरत गेली. जनतेमध्ये इंग्रजविरोधी वातावरण निर्माण झालेले होते. ते आंदोलन संघटित करून चालविणे गरजेचे होते. याची जबाबदारी मुंबईमध्ये कॉंग्रेसच्या अधिवेशनासाठी जमा झालेले परंतु अटक न झालेल्या, काही

काँग्रेस व समाजवादी नेत्यांनी स्वीकारली. त्यांनी भूमिगत होऊन स्वातंत्र्यलढा चालविण्याचा निर्णय घेतला. यापूर्वी ७ ऑगस्ट रोजी समाजवादी नेत्यांनी मुंबईत बैठक घेऊन भूमिगत आंदोलनाचा निर्णय घेतला होता. त्या वेळी डॉ. गिडवानी यांनी आंदोलनाचे सूत्रसंचालन करण्यासाठी भूमिगत अखिल भारतीय काँग्रेस कमिटीची स्थापना केली.[३७] या कमिटीमध्ये सुचेता कृपलानी श्री. सादिक अली नंद ऊयार आणि काँग्रेस कमिटीच्या कार्यालयातील सर्व सेवकवर्ग सहभागी झालेला होता. काँग्रेस कमिटी व इतर नेते आणि भूमिगत कमिटी यांची एकत्र बैठक झाली. त्यामध्ये १२ कलमी कार्यक्रमाचे पहिले भूमिगत बुलेटिन जारी केले. त्यानंतर चार-आठ दिवसांत कमिटीच्या अनेक गुप्त बैठका झाल्या. भूमिगत अखिल भारतीय काँग्रेस समितीने कचेरी चालविण्याचा निर्णय घेतला. त्याप्रमाणे मुंबईत वाळकेश्वर भागात 'कृष्णा निवास' येथे कार्यालय सुरू करण्यात आले. सादिक अली यांची कचेरीचे प्रमुख म्हणून निवड करण्यात आले. सुचेता कृपलानी व लोहिया यांच्यावर आंदोलनाचे धोरण व कार्यक्रम ठरविण्याची जबाबदारी देण्यात आली. सादिक अली हे देशातील काँग्रेस कार्यकर्त्यांना पत्रव्यवहार करत असत.

नेत्यांची खोटी नावे व पत्त्यांची एक यादी तयार करण्यात आली. त्यामध्ये सुचेता कृपलानी=दादी/बहेनाजी लोहिया=डॉक्टर अच्युत पटवर्धन=कुसूम सादिक अली=सत्या/ सुशिल बाबा राघवदास=दीदी, अरुणा असफअली=कदम रामानंदन मिश्र=नारायण एस. एम. जोशी=इमामअली इ. टोपण नावे नेत्यांना देण्यात आली होती. कचेरीचे प्रमुख म्हणून सादिक अली डॉ. केसकर द्वारकानाथ कचरू हे सोईनुसार काम करीत असत. कचेरीच्या प्रमुखास 'किकाजी' या एकाच नावाने सर्वजण ओळखत असत. तर कचेरी व्यवस्थापकास 'रमेश' या नावाने ओळखले जाई. काँग्रेसने सेंट्रल डिरेक्टोरेट या नावाचे स्वतंत्र सेल स्थापन करून सुचेता कृपलानी डॉ. लोहिया अच्युतराव पटवर्धन हे तिघेजण सुरुवातीस त्याचे सभासद होती. नंतर अरुणा असफअली जयप्रकाश नारायण आणि इतर मंडळी सहभागी झाली. अखिल भारतीय काँग्रेस समितीची कचेरी व सेंट्रल डिरेक्टोरेट परस्पर सहकार्याने काम करीत असे. परंतु भूमिगत आंदोलनाचे नेतृत्व व मार्ग दर्शन सेंट्रल डिरेक्टोरेट करीत होते. तेच आपल्या सूचना आदेश कार्यक्रम इ. अधिकृतपणा यावा म्हणून सर्व पत्रे बुलेटिन अखिल भारतीय काँग्रेस कमिटीच्या नावाने सेंट्रल डिरेक्टोरेट पाठवित असे. तो सर्व कार्यक्रम प्रांतीय काँग्रेस नेते व समित्या "अधिकृत"म्हणून स्वीकारून त्यानुसार चळवळ चालवत असत.

रायगड जिल्ह्यामध्ये स्थापन झालेल्या भूमिगत काँग्रेस समित्या किंवा कृती समित्या युद्ध समित्या तात्काळ सक्रिय झाल्या. कारण समाजवाद्यांप्रमाणे भूमिगत होऊन लढा लढविण्याचा बहुतांश सामान्य काँग्रेस कार्यकर्त्यानी आंदोलन सुरू होण्यापूर्वीच निर्णय घेतला होता. या निर्णयामध्ये रायगड जिल्ह्यातील काँग्रेस समाजवादी नेते आणि जनता सहभागी झाली. कर्जत तालुक्यात भाई कोतवाल आणि त्यांचे सहकाऱ्यानी प्रामुख्याने घातपाती कारवाया केल्यातर नाना पुरोहित यांनी महाडमध्ये प्रतिसरकार स्थापन करण्याचा प्रयत्न केला. जिल्ह्यातील भूमिगत चळवळीचे साधारण स्वरूप पुढीलप्रमाणे.

**भूमिगत चळवळीचे स्वरूप :-**

१) ब्रिटिश सत्तेच्या शक्तिकेंद्रावर म्हणजे सरकारी पोलीस स्टेशन पोस्ट ऑफिसतारा ऑफिसरेल्वे व बसस्थानक, तहसील कार्यालय व सरकारी कार्यालयाचा तावा घेणे.

२) सरकारी दळणवळण साधनांमध्ये अडथळे निर्माण करणे उद्ध्वस्त करणे टेलिफोन व लाईटच्या तारा व खांब तोडणेरेल्वेरूळ रस्ते छोटे पूल उद्ध्वस्त करणे. वाहतुकीस अडथळे निर्माण करणे

३) इंग्रज व्यक्ती आणि सरकारी नोकर यांच्या विरोधी बहिष्काराचे धोरण स्वीकारणे.

४) आंदोलकांच्या सुटकेसाठी विविध उपाय अमलात आणणे.

५) गनिमी पद्धतीने घातपाती चळवळ सुरू करणे. यामध्ये आर्थिक निधी व शस्त्रास्त्रे व इतर साहित्यांची उभारणी करणे. बॉम्बस्फोट करणे.

चळवळीच्या कार्यक्रमानुसार अलिबाग पेण महाड कर्जत या तालुक्यांमध्ये प्रामुख्याने कार्य क्रम करण्यात आला. या कार्यक्रमानुसार कार्याचा तपशील पुढीलप्रमाणे ठरविण्यात आला. त्यामध्ये ब्रिटिश सरकारच्या सत्ताकेंद्रावर हल्ला करणे घातपाती कारवाया करणे गमिनी पद्धतीने घातपाती घटना घडविणे (बॉम्ब स्फोट) ब्रिटिश व्यक्ती व सरकारी नोकरांच्या व त्यांच्या हालचालीविरोधी धोरण स्वीकारले.

- **ब्रिटिश सरकारच्या सत्ताकेंद्रावर हल्ला :-**

पुण्यामध्ये समाजवादी गटाची परिषद भरली होती. त्या परिषदेत महाडचे श्री. दिगंबर उर्फ नानासाहेब पुरोहित हजर होते. परिषदेमध्ये ठरलेल्या कार्याची माहिती नानांनी आपल्या सर्व कार्यकर्त्याना दिली. या परिषदेने रायगड जिल्ह्यातून महाड व कर्जत ही दोन ठिकाणे कार्यासाठी निवडली होती. मे १९४२ पासून नाना प्रत्येकाच्या घरी जाऊन चळवळीचा प्रचार करत होते. जेथे

रात्र तेथे मुक्काम करून दुसऱ्या दिवशी पुढच्या गावात प्रचार करीत असत. परंतु काँग्रेसच्या स्थानिक नेत्यांपासून ते राष्ट्रीय नेत्यांपर्यंत अटक सत्र सुरू झाले. त्यामुळे रायगड जिल्ह्यातील काँग्रेसची मंडळी खेतवाडीत गुप्तपणे ९ ऑगस्ट रोजी सकाळी जमा झाली. स्वातंत्र्याची चळवळ पुढे कशी चालवावी यावर खूप चर्चा झाली. प्रत्यक्ष उठाव करून जिल्ह्यातील कचेऱ्या कब्जात घ्याव्यात असे नानांनी सुचविले. त्याला भाऊसाहेब लेले यांनी विरोध केला. त्यातून चळवळी संदर्भात मतभेद झाले. कोणताही निर्णय न होता सभा संपली. त्यानंतर ब्रिटिशांची सत्ताकेंद्रे ताब्यात घेण्याचा निर्णय घेण्यात आला. कारण सत्ताकेंद्रे त्यांची शक्तीकेंद्रे होती. या केंद्रामध्ये पोलीस स्टेशन, पोस्ट, तार, टेलिफोन ऑफिस, रेल्वे व बस स्थानक, तहसील कार्यालय इ. होती. त्यावर हल्ला करणेप्रसंगी आगी लावणे किंवा हल्ला करून ताब्यात घेणे आणि समांतर सरकार स्थापन करून स्वातंत्र्य मिळविणे हा या चळवळीचा एक भाग होता. त्यानुसार रायगड जिल्ह्यात पनवेल, पेण, अलिबाग, उरण, कर्जत, महाड इ. ठिकाणी आंदोलने करण्यात आली.

शंभूशेठ यांच्या नेतृत्वाखाली पनवेलमध्ये सभा झाली आणि पोलिसांनी त्यांना अटक केली. याचा परिणाम होऊन लोकांनी सरकारी इमारतीचा ताबा घेतला. व्ही. के. हायस्कूलच्या इमारतीला आग लावली.[३८] विद्यार्थी या आंदोलनात सक्रिय सहभागी झालेले होते. त्याचप्रमाणे किसनराव जगगाडे यांनी टपाल नाक्यावरची ब्रिटिश पोलीस चौकी रॉकेल ओतून पेटवली.[३९] त्यामुळे त्यांना पकडले आणि कारावासाची शिक्षा झाली. उरणचे भूमिगत कार्याचे प्रमुख लल्लूभाई सरवैय्या यांची श्रीकांत काणेकर व श्री. दत्ता नारकर यांनी खेतवाडी मुंबई येथे भेट घेऊन आपल्या भूमिगत कार्याला सुरुवात केली.[४०] सरवैय्या यांच्या सल्ल्यानुसार काणेकर व नारकर उरणला आले. त्यांनी उरणच्या एका बंगल्यास (सरकारी गेस्ट हाउस) आग लावण्याचा प्रयत्न डिसेंबर १९४२ मध्ये केला. त्यांनी यासाठी केमिकलचा उपयोग केला. साखर पावडरयुक्त पोटॅशिअम क्लोराइड व सल्फ्युरिक ॲसिड यांचा संबंध येऊन तीस मिनिटांनी आग लागते. डाक बंगल्याच्या इमारतीत ते केमिकल ठेवले. परंतु सोसाटŸयाचा वारा सुटल्याने हे केमिकल्स विभक्त झाले. त्यामुळे डाक बंगल्यास आग लागली नाही.[४१] कर्जत तालुक्यात श्री. भाई कोतवाल (अण्णासाहेब) यांच्या नेतृत्वाखाली स्वातंत्र्याचा लढा चालू होता. त्यांच्या गटाकडे वीज पुरवठा बंद करण्याची प्रमुख जबाबदारी सोपविण्यात आली असली तरीही त्यांच्या गटाने सरकारी कार्यालयावर हल्ला केला. काही प्रसंगी आगी लावण्यात आल्या. त्याचा तपशीलवार विचार करणे गरजेचे आहे. भिवपुरी

खोपोली दरम्यान टाटाच्या टेलिफोनच्या तारा तोडल्या.नंतर गौळवाडी येथील पोलीस गेटला (फॉरेस्ट गेटला)आग लावली.यासाठी अण्णासाहेबांना श्री.इका पुतळ्या श्री.पांडू रामा या आदिवाशींनी तर श्री.भाऊ विठू पाटील श्री.काशिनाथ बाळू म्हस्के[४२] या शेतकऱ्यांनी मदत केली.डहाणूच्या मामलेदार कचेरीस आग लावण्यासाठी या गटातील अनेक मंडळी गेली परंतु त्यांना अपयश आले.

महाड मोर्चावरील पोलिसांची शक्ती कमी करण्याच्या उद्देशाने माणगाव तालुक्यात शंकरभाई गांधी यांनी स्वातंत्र्य चळवळ सुरू केली.खरवली केंद्रातील कार्यकत्यानी मनाचा निश्चय केला की इंदापूरचा डाक बंगला व त्यामध्ये असलेल्या डी.एस.पीसह जाळण्याचा धाडसी निर्णय घेतला.तिलोरे जंगलातील शंकर मंदिरातून सर्व कार्यकर्ते दुपारी तीन वाजता इंदापूरकडे निघाले.योगायोगाने शंकरभाईचा वर्गमित्र अर्जुन भाऊराव पवार गाडी घेऊन इंदापूरकडे निघाला होता.त्याने एक पैसाही न घेता सवाना इंदापूरला सोडले.बंगल्याजवळ जाताच पोलिसांच्या दोन गाड्या आल्या.त्यामुळे सर्वजण इंदापूरहून करोणे गावच्या डोंगराळ भागातून खरवली केंद्राकडे गेले.शेतकरी संपाच्या चळवळीपासून खरवली येथील इनामदार कार्यकत्याच्या विरोधात होते. त्यांच्या संरक्षणासाठी पोलीस होते.तरीही कार्यकत्यानी त्याचा वाडा पेटवून देण्याचा निर्णय घेऊन ते खरवली गावाकडे गेले.यावेळी श्री.जगन्नाथ तलाठी यांनी शंकरभाइना झोपेतून उठवून सर्व घटना सांगितली.त्यानंतर श्री.शंकरभाई गांधी खरवलीला गेले व सर्व कार्यकत्याना समजावून सांगून वाडा पेटविण्यापासून परावृत्त केले.[४३] या दोन्ही घटना अपयशी ठरल्या.

१९४२ च्या चळवळीचा प्रभाव पोलादपूर तालुक्यात फारसा दिसून येत नाही. म.गांधीजींच्या आदेशानंतर पोलादपूरमधील वृद्ध कार्यकर्ते श्री.गोपीनाथ लालाजी गांधी यांनी थोडीफार हालचाल केली.म.गांधी व सरदार वल्लभभाई पटेल महाड पोलादपूरला[४४] येऊन गेल्यानंतर चळवळीला गती मिळाली.श्री.नानासाहेब पुरोहित यांचा महाडला मोर्चा येणार आणि मामलेदार कचेरी ताब्यात घेणार याची बातमी मिळाली.त्या वेळी पुरोहित गटाचे कार्यकर्ते सर्वत्र लोकजागृतीचे कार्य करत होते.मोर्चानंतर ब्रिटिश सरकारने राक्षसी भूमिका घेऊन अनेकांवर अन्याय व अत्याचार केला.अनेकांना अटक केली.त्यावेळी पोलादपूरमधील श्री.गोपीनाथ लालाजी गांधी डॉ.गणेश अनंत करमरकर श्री.दत्तात्रेय काशिनाथ जोशी श्री.दत्तात्रय गणपत

सावळे श्री . बाळकृष्ण पितांबर तलाठी,श्री . अंबाजी बुवा मालुसरे, श्री . विठ्ठल गणपतशेठ इत्यादींना शिक्षा झाली . या सर्वांना प्रथम वरळी जेलमध्ये व नंतर विसापूर जेलमध्ये ठेवण्यात आले .

**नाना पुरोहित यांचा महाडवर किसान मोर्चा :-**

भारतीय स्वातंत्र्य चळवळीतील नेत्यांना पकडले . या घटनेचा भारतीय जनतेवर भयानक परिणाम झाला . स्वातंत्र्यासाठी महाड परिसरातील शेतकरी, कामगार व विद्यार्थी स्वातंत्र्य चळवळीत सहभागी झाले होते . श्री . नाना पुरोहित मुंबईहून रात्री बिरवाडीत आले . तेथूनच रात्री वाळण खुर्द गावी गेले . त्यानंतर ते गुप्त सभा व भाषणे करीत गावोगावी फिरत असत . 'आपल्याला ब्रिटिश सरकार उलथून पाडायचे आहे . त्याकरिता आपल्या भागाचा हिस्सा म्हणून आपल्याला महाडची मामलेदार कचेरी व खजिना ताब्यात घ्यावयाचा आहे, ही मोठी लढाई आहे . यामध्ये गोळीबार होईल, अनेकांना अटक होईल, जन्मठेपीच्या शिक्षाही होतील . ज्यांच्यामध्ये हिंमत असेल, त्यांनी माझ्या झेंड्याखाली यावे' [४५] असे नाना पुरोहित यांनी सर्वांना सांगितले . महाड तालुक्यात बिरवाडी येथे जयराम उर्फ मामा उपाध्ये यांच्या वाड्यात नानानी आपल्या कार्याचे केंद्र बनवून प्रचार कार्य सुरू ठेवले . मोर्चाची जडणघडण आणि चळवळीतील गुप्त बातम्या मिळवत असे . पोलिसांची ताकद कमी करण्यासाठी माणगाव तालुक्यात श्री . शंकरभाई गांधींच्या नेतृत्वाखाली मोर्चाचे नियोजन करण्यात आले . त्यामुळे महाडचे पोलीस माणगावला गेले . बिरवाडीत पोलिसांचा तळ वाढल्याने नानांनी कार्या ंचे केंद्र हलवून शेलटोली येथील जंगलातील तुकाराम अंबरकर यांच्या गुरांच्या गोटÿात नेले . [४६] तेथे सत्यनारायणाची पुजा करून मंडळींसाठी रात्रभर भजन कीर्तन ठेवले हेते . या माध्यमातून मोर्चा चा प्रचार केला . सर्व कार्यकर्त्यांच्या जेवणाची सोय श्री . पांडू खोत (आप्पा)यांनी केली .

१ सप्टेंबर रोजी समाजवादी गटाची पुण्यात गुप्त बैठक झाली . या बैठकीत जहाल गटाच्या कार्यक्रमात भाग घेणाऱ्यांची यादी तयार करण्यात आली . ठिकठिकाणी आखलेल्या जहाल कार्यक्रमासाठी माणसांची निवड करून पाठविण्यात आले . महाडच्या मोर्चासाठी पुणे, मुंबईहून अनेक कॉलेजचे विद्यार्थी पाठविण्यात आले . मोर्चाच्या आधी चार दिवस बिरवाडी, शेलटोली या गावांच्या मध्यावर असलेल्या मामा उपाध्यांच्या वाड्यात बेसकॅम्प ठेवला होता . [४७] तेथे मोर्च्यामध्ये सहभागी होणाऱ्यांच्या याद्या तयार करण्यात आल्या . गावोगावी प्रचारक पाठविले होते . कॅम्पला पांडू खोत यांनी धान्याचा पुरवठा केला . मोर्चात सहभागी झालेल्या सर्वांना शेतकऱ्यांचा पोशाख देण्यात आला होता . महाड पोलिसांचा सतत पाठलाग चालू होता . त्यामुळे वाळणशेलटोली, शेलटोली ते बिरवाडी

या भागातील कार्यकर्त्यांची पळापळ सुरू होती. संदेशाचे दळणवळण सुरू होते. फितूर लोकांकडून होणारा धोका त्यामुळे महाड मोर्चाची तारीख निश्चित होत नव्हती. माणगाव तालुक्यातील खरवली केंद्रातील काही कार्यकर्ते आले. त्यांच्यात चर्चा झाली. पिठोरी अमावस्येच्या दिवशी म्हणजे गुरूवार दिनांक १० सप्टेंबर १९४२ हा दिवस मोर्चाचा निश्चित केला. या स्वातंत्र्यलढ्याचे केंद्रस्थान शेलटोली होते. बिरवाडी, वाळण, सांदोशी, वारंगी इ. अनेक गावातील लोक या किसान मोर्चात सहभागी झाले. यावेळी महाड मोर्चाचा आराखडा तयार करण्यात आला. प्रथम सवानी वाळण खुर्द येथे जमणे व तेथून शेलटोली कॉम्पवर जाणे. सर्व तयारी करणे, सूर्योदयापूर्वी महाड शहरात प्रवेश करणे , प्रथम पोस्टऑफिस ताब्यात घेऊन, मग मामलेदार कचेरीचा काब्जा करावा. [४८]

स्वातंत्र्याचा हक्क मागण्यासाठी नाना पुरोहित यांच्या नेतृत्वाखाली भटक्या जाती, आदिवासी, चर्मकार, भोई, कतकरी इ. जातीतील लोक एकत्र आले. श्री. हरी पवार, श्री. तुकाराम सावंत, श्री. जयराम उपाध्ये, श्री. लक्ष्मण तरे, श्री. रामभाऊ काळगुडे, श्री. सखाराम भगत, श्री. धोंडू पाटील, श्री. तुकाराम अंबरकर, श्री. धोंडू साटम, श्री. गजानन सोलम, श्री. रंगू कडू, श्री. विठ्ठल चांभार, श्री. सखाराम पाटील, श्री. सारकू वरवटकर, श्री. भिवा पवार, श्री. चेंड्या मिस्त्री, श्री. भिवा खेतल, श्री. भिवा तटकरे, श्री. टिकभाई मेहता इत्यादी अनेक सहकारी जमा झाले होते. [४९] महाड मोर्चासाठी पुण्याहून श्री. वसंत दाते, श्री. वसंत नगरकर, श्री. नारायण गुजर, श्री. रामभाऊ चांदोरकर, जमखिंडे, शहा इ. आले होते. तर मुंबईहून श्री. अच्युतराव केळकर, श्री. शरद रेडिज इ. कार्यकर्ते सहभागी झाले होते. [५०]

८ सप्टेंबरला गुप्तहेरांकडून बातमी समजली की, नानांच्या महाड मोर्चाची माहिती पोलिसांना मिळाली असून पोलीस पकडण्यासाठी येत आहेत. हे नानाला समजताच नाना व त्यांचे कार्यकर्ते वाळण खुर्द येथील कॅम्पमधून पळून गेले. दि. ९ सप्टेंबरला रात्री ९ वाजता मोर्चासाठी निघायचे असे संदेश दिले. मोर्चासाठी शेलटोली, बिरवाडीच्या मध्यावरील मामा उपाध्यांच्या वाड्यावर जमायचे असे कळविले. सर्व मंडळी वाळण खुर्द कॅम्पवर रात्री ९ वाजता जमा झाली. रात्री १२ वाजता शेलटोली कॅम्पवर पोहोचले. येथे सर्व तयारी झाली. 'मारू किंवा मरू' या निर्धाराने पाचशे अशिक्षित शेतकरी जमा झाले होते. श्री. अच्युतराव केळकर यांच्या भाषणाने बेभान झालेल्या सत्याग्रहींच्या मोर्चाने 'महात्मा गांधी की जय', 'छत्रपती शिवाजी महाराज की जय' अशा घोषणा देऊन रात्री १ वाजता कॅम्प सोडून महाडकडे वाटचाल केली. १० सप्टेंबर रोजी सकाळी स्वातंत्र्य

सैनिकांचा मोर्चा नडगाव येथे आला. याच वेळी महाडहून पोलादपूरकडे जाणारी सकाळची सर्व्हिस गाडी जमावाला दिसली. या गाडीमध्ये कोणी सरकारी अधिकारी आहे काय ? पाहण्यासाठी गाडी थांबवली. या गाडीमध्ये तहसील कार्यालयातील अव्वल कारकून आप्पासाहेब सावंत हा अधिकारी होता. त्याला खाली उतरविण्यात आले. दोरीने हात बांधून त्यास खादी पोशाख घातला व त्याला मोर्चाबरोबर घेतले.[५१] मोर्चा राजवाडी फाट्याजवळ शेडाव नाक्यावर आला. यावेळी एक सावकार सरकारी बेलीफ (कारकून) घेऊन जप्ती बजावण्यासाठी चाललेला होता. त्यास जमावाने ताब्यात घेतले.

सकाळी सात–साडेसातच्या दरम्यान मोर्चा शहरात दाखल झाला. मोर्चा पोस्ट ऑफिस जवळ आला. प्रथम टेलिफोनच्या तारा तोडल्या. श्री. नाना पुरोहित श्री. मामा उपाध्ये श्री. लक्ष्मण दुधाने पोस्टात घुसले. पोस्टमास्तर श्री. अंबिके आपल्या कुटुंबासह तेथेच राहत होता. त्यांना प्रथम बाहेर काढले. ठिकठिकाणी रॉकेल ओतून पोस्ट ऑफिसला आग लावली.[५२] एवढ्यात २५ लाठीधारी पोलीस घेऊन फौजदार श्री. मांढरे आले. त्यांच्याबरोबर ५१० मिनिटे हातघाईचा संघर्ष झाला. १५ पोलीस जखमी झाले. बाकीचे पळून गेले. फौजदार श्री. मांढरेंना पकडून त्याच्या डोक्यावर गांधी टोपी व खादी पोशाख घातला.[५३] यावेळी महाडमधील श्री. कृष्णा हेलेकर श्री. तुकाराम पानसरे यांनी नानास मदत केली. पोस्ट ऑफिस जाळल्यानंतर मोर्चा तहसील कचेरी ताब्यात घेण्यासाठी निघाला. त्यांना कचेरीवर तिरंगा झेंडा फडकावयाचा होता. मोर्चा बाजार पेठेतून (हल्लीचा महात्मा गांधीमार्ग) कचेरीकडे जाताना बाजारपेठ बंद झाली. डोंगरी पुलाजवळ श्री. कमलाकर दांडेकर हा १० वीत शिकत असणारा विद्यार्थी मोर्चात सामील झाला. येथेच नानांनी मोर्चाला उद्देशून सांगितले की "आता सावधान पुढील मार्गावर गोळीबार होण्याची शक्यता आहे. तेव्हा श्री. अण्णासाहेब सावंत बेलिफ व फौजदार मांढरे यांना पुढे करून वाटचाल करूया जर गोळीबार झाला तर प्रथम हे सरकारी नोकर ठार होतील. हा जमाव मच्छीमार्केटजवळ आला. तेव्हा 'हरहर महादेव' अशा घोषणा देत पुढे जावे असा आदेश नानांनी दिला. जमाव कचेरीकडे धावत सुटला. तेव्हा पोलिसांनी गोळीबार सुरू केला. यामध्ये श्री. कमलाकर दांडेकर श्री. नथू टेकावला श्री. अर्जुन भोई श्री. वसंत दाते आणि श्री. अण्णासाहेब सावंत इ. जागीच ठार झाले. श्री. अच्युतराव केळकर श्री. रामभाऊ कालगुडे हे जखमी झाले. हा संघर्ष तांबट आळीतील विठ्ठल

मंदिराजवळ घडला.या मोर्चात पाचजण ठार झाले व अनेकजण जखमी झाले.पिंपळपाराचा परिसर रक्ताने भिजला.

जखमी लोकांना बाजल्यावर घालून खाडीकिनाऱ्याने सरकारी दवाखान्यात दाखल केले. यावेळी महाडमधील लोकप्रिय डॉ.चितळे व डॉ.डिंगणकर हे डॉक्टर होते.त्या दोघांनी धोका पत्कारू,न स्वत:हून जखमी लोकांवर उपचार करण्यासाठी घटनास्थळी आले.[५४] त्यांनी जखमींवर उपचार केले.त्यानंतर इन्स्पेक्टर ढवळे पिंपळपाराजवळ आले.जमावाने त्याच्यावर बंदुका रोखल्या.त्यामुळे तो पळून गेला व गवत आळीतील धुमाळांच्या गोठ्यातील पेंढ्यामध्ये लपून वसल्यामुळे तो वाचला.महाडचे मामलेदार कित्तूर पिंपळपाराशी आले.नानांनी त्याला पकडून त्याचे हात बांधले व पितांबर भिकूदास गांधी यांच्या दुकानामध्ये ठेवले.इतक्यात बातमी आली की, सशस्त्र पोलिसांची एक तुकडी माणगावाहून महाडात येत असून त्यांनी गांधार नाक्यापासूनच गोळीबार सुरू केलेला आहे.त्यामुळे नानांनी सर्वाना आदेश दिला की पोलिसांच्या नव्या तुकडीला तोंड देणे अशक्य आहे.शिवाय पुण्यावरून मिलिटरी येत आहे. सर्वानी जमेल तसे लपत-लपत महाड सोडून संध्याकाळपर्यत कॅम्पवर जमावे."तुम्हाला रायगडच्या राजबंदीची शपथ आहे".[५५] तसे लोक पांगले व दुपारपर्यत शिरटोली कॅम्पवर जमू लागले.सकाळी ७ वाजल्यापासून ११.३० पर्यत महाडमध्ये संघर्ष सुरू होता.

दुपारी डी.एस.पी खोत पोलीस फौजसह महाडमध्ये हजर झाले.त्यांनी अनेक लोकांना पकडले.मोर्चात सहभागी झालेल्या लोकांची माहिती मिळविण्यासाठी अनेक लोकांचा अतिशय छळ करण्यात आला.नानास पकडण्यासाठी १० हजार रुपयांचे बक्षीस जाहीर केले.नाना हाती लागले नाही तर शूट ॲट साईट असे लष्कराला व पोलिसांना आदेश देण्यात आले होते.संध्याकाळी डॉ.डिंगणकर यांच्या दवाखान्यात जाऊन सर्व झडती घेतली.परंतु काहीच पुरावा मिळाला नाही. श्री.नाना पुरोहित भूमिगत झाले.त्यांनी बिरवाडी ते पुणे पायी प्रवास केला.या प्रवासाच्या वेळी त्यांना हिर्डोशीचे सदाशिव सुंदर मेहता भोरचे डॉ.तेंडुलकर यांनी मदत केली.

महाड मोर्चातील लोक पांगल्यानंतर हुतात्म्यांची दहनक्रिया सरकारी खर्चात महाड येथे झाली.या काळात वाळण खोऱ्यातील जवळजवळ ७०० ते ८०० लोकांना अटक केली. त्यापैकी वर्षाअखेरपर्यत ४८ लोकांना आरोपी म्हणून जेलबंद करण्यात आले.त्यांच्यावर खटला दाखल झाला.केस चालविण्यासाठी लोकांनी पैसा उभा केला.शेतकऱ्यांना कायदेशीर सल्ला दिला व त्यांचे

वकीलपत्रक घेतल्याने श्री.बाबुराव ओक(महाड) श्री.शंकर गोवर्धन शहा (महाड)यांना अटक करून त्यांना ठाणे तुरुंगात पाठविले.[५६] त्यानंतर श्री.वामनराव रेगे श्री.के.एन.फडके श्री.वसंतराव मेगदे इ.नामवंत १२ वकिलांची नेमणूक केली.सरकारतर्फे शंभराहून अधिक साक्षीदार तपासण्यात आले.अलिबाग जिल्हा न्यायालयात रीतसर खटला चालविण्यात आला. न्यायाधीश मिस्टर शहा यांनी निकालपत्रक तयार केले.याच वेळी म.गांधीजींच्या प्रयत्नामुळे १९४२ च्या लढ्यासाठी सरकारने नेमलेली खास न्यायालये रद्द करण्यात आली.त्यामुळे हा खटला पुन्हा नवीन ज्युरी असलेल्या न्यायालयापुढे अनेक वर्ष चालला.दि.२३ ऑक्टोबर १९४३ रोजी अलिबाग कोर्टाने हा निकाल दिला.सर्व आरोपींपैकी फक्त सहा जणांना किरकोळ शिक्षा झाली व इतर आरोपी निर्दोष सुटले.[५७]

## ➢ रायगड जिल्ह्यातील घातपाती कारवाया :-

'छोडो भारत' चळवळीच्या काळात भूमिगत कार्यकर्त्यानी ब्रिटिशांविरोधी निरनिराळे मार्ग स्वीकारले.त्यामध्ये दळणवळणात अडथळे आणणे प्रसंगी उद्ध्वस्त करणे हा कार्यक्रम उत्स्फूर्त व पूर्वनियोजित असाच होता.टेलिफोनच्या तारा व खांब तोडणे लाईटच्या तारा तोडणे रेल्वेरूळ उद्ध्वस्त करणे रस्ते व पुलामध्ये अडथळे निर्माण करणे पोस्ट व्यवहारात अडथळे आणणे इ. मार्गाने चळवळ सुरू करण्याचा निर्णय भूमिगत नेत्यांनी घेतला.या निर्णयाचे स्वागत करून रायगड जिल्ह्यामध्येही दळणवळण व्यवस्थेत अडथळे निर्माण करण्याचे प्रयत्न करण्यात आले.आंदोलनास प्रारंभ होताच सरकारने दडपशाही सुरू केली.त्यामुळे सर्वसामान्य जनतादेखील सरकारच्या विरोधात गेली.आंदोलक नेते भूमिगत होऊन सरकारविरोधी घातपाती कारवायांना प्रारंभ केला.

मुंबईपासून पुणे दक्षिण महाराष्ट्र, कर्नाटक आंध्र प्रदेश तमिळनाडू आणि केरळपर्यंत सरकारी टेलिफोन रस्ते रेल्वे ही दळणवळणाची साधने रायगड जिल्ह्यातून जात होती.तसेच याच जिल्ह्यातून पाणी वीज मुंबई शहराला पुरविली जात होती.ही यंत्रणाच उद्ध्वस्त करण्याचे लक्ष आंदोलकांनी बनविले.अलिबाग येथे श्री.ना.का.भगत श्री.गणपत पाटील (चरी)श्री.आनंद सावटे श्री.गोविंद साठे श्री.रंगा दातार(चौंडी)श्री.दामो अण्णा पाटील वाघरी),श्री.नारायण हरी पाटील श्री.के.डी.सुर्वे श्री.बाळू कुंटे श्री.नारायण थेळे श्री.गोविंद राम तिवारी श्री.वसंत कुंटे श्री.शंकर पाटील(चिचारी) श्री.हरीभाऊ महाजन (थळ), श्री.द.श.गोडबोले (थळ)श्री.प्रभाकर आंब्रे इत्यादी ५०-६० लोकांची यंत्रणा अलिबाग परिसरात घातपाती कारवाया

करत असत.[५८] एका रात्री टेलिफोनच्या तारा तोडून सरकारी दूरध्वनी आणि तारायंत्रणा विस्कळीत केली.अलिबागजवळ असलेल्या कार्तेखिंडीमध्ये घातपात कारवाया करून या टोळीने लाईटच्या तारा तोडल्या.[५९] तसेच अलिबाग़ महाड व अलिबाग-खोपोली जाणाऱ्या रस्त्यावर दगड़ तोडलेली झाडे व लाकडे ठेवून अडथळे निर्माण केले.तसेच लहानलहान पुलांची नासधूस केली.दळणवळणाच्या अभावी पोलिसांना कारवाई करणे अवघड झाले.टेलिफोन बंद झाल्याने जिल्हाधिकाऱ्याला व पोलीस अधीक्षकाला जिल्ह्यातील माहिती कळत नसे.पनवेल ते अलिबाग दोन तासाच्या प्रवासाला ६० तास लागले.कारण रस्त्यांवर लोकांनी अडथळे निर्माण केलेले होते.[६०] या कारवायांमुळे श्री.अ.मो.साष्टे़ श्री.ना.का.भगत़ श्री.हरिभाऊ महाजन इ.अनेकांना कैद झाली.डिफेन्स ऑफ इंडिया रुल ५६(२) अन्वये त्यांना एक वर्षाची सक्त मजुरीची शिक्षा झाली.

पेण तालुक्यामध्ये उंबर्डे गावाजवळ टाटा कंपनीचे लोखंडी इलेक्ट्रिकचे खांब होते. शांताराम वामा सोनावणे,गावऱ्या श्री.अंबू सोनावणे़ श्री.मारूती धोंडू सोनावणे़ श्री.नामदेव महादू सोनावणे हे वाशी गावचे रहिवासी होते.दि.२५/०९/१९४२ रोजी रात्री लाईटच्या तारा तोडण्यासाठी गेले.खांबावर असतानाच गस्त घालणाऱ्या पोलिसांनी श्री.शांताराम वामा सोनावणे यास पकडले व इतर तिघे पळून जाताना उंबडऱ्याच्या हद्दी पकडले.पेणचे पहिला वर्ग मॅजिस्ट्रेट यांनी या सवाना दोन वर्षाची सक्त मजुरीची शिक्षा दिली व त्यांना ठाणे तुरुंगात पाठविले.हे सर्व हरिजन समाजातील होते.[६१] श्री.गोपीचंद काशिनाथ पाटील़ श्री.पुंडलिक कारेकऱ श्री.रमण नामदेव कारेकऱश्री.किसन रोड़ेश्री.यशवंत देशमुख़ श्री.क.मा.शृंगारपुरे़ श्री.वसंत भागवत़ श्री.आंबा जोशी, हे नेते भूमिगत चळवळीचे कार्य पेणमध्ये करीत होते.या गटांनी आमटेंब भागात लाईटच्या तारा तोडल्या़ पेणखोपोलीकडे जाणाऱ्या रस्त्यावर अडथळे निर्माण केले.अनेक ठिकाणी दगडी व झाडे तोडून रस्त्यावर टाकली.त्यामुळे पेण परिसरातील वाहातूक यंत्रणा विस्कळीत झालेली होती.[६२] या गटातील अनेकांना अटक झाली.

माणगाव़ गोरेगाव परिसरात शंकरभाई गांधी यांच्या नेतृत्वाखाली लढा सुरू होता. महाड येथील पोलीस शक्तीचे विघटन करण्यासाठी माणगाव परिसरात घातपाती कारवाया सुरू करण्यात आल्या.त्याचप्रमाणे कुरवडे केंद्रात श्री.रा.त्रि.पेठे यांच्या नेतृत्वाखाली एक गुप कार्य करत होता.पोलीसयंत्रणेत जेवढे अडथळे करता येतील तेवढे करावयाचे असे गांधी व पेठे यांच्या गटाने ठरविले होते.श्रावणी अमावस्येच्या रात्री आकराच्या सुमारास २५-३० लोकांनी मोरी तोडली़

लाईटच्या तारा तोडल्या तसेच मुंबई,गोवा रस्त्यावर माणगावजवळ अडथळे निर्माण केले.हे काम श्री.धुंडिराज विनायक वैद्य श्री.शंकरभाई गांधी श्री.कोल्हटकरश्री.जगन्नाथ पितांबर तलाठी (पोलादपूर)श्री.भाऊ रणदिवे(चाढोरे)श्री.दामभाई मेहता श्री.दत्ता गांधी (महाड)श्री. पांडुरंग बाळकृष्ण कार्लेकर श्री.रामभाऊ अडीत, श्री.बाजी दाजी अडीत श्री.भिकू सकपाळ श्री.धोंडू सखाराम इंगवणा श्री.पांडू माणकर श्री.गंगाराम भेगाजी अडीत श्री.बसवलिंग गणलिंग जंगम श्री.अनंत राजपूरकर श्री.लक्ष्मण रंगू अडीत श्री.शंकर गजानन खेरे श्री.विश्राम कातकरी व इतर सात कातकरी हे सर्व खरवलीचे होते.या सवानी तिलेरे गावाजवळची मोरी तोडून रस्त्यात अडथळा तयार केला.तारांचे वेटोळे तोडून तारा तोडण्यात आल्या.हे काम खरवली केंद्रातील कार्यकत्यानी केले.[६३] कुरवडे येथील केंद्रात सर्व गावे एकत्र आलेली होती. श्री.रामचंद्र त्रिंबक पेठे व त्यांचा ग्रुप कार्य करीत होता.त्यामध्ये श्री.बापू दानवे श्री.वा.सु उपाध्ये श्री.शंकर दानवे श्री.विष्णू खुळे इ.गोरेगावचे कार्यकर्ते होते.त्यांनी तळेगाव खिंडीतील मोरी तोडून रस्त्यात अडथळा निर्माण केला.कुरवडा माणगाव रस्ता उदध्वस्त केला.तळेगाव येथे लाईटच्या तारा तोडल्या.[६४] बहुतेक सर्व कार्यकर्ते शेतकरी वेषात जंगलात राहत असत.श्री.गे.ना.अडीत द्रौपदी अडीत लक्ष्मी अडीत या महिलांनी त्यांच्या जेवणाची व्यवस्था केलेली.महाड मोर्चानंतर दोन्ही गटांनी पोलिसांच्या ताब्यात जाण्याचा निर्णय घेतला. त्यांमुळे सवाना अटक करण्यात आली [६५].

**भाई कोतवाल गटाच्या घातपाती कारवाया :-**

स्वातंत्र्याची आकांक्षा समाजातील निरनिराळ्या घटकांपयत पसरलेली होती.धनिकापासून ते खेड्यातील गोरगरिबांपयत स्वातंत्र्यासाठी त्याग करण्याची प्रेरणा पोहोचली होती.त्यातूनच तरुण मंडळी एका विशाल ध्येयासाठी पुढे आली.त्यांने समर्पण बुध्दीने तळहातावर शीर घेऊन चळवळीत सहभागी झाले होते.त्यातून कर्जत तालुक्यातील नेतृत्व उदयास आले.ते म्हणजे हुतात्मा विठ्ठलराव(अण्णासाहेब) लक्ष्मणराव कोतवाल उर्फ भाई कोतवाल होय.त्यांनी राष्ट्रसेवा दलाची स्थापना सन १९४१ मध्ये कचरे पाटलांच्या विहिरीजवळ एका लहानशा इमारतीत केली.तिचे नाव 'जम्मत' असे शिरूभाऊ लिमये यांनी ठेवले.सन १९४२ च्या ऑल इंडिया काँग्रेसच्या मुंबई बैठकीपूर्वी, पुण्यात युसूफ मेहेर अली यांच्या नेतृत्वाखाली युवकांची एक गुप्त बैठक झाली.यावेळी भाई कोतवाल हजर होते.स्वातंत्र्यलढ्यास प्रारंभ झाल्यावर इंग्रजांच्या युद्ध धोरणाला कसा विरोध करावयाचा यावर चर्चा झाली.यावेळी एक आराखडा तयार करण्यात

आला . त्यानुसार रेल्वेरुळ उखडून मालगाड्या पाडणे, विजेचा पुरवठा बंद पाडण्यासाठी भिरा, भिवपुरी, पुणे, चोला पॉवर हाउस इ. वीज पुरवठा करणाऱ्या केंद्राचे काम बंद पाडण्याचा कार्यक्रम तयार केला . त्यासाठी विजेचे पायलॅन्स पाडून वीजपुरवठा बंद करण्याच्या योजनेची जबाबदारी भाई कोतवालांच्या गटाकडे सोपविण्यात आली .

दि . ७ व ८ ऑगस्ट १९४२ रोजी मुंबईत गवालिया टँकवर कॉंग्रेसची सभा झाली . 'करेंगे या मरेंगे' हा ठराव पास झाला . याच वेळी सर्व नेत्यांना अटक करण्याचे सत्र सुरू झाले . भाई कोतवाल यांना अटक करण्यासाठी पोलीस पाठलाग करत होते . त्यामुळे भाई कोतवाल फरारी झाले . पालीला रघुनाथराव दादाकडे आले . तेथे थांबून मंडळी जमा केली . भिवपुरी, खोपोली दरम्यानच्या टाटाच्या टेलिफोनच्या तारा कापल्या . यावेळी भाई कोतवालाबरोबर श्री . इका पुतळ्या, श्री . पांडू रामा हे कातकरी, आणि श्री . भाऊ विठू पाटील, श्री . काशिनाथ बाळू म्हसणे, श्री . परशुराम पाटील हे तरुण शेतकरी होते .[६६]

भाई कोतवालवर सोपविलेल्या जबाबदारीच्या कार्याकडे त्यांनी संपूर्ण लक्ष दिले . विजेचे पायलन कसे कापावयाचे याची माहिती गोळा केली . या संदर्भात टाटा कंपनीतील देशभक्त इंजिनिअर श्री . कुशाभाऊ आपटे यांनी कोणता पायलन कसा पाडावयाचा याची सविस्तर माहिती दिली .[६७] याशिवाय जंगलात फिरणारा लाईनमन यांनीही या संदर्भात माहिती दिली की, विजेच्या खांबात शॉक कुठे बसू शकतो? त्यासंबंधी कशी काळजी घ्यावी? मुंबईत गिरगाव-खाडीलकर रोड येथे एका जुनाट इमारतीमध्ये भूमिगत चळवळीतील कार्यकर्त्यांचा एका अड्डा होता . भूमिगत हेड कॉर्टर्सकडून वीज बंद पाडण्याचे आदेश कोतवालांना मिळाला . अण्णांनी सामानांची जुळवाजुळव सुरू केली . दिनांक २५/०९/४२ रोजी डोण्याचा पायलन नंबर ४२९ कापून पडला . यावेळी अण्णाबरोबर श्री . गोमा पाटील, श्री . पिटण्या, रघुनाथदादा, श्री . गणपतराव भगतमास्तर, श्री . बाबू क्षीरसागर, श्री . बाबू लोहार, श्री . शिंदे मास्तर इ . मंडळी होती .[६८] पालीला नदीकाठी मुक्कामाला असताना श्री . चांदोबा बंडोबा क्षीरसागर, श्री . व्यास, श्री . शांतिलाल, चंद्रकांत इ . कल्याण मुरबाड येथील मंडळी कोतवाल गटात सामील झाली . पायलन कापण्याचे जनरल सुपरविझन अण्णासाहेबांचे, मुख्य मार्गदर्शन गोमा पाटील यांचे होते . प्रत्यक्ष पायलन कापण्याची प्रमुख सूत्रे श्री . रामलालजी श्रीवास्तव यांच्याकडे होती . माणगाव २३(७) नंबरचा पायलन २३/१०/१९४२ रोजी रामलालजीने दोन तासात कापला . आबिवलीचा पायलन नंबर ५०४ पाचव्या दिवशी म्हणजे

२८/१०/१९४२ रोजी कापला. त्यानंतर कर्जतजवळील आकुर्ली पायलन नंबर १०० भाई कोतवाल यांच्या गटांनी कापला.[६९]

भाई कोतवाल गटाने पायलन पाडण्याचे सत्र सुरूच ठेवले होते. त्यांच्या गटाने कासगावचा रेल्वेचा पायलन पाडला. तसेच भिवपुरी लाइनचा पायलन ठरावीक दिवसांनी ठरावीक वेळेत कापा. दिवाळीच्या वेळी मुंबई अंधारात ठेवा असा संदेश आला. त्यानुसार भिवपुरी पॉवरहाउसची डायरेक्ट लाइन कापली. परंतु मुंबईची लाईट बंद करण्याचा उद्देश सफल झाला नाही. कारण खोपोलीमार्गे लाइट मुंबईला जात होती. कोतवाल गटाने पहिल्या मुहूर्तावर डोण्याचा पायलन नंबर ४२९ हा कापला. त्याच्या जागी नवीन पायलन उभा केला. पोलिसांचा पहारा असतानाही पायलन कापण्याचा निर्णय घेतला. यावेळी कोतवाल गटाचे दोन विभाग करण्यात आले. देसाईच्या नेतृत्वाखाली श्री. अण्णा दातोबा हळदे़ श्री. शिंदेमास्तऱ श्री. झिंग्या काका़ श्री. चांदोबा तर रामलालबरोबर श्री. जकातदार मोरमारे़ श्री. जगन्नाथ क्षीरसागऱ श्री. वामन भोळे़ श्री. चंद्रकांत गुजराथी इ. मंडळी होती. दोन्ही बाजूनी पोलिसांवर हल्ला करून त्यांना बांधून ठेवले. पायलन कापण्यास सुरुवात केली. याच वेळी पेट्रोलिंगची मोटार आल्याने सर्व मंडळी पळून गेली.

कोतवाल गटाने पोलिसांवर हल्ला केल्याने शासन चिडले होते. सरकारने अण्णासाहेब व काका (द्वारकानाथ तकारे) यांना पकडण्यासाठी प्रत्येकी ५ हजार रुपयांचे इनाम जाहीर केले. कोतवाल टोळीचा नाश करण्यासाठी साठ सशस्त्र घोडेस्वारांची एक पलटण मुंबई गव्हर्नरच्या A.D.C.च्या खास देखरेखीखाली रवाना केली. त्यांनी कर्जत तालुक्यात मोठा धुमाकूळ घातला. पॉवर हाउस़ कळंब़ कोल्हारे़ वांगणी इ,. ठिकाणी मुक्काम ठेवला. त्यांनी लोकांना अनेक प्रकारचा त्रास दिला. खेड्यात जाऊन कोंबड्या़ भात इतर साहित्य सक्तीने मिळवीत असत. नेरळचा गुल्लूशेठ हा पोलिसांना मिळाला होता.

सिद्धगड येथे मुक्कामी असताना अण्णांच्या सांगण्यावरून श्री. भगतमास्तरांनी नांदगावच्या मारूती पाटील यास गडावर येण्याची चिठ्ठी लिहिली होती. ती गडावरील माणसाबरोबर नांदगावला पाठवली. मारूती पाटील घरी नसल्याने त्याचा मित्र गोविंद साबळे यांच्याकडे दिली. परंतु १० हजारांच्या बक्षिसासाठी साबळ्याने लल्या वाज्या या माणसाबरोबर मुरबाडला श्री. अण्णा बोकड याच्याकडे पाठविली. बोकडने ती चिठ्ठी बदलापूरच्या अण्णा घाटवळांकडे पाठवली. त्याने ठाणा पोलीस हेडकोर्टला पोहोचवली. ठाण्याचा जिल्हा पोलीसप्रमुख हॉल हा होता. त्याने पोलीस जमादार

फौजदार असे मिळून दोन मोटारी भरून कल्याण मुरवाड़ म्हसामार्गे चिरडला आला.बापू कुंटे यास मार्गदर्शक घेऊन जांबुर्डीमार्गे बोरवाडीस आला.बोरवाडीचा श्री.दुर्गा हेमाडा या दिवशी कोतवाल टोळीला जेवणाचे साहित्य पुरविणार होता.त्याला घेऊन श्री.हॉल सिद्धगडावर आला. श्री.हिराजी पाटील दात घासत उभा होता.त्याच्यावर डी.वाय.एस.पी.हॉलने गोळीबार केला.त्यात हिराजी पाटील हौतात्म्य झाला.दुसरी गोळी भाई कोतवाल यांच्या पायाला लागली.श्री.देसाई यांनी भाई कोतवालाला उचलून नेण्याचा प्रयत्न केला.अण्णांनी देसाईला स्वत:चा जीव वाचविण्यासाठी पळून जाण्यास सांगितले.त्यानुसार देसाई पळून गेले.मात्र अतिशय रक्तस्त्रावामुळे अण्णा बेशुद्ध पडले.पोलिसांनी भाई कोतवाल यांच्यावर ८०-९० गोळ्या झाडल्या.त्यात ते मरण पावले.तो दिवस २ जानेवारी १९४३ हा होता.श्री.हॉल याने अण्णाच्या मृत शरीराचे प्रचंड हाल केले.गोळीबार झाला त्यावेळी येथे १८ जण उपस्थित होते.श्री.शंकर तांबट़श्री.भास्कर तांबट़ श्री.गोमा पाटील़ श्री.धाकू डुकरे़ श्री.काळू दळवी़ श्री.गोपाळ शेट्टीश्री.आप्पा शेंडे यांना जागेवरच अटक केली.श्री.जगन्नाथ क्षीरसागर यास २७/०१/१९४३ रोजी अटक केली.त्यानंतर श्री.देसाईश्री.भगतमास्तऱ श्री.शेलारमामा़ श्री.झिपरा कांतारा़ श्री.नमू वामऩ श्री.राघो देवू श्री.रामलाल़ श्री.दत्तात्रेय हळदे़ श्री.चांदोबा देहरकर यांना १९/१२/१९४३ रोजी अटक केली.[७१] पोलिसांनी कबुली जबाब तयार करून फडके मॅजिस्ट्रेटकडे पाठविला.प्रथम कल्याणनंतर कर्जत लॉकपमध्ये ठेवण्यात आले.ठाणे़ कर्जत न्यायालयात केस चालविण्यात आली.'कोतवाल केस' म्हणून हा खटला चालविण्यात आला होता.

भूमिगत नेत्यांना एकत्र आणण्यासाठी एका सभेचे बाबुराव यांनी आयोजन केले.ही सभा ११ ऑगस्ट १९४३ रोजी भोजनालयात झाली.यावेळी श्री.एस.एम.जोशी़ श्री.अच्युतराव पटवर्धऩ श्री.अण्णासाहेब सहस्त्रबुद्धे श्री.नाना कुंटे़ डॉ.लेहिया़ श्री.दिवाकर इ.१५-२० मंडळी हजर होती.कार्यक्रमासंदर्भात एकमत न झाल्याने निर्णय झाला नाही.[७२] भाई कोतवाल गटाने आपले क्रांतिकारक कार्य पुढे सुरूच ठेवले.लोणावळ्यास पाण्यासाठी सिमेंटचा कालवा बांधलेला होता.कालव्याचा पूल उडवून दिल्यास पॉवर हाउस बंद होऊन मुंबईची वीज खंडित होईल.या संदर्भात श्री.हरिभाऊ भेडसावळे आणि श्री.मारूतीकुमार यांनी डॉ.विवलकर यांच्याशी चर्चा केली.परंतु पुलाचे काम अतिशय मजबूत असल्याने अपयश आले.घोलवड स्टेशनच्या दक्षिणेस व

उत्तरेस टेलिफोनच्या तारा कापण्याचे काम श्री.हरिभाऊ भडसावळे श्री.लाखण श्री.मारूतीकुमार शांतिलाल इत्यादींनी केले.[७३]

श्री.भाई कोतवाल व श्री.हिराजी पाटील यांच्या पुण्यतिथी निमित्ताने त्यांचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी मुंबई-पुणे येथील सर्व वीज बंद करण्याची एक योजना तयार करण्यात आली. यासाठी माणसे व पैसा मोठ्या प्रमाणात हवा होता.खर्चाकरिता श्री.भाऊसाहेब नेवाळकरांनी लागतील तेवढे पैसे देईन असे सांगितले.श्री.भाऊसाहेब राऊत यांनी ३०० रु.तर कोरासाहेवांनी ५०० रु.मदत केली.या कामासाठी २५ माणसे जमा केली. त्यांचे पाच गट करून कामाचे पुढीलप्रमाणे पाच विभाग केले.

<u>१)**खोपोली (पनवेल) लाइन**</u>**:-** श्री.हरिभाऊ भडसावळे, श्री नामदेव, श्री.सातारकर व इतर दोन माणसे होती.

२)**भिरा लाइन (रोह्याजवळ):-**पांडोबा भोळेचांदोरकर व त्यांच्याबरोबर इतर तीन माणसे होती

३)**भिवपुरीलाइन (अंबरनाथजवळ):-**श्री.शांतीलाल दलालरमणिकभाई इतर माणसे होती.

४)**पुणे लाइन (लोणावळ्याजवळ ):-**श्री.दगडू शहा व इतर चार माणसे सोबती होती.

५)**चोला पॉवर हाउस (विक्रोळीजवळ):-**श्री.रामलाल श्रीवास्तवरूपाणी व इतर तीनजण होते

भिरा भिवपुरी खोपोली अशी तीन पॉवर हाउसची एकाच वेळी लाइन्स तोडली तरच मुंबईचा वीजपुरवठा बंद होऊ शकतो.वीज बंद पाडण्याचा कार्यक्रम २६ जानेवारी रोजी ठरविण्यात आला.एकाच वेळी पाच ठिकाणचे खांब पाडले.पनवेल रोहे लोणावळा येथील टॉवर्स कापले. परंतु भिवपुरी व चोला येथील पॉवर कापले नाहीत.त्यामुळे भाई कोतवालांचे स्वप्न पूर्ण होऊ शकले नाही.

## ➢ <u>गनिमी पद्धतीने घातपाती घटना घडविणे (बॉम्बस्फोट):-</u>

आंदोलनाच्या पूर्वनियोजनामध्ये सामुदायिक प्रतिकार अवस्था म्हणजे बॉम्ब व स्फोटक द्रव्ये यांचा वापर करणे.त्यामुळे भूमिगत कार्यक्रमात घातपाती कार्यक्रमास प्राधान्य मिळाले.यावेळी मिल बॉम्ब हॅन्डग्रेनेडस पिस्तुले टी एन.टी.स्टिक्स ॲम्युनिशन फॉस्फरस नायट्रिक व सल्फ्युरिक ॲसिडच्या बाटल्या गावठी बॉम्ब ब्लास्टिंग पावडर याचा वापर करण्यात आला.भाई कोतवालाच्या मृत्यूनंतरही जेलिग्नाईट फ्युज वायर्स इ.घातक शस्त्रे व स्फोटक साधने वापरण्यात आली.सुभाष ब्लास्टिंग जेली जवाहर ग्रेनेड गांधी ब्लास्टिंग स्टिक इ,.नावांनी काही साधने यावेळी प्रचारात

होती. आंदोलनाचे बहुतांश मार्गदर्शन भूमिगत नेत्यामार्फत होऊ लागल्याने ऑक्टोबर १९४२ पासून हिंसक प्रतिकारला व घातपाती कार्यक्रमास प्राधान्य मिळाले. गनिमी तंत्रासाठी गनिमी गट व पथके स्थापन झाली. यामध्ये लष्कर व पोलीस दलातून पळून आलेल्या किंवा मुद्दाम नोकरी सोडलेल्या तरुणांचा आणि रेल्वे व इंजिनियरिंग कारखान्यातील कुशल कारागिरांचा समावेश होता. सशस्त्र गनिमी तंत्राच्या प्रमुख शिल्पकारांमध्ये बिहारचे सुरज नारायण सिंह कर्नाटकचे श्री. चन्नपावाळी आसामचे श्री. शंकर बारूआ गुजरातचे श्री. छोटूभाई पुराणी आणि महाराष्ट्राचे सातारचे श्री. नाना पाटील [७४] इ. क्रांतिकारकांचा प्रामुख्याने उल्लेख होतो. गनिमी युद्ध तंत्राचा वापर गुजरातमध्ये अत्यंत प्रभावीपणे छोटूभाई पुराणी चंद्रशेखर भट्ट, मेघजी इ. क्रांतिकारकांनी अंमलात आणला. तेच तंत्र महाराष्ट्रात पर्यायाने रायगड जिल्ह्यामध्ये राबविण्यात आले.

स्वातंत्र्यलढा यशसिद्धीपयत चालू ठेवण्याचा निर्णय भाई कोतवाल गटांनी घेतला. यासाठी आगलावे बॉम्ब बनविण्याचे तंत्र अवगत केले. हरिभाऊ भडसावळे व गजाननराव नाईक यांनी लिमये इंजिनिअर यांच्याकडून बॉम्बच्या टाइमिंगचे प्रशिक्षण घेतले. यामध्ये आग लावणारे व स्फोट होणारे बॉम्ब होते. आग लावणारे बॉम्ब पोस्टाने पार्सलमधून पाठवत असत. त्यामुळे मुंबई व मुंबईबाहेरील पोस्टाला आग लावण्याचे कार्य करण्यात आले. या कार्यासाठी लागणारी रसायने जोगेश्वरीच्या एक्सेल इंडस्ट्रीच्या श्री. चापराभाई श्रॉफ यांच्याकडून[७५] पुरविली जात असत. दिल्लीत व्हॉईसरॉयने वटहुकूम काढला की ज्यांच्याजवळ बेकायदा स्फोटक द्रव्ये असतील त्यांना फाशी दिली जाईल. त्याच दिवशी हरिभाऊ व रामलाल यांनी वडाळ्याच्या पेट्रोल पाईपखाली टाईम बॉम्ब लावून जोरदार स्फोट घडवून आणला. त्या वटहुकूमाला ते एक आव्हान देण्यात आले. पश्चिम रेल्वेच्या दादर व माटुंगा यांच्यामध्ये जे पॉवर हाउस होते त्याच्या समोरच रेल्वे लाइनखाली डायनामाईटचा चार्ज ठेवून स्फोट घडविला. दुसरा चार्ज गोरेगाव स्टेशनजवळ पुलावर लावला. तो T.N.T.चा पेटविण्यासाठी कॅप्स्टन सिगारेट लावली होती. २० मिनिटांनी स्फोट होऊन रूळ वाकडे-तिकडे झाले. दादर व गोरेगाव येथे जे स्फोट घडविले. त्याचा उद्देश म्हणजे लष्करी साहित्य दारूगोळा ने-आण करणाऱ्या मालगाड्या पाडावयाच्या होत्या. इंजीनचा स्फोट व्हावा यासाठी ॲटिटॅक माईन्सचा सहा सात प्रयोगात उपयोग करण्यात आला.

भाई कोतवालच्या मृत्यूला कारणीभूत झालेल्या नेरळच्या नजे कुटुंबावर सूड उगविण्याचा विचार पुढे आला. त्यावर सैद्धान्तिक मतभेद झाले. शेवटी नाथजीच्या सल्ल्यानुसार घरावर हल्ला

करण्यचे ठरले.प्राथमिक माहिती गोळा करून १४ लोकांच्या टोळीने घरावर हल्ला केला.यावेळी प्रमुख आरोपी गुल्लाशेठ व त्याचा मोठा मुलगा घरात नव्हता. श्री.भोळे व रमणिक यास हातबॉम्ब देऊन समोरच्या खिडकीच्या आड उभे केले होते.कोणी समोरून येण्याचा प्रयत्न केल्यास त्यावर बॉम्ब फेकावयाचे असे सांगितले होते. त्यांच्या मदतीसाठी शांतीलाल रिव्हॉलव्हर घेऊन मागे उभा होता.सर्वत्र रॉकेल शिंपडले आणि घराला आग लावून मागच्या दरवाजाने पळाले.परंतु याच वेळी गोळीबार सुरू झाला. गोळीबार करणारे गृहस्थ म्हणजे शिवनाथ परदेशी व इब्राहीमशेठ मामूशेठ[७६] हे होते. श्री.पांडोबा भोळे यांनी बॉम्ब फेकून जमाव थोपविला होता.पूर्वनियोजनानुसार बापुसाहेब सुगवेकर बंदूक घेऊन निघाले असताना त्यांना बापुराव धारपने रोखले व परत घरी पाठविले.याच वेळी जोरदार पाऊस झाल्याने घराची आग विझली.रामलाल व हरिभाऊ यांच्याकडे सर्व बॉम्ब होते.रामलालच्या खिशातील एक बाटलीवाला बॉम्ब फुटला आणि त्याची मांडी भाजली.तर चालताना एका खड्ड्यात हरिभाऊ पडले.परंतु बॉम्बची पिशवी एका हाताने उंच धरली.त्यामुळे अपघात टळला.शेवटी एका ठिकाणी खड्डा करून सर्व बॉम्ब पुरून ठेवले.सर्वजण वेगवेगळ्या दिशेने गेले.

भाई कोतवाल खटला ठाणे कोर्टात सुरू होता.या खटल्याचे काम सुरू होईल त्या दिवशी बॉम्ब स्फोट घडवायचा अशी योजना तयार केली.कोर्टामध्ये सेशन्स न्यायधीश शिंदे राहात होते.दुधवाला म्हणून इमारतीची पाहणी करून टाईम बॉम्ब ठेवला.ही जबाबदारी श्री.भास्कर मोहोरीकर व श्री.मारुतीकुमार यांच्याकडे सोपविली होती.कोर्ट सुरू झाल्यानंतर थोड्याच वेळात बॉम्बचा स्फोट झाला.त्यामुळे सर्वत्र गोंधळ झाला.कोर्टाचे कामकाज बंद करण्यात आले. श्री.दगडू शेठ शांतिलाल आणि रमणिकभाई यांना डुकले नावाचे गृहस्थ बॉम्ब आणून देत असत.ही मंडळी त्याचा प्रयोग करत असत.रमणिकभाईने कॅपिटॉल सिनेमाजवळ एका लष्करी अधिकाऱ्यावर बॉम्ब टाकला.तो त्यामध्ये जखमी झाला.त्याला दवाखान्यामध्ये पाठविले.त्याच दिवशी महारवाडी पोलीस स्टेशनमध्ये दगडू शेठनी बॉम्ब फेकला.[७७] कोणास इजा झाली नाही परंतु धमाका मोठा झाला.शांतिलालने रेल्वे डिरिलमेंट करिता ब्लॉक्स आणले होते.त्याचाही अयशस्वी प्रयोग करण्यात आला.

रायगड जिल्ह्याचे प्रमुख ठिकाण म्हणजे अलिबाग होय.ते सुद्धा सरकारविरोधी कारवाईचे केंद्र होते.स्फोटक दारू व ॲसिडपासून गावठी बॉम्ब तयार करण्याचे प्रशिक्षण केळकर वाड्यात

राहणाऱ्या भूमिगत कार्यकर्त्याकडून मिळत असे. अलिबागच्या वेधशाळेजवळ राजा केळकर [७८] यांनी गावठी बॉम्बचा एक स्फोट घडवून आणला. त्यामुळे पोलिसांचे चित्त विचलित झाले. अलिबागच्या ट्रेझरीमध्ये दुसरा गावठी बॉम्ब ना. का. भगत व इतर [७९] मंडळींनी ठेवला. अपेक्षेच्या आधीच त्याचा स्फोट झाला. ही सर्व मंडळी कोळीवाड्यातील डबरींच्या दत्त मंदिरात लपून बसली. परंतु पोलीस जमादार रामचंद्र साळवी आणि फौजदार गोळे यांनी अटक केली. त्या वेळी श्री. ना. का. भगत यांच्या आईने फौजदार गोळे यांना उत्तर दिले की "सहापैकी एका पोराला देशासाठी दिलाय़ जा पोरा." अलिबागजवळच सासवणे येथे बॉम्ब तयार करत असत. १९४५ मध्ये मुंबईमध्ये जो बॉम्ब स्फोट झाला. तो सासवण्यात तयार करण्यात आला असून तो ढवण व दातार [८०] यांनी बनविला होता.

## ➢ ब्रिटिश व्यक्ती सरकारी नोकरांच्या व त्यांच्या हालचाली विरोधी धोरण:-

भूमिगत आंदोलनाच्या रणनीतीचा एक भाग म्हणून ब्रिटिश सरकारधार्जिणी व सरकारी हालचालीविरोधी धोरण आखले. या धोरणानूसार

१)लष्करी हालचालीमध्ये अडथळे निर्माण करणे.

२)सरकारी कर्मचाऱ्यांना व सरकार धार्जिण लोकांना शिक्षा करणे.

या पद्धतीने रायगड जिल्ह्यात भूमिगत नेत्यांनी कार्यक्रम तयार केला. लष्करोपयोगी साहित्याचा पुरवठा बंद करणे किंवा लष्कराच्या हालचालीत अडथळे निर्माण करून सरकारी युद्धधोरण रोखणे तसेच लष्करी छावण्याकडे पेट्रोल़ धान्य आदि साहित्य घेऊन जाणाऱ्या लॉर्या़ रेल्वेगाड्या रिकाम्या करणे किंवा नष्ट करणे. युद्ध आघाडीवर दारूगोळा व सैनिकांना घेऊन जाणाऱ्या रेल्वे गाड्या उलथविण्याचे प्रयत्न करणे. लष्करी गणवेश व तंबू तयार करणारे कारखाने व लष्कराला उपयुक्त लाकूड़ गवत़ झोपड्या इ. आगी लावणे. तसेच लष्करातील लोकांना छावणीच्या ठिकाणी कोणत्याही प्रकारचे सहकार्य अथवा जीवनोपयोगी वस्तू मिळू नये. लष्करी किंवा पोलीस लोकांनी त्रास दिल्यास त्यांना धडा शिकविणे हा रणनीतीचा भाग होता. त्यानुसारच थोड्याफार प्रमाणात रायगडमध्ये अमलबजावणी झाली.

शासनाने डहाणू येथे लष्करासाठी गवत खरेदी करून ठेवले होते. त्याच्या मोठ्या गंजी लावल्या असून लष्करी पहारा होता. गवतांच्या गंजीमध्ये आगलावे बॉम्ब भाई कोतवाल गटातील हरिभाऊ भडसावळे यांनी ठेवला. २०-२५ मिनटांनी आग लागली. त्यामध्ये मोठ्या प्रमाणात गवत

जळाले. पहारेकरी असणाऱ्या पोलिसांवर हल्ला करून त्यांना बांधून ठेवले. त्यांच्या जवळच्या पाच बंदुका वीस काडतुसे पोलिसांचे युनिफॉर्म पट्टे चपला इ. सामान गटाने प्राप्त केले.[८१] या घटनेमुळे शासन चिडले. काही लोकांजवळ ज्या खाजगी बंदुका होत्या त्याचा परवाना पोलीस घेऊन जाणार आहेत. कारण हेच लोक कोतवाल गटाला आपल्या बंदुका देत असतील म्हणून कोतवाल गट सशस्त्र पोलिसांवर हल्ला करू शकतो ही माहिती नथोबा भोईर यांनी अण्णांना सांगितली. त्यामुळे भाई कोतवालांनी निर्णय घेतला कीपरवानाधारक खाजगी बंदुका आजच गोळा करूया. त्यानुसार चरेगाव सांबारी येथील दगडू पाटलांच्या घरावर छापा घातला परंतु बंदूक परवाना तेथे मिळाला नाही. हिंदोळपाडा येथील गुलाम अंबिया यांच्या घरावर छापा घातला परंतु त्याची बंदूक त्याचा भाऊ मोसीनकडे असल्याचे सांगितले. त्यानंतर लव्हाळपाडा येथे मोसीनच्या घरावर छापा घातला. त्याच्याकडून बंदूक व काडतुसे प्राप्त केली. कारव येथील बाबुराव देशमुख यांच्याकडे बंदूक असल्याने त्यांच्या घरावर छापा घातला. त्याच्याकडून बंदूक जमा केली.[८२] श्री. अण्णासाहेब सहत्रबुद्धे व नाथाजी यांच्याकडून काही रिव्हॉल्व्हर्स मिळाली होती. राजाध्यक्षांबरोबर हरिभाऊ भडसावळे व नामदेव हे शिरोड्यास गेले. तेथून काही रिव्हॉल्व्हर्स मिळवली. यावेळी कोतवाल गटाकडे एकंदर १४१५ रिव्हॉल्व्हर्स होती. तसेच हॅडग्रेनेड्स ॲटिटॅंक माईन्स गन कॉटन स्लॅब इ. खडकीच्या दारूगोळा कारखान्यातून मिळविला होता. ३०३ ची काडतुसे दामुअण्णा साळवी यांनी आणून दिली होती.

एका पोलीस जमादारास आपल्या शक्तीचा खूपच गर्व होता. त्याने छोटूभाई व इतरांना पकडून देण्याचा विडा उचलला होता. कोतवाल गटाने त्याच्या घरावर छापा घातला. त्याची बायकोमुले शेजारी पाठवली. जमादारास घरात एका खांबास बांधून ठेवले. घराला आग लावली. सर्व घर जळाल्यानंतर तेथे तिरंगा लावला व सवानी 'वंदे मातरम्' हे राष्ट्रगीत म्हटले. त्याच्या कुटुंबाला अनेक दिवस आर्थिक मदत दिली.

जुम्मापट्टी स्टेशनमध्ये डायनामाईटचा मोठा साठा असल्याचे समजल्याने तेथे गेले. प्रथम स्टेशनमधील टेलिफोनच्या तारा कापल्या. स्टेशनच्या मागच्या बाजूस दारूगोळ्याच्या कोठाऱ्या जवळ गेले. तेथून दोन पेट्या बारूद घेऊन निघाले. त्याच्या शेजारी डायनामाईटस साहित्य होते परंतु ते माहीत नसल्याने आणले नाही. ते सर्व साहित्य ओलमण येथे मालू पाटलांच्या सल्ल्यानुसार

हनुमान मंदिराच्या माळ्यावर नेऊन ठेवले. परंतु पाटगावच्या पोशा पाटीलाने पोलिसांना माहिती दिल्याने [८३] ते साहित्य जप्त करण्यात आले.

महाड तालुक्यात नाना पुरोहित यांच्या नेतृत्वाखाली महाड मोर्चाची तयारी सुरू होती. महाड पोलिसांचे दुसरीकडे लक्ष विचलित करण्यासाठी आणि त्यांच्या शक्तीचे विभाजन करण्याच्या हेतूनेच माणगावमध्ये विविध प्रकारच्या हालचाली सुरू करण्यात आल्या. माणगावला मोर्चा येणार व सरकारी अधिकाऱ्यांना पकडून तुरुंगात टाकणार असे जाहीर केले होते. अशा स्वरूपाची पत्रके दर दोन-चार दिवसांनी लावली जात होती. त्यामुळे महाडला पोलीस बंदोबस्त न ठेवता सरकारी शक्ती माणगाव तालुक्यात गुंतली होती. खरवली हे चळवळीचे केंद्र असून तेथील शेतकरी मोर्चा आणणार आहेत. त्यामुळे तेथे पोलिसांनी एक तुकडी [८४] ठेवली. तेथील हालचालीच्या नोंदी होऊ लागल्यामुळे खरवलीतून सर्व कार्यकर्ते दूर जंगलात पाठविले. यामध्ये श्री. शंकरभाई गांधी श्री. रामचंद्र अडीत श्री. दत्ता गांधी श्री. जगन्नाथ तलाठी श्री. शांताराम मुळे दामोदरबाई मेहता हे सर्व जंगलात राहून खेडुतांचा वेष धारण करत होते. जंगलात असताना श्री. लक्ष्मण रंगू अडीत गेनाबाई अडीत लक्ष्मीबाई अडीतश्री. शंकर गजानन खैरे इत्यादींनी जेवणाची सोय केली. जवळपासच्या खेड्यात जाहीर सभा होत असत. त्यामुळे महाडमधील पोलीस संख्या कमी करून माणगाव तालुक्यात वाढवली. पोलिसांच्या शक्तीचा अंदाज घेण्यासाठी खरवल गावात शांताराम मुळे [८५] यांचा जाहीर सत्याग्रहाचा कार्यक्रम घडवून आणला. या धोरणामुळे पोलीस शक्तीचे विभाजन तर झाले परंतु पोलीसही हैराण झाले. कार्यकर्त्याचे दोन गट निर्माण केले. श्री. शंकरभाई गांधी गटाने गोरेगाव पोलीस स्टेशनमध्ये तर श्री. धुंडीराज विनायक वैद्य गटानी माणगाव येथील पोलीसस्टेशनमध्ये हजर होऊन अटक करून घ्यावी असे ठरले. त्याप्रमाणे सवाना अटक केली.

म. गांधीजींनी ब्रिटिश राजवटीविरोधी करा अथवा मरा चा आदेश देऊन चळवळीला सुरुवात केली. ब्रिटिश सरकारने ही चळवळ दडपण्याचा प्रयत्नही केला. त्याबरोबरच भारतीयांच्या स्वातंत्र्याच्या भावना लक्षात घेऊन ब्रिटिश सरकारने स्वातंत्र्य देण्याच्या दिशेने वाटचाल सुरू केली. हिंदू-मुसलमान यांच्यातील मतभेद मिटल्याशिवाय स्वातंत्र्य मिळणार नाही असे व्हॉइसरॉय लॉर्ड वेव्हेलने सांगितले. तेव्हा चक्रवर्ती राजगोपालाचारी यांनी म. गांधीजींच्या संमतीने बॅ. जिनांसमोर एक योजना मांडली. तिला सी. आर. फॉर्म्युला अथवा राजगोपालाचारी योजना

म्हणतात.परंतु जिनाने त्यास नकार दिला.कारण त्यामध्ये हिंदुस्थानच्या फाळणीची योजना मांडलेली नव्हती.याच वेळी भारताच्या स्वातंत्र्याच्या संदर्भात इंग्लंडच्या मित्र राष्ट्रांनी चर्चिलवर दबाव आणला.तसेच इंग्लंडमध्ये आगामी निवडणुकीत मजूर पक्ष सत्तेवर आला तर आपल्या पक्षाची बदनामी होईल.या भीतिपोटी भारतीयांसाठी एक योजना जाहीर केली तिला वेव्हेल योजना म्हणतात.या योजनेनुसार नवीन राज्यघटना तयार करणे.जपान युद्धात सहकार्य करावे अशी अपेक्षा होती.वेव्हेल योजनेवर चर्चा करण्यासाठी सिमला संमेलन आयोजित करण्यात आले. कार्यकारी मंडळाच्या रचनेबाबत मतभेद झाल्याने संमेलन अपयशी ठरले.

इंग्लंडमध्ये ॲटलीच्या नेतृत्वाखाली मजूर पक्षाची सत्ता स्थापना झाली.ॲटलीने घोषणा केली की, भारताला लवकरच स्वातंत्र्य देण्यात येईल.त्याला सप्टेंबरची घोषणा म्हणतात.सर पेथिक लॉरेन्स, सर स्टॅफर्ड क्रिप्स, सर अलेक्झांडर या तीन कॅबिनेट मंत्र्यांचे मिशन नियुक्त केले त्याला कॅबिनेट मिशन/त्रिमंत्री योजना असे म्हणतात.त्यांनी देशातील ४७२ नेत्यांशी चर्चा करून योजना जाहीर केली.ही योजना मुस्लीम लीगने मान्य केली.तर काँग्रेसने फेटाळली.त्रिमंत्री योजनेनुसार घटनासमितीसाठी निवडणूक घेण्यात आली.त्यामध्ये २९२ पैकी २१२ काँग्रेस पक्षाला जागा मिळाल्या.काँग्रेसने हंगामी सरकार स्थापन केले.तर मुस्लीम लीगने पाकिस्तानच्या निर्मि तीसाठी प्रत्यक्ष कृती दिन म्हणून १६ ऑगस्ट पाळण्यात आला.२ सप्टेंबर रोजी काँग्रेसने हंगामी सरकार स्थापन केल्याने लीगने शोकदिन म्हणून तो दिवस पाळला.याच वेळी ॲटलीने जाहीर केले की, जून १९४८ पूर्वी ब्रिटिश सरकार हिंदुस्थानवरील आपली सत्ता सोडेल.भारताचा गर्व्हनर जनरल म्हणून लॉर्ड माऊंटबॅटन यांची नियुक्ती करण्यात आली. त्याने काँग्रेस व मुस्लीम नेत्यांबरोबर चर्चा करू एक योजना तयार केली.या योजनेला इंग्लंडच्या मंत्रिमंडळाकडून मान्यता देण्यात आली.लॉर्ड माऊनबॅटनने ती योजना ३ जून १९४७ रोजी जाहीर केली.लॉर्ड माऊनबॅटन योजनेनुसार हिंदुस्थानचे विभाजन करून १५ ऑगस्ट १९४७ रोजी भारताला स्वातंत्र्य मिळाले. भारताचा तिरंगा ध्वज दिल्लीच्या लाल किल्ल्यावर डौलाने फडकू लागला.गांधीजींनी जे उदात्त स्वप्न डोळ्यासमोर ठेवून स्वातंत्र्याची चळवळ सुरू केलेली होती त्या चळवळीमुळे त्यांचे आणि सर्व भारतीयांचे स्वातंत्र्याचे स्वप्न साकार झाले.

राष्ट्रीय काँग्रेसच्या आदेशानुसार रायगड जिल्ह्यामध्ये १९४२ ची छोडो भारत चळवळ आणि भूमिगत आंदोलन सुरू करण्यात आले.त्यामध्ये श्री.नाना पुरोहित यांच्या नेतृत्वाखाली

महाडचे बंड व भाई कोतवाल यांच्या नेतृत्वाखाली कर्जत–नेरळ परिसरात घातपाती कारवाया करण्यात आल्या. या घटनांना राष्ट्रीय इतिहासामध्ये अतिशय महत्त्वपूर्ण स्थान आहे. या दोन समाजवादी नेत्यांना रायगड जिल्ह्यामधील अठरापगड जातींच्या लोकांनी पाठिंबा दिला. त्यांच्या कारवाया जरी यशस्वी झाल्या नसल्या तरीही सरकारी यंत्रणेला फार मोठा हदरा बसला. इंग्रजांच्या साम्राज्यवादी धोरणाला विरोध करण्याच्या मार्गातून स्वातंत्र्य चळवळीचा जन्म झाला. या चळवळीचा अखेरचा टप्पा म्हणजे छोडो भारत चळवळ होय. या चळवळीचे दोन टप्पे असून एक वहिष्कार स्वरूपाचा तर दुसरा आक्रमक स्वरूपाचा होता. ज्या दिवशी चळवळ सुरू करणार त्याच दिवशी राष्ट्रीय व स्थानिक नेत्यांना अटक केली. उरलेले नेते भूमिगत झाले. यामध्ये प्रामुख्याने समाजवादी नेत्यांचा समावेश होता. त्यामुळे भूमिगत आंदोलनावर समाजवादी विचारांचा प्रभाव होता.

रायगड जिल्ह्यामध्ये अलिबाग, पेण, पनवेल, उरण, महाड या तालुक्यात गांधीवादी स्वरूपात अहिंसात्मक मार्गाने चळवळ सुरू झाली. या चळवळीमध्ये स्थानिक नेते, सामान्य जनता, स्त्रिया, शाळकरी मुले, आदिवासी, कातकरी यांचा प्रामुख्याने समावेश होता. गांधीजींनी सांगितलेल्या सत्याग्रह, बहिष्कार, सभा, मोर्चा, संप, पिकेटिंग, कायदेभंग, प्रभातफेरी इ. तत्त्वांनी चळवळ सुरू झाली. या चळवळीच्या वेळी पोलिसांनी मोठ्या प्रमाणात अन्याय- अत्याचार केला. तसेच अनेकांना अटक करून अलिबागच्या हिरकोट तुरुंगात व ठाणे तुरुंगात पाठविले. स्वातंत्र्य सैनिकांनी तुरुंग म्हणजे अलिशान राजवाडा समजून अनेक दुख,वेदना, हालअपेष्टा व त्रास सहन करून आनंदाने राहत होते. ग्रामीण भागातील डोंगरदऱ्यांमध्ये एखादी छोटी झोपडीसुद्धा चळवळीचे केंद्र बनून त्यातील माणूस देशासाठी त्याग व मरण पत्करण्यास तयार झालेला होता. हेच म. गांधीजींना साध्य करावयाचे होते. ते त्यांचे स्वप्न पूर्ण झाले. यावरून चळवळीची व्याप्ती लक्षात येते.

चळवळीच्या पहिल्या टप्प्यामध्ये गांधीजींच्या तत्त्वानुसार आंदोलन सुरू होते. परंतु दुसऱ्या टप्प्यामध्ये समाजवादी विचारांचा प्रभाव दिसून येतो. 'करा अथवा मरा' या गांधीजींच्या आदेशाचा हा परिणाम या टप्प्यावर झाला. त्यामुळे दुसऱ्या कालखंडात चळवळ अतिशय आक्रमक बनली. त्यांनी घातपाती कारवाया सुरू केल्या. याचे प्रमुख केंद्र महाड आणि परिसर व कर्जत-नेरळ परिसर होय. ब्रिटिश सत्तेची शक्तीकेंद्रे म्हणजे पोलीसस्टेशन, पोस्टऑफिस, तारा ऑफिस, रेल्वेस्थानक, बसस्थानक, तहसील व इतर सरकारी कार्यालय यांच्यावर हल्ला करणे, आग लावणे, हस्तगत करून

समांतर सरकार किंवा व्यवस्था स्थापन करणे. सरकारी दळणवळण व्यवस्था उद्ध्वस्त केली तर सरकारी हालचाली मंदावतील आणि चळवळ यशस्वी होईल. या दृष्टीने टेलिफोन व लाइटचे खांब आणि तारा तोडणे रस्ते, पूल रेल्वेरुळ उद्ध्वस्त करणे किंवा दगड़े झाडे तोडून रस्त्यावर टाकणे इ. माध्यमातून अडथळे निर्माण करणे. शस्त्रास्त्रे मिळविणे शक्य ते बॉम्बस्फोट घडविणे, सरकारी नोकर,इंग्रज व्यक्तीसरकारधार्जिण मंडळींना कोणत्याही प्रकारची मदत होणार नाही. यासाठी त्यांच्याशी असहकार धोरण स्वीकारणे. या कार्यक्रमाची जबाबदारी श्री. नाना पुरोहित व श्री. भाई कोतवाल यांच्या गटांनी स्वीकारली. त्यांना समाजातील सर्व लोकांनी अतिशय प्रेमाने मदत केली. परंतु स्वार्थी अण्णा बोकड यांनी भाई कोतवालांची माहिती सरकारला दिली. त्यामुळे भाई कोतवाल व हिराजी पाटील यांना हौतात्म्य पत्करावे लागले. १९४२ ते १९४५ पयत भारतात छोडो भारत व भूमिगत आंदोलन सुरू होते. त्यानंतर राष्ट्रीय काँग्रेसच्या नेतृत्वाखाली ब्रिटिश सरकारबरोबर वाटाघाटी सुरू होत्या. सरकारनेही विविध योजना जाहीर केल्या. परंतु त्याचा फारसा परिणाम झाला नाही. इंग्लंडमध्ये ॲटलीच्या नेतृत्वाखाली मजूर पक्षाचे सरकार स्थापन झाले. त्यांनी हिंदुस्थानची फाळणी व स्वातंत्र्याचा कायदा मंजूर केला. त्यानुसार १५ ऑगस्ट १९४७ रोजी भारताला स्वातंत्र्य मिळाले. भारतीय स्वातंत्र्याचे भारतीय जनतेने गुढ्यापताका लावून भव्य स्वागत केले. सर्वत्र आनंदाचे वातावरण होते. ज्यांनी हा सोनियाचा दिवस पाहिला ते खरोखर भाग्यशाली होते. ज्यांनी आतापयत आपल्या सुखी संसारावर पेटते निखारे ठेवून भारतमातेची सेवा केली त्यांच्या त्यागाचे दु:खाचे आणि इच्छा-अपेक्षांची पूर्तता झाली.

## <u>संदर्भ साधने</u>


१)केळकर श्रीपाद: छोडो भारत १९४२: कॉन्टिनेन्टल प्रकाशन पुणे. २००३ पृ ५९

२)प्रधान ग. प्र: स्वातंत्र्य संग्रामाचे महाभारत: साधना प्रकाशनपुणे. १९८९ पृ. ३०८

३)केळकर श्रीपाद: उपरोक्त : पृ. ६२

४) केळकर श्रीपाद: उपरोक्त . पृ. ६९

५)डॉ. चौधरी के. के.: जळगाव जिल्ह्यातील स्वातंत्र्यलढा : ऑगस्ट क्रांती सुवर्ण महोत्सव समिती महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटी मुंबई. १९९७ पृ. ११०

६)केळकर श्रीपाद : उपरोक्त : पृ ७७

७)फडके य.दि.: विसाव्या शतकातील महाराष्ट्र खंड-५: श्रीविद्या प्रकाशन् पुणे. पृ.१८९

८)स्वातंत्र्य सैनिक गोपीनाथ काशिनाथ पाटील पेण यांची मुलाखत : दिनांक १६/११/१९८२

९)स्वातंत्र्य सेनानी गांधी शंभरभाई: महाड तालुक्यातील स्वातंत्र्यलढ्यातील ऐतिहासिक कार्याचा त्रोटक वृत्तान्त : हस्तलिखित प्रत. पृ.६

१०)प्रधान ग.प्र.: उपरोक्त : पृ.३१८

११)डॉ.चौधरी के.के.: उपरोक्त : पृ.११४

१२)स्वातंत्र्य सेनानी गांधी शंकरभाई : उपरोक्त : पृ. ६

१३)फडके य.दि.: उपरोक्त : पृ.२०५

१४)लोकसत्ता मुंबई आवृत्ती : दिनांक १४/ ०८/२००७

१५)सार्दक शंकर धोंडो: आचार्य भाई ढवण: आचार्यभाई ढवण स्मृती प्रकाशन समिती अंधेरी मुंबई. १९७८ पृ.

१६)स्वातंत्र्य सैनिक भगत ना.का.: महाड यांची मुलाखत : दिनांक १०/ ०१/ २००६

१७)होम डिपार्टमेंट स्पेशल ब्रँच फाईल क्रमांक १११०(६)-ए-(२०) १९४२
पोलिस अधिक्षकाचे जिल्हा दंडाधिकाऱ्यास पत्र : दिनांक २४/ ०८/१९४२

१८)स्वातंत्र्य सैनिक गोडबोले द.श.: अलिबाग तालुक्यातील राजकीय आंदोलनातील वाटचाल: अप्रकाशित हस्तलिखित प्रत. पृ. ५

१९)लोकसत्ता मुंबई आवृत्ती : : दिनांक १४ / ०८/२००७

२०)स्वातंत्र्य सेनानी लिमये गणेश रघुनाथ : पेण तालुक्यातील सत्याग्रहाचा इतिहास: अप्रकाशित हस्तलिखित प्रत.

२१)स्वातंत्र्य सैनिक रामचंद्र दत्तात्रेय दोंदे यांची मुलाखत : दिनांक १६/ ११ / २००५

२२)स्वातंत्र्य सैनिक हिरालाल हेमचंद गुजर यांची मुलाखत : दिनांक १६/ ११/२००५

२३)स्वातंत्र्य सैनिक गोपिनाथ काशिनाथ पाटील यांची मुलाखत : दिनांक १६/ ११/२००५

२४)कुंटे नाना : वाटचाल : ९४ मित्रमंडळ पुणे.१९८२ पृ. ६०

२५)कित्ता : पृ.६१

२६)होम डिपार्टमेंट स्पेशल ब्रँच फाईल क्रमांक १११० ( ६ )-ए-( २०) १९४२ :पोलिस अधिक्षकाचे पोलिस महानिरिक्षकास पत्र १९/ ०८/१९४२

२७)सन्मित्र मासिक : दिनांक १५ ऑगस्ट १९८०.पृ. ५

२८)रहाळकर दत्ता : चिरनेर सत्याग्रह आणि उरणचा स्वातंत्र्य संग्राम : झुंज प्रकाशन् उरण १९९३. पृ. ५५

२९)सन्मित्र मासिक ठाणे : : दिनांक १५ ऑगस्ट १९८१.पृ. ११

३०)स्वातंत्र्य सेनानी काणेकर श्रीकांत पांडुरंग यांचे पत्र : दिनांक ११/ ०७/१९८२.पृ. २

३१)रहाळकर दत्ता : उपरोक्त : पृ. ५७

३२)धारिया मोहन: सफर माझा राजकीय प्रवास:विश्वकर्मा साहित्यालय् पुणे ३०.१९७८,पृ.१३

३३)स्वातंत्र्य सेनानी गांधी शंकरभाई: महाड तालुक्यातील स्वातंत्र्यलढयातील ऐतिहासिक कार्याचा त्रोटक वृत्तान्त : अप्रकाशित हस्तलिखित प्रत.पृ. १४

३४)स्वातंत्र्य सैनिक मेहता मनोहर काशीनाथ यांची मुलाखत : दिनांक २४/०३/२००७

३५)भुस्कुटे प्रभाकर रघुनाथ : महाड गॅझेट : चिरंजीव प्रकाशन् महाड. २००२, पृ ४५

३६)लंकेश्वरी रघुनाथ गंगाराम महाड यांची मुलाखत : दिनांक ०८/०४/२००७

३७)केळकर श्रीपाद : उपरोक्त : पृ. १२४

३८)सदावर्ते प्रार्थना : उपरोक्त : पृ. ३५

३९)कित्ता : पृ. ११७

४०)रहाळकर दत्ता: उपरोक्त : पृ. ५६

४१)सन्मित्र मासिक ठाणे : : दिनांक १५ ऑगस्ट १९८१. पृ. ११

४२)श्रीवास्तव रामलाल: हुतात्मा कोतवाल स्वातंत्र्य समरातील एक पर्व: कोतवालवाडी प्रकाशन् नेरळ. १९९७, पृ. २२

४३)भुस्कूटे प्रभाकर रघुनाथ: थोर स्वातंत्र्य सेनानी चुनीलालभाई स्वातंत्र्यसैनिक: कै.चु.टि.जोशी एज्युकेशनल ॲण्ड चॅरिटेबल ट्रस्ट प्रकाशन् माणगाव.पृ.२५

४४)स्वातंत्र्य सेनानी गांधी शंकरभाई: पोलादपूर तालुक्यातील स्वातंत्र्यलढयातील कामगिरी: अप्रकाशित हस्तलिखित प्रत.पृ.३

४५)होम डिपार्टमेंट स्पेशल ब्रँच फाईल क्रमांक १११०(६)-ए-(२०) १९४२. ११सप्टेंबरचा अहवाल

४६)स्वातंत्र्य सेनानी गांधी शंकरभाई :महाड तालुक्यातील स्वातंत्र्यलढ्यातील ऐतिहासिक कार्याचा त्रोटक वृत्तान्त: अप्रकाशित हस्तलिखित प्रत. पृ.९

४७)संपादक बाळ श्रीकृष्ण दत्तात्रय: महाड किसान मोर्चा स्मृतिदिन विशेषांक: सप्टेंबर २००५

४८)स्वातंत्र्य सेनानी गांधी शंकरभाई: उपरोक्त : पृ. ०९

४९) प्रा.बिवलकर राम : नाना पुरोहित एका क्रांतिवीराची जीवन कथा : महाड-पोलादपूर तालुका समाजवादी मित्र मंडळ प्रकाशन मुंबई .१९७४. पृ. ११

५०)भुस्कुटे प्रभाकर रघुनाथ : महाड गॅझेट : चिरंजीव प्रकाशन महाड.२००२ पृ.१०६

५१)होम डिपार्टमेंट स्पेशल ब्रँच फाईल क्रमांक १११०(६)-ए-(२०) १९४२ जिल्हा दंडाधिकाऱ्याचे गृहसचिवास पत्र : दिनांक ११/०९/१९४२

५२)धारिया मोहन : उपरोक्त : पृ. १५

५३)भुस्कुटे प्रभाकर रघुनाथ : महाड गॅझेट : उपरोक्त पृ. १०७

५४)स्वातंत्र्य सैनिक लंकेश्वरी रघुनाथ गंगाराम उर्फ भाई लंकेश्वरी नाते महाड यांची मुलाखत : दिनांक ११/ ०७/१९८२

५५) होम डिपार्टमेंट स्पेशल ब्रँच फाईल क्रमांक १११०(६)-ए-(२०) १९४२ पोलिस अधिक्षकाचे पोलिस महानिरीक्षकास पत्र : दिनांक २५/ ०९/१९४२

५६) होम डिपार्टमेंट स्पेशल ब्रँच फाईल क्रमांक १११०(८)-बी-(१६) १९४२

५७)फडके य.दि.:विसाव्या शतकातील महाराष्ट्र-खंड ५ :श्रीविद्या प्रकाशन,पुणे.१९९७,पृ.८७

५८)रामदास नामदेव पाटील राजणखार अलिबाग यांचे पत्र : २५. ०५.१९८२ चे

५९)अ.मो.साष्टे अलिबाग यांचे पत्र : दिनांक २७/०७/१९८२ चे

६०)होम डिपार्टमेंट स्पेशल ब्रँच फाइल क्रमांख १११०(६)–ए २०-१९४२.

६१) होम डिपार्टमेंट स्पेशल ब्रँच फाईल क्रमांक १११०(६)-ए-(२०) १९४२ पोलिस अधिक्षकाचे जिल्हा दंडाधिकाऱ्यास पत्र : दिनांक ९/०९/१९४२

६२) पोलिस अधिक्षकाचे जिल्हा दंडाधिकाऱ्यास पत्र : दिनांक २४/०९/१९४२

६३)गांधी शंकरभाई:माणगाव तालुक्यातील चळवळीचे ऐतिहासिक वृत्त:अप्रकाशित हस्तलिखित पृ.१२

६४)स्वातंत्र्य सैनिक शहा अमृतभाई माणिकचंद शेठ गोरेगाव यांची मुलाखत:दिनांक ३०/०३/२६ २००६

६५) स्वातंत्र्य सैनिक मेकडे नारायणराव तळे यांची मुलाखत : दिनांक १२/१०/२००६

६६)श्रीवास्तव रामलाल: उपरोक्त : पृ.२२

६७)कुंटे नाना : वाटचाल : महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ मुंबई .१९८२, पृ. ६२

६८)चव्हाण शशिकांत : भारतीय स्वातंत्र्य संग्रामातील झुंझार क्रांतिवर हुतात्मा भाई कोतवाल: वीर कोतवाल युवक मंडऴ दादर मुंबई. १९८९ ,पृ. ५८

६९)श्रीवास्तव रामलाल : उपरोक्त : पृ. २५

७०)कित्ता : पृ.४७

७१)चव्हाण शशिकांत: उपरोक्त : पृ. १४४

७२)कुंटे नाना : उपरोक्त : पृ. ६५

७३)भडसावळे हरिभाऊ : कमाजली : भडसावळे प्रकाशऩ नेरळ. १९९२ , पृ. ७८

७४)केळकर श्रीपाद : छोडो भारत १९४२ : कॉन्टिनेन्टल प्रकाशऩ पुणे.१९८३, पृ, .१२८

७५)श्रीवास्तव रामलाल: उपरोक्त : पृ. १०८

७६)भाडसावळे हरिभाऊ: उपरोक्त : पृ. ७५ ते ७६

७७)श्रीवास्तव रामलाल: उपरोक्त : पृ. १३१

७८)लोकसत्ता मुंबई : ९ ऑगस्ट २००७

७९) स्वातंत्र्य सैनिक भगत ना.का.: अलिबाग यांची मुलाखत : दिनांक १०/०१ / २००६

८०)म्हस्कर मोरेश्वर सासवणे यांची मुलाखत दिनांक १४/०७/२००६

८१)श्रीवास्तव रामलाल: उपरोक्त : पृ. ५१

८२)चव्हाण शशिकांत : उपरोक्त : पृ. ५९

८३)भडसावळे हरिभाऊ : उपरोक्त : पृ. ३५

८४)स्वातंत्र्य सेनानी गांधी शंकरभाई : माणगाव तालुक्यातील चळवळीचे ऐतिहासिक वृत्त : अप्रकाशित हस्तलिखित प्रत. पृ. ११

८५) स्वातंत्र्य सैनिक मेकडे नारायणराव तळा यांची मुलाखत : दिनांक १२/ ११/२००५

# प्रकरण – ६ मूल्यमापन

भारताच्या इतिहासातील एक सोनेरी पान म्हणजे 'भारतीय स्वातंत्र्य चळवळीचा इतिहास' होय. प्रदीर्घकाळ ब्रिटिशांनी भारतीयांवर जुलमी व अन्यायकारक राजवट केली. या राजवटीविरुद्ध

येथील राष्ट्रभक्तांनी लढा देऊन भारत देशाला स्वतंत्र करण्याचे कार्य केले. भारतासारखा खंडप्राय व शेतीप्रधान असलेल्या देशामध्ये जनतेनेच स्वातंत्र्य चळवळीची मुहूर्तमेढ रोवली. राष्ट्रीय काँग्रेसच्या नेतृत्वाखाली एखाद्या वृक्षाप्रमाणे विस्तारत जावी तशी स्वातंत्र्य चळवळ वाढत गेली. राष्ट्रीय काँग्रेसने म.गांधीजींच्या मार्गदर्शनाखाली लढा देण्याचा निर्णय घेतला. स्वातंत्र्यलढÝात मूठभर लोकांपेक्षा सर्वसामान्य जनता मोठÝा प्रमाणात सहभागी झाली पाहिजे अशी भूमिका म.गांधीजींनी घेतली. तसेच 'खेडÝांकडे चला' असा आदेश कार्यकर्त्यांना दिला.

आपल्या देशावर कोणाचे राज्य आहे? तसेच स्वातंत्र्यराजकीय हक्क काय आहेत? याची जाणीव येथील समाजाला नव्हती. सामाजिक व धार्मिक बंधनामध्ये गुंतून पडलेल्या व स्वातंत्र्याची कल्पना नसलेल्या समाजाला जागृत करण्याचे कार्य अनेकांनी केले. लोकमान्य टिळक नामदार गोपाळ कृष्ण गोखलेस्वातंत्र्यवीर वि.दा.सावरकर यांच्या विचारांचा प्रभाव महाराष्ट्राच्या राजकारणावर होता. त्यांच्या विचारांचे चहाते संपूर्ण राज्यात विखूरलेले होते. लो.टिळकांनी लोकांचामध्ये राष्ट्रवाद स्वराज्य हे विचार रुजविण्याचे प्रयत्न केले. लो.टिळकांचा भारतीय स्वातंत्र्य चळवळीवर १९२० पर्यंत प्रभाव होता. त्यांच्या मृत्यूनंतर भारतीय स्वातंत्र्य चळवळीचे नेतृत्व म.गांधीजींकडे आले. म.गांधीजींनी त्यापूर्वी नामदार गोखल्यांच्या सल्ल्यानुसार भारतीय राजकारण व समाजकारणांचा अभ्यास करण्यासाठी सर्व भारतभर दौरा केला होता. त्यामुळे त्यांना येथील राजकीय चळवळीची पूर्ण माहिती झालेली होती. तसेच म.गांधीजींना दक्षिण आफ्रिकेतील लढÝात चांगल्या प्रकारचे यश आलेले होते. या अनेक कारणांनी भारतीय समाज त्यांच्याकडे नेता म्हणून मोठÝा आशेने पाहू लागला होता. त्यामुळे लो.टिळकांच्या मृत्यूनंतर भारतीय स्वातंत्र्य चळवळीचे नेतृत्व आपोआप मा.गांधीजींकडे आले. म.गांधीजींनी या देशातील राजकीय प्रश्नाप्रमाने सामाजिक प्रश्न हाती घेतले व स्वातंत्र्य चळवळ ही शहरापुरती मर्यादित न ठेवता तिला व्यापक स्वरूप देण्याचा प्रयत्न केला. काँग्रेस पक्ष व स्वातंत्र्य चळवळ खेडÝातील सामान्य माणसांपर्यंत पोहोचली पाहिजे असा संदेश काँग्रेस कार्यकर्त्यांना दिला. त्याप्रमाणे चळवळीचा विस्तार खेडÝापर्यंत झाला. त्यामुळे मागासलेल्या व डोंगराळ भागात राहणाऱ्या आदिवासी माणसापर्यंत चळवळीचा प्रसार झाला. 'चले जाव' असे इंग्रजांना ठणकावून सांगणारे हजारो स्वातंत्र्यप्रेमी वीर तयार झाले. या वीरांनी स्वत:च्या सुखी संसारावर पेटते निखारे ठेवून भारतमातेच्या स्वातंत्र्याचा जप करत करत हौतात्म्ये आनंदाने पत्करले. हे या स्वातंत्र्य चळवळीचे वैशिष्ट्य दिसून येते.

राष्ट्रीय काँग्रेसच्या व म.गांधीजींच्या ध्येयधोरणानुसार ज्या स्वातंत्र्य चळवळीच्या घटना घडल्या त्यामध्ये रायगड (कुलाबा) जिल्हाही मोठŸा प्रमाणात सहभागी झालेला होता.

भारतीय स्वातंत्र्यलढŸाचे स्थानिक पातळीपासून ते राष्ट्रीय पातळीपयत अनेकांनी संशोधनाचे कार्य केलेले आहे.स्थानिक पातळीवर स्वातंत्र्य चळवळीचे संशोधन करण्याच्या हेतूने मी 'रायगड (कुलाबा) जिल्ह्यातील स्वातंत्र्य चळवळीचा इतिहास'–१९०१ ते १९४७ या विषयाची निवड केलेली आहे.रायगड जिल्ह्याच्या स्वातंत्र्य चळवळीतील घटनांचा तपशीलवार शोध घेण्याबरोबरच येथील लोकांचा वाढता सहभाग तपासणे.या जनतेने दिलेले योगदान अतिशय महत्त्वपूर्ण होते.त्याचा इतिहास स्वतंत्रपणे लिहिणे गरजेचे होते.आजवर अन्य इतिहास संशोधकांनी या विषयावर संशोधन केलेले नसल्याने या जिल्ह्यातील रोमहर्षक इतिहास उजेडात यावा व ग्रंथरूपाने जतन व्हावा हा या संशोधनाचा उद्देश आहे.म्हणून रायगड (कुलाबा) जिल्ह्याच्या स्वातंत्र्य चळवळीचा समग्र इतिहास संशोधन कार्यातून मांडण्याचा प्रयत्न केलेला आहे.

एकेकाळी रायगड जिल्ह्याच्या भूप्रदेशात मराठŸांची राजधानी होती.मराठी सत्तेचा उदय व विस्तारामध्ये रायगड जिल्ह्याने महत्त्वाची भूमिका बजाविली होती.या प्रदेशावर मराठे व सिद्धीची राजकीय सत्ता होती.नानासाहेब पेशव्यांनी १७५६ मध्ये इंग्रजाबरोबर तह करून दासगाव व कोमल ही दोन खेडी व बाणकोटचा किल्ला इंग्रजांना दिला.या तहामुळे रायगड जिल्ह्यामध्ये इंग्रजांचा चंचूप्रवेश झाला.परिणामी मराठे सिद्दी आणि इंग्रज यांच्यात सत्ता संघर्ष सुरू झाला.इंग्रजांनी हळूहळू मराठी सत्ता नष्ट केली.इंग्रजांनी संपूर्ण देशावर राज्य स्थापन केले.या जिल्ह्यात मराठी सत्तेच्या उदयाबरोबर स्वातंत्र्याची भावना विकसित झालेली होती.ती मराठी सत्तेच्या ऱ्हासाबरोबर नष्ट झालेली दिसून येते.याचा परिणाम रायगड जिल्ह्यावर झालेला होता.स्वातंत्र्य चळवळीचे केंद्रबिंदू असलेल्या पुणे–मुंबई शहराजवळ रायगड जिल्ह्याचा भूप्रदेश असूनही प्रारंभीच्या काळात स्वातंत्रय चळवळीची तीव्रता पुणे–मुंबईतील स्वातंत्र्य चळवळीसारखी दिसून येत नाही.परंतु लो.टिळकांनी सुरू केलेल्या गणेश उत्सव शिवजयंती यासारख्या उत्सवातून राजकीय विचार मांडले गेल्यामुळे या जिल्ह्यात राजकीय जागृतीस सुरुवात झाली.

२० व्या शतकाच्या पहिल्या दोन दशकात रायगड जिल्ह्यात स्वातंत्र्य चळवळीच्या विकासाला प्रारंभ झाला.म.गांधीजींच्या काळात इतर भूप्रदेशाप्रमाणेच रायगड जिल्ह्यातही खऱ्या अर्थाने स्वातंत्र्य चळवळीची वाटचाल सुरू झाली.१९२० ते १९४७ या काळात रायगड जिल्ह्यात

अनेक मान्यवर नेत्यांबरोबरच आदिवासी आडाणी लोकांनी स्वातंत्र्य चळवळीच्या संघर्षात स्वत:ला झोकून दिले.इतर प्रदेशाप्रमाणेच रायगड जिल्ह्यातही असहकार चळवळ सविनय कायदेभंग चळवळ वैयक्तिक सत्याग्रह चळवळ चले जाव आंदोलन तसेच सामाजिक व शेतकरी आंदोलनात लोकांनी सक्रिय सहभाग घेतला होता.रायगड जिल्ह्यातील जनतेचे योगदान अतिशय महत्त्वाचे होते.या पार्श्वभूमीवर रायगड जिल्ह्याची सवागीण ओळख करून घेणे गरजेचे आहे.

महाराष्ट्र राज्यातील कोकण प्रशासकीय विभागातील रायगड (कुलाबा)एक जिल्हा आहे.जिल्ह्याला निसर्गाचे वरदान लाभलेली भौगोलिक पार्श्वभूमी आहे.रायगड जिल्ह्याच्या भौगोलिक परिस्थितीमध्ये घनदाट जंगल डोंगर घाट खिंडी आणि दऱ्याखोऱ्यांचा भूप्रदेश असून बेटे खाडŸा नद्या आणि समुद्रकिनारपट्टी लाभलेली आहे.या भौगोलिक घटकांच्या आधारे मराठे सिद्दी इंग्रज यांच्या राजकीय सत्ता स्थिरावल्या होते.या प्रत्येक सत्तेने आपले श्रेष्ठत्व सिद्ध करण्याचा प्रयत्न केला.त्यामुळे सतत प्रादेशिक सिमांमध्ये बदल घडून येत होते.सागरी वर्चस्वामुळे अखेर इंग्रज श्रेष्ठ ठरून संपूर्ण भारतावर राजकीय सत्ता स्थापन केली.केवळ रायगड जिल्ह्याचा भूप्रदेश व सागरी किनारा ताब्यात असल्याने इंग्रजांना हे शक्य झाल्याचे स्पष्ट होते.परंतु याच भौगोलिक परिस्थितीमुळे रायगड जिल्ह्यातील सर्वसामान्य माणसाचा विकास झालेला नाही.डोगर, दऱ्याखोऱ्या व नद्यांमुळे दळणवळणाची सोय झाली नाही.वाहतुकीच्या साधनांच्या अभावी औद्योगिक प्रगती झाली नाही.पाणी साठविण्यासाठी पाटबंधारे नाहीत.त्यामुळे पावळŸात प्रचंड पाऊस असूनही उन्हाळŸात पिण्यासाठी पाणी नाही व वीज उत्पादन केंद्रेही नाहीत.त्यामुळे रायगड जिल्ह्यातील परिस्थिती मागासलेलीच दिसून येते.

रायगड जिल्ह्यामध्ये प्रामुख्याने ब्राह्मणआगरी कोळी आदिवासी आणि मुसलमान या जाती–जमाती व त्यांच्या पोटजाती आढळतात.प्रत्येकजण आपल्या रीतिरिवाजानुसार जीवन जगत होते.लोकांचे राहणीमान साधे असून प्रत्येक जण आपल्या परंपरेनुसार धार्मिक उत्सव व विधीच्या वेळी विशिष्ट पोशाख धारण करत असे.समाजामध्ये रूढी परंपराअंधश्रद्धा व्यसनाधीनता रुजलेली होती.आदिवासी अतिशय मागासलेला असून स्त्री-पुरुषांमध्ये व्यसनाचे प्रमाण मोठŸा प्रमाणात होते.प्रत्येक जण आपल्या कुळाप्रमाणे कुळदेवतांचा उत्सव साजरा करत असे.गणपती उत्सव आणि दसरा व होळी हे सण मोठŸा जल्लोषात भक्तिभावाने साजरे करत असत.धवलारिणी या स्त्री पुरोहिताच्या देखरेखीखाली ४० पैकी ३८ लग्न विधी पार पाडले जातात.बहुतेक कार्य

क्रमामध्ये पुरूषांपेक्षा स्त्रियांचा सहभाग मोठ्या प्रमाणात असतो. मांसाहार हा जेवणातील अविभाज्य घटक आहे. जेवणामध्ये मासे नसतील आणि भाकरी चपाती भाजी असेल तर त्या कुटूंबाला दरिद्री कुटूंब समजत असल्याचे दिसते.

जुने तेच सोने हे आदर्शवादी तत्त्व मानून पारंपरिक जीवनमूल्य समाजात रुजल्याने सुधारणावादी नवविचारांचे स्वागत बहुसंख्य जनतेने केलेले नव्हते. परिणामी सामाजिक-धार्मिक जीवनातील सर्वच बाबीत बहुसंख्य समाज मागासलेला होता. सार्वजनिक उत्सव सण ऊरूस यासारख्या कार्यक्रमांमध्ये सर्वधर्मीय व जातीचे लोक एकत्र सहभागी होत होते. रायगड जिल्ह्यामध्ये जातीय-धार्मिक संघर्ष सतत झालेले दिसत नाहीत. प्रत्येक समाज आपल्या सामाजिक-धार्मिक परंपरेने आनंदाने व एकोप्याने नांदत होता.

रायगड जिल्ह्याची अर्थव्यवस्था प्रामुख्याने शेती जंगल आणि सागरी उत्पादनावर आधारित होती. शेतीही पूर्णपणे पावसावर अवलंबून असून पारंपरिक पद्धतीने शेती केली जात असे. कोणत्याही राजकीय सत्तेने शेती सुधारणेकडे फारसे लक्ष दिलेले नाही. बी-बियाणे पाणी पुरवठ्यासाठी विहिरी तलाव यांचे बांधकाम केले नाही. दळणवळणांचा अभाव असल्याने जवळ असलेल्या मोठ्या शहरांनाही शेती उत्पादनाचा पुरवठा होत नव्हता. परिणामी शेती व शेती उत्पादनात सुधारणा झाल्या नाहीत. जंगल उत्पादनातून शेती व घरासाठी लागणारा पालापाचोळा लाकूड-फाटा गवत गोळा करत असत. त्याचप्रमाणे औषधी वनस्पतीमध गोळा करण्याचा व्यवसाय प्रामुख्याने आदिवासी लोक करत असत. सागरी उत्पादनातून मीठ मासे मिळत असत. प्रामुख्याने आगरी लोक मिठाचा तर कोळी व मुसलमान लोक मासेमारीचा व्यवसाय करत असत. रायगड जिल्ह्यामध्ये हस्तकला व कुटीर उद्योग विकसित झालेला होता. रेवदंडा व चौलची पितांबरीचा माणगाव अलिबाग रोह्याचा घोंगडी महाडचा तांब्याची भांडी तर पनवेलचा बैलगाडीची चाक बांधणी व्यवसाय प्रसिद्ध होता. शेती व कुटीर उद्योगावरच रायगड जिल्ह्याची अर्थव्यवस्था अवलंबून होती.

रायगड जिल्ह्याची औद्योगिक प्रगती फारशी झालेली नव्हती. तरीपण मोरा-उरणच्या ग्राईडवेल ॲब्रेसिव्हज कारखान्याने १९४० मध्ये अभियांत्रिकी उद्योगाला प्रारंभ झाला. पनवेलमध्ये धुतपापेश्वर हा आयुर्वेदिक कारखाना १८७२ मध्ये विष्णू पुराणिकने सुरू केला. खोपोली येथे कागद उद्योगाला प्रारंभ १९४९ मध्ये झाला. त्याबरोबर तेल पोहे मिरची मसाला बेकरी विडी पेय

मध इत्यादी उद्योगधंदा रायगड जिल्ह्यात सुरू होते. रायगड जिल्ह्यात औद्योगिक विकास मोठÝा प्रमाणात झाला नाही. कारण भौगोलिक परिस्थितीमुळे दळणवळण़ वीज़ पाणी़ रस्ते याकडे राज्यकर्त्यानी दुर्लक्ष केले. शिवाय औद्योगिकीकरणाच्या संदर्भात सरकारची व जनतेचीही भूमिका उदासिन होती. आर्थिक दारिद्रÝ असल्याने जिल्ह्यातून मोठे व्यावसायिक व उद्योगपती निर्माण झाले नाहीत. केवळ सागरी वर्चस्वासाठी प्रयत्न करण्यात आल्याने जिल्ह्यात औद्योगिक प्रगती होऊ शकली नाही. त्यामुळे रायगड जिल्हा सामाजिक-आर्थिकदृष्टÝा मागासलेला होता.

रायगड जिल्ह्यातील सामाजिक व आर्थिक परिस्थितीपेक्षा सांस्कृतिक परिस्थिती प्रगत होती. जिल्ह्याला सांस्कृतिक जीवनाची मोठी परंपरा असूनही ती ठरावीक वर्गापुरती मर्यादित होती. महाराष्ट्र राज्याच्या सांस्कृतिक विकासामध्ये जिल्ह्याचे फार मोठे योगदान आहे. शिक्षण़ साहित्य व कलाक्षेत्राच्या जडणघडणीमध्ये या जिल्ह्यातील अनेक थोर विभूतींचे योगदान अतिशय मोलाचे होते. हा सांस्कृतिक विकास केवळ मूठभर लोकांचाच होता. रायगड जिल्ह्यातील असंख्य सामान्य जनता या प्रगतीपासून अतिशय दूर होती. एका बाजूस अतिउच्च दर्जाची परिस्थिती असल्याचे जरी स्पष्ट होत असली तरीही दुसऱ्या बाजूस बहुसंख्य समाज यापासून अतिशय दूर होता. सांस्कृतिक क्षेत्रात प्रगती व मागासलेपणा यांचे संमिश्रण या दोन्ही बाबी एकाच वेळी जिल्ह्यात दिसून येतात.

रायगड जिल्ह्यामध्ये जंजिऱ्याचा सिद्दी़ कुलाब्याचे आंग्रे़ भोरचे पंतसचिव आणि इंग्रजांची राजकीय सत्ता होती. या प्रत्येक सत्तेने आपल्या प्रदेशात आणि मिशनऱ्यांनी शैक्षणिक कार्य थोडÝा फार प्रमाणात केले. मराठÝांच्या काळात नागाव़ पेण ही शिक्षणाची प्रमुख केंद्र होती. आंग्रयांनी कुलाबा किल्ल्यात शिक्षणाची सोय करून सर्व खर्च संस्थानाकडून केला जात होता. जिल्ह्यातील पहिली व्हर्नाक्युलर शाळा १८४० मध्ये महाड येथे सुरू करण्यात आली. भोर संस्थानाने नागोठाणे़ पाली़नाडसुर येथे शाळा सुरू केल्या. जंजिरा संस्थानाने मुरूड़ श्रीवर्धऩ हरेश्वऱ मांडले येथे शाळा सुरू केल्या. अलिबाग येथे फ्री मिशन चर्चने १८७९ पहिली इंग्रजी शाळा सुरू केली. बा. ग. रानडे़ के. रा. आठवले़ ग. दा. टिळक़ सी. वि. घाटे यांनी इंग्रजी शाळेला शह देण्यासाठी १९१७ मध्ये कोकण एज्युकेशन सोसायटीची स्थापना केली. त्यानंतर पेण एज्युकेशन सोसायटी (१९१०) अभिनव ज्ञानमंदीर कर्जत (१९१५) अलिबाग शिक्षण प्रसारक मंडळ (१९१७) खालापूर तालुका शिक्षण प्रसारक मंडळ (१९५७) इ. विविध शैक्षणिक संस्था स्थापन करण्यात आल्या. त्यामुळे जिल्ह्यात खऱ्या अर्था

ने शैक्षणिक कार्याला प्रारंभ झाला.शिक्षणाचा प्रसार केवळ मूठभर उच्चवर्गीय लोकांच्यामध्ये झालेला होता. जिल्ह्यातील बहुसंख्य जनता, महिला, आदिवासी यांच्यामध्ये शिक्षणाचा प्रसार झालेला नाही.त्यामुळे जिल्ह्यात साक्षरतेचे प्रमाण अतिशय नगण्य होते.समाजात धार्मिक रूढी, परंपरा, व्यसनाधीनता असल्याने शिक्षणाकडे बहुसंख्य लोकांचे दुर्लक्ष होते.

शैक्षणिक प्रगतीप्रमाणेच साहित्य क्षेत्रातही मूठभर लोकच आघाडीवर होते.श्रेष्ठ साहित्यिकांची परंपरा जिल्ह्याला लाभलेली होती.अनंत महाराज पैठणकर यांनी तुकारामांच्या आत्मानुभवावर ४० हजार अंभगांची वचने केली.विष्णुबुवा ब्रम्हचारी यांनी 'वेदोक्त धर्म ' आणि 'सुखदायक राज्य प्रकरणी निबंध' याचे लेखन करून मार्क्सवादी सिद्धाताची मांडणी केली.नारायण मराठे तथा स्वामी केवलानंद सरस्वती यांनी संस्कृतमध्ये 'मीमांसाकोश' सात खंडात प्रसिद्ध केला. रायगड जिल्ह्यातील चोल, नागाव, अष्टगार या भागातून अनेक शास्त्री मंडळी साहित्यशास्त्रात पुढे आले.या शास्त्रीमंडळींच्या मदतीने 'मराठी भाषेचा कोश' व मराठी व्याकरणाचे लेखन करण्यात आले.माधव डुकले व आवासकर कृष्णशास्त्री पेंडसेंनी 'शव्दरत्नाकर' नावाचा मोठा कोश तयार केला.गंगाधरशास्त्री फडके यांनी 'महाराष्ट्र भाषेचे व्याकरण' हे पहिले मुद्रित व्याकरणाचे पुस्तक तयार केले.शंकर दीक्षितने मराठी कवितेचे 'विद्यार्थीबुद्धीवर्धिनी' हे व्याकरण लिहिले.मराठी भाषेच्या कोशाप्रमाणेच व्याकरणाच्या जनकत्वाचा मान रायगड जिल्ह्यातील शास्त्रीमंडळींना द्यावा लागतो.

१९व्या शतकाच्या सुरुवातीस पाठ्Ÿपुस्तके आणि छापील पुस्तकांची कमतरता होती.या संदर्भात रायगड जिल्ह्यातील शास्त्री व पंडितांनी पायाभूत कार्य केले.विल्यम हेन्री व बेलने नारायणशास्त्री जोशींच्या मदतीने 'शिल्पविद्या' या विषयावर निबंध तयार केला.गोविंद गंगाधर फडकेने 'यंत्रशास्त्राची मुळे' हे शास्त्रीय पुस्तक प्रसिद्ध केले.जगन्नाथशास्त्री क्रमवंत व रामचंद्रभट अधलेकरने अंकगणित, कर्तव्य भूमिती, आदिकरण भूमिती, बीजगणित इ.विषयाच्या पुस्तकांचे लेखन केले.या शास्त्रीमंडळींप्रमाणे शि.म.परांजपे, वामन जोशी, गोविंद टिपणीस, विनायक भावे, वामन रावजी ढवळे, दि.बा.मोकाशी, भालचंद्र भाटवडेकर यांनी व्याकरण, कथा, कादंबरी, नाटक इ.विषयांमध्ये लेखन केले.

रायगड जिल्हा कलाक्षेत्रामध्ये महाराष्ट्रात आघाडीवर आहे.अलिबाग,महाड येथे नाट्Ÿ संस्था स्थापन करण्यात आल्या होत्या.या संस्थानी सामाजिक व राजकीय आशयावर आधारित

अनेक नाटके सादर करून प्रबोधनाचे कार्य केले. कांचनगडची मोहना, कीचकवध, प्रेमसंन्यास, मत्स्यगंधा, मर्दमराठा, देशाचा फकीर यासारखी नाटके रंगभूमीवर सादर करण्याचे काम अनेक नटांनी केले. त्यामध्ये गणपतराव कारखानीस, त्र्यंबकराव प्रधान, केशवराव शेंडे, गणेश बोडके इ. अनेक नट प्रसिद्ध होते. नाटयक्षेत्राप्रमाणेच संगीत, गायन, वाद्य क्षेत्रातही फार मोठी परंपरा जिल्ह्यात आहे. विष्णू धारपा (कवी) गंगाराम पाटील (गायकनट) यशवंत देव व सुलोचना चव्हाण (गायक) आनंद लिमये (तबलावादक) कृष्णाजी धांग्रेकर (सारंगीवादक) इ. मंडळी प्रसिद्ध आहेत. रायगड जिल्ह्यातील सांस्कृतिक विकासामुळे राजकीय जागृतीची पार्श्वभूमी तयार होऊन स्वातंत्र्य चळवळीच्या दिशेने वाटचाल सुरू झाली.

रायगड जिल्ह्याचा अभ्यास करताना सांस्कृतिक क्षेत्र वगळता सर्वच क्षेत्रात अप्रगती व मागासलेली स्थिती होती. त्याची कारणमीमांसा करत असताना काही बाबी ठळकपणे दिसतात. सुशिक्षित, कर्ते, बुद्धिमान लोक नोकरी निमित्ताने पुणे-मुंबईसारख्या शहरात स्थायिक झाले. त्यामुळे या प्रदेशातील लोकांना प्रबोधनाची नवी दिशा देणारे नेतृत्व पुरेशा प्रमाणात लाभले नाही. त्यामुळे स्थानिक लोकांच्या आचार-विचारात बदल झाला नाही. यावेळी समाजावर रूढी, परंपरा, अंधश्रद्धा आणि व्यसनाचा मोठा प्रभाव होता. पारंपारिक पद्धतीचा शेती व्यवसाय असून आधुनिक यंत्रज्ञानाचा व दळणवळणाचा, पाणी पुरवठयाचा अभाव असल्याने शेती उत्पादन मर्यादित होते. औद्योगिक प्रगतीचा अभाव असल्याने थोडया फार प्रमाणात हस्तउद्योग व कुटीरउद्योग विकसित झालेला होता. उत्पादनाची साधने मर्यादित असल्याने आर्थिक दारिद्रय होते,. त्यामुळे लोकांना पुरेसे अन्न, वस्त्र, निवारा, पिण्याचे पाणी मिळत नव्हते. रायगड जिल्ह्यामध्ये शिक्षण देणाऱ्या शैक्षणिक संस्थांचा अभाव असल्याने साक्षरतेचे प्रमाण अतिशय कमी होते. वैद्यकीय उपचार व सेवा आणि आरोग्यविषयक सल्ला याचा अभाव होता. लोकांमध्ये चैनी विलासी जीवन जगण्याची हौस मोठी होती. आपले हक्क व जबाबदाऱ्या याची जाणीव नसलेला व आपणच आपला विकास करावा याचे ज्ञान नसलेला समाज असल्याने त्यांची प्रगती झालेली नाही. रायगड जिल्ह्याच्या सर्वांगीण परिस्थिती असल्याचे स्पष्ट होते.

ब्रिटिशांनी भारतात आपली राजकीय सत्ता स्थापन करून स्वत:ची प्रशासन यंत्रणा निर्माण केली. आपले राज्य स्थिर करण्याच्या दृष्टीने प्रयत्न चालविले. त्यासाठी त्यांना येथील लोकांची मदत घेणे गरजेचे होते. त्यातूनच ब्रिटिशांनी या देशात पाश्चिमात्य शिक्षण, नवीन कायदेसंहिता,

सामाजिक सुधारणा केल्यामुळे जनजागृती घडून येण्यास मदत झाली. पण याच काळात ब्रिटिशांनी भारतीयांचे आर्थिक शोषण चालविले होते. ब्रिटिशांचे राज्य हे भारतीयांच्या कल्याणासाठी नसून इंग्रजांच्या विकासासाठीच होते. म्हणून त्यांनी आपल्या साम्राज्य विस्ताराबरोबरच येथील लोकांचे दुर्बलीकरण चालविले होते. त्यातून येथील प्रजेवर इंग्रजांचे दडपशाही, अन्याय, अत्याचार, जातीयवादी राजकारण चालू होते. त्यामुळे इंग्रजी राजवटी विरुद्ध भारतीयांमध्ये असंतोष निर्माण झाला. तसेच पाश्चिमात्य शिक्षण व साहित्यामुळे भारतीयांना त्यांच्या संस्कृती, तत्त्वज्ञानाची ओळख झाली. लोकशाहीचे गोडवे गाणारे इंग्रज भारतीयांना तुच्छ लेखत आहेत. याशिवाय भारतीय समाजात व धर्मामध्ये अंधश्रद्धा, रूढी, परंपरा मोठ्या प्रमाणात फोफाविल्या आहेत याची जाणीव झाली. त्या नष्ट करण्यासाठी व समाजजागृती करण्याच्या उद्देशाने निरनिराळ्या संघटना अस्तित्वात येत होत्या. विविध संस्थांनी प्रबोधनाचे कार्य खेड्यापाड्यांपर्यंत केले. सामान्य माणसाच्या मनामध्ये राष्ट्रवाद व राष्ट्रप्रेम निर्माण होऊ लागल्यानेच स्वातंत्र्य चळवळीचा उदय झाला.

१९ व्या शतकाच्या उत्तरार्धातच भारतीयांना राजकीय जाणीव झाली. सुसंघटित राजकीय चळवळीचा पाया १८८५ मध्ये राष्ट्रीय काँग्रेसच्या स्थापनेने घातला. काँग्रेसच्या कार्यामुळे स्वातंत्र्याची आकांक्षा हळूहळू फूलू लागली. महाराष्ट्र, पंजाब, बंगाल या प्रांतातून स्वातंत्र्य चळवळीचा प्रसार मोठ्या प्रमाणात झाला. महाराष्ट्रातील पुणे-मुंबई ही शहरे काही काळ स्वातंत्र्य चळवळीची केंद्रे बनली होती. या पार्श्वभूमीवर रायगड जिल्ह्यात मात्र प्रारंभीच्या काळात स्वातंत्र्य चळवळ फारशी विस्तारली नव्हती. मात्र २० व्या शतकाच्या प्रारंभीच्या काळात ती सक्रिय झालेली होती. रायगड जिल्ह्यात स्वातंत्र्य चळवळीच्या उदयास विविध घटकांची पार्श्वभूमी लाभलेली होती.

इंग्रजी शिक्षणाचा भारतीय समाजजीवनावर व लोकजीवनावर परिणाम झाला. इंग्रजी शिक्षण संपादन करणारी नवशिक्षित तरुण पिढी उदयास आली. त्यातील काही जणांनी इंग्रजांचे अंधानुकरण केले. तर काही जणांनी स्वतंत्र भारत करण्याचे स्वप्न पाहिले. या नवशिक्षित पिढीमध्ये शि. म. परांजपे, भास्करराव जाधव, आचार्य भागवत, द. मा. पोतदार हे रायगड जिल्ह्यातील होते. त्यांनी पुण्यातील सामाजिक व राजकीय चळवळीचे विचार रायगड जिल्ह्यात रुजविले. त्यामुळे लोकांमध्ये आत्मविश्वास वाढला. इंग्रजी शिक्षणाप्रमाणेच ख्रिस्ती मिशनऱ्यांच्या धोरणामुळे वैचारिक जागृतीची प्रेरणा मिळाली. तसेच या ख्रिस्ती मिशनऱ्यांनी भारतीय लोकांना

अपमानास्पद वागणूक दिल्याने भारतीय जनतेमध्ये त्यांच्या विरुद्ध असंतोष झपाटÝाने वाढू लागला.हा असंतोष शहरापासून खेडÝापयत पसरला.ख्रिस्ती मिशनऱ्यां बरोबरच इंग्रजांची सत्ता नष्ट झाली पाहिजे अशी भावना लोकांच्यामध्ये असलेली दिसून येते.

१९ व्या शतकाच्या अखेरीस सामाजिक व धार्मिक सुधारणा चळवळी मागे पडून राजकीय विचारांना व चळवळींना प्राधान्य मिळाले.भारतीय वृत्तपत्राने राजकीय विचारप्रणाली उचलून स्वातंत्र्य चळवळीसाठी मोलाची कामगिरी बजावली.मुंबई-पुणे शहरातील वृत्तपत्रांचे प्रमुख वार्ताहर शि.म.परांजपे़रामभाऊ मंडलिक़के.सी.ठाकरे़नारायण जोशी़ प्रभाकर गुप्ते हे रायगड जिल्ह्यातील होते.त्यांनी जिल्ह्यातील घटना ठळकपणे छापल्या.ही वर्तमानपत्रे जिल्ह्यात मोठÝा प्रमाणात वाचली जात असत.शिवाय सत्यसदऩ सुधाकऱ पेण समाचाऱ कुलाबा़राष्ट्रमुख कुलाबा समाचार इ.स्थानिक वृत्तपत्रानी इंग्रजांचे धोरण व स्थानिक राजकीय घटना प्रसिद्ध केल्या. वृत्तपत्राप्रमाणे मराठी वाङमय़ नाटÝ कला चळवळीने रायगड जिल्ह्यात सामाजिक व राजकीय प्रबोधनात हातभार लावला.

दुष्काळग्रस्तांना मदत करण्याच्या हेतूने ब्रिटिश सरकारने फॅमिली रिलीफ कोड नावाचा कायदा मंजूर केल्याने नेमस्तवाद्याने अभिनंदन केले.परंतु या कायद्याची अंमलबजावणी सरकारने न केल्याने लो.टिळकांनी सार्वजनिक सभेच्या माध्यमातून सारावंदी चळवळ सुरू केली.सार्वजनिक सभेच्या दुष्काळ समितीचे सचिव अच्युतराव सीताराम साठे यांनी रायगड जिल्ह्यात पनवेल़ पेण़ रोहा़ गोरेगाव़ नागोठाणे येथे शेतकऱ्यांच्या सभा घेतल्या.यावेळी दत्तोपंत आपटे़ रामजी घरत़ शि.म.परांजपे आणि हजारो आगरी़ कोळी़ कातकरी लोक हजर होते.या चळवळीतून लो.टिळकांनी लोकांना निर्भय होण्यास शिकविले.स्वत:च्या हक्कासाठी संघर्ष करण्याची प्रेरणा दिली.या प्रेरणेमुळे जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी शेतसाऱ्यात सुट मिळावी यासाठी सरकारी कार्यालयाकडे जाऊ लागले.तसेच स्थानिक संघटना़ शेतकरी संघटना यांनी आंदोलनात सक्रिय सहभाग घेतला.सारावंदी चळवळीमुळे राजकीय जनजागृतीची प्रक्रिया सुरू झाली.रयतेच्या या असंतोषाला राजकीय प्रवाहात आणण्याचा प्रयत्न केल्याने स्वातंत्र्य चळवळीची पार्श्वभूमी तयार झाली.

रायगड जिल्ह्यातील स्वातंत्र्य चळवळीला भूषणावह ठरेल व नाव घेता येईल असा ऐतिहासिक व राजकीय वारसा लाभलेला आहे.जिल्ह्यातील जनता त्यांना अवतारी पुरुष मानत

असे. परकीयांविरुद्ध लढा देऊन ऐतिहासिक कामगिरी करावी अशी त्यांची इच्छा होती. त्यातूनच ब्रिटिशांविरुद्ध सर्वप्रथम बंड करणारे आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके हे या जिल्ह्यातील भूमिपूत्र होते. त्यांचे कार्यक्षेत्र पश्चिम महाराष्ट्रात होते. वासुदेव फडकेंनंतर काही काळ राजकीयदृष्टÏा हा जिल्हा थांबविलेला होता. या थंडावलेल्या रायगड जिल्ह्यात नवजागृती घडवून आणण्यासाठी लो. टिळकांनी शिवजयंती व गणपती उत्सव हे सार्वजनिक कार्यक्रम सुरू केले. या कार्यक्रमातून मनोरंजन व लोकशिक्षणाचा प्रसार केला. शिवाय राजकीय शिक्षणाचे व्यासपीठ निर्माण करून राष्ट्रवादी विचारांचा प्रसार केला. ऐतिहासिक व्यक्तींच्या चरित्रातून पुढे अनेक क्रांतिकारकांनी स्फूर्ती घेतली. रायगड जिल्ह्यामध्ये पेण पनवेल महाड पोलादपूर येथे अभिनव भारत या क्रांतिकारक संघटनेच्या शाखा सुरू करण्यात आल्या. गणेश जोशी नारायण मंडलिक करंदीकरमास्तर बापटमास्तर इत्यादी अनेक मंडळी संघटनेचे सदस्य होते. जॅक्सन खून खटल्याचा संबंध पेण शाखेपयत पोहोचला होता. अभिनव भारत या संघटनेच्या माध्यमातून क्रांतिकारी विचारांचा प्रसार रायगड जिल्ह्यात झालेला होता. इंग्रजांनी हा देश सोडून जावा असा विचार जनतेच्या मनात निर्मान होऊ लागल्याने स्वातंत्र्य चळवळीच्या दिशेने वाटचाल सुरू झालेली होती. म. गांधीजींच्या असहकार चळवळी रायगड जिल्ह्यात खऱ्या अर्थाने स्वातंत्र चळवळीला सुरुवात झाली.

लो. टिळकांनी लोकांच्या निर्माण केलेल्या आत्मविश्वासाचा उपयोग करून म. गांधीजींनी भारतीय स्वातंत्र्यलढÏाचे नेतृत्व स्वीकारले. म. गांधीजींनी ब्रिटिशांविरोधी असहकार (आत्मशुद्धी) चळवळ पुकारली. त्याचे पडसाद देशाच्या कानाकोपऱ्यात उमटले. यापासून रायगड जिल्हाही अलिप्त राहिला नाही. या काळात रायगड जिल्ह्यात गांधीवादी विचाराने प्रभावित झालेले रामभाऊ मंडलिक माधवराव गोसावी जनार्दन लेले वामन लिमये यांच्यासारखी अनेक प्रमुख नेते मंडळी होती. देशव्यापी पातळीवर असहकार चळवळ सुरू झाल्यानंतर म. गांधीजींनी स्वातंत्र्य चळवळीबरोबरच सामाजिक प्रश्नासंदर्भात चळवळ सुरू केली. त्यामुळे म. गांधीजींच्या चळवळीचे स्वरूप म्हणजे संघर्षात्मक व विधायक कार्यक्रमात्मक असल्याचे स्पष्ट होते.

काँग्रेस वकिंग कमिटीने नागपूर अधिवेशनात असहकार चळवळीचा ठराव बहुमताने मंजूर केला. भारतीय जनतेचे आत्मबल व निर्भयता वाढविण्यासाठी गांधीजींनी संघर्षात्मक स्वरूपाचा कार्यक्रम स्वीकारला. या कार्यक्रमात प्रामुख्याने बहिष्कार या तत्त्वाचा स्वीकार करून निवडणूक

न्यायालय, विदेशी कापड या संदर्भात प्रभावीपणे हे तत्त्व राबविण्याचा निर्णय घेतला. हेच धोरण रायगड जिल्हा काँग्रेस कमिटीने स्वीकारले. निवडणूकीवर बहिष्कार हा कार्यक्रम रामभाऊ मंडलिक, माधवराव गोसावी यांच्या प्रयत्नाने यशस्वी झाला. काँग्रेस पक्षातर्फे अधिकृत उमेदवार कोणीही उभा नव्हता. प्रागतिक पक्षाचे उमेदवार रोह्याच गोपाळराव भाटे यांना ४११ ऐवढी अल्प मते मिळून ते विजयी झाले. तर १९२३ च्या कायदेमंडळाच्या निवडणुकीत स्वराज्य पक्षाचे उमेदवार डॉ. विजयराव पवार निवडून आले. त्यामुळे काँग्रेस पक्षाचा बहिष्काराचा कार्यक्रम यशस्वी झाला.

सरकारी न्यायालयात वेळ व पैसा खर्च करूनही योग्य न्यायनिवाडा होत नव्हता. त्यामुळे कलकत्ता अधिवेशनात सरकारी न्यायालयावर बहिष्कार टाकण्याचा निर्णय घेण्यात आला. या निर्णयानुसार रायगड जिल्ह्यात न्यायालयीन बहिष्कार ही चळवळ माधवराव गोसावी, जनार्दन लेले यांनी सुरू केली. काँग्रेसच्या आदेशानुसार तात्पुरती वकिली सोडणारे असंख्य वकिल होते. कायमची वकीली सोडणारे महाराष्ट्रात अलिबागचे माधवराव गोसावी व भुसावळचे अण्णासाहेब दास्ताने हे दोनच वकील होते. रायगड जिल्ह्यात वकिलीचा त्याग करणारे वामन लिमये, मुनीलालशेठ, माधवराव गोसावी, जनार्दन लेले यासारखे वकील होते. न्यायालय बहिष्कार कार्यक्रमाला निराशाजनक यश मिळाले असले तरीही ज्यांनी वकिलीचा धंदा सोडला ते पुढे स्वातंत्र्य चळवळीत सक्रिय सहभागी झालेले होते. हेच या चळवळीचे वैशिष्ट्ये होय.

विदेशी कापड व्यापाराच्या माध्यमातून परदेशात मोठी संपत्ती जात होती. शिवाय पारंपारिक कापड उद्योगाचा ऱ्हास झाल्याने बेकारीचे प्रमाण वाढले होते. हे रोखण्यासाठी व खादी उद्योगाचे पूनर्जीवन करण्याच्या हेतूनेच विदेशी कापड बहिष्कार हा कार्यक्रम सुरू केला. मुंबई इलाखा, बंगाल, संयुक्त प्रांत, मद्रास इलाख्यात बहिष्काराचा प्रभाव अधिकच होता. विदेशी कापड दुकानावर पिकेटिंग, विदेशी कापडाची होळी या कार्यक्रमाचा समावेश करण्यात आली. रायगड जिल्ह्यात पनवेल, पेण, महाड, अलिबाग या शहरात पिकेटिंगचा कार्यक्रम गणेश जोशी, जनार्दन लेले, शिवरात नाझरे यांनी केला. तर रामचंद्र बागडे, केशवराव लिमये यांनी विदेशी कापडाची होळी केली. विदेशी कापड बहिष्कारामुळे ब्रिटिशांची ५७ कोटी पयतची आयात कमी झाली. इंग्लंडमधील प्रसिद्ध कापड उद्योग दिवाळखोरीत निघाला.

म. गांधीजींनी राष्ट्रासमोर 'स्वयंपूर्ण खेडे' ही संकल्पना मांडली. त्याबरोबरच श्रमाला प्रतिष्ठा मिळवून देण्याच्या हेतूने विधायक कार्यक्रम जनतेसमोर मांडला. त्यातून समाजात नवचैतन्य

निर्माण करण्याचा प्रयत्न केला.बेझपाडा अधिवेशनात भारताच्या पारंपरिक व्यवसायाला पुन्हा स्थान मिळवून देण्यासाठी खादीचा प्रसार व प्रचाराचा ठराव मंजूर करण्यात आला.खादीच्या माध्यमातून लोकांमध्ये स्वराज्य प्रेम निर्माण करण्याचा प्रयत्न केला.टिळक फंडासाठी जमा केलेल्या पैशातून चरखे खरेदी करून ग्रामीण भागातील लोकांना रोजगारासाठी त्याचे वाटप करण्यात आले.रायगड जिल्ह्यात विशेषत: पनवेल परिसरात आप्पासाहेब वेदकांनी खादीच्या प्रसारासाठी पनवेल़ जासई उरण येथे खादी केंद्राची निर्मिती केली.त्यातून स्थानिक लोकांना पेळू करणे़ सूत कातणे हा व्यवसाय उपलब्ध करून दिला.काकासाहेब गोखले यांनी पनवेल येथे खादी विणाईसाठी हातमाग सुरू केले.बाबुराव मेहताने महाड येथे खादी ग्रामोद्योग सुरू केला.

परकीयांच्या मगरमिठीतून देशाला सोडवावयाचे असेल तर तरुण पिढीला शिक्षणाची संधी उपलब्ध करून दिली तरच अनेक देशभक्त तरुणांची निर्मिती होईल.अश्या पद्धतीचे भारतीयांना राष्ट्रीय शिक्षण दिले पाहिजे असे लो.टिळकांचे मत होते.त्यातूनच राष्ट्रीय शिक्षणाचा उदय झाला.देशाच्या गुलामगिरीला कारणीभूत ठरलेल्या मेकॉले प्रणित प्रचलित असलेल्या शिक्षणावर बहिष्कार टाकून विद्यार्थ्यानी स्वातंत्र्य चळवळीत सहभागी होण्यासाठी म.गांधीजींनी राष्ट्रीय शिक्षणाचा प्रसार करण्याचा प्रयत्न केला.रायगड जिल्ह्यामध्ये राष्ट्रीय शिक्षणाचा प्रसार करण्यासाठी राष्ट्रीय शाळा सुरू करण्यात आल्या.महाड येथे आचार्य भागवत़ विनायक उपाध्ये़ श्रीवर्धन येथे महादेव पेंडसे़ नागाव अलिबाग येथे वामन लिमये़ नागाव महाड येथे गोपाळशेठ यांनी राष्ट्रीय शाळा सुरू केल्या.

ब्रिटिश सरकारला दारूमधून मोठÎा प्रमाणात आर्थिक फायदा होत होता.तसेच मद्यपानांचे दुष्परिणाम घालविणे हा सामाजिक हेतू डोळÎासमोर ठेवून म.गांधीजींनी मद्यपान निषेध कार्यक्रम हाती घेतला.दारू दुकानावर पिकेटिंग करणे़ दारू लिलाव न घेणे, दारूला स्पर्श न करण्यची वैयक्तिक व सामुदायिक शपथ घेणे या स्वरूपाचा कार्यक्रम होता.रामभाऊ मंडलिक़ माधवराव गोसावी़ गजानन कामत़ आत्माराम आठवणे़ नारायण पाटील यांनी हा कार्यक्रम रायगड जिल्ह्यात राबविला.अलिबाग़ पेण़ महाड़ पनवेल़ रोहा येथे पिकेटिंगचा कार्यक्रम करण्यात आला.अलिबाग येथे दारू लिलावावर लोकांनी व व्यापाऱ्यांनी बहिष्कार टाकला.ही चळवळ राजकीय भूमिकेइतकीच नैतिक भूमिकेने महत्त्वाची होती.कारण दारूतून सरकारला प्राप्त होणारे उत्पन्न थांबवून त्याची आर्थिक मार्गाने राजकीय कोंडी करण्याचा गांधीजींचा हेतू होता.परंतु

ब्रिटिश सरकारने मद्यपानाचे जाहीरपणे समर्थन करून चळवळ दडपून टाकण्याचा प्रयत्न केला. परंतु इंग्रज सरकारला फारसे यश मिळाले नाही.

भारतीय समाजात सामाजिक समता निर्माण करण्याच्या हेतूने म. गांधीजींनी अस्पृश्यतेचा प्रश्न हाती घेतली. म. गांधीजींच्या दृष्टीने हा प्रश्न राजकीय होता. त्यामुळे राजकीय चळवळीबरोबरच सामाजिक स्वातंत्र्यासाठी अस्पृश्यता निर्मूलन मोहीम हाती घेतली. या धोरणामुळे अनेक जण नाराज झाले. त्यामुळे या कार्यक्रमास फारसे यश मिळाले नाही. रायगड जिल्ह्यात अनंत चित्रेसुरबानाना टिपणीस नाना काणे या मंडळींनी सामाजिक समता निर्माण करण्यासाठी अस्पृश्यांना घरी बोलविणे सहभोजन घेणे आर्थिक मदत करणे इत्यादी उपक्रम हाती घेतले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नेतृत्वाखाली २० मार्च १९२७ रोजी चवदार तळ्याचा सत्याग्रह केला. त्या वेळी वाद घडून आला.

म. गांधीजींच्या आदेशानुसार संघर्षात्मक व विधायक स्वरूपाचा असहकार चळवळीचा कार्यक्रम राबविण्यात आला. या चळवळीमध्ये श्रीमंत कुटुंबातील व मूठभर सुशिक्षित पांढरपेशी मंडळी सहभागी झालेली होती. सर्वसामान्य जनता स्त्री आदिवासी या चळवळीपासून दूर होती. म. गांधीजींच्या अपेक्षेप्रमाणे ही चळवळ ग्रामीण भागातील सर्वसामान्य जनतेपर्यत पोहोचली नव्हती. त्यामुळे या चळवळीला फारसे यश आले नाही. तथापि या चळवळीमुळे ब्रिटिशांविरुद्ध लढ्याचे बळ निर्माण झालेले होते. त्यातूनच प्रखर राष्ट्रवाद निर्माण हाऊ लागला. असहकार चळवळीने भारतीय समाज व सरकारी प्रशासनातील दोष लोकांसमोर मांडले हेच असहकार चळवळीचे फलित होय.

असहकार चळवळीला हिंसेचे गालबोट लागताच म. गांधीजींनी असहकार चळवळ मागे घेतली. ऐन बहरात आलेली चळवळ मागे घेतल्याने चळवळीत सहभागी झालेले कॉंग्रेसच्या नेत्यांची व कार्यकर्त्याची भ्रमनिराशा झाली. कॉंग्रेसमधील मोतीलाल नेहरू चित्तरंजन दास या सारख्या नेत्यांनाही म. गांधीजींची ही कृती आवडली नाही. अशा या दोलायमान परिस्थितीचा फायदा घेऊन इंग्रजांनी म. गांधीजींना अटक केली. परिणामी काही काळ स्वातंत्र्याची चळवळ थंडावलेली होती. आपल्या भारतीय लोकांच्या राजकीय प्रगल्भत्तेची जाणीव अद्यापि परिपूर्ण झालेली नाही याची म. गांधीजींना जाणीव झालेली होती. स्वातंत्र्य राष्ट्रवाद या कल्पना जनमाणसात चांगल्या रुजल्याशिवाय भारतीय स्वातंत्र्यलढा तीव्र होणार नाही असे म. गांधीजींना वाटत होते. म्हणून

काही काळ रचनात्मक कार्य करण्यास विशेष प्राधान्य दिले. खादीचा प्रसार व प्रचार, दारूबंदी राष्ट्रीय शिक्षण,अस्पृश्यता निर्मूलन आणि राष्ट्रीय कॉंग्रेसचा खेडयांपर्यंत प्रसार करणे यासारखे विधायक कार्यक्रम राबविण्यावर विशेष भर दिला. तर कॉंग्रेसमध्ये मोतीलाल नेहरू, चित्तरंजन दास, बॅ. जयकर यासारख्या नेत्यांनी स्वातंत्र्य चळवळ गतिमान करण्यासाठी आणि ब्रिटिश प्रशासनात प्रवेश करून भारतीयांच्या हिताच्या मागण्या मान्य करून घेण्यासाठी प्रसंगी प्रशासनात अडथळे निर्माण करण्याच्या हेतूने स्वराज्य पक्षाची स्थापना केली. १९२६ पर्यंत स्वराज्य पक्षाच्या माध्यमातून समाजात राजकीय जागृतीचे कार्य केले. १९२७ मध्ये सायमन कमिशन भारतात आले. त्या वेळी कॉंग्रेसने म. गांधीजींच्या नेतृत्वाखाली हरताळ, निदर्शने पाळून कमिशनचा निषेध करण्यात आला. म. गांधीजींनी पुन्हा काही काळ लोकजागृती व रचनात्मक कार्यास वाहून घेतले. म. गांधीजींनी पंडित नेहरूंना बरोबर घेऊन पुन्हा स्वातंत्र्य आंदोलनास सुरुवात केली. १९२९ च्या लाहोर अधिवेशनात पंडित नेहरूंच्या अध्यक्षतेखाली संपूर्ण स्वातंत्र्याचा व सविनय कायदेभंग चळवळीचा ठराव मंजूर करण्यात आला. तसेच २६ जानेवारी १९३० हा दिवस स्वातंत्र्य दिन म्हणून साजरा करण्याचे अहवान करण्यात आले. २६ जानेवारी १९३० रोजी रायगड जिल्हा कॉंग्रेसच्या वतीने पेण येथे आप्पासाहेब देवच्या वाडयात स्वातंत्र्य दिन साजरा करण्यात आला. यावेळी 'कायदेभंग चळवळीस निघा' हा म. गांधीजींचा संदेश रामभाऊ मंडलिक यांनी वाचून दाखविला. त्यामुळे रायगड जिल्ह्यात सविनय कायदेभंग चळवळीला सुरुवात झाली. राष्ट्रीय कॉंग्रेसची बैठक फेब्रुवारी १९३० मध्ये साबरमती येथे होऊन चळवळीचा ठराव मंजूर करण्यात आला. सविनय कायदेभंग चळवळीतसुद्धा रायगड जिल्हा म. गांधीजीच्या बरोबर असल्याचा दिसून येतो.

सुरुवातीपासून रायगड जिल्ह्यातील राजकीय नेत्यांवर म. गाधीजींचा खूप मोठा प्रभाव असल्याचे दिसून येतो. त्यामुळे गांधीजींनी सुरू केलेल्या सविनय कायदेभंग चळवळीला रायगड जिल्ह्याच्या नेत्यांनी पाठिंबा देऊन सक्रियता दाखविली. महाराष्ट्रातील स्वातंत्र्य चळवळीचा विचार करता पश्चिम महाराष्ट्राप्रमाणेच कोकणातील रायगड जिल्ह्यात या स्वातंत्र्य चळवळीत आघाडीवर असलेला दिसतो. रायगड जिल्ह्यातील सविनय कायदेभंग चळवळीच्या नियोजनासाठी महाराष्ट्र प्रांतिक कॉंग्रेस कमिटीने रायगड जिल्ह्यासाठी ग. वि. केतकर, रामभाऊ मंडलिक, हरिभाऊ जोशी, कमलाकर सुमंत यांची कमिटी नियुक्त केली. या कमिटीने २ एप्रिल ११९३० रोजी पनवेल येथे जिल्ह्यातील प्रमुख नेत्यांची सभा घेतली. यावेळी बाळासाहेब पटवर्धन,गोंदूकाका पटवर्धन, शंभूशेठ,

भाऊसाहेब जाईल इत्यादी नेते हजर होते. यावेळी जिल्हा सत्याग्रह समितीची स्थापना करून विनायकराव गोविलकर यांची अध्यक्ष म्हणून निवड करण्यात आली, तर सविनय कायदेभंग चळवळीचे नेतृत्व रामभाऊ मंडलिक यांच्याकडे दिल्याने या स्वातंत्रलढÝाचे पेण हे केंद्र बनले.

सविनय कायदेभंग चळवळीचा एकभाग म्हणून मीठ सत्याग्रह करण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यानुसार रायगड जिल्ह्यामध्ये पेण़ पनवेल़ अलिबाग़ महाड़ माणगाव़ गोरेगाव इत्यादी ठिकाणी मीठ सत्याग्रह करण्यात आले. या सत्याग्रहास रायगड जिल्ह्यातील जनतेने चांगला प्रतिसाद दिलेला दिसून येतो. यावेळी सामान्य जनतेप्रमाणेच व्यापारी़ जमीनदार यांनीही चळवळीला पाठिंबा दिला. रायगड जिल्हा काँग्रेस कमिटी मीठ सत्याग्रहाच्या नियोजनासाठी व प्रशिक्षणासाठी ८ एप्रिल १९३० रोजी पेण येथे शिबिर घेतले. या शिबिरासाठी जिल्ह्यातून व जिल्ह्याबाहेरून अनेक काँग्रेस कार्यकर्ते उपस्थित होते. या शिबिराचे प्रमुख म्हणून रामभाऊ मंडलिक तर व्यवस्थापक म्हणून विनायक फडके यांची निवड करण्यात आली. त्यामुळे संपूर्ण रायगड जिल्ह्यात सत्याग्रहमय वातावरण निर्माण झालेले होते. इंग्रज राजवटीची भीती न बाळगता लोक सहभागी झालेले होते. त्याचप्रमाणे रंगो टिळक़ हेमचंद्र शहा़ कानकिया़ शंभूशेठ यांनी मोठÝा प्रमाणात आर्थिक मदत दिली. सत्याग्रह शिबिरानंतर जिल्ह्यात अनेक ठिकाणी मीठ सत्याग्रह करण्यात आले. पेण तालुक्यात नाना काणे़ चिंतामणशास्त्री जोशी़ दामलेमास्तऱ चुनीलाल मेहेता यांच्या मार्गदर्शनाखाली मीठ सत्याग्रह करण्यात आले. पनवेल तालुक्यात प्रभाकर गुप्ते़ मधू चिटणीस़ हरिभाऊ जोशी़ रामभाऊ मंडलिक़ ग. वि. केतकर यांच्या नेतृत्वाखाली मीठ सत्याग्रह करण्यात आले. दामले मास्तरांच्या सल्ल्यानुसार अलिबाग मीठ सत्याग्रह सुरू करण्यात आला. वामन लिमये़ एस. एम. जोशी़ ना. ग. गोरे़ र. बा. खाडिलकर यांनी मीठ पुडÝांची विक्री करून मीठ सत्याग्रह केला. तसेच महाड़ माणगाव़ गोरेगाव येथील मीठ सत्याग्रह करण्यात आला. रायगड जिल्ह्यात खऱ्या अर्थाने राजकीय जागृतीस प्रारंभ झाला. कारण मीठ सत्याग्रहाच्या प्रसंगी जिल्ह्यातून अनेक स्तरातील सर्वसामान्य जनता़ स्त्रिया थोडÝा फार प्रमाणात सहभागी झालेल्या होत्या. त्यामुळे आतापयत धिमेपणाने सुरू असलेली स्वातंत्र्य चळवळीची वाटचाल आता अधिक आक्रमक होऊन इंग्रजांच्या साम्राज्यशाहीचा नायनाट करण्याच्या विचाराने झपाटू लागलेली दिसून येत होती. त्यामुळे मीठ सत्याग्रहाने राजकीय जागृतीला व चळवळीला सुरुवात झाली असे म्हणावे लागेल.

रायगड जिल्ह्याप्रमाणेच जिल्ह्याबाहेरही कायदेभंगाची चळवळ अतिशय जोरदारपणे फोफावली होती.म.गांधीजींनी पुकारलेला मीठ सत्याग्रह देशाच्या निरनिराळÏा भागात सुरू करण्यात आला.या मीठ सत्याग्रहामध्ये रायगड जिल्ह्यामधील काँग्रेस कार्यकर्ते सहभागी झालेले होते.उदा.म.गांधीजींच्या नेतृत्वाखाली सुरू करण्यात आलेला दांडीचा मीठ सत्याग्रह या सत्याग्रहासाठी म.गांधीजींनी पहिल्या तुकडीसाठी रायगड जिल्ह्यातून चिंतामणशास्त्री जोशी व विष्णू लक्ष्मण ऊर्फ नाना काणे या दोन प्रतिनिधींची निवड केलेली होती.संपूर्ण देशातून फक्त ७९ निवडक सत्याग्रहींच्या मदतीने दांडीयात्रेला गांधीजींनी प्रारंभ केला.जगन्नाथ गणपत ऊर्फ आचार्य भाई ढवण यांच्या नेतृत्वाखाली २० जणांची रायगड तुकडीने विर्लेपार्ले धारासना मीठ सत्याग्रहामध्ये मोठी कामगिरी केली.वडाळा मीठ सत्याग्रहामध्ये महाडचे विसूभाऊ पेणसे तर शिरोडा मीठ सत्याग्रहामध्ये कापरसू मथूरशेठ यांनी सहभाग घेतला होता.यावरून रायगड जिल्ह्यातील स्वातंत्र्य चळवळीने राष्ट्रीय स्वातंत्र्य चळवळीला प्रभावी व बलशाली बनविण्याचा प्रयत्न केला.म्हणूनच कायदेभंगाच्या चळवळीमुळे स्वातंत्र्यलढÏाचे एक पाऊल निश्चितपणे पुढे पडले.मीठ सत्याग्रहाची टिंगलटवाळी उडविणारे इंग्रज अधिकारी भयभीत झाले.नि:शस्त्र प्रतिकारातून स्वातंत्र्यासाठी स्वातंत्र्य सैनिकांची एक नवी फौज तयार झाली.त्यामुळे जुलूम् अत्याचार करणाऱ्या इंग्रजी सत्तेला जोरदार हादरा बसला.

स्वातंत्र्य चळवळ सुरू असतानाच म.गांधीजींनी लोकांमध्ये आत्मबल व आत्मविश्वास वाढविण्याच्या दृष्टीने संघर्षात्मक व विधायक कार्यक्रमाची चळवळ हाती घेतली.त्यातूनच सामाजिक ऐक्याबरोबरच स्वातंत्र्याची प्रेरणा देण्याचे कार्य सुरू केले.विदेशी दारू दुकानावर व लिलावावर निरोधन् विदेशी कापडावर बहिष्कार् सरकारी नोकरांवर सामाजिक व आर्थिक बहिष्कार् मार्शल लॉविरोधी सत्याग्रह इत्यादी उपक्रम संघर्षात्मक कार्यक्रम म्हणून हाती घेतले. तसेच खादीचा प्रसार व प्रचार् प्रभातफेरी् राष्ट्रध्वज वंदन आणि सामाजिक ऐक्य हे विधायक कार्य हाती घेतले.स्वातंत्र्य चळवळीत स्त्रियांचा सहभाग वाढविण्यासाठी स्त्रियांना सहभागी होण्याचे अहवान म.गांधीजींनी केले.त्यानुसार या कार्यक्रमामध्ये विमल गुप्ते् गांगले् कर्वे् दयाबाई ढवण् सरस्वतीबाई लिमये् कुसुम लिमये् भागिरथीबाई पटवर्धन या महिलांनी सहभाग घेतला.या कार्य क्रमामुळे समाजातील शेवटच्या माणसापयत स्वातंत्र्याची भावना पोहोचविण्याचा प्रयत्न म.गांधीजींनी केला.यामुळे गांधीजींचे ध्येय सफल होऊ लागल्याचे स्पष्ट होत होते.परिणामी

सर्वसामान्य माणूस सरकारी धोरणाविरोधी व आपल्या न्यायासाठी संघर्ष करण्यास तयार झाला. मीठ सत्याग्रहामुळे लोकांमध्ये धैर्य़ आत्मविश्वास वाढून जनशक्ती एकत्र येऊन पुढील स्वातंत्र्य चळवळीसाठी जनसमुदायाचे स्वरूप प्राप्त झालेले दिसून येते. राजकीय चळवळीच्या तुलनेने अस्पृश्यता निर्मूलन चळवळ तेवढी प्रभावी नव्हती. केवळ सहभोजन व ठरावीक व्यक्तींनी व कार्यकत्यानी एकमेकांच्या घरी जाणे-येणे ऐवढÎयापुरतेच मर्यादित होती. म. गांधीजींच्या आदेशाप्रमाणेच रायगड जिल्ह्यात काही प्रमाणात विधायक कार्य घडून आले. मीठ सत्याग्रहाच्या स्वरूपातच राजकीय स्वातंत्र्याची चळवळ विकसित होत होती. मीठ सत्याग्रहाची तीव्रता वाढत असतानाच पावसाळा सुरू झाल्याने मीठ सत्याग्रह बंद करून जंगल सत्याग्रह सुरू करण्याचा निर्णय म. गांधीजींनी घेतला.

सविनय कायदेभंग चळवळीचा दुसरा टप्पा म्हणजे जंगल सत्याग्रह होय. ब्रिटिश सरकारने ज्याज्या गोष्टींबद्दल अन्यायकारक कायदे केलेले होते ते-ते कायदे सत्याग्रहाच्या माध्यमातून मोडणे. त्याबद्दल होणारी शिक्षा आनंदाने भोगणे म्हणजेच सविनय कायदेभंग चळवळ होय. १९२७ मध्ये भारतीय वन कायदा मंजूर करण्यात आला. या कायद्यामध्ये अतिशय अन्यायकारक तरतुदी करण्यात आलेल्या होत्या. या तरतुदीमुळे जंगलाशी निगडित असलेल्या सामान्य लोकांचे उपजीविकेचे साधन नष्ट झाले. तसेच सामान्य जनतेवर अन्याय करणारा कायदा होता. त्यामुळे ब्रिटिश सरकारविरोधी सर्वसामान्य जनतेच्या मनामध्ये असंतोष खदखदत होता. याचा फायदा घेवून म. गांधीजींनी सविनय कायदेभंग चळवळीचे हत्यार उपसले. त्याचाच एक भाग म्हणून जंगल सत्याग्रह सुरू करण्याचा निर्णय घेतला. महाराष्ट्रात अनेक ठिकाणी मोठÎा प्रमाणात जंगल असल्याने महाराष्ट्र प्रांतिक कॉंग्रेस कमिटीने जंगल सत्याग्रहाचा निर्णय घेतला. या निर्णयाचे स्वागत करून रायगड जिल्ह्यामध्ये जंगल सत्याग्रह सुरू करण्यात आला. या जंगल सत्याग्रहाला रायगड जिल्ह्याने चांगला प्रतिसाद दिला. रायगड जिल्हा कॉंग्रेस व तालुका कॉंग्रेस कमिटी यांची संयुक्तपणे अलिबाग येथे १२ जुलै १९३० रोजी एक बैठक होऊन सत्याग्रह शिबिर घेण्यात आले. जंगल सत्याग्रहाचे नियोजऩ प्रसार भारतीय वन कायदा या संदर्भात मार्गदर्शन करण्यात आले. नियोजनाप्रमाणे जिल्ह्याच्या वेगवेगळÎा भागात जंगल सत्याग्रह घडून आले. यावेळी जिल्ह्यातील सामान्य जनता़ स्त्रिया यांनी मोठÎा संख्येने सहभाग दर्शविला.

पेण तालुका काँग्रेस कमिटीने जनार्दन केशव दामले यांच्या मार्गदर्शनाखाली जंगल सत्याग्रहाचे नियोजन केले. होराळे-आपटे-वावोशी येथे जंगलाच्या बंद भागात प्रवेश करून गवत कापणे व गुरांना जंगलात सोडणे या स्वरूपात जंगल सत्याग्रह करण्यात आला. झाडे तोडण्याचा वांधणवाडीचा जंगल सत्याग्रह गणू बाळू ठाकूर यांनी केला. झाडे तोडण्याचा वडगावचा जंगल सत्याग्रह शंकर ठोसर रघुनाथ सावंत यांनी केला. नाणेगाव येथे दोन वेळा जंगल सत्याग्रह करण्यात आला. अलिबाग तालुका काँग्रेस कमिटीने द. का. कुंटे यांच्या मार्गदर्शनानुसार रोहा तालुक्यात जंगल सत्याग्रह करण्याचा निर्णय झाला. तसेच रामभाऊ कामत मास्तरांच्या नेतृत्वाखाली चरीचा जंगल सत्याग्रह करण्यात आला. पनवेल तालुका काँग्रेस कमिटीने सत्याग्रह समितीची स्थापना करून विनायकराव गोविलकर यांची अध्यक्ष म्हणून निवड केली. तर समितीचे कार्यालय गोविंद पटवर्धनांच्या वाडÚात सुरू केले त्याला काँग्रेस हाऊस असे म्हणतात. जंगल सत्याग्रहाच्या प्रसाराचे व प्रचाराचे कार्य प्रभाकर गुप्तेंनी करून पनवेल-उरण तालुक्यात लोकजागृतीचे भरीव कार्य केले.

पनवेल तालुक्यातील कल्हे गावचा जंगल सत्याग्रह किसनराव आपटे यांच्या नेतृत्वाखाली शांततेने पार पडला. विष्णू महादेव सोमणने चावणेचा जंगल सत्याग्रह केला. विनायक वासुदेव चितळेंनी गाढे व वावंजेचा जंगल सत्याग्रह घडवून आला. पनवेल तालुक्यातील हजारो लोक जमा झाले होते. यशोदाबाई आपटे विमल गुप्ते या स्त्रियांप्रमाणेच पदÚा ठाकूर या आदिवासीने सत्याग्रहामध्ये सहभाग घेतल्याने सर्वसामान्य माणसापर्यंत स्वातंत्र्याची तीव्रता पसरलेली होती हे सिद्ध होते. चिरनेर गावात आक्कादेवीच्या डोंगरावर ८ १८ व २५ सप्टेंबर रोजी सत्याग्रह करण्यात आले. यामध्ये सर्वात महत्त्वाचा व देशभर गाजलेला जंगल सत्याग्रह म्हणजे २५ सप्टेंबरचा होय. या सत्याग्रहाच्या वेळी ब्रिटिश अधिकाऱ्याने गोळीबार केल्याने ९ देशभक्त हुतात्मे झाले. स्वातंत्र्य चळवळीतील या ९ देशभक्तांचे बलिदान रायगड जिल्ह्याच्या इतिहासातच नव्हे तर भारतीय इतिहासातही महत्त्वपूर्ण मानले गेले आहे. इंग्रजांना या देशातून हाकलून लावण्यासाठी कोणताही त्याग करण्याची तयारी भारतीय लोकांनी केलेली होती. हेच या सत्याग्रहाने दाखवून दिले होते. चिरनेर जंगल सत्याग्रहामुळे रायगड जिल्ह्याचे नाव सर्वातोमुखी झालेले आहे. प्रांत ऑफिसर श्री. कौंडिण्य आणि ठाणे जिल्ह्याचे डेप्युटी सुपरिंटेंड ऑफ पोलीस द्वारकानाथ शिवराम राजे यांनी गोळीबाराची चौकशी करून चिरनेर खटला तयार करून ४७ जणांवर आरोपपत्र दाखल

केले. जिल्हा काँग्रेस व महाराष्ट्र काँग्रेस यांनी बचावाची भूमिका घेऊन आरोपींना मुक्त करण्याचा प्रयत्न केला. सेशन कोर्ट ठाण्याचे न्यायाधीश सजाना यांनी या खटलाचा न्यायनिवाडा केला.

सविनय कायदेभंग चळवळ सुरू असतानाच ब्रिटिश सरकारने भारतीय स्वातंत्र्य व इतर प्रश्नासंदर्भात चर्चा करण्यासाठी लंडन येथे गोलमेज परिषदेचे आयोजन करण्यात आले. एकूण तीन परिषदा झाल्या. परंतु या परिषदेमध्ये सांप्रदायिक प्रश्न सुटू शकला नसल्याने म. गांधीजींनी परिषद अर्धवट सोडून परत भारतात आले. रॅम्से मॅकडोनाल्ड यांनी जातीय निवाडा जाहीर केल्यानेच त्याच्या विरोधात गांधीजींनी उपोषणाला प्रारंभ केला. शेवटी म. गांधी व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यात २५ सप्टेंबर १९३२ मध्ये पुणे करार झाला. तीन गोलमेज परिषदेच्या आधारे १९३४ मध्ये ब्रिटिश सरकारने श्वेतपत्रिका प्रसिद्ध केली. त्याच्या आधारे १९३५ चा कायदा जाहीर केला. जागतिक दुसरे महायुद्ध सुरू होऊन इंग्लंडचा सहभाग महत्त्वाचा होता. महायुद्धाच्या काळात इंग्लंडला अडचणीत न आणणे तसेच भारतीय लोकांची स्वातंत्र्याची मानसिकता शोधण्याच्या दृष्टीने म. गांधीजींनी वैयक्तिक सत्याग्रह चळवळीला सुरुवात केली. या चळवळीला रायगड जिल्ह्यातून मोठ्या प्रमाणात पाठिंबा मिळाला. रायगड जिल्ह्यातील पेण पनवेल अलिबाग उरण माणगाव, सुधागड या तालुक्यातून चळवळी मोठ्या प्रमाणात झालेल्या होत्या. प्रत्येकाने आपले राष्ट्रीय कर्तव्य पार पाडल्याचे दिसून येते. लोकांना स्वत:च्या हक्काची व स्वातंत्र्याची जाणीव झालेली होती. त्यामुळे सर्वत्र स्वातंत्र्याचे वातावरण निर्माण होऊ लागल्यानेच म. गांधीजींनी १९४२ मध्ये चले जाव ही चळवळ सुरू केली.

म. गांधीजींनी असहकार चळवळ सुरू केल्यापासून सतत २०-२२ वर्ष ब्रिटिशांच्या विरोधी शांतता व अहिंसेच्या मार्गाने स्वातंत्र्यलढा दिला. तरीपण आजूनही भारतीय स्वातंत्र्य दृष्टिपथात आलेले नव्हते. त्यामुळे म. गांधीजी ब्रिटिशांच्या विरोधी आक्रमक भूमिका घेऊ लागले होते. त्याचाच एक भाग म्हणजे १९४२ चे चले जाव आंदोलन होय. म. गांधीजींनी ब्रिटिशांच्या विरोधी निर्णायक लढा देण्याचे ठरविले. त्यामुळे काँग्रेसमध्ये मतभेद झाले. अखेर काँग्रेस कार्यकारिणीच्या वर्धा बैठकीत चले जावचा ठराव सर्वसंमतीने करण्यात आला. तसेच अखिल भारतीय काँग्रेसच्या मुंबई महाअधिवेशनात अंतिम निर्णय घेऊन छोडो भारत असा आदेश इंग्रजांना दिला. तसेच भारतीय जनतेला करेंगे या मरेंगे या निर्णायक भूमिकेतून इंग्रजांना या देशातून हाकलून देण्यासाठी सर्व भारतीयांनी या आंदोलनात सहभागी व्हावे असे आवाहन केले. या निर्णयाविरोधी ब्रिटिश

सरकारने आक्रमक भूमिका घेऊन ९ ऑगस्ट रोजी गांधींसह अनेक प्रमुख नेत्यांना अटक केली.प्रमुख नेत्यांना अटक झाल्याने देशातील लढाऊ काँग्रेसजनांनी व संघर्षात्सुक जनतेने ब्रिटिशांचे आव्हान स्वीकारून संपूर्ण भारतभर चले जाव आंदोलन उत्स्फुर्तपणे सुरू केले.अनेक जनतेने आपल्या मार्गाने स्वातंत्र्याच्या रणकुंडात उडी घेतलेली दिसते.रायगड जिल्हाही या चळवळीत सक्रिय झाला.१९४२ च्या चळवळीचे दोन पैलू म्हणजे गांधीवादी मार्गाची छोडो भारत चळवळ व समाजवाद्यांची भूमिगत चळवळ होय.

म.गांधीजींना अटक केल्याचे समजताच रायगड जिल्हा काँग्रेस कार्यकत्याची बैठक खेतवाडी—मुंबई येथे झाली.सरकारविरोधी गांधीवादी स्वरूपाच्या अहिंसात्मक व विध्वंसक मार्गाने आंदोलन सुरू करण्याचा निर्णय झाला.जिल्हा काँग्रेस व राष्ट्रसेवा दल यांनी हे आंदोलन ९ ऑगस्टपासून पनवेल़ पेण़ अलिबाग़ कर्जत़ महाड़ उरण या परिसरात सुरू केले.सभा़ मिरवणूक़ प्रभातफेरी़ राष्ट्रध्वज फडकविणे़ गांधीजयंती या मार्गाने आंदोलन सुरू केले.हे आंदोलन प्रामुख्याने विद्यार्थी व लहान मुले स्त्रिया तसेच सर्वसामान्य जनतेने सुरू केले होते.प्रमुख नेते काही अटक तर काहीजण भूमिगत झाले होते.त्यामुळे ही चळवळ नेतृत्वाविन सर्वसामान्य जनतेने चालविलेली होती.म.गांधीजींनी मूठभर लोकांच्या सहकार्याने सुरू केलेल्या स्वातंत्र्य चळवळीचा विस्तार होऊन विद्यार्थी, लहान मुले, स्त्रिया़ आदिवासी़ शेतकरी कामगाऱ कष्टकरी लोकांचापयतत चळवळ पोहोचली.त्यांच्या आक्रमक लढÝामुळेच इंग्रजांना भारत देश सोडावा लागला.

राष्ट्रीय काँग्रेसने आंदोलन सुरू करताच ब्रिटिश सरकारने काँग्रेसच्या नेत्यांना अटक केली.त्याच वेळी समाजवादी गटाने भूमिगत होऊन स्वातंत्र्याचे आंदोलन सुरू ठेवले.भूमिगत आंदोलनाने सरकारी प्रशासनामध्ये़ व्यवहारामध्ये़ दळणवळणामध्ये अडथळे निर्माण करणे़ घातपाती कारवाया करणे हे उपक्रम ठरविण्यात येऊन अलिबाग़ पनवेल़ महाड़ पेण इत्यादी ठिकाणच्या सरकारी कार्यालयावर हल्ले करण्यात आले.नाना पुरोहित यांच्या नेतृत्वाखाली किसान मोर्चाचे नियोजन करून महाडमध्ये समांतर सरकार स्थापन करण्याचा प्रयत्न केला. परंतु यावेळी ब्रिटिश अधिकाऱ्याने केलेल्या गोळीबारात पाच देशभक्त हुतात्मे झाले.या आंदोलनामध्ये घातपाती कारवाया म्हणजे दळणवळण व वाहतूक व्यवस्था व लाईटव्यवस्था उद्ध्वस्त करणे किंवा अडथळे निर्माण करण्याचा प्रयत्न केला.घातपाती कारवाया भाई विठ्ठलराव लक्ष्मण ऊर्फ भाई कोतवाल

यांच्या गटाने कर्जत-नेरळ विभागात मुंबईची लाईट बंद करण्याचा प्रयत्न केला. यावेळी झालेल्या गोळीबारामध्ये दोन देशप्रेमी हुतात्मे झाले.

सन १९४२ ची चले जाव ही चळवळ गांधीवादी व समाजवादी विचारप्रणालीची चळवळ होती. या चळवळीमध्ये मोठÎा संख्येने विद्यार्थी शेतकरी आदिवासी आणि हरिजन समाज सहभागी झालेला होता. सरकारी व्यवस्था व यंत्रणेमध्ये अडथळे निर्माण केल्यास इंग्रज हा देश सोडून जातील अशी भावना देशभक्त जनतेची होती. डोंगर दऱ्यामध्ये रहाणारे आदिवासी व समाजव्यवस्थेपासून गावकुशात राहणारा हरिजन समाज या चळवळीत सहभागी झालेला होता. यावरून स्वातंत्र्य चळवळीची व्याप्ती वाढत जाऊन ती सर्वसामान्याच्या झोपडीपर्यंत पोहोचलेली होती. रायगड जिल्ह्यातील आक्रमक चळवळीमुळे राष्ट्रीय चळवळ अधिकच बलशाली बनली.

ब्रिटिश राजवटीविरोधी गांधीजींनी 'करा अथवा मरा' चा आदेश देऊन चळवळीला सुरुवात केली. ही चळवळ सुरू असताना ब्रिटिश सरकारने चळवळ दडपण्याचा प्रयत्न केला. त्याबरोबरच भारतीयांच्या स्वातंत्र्याच्या भावना लक्षात घेऊन स्वातंत्र्य देण्याच्या दिशेने वाटचाल सुरू केली. हिंदू-मुसलमान यांच्यातील मतभेद मिटल्याशिवाय स्वातंत्र्य मिळणार नाही असे व्हॉइसरॉय लॉर्ड वेव्हेलने सांगितले. तेव्हा चक्रवर्ती राजगोपालाचारी यांनी म. गांधीजींच्या संमतीने बॅ. जीनांसमोर योजना मांडली. तिला सी. आर. फॉर्म्युला अथवा राजगोपालाचारी योजना म्हणतात. परंतु जीनानी त्यास नकार दिला. कारण हिंदुस्थानची फाळणी केलेली नव्हती. दुसऱ्या महायुद्धाचा शेवट झाल्यानंतर भारताच्या स्वातंत्र्यासंदर्भात मित्र राष्ट्रांनी चर्चिलवर दबाव आणला. तसेच इंग्लंडमध्ये आगामी निवडणुकीत मजूर पक्ष सत्तेवर आला तर आपल्या पक्षाची बदनामी होईल या भीतिपोटी भारतीयांसाठी योजना जाहीर केली. तिला वेव्हेल योजना म्हणतात. या योजनेनुसार नवीन राज्यघटना तयार करणे,जपानच्या युद्धात सहकार्य करावे अशी होती. वेव्हेल योजनेवर चर्चा करण्यासाठी सिमला संमेलन आयोजित करण्यात आले. कार्यकारी मंडळाच्या रचनेबाबत मतभेद झाल्याने संमेलन अपयशी ठरले.

इंग्लंडमध्ये ॲटलीच्या नेतृत्वाखाली मजूर पक्षाची सत्ता स्थापन झाली. ॲटलीने घोषणा केली की, भारताला लवकरच स्वातंत्र्य देण्यात येईल. त्याला सप्टेंबरची घोषणा म्हणतात. सर पेथिक लॉरेन्स, सर स्टॅफर्ड क्रिप्स, सर अलेक्झांडर या तीन कॅबिनेट मंत्र्याचे मिशन नियुक्त केले. त्याला कॅबिनेट मिशन योजना असे म्हणतात. त्यांनी देशातील ४७२ नेत्यांशी चर्चा करून योजना

जाहीर केली.ही योजना मुस्लिम लिगने मान्य केली.तर कॉंग्रेसने फेटाळली.त्रिमंत्री योजनेनुसार घटनासमितीची निवडणूक घेण्यात आली.त्यामध्ये २९२ पैकी २१२ कॉंग्रेस पक्षाला जागा मिळाल्या.कॉंग्रेसने हंगामी सरकार स्थापन केले.तर मुस्लीम लीगने पाकिस्तानच्या निर्मितीसाठी प्रत्यक्ष कृती दिन म्हणून १६ ऑगस्ट पाळण्यात आला.२ सप्टेंबर रोजी कॉंग्रेसने हंगामी सरकार स्थापन केल्याने मुस्लीम लीगने शोकदिन म्हणून तो दिवस पाळला. याच वेळी ॲटलीने जाहीर केले की, जून १९४८ पूर्वी ब्रिटिश सरकार हिंदुस्थानवरील आपली सत्ता सोडेल.भारताचा गर्व्हनर जनरल म्हणून लॉर्ड माऊंटबॅटन याची नियुक्ती करण्यात आली. त्याने कॉंग्रेस व मुस्लीम नेत्यांच्या बरोबर चर्चा करू एक योजना तयार केली.या योजनेला इंग्लंडच्या मंत्रिमंडळाकडून मान्यता देण्यात आली.लॉर्ड माऊनबॅटनने ती योजना ३ जून १९४७ रोजी जाहीर केली.त्यानुसार हिंदूस्थानचे विभाजन करून १५ ऑगस्ट १९४७ रोजी भारताला स्वातंत्र्य मिळाले.भारताचा तिरंगा ध्वज दिल्लीच्या लाल किल्ल्यावर डौलाने फडकू लागला.गांधीजींनी जे उदात्त स्वप्न डोळÝासमोर ठेवून स्वातंत्र्याची चळवळ सुरू केलेली होती त्यांचे आणि सर्व भारतीयांचे स्वातंत्र्याचे स्वप्न साकार झाले.

भारतीय स्वातंत्र्य चळवळीचा इतिहास अभ्यासत असताना असे दिसून येते की प्रारंभीच्या काळात स्वातंत्र्य चळवळ समाजातील श्रीमंत व पांढरपेशा मूठभर लोकांच्या हाती केंद्रित होऊन ती शहरापुरतीच मर्यादित होती.संपूर्ण देशाच्या तुलनेने महाराष्ट्र पंजाब बंगाल यासारख्या प्रांतांत जास्त प्रभावी व आक्रमक चळवळ होती.महाराष्ट्रात लो.टिळक व वि.दा.सावरकर यांनी राष्ट्रवाद व राष्ट्रप्रेम विचारांची पायाभरणी केली.त्यावरच म.गांधीजींनी स्वातंत्र्याची चळवळ उभी करून एखादया वृक्षाप्रमाणे तिचा विस्तार केला.लो.टिळकांच्या काळात देशाच्या स्वातंत्र्य चळवळीचे प्रमुख केंद्र पुणे बनलेले होते.त्यामुळे महाराष्ट्र हे देशाच्या राजकारणामध्ये आघाडीवर होते.

म.गांधीजींच्या नेतृत्वाखाली असहकार चळवळीच्या रूपाने स्वातंत्र्य चळवळीची सुरुवात झाली.स्वातंत्र्य चळवळीत मूठभर लोकांच्या बलिदानापेक्षा सर्वसामान्य जनतेचा सहभाग अतिशय महत्वाचा आहे असे गांधीजीनी जाहीर केल्याने दिवसेंदिवस चळवळीची व्याप्ती वाढत गेली. समाजातील धनिकापासून ते खेडÝातील जनता डोंगरदऱ्यामधील आदिवासी गावकुशाबाहेरील हरिजन समाज स्त्री विद्यार्थी इंग्रजांच्या विरोधी पेटून उठलेले होते.प्रत्येक घर जणू स्वातंत्र्य

चळवळीचे केंद्र बनलेले होते.प्रत्येक माणूस स्वातंत्र्य सैनिक बनलेला होता.म.गांधीजींच्या काळात राजकीय जागृती दिवसेंदिवस वाढत जाऊन स्वातंत्र्य चळवळ अतिशय गतिमान झाली.या चळवळीमध्ये रायगड जिल्हा सहभागी होऊन चळवळ अतिशय प्रभावी व आक्रमक स्वरूपाची झालेली होती.

म.गांधीजींनी पुकारलेल्या असहकार चळवऴ सविनय कायदेभंग चळवळ(मीठ सत्याग्रह़जंगल सत्याग्रह) वैयक्तिक सत्याग्रह आणि चले जाव चळवळ त्याबरोबरच विधायक व संघर्षात्मक कार्यक्रमात रायगड जिल्ह्यातील जनता मोठ्या हिमंतीने व आक्रमकतेने सक्रिय सहभागी झालेली होती.विशेष म्हणजे व्यापारी़ शेठजी़ दुकानदाऱ जमीनदार या वर्गाने स्वातंत्र्य चळवळीसाठी आर्थिक मदत मोठ्या प्रमाणात केली.तसेच स्त्रिया़ आदिवासी़ हरिजन समाज़ विद्यार्थी आणि सामान्य जनता यांचा सहभागही वाढत होता.त्यामुळे चळवळीचा विस्तार होऊन चळवळीला जनसमुदायाचे स्वरूप प्राप्त झालेले दिसून येते.ही गांधी युगातील स्वातंत्र्य चळवळीचे यशश्रुती होय.गांधीजींच्या नेतृत्वाखाली भारतीय स्वातंत्र्य चळवळीला रायगड जिल्ह्यातील चळवळीने भक्कम ताकद दिल्याचे दिसून येते.स्वातंत्र्य चळवळीत रायगड जिल्ह्याचे योगदान अतिशय मोठे असूनही त्याचा इतिहास क्रमवार लिहिला गेला नाही.त्या दृष्टीने माझे हे प्रबंधलेखन आहे.

## शिफारशी

रायगड जिल्हाचा व स्वातंत्र्य चळवळीचा अभ्यास शोधप्रबंधामध्ये करण्यात आलेला आहे.अभ्यास केल्यानंतर विविधबाबी संर्दभात पुढीलप्रमाणे शिफारशी करत आहे.

१)रायगड जिल्ह्याचा सांस्कृतीक अभ्यास स्वतंत्रपणे करण्यात यावा.

२)रायगड जिल्ह्यासाठी जलसिंचन योजना अंमलात आणावी.

३)रायगड जिल्ह्याच्या स्वातंत्र्य चळवळीतील स्त्रियांच्या कार्याचा सखोल अभ्यास करण्यात यावा.

४)रायगड जिल्ह्याच्या स्वातंत्र्य चळवळीतील दलितवर्गाच्या भुमिकेचा विचार करावा.

५)रायगड जिल्ह्याच्या स्वातंत्र्य चळवळीतील आदिवासी समाज्याचे योगदान शोधावे.

६)रायगड जिल्ह्यातील संस्थानिकांचा स्वातंत्र्य चळवळीतील सहभागा विचार करावा.

## संदर्भ साधने

१)दाते प.रा.: पेण तालुका-स्वातंत्र्य संग्राम: दाते प्रकाशन् पेण. १९७२

२) गुप्ते प्रभाकर: पनवेलचा मीठ सत्याग्रह: अप्रकाशित हस्तलिखित

३)आचार्य केळकर श्रीपाद: असहाराचे आंदोलन: कॉन्टिनेन्टल प्रकाशन् पुणे.२००३

४)पाटील प्रभाकर: कथा एका संघर्षाची: नागेश पब्लिशर्स् वेश्वी-अलिबाग. १९९४

५)लिमये ग.र.: पेण तालुक्यातील सत्याग्रहाचा इतिहास: अप्रकाशित हस्तलिखित्

६)पाटील वसंत भाऊ: चिरनेर जंगल सत्याग्रह: मयूर प्रकाशन चिरनेर् १९९८

७) गोडबोले द.श.: अलिबाग तालुक्यातील राजकीय आंदोलनातील वाटचाल: अप्रकाशित

८)गांधी शंकरभाई गोपीनाथ: माणगाव तालुक्यातील चळवळीचे ऐतिहासिक वृत्त: अप्रकाशित

९)रहाळकर दत्ता:चिरनेर सत्याग्रह आणि उरणचा स्वातंत्र्य संग्राम: झुंज प्रकाशन्उरण

१०)पाटील वसंत भाऊ: चिरनेर जंगल सत्याग्रह: मयुरी प्रकाशन् चिरनेर.१९९८

११)गोडबोले द.श.:अलिबाग तालुक्यातील राजकीय आंदोलने:अप्रकाशित हस्तलिखित

१२)केळकर श्रीपाद: छोडो भारत १९४२: कॉन्टिनेन्टल प्रकाशन् पुणे.२००३

१३)फडके य.दि.: विसाव्या शतकातील महाराष्ट्र खंड-५: श्री विद्या प्रकाशन् पुणे

१४)स्वातंत्र्य सैनिक गोपीनाथ काशीनाथ पाटील पेण यांची मुलाखत .

१५)श्रीवास्तव रामलाल: हुतात्मा कोतवाल स्वातंत्र्य समरातील एक पर्व: कोतवालवाडी प्रकाशन् नेरळ १९९७

# परिशिष्टे

१) १९०८ मधील नाशिक कटातील स्वातंत्र्य सैनिक

२) रायगड जिल्हयाच्या स्वातंत्र्य चळवळीतील हुतात्मे

३) स्वातंत्र्य चळवळीतील स्त्रियांचा सहभाग

४) स्वातंत्र्य चळवळीतील आदिवासींचा सहभाग

५) स्वातंत्र्य सैनिकांचे मानपत्र

१) राज्य शासन

२) केंद्र शासन

६) स्वातंत्र्य सैनिकांचे पत्र

१) नाना काणे

२) श्रीकांत पांडुरंग काणेकर

७) प्रश्नावली नमुना

# परिशिष्ट:- १

## सन १९०८ मधील नाशिक कटातील स्वातंत्र्य सैनिक

| | |
|---|---|
| श्री. त्र्यंबक गंगाधर मराठे | श्री. विनायक पांडुरंग कोल्हटकर |
| श्री. गोविंद सदाशिव बापट | श्री. शंकर वासुदेव गोडबोले |

श्री. बाळकृष्ण शंकर करंदीकर

श्री. त्र्यंबक विनायक जोग

श्री. नारायण सदाशिव सावंत

श्री. अनंत रामचंद्र जोशी

श्री. सदाशिव लक्ष्मण देव

श्री. रामचंद्र नारायण मंडलीक

श्री. बगाराम त्र्यंबक जोशी

श्री. बळवंत चिंतामण दातार

श्री. कृष्णाजी जनार्दन घांगरेकर

श्री. भास्कर कृ. वडखळकर

श्री. दामोदर कृष्ण कणेकर

श्री. गणेश पांडुरंग लोंढे

श्री. जनार्दन केशव दामले

श्री. गंगाधर रामचंद्र रानडे

श्री. विठ्ठल सखाराम मराठे

श्री. रंगो वामन लिमये

श्री. पुरुषोत्तम वामन गोखले

श्री.दामोदर आत्माराम मोकाशी

श्री. रामकृष्ण विष्णू जोशी

श्री. रघुनाथ का. पाटणकर

श्री. अनंत विश्वनाथ जोग

श्री.अनंत विश्वनाथ टिळक

श्री.गणेश वा.काळे

श्री.वासुदेवशास्त्री कृ. नातु

श्री.कृष्णाजी पांडुरंग साठे

श्री.गणपत विष्णू घागरेकर

श्री.गोविंद भिकाजी लिमये

श्री.विनायक वि. दिघे

श्री.महादेव रामचंद्र दाते

श्री.गणेश सखाराम आगाशे

श्री.शिवराम कृष्ण वैद्य

श्री.गोपाळ पांडुरंग साठे

श्री.रंगो रावजी टिळक

श्री.गोपाळ शंभुराव भावे

श्री. बापुजी आत्माराम मोकाशी

# परिशिष्टः – २

## रायगड जिल्ह्यातील स्वातंत्र्य चळवळीतील हुतात्मे

| क्र. | हुतात्म्यांची नावे | जन्म गाव | दिनांक | बलिदानाचे ठिकाण |
|---|---|---|---|---|

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १ | वासुदेव बळवंत फडके | शिरढोण | १७ फेब्रुवारी १८८३ | एडन |
| २ | विनायक पांडुरंग कोल्हटकर | पेण | १३ एप्रिल १९१० | पेण |
| ३ | नाग्या महादू कातकरी | चिरनेर | २५ सप्टेंबर १९३० | चिरनेर |
| ४ | रामा बामा कोळी | मोठी जुई | २५ सप्टेंबर १९३० | चिरनेर |
| ५ | हसुराम बुधाजी घरत | खोपटे | २५ सप्टेंबर १९३० | चिरनेर |
| ६ | धाकू गवत्या फोफेरकर | चिरनेर | २५ सप्टेंबर १९३० | चिरनेर |
| ७ | आनंद माया पाटील | धाकटी जुई | २५ सप्टेंबर १९३० | चिरनेर |
| ८ | परशुराम रामा पाटील | पाणदिवे (पिरकोन) | २५ सप्टेंबर १९३० | चिरनेर |
| ९ | आलू बेमटÝा म्हात्रे | दिघोडे | २५ सप्टेंबर १९३० | चिरनेर |
| १० | रघुनाथ मोरेश्वर शिंदे (न्हावी) | कोप्रोली | २५ सप्टेंबर १९३० | चिरनेर |
| ११ | वसंत बळवंत दाते | पुणे | १० सप्टेंबर १९४२ | महाड |
| १२ | कमलाकर विठ्ठल दांडेकर | नडगाव | १० सप्टेंबर १९४२ | महाड |
| १३ | अर्जुन कानू भोई | बिरवाडी | १० सप्टेंबर १९४२ | महाड |
| १४ | केशव बळवंत सावंत | महाड | १० सप्टेंबर १९४२ | महाड |
| १५ | नथू दौलता टेकावले | शेलटोली | १० सप्टेंबर १९४२ | महाड |
| १६ | विठ्ठल बिरवडकर | बिरवाडी | १० सप्टेंबर १९४२ | महाड |
| १७ | विठ्ठल लक्ष्मण कोतवाल | मानिवली माथेरान | २ जानेवारी १९४३ | सिद्धगड |
| १८ | हिराजी गोमाजी पाटील | मानिवली माथेरान | २ जानेवारी १९४३ | सिद्धगड |
| १९ | भास्कर शंकर पिंपळे | मानिवली माथेरान | २ जानेवारी १९४३ | सिद्धगड |

# परिशिष्ठ :– ३

## स्वातंत्र्य चळवळीतील स्त्रिया

### अ)सविनय कायदेभंग चळवळ (मीठ, जंगल सत्याग्रह व गांधी कार्यक्रम)

१)यमुबाई मुकूंद लिमये २) सौ.सरस्वतीबाई विनायक लिमये ३) विमल केशव गुप्ते ४)श्रीमती भागीरथी वैजनाथ पटवर्धन ५)लीला मनोहर ६) सुमन शिरवटकर ७) अंबू दामले ८) सोना बेंद्रे ९) बायाजी बेंद्रे १०) स्नेहा बेंद्रे ११) मंदा आपटे १२) चंद्रबाई नारंगीकर १३) आंबीबाई मोकल १४) गोमीबाई पाटील १५) बामीबाई म्हात्रे १६) काशीबाई मोकल १७) मालती कर्वे १८) सरस्वतीबाई उपाध्ये १९) दयाबाई ढवण.

## ब)१९४२ च्या चले जाव चळवळीतील सहभाग

१) दुर्गाबाई मुकुंद लिमये २) लीला विनायक मनोहर ३) कुसूम लिमये ४) श्रीमती लक्ष्मीबाई कृष्णा भागवत ५) इंदिराबाई रघुनाथ फडके ६) मालतीबाई दत्तात्रेय दोंदे ७) सुशिलाबाई विनायक फडके ८) सुलोचनाबाई फडके ९) रमाबाई बापट १०) सुंदर डारूर ११) सुलोचना अधिकारी १२) तारा कोर्लेकर १३) रूक्मिणी वाजेकर १४) तारा वाजेकर १५) उमाबाई जानकू ठाकूर १६) रेणूबाई रघुनाथ पाटील १७) सुलोचना बाबूराव पानसरे १८) पदमा कमळ्या म्हात्रे १९) शांता मेहता २०) चंदा बुटाला २१) यमुना मुडाळा (गुजर) २२) स्नेहलताबाई शेठ २३) यमुताई बुटाला २४) विटाबाई भिसे २५) काशीबाई भिसे २६) बायाबाई बोवडे २७) काशिवाई भालेकर २८) द्रौपदी जाधव २९) लक्ष्मीबाई खोतळ ३०) मुक्ताबाई तटकरे ३१) जामकोबाई तटकरे ३२) बबी भालेकर ३३) राधा टेकावले ३४) सुंदराबाई उंबरकर.

# परिशिष्ठ :– ४

## स्वातंत्र्य चळवळीतील आदिवासींचा सहभाग

| | | |
|---|---|---|
| १) नाम्या कातकरी | – | पोयंजे येथे झेंडा फडकविला – १९३२ |
| २) पधा ठाकू र | – | गाढे येथील जंगल सत्याग्रहात सहभागी |
| ३) नाग्या कातकरी | – | चिरनेर जंगल सत्याग्रह |
| ४) विश्राम कातकरी | – | महाड सत्याग्रह १९४२ |
| ५) इका पुतळŸा कातकरी | – | १९४२ लढा – भाई कोतवाल गट |
| ६) नागो ऊर्फ पांडू रामा कातकरी | – | १९४२ लढा – भाई कोतवाल गट |
| ७)वाल्या रामा कातकरी | – | १९४२ लढा – भाई कोतवाल गट |
| ८)हुमगावचे धोंडŸा लाक्या कातकरी | – | १९४२ लढा – भाई कोतवाल गट |
| ९)हुमगावचे रामा मन्या कातकरी | – | १९४२ लढा – भाई कोतवाल गट |
| १०)हुमगावचे लक्ष्या मन्या कातकरी | – | १९४२ लढा – भाई कोतवाल गट |
| ११) हुमगावचे रूपा मन्या कातकरी | – | १९४२ लढा – भाई कोतवाल गट |

# परिशिष्ट – ५

## स्वातंत्र्य सैनिकांचे मानपत्र:- १

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन

## सन्मान पत्र


श्री. *गोपीचंद काशिनाथ पाटील, रा. पेण* यांना त्यांनी भारतीय स्वातंत्र्य संग्रामांत केलेल्या कामगिरीच्या गौरवार्थ हे सन्मानपत्र देण्यांत येत आहे.

*वसंत नाईक*

सचिवालय
मुंबई.
दिनांक १३-४-१९६७.

मुख्य मंत्री
महाराष्ट्र राज्य


स्वातंत्र्य सैनिकांचे मानपत्र:- २


"वीर स्वातंत्र्यसेनानी" ★
सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
सन्मान पत्र
श्री. [illegible] यांना
त्यांनी भारतीय स्वातंत्र्य संग्रामांत केलेल्या कामगिरीच्या गौरवार्थ हे सन्मानपत्र देण्यांत येत आहे.
सचिवालय
मुंबई.
मुख्य मंत्री
महाराष्ट्र राज्य

परिशिष्ट: – ६

स्वातंत्र्य सैनिकांचे पत्र :- १) नाना काणे

नानांचें हस्ताक्षर—



स्वातंत्र्य सैनिकांचे पत्र:- २) श्रीकांत पांडुरंग काणेकर

३१०.

**श्रीकांत पांडुरंग कणेकर**
स्वातंत्र्य सैनिक
विशेष कार्यकारी दंडाधिकारी
अध्यक्ष, जनता पार्टी, ठाणे शहर.

बी/५, शांतिनिकेतन सोसायटी
कोपरी–ठाणे (पूर्व)
ठाणे–४०० ६०३

URAN

दिनांक ३१-७-९२

श्रीयुत प्रभाकर कुंडे
सप्रेम नमस्कार वि. वि.
(9) आपले 'कामस्थ' प्रभु समाचार मधील प्रकट आवाहनानुसार पत्र वाचले व त्या अनुषंगाने हे पत्र पाठवीत आहे. आपण चिरनेर जंगल सत्याग्रहाच्या पार्श्वभूमीवर पुस्तक प्रकाशित करीत आहात व हयात जन जागरणाचे कार्याबद्दल प्रतिबिंब त्यांत उमटणार आहेत त्या दृष्टीने मी माझे कार्याबद्दल लिहित आहे.

माझे बालपण शिक्षण व यथाशक्ति समाजकार्य हे उरण मध्ये झाले आहे, पण माझा जन्म वाडा (ठाणे) येथे दिनांक ६ ऑगस्ट १९१६ साली झाला आहे. मी १९३८-३९ पासून प्रत्यक्ष काँग्रेस कार्यात भाग घेऊ लागलो. घरोघरी जाऊन खादी विक्री करणे हे काम प्रथम सुरु केले. वैयक्तिक सत्याग्रहात भाग घेण्यास मला परवानगी मिळाली नाही कारण त्यावेळी माझ्याकडे पक्षसंघटनेचे काम होते. मी माझे नाव नोंदविले होते. चिरनेर जंगल सत्याग्रहाचे वेळी मी उरण शाळेत होतो. त्या काळात देशभक्तीची लाट आली व त्याचे परिणाम सर्व ठिकाणी झाले. उरण शहरावर त्याचा परिणाम झाला. उरण शाळेवर झेंडा (काँग्रेसचा) चढविण्याच्या दृष्टीने हालचाल झाली त्यासाठी एक एक पैसा जमा करण्यात आला होता. वर्गात चौकशी केली असता मी तो पैसा दिला असल्याचे सांगितले व या आठवणी संबंधी एक लेख 'सामना' ठाणे मध्ये प्रसिद्ध झाला आहे. उरण मध्ये अशा प्रकारे चिरनेरमुळे कार्य स्फूर्ती मिळाली हे खरे आहे.

माझे कार्याला जोडी मिळाली ती १९४२चे वेळी. ९ ऑगस्ट रोजी मी माझी डेप्युटेशन मिलची नोकरी सोडली व आंदोलनात सामील झालो. त्यादिवशी मार्गावरील सर्व कारखाने बंद करून [illegible] प्रवेश केल्यामुळे अश्रुधुराचा प्रसाद मिळाला. हरताळ होणे, दुकाने बंद करण्याची मोहिम असे जे कार्यक्रम होते त्यांत मी माझे मित्रांबरोबर असे. ठाणे येथे हे कार्यक्रम उग्र स्वरूप घेऊ लागले. गोळीबार होणे.

मी गोळीबाराचे अगदी पास असे हे माझे मोठे बंधू यांनी ऐकल्यावर आल्यामुळे त्यांनी माझी उचल बांगडी करून उरणला पाठविले. मी गोळीबारात बळी पडू नये हाच उद्देश. उरणला गेल्यावर बुलेटीनचे काम सुरू केले. गांधीजयंतीचे दिवशी बुलेटीन वाटण्यात आले. सभा झाली व मिरवणूकीने चालले असता तिला अडवून पोलीसांनी अटक केली. त्यांत सर्व प्रथमवर्ग केसेस नोंदवली त्यातच माझा नंबर लागला. परवडा जेल मध्ये दोन महिने सजा भोगून बाहेर आल्यावर भूमिगत कार्य केले. त्या कार्याचा एक प्रकार असा की उरण डिक बंगल्यास आग लावणे. हा प्रयत्न अयशस्वी झाला पण त्याचा दबदबा फारच झाला. हे भूमिगत कार्य मी व माझा मित्र डॉ. दत्ता नाडकर यांनी केले. डॉ. लेले भाई अभ्यंकर सरवैया यांचे सांगण्यावरून आम्ही हे केले. मी व माझे सहकारी डॉ. दत्ता नाडकर यांनी डिसेंबर १९४२ मध्ये केले. आग २०-२५ मिनीटाने लागावी अशी व्यवस्था करून आम्ही स्वतः उरणला. वेळ रात्रीची होती. आमचे कामाचा आग लागण्याचा पण सोसाट्याचे वाऱ्यामुळे साखर युक्त पोटॅशियम क्लोरेट व सल्फ्युरिक ॲसिड यांच्या संबंधाने २०-२५ मिनीटांत आग लागली नाही. ते विझत गेले. आमचा हा प्रयत्न यशस्वी न झाल्यामुळे आमचे हाताला मिस्तुल पडले नाही. व त्यानंतर माथेरान डोंगरांतील भूमिगत कार्य डॉ. भाई कोतवाल व हिराजी पाटील यांचा मृत्यू झाल्यामुळे संपुष्टात आले. आम्ही त्या दिवशी रात्री पूर्ण वेळ चालत होतो. उरणला पनवेल हा मार्ग आम्ही रात्री सहा तास चालून पनवेल गाठले. एक नमुना म्हणून हे निवेदन केले आहे.

आमचे भूमिगत कार्य दादर-मुंबई येथे चालू होते. त्यांत माझे सहकारी दत्ता नाडकर, गजानन दिक्षित, नंतरचे कम्युनिस्ट पुढारी कै. कृष्णा देसाई वगैरे सहकारी असत. दुकाने, सरकारी पोस्ट ऑफिसेस यांचेवर लोकांचे हल्ले यशस्वी झाले त्यांत छोटे हँड बॉम्ब वापरण्यात आले. अशा प्रकारे आमचे भूमिगत कार्य चालू होते पण पुढे आंदोलन शांत झाल्यामुळे आम्ही

**श्रीकांत पांडुरंग कणेकर**
स्वातंत्र्य सैनिक
विशेष कार्यकारी दंडाधिकारी
अध्यक्ष, जनता पार्टी, ठाणे शहर.

बी/५, शांतिनिकेतन सोसायटी
कोपरी-ठाणे (पूर्व)
ठाणे-४०० ६०३

दिनांक [illegible]

आंदोलनाच्या पोटाचे व्यवस्थेला लागलो.

मी डेव्हीड मिल्स मध्ये कपड्याचे सांचेवाला म्हणून काम केले असल्यामुळे मला कोहिनूर मिल्स मध्ये सांचेवाल्याचे काम मिळाले व पुढे मी तेथेच कारकून झालो. १९५६ला कॉंग्रेस अंतर्गत लढ्याचे दृष्टीने कामाला लागलो व त्यांत मी सामील झालो. कोहिनूर मिल्स मधील उत्तम नोकरी सोडून मी पूर्णवेळ कार्यासाठी उरणला परत ~~आलो~~ गेलो. त्या काळांत म्हणजेच १९५९ मध्ये कोकणांत कामगार शेतकरी यांना संघटनेच्या कामाला लागलो. मोबदला भरपूर असल्यामुळे हे संघटनेचे काम चांगल्या प्रकारे करता आले. कामगार शेतकऱ्यांत जागृती निर्माण केली व त्याचा परिणाम म्हणून प्रथमच ग्राईंडवेल कारखान्यातील कामगारांची युनियन स्थापन करण्याचा व त्या युनियनचा अध्यक्ष होण्याचा योग आला. युनियन ~~[illegible]~~ संप यशस्वी करून त्यांचे पगारांत प्रत्येकी रु. ५०/- ची वाढ मिळवून देऊन उरण मध्ये कामगार शेतकऱ्यांत विश्वास निर्माण केला. पुढे तर भारत टेक्सटाईल्स, उरण म्युनिसिपल कामगार युनियन्स इत्यादी स्थापन केल्या, त्याच प्रमाणे मिठागार कामगार युनियन पण स्थापन केली. मिठागार कामगारांच्या प्रश्नाला हात घालणे म्हणजे एक धोकाच होता पण कै. लहू शेठ भरत, खोपटे यांच्या मदतीने मिठागार कामगार युनियन स्थापन केली. २३ जानेवारी १९५८ रोजी उरण येथे ही संघटना स्थापन केली. पुढे या मिठागार कामगारांचे नेतृत्व कै. श्री तुकाराम हरी वाजेकर शेट यांनी घेऊन व त्यांचेकडे पूर्ण लक्ष देऊन मिठागार कामगार चळवळ यशस्वी करण्याचा मान मिळविला. कामगारांची परिस्थिती त्यामुळे सुधारली.

त्या काळांत कामगार-शेतकरी संघटना करण्यांत आल्यामुळे शेतकऱ्यांच्या हिताचे कॉंग्रेसने पास करून घेतलेले दोन महत्वाचे कायदे - कुळकायदा व कर्ज निवारण कायदा - यांचा फायदा शेतकऱ्यांना मिळवून देण्यास यश मिळविता आले. उरण तालुक्यांतील ६४ गावांत जाऊन या दोन कायद्यांची माहिती व त्याचे फायदे त्यांना सांगून त्यांच्या कार्याला आवश्यक ते

(४)

अर्ज (फॉर्म्स) करून त्यांना त्यांचे फायदे मिळवून देतो. हे सर्व काम विनामूल्य करण्यात आले. मी कॉँग्रेस सेवक म्हणून ते काम करीत असे. कर्ज निवारण कायद्या प्रमाणे ३४५ जणांना १५० शेतकरी-मजुरांच्या जमिनी त्यांना परत मिळवून देता आल्या. हा केवढा मोठा फायदा शेतकऱ्यांना मिळवून देता आला, यामुळे मी कामगार शेतकऱ्यांत प्रिय ठरलो पण त्यामुळे माझा सावकार वर्गाचा रोष पत्करावा लागला. गरसरकार येथील तो प्रसंग माझ्या स्मरणात कायम आहे. माझ्या स्वतःवर मी परत फिरण्याचे वेळी माझा तेथील शेतकऱ्यांचे मुलांनी आंबवीत व त्यांनी मला सोबत केली पनवेल-उरण मार्गावर सोडले. त्यामुळे चालू प्रचारामुळे - कुळ कायदा व कर्ज निवारण कायदा - सावकारी पद्धती लोकांच्या पोटात गोळा उठला आहे, म्हणून ही सोबत असे सांगितले. उरण येथील हिंदु-मुसलमान दंगल प्रसंगी माझा आर्थिक हानी होती. मी स्वातंत्र्य सैनिक आहे.

वरील मजकूर लिहित असताना एक दोन व्यक्तींचा नामनिर्देश मी करू इच्छितो: कै. भार्गव वामन कोल्हेकर (काका कोल्हेकर) यांनी त्यांचे मालकीचे मंदिर हरिजनांसाठी १९३४/३१ साली खुले केले. त्यांचे कार्य हालचालींचा परिणाम कसा जनतेवर झाला याबद्दल माझे प्रकाशनात ते दृष्टीस पडेल.

श्री. लेलूभाई ओधवजी सरवैया यांच्या बद्दल पण त्या लेखात लिहित आहेत लेख सोबत पाठवीत आहे.

कै. तुकाराम हरी वाजेकर यांचे त्यांचे समाजासाठी केलेल्या कार्याची माहिती आपणास मिळालीच असेल मी लेखांत त्यांचा पर्यंत
उल्लेख आहे. असो.

मी पाठवीत असलेला माहितीवजा लेखाचा आपणास थोडा तरी उपयोग होईल असा विश्वास बाळगतो. असो. कळावे.

आपला स्नेहांकित
शि. भा. कोळेकर

# परिशिष्ट – ७
## प्रश्नावली

ठिकाण :

दिनांक : / /

१) स्वातंत्र्य सैनिकाचे नाव : ------------------------------------------------------------

२) जन्म दिनांक : ____________ जन्म ठिकाण : --------------------

३) संपूर्ण पत्ता : ------------------------------------------------------------

------------------------------------------------------------

४) स्वातंत्र्य आंदोलनाच्या काळाता कोणत्या पक्षाचे कार्य करत होता :

५) आंदोलनाच्या काळात जनजागृतीसाठी केलेले कार्य व त्याचे स्वरूप :

६) स्वातंत्र्य चळवळीच्या काळातील कामगिरीचे स्वरूप :

७) झालेल्या शिक्षेचे स्वरूप : ------------------------------------------------------------

------------------------------------------------------------

८) केंद्र व राज्य शासनाकडून झालेला गौरव : ------------------------------------------------------------

९) लोकांकडून व इतर संस्थाकडून झालेला गौरव : ------------------------------------------------------------

------------------------------------------------------------

१०) इतर अन्य प्रकरचे केलेले कार्य :------------------------------------------------------------

------------------------------------------------------------

११) स्वातंत्र्य सैनिकांच्या नजिकच्या वारसाचे नाव व पत्ता :

------------------------------------------------------------

------------------------------------------------------------

------------------------------------------------------------

मुलाखतकर्त्याची सही व नाव

मुलाखत देणाऱ्याची सही

# संदर्भ साधने

- **<u>प्राथमिक साधने</u> :**
  - **अप्रकाशित <u>साधने</u>**
    - अप्रकाशित हस्तलिखिते :
    - स्वातंत्र्य सैनिकांची पत्रे:
    - स्वातंत्र्य सैनिकांच्या मुलाखती:
    - सरकारी पत्रे व रिपोर्ट:
    - समकालीन वृत्तपत्र:
  - **प्रकाशित साधने :**
    - ✓ गॅझेटिअर :
    - ✓ स्मरणिका:
    - ✓ स्वातंत्र्य सैनिकांचे लेखन:
- **<u>दुय्यम साधने</u> :**

# <u>प्राथमिक साधने</u>

## अ)अप्रकाशित हस्तलिखिते:

१)गोडबोले द.श : अलिबाग तालुक्यातील राजकीय आंदोलनातील वाटचाल

२)गुप्ते प्रभाकर : पनवेलचा मिठाचा सत्याग्रह

३)गुप्ते प्रभाकर केशव : चिरनेर जंगल सत्याग्रह

४)गांधी शंकरभाई गोपीनाथ : माणगाव तालुक्यातील चळवळीचे ऐतिहासिक वृत्त

५)गांधी शंकरभाई गोपीनाथ : महाड तालुक्यातील स्वातंत्र्यलढयातील ऐतिहासिक कार्याचा त्रोटक वृत्तान्त

६)गांधी शंकरभाई : पोलादपूर तालुक्यातील स्वातंत्र्यलढयातील कामगिरी

७)गांधी शंकरभाई : कर्जत तालुक्यातील ऐतिहासिक चळवळ

८)फडके वि.कृ. : पेण तालुक्यातील क्रांतिकारक

९)भगत अलोजी नाना : सत्याग्रहाचा खटला

१०)मोकाशी शं.पा.: शपथ तुला रायगडच्या राजबंदीची म्हणजेच महाडचा स्वातंत्र्य संग्राम

११)लिमये गणेश रघुनाथ : पेण तालुक्यातील राजकीय इतिहास

## स्वातंत्र्य सैनिकांची पत्रे:

| | |
|---|---|
| १)रामदास नामदेव पाटील यांचे पत्र | २५ मे १९८२ |
| २)मोकाशी नारायण दामोदर यांचे पत्र | ७ जुलै १९८२ |
| ३)फोफेरकर पांडुरंग कुशा.यांचे पत्र | ९ जुलै १९८२ |
| ४)काणेकर श्रीकांत पांडुरंग यांचे पत्र | ११ जुलै १९८२ |
| ५)ठाकूर धर्माजी बुधाजी यांचे पत्र | १५ जुलै १९८२ |
| ६)ठाकूर धर्माजी बुधाजी यांचे पत्र | १५ जुलै १९८२ |
| ७)बेडेकर नानासाहेब यांचे पत्र | २५ जुलै १९८२ |
| ८)साष्टे अ.मो.यांचे पत्र | २७ जुलै १९८२ |
| ९)मोकाशी श.पा.यांचे पत्र | ११ ऑगस्ट १९८२ |

**स्वातंत्र्य सैनिकांच्या मुलाखती:**

१)स्वातंत्र्य सैनिक शहा हिरालाल हेमचंद्र

२)स्वातंत्र्य सैनिक दोंदे रामचंद्र दत्तात्रय

३)स्वातंत्र्य सैनिक पाटील गोपीनाथ काशीनाथ

४)स्वातंत्र्य सेनानी भगत ना.का.महाड

५)स्वातंत्र्य सैनिक लिमये केशव गोविंद

६)स्वातंत्र्य सेनानी मेकडे नारायणराव तळा

७)स्वातंत्र्य सैनिक मेहता मनोहर काशीनाथ

८)स्वातंत्र्य सेनानी लंकेश्वरी रघुनाथ गंगाराम उर्फ भाई लंकेश्वरी नाते महाड

९)स्वातंत्र्य सेनानी शहा अमृतभाई माणिकचंद शेठ गोरेगाव

१०)स्वातंत्र्य सैनिक कोठारी मामा पेण

११) स्वातंत्र्य सैनिकखानविलकर दत्ता

**सरकारी पत्रे व रिपोर्ट:**

१)रिचर्ड टेंपलचे लॉर्ड लिटनला पत्र - ३ जुलै १८७९

२)कुलाबा जिल्हाधिकाऱ्याचे मध्यवर्ती महसूल विभागाच्या आयुक्तास पत्र -१५जुलै १८९७

३)कृति आराखडा रायगड जिल्हा उद्योग केंद्र.१९९०

४)पीक संरक्षण मार्गदर्शिका.कृषी संचालनालय पुणे.१९८१

५)बॉम्बे पोलीस अॅबस्ट्रॅक्ट ऑफ इन्टेलिजन्स - ९ नो १८९६ परि.१५६७

६)महाराष्ट्राचे जिल्हे कुलाबा.प्रसिध्दी विभाग महाराष्ट्र सरकार. मुंबई. १९६०

७)महाराष्ट्राचे जिल्हे कुलाबा.प्रसिध्दी विभाग महाराष्ट्र सरकार मुंबई.१९६०

८)रायगड प्रादेशिक योजना वाहतुक व दळणवळण . मार्च १९८९

९)रायगड जिल्हा स्वातंत्र्य सैनिक पेन्शन योजना अहवाल

१०)रेव्हेन्यू डिपार्टमेंट (आर.डी.)व्हॉल्यूम क्र. :

१)२९० /१८८६
२)२७३ /१८८८
३)२९० /१९२४
४)१२२ /१९७७

११) स्वातंत्र्य सैनिक चरित्र कोश खंड - २

१२)सेंकड रिव्हीजन सेटलमेंट रिपोर्ट.तालुका पनवेल उरण-महाल.१९२५

१३)होम डिपार्टमेंट स्पेशल ब्रँच फाइल क्रमांक :

१)७५०(७४)-२०-१९३२

२)८००(७४)-२०-१९४२

३)१०२०(५)-सी१९-१९४२

४)१११०(६)-ए २०-१९४२

५)१११०(८)-बी १६-१९४२

६)१११०(३७)- १-१९४२४३

७)३७ १ १९४२

८)एस डी.- ५ .२७९४

## ब)प्रकाशित साधने :

### गॅझेटिअर :

१)कुलाबा गॅझेटिअर १८८३

२)रायगड जिल्हा गॅझेटिअर दर्शनिक विभाग महाराष्ट्र शासनमुंबई.१९९३

३)सातारा गॅझेटिअर. १८८४

४)पुना गॅझेटिअर. १८८५

५)ठाणा गॅझेटिअर भाग १. १८८२

६)बॉम्बे सिटी गॅझेटिअर खंड - २१/९०९

७)गॅझेटिअर ऑफ दि बॉम्बे प्रेसिडेंसी कुलावा ॲण्ड जंजिरा खंड ११ वी.१९२६

### स्मरणिका:

१)उरण नगरपालिका शतसांवत्सरिका स्मृतिग्रंथ.१९६७

२)अलिबाग नगरपालिका स्मरणिका.१९६४

३)कर्जत नगरपालिका स्मरणिका.१९४२

४)कुलाबा जिल्हा लोकल बोर्ड पेण.१९२४

५)खोपोली नगरपालिका स्मरणिका.१९७६

६)पनवेल नगरपालिका शतसांवत्सरिका ग्रंथ.१९५७

७)महाड नगरपालिका स्मरणिका.१९६६

**स्वातंत्र्य सैनिकांचे लेखन:**

१)अधिकारी चंद्रकांत:खोती विरुध्दाचा लढा: श्रीमती उषा अधिकारी प्रकाशन गोरेगाव.१९९९

२)कानिटकर रा.प्र.श्री.जोशी ल.उपाध्ये श्याम गुळवणी (संपा): हरिभाऊ जोशी जीवन वृत्तान्त व आठवणी : पुणे. १९८३

३)कुंटे नाना : वाटचाल : महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ मुंबई. १९८२

४)गोडबोले द.श. : बांधीलकीची वाटचाल : गोडबोले प्रकाशन थळ.१९८२

५)चव्हाण शशिकांत : भारतीय स्वातंत्र्य संग्रामातील झुंझार क्रांतिवर हुतात्मा भाई कोतवाल : वीर कोतवाल युवक मंडळ दादर मुंबई. १९८९

६)आचार्य भाई ढवण : कै.नाना काणे चरित्र व कार्य : वैश्य विद्याश्रम सासवणे. १९५८

७)जोग गो.चि.तलाठी ज.छ. (संपा): रायगड जिल्हयाचा स्वातंत्र्य संग्राम : रायगड जिल्हा क्रांती दिन सुवर्ण महोत्सव समिती पेण. १९९२

८)दाते प.रा. : पेण तालुक्यातील स्वातंत्र्य संग्रामाचा इतिहास : दाते प्रकाशन पेण.१९७२

९)दाते प.रा. : चिरनेर जंगल सत्याग्रह : दाते प्रकाशन पेण.सप्टेंबर १९७१

१०)धारिया मोहन : सफर माझा राजकीय प्रवास : विश्वकर्मा साहित्यालय पुणे.१९७८

११)भडसावळे हरिभाऊ : कमांजली : भडसावळे प्रकाशन नेरळ. १९९२

१२)रहाळकर दाता: चिरनेर सत्याग्रह आणि उरणचा स्वातंत्र्य संग्राम: झूंज प्रकाशन उरण.१९९३

१३)सहस्त्रबुद्धे मा.के.: कर्मयोगी रामभाऊ मंडलिक: चरित्र ग्रंथ समिती पेण. १९९१

१४)सार्दक शंकर धोंडे: आचार्य भाई ढवण: आचार्य ढवण स्मृति प्रकाशन समिती अंधेरी मुंबई .१९७८

१५)श्रीवास्तव रामलाल : हुतात्मा कोतवाल स्वातंत्र्य समरातील एक पर्व : कोतवालवाडी प्रकाशन नेरळ. १९९७

**समकालीन वृत्तपत्र:**


१)वहिष्कृत भारत ३ फेबुवारी १९२८

२)कुलाबा समाचार १९ एप्रिल १९३०

३)कुलाबा समाचार २७ सप्टेंबर १९३०

४)कुलाबा समाचार ८ नोव्हेंबर १९३०

५)बॉम्बे क्रॉनिकल ७ जानेवारी १९३१

६)फ्री प्रेस जर्नल २८ नोव्हेंबर १९३१


## दुय्यम साधने


१)डॉ.आकलेकर भालचंद्र: कोकणाचा सांस्कृतिक इतिहास: नवभारत प्रकाशन संस्थामुंबई.२००३

२)आजगावकर जगन्नाथ रघुनाथ: प्रसिध्द पुरुषांच्या अप्रसिध्द गोष्टी: अलिबाग प्रकाशन् अलिबाग.१९७८

३)एन्थोवेन आर.ई.: दि ट्राईब्स ॲण्ड कास्टस ऑफ बॉम्बे स्टेट खंड ३ : कास्मो पब्लिकेशन्स् दिल्ली. १९७५

४) डॉ.कर्वे इरावती : युगान्त : प्रकाशन अनुपलब्ध

५)कालेकर गोविंद मंगेश : मुंबई इलाख्यातील जाती : वरदा प्रकाशन्पुणे.१९९९.

६)कुलकर्णी गो.म. :मराठी वाङ्मयाचा इतिहास खंड-६: महाराष्ट्र साहित्य परिषद् पुणे. १९८८

७)कुलकर्णी पी.व्ही. :इंडस्ट्रिअल डेव्हलपमेंट ऑफ कोकण: अप्रकाशित पीएच.डी प्रबंध १९६१

८)केतकर गोदावरी(संपा):कुलगुरू दादासाहेब केतकर संस्मरण ग्रंथ:पुणे विद्यार्थी गृह्पुणे १९८७

९)केळकर नरसिहं चिंतामण:लो.टिळक यांचे चरित्र खंड २: न.चि.केळकर प्रकाशन्पुणे१९२८

१०)केळकर श्रीपाद : असहकाराचे आंदोलन : कॉन्टिनेन्टल प्रकाशन् पुणे. २००३

११)केळकर श्रीपाद : छोडो भारत १९४२ : कॉन्टिनेन्टल प्रकाशन् पुणे.१९८३

१२)खैरमोडे चंगदेव भवानराव : डॉ.भीमराव रामजी आंबेडकर यांचे चरित्र: सुगाव प्रकाशन् मुंबई.१९९०

१३)गणवीर रत्नाकर(संपा): बहिष्कृत भारतातील डॉ.आंबेडकरांचे स्फुटलेख : रत्नमित्र प्रकाशन् भुसावळ .१९८१

१४)गायकवाड देविदास:कर्मयोगी दादासाहेब लिमये:गायकवाड प्रकाशन्देविचापाडापनवेल २००५

१५)घरत किशोर हरिश्चंद्र : उरणच्या शेतकऱ्यांचा ऐतिहासिक संग्राम : न्हावा शेवा बंदर कामगार संघटना उरण. २००२

१६)घोडके ह.म.: महाराष्ट्र गाथा : राजहंस प्रकाशन् पुणे. २०००

१७)डॉ.चौधरी के.के.: जळगाव जिल्हयातील स्वातंत्र्यलढा:ऑगस्ट क्रांती सुवर्ण महोत्सव

समिती महाराष्ट्र प्रदेश कॉंग्रेस कमिटी मुंबई .१९९७

१८)जेम्स डग्लस : बुक ऑफ बॉम्बे गॅझेट : स्टीम प्रेस मुंबई . १८८३

१९)जोशी गोविंद बाबाजी : रायगड किल्ल्याचे वर्णन : पुणे .१९२४

२०)जोशी वि.श्री.: आद्य क्रांतिकारक वासुदेव बळवंत फडके यांचे चरित्र : मुंबई. १९७४

२१)जोशी विष्णू श्रीधर : मृत्युंजयाचा आत्मयज्ञ : राजा प्रकाशन पुणे .१९८१

२२)जोग रा.श्री.: मराठी वाङ्मयाचा इतिहास खंड-४ : महाराष्ट्र साहित्य परिषद्पुणे .१९७३

२३)जोशी वि.कृ.:कुलाबा वर्णन: नारायणराव कुलकर्णी मेमोरियल वेल्फसर सोसायटीमुंबई १९५४

२४)जोशी विनायक सहस्त्रबुद्धे श्री.म.: दर्पण संग्रह : मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय मुंबई. १९४६

२५)ठोसर : कोकण एज्युकेशन सोसायटीचा इतिहास : सेक्रेटरी को.ए.सो.महाड. १९५१

२६)डेहेजिया विद्या: अर्ली बुद्धिस्ट रॉक टेंपल्स एक्रॉनॉलॉजिकल स्टडी : थॉमस ॲण्ड हडसम लंडन. १९७२

२७)ढबु दा.गो.: कुलाबकर आंग्रे सरखेल आंग्रे घराण्याचा इतिहास : शंकर नारायण जोशी प्रकाशन अलिबाग. १९३९

२८)तांबे भट्टविद्याभूषण : स्वराज्याच्या साधनांचा बाजार : तांबे प्रकाशनरत्नागिरी.१९३४

२९)दाते.प.रा.: कुलाबा जिल्ह्यातील कुडे मांदाड येथील गीरीगुहा : दाते प्रकाशनपेण.१९६९

३०)दिघे पी.डी. : महाराष्ट्रातील सामाजिक-सांस्कृतिक चळवळ: अक्षर प्रकाशनमुंबई.१९९५

३१)देशमुख मोरेश्वर: स्वाध्याय संदेश ठाकरे के.सी.यांचे निवडक निबंध: गोविंदाग्रज मंडळ दादर मुंबई. १९२३

३२)डॉ.देशमुख सी.डी. : दि.कोर्स ऑफ माय लाईफ : १९७४

३३)देशमुख एस.एम. : असा हा रायगड : सुधांश प्रकाशनअलिबाग.जून २००६

३४)पगडी सेतू माधवराव : श्री समर्थ आणि समर्थ संप्रदाय : १९८५

३५)परांजपे वामन कृष्ण : काळकर्ते शिवरामपंत पराजंपे : देशपांडे प्रकाशनपुणे.१९४५

३६)पर्वते त्र्य.वि.:नरसिंह चिंतामणएक महनीय व्यक्तीत्व: मनोहर ग्रंथमाल प्रकाशनपुणे.१९७२

३७)पोतदार दातो वामन (संपा) : माझा प्रवास : -आवृत्ती ४थी.जून १९९६

३८)प्रधान ग.प्र.: स्वातंत्र्य संग्रामाचे महाभारत : साधना प्रकाशन पुणे.१९८७

३९)पाटील वसंत भाऊ : चिरनेर जंगल सत्याग्रह : मयुरी प्रकाशन चिरनेर. १९९८

४०)पाटील प्रभाकर : कथा एका संघर्षाची : नागेश पब्लिशर्स वेशी अलिबाग. जानेवारी १९९४

४१)फडके गो.स.: आत्माराम–रमापती कै.आत्माराम महादेव आठवणे यांचे चरित्र : पनवेल प्रकाशन् पनवेल. एप्रिल १९५०

४२)फडके य.दि : विसाव्या शतकातील महाराष्ट्र खंड - १ : श्रीविद्या प्रकाशन्पुणे.१९८९

४३)फडके य.दि.: विसाव्या शतकातील महाराष्ट्र खंड १ : के.सागर पब्लिकेशन्स्पुणे.२००५

४४)फडके य.दि.: विसाव्या शतकातील महाराष्ट्र खंड-३ : श्रीविद्या प्रकाशन्पुणे. १९९१

४५)फडके य.दि.: विसाव्या शतकातील महाराष्ट्र, खंड ४ : श्रीविद्या प्रकाशन्पुणे.१९९३

४६)फडके य.दि.: विसाव्या शतकातील महाराष्ट्र खंड ५ : श्रीविद्या प्रकाशन्पुणे.१९९७

४७)वस्तावाला दिनू एस.: हिल ऑफ ब्युटी माथेरान सेंटेनरी १८५० ते १९५० ए गाईद बुक ॲण्ड हिस्टरी: न्यू बुक कंपनी मुंबई.१९५०

४८)वाळ श्रीकृष्ण दत्तात्रय : महाड किसान मोर्चा स्मृतिदिन विशेषांक : महाड.१० सप्टेंबर २००५

४९)प्रा.बिवलकर राम : नाना पुरोहित एका क्रांतिवीराची जीवनकथा : महाड पोलादपूर तालुका समाजवादी मित्र मंडळ प्रकाशन् मुंबई. १९७४

५०)बेर्डे विश्वनाथ रामचंद्र : कै.नाना काणे चरित्र : प्रकाशन अनुपलब्ध.

५१)भुदकवी वसंत: महाराष्ट्र वैभव मार्गदर्शक-कोकण विभाग : पुरुषार्थ प्रकाशन्पनवेल. १९७३

५२)भुस्कुटे प्रभाकर रघुनाथ : महाड गॅझेट : चिरंजीव प्रकाशन् महाड. २००२

५३)भुस्कूटे प्रभाकर रघुनाथ: थोर स्वातंत्र्य सेनानी चुनिलालभाई स्वातंत्र्यसैनिक : कै.चु.टि. जोशी एज्युकेशनल ॲण्ड चॅरीटेबल ट्रस्ट प्रकाशन् माणगाव.२००९

५४)महाजन टी.टी.:इंडस्ट्री ट्रेड कॉमर्स डुरिंग पेशवा पिरिअड :पाईट पब्लिसर्जयपूर.१९८९

५५)प्रा.म्हात्रे व्यंकटेश : वीर वाजेकर : मयुर प्रकाशन् खोपटे-उरण. २०००

५६)मालपुरवाला बाबुभाई:लोकमान्यास श्रध्दांजली: दि महाराष्ट्र ग्रंथ भांडर लिमिटेड मुंबई.१९४७

५७)मोकल गो.बा.: आगरी समाज शोध आणि बोध: काशीबाई मोकल प्रकाशन् तुर्भे.१९९६

५८)मोकाशी श.पा.: चिरनेर जंगल सत्याग्रहातील हुतात्म्यांच्या पराक्रमाची अमत गाथा : लिला प्रतिष्ठान प्रकाशन् पाणदिवे-उरण. १९९५

५९)मोरजे गंगाधर : महाराष्ट्रातील सांस्कृतिक परिवर्तन आणि ख्रिस्तीधर्मीय: लोक वाङ:मय प्रकाशन् मुंबई. १९९२

६०)मालशे स.ग.: मराठी वाङ्मयाचा इतिहास खंड-२ : महाराष्ट्र साहित्य परिषद्पुणे.१९९२

६१)रिचर्ड कॅशमन:दि मिथ ऑफ दि लोकमान्य टिळक अॅण्ड मास पोलिटिक्स इन महाराष्ट्र: १९७५

६२)रॉबिन्सन : इंटर कोर्स बिटवीन इंडिया ॲण्ड दि वेस्टर्न वर्ल्ड : केंब्रिज. १९१६

६३)लेले रा.के. : मराठी वृत्तपत्रांचा इतिहास : कॉंटिनेन्टल प्रकाशन् पुणे. १९८४

६४) प्रा.शेणोलीकर ह.श्री. व डॉ.देशपांडे प्र.न.: महाराष्ट्र संस्कृती घडण आणि विकास : मोघे प्रकाशन् कोल्हापूर. १९७२

६५)शेलकर अभय : वन संरक्षण कायदा : नाशिक लॉ हाउस प्रकाशन् औरंगाबाद.२००५

६६)शिखरे दा.न. : गांधी चरित्र : प्रकाशन अनुपलब्ध.

६७)शिंदे भानुदास(संपा): कोकणातील शेतकरी चळवळीचा इतिहास : एम.पी.ए.एस.सी. कॉलेज़ पनवेल.फेब्रुवारी २००५

६८) डॉ.सांकलिया ह.श्री.: अस्मिता महाराष्ट्राची : प्रकाशन अनुपलब्ध.

६९)सरदार ग.बा(संपा) : महाराष्ट्र जीवन : जोशी लोखंडे प्रकाशन् पुणे. १९६०

७०)सदावर्ते प्रार्थना : समग्र पनवेलची गाथा : आशय प्रकाशन् पनवेल .२००६

७१) सामान्य भूगोल : रायगड जिल्हा इयत्ता तिसरी. १९९३

७२) सवदी ए.बी. : द मेगा महाराष्ट्र, : निराली प्रकाशन् पुणे. आवृत्ती ८ वी २००५

७३)सुराणा पन्नालाल : आपला महाराष्ट्र, : समाजप्रबोधन संस्था पुणे. १९६०

७४) प्रा.सोनार ब.लू.: महाराष्ट्राचा सांस्कृतिक इतिहास: मोघे प्रकाशन् कोल्हापूर.१९८५

**वृत्तपत्र व मासिक**

१)सन्मित्र मासिक ठाणे १५ ऑगस्ट १९८१
२)सकाळ वृत्तपत्र ६ एप्रिल १९८८
३)सागर दैनिक विशेषांक डिसेंबर १९९०
४)लोकसत्ता २२ सप्टेंबर १९९४
५)पुढारी १५ ऑगस्ट १९९४
६)सकाळ १५ ऑगस्ट १९९७
७)लोकसत्ता लोकरंग १६ नोव्हेंबर १९९७
८)उरण टाइम्स सप्टेंबर २००५
९)लोकसत्ता मुंबई १४ ऑगस्ट २००७
१०)लोकसत्ता मुंबई ९ ऑगस्ट २००७

# स्वातंत्र्य सैनिकांचे फोटो

१)पेण ताल्युक्यातील स्वातंत्र्य सैनिक

२)पनवेल-उरण ताल्युक्यातील स्वातंत्रय सैनिक

३)अलिबाग-महाड-पनवेल-उरण ताल्युक्यातील स्वातंत्रय सैनिक

४)नाना पुरोहित यांचे महाड किसान मोर्चातील सहकारी


५)कर्जत ताल्युक्यातील स्वातंत्रय सैनिक

६)स्वातंत्रय चळवळीतील इतर महत्त्वाचे फोटो


# स्वातंत्र्य सैनिक



रामभाऊ नारायण मंडलीक



प.रा.दाते



भाऊसाहेब नेने



हिरु महादू म्हात्रे वाशीकर



हेमचंद्र भाईदास गजर



गणेश रघुनाथ लिमये



मुकूंद नारायण लिमय दादासाहेब लिमये

# स्वातंत्र्य सैनिक



प्रभाकर गुप्ते



नानासाहेब वेडेकर




विमल गुप्ते



केशव गणेश गुप्ते



आप्पासाहेब वेदक



रा.ग.आपटे



धनाजी जोमा म्हात्रे



सखाराम केशव पोवळे




भारकू अंबाजी चिर्लेकर

# स्वातंत्र्य सैनिक



विठ्ठल लक्ष्मणराव कोतवल




गोमाजी पाटील




हिराजी पाटील



शांतीलाल दलाल



रामलाल बन्सीलाल श्रीवास्तव



चापराजभाई श्रॉफ



धोंडू देसाई



भगत मास्तर




अण्णासाहेब सहस्त्रबुद्धे

# स्वातंत्र्य सैनिक



नारायण नागू पाटील



नाना पुरोहित



शंकरभाई गांधी



नानासाहेब टिपणीस



हरीभाऊ मोरेश्वर जोशी पनवेल



सुमन शिरवटकर



पांडुरंग काशिनाथ पोटे



मदन गजानन मानकामे

# नाना पुरोहित यांचे महाड किसान मोर्चातील सहकारी



नाना पुरोहित यांचे महाड किसान मोर्चातील सहकारी



नाना पुरोहित यांचे महाड किसान मोर्चातील सहकारी



नाना परोहित यांचे महाड किसान मोर्चातील सहकारी

# स्वातंत्र्य चळवळीतील वास्तु





आप्पासाहेब वेदकांचे घर-पनवेल कॉंग्रेस हाऊस

१९४२ च्या अलिबाग चळवळीचे केंद्र:-केळकर वाडा

# स्वातंत्र्य सैनिक

श्री. वि.ना. उर्फ दादासाहेब लिमये
श्री. प्र.ग. उर्फ दादा प्रधान
श्री. गणेश रघुनाथ लिमये
श्री.दामोदर आत्माराम ऊर्फ अण्णा मोकाशी
श्री.दत्तात्रय रावजी फडके
श्री.हिरू महादू म्हात्रे
श्री.चंद्रकांता शंकर चिखले
श्री.गोविंद चिंतामण जोग
श्री.खंडेराव मुकुंद कुळकर्णी
श्री.गौऱ्या आंबो सोनावळे
श्री.हिरालाल हेमचंद्र शहा
श्री.दिगंबर विनायक तथा नानासाहेब पुरोहित
श्री.शंकर गोपिनाथ गांधी
श्री.बाबुराव तथा डी.पी मेहताा
श्री.प्रभावती चुनीलाल बुटाला
श्री.लक्ष्मण अनाजी तरे
श्री.गंगाराम महादेव सकपाळ
श्री. तुळजाराम मिठा शेट
श्री.डिंगणकर रघुनाथ रामचंद्र
श्री.जनार्दन विष्णू तथा भाऊसाहेब लेले
श्री.दत्तात्रय काशिनाथ तथा नानासाहेब कुंटे
श्री.गजानन यज्ञेश्वर म्हसकर
श्री.चिंतामणशास्त्री जोशी
श्री.नारायण कान्होबा भगत
श्री.परशुराम पांडूरंग वैशंपायन
श्री.सुधागड तालुका
श्री.शांताराम रामचंद्र मुळे
श्री.आचार्य वासुदेव पुरूषोत्तम
श्री.भालचंद्र गोविंद कुळकर्णी
श्री.अप्पा शिवराम काटम
श्री.शंकर महादेव महांकाळ
श्री.अली महमद हमदुले
श्री.ज.भा.म्हापुसकर
श्री.महदेव सदाशिव पेंडसे
श्री.वसंत महादेव ऊर्फ अप्पासाहेब वेदक
श्री.आत्माराम महादेव आटवणे
श्री.शेठ चापसी पुरूषोत्तम ऊर्फ शंभूशेठ

श्री. ना.य.ऊर्फ भाऊसाहेब नेने
श्री. परशुराम रामचंद्र उर्फ अण्णा दातो
कुमारी दुर्गाबाई मुकुंद लिमये
डॉक्टर मुकुंद नारायण लिमये
श्री.रामचंद्र नारायण मंडलीक
श्री.वसंतराव विठ्ठलदास कोठारी
श्री.जगन्नाथ छगन तलाठी
श्री.शंकर सदाशिव घटवई
श्रीमती. भागीरथीबाई वैजनाथ पटवर्धन
श्री. नारायण मार्तंड धारकर
श्री.आचार्य विनोबा भावे
श्री.शिवराम महादेव परांजपे
श्री. पितांबर गोकूळ मेहता
श्री.माणिकचंद मोतिराम मेहता
श्री.रामचंद्र मोरेश्वर बागडे
श्री.जनार्दन शंकर पोतदार
श्री.रघुनाथ गंगाराम (तथा भाऊ) लकेश्री
श्री. नरहर यज्ञेश्वर चितळे
श्री.कृष्णाजी गजानन हेलेकर
श्री. वामन गोविंद तथा बाबासाहेब लिमये
श्री. गणेश भास्कर पंडित
श्री. रामचंद्र रघुनाथ नाईक
श्री.धर्मा बारकू पाटील
श्री. रामजी लक्ष्मण घरत
श्री.नरहर काशिनाथ जोशी
श्री.लिमये पुरूषोत्तम गोविंद
श्री.धोंडू ऊर्फ कोंडू बाळू ढेबे (धनगर)
श्री. रामजीभाई पुरूषोत्तम मेहता
श्री.राजाराम मुकुंद ऊर्फ राजाभाऊ चांदोरकर
श्री.कांतिलाल भगवानदास शहा
श्री. बाळकृष्ण गणेश ऊर्फ बाबुराव भावे
श्री. सिताराम विश्वनाथ टिळक
श्री.रघुनाथ दामोदर पेंडसे
श्री. गोविंद काशिनाथ ऊर्फ गोंदूकाका पटवर्धन
श्री. त्रिंबक नारायण ऊर्फ नानासाहेब बेडेकर
श्री.पुरूषोत्तम गोपाळकृष्ण ऊर्फ तात्या बापट
श्री.नटवरलाल पितांबरदास शहा

| | |
|---|---|
| श्री. कांतिलाल कानजी ऊर्फ काका सादराणी | श्री. रामचंद्र विनायक दाबके |
| श्री. नरहर परशुराम ऊर्फ बाबासाहेब ठोसर | श्री. विश्वनाथ रामचंद्र ठाकरे |
| ॲड. वसंत काशिनाथ कुंटे | श्री. वामन मल्हार जोशी |
| डॉ. केशवलाल दामोदर धुवाड | श्रीमती. पुष्पलता अनंत आंबेतकर |
| श्री. धुंडीराज विनायक वैद्य | श्री. पांडूरंग बाळकृष्ण कोळेकर |
| श्री. अनंत केशव राजपूरकर | श्री. बस्वलिंग गणलिंग जंगम |
| श्री. रामचंद्र त्र्यंबक पेठे | श्री. रामचंद्र विश्वनाथ ऊर्फ नानासाहेब अधिकारी |
| श्री. विष्णू भगवान शेठ | श्री. दत्तात्रय मालोजी तळेगावकर |
| श्री. वसंत दयाराम समेळ | श्री. रामचंद्र विठ्ठल आडीत |
| श्री. लीलाचंद्र अमीचंद मोदी | श्री. रामचंद्र भगवान शेठ |
| श्री. प्रभाकर संताजी ऊफी भाई सुळे | श्री. प्रभाकर रामकृष्ण देशमुख |
| श्री. शामळदास साखळचंद्र मेहता | श्री. गोपिनाथ लालजी गांधी |
| श्री. विठ्ठल गणपत शेठ | श्री. दत्तात्रय गणपत सावळे |
| श्री. अंबाजी बुदा मालुसरे | श्री. दत्तात्रय काशिनाथ जोशी |
| श्री. गणेश अनंत करमरकर | श्री. गोपाळराव मल्हारराव शिंदे |
| श्री. पेटण्णा नारायण कोतवाल | श्री. राघो नागा भगत |
| श्री. हरीभाऊ धोंडो भडसावळे | श्री. केशवराव जोशी |
| श्री. हरिलाल करसनदास मेहता | श्री. काळू हिरू परदेशी ऊर्फ गोविंद हरी पाटील |
| श्री. विष्णू विठ्ठल कोटकर | श्री. गजानन बाळू चिर्लेकर |
| श्री. शंकर पांडूरंग चौधरी | श्रीमती उमाबाई जानकू ठाकूर |
| श्री. दत्तात्रय सिताराम ठाकूर | श्री. विठोबा पंढरिनाथ ठाकूर |
| श्री. कृष्णाजी अंबाजी डाऊर | श्री. द्वारकानाथ गजानन तांबडे |
| श्री. केशव चुनीलाल दोशी | श्री. एकनाथ भिकाजी पडते |
| श्री. काशिनाथ राणबा पाटील | श्री. ठोमा बाळया पाटील |
| श्री. नानू झिटया पाटील | श्रीमती रेणुबाई रघुनाथ पाटील |
| श्री. वसंत परशुराम पाटील | श्रीमती सुलोचना कृष्णराव ऊर्फ बाबूराव पानसरे |
| श्री. यशवंत वामन पोवळे | श्री. शंकर विनायक पौडवाल |
| श्री. गोपीनाथ भाऊ माळी | श्री. अप्पा अंबू म्हात्रे |
| श्री. मोतिराम रामचंद्र म्हात्रे | श्री. मोरेश्वर गोविंद म्हात्रे |
| श्री. हिऱ्या माया म्हात्रे | श्री. जयंतीलाल रणछोडदास मेहता |
| श्री. म्हात्रे हिराजी जोमा | श्री. बाळाराम हरी मोकाशी |
| श्री. दत्तात्रय गणेश राहळकर | श्री. विष्णू गणेश रहाळकर |
| श्री. लल्लूभाई अभयचंद्र सरवैय्या | श्री. हऱ्या पांग्या साईकर |
| श्री. चिंतामण गणेश देशपांडे | श्री. देवराय नारायण काठे |

# नकाशे

१)महाराष्ट्र

२)कुलाबा जिल्हाा

३)रायगड जिल्हा


४)असहकार चळवळीतील महत्वाची ठिकाणे

५)मीठ सत्याग्रह चळवळीतील महत्वाची ठिकाणे


६) जंगल सत्याग्रह चळवळीतील महत्वाची ठिकाणे

७) १९४२ ची चले जाव चळवळीतील महत्वाची ठिकाणे

# नकाशा :- १ )महाराष्ट्र


महाराष्ट
वास्तूत नक्षा
मध्य प्रदेश
N
गुजारात
नंदूरबार
जलगांव
अकोला
अमरावती
नागपूर
मंडारा
गोनडीया
धूले
बुलडांना
दाद्रा व नगर हवेली
दामन व डूव
अजनता रेंज
सामाला रेंज
वाशीम
यवतमाळ
गडचिरोली
चंद्रपूर
नासिक
अवरंगाबाद
जालना
हीगोली
ठाणे
परभनी
मुंबई
अहमदनगर
अलीबाग
पूणे
बालघट रेंज
लातूर
राजपूरी क्रीक
उस्मानाबाद
अंद्र प्रदेश
महाबलेश्वर
सातारा
सोलापूर
दाभोल क्रीक
जयगड क्रीक
रत्नागिरी
सांगली
अरब महासागर
कर्नाटका
विजयदूर्ग क्रीक
कोल्हापूर
पोडा घाट
सिध्ददूर्ग
अंबोली घाट
LEGEND
1200 and Above
900
600
300
0 Sea Level
नदी
राज्य मुख्यालय
जिल्हा मुख्यालय
Map not to scale
Copyright © 2006 Compare Infobase Limited

# नकाशा :- २)कुलाबा जिल्हा


भौगोलिक रचना व शासनव्यवस्था
ठाणें जिल्हा
तालुका
महाल
तालुका-महालाचें मुख्य ठिकाण
जिल्ह्याचें मुख्य ठाणें
पोलीस हेडक्वार्टर्स
पोलीस स्टेशन
पोलीस आऊटपोस्ट स्टेशन
तालुकाधिकारी न्यायालयें
प्रांताधिकारी न्यायालयें
दिवाणी व फौजदारी न्यायालयें
जिल्हा न्यायालय
पनवेल
कर्जत
माथेरान
नेरळ
कळंब
कशेळें
घारापुरी
मोरे
उरण
चिरनेर
चौक
खालापूर
खापोली
पेण
मांडवा
अलिबाग
पोयनाड
रेवदंडा
जांभुळपाडा
नागोठणें
पाली
रोहा
कोलाड
मुरुड
निजामपूर
तळें
माणगांव
गोरेगांव
बोर्ली पंचायतन
म्हसाळें
खामगाव
श्रीवर्धन
महाड
पोलादपूर
उत्तर सातारा जिल्हा
रत्नागिरी जिल्हा

# नकाशा :- ३)रायगड जिल्हा

